मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्र. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई – ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

निवेदन

राज्य मराठी विकास संस्था, मुंबई ही महाराष्ट्र शासनाने स्थापन केलेली स्वायत्त संस्था आहे. मराठी भाषा विभागाच्या पत्राप्रमाणे (संदर्भ क्र. मसंस २०१६/प्र.क्र.११५/२०१६/भाषा-२, दि. ३ जानेवारी, २०१७) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे '**महाराष्ट्रातील मराठी संशोधन मंडळ/ संस्थांना अर्थसाहाय्य योजना**' कार्यान्वित करण्यात आली असून या योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील मराठी भाषा, साहित्य व संस्कृती वृद्धिंगत होण्यासाठी काम करणाऱ्या महाराष्ट्रातील मान्यताप्राप्त मंडळ/ संस्थांना अर्थसाहाय्य करण्यात येते.

सदर प्रकल्पांतर्गत प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांना राज्य मराठी विकास संस्थेद्वारे नवभारत मासिकांचे ऑक्टोबर १९४७ ते सप्टेंबर २०१७ पर्यंतच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासाठी अर्थसाहाय्य करण्यात आले होते. याअंतर्गत सदर अंकांचे संगणकीकरण करण्यात आले असून **प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांनी हे अंक जतन केलेले असल्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.**

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर असणार नाही.

उमेशचंद्र बॅनर्जी ■ दादाभाई नवरोजी ■ बद्रुद्दीन तय्यबजी ■ जॉर्ज यूल ■ विल्यम वेडरबर्न ■ फेरोजशहा मेहता ■ पी. आनंद चार्लू ■ अल्फ्रेड वेब ■ सुरेंद्रनाथ बॅनर्जी ■ रहिमतुल्ला मोहंमद सयानी ■ सी. शंकर नायर ■ आनंद मोहन बोस ■ रमेशचंद्र दत्त ■ नारायण गणेश चंदावरकर ■ दिनशा एडलजी वाछा ■ लाल मोहन घोष ■ सर हेन्री कॉटन ■ गोपाळ कृष्ण गोखले ■ राशबिहारी घोष ■ पं. मदन मोहन मालवीय ■ बिशन नारायण दार ■ रंगनाथ नृसिंह मुधोळकर ■ नबाब सइद मोहंमद बहादूर ■ भूपेंद्रनाथ बसू ■ सत्येंद्र प्रसन्न सिन्हा ■ अंबिकाचरण मझुमदार ■ ॲनी बेझंट ■ सईद हसन

नवभारत

वर्ष ३९ । अंक ८-९ मे-जून १९८६

इंडियन नॅशनल काँग्रेस १८८५-१९८५

खंड २ : स्वातंत्र्योत्तर काळ

इमाम ■ पं मोतीलाल नेहरू ■ लाला लजपत राय ■ सी. विजय राघव चारियार ■ देशबंधू चित्तरंजन दास ■ मौ. अबुल कलाम आझाद ■ मौ. महंमद अली ■ महात्मा गांधी ■ सरोजिनी नायडू ■ एस्. श्रीनिवास अय्यंगार ■ मुख्तार अहमद अन्सारी ■ पं. जवाहरलाल नेहरू ■ वल्लभभाई पटेल ■ राजेंद्र प्रसाद ■ सुभाषचंद्र बोस ■ आचार्य कृपलानी ■ पट्टाभी सीतारामय्या ■ पुरुषोत्तमदास टंडन ■ यू. एन्. ढेबर ■ नीलम संजीव रेड्डी ■ के. कामराज ■ एस्. निजलिंगप्पा ■ जगजीवनराम ■ शंकरदयाळ शर्मा ■ देवकांत बरूआ ■ इंदिरा गांधी ■ राजीव गांधी ■ ■ ■ ■ ■ ■ ■ ■ ■ ■ ■ ■ ■ ■

अनुक्रमणिका

प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई संचालित मासिक

नवभारत

वर्ष ३९ । अंक ८–९ । मे–जून १९८६
किंमत १५ रुपये वार्षिक वर्गणी ३० रुपये
आजीव सदस्य वर्गणी–
व्यक्ती : रु. ३००/– संस्था : रु. ५००/–

संपादकीय पत्रव्यवहार :
मे. पुं. रेगे,
संपादक, 'नवभारत' मासिक,
द्वारा : प्राज्ञपाठशाळा मंडळ,
वाई–४१२ ८०३ (जि. सातारा)

व्यवस्थापकीय पत्रव्यवहार :
श्री. ग. दीक्षित,
व्यवस्थापक, 'नवभारत' मासिक,
द्वारा : दी प्राज्ञ प्रेस, वाई–४१२ ८०३.
(जि. सातारा)

या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाकडून अनुदान मिळाले.

अनुक्रमणिका

नवभारत

मे-जून १९८६

अनुक्रम

लेखक-परिचय

■ **देवदत्त दाभोलकर :** माजी कुलगुरू, पुणे विद्यापीठ; भूतपूर्व संचालक, इंडियन इन्स्टिटयूट ऑफ एज्यूकेशन, पुणे २९; निवास : समन्वय, क्षिप्रा सहकारी वसाहत, २५/५/८ कर्वेनगर, पुणे-४११०२९. ■ **प्र. म. बांदिवडेकर :** रामनारायण रुइया कॉलेज, मुंबई येथे राज्यशास्त्राचे प्राध्यापक; निवास : ४६/१५८१ सुभाषनगर, चेंबूर, मुंबई-४०० ०७१. ■ **भास्कर लक्ष्मण भोळे :** प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, नागपूर विद्यापीठ, नागपूर; निवास : १६ ब, विद्याविहार, प्रतापनगर, नागपूर-४४० ०२२. ■ **वि. मा. बाचल :** उपप्राचार्य आणि राज्यशास्त्राचे प्राध्यापक, फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे. ■ **सत्यरंजन साठे :** माजी कुलगुरू, पुणे विद्यापीठ; निवृत्त प्राचार्य, लॉ कॉलेज, पुणे. ■ **पन्नालाल सुराणा :** समाजवादी विचारवंत, १२५-२६ औद्योगिक वसाहत, सोलापूर. ■ **ह. कृ. परांजपे :** एलफिन्स्टन कॉलेज, सिडनहॅम कॉलेज, इंडियन इन्स्टिटयूट ऑफ पब्लिक अॅड-मिनिस्ट्रेशन ह्या शिक्षणसंस्थांतून अर्थशास्त्राचे अध्यापन; भारत सरकारच्या विविध समित्यांवर अध्यक्ष वा सदस्य ह्या नात्याने काम; इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्चचे सीनिअर फेलो, जवाहरलाल नेहरू फेलो; निवास : सोनाली, प्रभात रोड, गल्ली ६, पुणे-४११ ००६. ■ **अविनाश यशवंत जोशी :** अर्थशास्त्राचे प्राध्यापक, बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालय, पुणे-४११ ००४.

○ ○ ○

संपादकीय

'नवभारता'च्या काँग्रेस शताब्दी विशेषांकाचा दुसरा भाग प्रकाशित करताना आम्हाला आनंद होत आहे.

स्वातंत्र्यकाळातील काँग्रेस हा ह्या भागाचा मुख्य विषय आहे. ह्या काळात लोकशाही राज्य-व्यवस्थेतील सत्ताधीश पक्ष असेच काँग्रेसचे स्वरूप प्रामुख्याने राहिले. ह्यामुळे काँग्रेसच्या ह्या कालखंडातील इतिहासाचा आढावा आणि सरकारची धोरणे, उद्दिष्टे आणि कार्यक्रम ह्यांचा आढावा ह्यांची एकमेकांपासून फारकत करणे अशक्य आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळातील काँग्रेसचे स्वरूप, तिने जाहीरपणे स्वीकारलेली उद्दिष्टे आणि भारतीय जनतेतील विविध घटकांना दिलेली आश्वासने ह्यांची आणि स्वातंत्र्यकाळात, प्रौढ मतदानाच्या हक्कावर आधारलेल्या लोकशाही व्यवस्थेत सत्ता अंकित करण्यासाठी काँग्रेसने स्वीकारलेली रणनीती (स्ट्रॅटजी) ह्याचे तिच्या स्वरूपावर आणि धोरणे-कार्यक्रम ह्यांच्यावर झालेले परिणाम आणि विशेषत: तिला कराव्या लागलेल्या तडजोडी ह्यांची तपशीलवार तुलना होणे आवश्यक आहे. अशी तुलना बदलत गेलेल्या राजकीय आणि सामाजिक परिस्थितीच्या, तसेच काँग्रेसमधून फुटून बाहेर गेलेल्या किंवा स्वतंत्र-पणे उदयाला आलेल्या प्रतिस्पर्धी राजकीय पक्षांच्या संदर्भात करावी लागेल. भारतीय जनतेचे एक आधुनिक राष्ट्र ह्या स्वरूपात संघटन करणे आणि त्याच्या राजकीय आकांक्षांना उद्‌गार देणे हे काँग्रेसचे एक ऐतिहासिक कार्य आहे. धार्मिक व वांशिक अल्पसंख्यांची अस्मिता, त्यांची भीती आणि त्यांच्या आकांक्षा ह्यांना स्वातंत्र्याच्या कालखंडात कोणत्या प्रकारचा प्रतिसाद दिला आणि राष्ट्रीय एकात्मता दृढ करण्यात तिला किती यश-अपयश आले ह्याचेही सर्वांगीण विश्लेषण होणे आवश्यक आहे.

काँग्रेसच्या स्थापनेपासूनच्या इतिहासाचा एक भाग असलेल्या ह्या अंकात हे सर्व विषय विस्ताराने अंतर्भूत करणे व्यवहार्य नव्हते. काँग्रेसच्या ह्या कालखंडातील इतिहासाची रूपरेखाच काय ती ह्या अंकात देता येणे शक्य झाले आहे. परंतु हे महत्त्वाचे विषय आहेत आणि त्यांच्यावर अधिकारी विद्वानांचे लेख प्रसिद्ध करण्याचा आमचा संकल्प आहे.

आमच्या विनंतीला मान देऊन ह्या अंकासाठी लेख लिहिणाऱ्या लेखकांचे, तसेच जाहिरात-दारांचे व अन्य साहाय्यक व हितचिंतक यांचे आम्ही ऋणी आहोत.

○ ○ ○

काँग्रेसमधील नेहरूपर्व

देवदत्त दाभोलकर

एका संपन्न सुसंस्कृत घरातील संस्कार घेऊन शालेय शिक्षणासाठी जवाहरलाल नेहरू इंग्लंडमध्ये हॅरो या जगप्रसिद्ध शाळेत दाखल झाले व नंतर केंब्रिज विद्यापीठातून भूशास्त्र, रसायनशास्त्र व वनस्पतिशास्त्र या शाखांच्या अभ्यासात पदवी मिळवून १९१२ मध्ये भारतात आले.

येथवरच्या संस्कारांचाही त्यांच्या जीवनावर चिरकाल टिकणारा ठसा उमटला व यातून झालेली त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची घडण पुढे त्यांच्या कार्य-कर्तृत्वाला आकार देत राहिली. भारतीय संस्कार व पाश्चिमात्य संस्कृतीचा संपर्क यांतून त्यांची मनोभूमिका घडली, त्याचप्रमाणे ब्रिटिश लोकशाहीतील उदारमतवाद व त्याचबरोबर ब्रिटनमध्ये त्या वेळी प्रसृत असणारे लोकशाही समाजवादी बैठकीचे विचारही या कालखंडात त्यांच्या मनोभूमीत रुजले.

जवाहरलाल बॅरिस्टर होऊन भारतात परतले तरी त्या व्यवसायात त्यांचे मन सुरवातीपासूनच रमले नाही. (पुढे प्रतिकात्मकरीत्या आझाद हिंद सेनेतील सैनिकांवर झालेल्या खटल्याच्या वेळी त्यांच्या बचावाच्या बाजूने त्यांनी वकिलाची वस्त्रे परिधान केली, एवढाच नंतरच्या त्यांच्या सर्व आयुष्यातील एकमेव अपवाद.)

या सुसंस्कृत तरुण मनाला त्याच सुमारास आफ्रिकेतून परत येऊन कार्य करू लागलेल्या गांधीजींचे आकर्षण वाटू लागले असल्यास नवल नाही. अन्यायाचा प्रतिकार केलाच पाहिजे, ही जवाहरलालजींची वृत्ती होतीच; ब्रिटिश राजवटीचे ते विरोधक होते. परंतु ब्रिटिशांविषयी उग्र, कडवट अशी भावना त्यांच्या मनात नव्हती. आततायी शस्त्राचाराने स्वातंत्र्यसंपादन शक्य होणार नाही हे स्पष्ट दिसत होते. अशा वेळी ब्रिटिश राजवटीचा द्वेष करा परंतु ब्रिटिश लोकांचा द्वेष करू नका, अन्यायाचा प्रतिकार केल्यावाचून राहू नका परंतु तो शस्त्राने न करता निर्धारपूर्वक केलेल्या सत्याग्रहाने करा, असे सांगणाऱ्या व त्याप्रमाणे व्यक्तिगत आचरण स्वतः करून राष्ट्राला त्या दिशेने नेण्याची कुवत असणाऱ्या गांधीजींच्या प्रभावाखाली ते आले यात नवल नाही. १९१६ साली त्यांची आणि गांधीजींची भेट झाली. १९२० साली काँग्रेस पूर्णपणे गांधीजींच्या नेतृत्वाखाली आली. यानंतर गांधीजींच्या निधनापर्यंत मध्यंतरी अनेकदा चढउतार झाले तरी काँग्रेसवर गांधीजींचाच प्रभाव होता. या कालखंडात गांधीजी आणि नेहरू यांच्यामध्येही अनेकदा मतभेद झाले तरी नेहरूंनी गांधीजींचे श्रेष्ठत्व सदैव निरपवादपणे मानले. आणि याहूनही महत्त्वाचे म्हणजे गांधीजींशी असणारे त्यांचे जवळजवळ पिता-पुत्राच्या नात्याचे जिव्हाळ्याचे अनुबंध उभयतांत कितीही मतभेद झाले तरी दोघांकडूनही सदैव अतूट उत्कट असेच राहिले. गांधीजींच्या निधनापर्यंत या जिव्हाळ्यात कधी एक दिवसही अंतर पडले नाही. ही घटना केवळ त्या दोघांच्या जीवनाच्या दृष्टीनेच नव्हे, तर राष्ट्रजीवनाच्या दृष्टीनेही इतिहासावर परिणाम करणारी अशी महत्त्वाची ठरली.

ज्या व्यक्तीविषयी कोणत्याही कारणाने का होईना, आपल्याला पूर्ण विश्वास वाटेल तिच्या पाठीशी अधिक तपशीलाचा विचार न करता उभे राहावे ही भारतीय जनतेची मनःप्रकृती आहे असे समजावयास हरकत नाही. विसाव्या शतकातील भारताचा इतिहास याची साक्ष आहे. लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी, आणीबाणीच्या काळातील जयप्रकाश नारायण व आज राजीव गांधी ही याची उदाहरणे आहेत. नेहरूंच्या कालखंडात जवाहरलालनी गांधीजींशी स्पर्धा करण्याचा प्रश्नच नव्हता व तशी कल्पनाही

अनुक्रमणिका

चुकून कधी त्यांच्या मनात आली नाही. धोरणात्मक मतभेदांमुळे ज्या ज्या वेळी त्यांच्यामध्ये प्रत्यक्ष राजकारणात अंतर पडले, त्या वेळीही अशी स्पर्धेची भावना नेहरूंच्या मनात कधी आली नाही. आली तर असा दुरावा निर्माण व्हावा याविषयी दुःखाचीच भावना त्या दोघांच्या मनात असे. अगदी फाळणीपूर्वीदेखील जेव्हा नेहरू-पटेल यांनी फाळणीला मान्यता द्यावयाची भूमिका घेतली व गांधीजी फाळणीला विरोधी होते, तेव्हाही या हार्दिक भावनेत फरक पडला नाही.

वल्लभभाई पटेल यांची काँग्रेससंघटनेवर पकड होती. परंतु जनतेच्या अंतःकरणाला आकर्षित करू शकेल असे वलय त्यांच्या व्यक्तिमत्त्वाभोवती कधीच निर्माण होऊ शकले नाही. लोकप्रियतेत नेहरूंच्या जवळपास येऊ शकेल अशी प्रतिमा केवळ सुभाषचंद्र बोस यांच्या व्यक्तिमत्त्वाचीच होती. नेहरू आपल्यापेक्षा लोकप्रिय आहेत याची जाणीव बोस यांना होती. परंतु स्वातंत्र्यसंपादनानंतर बोस भारतात जिवंत परत आले असते, तर नेहरू व बोस यांच्या स्पर्धेत गांधीजींच्या नंतर कोणती परिस्थिती निर्माण झाली असती हे सांगणे कठीण आहे. परंतु तो प्रश्नच उपस्थित न झाल्यामुळे त्या दिशेने विचार ताणण्याचे कारण नाही. परंतु तरीही गांधीजी आणि बोस यांच्यामधील संघर्ष, त्याआडून काही प्रमाणात चालणारा काँग्रेसमधील डाव्या-उजव्या गटांचा संघर्ष, डाव्या गटाचे प्रमुख नेहरू यांनी त्या संघर्षात गांधीजींच्या बाजूने घेतलेली भूमिका या सर्व घटना काँग्रेसच्या इतिहासात महत्त्वाच्या आहेत.

एका दृष्टीने काँग्रेसमधील नेहरूयुग, नेहरू काँग्रेसमध्ये आले तेव्हापासूनच सुरू झाले. नेहरूंनी १९१९ मध्ये जालियनवाला बाग समितीला साहाय्य केले. १९२१ मध्ये सत्याग्रह करून त्यांनी तुरुंगवास सोसला. १९२२ ते १९२९ या कालखंडात ते काँग्रेसचे सरचिटणीस राहिले. याला अपवाद फक्त १९२६ या वर्षाचा. त्या वर्षी कमला नेहरू यांच्या आजाराच्या कारणासाठी त्यांना स्विट्झर्लंडमध्ये जावे लागले.

१९२९ मध्ये नेहरूंची काँग्रेसच्या अध्यक्षपदी निवड झाली. संपूर्ण स्वातंत्र्याची प्रतिज्ञा त्या अधिवेशनात घेण्यात आली. १९३६ मध्ये परत त्या वेळी काँग्रेसचे अध्यक्ष असताना त्यांनी काँग्रेस अध्यक्षपदावरून समाजवादाचा पुरस्कार केला. १९४० मध्ये व्यक्तिगत सत्याग्रहाच्या वेळी गांधीजींनी विनोबांची पहिला सत्याग्रही व नेहरूंची दुसरा सत्याग्रही म्हणून निवड केली. 'माझा राजकीय वारस' म्हणून गांधीजींनी नेहरूंचा निर्देश या आधीच बरीच वर्षे केला होता. ८ ऑगस्ट १९४२ चा 'छोडो भारत' ठराव नेहरूंनी मांडला. १९४७ मध्ये मौंटबॅटनबरोबर चर्चा करून फाळणी स्वीकारण्याचा निर्णय नेहरू-पटेल यांनी घेतला. या सर्व कालखंडात गांधीजींच्या खालोखाल काँग्रेसमध्ये नेहरूंचाच प्रभाव होता.

या कालखंडात संस्थानी प्रजेच्या आंदोलनात नेहरूंनी सहभाग घेतला व नेतृत्वही केले. आंतरराष्ट्रीय राजकारणाविषयी गांधीजी त्यांच्याकडून भूमिका समजावून घेत व काँग्रेस त्यांच्या भूमिकेशी सहमत असे. राष्ट्रीय क्रांतीशी एकनिष्ठ असतानाही मानवतेचा संदर्भ आपण सुटू देता कामा नये हे त्यांच्या धोरणाचे सूत्र होते. गांधीजींच्या मानवतावादी भूमिकेशीही हे सुसंगतच होते. फॅसिझमला त्यांचा विरोध होता. स्पॅनिश अंतर्गत युद्धात सहभागी होण्याची त्यांची इच्छा होती व इटलीतून प्रवास करताना मुसोलिनीने आपल्या भेटीचे दिलेले आमंत्रण त्यांनी नाकारले होते. लॉर्ड वेव्हेल यांच्या कारकीर्दीत हंगामी सरकारची सूत्रे हाती घेताना केलेल्या पहिल्या भाषणात आपल्या मंत्रिमंडळाचे परराष्ट्रीय धोरण स्वतंत्र राहील हे त्यांनी स्पष्ट केले होते.

आपल्या मनातील ध्येये व सभोवतालचे वास्तव यांचा समन्वय साधण्याची समस्या नेहरूंसमोर त्यांच्या कर्तृत्वाच्या सर्व कालखंडात उभी होती. साम्यवाद आणि लोकशाही, राष्ट्रीयता आणि आंतरराष्ट्रीयता, रशिया आणि अमेरिका, भांडवलशाही आणि समाजवाद, यांच्या परस्परताणातून निर्माण होणारे संबंध, त्याचप्रमाणे राष्ट्रीय एकात्मतेच्या संदर्भात निर्माण होणाऱ्या समस्या अशा सर्व प्रश्नांना त्यांना सामोरे जावे लागले. असे सामोरे जाताना जनमानसात त्यांच्या व्यक्तिगत प्रतिमेविषयी असणारे आत्यंतिक प्रेम हे त्यांचे सामर्थ्यस्थान होते. यामुळे केवळ विरोधी पक्षच

त्यांना वचकून होते असे नव्हे, तर काँग्रेस संघटनाही त्यांना वचकून होती. परंतु आपल्या मनात असलेले कार्यक्रम पार पडण्यासाठी आपल्या हाताशी असणारे एक प्रभावी अमोघ साधन अशा रीतीने नेहरू काँग्रेससंघटनेची बांधणी करू शकले नाहीत. ही त्यांची एक व्यक्तिगत मर्यादा मानली पाहिजे.

काँग्रेसमध्ये नेहरू आल्यानंतर लवकरच डाव्या विचारसरणीचे प्रमुख प्रवक्ते म्हणून नेहरूंना मान्यता मिळाली होती. नेहरूंनी भावनात्मक रीत्या गांधीजींचे नेतृत्व मानले होते ही गोष्ट तर खरीच, परंतु एरवीही त्यांचा या बाबतीत गांधीजींशी विरोध येण्याचे कारण नव्हते. केवळ स्वातंत्र्य-संपादन एवढेच काँग्रेसचे ध्येय असता कामा नये, काँग्रेसने आर्थिक व सामाजिक क्रान्तिविषयीही क्रियाशील राहिले पाहिजे ही गांधीजींची भूमिका होती व दीनदलितांच्या बाजूने उभे राहणारे ते दरिद्रनारायण होते. यामुळे तारुण्याचा उत्साह अधिक असलेले, परंतु अननुभवी डावे तरुण सहकारी व कर्तृत्वशाली गांधीजी यांच्यामध्ये निवड करण्याचा प्रसंग आला, तेव्हा नेहरूंनी गांधीजींचे नेतृत्व स्वीकारले यात नवल नाही.

II

१९२९ मध्ये लाहोर येथे भरलेल्या काँग्रेस अधिवेशनाच्या अध्यक्षपदासाठी नेहरूंचे नाव स्वतः महात्मा गांधींनी सुचविले. अधिवेशनानंतर 'यंग इंडिया'च्या ९ जानेवारी १९३० च्या अंकात गांधीजींनी लिहिले होते :

'लोकांनी आपली केलेली निवड किती योग्य होती, हे पंडित जवाहरलाल नेहरू यांनी सिद्ध केले. त्यांचे अध्यक्षीय भाषण छोटेसेच परंतु नेमके असे होते. त्यांची वैचारिक बैठक एकान्तिक होती, परंतु मांडणीची भाषा सौम्य होती. परिस्थितीकडे तटस्थ-वृत्तीने पाहू शकणाऱ्या व्यक्तिमत्त्वाचा ते भाषण म्हणजे एक पुरावा होता. जवाहरलाल पक्के समाजवादी विचारसरणीचे आहेत, परंतु देशाला पेलेल इतकेच देशाने स्वीकारावे अशा मताचे आहेत. ते एक व्यावहारिक मुत्सद्दी आहेत आणि परि-स्थितीच्या संदर्भात आपल्या ध्येयाला योग्य अशी मुरड ते घालू शकतात. परंतु त्यांची मूलभूत मतः-प्रकृती ध्येयवादाची आहे आणि त्या ध्येयवादाला अनुरूप असे ज़ीवन जगावे असा त्यांचा सतत प्रयत्न असतो.

'त्यांच्या भाषणात व अध्यक्षीय खुर्चीतून त्यांनी केलेल्या वर्तनात, ते खंबीर आहेत परंतु त्याचबरोबर इतरांशी जुळवून घेण्याची त्यांची प्रवृत्ती आहे, याचा प्रत्यय आला. कितीतरी चमत्कारिक प्रसंगी त्यांनी आपल्या विनोदी वृत्तीने सर्व निभावून नेले. ज्या वेळी निर्णायक काही करण्याची गरज होती त्या वेळी ते जराही कचरले नाहीत. अथवा श्रम करण्याची आपली कुवत, आत्मविलोपनाची वृत्ती, नैसर्गिक साधेपणा व स्नेहभाव यांनी सर्वांची मने त्यांनी जिंकून घेतली. ज्या शासनाला योग्य पद्धतीने कारभार करावयाचा आहे त्याला त्याच्या-विषयी भीती बाळगण्याचे कारण नाही. परंतु दुष्ट वृत्तीच्या शासनाला त्यांच्या सामर्थ्याचा लागलीच प्रत्यय येईल आणि देशाला दुष्ट शासना-पासून मुक्त करण्यासाठी कोणतीही किंमत मोजण्यास हा धीरपुरुष कमी पडणार नाही.

'आपला असा प्रतिनिधी आहे याचा तरुण पिढीला अभिमान वाटला पाहिजे. जवाहरलाल नेहरूंसारखा सुपुत्र आपल्याला लाभला याचा राष्ट्राला आनंद होईल. ईश्वराची कृपा त्यांच्यावर सदैव असो आणि त्यांच्या वर्षाच्या कारकीर्दीत राष्ट्र आपले ध्येय साध्य करो.'

ही केवळ एक औपचारिक भलावण नव्हती. आपण केलेली निवड किती अचूक होती याचा आनंद गांधीजींच्या शब्दाशब्दांतून ओसंडताना दिसतो. आपल्यामागून देशाची धुरा समर्थपणे वाहू शकेल असा तरुण अनुयायी आपल्याला मिळाला या भावनेने आश्वासित झालेल्या त्यांच्या मनाचे दर्शनही या उद्गारांतून आढळून येते.

गांधीजी व नेहरू या बाह्यतः काही प्रमाणात परस्परविरोधी भासणाऱ्या व्यक्तिमत्त्वांत असणारा आंतरिक अनुबंध हा असाच लोकविलक्षण होता. गांधीजींनी नेहरूंचा 'माझा राजकीय वारस' म्हणून निर्देश केला आणि 'मी गेल्यानंतर हा माझीच भाषा बोलेल' असा विश्वासही प्रकट केला. या विश्वासाला तडा जाईल असे वर्तन नेहरूं-कडून कधी घडले नाही. गांधीजींचे नेहरूंनी केलेले

मूल्यमापन यामुळेच त्यांच्या स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचे व विचारप्रणालीचेही दर्शन घडवते. हे मूल्यमापन नेहरूंनी अहमदनगर येथील तुरुंगात एप्रिल ते सप्टेंबर १९४४ या कालखंडात लिहिलेल्या 'भारताचा शोध' (Discovery of India) या ग्रंथात समाविष्ट आहे.[१]

ते लिहितात :

'गांधीजी कॉंग्रेसमध्ये आले आणि त्यांनी त्या संघटनेच्या घटनेत संपूर्ण बदल घडवून आणला. त्यांनी त्या संघटनेला अधिक लोकशाही पद्धतीचा आकार दिला व ती जनतेपर्यंत नेऊन पोचवली.

'कृतिशीलता हे या संघटनेचे ध्येय ठरले व कृतिशीलता शांततामय मार्गाने प्रकट करावी असाही निर्णय घेण्यात आला. गांधीजी एका वेगळ्याच मुशीतले शांततावादी होते. उत्साहाने कार्यरत राहणारे ते कृतिशील होते. दैवापुढे किंवा कोणत्याही दुष्ट प्रवृत्तीपुढे शरण जाण्याची त्यांची प्रवृत्ती नव्हती. त्यांचा विरोध शांततामय व सौजन्यशील होता; परंतु त्यांच्यामध्ये तत्त्वासाठी विरोध करण्याची अपरंपार शक्ती होती.

'त्यांनी आम्हाला खेड्याकडे पाठविले आणि ग्रामीण भाग विधायक कार्यकर्त्यांच्या कार्याने घुमू लागला. खेडूत जागा झाला आणि आपल्या जडमूढ कोषातून बाहेर पडला. आम्हा लोकांवर याचा वेगळा परंतु तसाच परिणामकारक प्रभाव पडला. उपासमारीच्या छायेत असणाऱ्या खेडुतांचे त्यांच्या झोपड्यांत आम्हाला दर्शन झाले. पुस्तके आणि व्याख्यानांतून शिकता येणार नाही इतके अर्थशास्त्र आम्ही या भेटीतून शिकलो.

'आर्थिक, सामाजिक व इतर क्षेत्रांविषयीची त्यांची मते अतिशय आग्रही असत. या मतांचा परिस्थितीच्या संदर्भात ते विकास करीत असत आणि आपल्या सर्वच कल्पना कॉंग्रेसवर लादण्याचा प्रयत्न त्यांनी केला नाही. परंतु काही कल्पना कॉंग्रेसमध्ये पुढे रेटण्याचा त्यांनी प्रयत्न केला. लोकांना आपल्याबरोबर नेता यावे म्हणून ते धीम्या गतीने जात असत. काही वेळा आपल्या कल्पना राबविण्यात ते फारच पुढे जात आणि मग त्यांना पुन्हा काही पावले मागे यावे लागे. त्यांची संपूर्ण मते मान्य असणारे फार लोक नव्हते ; काहींचा तर त्यांच्या मूलभूत दृष्टिकोणालाच विरोध होता. परंतु काही बदल करून ती मते मांडण्यात आली म्हणजे प्रचलित परिस्थितीत उपयुक्त म्हणून कॉंग्रेस त्यांचा स्वीकार करीत असे.

'कॉंग्रेस गांधीजींच्या प्रभावाखाली होती; परंतु तो एक विशिष्ट प्रकारचा प्रभाव होता. कारण कॉंग्रेस ही एक क्रियाशील, बंडखोर वृत्तीची अनेकविध विचारांचे लोक असलेली विविध अंगांची संघटना होती. अशा संघटनेला सहजपणे इकडून तिकडे वळवणे शक्य नव्हते. यासाठी अनेकदा इतरांच्या इच्छेला मान देण्यासाठी त्यांना आपली भूमिका सौम्य करावी लागे आणि कधीकधी एखादा निर्णय त्यांच्या विरुद्ध गेला तरी ती परिस्थिती ते स्वीकारीत. परंतु ज्या गोष्टी त्यांना मूलभूत महत्त्वाच्या वाटत, त्यांच्या बाबतीत ते अविचलपणे दृढ असत आणि काही वेळा त्यांच्यामध्ये आणि कॉंग्रेसमध्ये अशा कारणावरून फारकतदेखील झालेली आहे. परंतु भारताच्या स्वातंत्र्याचे आणि युयुत्सू राष्ट्रवादाचे ते प्रतीक होते आणि यासाठी त्यांच्याशी इतर काही मतभेद असले तरी लोक त्यांच्याभोवती गोळा होत आणि त्यांच्या नेतृत्वाला मान्यता देत. ज्या वेळी प्रत्यक्ष लढा चालू नसे, त्या वेळी त्यांचे नेतृत्व लोक नेहमी मान्य करीतच असे नाही. परंतु आंदोलन अटळ आहे अशी परिस्थिती निर्माण झाली की, मग मात्र त्यांच्या नेतृत्वाला महत्त्व येई आणि इतर सर्व गोष्टी मागे पडत.'

गांधीजींच्या विषयीची त्यांची भावना अखेरपर्यंत याप्रमाणे उत्कट आपुलकीची व आत्यंतिक आदराची अशीच राहिली.

३० जानेवारी १९४७ रोजी नेहरूंनी गांधीजींना लिहिले[२] :

'भारतात सर्वत्र आज परिस्थिती कमीअधिक प्रमाणात असमाधानकारक आहे. कामात खोडा घालण्याची प्रवृत्ती अस्तित्वात आहे आणि त्यामुळे कोणत्याही दिशेने काम करणे अवघड झाले आहे. आज संपूर्ण कॉंग्रेसपक्ष या प्रवृत्तीने पोखरला आहे आणि शासनात काम करणाऱ्या आम्हा लोकांपुढे दुसऱ्या इतक्या समस्या आहेत की, या परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी प्रयत्न करावयास आम्हाला सवड होत नाही. परिस्थिती उत्तरोत्तर घसरत

अनुक्रमणिका

चाललेली आहे व माझे मत त्यामुळे फार अस्वस्थ आहे, हे तुमच्या निदर्शनाला आणणे मला आवश्यक वाटते.

'आपले धोरणच ज्या वेळी स्पष्ट नसते आणि विभिन्न दृष्टिकोण आणि त्यामुळे विभिन्न दिशांनी होणारी ओढाताण अस्तित्वात असते त्या वेळी समस्यांना सामोरे जाणे अधिकच दुष्कर होते.'

नेहरू पुढे आंतरिक जिव्हाळ्याने लिहितात :

'आम्ही स्वतःच्या अंगावर जबाबदारी घ्यावयास शिकले पाहिजे व प्रत्येक वेळी मदतीसाठी तुमच्याकडे धाव घेणे हे युक्त नाही हे मला समजते. परंतु आम्हाला ही वाईट सवय आता जडली आहे आणि तुम्ही सहज संपर्क साधण्यासारखे उपलब्ध असता तर आमच्या अडचणी कमी झाल्या असत्या असे वारंवार वाटल्याखेरीज राहात नाही.'

III

काँग्रेसमधील डावे आणि उजवे यांच्या बलाबलाची कल्पना नेहरूसमितीच्या अहवालावरील चर्चेत आली. सायमन कमिशनवर बहिष्कार घालण्याच्या नकारात्मक कार्यक्रमाबरोबरच देशासाठी सर्वमान्य घटना तयार करून दाखवा या लॉर्ड बर्कनहेडच्या आव्हानाला उत्तर म्हणून एक आराखडा तयार करण्यासाठी दिल्लीत फेब्रुवारी-मार्च १९२८ मध्ये एक सर्वपक्षीय परिषद घेण्यात आली. एकमत व्हावे म्हणून ज्या मसुद्यास मान्यता देण्यात आली त्यात स्वातंत्र्याऐवजी वसाहतीच्या स्वराज्याचा निर्देश करण्यात आला. त्याचप्रमाणे जमीनमालकांना त्यांच्या मालकी हक्काची शाश्वती देण्यात आली. सुभाषचंद्र बोस व जवाहरलाल नेहरू या दोन्ही कलमांच्या विरुद्ध होते; परंतु परिषद विफल झाली असे होऊ नये म्हणून त्यांनी आपल्या अनुयायांना परिषदेत या गोष्टीचा आग्रह ताणून न धरण्याचा सल्ला दिला.

हा समितीचा अहवाल मंजुरीसाठी गांधीजींनी काँग्रेसपुढे मांडला.सायमन कमिशनला होणारा विरोध केवळ शाब्दिक न होता निदर्शनात्मक क्रियात्मक व्हावा एवढाच गांधीजींचा आग्रह होता. वसाहतीचे स्वराज्य मान्य असणारे व संपूर्ण स्वातंत्र्याचा आग्रह धरणारे असे दोन तट काँग्रेसमध्ये पडले. तडजोड म्हणून गांधीजींनी असे सुचविले की, वसाहतीच्या स्वराज्याला मान्यता द्यावी परंतु त्याचबरोबर १९२९ साल संपण्याच्या आधी ब्रिटिश सरकारने नेहरू समितीचा अहवाल जसाचा तसा मान्य केला नाही तर काँग्रेस सत्याग्रहाचे आंदोलन करावयास मोकळी राहील असेही स्पष्ट करावे. परंतु हा पर्यायही डाव्या गटाला मान्य झाला नाही व 'संपूर्ण स्वातंत्र्याचा' निर्देश करणारी उपसूचना सुभाषचंद्र बोस यांनी मांडली व जवाहरलाल नेहरूंनी तिला पाठिंबा दिला. गांधीजींचा ठराव मताला टाकला गेला तेव्हां त्यात स्वातंत्र्याचा निर्देश नसल्यामुळे जवाहरलाल अनुपस्थित राहिले. उपसूचनेचा अनुकूल ९७३ मते व प्रतिकूल १३५० मते असा पराभव झाला. उपसूचना पास होणे म्हणजे गांधीजींच्या नेतृत्वाला अमान्यता देणे होय या भावनेचा पगडा राहिल्यामुळे त्यांचा ठराव पास झाला. अशा परिस्थितीत उपसूचनेला इतक्या मोठ्या प्रमाणात अनुकूल मतदान व्हावे हादेखील डाव्या गटाच्या वाढत्या सामर्थ्याचाच पुरावा होता.[३]

परंतु बोस व नेहरू यांच्यामधील समविचाराची ही भावना फार काळ टिकू शकली नाही. १९३८ मध्ये बोस यांची काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून निवड गांधीजींच्या प्रेरणेनेच झाली होती. परंतु १९३९ मध्ये आपल्या कार्यक्रमाचा आग्रह धरून परत अध्यक्षपदाची निवडणूक लढविण्याचे ठरवले त्या वेळी गांधीजी आणि बोस यांच्यामध्ये झालेल्या संघर्षात नेहरूंनी गांधीजींचा पाठपुरावा केला. तायाझिनकिनाला पुढे नेहरूंनी सांगितले[४] : 'त्यावेळच्या परिस्थितीत एक गोष्ट स्पष्ट होती. भारताचा विकास कसा व्हावा याविषयीच्या कोणाच्या काहीही कल्पना असल्या तरी प्रत्यक्षात गांधीजी म्हणजेच भारत असे समीकरण निर्माण झाले होते. गांधीजींना कमकुवत करणे म्हणजे भारताचे सामर्थ्य खच्ची करणे असा त्याचा सरळ अर्थ होता. म्हणून बोस यांच्या प्रयत्नाशी मी सहमत होतो तरीही मी गांधीजींचा निष्ठावंत अनुयायी म्हणून पाठपुरावा केला.'

साम्यवादी विचारसरणीविषयी नेहरूंच्या मनात आस्था होती परंतु ते कट्टर मार्क्सवादी कधीही नव्हते. साम्यवादी क्रांतीचा अग्रदूत म्हणून रशिया-

विषयीही त्यांच्या मनात जिव्हाळा होता. परंतु भारतातील साम्यवादी पक्षाला त्यांचा विरोध होता. यापाठीमागची आपली भूमिका त्यांनी जेराल्ड पील यांना लिहिलेल्या पत्रात स्पष्ट केली आहे. पील ऑस्ट्रेलियातील समाजवादी पक्षाचे नेते होते. पील व नेहरू यांची भेट १९३९ मध्ये फैजपूर अधिवेशनाच्या वेळी आधी झाली होती.

आपल्या दि. ३ डिसेंबर १९४५ च्या पत्रात नेहरू लिहितात[५] :

'आपले दि. ८ नोव्हेंबरचे पत्र मिळाले. खरे तर मी कामाच्या अत्यंत गर्दीत आहे; परंतु तरीही तुम्हाला निदान एक छोटेसे तरी उत्तर पाठवावे म्हणून हे पत्र लिहीत आहे.

'तुम्ही पत्रात निर्देश केलेल्या मोठ्या प्रश्नाविषयी आता मला चर्चा करता येणार नाही. माझी साम्यवादाविषयी व त्याचप्रमाणे भारतीय व परदेशातील साम्यवादाविषयी मित्रत्वाची भावना आहे हे तुम्हाला माहीत आहे. भारतातील साम्यवादी पक्षाने चुकीचे पाऊल उचलले आणि त्या चुकीचे समर्थन करताना ते अधिकाधिक प्रमाद करत राहिले असे माझे मत आहे. निदान युद्ध संपल्यानंतर तरी ते काँग्रेसपक्षाच्या अधिक जवळ येतील अशी मला आशा होती. परंतु ते तर अधिकच दूर गेले आणि आज स्पष्टपणे काँग्रेसच्या विरोधात उभे ठाकले आहेत. भारतात हिंदू-मुसलमान व इतर यांच्यामध्ये काही ऐक्य व्हावे यासाठी सर्वांचे एकमत आहे. परंतु भारतातील अत्यंत प्रतिगामी अशा वृत्तीच्या मुस्लिम लीगला पाठिंबा देऊन साम्यवादी या प्रयत्नात खीळ घालत आहेत.

'भारतातील राष्ट्रीय जीवनाच्या मुख्य प्रवाहापासून साम्यवादी पक्षाने आपल्याला अलग पाडून घेतले आहे याविषयी काहीही शंका नाही. साम्यवादी पक्षाकडून असे का व्हावे याचे कारण शोधून काढणे हे महत्त्वाचे आहे. परिस्थितीच्या वस्तुनिष्ठ मूल्यमापनावर साम्यवादी पक्ष आपले धोरण आखत असतो असे म्हणतात. मग हे मूल्यमापन येथेच कोठे आणि कसे चुकत गेले ?

'भारतीय काँग्रेस पक्ष व भारतातील साम्यवादी पक्ष यांच्यामधील या दुराव्यात एकूण साम्यवाद किंवा रशिया यांच्याविषयीच्या धोरणाचा काहीही संबंध नाही हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. हा केवळ एक अंतर्गत राजकीय प्रश्न आहे. अंतर्गत राजकीय परिस्थितीबाबतच्या दृष्टिकोणात काँग्रेस पक्ष व भारतातील इतर सर्व राजकीय पक्ष चुकीचे धोरण स्वीकारतात व फक्त साम्यवादी पक्षालाच योग्य काय ते कळते असे म्हणणे थोडेसे विचित्रच ठरेल. भारतातील साम्यवादी पक्षाच्या या वृत्तीमुळे भारतात रशिया व साम्यवाद यांच्याविषयीही गैरसमज निर्माण होत आहेत याचेच मला विशेष दुःख होते. भारतातील साम्यवादी पक्षाचा या दोहोंशीही निकटचा संबंध असल्यामुळे हे स्वाभाविकही आहे. स्वतःच खोदलेल्या खड्डयात भारतातील साम्यवादी पक्ष पडला आहे आणि त्यातून बाहेर येणे त्याला अवघड होत आहे. भारतीय जनतेत साम्यवादी पक्ष आज अत्यंत अप्रिय आहे ही वस्तुस्थिती आहे. या घटनेमुळेही त्यांनी अंतर्मुख होऊन आत्मपरीक्षण केले पाहिजे असे मला वाटते.'

नेहरूंचे हे पत्र पुरेसे स्पष्ट आहे.

IV

नेहरूंचे काँग्रेसमधील स्थान गांधीजींच्या खालोखाल लगेच दुसरे असे होते. लोकप्रियतेच्या दृष्टीने नसले तरी काँग्रेससंघटनेवरील वर्चस्वामुळे राजकारणात त्यांच्या आसपास येऊ शकेल अशी एकच व्यक्ती भारतात होती. ती म्हणजे सरदार वल्लभभाई पटेल. एप्रिल १९५० मध्ये लॉर्ड माउंटबॅटन यांनी पटेलांना लिहिले होते[६] :

'आजवर अनेक वर्षे तुम्ही भारताचे पोलादी पुरुष राहिले आहात. तुमचा पाठिंबा असताना जवाहरलाल अयशस्वी होणे शक्य नाही. तुम्ही एकदा काही निर्धार केला की, तुमच्याविरुद्ध उभा राहून टिकू शकेल असा एकही दुसरा माणूस भारतात नाही. यामुळे जवाहरलालना तुम्ही जो पाठिंबा देऊ शकता तो केवळ भारताच्याच नव्हे तर आंतरराष्ट्रीय महत्त्वाचाही आहे.

'परंतु असा बळकट पाठिंबा देत असताना तुम्हाला किती मानसिक काळजीतून आणि क्लेशातून जावे लागत आहे याची मला कल्पना आहे. यामुळेच मला असे वाटले की, शांतता आणि समंजसपणा यांवर आधारित अशा धोरणाला धैर्याने पाठिंबा

अनुक्रमणिका

देण्याचे धोरण तुम्ही यापुढेही चालू ठेवण्याविषयी मी मित्रत्वाच्या भावनेने आपल्याला लिहिले तर ते उचित होईल.'

नेहरू व पटेल यांच्यामध्ये असलेल्या ताणाची कल्पना या पत्रावरून येऊ शकेल. गांधी आणि नेहरू, नेहरू आणि पटेल, गांधी आणि पटेल व गांधी–नेहरू–पटेल यांचे संबंध केवळ राजकीय नव्हते तर भावनात्मक आपुलकीचे होते. आणि यातूनच भारतीय राजकारणातील अनेक गुंतागुंतीही निर्माण होत गेल्या. या सर्वांचा खरे तर तपशीलाने व शास्त्रशुद्ध पद्धतीने कधीतरी अभ्यास झाला पाहिजे.

नेहरू आणि पटेल यांना जिव्हाळ्याने जोडणारा अनुबंध गांधीजींचा होता. गांधीजींच्या निधनाच्या सुमारासच पटेल राजीनामा देण्याच्या तीव्रतेवर आले होते. असे सांगतात की, गांधीजींच्या मृतदेहाच्या जवळ दोघांच्या खांद्यावर हात ठेवून लॉर्ड मौंटबॅटन म्हणाले : 'He wanted you two to work together' ('तुम्ही दोघांनी एकत्र राहिले पाहिजे अशी त्यांची इच्छा होती') सरदार पटेल कितीही कणखर असले तरी आपल्या जीवनाच्या जवळजवळ अखेरपर्यंत आपली प्रकृती तशी साथ देत नसतानाही राष्ट्रीय कर्तव्याच्या भावनेने त्यानी नेहरूंना सतत साथ देण्याचा प्रयत्न केला हे मान्य केले पाहिजे. वरील वाक्यातील 'जवळजवळ' हा शब्द पटेलांचे सचिव व्ही. शंकर यांच्या या कालखंडाच्या समीक्षणात्मक लेखात सहज ओघात आला असे भासणाऱ्या 'almost' या शब्दाचे भाषांतर आहे.[७] या तपशीलाचाही कधीतरी अभ्यास झाला पाहिजे.

नेहरू व पटेल यांच्यामधील संबंधाची यथार्थ कल्पना येण्यासाठी त्यांनी एकमेकांना लिहिलेली दोन पत्रे महत्त्वाची आहेत. पत्रे स्वाभाविकच दीर्घ आहेत; परंतु या संदर्भात ती इतकी महत्त्वाची आहेत की, ती जवळजवळ संपूर्णपणे उद्धृत करणेच उचित होईल. आणि त्यानंतर या संदर्भात अधिक काही सांगण्याचे कारणही उरणार नाही. जे उरते त्याचेही समाधान त्यानंतरच्या लगेचच्या नेहरूंच्या छोट्या पत्रात आहे.

नेहरूंनी पटेल यांना पाठविलेले दिनांक २६ मार्च १९५० चे पत्र असे होते[८] :

'पुष्कळ विचारान्ती मी आज तुम्हाला हे पत्र लिहीत आहे. हे तुम्हाला लिहिण्यात मी तुमच्याविषयीचे व माझे माझ्या स्वतःविषयीचेही कर्तव्य पार पाडले असे होईल अशीही माझी भावना आहे. आपल्या दोघांत मतभेद आहेत आणि तरीही आज जवळजवळ तीस वर्षे आपण एकमेकांचे सहकारी आणि निकटचे मित्र राहिलेले आहोत, अनेक संकटांशी आपण एकत्र मुकाबला केला आहे. या दीर्घ काळाच्या सहवासामुळे व वादळ-वाऱ्यात एकत्र काम केल्यामुळे आपण दोघेही आता एकमेकांना पुरेसे जाणू शकतो अशी माझी कल्पना आहे. आपल्या दोघांच्याही मनात परस्पराविषयी अतीव सौहार्द व आदर आहे आणि यामुळेच आपण अनेक समस्यांना आजवर समर्थपणे सामोरे जाऊ शकलो.

'तुम्हाला आठवत असेल, गांधीजींच्या निधनाच्या आधी आपणा दोघांमध्ये असलेल्या मतभेदांची चर्चा आपण वारंवार बापूंशी केली होती. जवळजवळ त्यांच्या निधनाच्या दिवसापर्यंत हा कार्यक्रम चालू होता. आपल्यासमोरील समस्या बिकट होती. मनोधर्मातील वेगळेपणा, दृष्टिकोणांतील फरक, व त्याचप्रमाणे समस्येची उकल कोणत्या पद्धतीने करावी याविषयीचे विभिन्न विचार यांमुळे एकजुटीने काम करणे काही वेळा अवघड होत असे. यातून निर्माण होणारी परिस्थिती देशाच्या दृष्टीने हितावह आहे काय, असा प्रश्न या वेळी निर्माण झाला. त्याचबरोबर भारतातील विद्यमान परिस्थितीत आपण आपसातील मतभेद बाजूला ठेवून एकत्र काम करणे देशाच्या हिताच्या दृष्टीने अत्यावश्यक आहे ही गोष्टही स्पष्ट होती. हा प्रश्न सोडवणे अवघड होते आणि याविषयी आपण दोघांनी बापूंशी स्वतंत्रपणे व एकत्रितही चर्चा केल्या. बापूंचे मत असे झाले की, काही काळ आपल्या दोघांपैकी एकाने शासनातून निवृत्त होऊन दुसऱ्याला मोकळेपणे काम करू देणे हे उचित होईल. मी निवृत्त होण्याची तयारी दाखविली तशी तुम्हीही दाखविली. आपल्यापैकी कोणालाही अधिकारपद नको होते आणि आपल्यातील मतभेदाचा आपल्या व्यक्तिगत संबंधांवर किंवा देशहितावर प्रतिकूल परिणाम व्हावा अशीही आपल्यापैकी कोणाचीच इच्छा नव्हती. परंतु अनेकवार केलेल्या चर्चांतून आपण अशा

अनुक्रमणिका

निष्कर्षाला आलो– आणि बापूंचेही त्यांच्या निधनापूर्वी असेच मत झाले असावे असे दिसले– की, सर्व गोष्टी लक्षात घेतल्यानंतर एकत्र काम करणे हेच आपले दोघांचेही कर्तव्य आहे. गेल्या दोन वर्षांच्या कालावधीत अडचणी तर आल्याच, परंतु तरीही, आपण याच भावनेने आपल्या शक्तिसर्वस्वाने काम करीत राहिलो. आपल्यातील एकजूट भंग पावली तर ते देशाला धोक्यात टाकणारे होईल हीच यामागची आपली दोघांचीही प्रबळ भावना होती.

'अलीकडे मात्र माझ्या मनात अशी जबरदस्त *शंका निर्माण होऊ लागली आहे की, अशा एकत्र* काम करण्याच्या प्रयत्नांत काही चांगले साध्य करण्याऐवजी केवळ राज्यकारभारात अडचणीच तर *आपण निर्माण करीत नाही ना?* काही दिवसांपूर्वी मंत्रिमंडळाच्या बैठकीत तुम्ही काढलेले काही उद्गार माझ्या मनाला लागले. हा व्यक्तिगत भावनेचा भाग बाजूला ठेवला तरी त्यामुळे काही महत्त्वाच्या प्रश्नाबाबत आपल्या भूमिका वेगळ्या आहेत याची मला जाणीव झाली. त्यानंतर एकदोन दिवसांनी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत आपण सर्वजण एका पिढीच्या कालखंडात जी ध्येये उराशी बाळगली त्या ध्येयापासून दूर जात आहोत याविषयी मला होणारे दुःख मी व्यक्त केले होते हे आपल्याला स्मरत असेल. परिस्थिती बदलली आहे आणि नव्या प्रश्नांना जुन्या पद्धतीने सामोरे जाता येणार नाही, हे खरे आहे. परंतु तात्कालिक व्यवहारात काही बदल करावे लागले तरी धोरणाची मूलभूत बैठक परिस्थितीच्या आघाताप्रमाणे विचलित होऊ देता कामा नये.

'माझे त्या बैठकीतील हे विधान कोणत्याही एका विशिष्ट घडामोडीला उद्देशून नव्हते. आतापर्यंत ज्या अनेक घटना घडत आल्या त्यांना उद्देशून मी ती प्रतिक्रिया व्यक्त केली होती.

'आपण त्याआधीच लोकसभेतील अनेक सदस्यांना बोलावून अनेकविध प्रश्नांबाबत त्यांच्याशी चर्चा केली होती ही गोष्ट मला त्या वेळी माहीत नव्हती. मला ही गोष्ट नंतर कळली आणि त्या बैठकीला उपस्थित असलेल्या काही जणांनी मला जो त्या बैठकीचा वृतांत सांगितला त्याने मी अत्यंत व्यथित झालो. आपल्या अनेक धोरणांविषयी तुम्ही त्या बैठकीत तीव्र नापसंती व्यक्त केली आणि त्या धोरणांशी तुम्ही कोणत्याही प्रकारे संबंधित नाही असे तुम्ही स्पष्ट केले असे मला सांगण्यात आले आहे. याचा सर्वसाधारण संदर्भ बंगालविषयीचे आपले धोरण व आपली परराष्ट्रनीती यांच्याशी होता असे समजते. याखेरीज अन्य काही गोष्टींचाही निर्देश करण्यात आला; परंतु त्या तपशीलात जाण्याची मला आवश्यकता वाटत नाही.

'तुम्ही अशा प्रकारे महत्त्वाच्या प्रश्नांविषयी अनेक लोकसभेच्या सदस्यांशी चर्चा करावी ही गोष्ट *मला अनुचित आणि अतिशय विचित्र अशी वाटते.* आपण हे आपल्या मतांच्या व भावनांच्या आग्रहामुळे केले असले पाहिजे ही गोष्ट उघड आहे. यातील व्यक्तिगत भाग जरी बाजूला ठेवला तरी सार्वजनिक स्वरूपाचा भाग हा महत्त्वाचा आहे आणि आपल्या बैठकीला आलेल्या अनेकजणांनी या सार्वजनिक भागाविषयीच आपली चिंता व्यक्त केली. लोकसभेच्या कक्षात याच विषयाची सारखी चर्चा होत होती.

'त्यानंतर एक-दोन दिवसांनी झालेल्या पक्षाच्या बैठकीत अनेक सदस्यांनी या कुजबुजीच्या प्रचार-आघाडीचा निर्देश केला. कोणाचाही नामनिर्देश करण्यात आला नाही; परंतु सुचविण्यात येणारा आशय स्पष्ट होता. काही सरकारी अधिकारीही या प्रचारात सामील आहेत आणि माझ्यावर आणि माझ्या वक्तव्यावर वर्तमानपत्रांतून टीकात्मक अग्रलेख यावयास उत्तेजन देत आहेत असेही माझ्या कानावर आले आहे.

'ही एकूण इतकी विचित्र अशी परिस्थिती आहे की, अशा वातावरणात मी पंतप्रधान म्हणून काम पाहणे अशक्य होईल. माझी ही भावना मी पक्षाच्या बैठकीत बोलून दाखविली होती.'

इतके लिहिल्यानंतर पाकिस्तान, बंगाल येथील हिंदू-मुसलमान यांच्यामधील तणावाचा व देशातील जातीय वातावरणाचा तीन-चार दीर्घ परिच्छेदांत निर्देश करून नेहरू पुढे लिहितात :

'जातीय तणाव आणि हिंसाचार यांना उत्तेजन देणाऱ्या लोकांबाबत आपण फारच नरम धोरण स्वीकारले आहे असे मला वाटते. हिंदु-महासभा अखंड भारताचा प्रचार चालू ठेवते आणि त्यातून

अनुक्रमणिका

संघर्षाला उत्तेजनच मिळते. लोक उघडपणे युद्धाची भाषा करतात. शासनाला या सर्व व्यवहारात कुठेच स्थान नाही अशीच जवळजवळ आजची स्थिती झाली आहे. आणि याविषयींच्या धोरणाबाबत शासनात विभिन्न मते आहेत आणि त्यामुळे शासनाला निश्चित असे खरे तर धोरणच नाही असे लोक स्पष्टपणे म्हणू लागले आहेत.'

नंतर काही ओळींच्यापुढे नेहरू लिहितात :

'अशा वातावरणात, तुमची आणि माझी मते भिन्न असणे, निदान ती तशी परस्परविरोधी आहेत असा आभासही लोकांच्या मनात निर्माण होणे हे अत्यंत विघातक आहे... याविषयीचा निर्णय काँग्रेसच्या कार्यकारिणीने किंवा अखिल भारतीय काँग्रेसने घेतला पाहिजे. यासाठी अखिल भारतीय काँग्रेसची एखादी तातडीची बैठक बोलवावी अशा महत्त्वाची मला ही गोष्ट वाटते. काँग्रेसचे संपूर्ण अधिवेशनच यासाठी घेता आले असते तर चांगले झाले असते, परंतु तसे अधिवेशन आणखी काही महिने तरी घेणे शक्य वाटत नाही. निश्चित धोरण ठरवून ते कणखरपणे आणि निष्ठेने पार पाडण्याची आज गरज आहे. ... पंजाबमधील दंगलीनंतर अखिल भारतीय काँग्रेस समितीची बैठक आपण घेतली होती आणि गांधीजींचे मार्गदर्शन त्या बैठकीला लाभले होते. मला व्यक्तिशः त्या वेळी आपण ठरविलेले धोरण योग्य होते आणि आजही तेच मूळ धोरण होईल असे वाटते'

यानंतर आपल्या पत्राच्या शेवटच्या परिच्छेदात नेहरू लिहितात :

'तुमच्या-माझ्यामधील व्यक्तिगत संबंध आपणा उभयतांच्या दृष्टीने आणि राष्ट्राच्याही दृष्टीने महत्त्वाचे आहेत. परंतु व्यक्तिगत भावना बाजूला ठेवून आपण या प्रश्नाचा विचार केला पाहिजे असे मला वाटते. एकदा धोरणामागील तत्त्वाचा निर्णय झाला की, इतर प्रश्न अधिक सुकरपणे सोडविता येतील. आपल्या आचारविचारांत जो गोंधळ माजला आहे, तो शक्य तितक्या लवकर दूर करणे ही आजची किमान गरज आहे.'

या पत्राचे सविस्तर उत्तर लागलीच दोन दिवसांनी पटेल यांनी पाठविले. एकमेकांविषयींच्या

हार्दिक जिव्हाळ्याचा प्रत्यय त्यांच्याही पत्रात येतो. आपल्या दि. २८ मार्चच्या पत्रात पटेल लिहितात :'

'तुमचे दिनांक २६ मार्चचे पत्र पाहून मला आश्चर्य वाटले आणि फार दुःखही झाले. तुमच्या मनातील व्यथा, आशंका व तुमच्या मनावरील दडपणाचे दर्शन तुमच्या पत्रातून होते. आपल्या उभयतांचे संबंध लक्षात घेता तुम्हाला आपल्या मनावरील हे ओझे माझ्याशी बोलून कमी करता आले असते. आपल्या झालेल्या अनेक भेटींत हे केव्हाही करता आले असते व यासाठीच एखादी वेगळी भेट तुम्ही ठरवली असती तरीही मी अगत्याने आलो असतो. असा विश्वास माझ्यावर टाकावा असे तुम्हाला वाटले नाही, या गोष्टीचेच व्यक्तिगत दुःख माझ्या मनाला आहे. काही हितसंबंधी आणि उपद्व्यापी लोकांनी दुष्टपणे केलेल्या प्रचाराच्या आहारी जाऊन त्या सांगोवांगीच्या गोष्टींमुळे तुम्ही आपला मानसिक तोल ढळू द्यावा, ही गोष्टही माझ्या मनाला व्यथित करते.

'तुम्ही आपल्या पत्रांत बापूंच्या निधनापूर्वीच्या ज्या गोष्टींचा निर्देश केला आहे, त्यामुळे त्या वेळचे ते संपूर्ण चित्र माझ्या डोळ्यांसमोर स्पष्टपणे उभे राहिले आहे. परंतु मला सर्वांत ठळकपणे आठवते ती गोष्ट म्हणजे त्यांचे माझ्याशी झालेले अखेरचे संभाषण. आपण दोघांनी एकत्र काम केले पाहिजे आणि आपल्या दोघांत फूट पडली तर देशाच्या हिताला तीव्र धक्का बसेल असे आपले संपूर्ण विचारान्ती मत बनले असल्याचे त्यांनी त्या वेळी सांगितले होते. बापूंचे हे शेवटचे शब्द कार्यवाहीत आणण्याचा मी माझ्याकडून आटोकाट प्रयत्न केला आहे. मी वेळोवेळी माझी मते स्पष्टपणे व प्रामाणिकपणे मांडत आलो आहे; परंतु त्याचबरोबर तुमचे हात जितके अधिकांत अधिक बळकट होतील तितके करण्याचा माझ्या कुवतीप्रमाणे प्रयत्नही मी करत आलेलो आहे. मी तुम्हाला निष्ठापूर्वक साहाय्य करीत आलो आहे आणि यासाठी अनेकदा मला कठोर मनोनिग्रहही करावा लागलेला आहे. तुम्ही आखून दिलेल्या एखाद्या निश्चित धोरणाविरुद्ध मी माझी भूमिका पुढे रेटण्याचा प्रयत्न केला आहे असा गेल्या दोन वर्षांतील एकही प्रसंग मला आठवत नाही. आपल्यात काही मतभेद होते, परंतु असे मतभेद

अनुक्रमणिका

असणे नैसर्गिक आहे अशा भावनेने आपण उभयतांना मान्य असे धोरण आखण्याचा प्रयत्न करीत असू. यामुळे बापूंच्या शेवटच्या आदेशाचे पालन करण्यात मी कमी पडलो अशी तुमची भावना झाल्याचे पाहून मला अतीव दुःख झाले.

'बापू असतानाही आपल्या दोघांत फूट पाडण्याचा प्रयत्न काही लोकांनी चालविला होता. त्यांनी तुमच्या व बापूंच्याही मनात माझ्याविषयी विष कालविण्याचा प्रयत्न केला. बापूंच्या निधनानंतर तुम्ही मला एक स्निग्ध आणि हृत्स्पर्शी पत्र लिहिले. ते पत्र हा माझा एक अमोल ठेवा आहे. देशासाठी एकत्र काम करावयाचा आपण दोघांनी त्या वेळी निर्धार केला. आज पुन्हा काही मंडळी आजच्या अस्थिर वातावरणाचा व तुमच्या अस्वस्थ मनःस्थितीचा फायदा घेऊन शंकाकुशंकांचे वातावरण फैलावण्याचा प्रयत्न करीत आहेत असे दिसते. तुम्ही त्यांच्या गोष्टी ऐकून घ्याव्यात, त्या गोष्टींवर विश्वास ठेवावा व एकदादेखील खरा प्रकार काय आहे याविषयी मला विचारू नये याचे मला खरोखर वाईट वाटते.'

यानंतरच्या काही परिच्छेदांत पटेल यांनी 'त्या' बैठकीची पार्श्वभूमी आणि वृत्तांत सांगितला आहे. त्याचा थोडक्यात आशय असा सांगता येईल :

१) लोकसभेच्या पन्नास-साठ सभासदांची पटेल यांच्याशी त्यांच्या निवासस्थानी चर्चा करावी अशी इच्छा होती. महावीर त्यागी यांनी ही इच्छा पटेल यांना कळविली. अशा बैठकीने गैरसमज निर्माण होतील म्हणून पटेल या बैठकीला तयार नव्हते.

२) असे आपल्याला बोलावले नाही तर 'गृहमंत्र्यांच्या घरी चहा घेण्यासाठी' म्हणून शंभर रुपयांची कट-मोशन अंदाजपत्रकाच्या चर्चेत आपण मांडू असे काहीसे विनोदाने व काहीसे आग्रहाने बाळकृष्ण शर्मा या सदस्याने सांगितले व तशी सूचना पाठवली.

३) या पार्श्वभूमीवर हा 'चहा' झाला. काही इतर चर्चा झाल्यानंतर सर्वांनी पूर्व बंगालमधील परिस्थितिविषयी पटेल यांनी आपली मते सांगितलीच पाहिजेत असा आग्रहच धरल्यामुळे पटेलांना त्या प्रश्नाविषयी बोलावेच लागले.

पटेल पुढे लिहितात :

'या वेळी मी त्यांना सांगितले की, कोणतीही आततायी उपाययोजना करणे योग्य होणार नाही. तेथील लोकांना सोसाव्या लागणाऱ्या यातनांमुळे मी अस्वस्थ आहे, आणि तुम्हीही रात्रंदिवस अस्वस्थ आहात हेही मी त्यांना सांगितले. तुम्हाला मनःस्ताप होईल व तुम्ही दुःखी व्हाल असे काहीही त्यांनी करू नये असेही मी त्यांना सांगितले ... नंतर सदस्यांच्या या संदर्भातील तीव्र भावना तुम्हाला सांगण्यासाठी त्यांना संधी मिळावी अशी सूचना पुढे आली. अशा बैठकीमुळे तुम्हाला मनःस्ताप होईल व सध्याच्या वातावरणात अशी बैठक घेणे अनुचित ठरेल असे सांगून मी त्यांना त्या कल्पनेपासून परावृत्त केले. यामुळे ज्या वेळी पक्षाच्या बैठकीची सूचना आली, त्या वेळी मला आश्चर्याचा धक्काच बसला.'

यानंतरच्या दोन परिच्छेदांत पटेल यांच्या घरी झालेल्या बैठकीत अंतर्गत व आंतरराष्ट्रीय धोरणाच्या चर्चेविषयीचा तपशील पटेल यांनी दिला आहे. नंतर ते लिहितात :

'यानंतर बैठक समाप्त झाली. मात्र शेवटी मी सत्यनारायण सिन्हा यांना इशारा देवून ठेवला की, हितसंबंधी लोक वृत्तान्ताचा विपर्यास करतील आणि याविषयी दक्ष राहणे आवश्यक आहे. म्हणून ते तुमच्याकडे आले आणि त्यांनी बैठकीचा वृत्तान्त तुम्हाला सांगितला... तुमच्या उपस्थितीत मी सांगू शकणार नाही असे कोणतेही विचार मी त्या बैठकीत मांडले नाहीत हे मी तुम्हाला अगदी स्पष्टपणे सांगू शकतो.'

मंत्रिमंडळातील ज्या घटनेचा नेहरूंनी आपल्या पत्रात निर्देश केला होता. त्या संबंधातीलही आपले म्हणणे पटेल यांनी यानंतर मांडले आहे. त्यानंतर ते म्हणतात :

'कार्यकारिणीत किंवा अखिल भारतीय काँग्रेस समितीत चर्चा करून काही कार्यभाग साधू शकेल असे मला वाटत नाही. किंबहुना, आपण या गोष्टींची सार्वजनिक किंवा अर्ध-सार्वजनिक चर्चा करण्याचे टाळून एखादे निश्चित धोरण आखण्यावर आपले लक्ष केंद्रित करणे अधिक उपयोगाचे होईल. गाजावाजा न करता असे निर्णय घेता येतात. पंजाबमधील दंगली व हैद्राबादचा प्रश्न यांच्या संदर्भात आपण

अनुक्रमणिका

असेच केले होते. आपले काही निश्चित धोरण आहे असा विश्वास जनतेला आला, की ती आपल्या पाठीशी उभी राहते.'

ते पुढे लिहितात :

'तुम्ही आपल्या पत्रात जातीय विद्वेष आणि हिंसा यांच्याबाबत दाखविलेल्या वृत्तीचा निर्देश केला आहे. आपले याबाबतचे धोरण 'नरम' आहे असे म्हणणे बरोबर होणार नाही. घटनात्मक व कायदेशीर तरतुदी व न्यायालयांचे निर्णय यांमुळे पडणाऱ्या मर्यादांचे अवधान ठेवून जितके करण्यासारखे आहे तितके आपण केले आहे. या मर्यादांतही अधिक काही करता येण्यासारखे आहे असे तुम्हाला वाटत असल्यास तुमच्या सूचनांची आपण अवश्य कार्यवाही करू.'

पत्राच्या शेवटी पटेल लिहितात :

'मला वाटते, आतापर्यंत मी तुमच्या पत्रांतील तुम्हाला अस्वस्थ करणाऱ्या सर्व गोष्टींविषयीचे माझे विचार मांडले आहेत. तुमच्या पत्राचे वाचन हा एक अतीव क्लेशकारक अनुभव होता. देशासाठी अंगावर घेतलेली मोठी जबाबदारी सहज आनंदात पार पाडावी अशी साथ आज माझे वय आणि प्रकृती मला देत नाहीत. अशाही परिस्थितीत जर मी आज काम करत असेन, तर जीवनाच्या सायंकाळी मातृभूमीच्या सेवेत तुमच्यावरील भारात सहभागी व्हावे व तुमचे हात बळकट करावे एवढाच केवळ माझा हेतू आहे. फाळणीनंतर आपल्या देशावर एकामागून एक आलेल्या अनेक आपत्तींत देशाला वाचविण्यासाठी आपणा उभयतांच्या संयुक्त प्रयत्नांची गरज आहे, याच एका भावनेने मी माझ्या पदाला धरून राहिलो आहे. बापूंनी जानेवारी १९४८ मध्ये सांगितले, ते आजही सत्य आहे याच जाणिवेने आणि भावनेतून मी आपल्या यापूर्वीच्या पत्रव्यवहारात तुम्ही पंतप्रधानपद सोडण्याचा विचार करू नये अशी तुम्हाला विनवणी केली होती. आपले दोघांचे मार्ग भिन्न झाले तर देशहिताला हादरा बसेल अशीच माझी आजही धारणा आहे... परंतु बापूंनी आपल्या अखेरच्या दिवसांत दिलेला आदेश मला पाळता येत नसेल, तुमचे हात माझ्यामुळे बळकट होत नसतील, तुमच्या मनात माझ्या तुमच्याविषयी असलेल्या निष्ठेबाबतच संशय असेल किंवा तुमची धोरणे अमलात आणली जाण्यात मी तुम्हाला एक अडथळाच होऊन राहिलो आहे अशी तुमची भावना झाली असेल, तर माझ्या पदावर राहण्यात मला स्वारस्य नाही. मी उरलेले आयुष्य विधायक कार्य करण्यात व्यतीत करीन आणि बाहेरून तुमचे हात बळकट करण्याचा प्रयत्न करीत राहीन.

'मी अगदी मोकळेपणाने व सविस्तर असे लिहिले आहे. इतके दीर्घ लिहीत बसण्यापेक्षा तुम्हाला भेटून प्रत्यक्ष बोलावेच असे एकदा वाटले, परंतु आधी लिहून नंतर चर्चा केली तर चर्चा सुकर होऊ शकेल अशा विचाराने हे पत्र लिहिले. तुमच्या मनातील व्यथा दीर्घकाल चालू राहावी असे मला वाटत नाही आणि लिखित शब्द ज्या ठिकाणी अपुरे पडतील तेथे प्रत्यक्ष संभाषणातून आपण एकमेकांच्या मनातील ताण कमी करू शकतो. ज्या वेळी मी यावे असे तुम्हाला वाटेल त्या वेळी मी अवश्य येईन.'

या पत्राला नेहरूंनी लागलीच दुसऱ्या दिवशीच उत्तर पाठवले. दिनांक २९ मार्चच्या त्यांच्या या पत्रात त्यांचा राग पूर्णपणे निवळलेला दिसतो. पटेलांविषयीची त्यांची सौहार्दाची व विश्वासाची भावनाही या छोटया पत्रात चांगली व्यक्त झाली आहे... नेहरू लिहितात :[१०]

'आपल्या दिनांक २८ मार्चच्या पत्राबद्दल मी आपला आभारी आहे. आज मी थोडक्यात लिहीत आहे कारण लवकरच तुमच्याशी प्रत्यक्ष चर्चा करावी–किंवा अनेक चर्चा कराव्यात–असे माझ्या मनात आहे. परंतु यासाठी थोडा निवांत वेळ हवा होता आणि तशी सवड काढणे मला व तुम्हालाही अवघड होते. मी त्या रात्री एका भावनेच्या आवेगाच्या क्षणी तुम्हाला ते पत्र लिहिले. तुमच्यासमोर मी माझे विचार ताबडतोब ठेवलेच पाहिजेत असे मला वाटले. असो. या सर्वांचा पुढील चर्चेला कदाचित उपयोग होईल.

'तुम्ही मला अगदी विस्तारपूर्वक आणि खूप श्रम घेऊन लिहिले आहे. बारीकसारीक गोष्टींचा खुलासा देण्याचे कारण नव्हते; बाजारगप्पांवर किंवा कपोलकल्पित कथांवर विश्वास ठेवण्याचा माझा स्वभाव नाही. तुमच्या घरी झालेल्या बैठकीचा निर्देश करावा असे मला वाटले कारण लोकसभेच्या

अनुक्रमणिका

सदस्यांत तो एक चर्चेचाच विषय झाला होता. पक्षाच्या बैठकीतही त्या बैठकीच्या आडून नेमका असा निर्देश करण्यात आला. त्या बैठकीतील तुमच्या उद्‌गारांचा जो वृत्तांत आला, तो संपूर्णपणे खरा होता असे मानले, तरी त्यात विशेष महत्त्वाचे असे काही नव्हते. संदर्भ तोडून उद्‌गारांना विकृत स्वरूप देता येते हे मला माहीत आहे. मला त्या वेळी तसा विश्वास होता, आणि आजही आहे, की तुम्ही माझ्याशी जे बोलणार नाही ते इतरांनाही सांगणार नाही. तुम्ही माझ्याशी जुळवून घेण्यासाठी किती सहन केले आहे याची मला कल्पना आहे. आणि मी त्यासाठी तुमचा कृतज्ञ आहे.

'परंतु माझ्या मनात असणारी सल अधिक मूलगामी आहे. तिची दोन अंगे आहेत. एक व्यक्तिगत स्वरूपाचे आहे, तर दुसरे पूर्णपणे व्यक्तिनिरपेक्ष आहे. आपल्याला परस्परांविषयी आपुलकी आणि आदर वाटत असतानाही आपण अनेकदा वेगळ्या दिशेने आणि वेगळ्या पद्धतीने काम करीत राहिलो. यामुळे केवळ धोरणावरच नव्हे, तर राज्यकारभारावरही प्रतिकूल परिणाम होतो. अनेक लोकांना वाटते त्यापेक्षा अधिक प्रमाणात आपले दोघांचे जमू शकते. परंतु तरीही असे विरोधी ताण गोंधळाला कारणीभूत होतात आणि अनिष्टच होत.

'माझी दुसरी व्यक्तिनिरपेक्ष चिंता, देशात, शासनात, काँग्रेसमध्ये व इतरत्रही दिसून येणाऱ्या प्रवाहपतित भावनेविषयीची आहे. एकदा मी मंत्रिमंडळात म्हटले त्याप्रमाणे मी माझ्या उराशी बाळगलेली ध्येये विरून चालली आहेत आणि जिच्यामुळे मी केवळ व्यथित होतो एवढेच नसून माझे जीवितकार्यच विफल झाले आहे असे मला वाटते अशी परिस्थिती भारतात निर्माण होत आहे. अडचणींपासून पळ काढण्याची माझी वृत्ती नाही असे मला आपले वाटते. परंतु मला प्रिय असणाऱ्या, आणि व्यावहारिक दृष्टचाही भारताच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण व आवश्यक असणाऱ्या, ध्येयासाठी आपण सर्वांत चांगला असा लढा कोणत्या पद्धतीने देऊ शकतो हा माझ्यापुढील प्रश्न आहे. ज्या ध्येयासाठी गांधीजी आणि काँग्रेस उभी राहिली त्यापासून आपण दूर गेलो, तर भारत झपाट्याने विनाशाकडे जाईल अशी माझी खात्री आहे. शेवटी विनाश हा आतून येत असतो, बाहेरून नव्हे. आपल्या अंतरंगातील हीनता हे आजचे सर्वांत दुःखदायक लक्षण आहे.

'आपणा उभयतांना लवकरच मनमोकळ्या व सर्वांगीण चर्चेसाठी संधी मिळेल अशी आशा मी बाळगून आहे.'

नेहरू आणि पटेल यांच्यामधील ही Love-hate relationship (ज्याला आपण सहयोग-संघर्षाचे नाते असे म्हणू शकतो) पटेलांच्या अंतःकाळापर्यंत चालू राहिली. पुरुषोत्तमदास टंडन यांची काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून निवड होण्याच्या वेळी त्या दोघांतील मतभेद पुन्हा जगासमोर आले. टंडन यांची जनमानसातील प्रतिमा जातीय व प्रतिगामी आहे म्हणून त्यांना काँग्रेसचे अध्यक्ष करू नये असे नेहरूंचे मत होते, तर टंडन यांना त्यांच्या आजवरच्या कार्यासाठी हे पद मिळाले पाहिजे व काँग्रेसची धोरणे अमलात आणण्यात ते कोणतीही कुचराई करणार नाहीत अशी पटेलांची भूमिका होती. नेहरू-पुरस्कृत आचार्य कृपलानी व पटेल-पुरस्कृत टंडन यांच्या लढतीत टंडन यांचा विजय झाला.

डिसेंबर १९५० मध्ये पटेल यांचे निधन झाले. आणि या समस्या कशा सोडवाव्यात हा प्रश्नच शिल्लक राहिला नाही.

V

पटेल यांच्या निधनानंतर नेहरूंना समर्थ सहकारी राहिला नाही, त्याचप्रमाणे नेहरूंना प्रतिस्पर्धी होऊ शकेल अशी दुसरी कोणती व्यक्तीही काँग्रेसमध्ये उरली नाही. यानंतरच्या कालखंडात काँग्रेस संघटनाही संघटनात्मक दृष्टीने आपल्या पूर्ण वर्चस्वाखाली आणण्याचा नेहरूंनी प्रयत्न केला. त्यांनी टंडन यांना काँग्रेसच्या अध्यक्षपदाचा राजीनामा देण्यास भाग पाडले आणि स्वतःच काँग्रेसचे अध्यक्ष झाले. पक्षात आणि शासनात प्रमुखपद त्यांच्याच हाती राहिले. १९५४ मध्ये नेहरूंनी काँग्रेसचे अध्यक्षपद सोडले तरी त्यानंतर त्यांचे निधन होईपर्यंत काँग्रेसचे सर्व अध्यक्ष त्यांच्याच अनुमतीने होत असत आणि शासनातील आणि पक्षातील सत्ता त्यांच्याच एकटयाच्या हातात केंद्रित होऊन राहिली.

पटेल असताना नेहरूंनी केली नसती अशी एक

अनुक्रमणिका

गोष्ट नेहरूंनी त्यांच्यानंतरच्या कालखंडाच्या प्रारंभी करण्याचा प्रयत्न केला. समाजवादी विचारसरणीच्या लोकांचे सहकार्य मिळविण्याचा तो प्रयत्न होता. नेहरूंनी हा प्रयत्न प्रामाणिकपणे केला होता असे दिसते. कारण एरवी सामान्य राजकारणाच्या पद्धतीने जयप्रकाश यांचे साहाय्य त्यांना लाभावे अशी कोणतीच परिस्थिती त्या वेळी अस्तित्वात नव्हती. आज ना उद्या आपल्याइतकाच लोकप्रिय होऊ शकेल अशा तोलामोलाच्या नेत्याला राजकीय रंगमंचावर येऊ देण्यात काही संभाव्य धोका आहे याचे त्यांच्यातील राजकारणी बुद्धीला आकलन झाले नसेल असेही नाही. जयप्रकाश यांना बोलावल्यानंतर त्याची परिणती समाजवादी पक्षाचीच शकले होण्यात होईल इतक्या धूर्त डावाची मांडणी त्यांनी केली असेल असे वाटत नाही. ही शकले समाजवाद्यांनीच आपल्या कर्तृत्वाने किंवा कर्तृत्वाच्या अभावाने करून घेतली.

१९५३ च्या फेब्रुवारीमध्ये जवाहरलाल नेहरूंनी जयप्रकाश यांना एक पत्र लिहून काँग्रेस व समाजवादी यांनी सर्व स्तरांवर एकमेकांशी सहकार्य करावे अशी विनंती केली. त्यानंतर नेहरू व जयप्रकाश यांची बोलणी सुरू झाली. त्यानंतर प्रजासमाजवादी पक्षाच्या प्रमुख पुढाऱ्यांची एक अनौपचारिक बैठक होऊन सहकार्याचा आधार म्हणून एक सुस्पष्ट कार्यक्रम सुचवावा असे ठरले. या चौदा कलमी कार्यक्रमाचा मसुदा नेहरूंना पाठविताना जयप्रकाशनी लिहिले होते [११] :

'तुम्ही मला जी सूचना केली ती निश्चितच साहसी व असाधारण होती; कारण काँग्रेस पक्षाला केंद्रात किंवा कोणत्याही राज्यात संमिश्र मंत्रिमंडळाची मुळीच गरज नाही. अशा स्थितीत तुम्ही पक्षातील भूमिकेवरून मुत्सद्दीपणाचे वर्तन केले. तुमच्या सूचनेचा अर्थ मी परंपरागत स्वरूपाचे संसदीय संमिश्र सरकार असा न मानता नवा भारत उभा करण्याकरता संयुक्त प्रयत्न करणे असा मानतो. आमची विधिमंडळात फारशी शक्ती नाही, पण देशात आम्हाला निश्चित स्वरूपाचा पाठिंबा आहे. आमच्याजवळ काही बाबतीत काँग्रेसपेक्षा चांगले कार्यकर्ते आहेत. पण आमचे सहकार्य मागण्याची तुमची कल्पना का व कशातून उगम पावली यावर बरेच अवलंबून आहे. जर सहकार्याचा अर्थ तुमची आजची धोरणे अमलात आणण्याच्या दृष्टीने तुमचे हात बळकट करणे असा असेल तर तसा प्रयत्न करण्यात काही अर्थ नाही. पण याचा अर्थ जर निर्भयपणाने राष्ट्र उभारण्याचे एक संयुक्त साहस हाती घ्यावयाचे असा असेल तर ते ऐतिहासिक पाऊल ठरेल आणि याच दृष्टिकोणातून आम्ही कार्यक्रमाचा मसुदा तयार केला आहे.'

ही युती घडून येऊ शकली नाही हा इतिहास आहे. परंतु नेहरूंचे मानस समजून घेण्याच्या दृष्टीने तो मसुदा व त्यांची त्यावरील प्रतिक्रिया लक्षात घ्यावयास हवी.

चौदा कलमी कार्यक्रम असा होता [१२] :

(१) घटना दुरुस्ती– अ) सामाजिक बदलांच्या मार्गातील अडचणी दूर करणे. ब) संस्थानिक व सनदी नोकर यांना दिलेली हमी रद्द करणे. क) विधानपरिषदा बरखास्त करणे.

(२) कारभाराविषयक यंत्रणेत सर्वत्र सुधारणा करणे, राजकीय सत्तेचे व कारभार यंत्रणेचे विकेंद्रीकरण करणे. कायद्यात आणि कायद्याच्या अमलबजावणीच्या प्रक्रियेत आमूलाग्र सुधारणा. भ्रष्टाचार निर्मूलनासाठी परिणामकारक व तातडीची यंत्रणा उभारणे.

(३) भाषावार, आर्थिक व कारभारविषयक बाबी लक्षात घेऊन राज्यांची पुनर्रचना करण्यासाठी संसदेमार्फत एका कमिशनची नियुक्ती. विभागीय राज्यपाल, उच्च न्यायालये व इतर उच्च आयोग आणि लवाद विभागवार स्थापन करून खर्चात कपात करणे.

(४) अ) विषमता व शोषण नष्ट करण्याच्या हेतूने जमिनीचे फेरवाटप, व फेरवाटपाच्या कामात भूमिहीन, शेतमजूर व गरीब शेतकरी यांना प्राधान्य. ब) सर्व प्रकारची बेदखली ताबडतोब बंद करणे. क) जमिनीचे लहान तुकडे करण्यास बंदी व तुकडेबंदीचा कार्यक्रम हाती घेणे. ड) सर्व उर्वरित जमीनदारी व सरंजामदारी प्रथा नष्ट करणे. इ) विविध कार्यकारी संस्थांमार्फत ग्रामीण अर्थव्यवस्थेचे सहकारी व्यवस्थेत रूपांतर करणे. शेतीला पतपुरवठा व इतर साहाय्य देण्याबाबत सरकारी मदत विविध कार्यकारी संस्थांमार्फत पुरविणे.

फ) शासनाने शक्यतो व्यक्तिगत शेतकऱ्यांशी संबंध न ठेवता शेतकऱ्यांच्या गटांशी व पंचायतीशी संबंध ठेवणे. पंचायतीच्या कामात जमीन महसुलीच्या कामाचा समावेश राहील व महसुलाचा काही भाग सहकारी संस्था किंवा पंचायतीकडे राहील.

(५) पडीक जमीन लागवडीखाली आणणे व सहकारी संस्थांमार्फत भूमिहीनांचे पुनर्वसन करणे. भांडवलशाही पद्धतीने शेती करण्यासाठी पडीक जमीन देण्यात येणार नाही.

(६) बँका व विमा कंपन्या यांचे राष्ट्रीयीकरण.

(७) सार्वजनिक व्यापाराची कक्षा हळूहळू वाढविणे.

(८) विविध धंद्यांतील निवडक कारखान्यांचा कारभार, सहकारी संस्था, स्वायत्त मंडळे किंवा कामगार समित्या यांच्यामार्फत चालवणे. सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांना तांत्रिक व व्यवस्थापकीय सल्ला पुरविण्यासाठी तंत्रज्ञ व व्यवस्थापक यांच्या संघटनांना उत्तेजन देणे.

(९) सर्व कामगारांनी सक्तीने कामगारसंघाचे सभासद व्हावे या तत्त्वावर देशात एकच एक संयुक्त कामगार चळवळ उभी करणे. यामुळे कामगार संघामध्ये जबाबदारीची जाणीव निर्माण होईल.

(१०) कोळसा व इतर महत्त्वाचे खनिज पदार्थ उत्पन्न करणाऱ्या खाणींचे राष्ट्रीयीकरण.

(११) सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांत कामगारांना व्यवस्थापनात भागीदारी.

(१२) मोठे व छोटे उद्योग यांसाठी विवक्षित क्षेत्र ठरवून देणे आणि छोट्या उद्योगांची स्थापना व त्यांना संरक्षण याबाबतीत प्रोत्साहन देणे.

(१३) देशात आर्थिक समानता निर्माण करण्याच्या उद्देशाने पहिले पाऊल म्हणून उच्च अधिकाऱ्यांचे पगार व भत्ते कमी करणे.

(१४) देशातील सर्व व्यवहारांमध्ये स्वदेशीच्या तत्त्वाचा पुरस्कार.

जयप्रकाश यांनी ४ मार्च १९५३ रोजी लिहिलेल्या या पत्राला नेहरूंनी १७ मार्च रोजी उत्तर पाठवले. त्यांनी लिहिले :[१३]

‘ आपल्या कार्यात जितकी सहकार्याची भूमिका निर्माण करता येईल तितकी करण्याच्या हेतूने मी तुमच्याशी, तसेच नरेन्द्र देव आणि कृपलानी यांच्याशी बोलणी केली. ... तुम्हाला आठवतच असेल की, तुमची भेट घेण्याचा मी गेले काही महिने प्रयत्न करीत आहे. काही नव्या घटनांमुळे किंवा एखाद्या नवीन ऊर्मीमुळे मी हा प्रयत्न केला असे नाही. तुम्ही आपले उपोषण सुरू करण्यापूर्वी बऱ्याच अगोदर मी तुम्हाला पत्र लिहून भेटण्याची इच्छा व्यक्त केली होती. यावरून तुमच्याशी बोलणी करण्याच्या माझ्या इच्छेचा संबंध कोणत्याही घटनेशी नसून ती इच्छा बरेच दिवस माझ्या मनात होती हे लक्षात येईल. या देशात आपणास बऱ्याच मोठ्या गोष्टी करावयाच्या आहेत व आपण संयुक्तपणे त्या केल्या पाहिजेत, ही भावना त्यामागे होती. तुमचे पत्र वाचल्यावर माझे असे मत झाले आहे की, आजच्या घडीला कोणतेही एखादे औपचारिक पाऊल टाकणे हितावह होणार नाही...... तुम्ही माझ्याकडे एक कार्यक्रमांचा मसुदा पाठवला असून त्यात मूलभूत घटनात्मक बदलांचाही समावेश आहे. माझा व्यक्तिश: जरी या बदलांना विरोध नसला, तरी हे बदल घडवून आणणे सोपे नाही. त्याचप्रमाणे कायद्याची प्रक्रिया, कारभारयंत्रणा व राज्यपुनर्रचना या निरनिराळ्या गोष्टींत बदल करण्याचा उल्लेख तुमच्या पत्रात आहे. या प्रत्येक बदलाचा स्वतंत्रपणे विचार केला, तर माझा फारसा विरोध राहणार नाही व मी त्या संबंधात आनंदाने विचार करीन. पण पंतप्रधान व काँग्रेसचा अध्यक्ष या नात्याने असल्या गोष्टींबद्दल मी आपणास काही निश्चित आश्वासन देऊ शकणार नाही. त्याचबरोबर तुमच्या दृष्टीने जो ताबडतोबीचा कार्यक्रम वाटतो तो तुम्ही मांडलात, तर ते समर्थनीयच आहे आणि येथेच खरी अडचण आहे. म्हणून मला असे वाटते की, एकमेकांना बांधून घेण्यापेक्षा आपल्या शक्तीप्रमाणे सहकार्याची भावना व प्रभाव वाढवण्याचा प्रयत्न करणे हेच आज अधिक उचित ठरेल. आणि ही गोष्ट फार मोठ्या क्षेत्रात शक्य होईल असे मला वाटते. म्हणून आजच्या घडीला या कल्पनेला अधिक रेखीव स्वरूप देण्याचे सोडून देऊ या. आणि आपणही ही कल्पना सोडून दिल्याचे मित्रत्वाच्या नात्याने लोकांना स्पष्ट करू या म्हणजे मग कोणत्याही प्रकारच्या वावड्या उडणार नाहीत.’

ही युती झाली असती तर काय झाले असते हा भारताच्या इतिहासातील एक कायमचा अनुत्तरित 'प्रश्न' राहणार आहे. कदाचित् काहीच घडले नसते, परंतु परिस्थिती आहे त्यापेक्षा अधिक विपरीत व समाजवादी समाजरचनेला प्रतिकूल अशी निश्चितच राहिली नसती. भावी महामंत्रीपदाच्या आशेने जयप्रकाश या मृगजळामागे धावत आहेत या डॉ. लोहियांच्या आततायी आणि असत्य आरोपामुळे तर पुढे समाजवादी पक्षाचेच विभाजन झाले व प्रत्यक्ष राजकारणात तो पक्ष व त्याचे उपपक्ष नेहमी क्षीणबल राहिले. याच्या उलट, वल्लभभाई पटेलांच्या नंतरच्या कालखंडात त्यांच्याच सामर्थ्याने व आत्मीयतेने जयप्रकाश नेहरूंच्या पाठीशी उभे राहिले असते, तर भारतीय राजकारणाला व अर्थकारणाला एक वेगळे वळण लागण्याचीही शक्यता होती. ही शक्यता कधीच अजमावली गेली नाही.

नेहरूंनी असा प्रयत्न यानंतर कधी केला नाही.

VI

नेहरू आणि पटेल यांच्यामध्ये असलेले ताण १९४७ ते १९५० च्या फाळणीनंतरच्या कालखंडात मुख्यत्वेकरून जातीय प्रश्नाबाबत धोरण कसे असावे याबाबत होते. परंतु हे मतभेद मूलभूत पातळीवरचे नव्हते, तर प्रत्यक्ष व्यावहारिक पावले कशी व किती प्रमाणात प्रभावी रीतीने टाकता येतील याविषयीच्या शक्यतेविषयीचे व आवश्यकतेविषयीचे होते. समाजवादी पद्धतीच्या समाजरचनेविषयी नेहरूंच्या मनात जी आंतरिक आपुलकी होती तिच्या संदर्भात मात्र हे मतभेद अधिक मूलगामी होते असे म्हटले पाहिजे. गांधीजींच्या कालखंडात त्या दोघांमधील हा मूलगामी भेद स्पष्ट होण्याचे कारण नव्हते. एक तर त्या काळात देश स्वतंत्र नव्हता व या क्षेत्रात प्रत्यक्ष करण्यासारखे काहीच नव्हते. दुसरे असे की, गांधीजींच्या 'तळागाळातील माणसापर्यंत' (Unto This Last) या धोरणाचा आग्रह स्वातंत्र्यसंपादनानंतर लढाऊ वृत्तीने राखला जाईल, की एक शांततामय व म्हणून मिळमिळीत असा परिवर्तनाचा कार्यक्रम एवढेच त्याचे स्वरूप राहील हे स्पष्ट झाले नव्हते. लढाऊ वृत्तीने समाजवादी समाजरचनेचा कार्यक्रम पुढे रेटावा अशी काँग्रेस-संघटनेची बांधणी झालेली नव्हती. झाली होती ती या गोष्टीला प्रतिकूल अशा स्वरूपाचीच झाली होती. गांधीजी असते तर त्यांची भूमिका लढाऊ कार्यक्रमाला अनुकूल अशी राहिली असती असे समजावयास जागा आहे. मृत्युपूर्वी काही दिवसच 'आता काँग्रेस विसर्जित करून लोकसेवक संघात तिचे रूपांतर करावे' असा विचार त्यांनी मांडला होता. एका प्रमुख भांडवलदाराशी झालेल्या चर्चेत 'आता ब्रिटिश गेल्यानंतर तुम्ही कोणाशी लढाल ?' या प्रश्नाला त्यांनी 'मग मी तुमच्याशी लढेन' असे उत्तर त्या भांडवलदाराला दिलेले होते. हा केवळ एक वाग्विलास नव्हता. कारण त्याच सुमारास आपली विश्वस्तवृत्तीची कल्पना स्पष्ट करताना त्यांनी भांडवलदार जर विश्वस्तवृत्तीने आचरण करणार नसतील तर कायदा आणि सत्याग्रह अशा दोन्ही शस्त्रांचाही वापर करावा लागेल असे सांगितले होते. परंतु गांधीजी गेले, राष्ट्रासमोर अधिक तातडीच्या समस्या उभ्या राहिल्या आणि यातून सावरून नेहरूंचे एकमुखी नेतृत्व प्रस्थापित झाले. त्या वेळी मनात इच्छा आहे परंतु हातात शक्ती नाही अशा परिस्थितीत आपण सापडलो आहोत हे नेहरूंच्या लक्षात आले. कारण काँग्रेस-संघटना निवडणुका जिंकण्याचा हुकमी एक्का म्हणून नेहरूंना मानत होती. परंतु भारतातील आर्थिक, सामाजिक परिवर्तनाच्या कामात त्यांना मनापासून साहाय्य द्यावयास तयार नव्हती. काँग्रेसच्या बाहेर पडून नवी बांधणी करावी असे नेहरूंच्या मनात कधी आले असेल असे वाटत नाही. देशासाठी काँग्रेसचे अस्तित्व, तिच्या सर्व मर्यादा लक्षात घेऊनही आवश्यक आहे अशी त्यांची मनोधारणा असावी. राष्ट्रासाठी काँग्रेसची आवश्यकता आहे व काँग्रेसला आपल्या नेतृत्वाची गरज आहे या दृढ भावनेतून त्यांनी अन्य दिशेने विचारही केला नसावा. परिस्थितीच्या व्यावहारिक मर्यादांच्या संदर्भात त्यांची अशी मनोभूमिका असली, तर ती स्वार्थी वृत्तीने घडली होती असे मानण्याचे कारण नाही. भारतीय परिस्थिती वेगळी असती तर वेगळे नेतृत्व नेहरूंना बाजूला सारूनही काँग्रेसमध्ये पुढे आले असते व काँग्रेसच्या बाहेरही एखादा समर्थ समाजवादी पक्ष

अनुक्रमणिका

उभा राहू शकला असता. केवळ नेहरूंवर टीका करून समाधान मानणाऱ्या विरोधी पक्षांनी आत्मपरीक्षण करून आपण एखादा पर्याय का देऊ शकलो नाही, या प्रश्नाचे उत्तरही शोधले पाहिजे.

काँग्रेसमध्ये एका दृष्टीने सर्वेसर्वा असे सर्वोच्च स्थान परंतु त्याचबरोबर आपल्याप्रमाणे ध्येयवादी अनुयायी नसल्यामुळे आलेली अगतिक एकाकी अवस्था हे नेहरूंचे पटेलांनंतरच्या कालखंडातील चित्र आहे. यामुळेच उद्‌गार आणि कृती यांमध्ये अंतर पडत गेले. ज्या क्षेत्रांत संघटनेच्या भरभक्कम आधाराची गरज असते त्या आर्थिक व सामाजिक परिवर्तनाच्या क्षेत्रांत तर हे विशेषच जाणवले. १९५७–५८ मध्ये डाव्या प्रवृत्तीचा एक 'जिंजर ग्रुप' काँग्रेसमध्ये स्थापन केला गेला, परंतु त्याने कधीच बाळसे धरले नाही.

समाजवादी समाजरचना व त्यासाठी नियोजित अर्थव्यवस्था हे नेहरूंचे आस्थेचे विषय. रशियातील नियोजनबद्ध आर्थिक विकासाच्या प्रयत्नांचे त्यांना आकर्षण. भारत स्वतंत्र होण्याच्या आधीही त्यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसने एक 'राष्ट्रीय नियोजन समिती' (National planning committee) नेमली होती. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर त्या दिशेने त्यांचे विचार चालू होणे स्वाभाविक होते. भारतीय परिस्थितीच्या मर्यादांत 'मिश्र अर्थव्यवस्थे' खेरीज अन्य पर्याय नव्हता. खाजगी व सरकारी अर्थव्यवस्थांत मेळ राखणे व नियोजन व लोकशाही या प्रथमदर्शनी विरोधी वाटणाऱ्या संकल्पनांचा प्रत्यक्ष व्यवहारात समन्वय घालणे या दुष्कर गोष्टी त्यांना साधावयाच्या होत्या. या साध्य करण्यासाठी लागणाऱ्या समर्पित वृत्तीच्या कर्तृत्वशाली कार्यकर्त्यांचा संच त्यांच्याकडे नव्हता. परिणामतः त्यांना नोकरशाहीवर अवलंबून राहावे लागले. या नोकरशाहीचे स्वतःचे असे काही ताण होते, परंतु त्याखेरीज सत्तास्थानातच रस असणाऱ्या काँग्रेसमधील कार्यकर्त्यांच्या दबावालाही नोकरशाहीला तोंड द्यावे लागत होते.

यातून निर्माण झालेल्या परिस्थितीचे मूल्यमापन धनंजयराव गाडगीळ यांनी १९६० मध्ये पुढीलप्रमाणे केले :

'भारतासारख्या गरीब देशात योजनाबद्ध आर्थिक विकासाच्या प्रयत्नांसाठी सुखोपभोगाबाबत संयम व कष्ट सोसण्याची तयारी यांची आवश्यकता असते. आपण सारे समान ध्येयासाठी समान कष्ट सोसत आहोत अशी भावना जनमानसात प्रभावी असणे यासाठी आवश्यक असते. ही भावना आज देशात मुळीच अस्तित्वात नाही असे आढळून येते. धनिकवर्गाच्या चैनीवर नियंत्रण ठेवण्याचा शासन काहीही प्रयत्न करताना दिसून येत नाही.

'बुद्धिजीवी वर्ग, अन्य व्यावसायिक व वरिष्ठ श्रेणीचे नोकरवर्ग यांच्याविषयी पूर्वी एकप्रकारचा आदरभाव लोकांच्या मनात असे. परंतु या वर्गाने राष्ट्रीय उत्पन्नाचा प्रमाणाबाहेर भाग स्वतःसाठी घ्यावयास सुरुवात केल्यापासून व या वर्गाची खाजगी भांडवलदारवर्गाशी हातमिळवणी झाल्यानंतर हा आदर ओसरला आहे. राजकीय पुढाऱ्यांचीही अशीच अवनती झाली आहे. राजकीय क्षेत्रातील काही राष्ट्रीय नेत्यांच्या व्यक्तिमत्त्वाभोवती पूर्वकाळातील वलय असल्यामुळे ही गोष्ट तितकीशी लक्षात येत नाही. परंतु पूर्वकाळाचा हा प्रभाव व हे जुने नेतृत्व फार काळ उपलब्ध राहणार नाही. नजीकच्या भविष्यकाळात शोषण करणाऱ्या या सर्व वर्गांचा व जनतेचा संघर्ष झाल्याखेरीज राहणार नाही. आणि मग देशातील केवळ नियोजनच नव्हे तर शांतता आणि सुव्यवस्था हीदेखील धोक्यात येतील.'[१४]

नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष असताना आधीच्या कालखंडाची गाडगीळ यांनी वर्णन केलेली परिस्थिती खालीलप्रमाणे होती.[१५]

१) विकेंद्रित छोटया उद्योगधंद्यांचा विकास करण्यात पूर्णपणे अपयश आले आहे.

२) प्रादेशिक विषमता नाहीशी करणे व पूर्ण रोजगाराची परिस्थिती निर्माण करणे यांपैकी कोणत्याच गोष्टीची पूर्तता होणे तर राहोच, परंतु त्यासंबंधातील कार्यवाहीचा प्रारंभही आपण केला आहे असे म्हणता येणार नाही.

या गोष्टी मान्य करणे म्हणजे १९५५ मध्ये उद्‌घोषित झालेल्या समाजवादी समाजरचनेच्या दृष्टीने वाटचाल करण्यात आपण पूर्णपणे अपयशी झालेले आहोत असे मान्य करण्यासारखे आहे. आणि या विधानाचा कालसंदर्भ अर्थात प्रामुख्याने नेहरू-युगाचाच होता.

काँग्रेसमध्येही या वस्तुस्थितीची जाणीव नव्हती असे नाही. परंतु घोषणा आणि कर्तृत्व यांत अंतर पडत होते ही गोष्ट खरी.

जानेवारी १९५५ च्या आवडी येथील अधिवेशनात काँग्रेसने आपला 'समाजवादी समाजरचने'चा सुप्रसिद्ध ठराव स्वीकारला.

'आर्थिक व सामाजिक क्षेत्रांत झपाट्याने प्रगती करण्याचा समय आता आला आहे. आता उत्पादनात वाढ केली पाहिजे, जीवनमान बरेचसे वर नेले पाहिजे, रोजगार उत्तरोत्तर वाढवला पाहिजे आणि दहा वर्षांच्या कालावधीत संपूर्ण रोजगाराची परिस्थिती निर्माण केली पाहिजे... आपले आर्थिक धोरण, समृद्धी आणि आर्थिक समता यांच्या दिशेने वाटचाल करणारे असे राहिले पाहिजे' असा त्या ठरावात निर्देश होता.

पुढील दहा वर्षांच्या काळात देश हे ध्येय साध्य करू शकला नाही अशी वस्तुस्थिती राहिली. (आजही ती वस्तुस्थिती दुर्दैवाने तशीच आहे.)

भारतातील साठ टक्के लोक दरडोई दरदिवशी तीन आणे उत्पन्नावर जगत आहेत असा कडवा निर्देश २१ ऑगस्ट १९६३ रोजी डॉ. लोहियांनी लोकसभेत केला. दारिद्र्यात खितपतणारी ही संख्या २७ कोटी अशी होती. त्यानंतर चार दिवसांनी या विधानाला उत्तर देताना त्या वेळचे नियोजनमंत्री गुलझारीलाल नंदा म्हणाले, 'तीन आण्याच्या रेषेखाली असणारे लोक फार तर पाच टक्के म्हणजे सुमारे सव्वादोन कोटी असतील. ज्या साठ टक्क्यांचा निर्देश डॉ. लोहियांनी केला त्यांचे सरासरी दरडोई दरदिवशीचे उत्पन्न साडेसात आणे इतके आहे.'

नंदा यांच्या विधानावर तीव्र प्रतिक्रिया होणे स्वाभाविक होते. या चर्चेत लोकसभेत भाग घेताना काँग्रेसपक्षाच्या सदस्या यशोदा रेड्डीदेखील म्हणाल्या (१०.९.१९६३): 'आपण त्यांना दिवसाला सात आणे देत आहोत याचे समाधान मानावे अशा अवनत अवस्थेला आपण येऊन पोहोचलो आहोत काय ? प्रत्येक माणसाला पुरेसे अन्न, पुरेसा कपडा मिळत आहे की नाही हा खरा प्रश्न आहे नियोजन, परराष्ट्रनीती, शाब्दिक आतषबाजी यांची कसोटी या प्रश्नाचे उत्तर ते कसे देतात यावर अवलंबून आहे.'

या चर्चेत पंडित जवाहरलाल नेहरूंना धारेवर धरण्याचा प्रयत्न डॉ. लोहिया यांनी केला. त्यातील व्यक्तिगत कडवटपणाचा भाग बाजूला ठेवला तरी वस्तुस्थिती चिंताजनक आहे ही गोष्ट स्पष्ट होती. नेहरूंच्या निधनापूर्वी भुवनेश्वर येथे जानेवारी १९६४ मध्ये भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात केलेल्या आपल्या अध्यक्षीय भाषणात कामराज यांनी याविषयीची अप्रत्यक्ष मान्यता दिली आहे. ते म्हणाले:[१६]

'स्वातंत्र्याच्या लढ्याच्या काळातही काँग्रेससंघटनेचे ध्येय केवळ स्वातंत्र्यसंपादन एवढेच नव्हते; सामाजिक, आर्थिक व राजकीय समता व न्याय यांच्या आधुनिक संकल्पनांप्रमाणे हे भारतीय समाजरचनेचे उद्दिष्ट काँग्रेसला अभिप्रेत होते.

'गांधीजींचे नेतृत्व लाभण्याच्या आधी काँग्रेस केवळ राजकीय स्वातंत्र्याच्या दिशेनेच विचार करीत असे. महात्माजींनी स्वातंत्र्याचा संदेश भारतात कानाकोपऱ्यांपर्यंत पोचवला ही गोष्ट तर खरीच, परंतु त्याचबरोबर जनतेचे दारिद्र्य आणि दुःख कसे दूर होऊ शकेल इकडेही त्यांनी आपले अवधान ठेवले होते.

'१९३१ च्या कराची काँग्रेसमध्ये आपण मूलभूत हक्कांचा ठराव पास केला; भारताच्या राज्यघटनेत वरील सर्व दृष्टिकोणाचा समावेश करणारी 'राष्ट्रीय धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे' अनुस्यूत केली. आवडी येथे भरलेल्या काँग्रेस अधिवेशनात आपण समाजवादी समाजरचनेचे ध्येय स्वीकारले. त्यानंतर झालेल्या दोन सर्वसाधारण निवडणुकांत देशाने काँग्रेसच्या धोरणाला आपली मान्यता दर्शविली आहे.'

हे सांगून नंतर तत्कालीन प्रत्यक्ष परिस्थितीच्या संदर्भात कामराज सांगतात :

'भारतातील आजची परिस्थिती मात्र वेगळी आहे. संपत्तीच्या विभाजनात असणारी प्रचंड विषमता आपल्या तत्त्वज्ञानाशी सुसंगत अशी नाही. अशी विषमता कायम राहिली, आणि जनतेचे सरासरी जीवनमान निकृष्ट राहिले, तर लोकशाहीचे रक्षण अवघड होऊन बसते. करविषयक धोरणातून ही विषमता दूर करता येईल अशी आपल्यापैकी अनेकांची कल्पना होती. हा उपाय पुरेसा प्रभावी

ठरलेला नाही आणि या दृष्टिकोणातून आपण आपल्या धोरणांची नवी आखणी केली पाहिजे.'

काँग्रेस अध्यक्षांची भाषणे नेहरूंच्या कालखंडात नेहरूंच्या अनुमतीनेच होत असत हे लक्षात घेतले, की कामराजांचे हे उद्गार नेहरूंनाही हे विश्लेषण मान्य असल्याचे अप्रत्यक्षपणे निदर्शक आहेत असे मानावयास हरकत नाही.

VII

समाजवादी समाजरचनेच्या आघाडीवरील हा दारुण पराभव होता. या पराभवाचे उत्तरदायित्व नेहरूंना टाळता येणार नाही, परंतु नेहरूंना याविषयी दोष देत असताना भारतातील डावे पक्ष, सर्वोदय आंदोलन व डाव्या मनोधारणेचे विचारवंत या सर्वांनी या पराभवाला आपणही कारणीभूत आहोत का, याचा शोध स्वतःशी घेतला पाहिजे. त्यांनाही यातील आपले उत्तरदायित्व स्वीकारावे लागेल.

या क्षेत्रातील अशा पराभवानेही नेहरूंच्या लोकप्रियतेला ढळ पोचला नाही, याला भारतीय जनतेची एकनिष्ठ भक्तीची प्रकृती एवढेच कारण नाही. अशा पराभवानंतरही उठून उजळून दिसावी अशी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची उंची व त्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव होता. त्यांनी काही क्षेत्रांत मिळविलेले यशही तसेच भव्य, दिव्य होते व ती क्षेत्रेही भारताच्या घडणीच्या दृष्टीने महत्त्वाची होती. धर्मातीत राष्ट्राची उभारणी, भारताची लोकशाही घडण व आंतरराष्ट्रीय स्तरावर तिसऱ्या जगातील राष्ट्रांत भारतीय नेतृत्वाला मान्यता ही ती तीन क्षेत्रे होत.

यांपैकी पहिल्या दोन क्षेत्रांत नेहरूंनी केलेले कार्य अमोल तर खरेच, परंतु त्याची पायाभरणी गांधीजींनी केली होती. प्राणपणाने गांधीजींनी जातीय वृत्तीशी झगडा केला होता व सत्य व अहिंसा यांच्याविषयीच्या आपल्या आग्रहातून त्यांनी लोकशाहीला पोषक असे वातावरण भारतात निर्माण केले होते. परंतु तरीही नेहरूंची मनःप्रकृती काहीशी वेगळी असती, तर या दोन्ही गोष्टींना विकृत वळण देणे त्यांना त्यांच्या जनमानसातील लोकप्रियतेच्या बळावर सहज शक्य होते. आसपासची मुस्लीम राष्ट्रे इस्लामी धर्माच्या पायावर आमच्या राष्ट्राची उभारणी आहे अशी स्पष्ट भूमिका घेत असताना, पाकिस्तानबरोबर सतत तणावाचे प्रसंग चालू असताना, अंतर्गत तणावांनी भारतातही जातीय वातावरण काही वेळा प्रक्षुब्ध होत असताना व अशा परिस्थितीत नेमके काय करावे याविषयी त्यांचे निकटचे व समर्थ सहकारी पटेल यांच्याशी मतभेद असण्याच्या वातावरणात व फाळणीनंतर लगेच जातीयता-विरोधी भूमिका निभावून नेणे नेहरूंना किती आव्हानात्मक आणि कष्टाचे झाले असेल याची कल्पना आपण करू शकतो. गांधीजी होते तोपर्यंत त्यांना एक समर्थ पाठीराखा होता. नंतर पटेल होते तोपर्यंत या बाबतीत मतभेद असणारा परंतु जुळवून घेणारा समर्थ सहकारी होता. पटेलांनंतर त्यांना समर्थ सहकारी किंवा भारतातील अन्य कोणी समर्थ विरोधक राहिला नाही ही गोष्ट ज्याप्रमाणे खरी, त्याचप्रमाणे या भूमिकेच्या समर्थ पाठराखणीसाठी ज्याच्या कर्तृत्वावर विश्वासून राहावे अशीही कोणी व्यक्ती उरली नाही.

जातीयता-विरोधाच्या संदर्भात ज्याप्रमाणे नेहरूंना एकाकी सर्व निभावून न्यावे लागले, त्याचप्रमाणे भारतीय लोकशाहीच्या आधाराबाबतही घडले. यासाठीही गांधीजींचे त्यांच्या कालखंडातील कार्य, सत्य, अहिंसा, सत्याग्रह यांविषयीचा गांधीजींचा आग्रह व प्रत्यक्ष कृतीने त्यांनी जनतेत निर्माण केलेल्या मनोभूमिका यांमुळे भारतात काही प्रमाणात लोकशाहीला अनुकूल वातावरण अस्तित्वात होते ही गोष्ट खरी. परंतु कालखंड अत्यंत कसोटीचाच होता. भारताच्या परंपरेत लोकशाही नव्हती. ब्रिटिश राजवटीत लोकशाहीच्या कल्पनेशी आपला प्राथमिक परिचय झाला, परंतु परतंत्र राष्ट्रात तिने काही मूळ धरण्याचा प्रश्नच नव्हता. मतदानाचा हक्कही अतिशय मर्यादित लोकसंख्येला होता. प्रत्येक प्रौढ व्यक्तीला मतदानाचा हक्क देण्याच्या टप्प्यापर्यंत यावयास इंग्लंडातदेखील तेथील लोकशाही प्रयोगाच्या प्रारंभकाळापासून जवळजवळ तीन शतके वाटचाल करावी लागली होती. भारत स्वतंत्र झाल्यानंतर आपल्या राज्यघटनेने ही प्रचंड उडी एका दमात घेतली. यात अदम्य उत्साह होता, त्याप्रमाणे प्रचंड धोकेही होते. जनतेच्या भावनांना आपल्याला हवे ते वळण देऊन आपल्या हातात सर्व सत्ता घेणे जनमानसात प्रिय असलेल्या एखाद्या

नेत्याला अशा परिस्थितीत सहज शक्य असते ; भारताच्या आसपास व जगात इतरत्र लोकशाही धडाधड कोसळून तेथे हुकूमशाह्या स्थापन होत आहेत असे त्या कालखंडाचे चित्र होते. नेहरूंच्या मनातही असा विचार कधी आला नाही. हाताशी काँग्रेसपक्षाची किंवा अन्य कोणती बळकट शिस्तबद्ध संघटना नसताना हे घडवून आणण्याची कुवत नसल्यामुळेच त्यांनी हे केले नाही असे म्हणणे नेहरूंना अन्यायकारक होईल असे मला वाटते. जनतेच्या लोकप्रियतेच्या लाटेवर आरूढ असताना सेनादलाने त्यांना पाठिंबा दिला नसता असे मानण्याचे कारण नाही. [एका परिसंवादात जनरल करिअप्पा म्हणाले होते– 'भारतीय सेना हुकूमशाहीला पाठिंबा देणार नाही कारण तिचे प्रशिक्षण ब्रिटिश लोकांच्या तालमीत झालेले आहे.' जयप्रकाश नारायण यांनी त्याच वेळी करीअप्पांना विचारले होते– Then what about Pakistan ? (मग पाकिस्तानात हे कसे घडले ?) या प्रश्नाचे उत्तर करिअप्पांच्याकडे नव्हते.]

नेहरूंच्या मनात जर लोकशाहीचा आग्रह नसता व त्या परिस्थितीत कदाचित सेनादलही त्यांच्या पाठीशी उभे राहिले नसते असे मानले तरी आपल्या हातांत सर्व सत्ता घेण्याचा आणखी एक मार्ग नेहरूंना मोकळा होता. रशियाच्या मदतीने व जनतेच्या सरळ पाठिंब्यावर विसंबून त्यांना सत्ता हाती घेता आली असती. या विधानावर अनेक आक्षेप घेतले जाऊ शकतील व बहुतेकांना हे विधान अनुचितही वाटेल याची मला जाणीव आहे. परंतु त्यांच्या ह्या तीव्र प्रतिक्रियेचे श्रेयही नेहरूंचेच आहे हे ते लोक थोडासा सूक्ष्म विचार करतील तर त्यांच्या लक्षात येऊ शकेल.

या शेवटच्या परिच्छेदाशी संबंधित असलेली व जिला आकार देण्याचे संपूर्ण श्रेय नेहरूंनाच दिले पाहिजे अशी तिसरी गोष्ट म्हणजे आपली परराष्ट्रनीती. आंतरराष्ट्रीय घटनांबाबत आपली भूमिका ठरविताना गांधीजी नेहरूंच्यावर विसंबून असत. भारताचे परराष्ट्रीय धोरण स्वतंत्र राहील याची स्पष्ट सूचना नेहरूंनी भारत परतंत्र असताना १९४६ मध्ये वेव्हेलच्या कारकीर्दीत हंगामी सरकारचे पंतप्रधान म्हणून त्यांनी केलेल्या पहिल्या भाषणातच दिली होती. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर तर भारताला आपले परराष्ट्रीय धोरण स्वतंत्रपणे ठरवणे भागच होते. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात रशिया किंवा अमेरिका यांच्यापैकी एकाच्या छत्रछायेखाली आपण सुरक्षितता शोधली पाहिजे असे इतर राष्ट्रांना– विशेषतः अप्रगत व पारतंत्र्यातून नुकत्याच स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांना– स्वाभाविकपणे वाटावे असाच तो काळ होता. हंगामी सरकारच्या काळातच घेतलेली पहिली आशियाई राष्ट्रांची परिषद, १९४९ मध्ये घेतलेली दुसरी परिषद व १९५५ मध्ये घेतलेली आफ्रिका व आशियामधील राष्ट्रांची बांडुंग परिषद, १९६१ मध्ये बेलग्रेड येथे घेतलेली गटातीत अलिप्ततावादी (Non-aligned) राष्ट्रांची परिषद. ही सर्व नेहरूंच्या परराष्ट्रीय नीतीच्या दिशेने त्यांनी टाकलेली महत्त्वाची पावले होती. या राष्ट्रांच्या समूहात भारताच्या एकूण आकारमानाच्या, व लोकसंख्येच्या संदर्भात भारताला महत्त्वाचे स्थान मिळणे अपरिहार्य होते ही गोष्ट खरी असली तरी त्या नेतृत्वाला खरी धार आणि तेज नेहरूंच्या व्यक्तिमत्त्वामुळे लाभले ही गोष्ट नाकारता येण्यासारखी नाही. तिसऱ्या जगाचा (Third World) प्रश्न राजकीय, आर्थिक, सामाजिक अशा सर्व अंगांनी दुसऱ्या महायुद्धानंतर त्या महायुद्धाच्या अनेक परिणामांचा एक केंद्रित परिणाम म्हणून आकस्मिकपणे सर्व जगासमोर येऊन उभा राहिला. या प्रश्नाचे स्वरूप समजून घेणे व त्या राष्ट्रांच्या हितासाठी संघटना बांधणे हे महत्त्वाचे कार्य नेहरूंनी केले. भारतापुरते बोलावयाचे तर याचे श्रेय त्यांचे एकटयाचे आहे व त्यांनी केलेल्या पायाभरणीवर आजही भारत या गटात मानाचे नेतृत्वाचे स्थान राखून आहे.

'राष्ट्र त्यांच्या हाती सुरक्षित आहे' असे गांधीजी नेहरूंबाबत म्हणाले होते. सर्व गोष्टींचा विचार केल्यानंतर आणि सर्व उणिवा लक्षात घेतल्यानंतरही राष्ट्र अन्य कोणाच्याही हाती याहून अधिक सुरक्षित राहू शकले नसते इतके तरी आपल्याला मान्य करावेच लागते.

संदर्भ–

१. The Discovery of India, आवृत्ती १९६९, पृ. ३६०–६५.
२. Selected works of Jawaharlal Nehru.
३. Hari Hara Das, Subhash Chandra Bose and the Indian National Movement, Sterling Publishers, 1983. पृ. १२५.
४. उपरि., पृ. १६९–७०.
५. Selected Works of Jawaharlal Nehru, Vol. XIV, पृ. ५४४–४५.
६. V. Shankar (Ed.), Sardar Patel, Select Correspondence 1945–1950. नवजीवन १९७६, पृ. १६९.
७. उपरि., पृ. ६३६.
८. उपरि., पृ. २११-१७.
९. उपरि., पृ. २१७–२६.
१०. उपरि., पृ. २२७–२८.
११. राजहंस, बा. न., लोकनायक जयप्रकाश, साधना प्रेस, १९७७, पृ. १२३.
१२. उपरि., पृ १२३-२४.
१३. उपरि., १२४–२५.
१४. Gadgil D. R., Planning and Economic Policy of India, Gokhale Institute Studies, No. 59, Foreword pp. xv–xvi.
१५. Gadgil D. R, Planning in India : Some Problems, Address at the University College Hall, Trivandrum, June 17, 1968; पृ. ६ व ७.
१६. AVARD Newsletter : Whither Social Justice ? Our Resolves versus The Realite. Jan.–April 1964; Annexure II.

⊙ ⊙ ⊙

साभार पोच–

* **प्राचीन मराठीतील प्रणयाख्याने व रूपकाख्याने** – डॉ. शिवाजी गवळकर ; प्रकाशक मराठी साहित्य परिषद, आंध्र प्रदेश, इसामिया बाजार, हैदराबाद ५०००२७ ; १९८५ ; पृ. १२७ ; कि. १८ रुपये.
* **खूणगाठी** – ना. घ. देशपांडे; मौज प्रकाशन गृह, खटाववाडी, मुंबई–४ ; १९८५; पृ. २२+१०७ ; किं. ३६ रुपये.
* **कागूद आणि सावली** (दोन लघु कादंबऱ्या) – आनंद पाटील; मौज प्रकाशन गृह, खटाववाडी, मुंबई–४; १९८६; पृ. १४७; किं. ४१ रुपये.
* **शूटिंग** – श्री. दा पानवलकर; मौज प्रकाशन गृह, खटाववाडी , मुंबई ४; १९८५; पृ. १५६; कि. ६५ रु.
* **मनवेला** – मृणालिनी जोगळेकर ; अमेय प्रकाशन, ८५ कॅनाल रोड, रामदास पेठ, नागपूर–१० ; १९८६ ; पृ. १४२ ; किं. ४० रुपये.
* **राजधानीतील १२ वर्षे** – द्वा. भ. कर्णिक ; श्रीविद्या प्रकाशन, पुणे–३० ; १९८६ ; पृ. १५३; किं. ४० रुपये.
* **सीमा प्रदेशातील भावगंगा** – डॉ. ताराबाई परांजपे; प्रकाशक– मराठी साहित्य परिषद, आंध्र प्रदेश, हैदराबाद ५०००२७ ; १९८५ ; पृ. १६० ; किं. २० रुपये.
* **कालमान** – फ. मुं. शिंदे ; परिमल प्रकाशन, खडकेश्वर, औरंगाबाद; १९८६ ; पृ. १७६ ; किं. ४० रुपये.

नेहरूपर्वातील कॉंग्रेसचे स्वरूप आणि कार्यपद्धती

प्र. म. बांदिवडेकर

– १ –

स्वातंत्र्यप्राप्तीसाठी प्रभावी जनआंदोलन उभारून नंतर राष्ट्रबांधणी आणि शासन या दुहेरी जबाबदारीचे आव्हान स्वीकारणारी कॉंग्रेस ही आशिया आणि आफ्रिका खंडांतील सर्वांत जुनी आणि तितकीच वैशिष्ट्यपूर्ण राजकीय संघटना आहे. साधारणत: संसदीय आणि इतर प्रकारच्या लोकशाही देशांमध्ये आढळणाऱ्या द्विपक्षपद्धती, बहुपक्षपद्धती यांपेक्षा भिन्न स्वरूपाची अशी एकप्रबळपक्षपद्धती भारतामध्ये रुजली, ती कॉंग्रेसच्या देशातील अद्वितीय स्थानामुळे. अशा प्रकारची कॉंग्रेसपद्धती किंवा एकप्रबळपक्षपद्धती अनेक स्थित्यंतरांमधून गेली आहे. या एकप्रबळपक्षपद्धतीमध्ये आणखी कोणत्या तऱ्हेचे बदल होतील आणि एकंदरीत या पद्धतीचे भवितव्य काय हा एक चर्चेचा आणि वादाचा विषय आहे. अशा प्रकारच्या चर्चेतील मुद्दे अधिक स्पष्ट होण्यासाठी पं. नेहरूंच्या नेतृत्वकालामध्ये कॉंग्रेसला कोणत्या प्रकारचे स्वरूप प्राप्त झाले, त्यामध्ये पं. नेहरूंचा वाटा कोणता होता आणि त्या काळातील कॉंग्रेसची एकूण कार्यपद्धती कशा स्वरूपाची होती, हे जाणून घेणे उद्बोधक ठरेल. प्रस्तुत लेखामध्ये अशा तऱ्हेचा आढावा घेण्यात आला आहे.

१९४६ मध्ये हंगामी मंत्रिमंडळाचे नेतृत्व स्वीकारल्यापासून तो १९६४ मध्ये मृत्यूपर्यंत पं. नेहरू अठरा वर्षे देशाच्या पंतप्रधानपदी होते. परंतु कॉंग्रेसमध्ये त्यांचे एकमुखी नेतृत्व १९५० मध्ये सरदार पटेलांच्या निधनानंतरच प्रस्थापित झाले. १९६२ मधील चिनी आक्रमणानंतर या एकमुखी नेतृत्वाला ग्रहण लागले. तेव्हा १९५१ मध्ये पुरुषोत्तमदास टंडन यांनी कॉंग्रेसच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्यानंतर व पंतप्रधानपद आणि कॉंग्रेसचे अध्यक्षपद अशी दोन्ही सत्तास्थाने पं. नेहरूंच्या हाती केंद्रित झाल्यापासून १९६२-६३ पर्यंत म्हणजे सुमारे बारा वर्षांचा काळ हा पं. नेहरूंच्या एकमुखी वर्चस्वाचा काळ. यालाच नेहरूपर्व म्हणता येईल. परंतु नेहरूपर्वातील कॉंग्रेसचे स्वरूप आणि कार्यपद्धती अधिक चांगल्या रीतीने समजून घेण्यासाठी प्रस्तुत लेखामध्ये १९४६ पासूनच्या तसेच अगदी अलीकडील घटनांचा संदर्भही विचारात घेतलेला आहे.

– २ –

१९४६ ते १९५१ हा पं. नेहरूंच्या नेतृत्वाबाबतीत तसेच कॉंग्रेसपक्षाच्याही बाबतीत संक्रमणावस्थेचा काळ होता. १९४६ मध्ये कॉंग्रेसने हंगामी शासनाची जबाबदारी स्वीकारण्यापर्यंत पक्ष आणि शासन यांच्या संबंधांचा फारसा विचार कॉंग्रेसनेत्यांना करावा लागला नव्हता. १९३७-१९३९ या काळात कॉंग्रेसने प्रांतिक शासनाची जबाबदारी उचलली होती. परंतु बहुतेक सर्व महत्त्वाचे राष्ट्रीय नेते संघटनात्मक कार्यामध्येच गुंतलेले होते. त्यामुळे प्रत्यक्ष शासनाची धुरा प्रांतिक किंवा दुय्यम दर्जाच्या नेत्यांनाच उचलावी लागली. या प्रांतिक शासनावर व मंत्र्यांवर राष्ट्रीय नेतृत्वाची आणि कॉंग्रेस कार्यकारिणीची पूर्ण देखरेख आणि जरब होती. स्वातंत्र्यप्राप्तीचे उद्दिष्ट हेच महत्त्वाचे असल्याने साहजिकच पक्ष आणि पक्षयंत्रणेपुढे मंत्रिमंडळांना त्यामानाने गौण स्थान मिळणे अत्यंत स्वाभाविकच होते. स्वातंत्र्याच्या सर्व आंदोलनांमध्ये कॉंग्रेसपक्षाची भूमिका साम्राज्यवाद आणि ब्रिटिश सरकार यांच्या विरोधाची असल्याने एकंदर शासनाबाबतच अविश्वासाची भावना समाजामध्ये आणि कॉंग्रेसनेते व कार्यकर्ते यांच्यामध्ये दीर्घ काळ मूळ धरून राहिली होती. हिंदू तत्त्वज्ञानामध्ये त्यागाच्या भावनेला महत्त्वाचे स्थान असल्याने सत्तेपासून दूर राहून पक्षकार्य आणि जनसेवा करीत राहणे नैतिक दृष्टीने श्रेष्ठतर कर्तव्य असल्याची सूक्ष्म अहंकारयुक्त जाणीव सत्तेपासून दूर राहिलेल्या

अनुक्रमणिका

नेत्यांमध्ये जोपासली गेली. त्याचा काही अंशी परिणाम, पक्ष आणि शासन यांच्या संबंधांच्या विचारावर वर उल्लेखिलेल्या संक्रमणावस्थेच्या काळामध्ये झालेला दिसून येतो.

हंगामी शासनाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर मात्र पक्ष आणि शासन यांच्या संबंधाबाबतचा प्रश्न गांभीर्याने विचारात घेण्याची गरज निर्माण झाली. १९४६ मध्ये काँग्रेसच्या अध्यक्षपदावर पं. नेहरूंची निवड झाल्यानंतर महिनाभरातच त्यांना हंगामी मंत्रिमंडळ बनविण्यासाठी व्हाईसरॉयकडून पाचारण करण्यात आले. अशा परिस्थितीत पंतप्रधानपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर पं. नेहरूंनी काँग्रेसच्या अध्यक्षपदावर राहावे का आणि दुसऱ्या एखाद्या व्यक्तीची निवड काँग्रेसाध्यक्षपदी झाल्यास पंतप्रधान आणि अध्यक्ष यांच्या भूमिका व परस्परसंबंध काय असावेत असे मूलभूत प्रश्न उपस्थित झाले.

प्रत्यक्ष शासनाची जबाबदारी स्वीकारण्यापूर्वी ऑगस्ट महिन्यामध्ये या प्रश्नाची चर्चा काँग्रेस कार्यकारिणीत झाली. कार्यकारिणीतील बहुसंख्य सदस्यांचे मत पं. नेहरूंनी अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा असे असले तरी, काही सदस्यांनी मात्र पं. नेहरूंनी या दोन्ही जबाबदाऱ्या पार पाडण्यास कोणतीच हरकत नसावी असे मत व्यक्त केले. इतकेच नव्हे तर, यापुढील काळात संसदीय पक्षाचे आणि संघटनेचे नेतृत्व एकाच व्यक्तीकडे असावे आणि पंतप्रधानपदी असलेल्या व्यक्तीने पक्षाचे दैनंदिन कार्य पाहण्यासाठी कार्याध्यक्षाची नेमणूक करावी अशीही सूचना करण्यात आली. एका महिन्यानंतर स्वतः पं. नेहरूंनीच या दोन्ही जबाबदाऱ्या एकाच व्यक्तीने पेलणे अशक्यप्राय असल्याचे नमूद करून पक्षाध्यक्षपदाचा राजीनामा देण्याचा आपला मनोदय व्यक्त केल्यामुळे वरील प्रश्नांची तड तातडीने लावण्याची आणि त्याविषयीचे निश्चित धोरण ठरविण्याची गरज निकडीची राहिली नाही. परंतु प्रश्नाचा गुंता मात्र तसाच राहिला.

म. गांधींच्या शिफारसीवरून त्यानंतर अध्यक्षपदावर आचार्य कृपालानींची निवड करण्यात आली. आतापर्यंत काँग्रेस अध्यक्षाला गौरवाने राष्ट्रपती म्हणून संबोधिले जात होते आणि त्या पदावर सामान्यतः प्रथमश्रेणीच्या राष्ट्रीय नेत्याची निवड होत होती. आता मात्र मंत्रिमंडळातील स्थान हे सत्तेच्या दृष्टीने अधिक महत्त्वाचे असल्याने बहुतेक प्रथमश्रेणीच्या नेत्यांना मंत्रिमंडळात स्थान मिळाले होते. आचार्य कृपालानी जरी दीर्घकाळ काँग्रेसचे सरचिटणीस म्हणून काम पाहात होते आणि गांधीजींचे निकटवर्ती होते, तरी तुलनेने काँग्रेसपक्षाच्या सत्तावर्तुळात त्यांचे स्थान त्यामानाने दुय्यमच होते. तरीही काँग्रेस संघटनेच्या महत्त्वाबाबत आणि विशेषतः राष्ट्राचे धोरण निर्धारित करण्यामध्ये पक्षाध्यक्षाच्या भूमिकेबाबत कृपालानींची काही निश्चित स्वरूपाची मते होती. हंगामी सरकारमधील काँग्रेस मंत्र्यांनी कोणतेही महत्त्वाचे निर्णय घेण्यापूर्वी काँग्रेस अध्यक्ष आणि कार्यकारिणी यांच्याशी विचारविनिमय केला पाहिजे याबाबत त्यांचा आग्रह होता. प्रत्यक्ष प्रशासनाच्या अडचणी ज्ञात झाल्यामुळे पं. नेहरू, वल्लभभाई आणि मंत्रिमंडळातील अन्य ज्येष्ठ सहकाऱ्यांचा दृष्टिकोण मात्र वेगळा होता. शासनाची दूरगामी उद्दिष्टे निश्चित करण्यामध्ये पक्षकार्यकारिणीने आपली भूमिका जरूर पार पाडावी, परंतु प्रत्येक वेळेला विशिष्ट प्रश्नांच्या बाबतीत पक्षकार्यकारिणीशी अशा तऱ्हेने विचारविनिमय करणे शक्य होणार नाही, अशा तऱ्हेची त्यांची भूमिका होती. वेळोवेळी घडणाऱ्या घटनांच्या संदर्भात मात्र काँग्रेसाध्यक्ष आणि कार्यकारिणी यांना माहिती देत राहण्यास या नेत्यांनी मान्यता दिली. पुढे फाळणीमुळे देशासमोर अनेक गंभीर समस्या निर्माण झाल्या. या समस्यांकडे पाहण्याचा शासनाचा दृष्टिकोण आणि कार्यकारिणीतील काही सदस्यांचा दृष्टिकोण यांमध्ये तफावत असल्याने शासन आणि कार्यकारिणी यांच्यातील संबंधात कटुता निर्माण होऊ लागली. नोव्हेंबर १९४६ मध्ये मीरत येथे कृपालानी अध्यक्षपदी विराजमान झाल्यानंतर थोडक्या अवधीतच या संघर्षातील पहिली ठिणगी पडली. कॅबिनेट मिशनने केलेल्या सूचनांच्या बाबतीत काँग्रेस आणि मुस्लिम लीग यांच्यामध्ये पेचप्रसंग निर्माण झाला होता. त्यातून मार्ग काढण्यासाठी एक शिष्टमंडळ लंडनला पाठविण्याची पंतप्रधान ॲटली यांची सूचना हंगामी मंत्रिमंडळातील सदस्यांनी मान्य केली.

अनुक्रमणिका

या बाबतीतील निर्णयाची कल्पना कृपालानींना शिष्टमंडळ लंडनला रवाना होण्याअगोदर दिली गेली असली, तरी त्याबाबतीत त्यांच्याशी वा काँग्रेस कार्यकारिणीशी कोणत्याही प्रकारची चर्चा झालेली नव्हती. याचा कृपालानींना मनस्वी राग आला. पुढील घटनांची ही नांदी होती.

देशाच्या फाळणीबाबत ब्रिटिश आणि मुस्लिम लीग यांच्याशी चाललेल्या वाटाघाटी एका नाजूक टप्प्यावर आल्या होत्या आणि त्यासंबंधाने पूर्ण गुप्तता राखण्याची आवश्यकता होती. परंतु काँग्रेस कार्यकारिणीमध्ये यासंबंधीची चर्चा झाली, की त्यातील काही भाग लगेच वृत्तपत्रांतून प्रसिद्ध होतो अशा तऱ्हेचा अनुभव शासनातील ज्येष्ठ मंत्र्यांना येऊ लागला. अशा तऱ्हेची परिस्थिती चालू राहिली, तर काँग्रेस कार्यकारिणीला कोणत्याही तऱ्हेची माहिती देणे अवघड होईल अशी समज अखेर पं. नेहरूंनी एका पत्राद्वारे कृपालानींना दिली. एव्हाना पक्ष आणि शासन यांच्या संबंधाबाबत काही निश्चित स्वरूपाचे दंडक ठरवून द्यावे लागतील याची कल्पना पं. नेहरूंना आली होती. स्वातंत्र्यप्राप्तीच्या अगोदर काहीच दिवस १५ जुलै १९४७ रोजी जवाहरलालजींनी एक अतिशय गुप्त स्वरूपाचे खास पत्र कृपालानी, पटेल, राजेंद्रप्रसाद, राजगोपालाचारी आणि महात्मा गांधी यांना उद्देशून लिहिले. या पत्रामधून पंडितजींचे पक्ष व शासन यांच्या संबंधातील मनोगत उत्तम रीतीने व्यक्त झालेले दिसते. सत्तांतरानंतर अर्थकारण, संरक्षण आणि अनेक महत्त्वाच्या प्रश्नांबाबत शासनाला निर्णय घ्यावे लागतील आणि गुप्ततेच्या दृष्टीने त्यांची चर्चा सहज रीतीने काँग्रेस कार्यकारिणीत करता येणार नाही. तेव्हा काँग्रेसने आखून दिलेल्या सर्वसामान्य धोरणविषयक चौकटीच्या आत राहून दैनंदिन प्रशासनविषयक प्रश्नांसंबंधीचे आणि धोरणाविषयीचे निर्णयस्वातंत्र्य शासनातील मंत्र्यांना द्यावे लागेल. शिवाय संसदीय पद्धतीमध्ये शासनाचे धोरण आणि कारभार यांना एक वेगळे वळण लावण्याची विशेष जबाबदारी पंतप्रधानाला पार पाडावी लागते. अशा अर्थाचे विचार पं. नेहरूंनी या पत्रातून व्यक्त करून भावी काळातील पक्ष आणि शासन यांच्यातील संबंधांचा पाया घातला असे म्हणावयास हरकत नाही.

तरीही कृपालानी आणि शासनातील मंत्री यांच्यातील कुरबुरी चालूच राहिल्या. संसदीय पक्षाला संघटनेकडून शक्ती आणि सत्ता या दोहोंचा लाभ होत असल्याने संघटनेचे सार्वभौमत्व संसदीय पक्षाने मान्य केले पाहिजे असा कृपालानींचा आग्रह होता. स्वातंत्र्यानंतर कृपालानी व शासनातील त्यांचे सहकारी यांच्यातील संबंधांमध्ये अधिक तीव्र स्वरूपाचे तणाव निर्माण झाले. त्यांच्यातील मतभेद केवळ कार्यपद्धतीपुरतेच मर्यादित राहिले नाहीत. पाकिस्तान, काश्मीर आणि हैद्राबाद यांच्या संदर्भात कृपालानींचा शासकीय धोरणाला प्रखर विरोध होता. अखेरीस महात्मा गांधींच्या संमतीने त्यांनी नोव्हेंबर १९४७ मध्ये पक्षाध्यक्षपदाचा राजीनामा दिला.

कृपालानींनंतर पटेल आणि नेहरू यांच्या आग्रहामुळे राजेंद्रप्रसाद यांना काँग्रेसचे अध्यक्षपद स्वीकारावे लागले. पेचप्रसंग निर्माण झाला असता पक्षातील पोकळी भरून काढण्यासाठी अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारण्याची राजेंद्रप्रसाद यांची ही दुसरी वेळ. सरकारमध्ये अन्नमंत्री म्हणून काम केल्याने शासनाच्या अडचणींची राजेंद्रप्रसाद यांना चांगली जाण होती. कृपालानी सरकारमध्ये सत्तास्थानावर नसल्याने या अडचणी त्यांना केव्हाच समजू शकल्या नाहीत. याशिवाय राजेंद्रप्रसादांचे सर्व काँग्रेसनेत्यांशी जिव्हाळ्याचे संबंध असल्याने अशा कठीण परिस्थितीमध्ये काँग्रेसच्या अध्यक्षपदाची जबाबदारी वाहण्यास राजेंद्रप्रसादांहून अधिक योग्य व्यक्ती अर्थातच नव्हती. जेमतेम वर्षभर अध्यक्षपदावर राहिल्यानंतर राजेंद्रप्रसादांनी प्रकृती-अस्वास्थ्याच्या कारणास्तव राजीनामा दिला. आणि पुनः अध्यक्षपदासाठी योग्य व्यक्ती शोधण्याचा प्रश्न निर्माण झाला.

या वर्षभरामध्ये काँग्रेस-पक्षाला काही गंभीर प्रसंगांना सामोरे जावे लागले. गांधीजींची हत्या झाली आणि त्यामुळे काँग्रेस-पक्षातील ऐक्याचा महत्त्वाचा आधारस्तंभच ढासळून पडला. काँग्रेस-समाजवादी काँग्रेसपक्षाला सोडून गेले. आणि सरदार पटेल आणि पं. नेहरू यांच्यातील स्पर्धेमुळे काँग्रेस-पक्षामध्ये आपापल्या गटांचे सामर्थ्य जोखण्याची चुरस निर्माण झाली.

१९४८ च्या अखेरीस काँग्रेसच्या अध्यक्षपदाची झालेली निवडणूक काँग्रेसअंतर्गत चाललेल्या सत्ता-स्पर्धेवर चांगलाच प्रकाश टाकते. या निवडणुकीचा सर्व तपशील येथे देता आला नाही, तरी तिचा नंतरच्या घटनांवर खोलवर परिणाम झाला असल्याने काही ठळक गोष्टी नमूद करणे आवश्यक आहे. या निवडणुकीमध्ये काँग्रेसमधील अनेक गटांनी आपापले मोर्चे बांधून उमेदवारांची निश्चिती केली व त्यानंतर गटागटांमध्ये तडजोडीने उमेदवार ठरविण्यासाठी वाटाघाटी सुरू झाल्या. काँग्रेसमधील गांधीवादी विचारसरणीच्या गटाने शंकरराव देव किंवा डॉ. पी. सी. घोष यांपैकी एकाचे नाव निश्चित करावयाचे ठरविले. उजव्या विचारसरणीच्या गटाने पुरुषोत्तमदास टंडन यांचे नाव मुक्रर केले. याशिवाय डॉ. पट्टाभी सीतारामय्या आणि आचार्य कृपालानी यांनीही निवडणूक लढविण्याचा मानस व्यक्त केला. याशिवाय डॉ. राजेंद्रप्रसादांनाही पुन: निवडणूक लढविण्याचा आग्रह काँग्रेस कार्यकारिणीच्या अनेक सदस्यांकडून होत होताच. परंतु निवडणूक अगदी तोंडाशी आली असता त्यांनी आपण निवडणूक लढविणार नसल्याचे जाहीर केले. शंकरराव देव, घोष आणि कृपालानी यांनीही बऱ्याच चर्चेअंती आपापली उमेदवारी मागे घेतली. शेवटी टंडन आणि पट्टाभी हे दोनच उमेदवार रिंगणामध्ये राहिले. डॉ. राजेंद्रप्रसादांनी बिनविरोध निवड व्हावी यासाठी केलेले सर्व प्रयत्न विफल ठरले.

टंडन यांना काँग्रेसमधील सर्व उजव्या विचारसरणीच्या नेत्यांचा व उद्योगपतींचा पाठिंबा होता व त्यांच्या प्रचारकार्याचा सर्व खर्च घनश्यामदास बिर्लांनी केला. पट्टाभी हे स्वत: काही पुरोगामी विचारसरणीचे होते असे नाही. परंतु या निवडणुकीमध्ये ते काँग्रेसमधील सर्व पुरोगामी शक्तींचे प्रतीक बनले.

या निवडणुकीमध्ये काँग्रेस कार्यकारिणीने आपला पाठिंबा उघडपणे कोणालाच दिला नाही. राजेंद्रप्रसाद, सरदार पटेल आणि पं. नेहरू यांच्यामध्ये या निवडणुकीच्या बाबतीत तटस्थ राहण्याबाबत मतैक्य झाले होते. स्वत: पं. नेहरू निवडणुकीच्या काळात देशाबाहेर होते. तरीही पं. नेहरूंचा आपणाला नैतिक पाठिंबा असल्याचा पट्टाभींचा दावा होता आणि त्यांच्या प्रचाराची मोहीमही पं. नेहरूंचे निकटवर्ती रफी अहमद किडवई यांनी चालवली होती. तसेच सरदार पटेल तटस्थ असल्यासारखे दिसत होते. तरीही त्यांच्या सचिवाने सर्व प्रांतांतील प्रमुख नेत्यांशी संपर्क साधून त्यांना टंडन यांना पाठिंबा देण्यास सुचविले.

जयपूर अधिवेशनात अटीतटीच्या झालेल्या या निवडणुकीमध्ये पट्टाभींना ११९९, तर टंडन यांना १०८५ मते मिळाली आणि ११४ मतांच्या अत्यल्प बहुमताने पट्टाभी निवडून आले. पट्टाभींच्या या विजयाचे पडसाद पुढे १९१० मध्ये झालेल्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीमध्ये उमटणार होते. परंतु पट्टाभी काँग्रेसचे अध्यक्ष झाल्यामुळे निदान दोन वर्षे तरी पक्ष आणि शासन यांच्यामध्ये निर्माण झालेले गढूळ वातावरण तात्पुरते निवळण्यास मदत झाली. काँग्रेसमधील आपल्या दुय्यम दर्जाच्या नेतृत्वाची पट्टाभींना यथार्थ कल्पना होती आणि स्वभावत: अध्यक्ष म्हणून आपण काही प्रभावी भूमिका बजावू शकू असेही त्यांना वाटत नव्हते. मुख्य म्हणजे सत्तेचे केंद्र काँग्रेस अध्यक्ष आणि कार्यकारिणी यांच्याकडून पंतप्रधान आणि मंत्रिमंडळ यांच्याकडे कायमचे बदलत असल्याची वास्तव परिस्थिती त्यांनी पूर्णपणे समजून घेऊन तिला मनोमन मान्यता दिली होती. तरीही पट्टाभी जे समजू शकले ते अद्यापि काँग्रेसमधील सर्वच नेत्यांना पटू शकत नव्हते. पक्षसंघटना आणि संसदीय पक्ष यांच्यातील सर्वश्रेष्ठत्वाचा हा वाद पुन: एकदा डोके वर काढणार होता.

पट्टाभींची दोन वर्षांची कारकीर्द संपण्याच्या सुमारास देशामध्ये राजकीय पेचप्रसंगांचे सावट आले होते आणि त्यामुळे पक्षामध्येही गोंधळाची स्थिती निर्माण झाली होती. जातीय दंगलींमुळे पूर्व पाकिस्तानातून पश्चिम बंगालमध्ये निर्वासितांची रीघ लागली होती. निर्वासितांच्या गंभीर समस्येमुळे नेहरूंचे पाकिस्तानविषयीचे धोरण कितपत योग्य आहे अशी चर्चा पक्षांतर्गत होऊ लागली होती. आणि धर्मनिरपेक्ष राज्य म्हणून भारत तग धरू शकेल काय याविषयीही अनेकांच्या मनात आशंका निर्माण झाली होती.

मध्यंतरीच्या काळात काँग्रेसने स्वीकारलेल्या नवीन घटनेप्रमाणे संघटनात्मक निवडणुका पार पाडल्या. पट्टाभींच्या विजयामध्ये महत्त्वपूर्ण कामगिरी बजावलेले अनेक गट या वेळी प्रांतिक पातळीवरील निवडणुकांत अल्पमतात गेले. तेव्हा आता त्यांची मदार राष्ट्रीय पातळीवरील महत्त्वाच्या जागा जिंकण्यावर होती. याउलट, प्रांतिक निवडणुकांमध्ये विजय मिळालेल्या नेत्यांचे लक्ष आता केंद्र पातळीवर आपल्या विजयावर शिक्कामोर्तब करण्याकडे होते.

१९५० मध्ये नाशिक येथे भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनामध्ये काँग्रेसच्या अध्यक्षपदासाठी एकूण सात उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज भरले. परंतु अखेरीस पुरुषोत्तमदास टंडन, आचार्य कृपालानी आणि शंकरराव देव यांच्यामध्ये निवडणूक झाली. १९४८ मधील निवडणुकीपेक्षा या निवडणुकीला अधिक महत्त्व प्राप्त झाले होते; कारण या दोन वर्षांमध्ये सरदार आणि पंडितजी यांच्यामधील संबंध तितके सौहार्दाचे राहिले नव्हते. एवढेच नव्हे तर, या निवडणुकीमध्ये दोन्ही नेत्यांची प्रतिष्ठा पणाला लागली होती.

टंडन यांच्या उमेदवारीस पंडित नेहरूंनी उघडपणे विरोध दर्शविला नाही. परंतु त्यांच्या अनेक मतांबाबत– विशेषतः जातीय समस्येबाबतच्या त्यांच्या मतांवर पंडितजींनी जाहीर टीका केली आणि आगामी अध्यक्षपदाच्या निवडणुकीमध्ये हा एक मूलभूत चर्चेचा विषय राहील, एवढेच नव्हे तर त्याचा पंतप्रधानपद आणि देश यांबाबतीत परिणाम झाल्याखेरीज राहणार नाही असेही मत व्यक्त केले.

टंडन यांच्या विरोधी आघाडी उभारण्यामध्ये पंडितजींचे निकटवर्ती रफी अहमद किडवई यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. पट्टाभींनी किंवा स्वतः पं. नेहरूंनी अध्यक्षपदासाठी निवडणूक लढवावी यासाठी त्यांनी अयशस्वी प्रयत्न केले. त्यानंतर शंकरराव देवांच्या उमेदवारीस पाठिंबा देण्याचाही विचार केला. परंतु अखेरीस टंडन यांच्याशी समर्थ रीतीने झुंज देण्यासाठी त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी आचार्य कृपालानींना निवडणुकीसाठी उभे केले. पक्ष आणि शासन यांच्या संबंधाबाबत कृपालानींच्या आग्रही मतांमुळे पक्षामध्ये पूर्वी एकदा वादळ निर्माण झाले असतानादेखील पं. नेहरूंच्या सहकाऱ्यांनी त्यांना निवडणुकीमध्ये पाठिंबा द्यावा हा दैवदुर्विलास होता. पक्ष आणि शासन यांच्या संबंधांबाबत टंडन यांची मतेदेखील कृपालानींपेक्षा फारशी वेगळी नव्हती. त्यामुळे या निवडणुकीमध्ये पक्ष–शासन संबंधाचा मूळ प्रश्न बाजूला राहून काँग्रेसमधील सत्तास्पर्धेला प्राधान्य मिळाले होते असेच म्हटले पाहिजे.

२९ ऑगस्ट १९५० ला झालेल्या या निवडणुकीत टंडन यांना १३०६, कृपालानी यांना १०५२ आणि देवांना फक्त २०२ मते मिळाली आणि टंडन काँग्रेसचे अध्यक्ष झाले. पक्ष–शासन संबंधांबाबतच्या नाटकातील मुख्य अंकाला येथून प्रारंभ झाला.

टंडन यांच्या विजयापुढे पंडितजींनी आपल्या व शासनाच्या धोरणाला पक्षाचा पूर्ववत पाठिंबा आहे का ते अजमावून पाहण्यासाठी परराष्ट्रीय धोरण, धर्मनिरपेक्षतेचे धोरण व आर्थिक धोरण यांसंबंधी अनेक ठराव अधिवेशनात मांडले. हे सर्व ठराव प्रचंड बहुमतानें मंजूर झाले आणि शासनाच्या धोरणाविषयी पक्षाने आपला संपूर्ण विश्वासदर्शक पाठिंबा व्यक्त केला या पाठिंब्यामुळे पंडितजींचे काहीसे समाधान झाले असले, तरीही पक्षांतर्गत असलेल्या गटबाजीमुळे आपल्या धोरणाला पक्षाचा खरोखरीच पाठिंबा आहे का याविषयी त्यांच्या मनामध्ये एक प्रकारची अस्वस्थता निर्माण झाली. काँग्रेस कार्यकारिणीवर काम करण्याबाबत टंडन यांनी दिलेल्या निमंत्रणास सुरवातीला नकार देऊन अध्यक्षपदाच्या निवडीबाबतचे आपले असमाधान त्यांनी नाट्यपूर्ण रीतीने व्यक्त केले. परंतु मौलाना आझाद आणि राजगोपालाचारी यांच्या मध्यस्थीमुळे अखेरीस पंडितजींनी कार्यकारिणीवर राहण्यास होकार दिला. टंडन यांनी नवीन कार्यकारिणीमध्ये आपणाला विरोध करणाऱ्या सर्व नेत्यांऐवजी आपल्या समर्थकांची कार्यकारिणीवर नेमणूक केली. किडवाईंचा समावेशही अर्थातच झालेला नव्हता. नवीन कार्यकारिणीमध्ये मुख्यत्वेकरून प्रांतिक पातळीवरच्या संघटनेतील प्रमुख नेत्यांचा भरणा होता.

अशा रीतीने टंडन यांच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीतील विजयामुळे काँग्रेसमधील उजव्या विचारसरणीच्या गटाचे वर्चस्व प्रस्थापित झाले. परंतु

अनुक्रमणिका

विजयाच्या या ऐन वेळी उजव्या गटाचे प्रमुख सूत्रधार वल्लभभाई पटेल यांचे १५ डिसेंबर १९५० रोजी निधन झाले. संघटनेवर पकड असलेल्या उजव्या गटाला हा जबरदस्त धक्का होता.

सरदार पटेल हयात असेपर्यंत पं. नेहरूंनी काँग्रेसपक्षाच्या संघटनात्मक बाबींमध्ये फारसे लक्ष घातले नव्हते. पटेलांच्या निधनामुळे मात्र पं. नेहरूंना विरोध करू शकेल असा दुसरा मातब्बर नेता काँग्रेस-पक्षात राहिला नाही. तेव्हा पंडितजींनी अधिक आत्म-विश्वासपूर्वक पक्षकार्यामध्ये लक्ष घालण्याचे ठरविले. काँग्रेसमधील दुही राष्ट्रीय एकात्मतेस विघातक ठरेल अशा विचाराने पंडितजींनी पटेल यांच्या मृत्यूनंतर वर्षभराच्या आतच अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या चार बैठकी अहमदाबाद, दिल्ली, बंगलोर आणि पुन: दिल्ली येथे बोलावून काँग्रेस-मध्ये ऐक्य निर्माण करण्यात पुढाकार घेतला.

टंडन यांच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीमध्ये अनेक गैरमार्गांचा वापर करण्यात आल्याचा आरोप करून कृपालानींनी काँग्रेसचे शुद्धीकरण घडवून आणून काँग्रेसला तिच्या मूळ उद्दिष्टांची पूर्ती करण्यास समर्थ करण्याच्या हेतूने काँग्रेसअंतर्गत लोकशाही आघाडीची स्थापना केली. त्यांना किड-वईंचाही पाठिंबा होता. अध्यक्ष टंडन यांनी काँग्रेस-अंतर्गत स्थापन झालेल्या या स्वतंत्र गटाची स्थापना पक्षाच्या ऐक्यास विघातक ठरेल आणि म्हणून या आघाडीचे विसर्जन करावे अशी भूमिका घेतली. याच सुमारास अहमदाबाद येथे अखिल भारतीय काँग्रेस समितीची बैठक झाली. पटेल यांच्या निधना-नंतरची ही पहिली बैठक. तिच्यामध्ये पक्षाचे ऐक्य टिकविण्याचा निर्धार व्यक्त करणारा ठरावही एक-मताने मंजूर करण्यात आला. तरीही टंडन व त्यांची कार्यकारिणी आणि कृपालानी-किडवई यांची लोक-शाही आघाडी यांच्यातील मतभेद मिटू शकले नाहीत. उलट, याच बैठकीमध्ये केंद्रीय निवडणूक समितीवरील सदस्यांच्या निवडणुकीच्या प्रश्नावरून पक्षातील गटबाजी पुन: उसळून वर आली. अखेर मौलाना आझाद यांच्या मध्यस्थीने या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या.

पक्ष अशा तऱ्हेच्या पेचप्रसंगांतून जात असताना आता पंडितजींना पक्षामध्ये ऐक्य प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने पुढाकार घेतल्याशिवाय गत्यंतर नव्हते. लोकशाही आघाडीचे विसर्जन करण्याबाबत कृपालानी व किडवई यांचे मन वळविण्याचा पंडितजींनी खूप प्रयत्न केला व अखेरीस त्याला त्यांनी सशर्त मान्यता दिली. परंतु दोन्ही गटांतील अविश्वासाची भावना खोलवर रुजलेली होती. त्यामुळे लोकशाही आघाडीला केंद्रीय निवडणूक समितीवर प्रतिनिधित्व मिळवून देण्याबाबत पं. नेहरूंनी दिलेल्या आश्वासनाची पूर्ती करण्यामध्ये टंडन यांच्या कार्यकारिणीने अनेक अडचणी निर्माण केल्या. कृपालानी-किडवई यांनादेखील कोणत्याही प्रकारे टंडन यांच्या गटाशी समझोता करण्याची मनापासून इच्छा नसावी. प्रत्यक्ष निवडणुकीत लोकशाही आघाडीच्या उमेदवारांनी माघार घेतली आणि स. का. पाटील यांनी टंडन गटातर्फे सुचविलेले पाच जणांचे पॅनेल अविरोध निवडून आले. अशा रीतीने बहुमतामध्ये असलेल्या टंडन गटाचा पुन: एकदा विजय झाला. लोकशाही आघाडीच्या या अपयशानंतर लगेच कृपालानींनी काँग्रेसचा राजीनामा दिला व महिनाभरातच त्यांनी पी. सी. घोष यांच्या सहकार्याने किसान मजदूर प्रजापक्षाची स्थापना केली. किडवई त्या वेळी पं. नेहरूंच्या मंत्रिमंडळामध्ये असल्याने ते या नवीन पक्षात सामील झाले नाहीत. कृपालानींच्या मतांशी ते सहमत असले तरी, काँग्रेसमध्ये राहूनच आपणाला आपले उद्दिष्ट साध्य करता येईल, अशा विश्वासाने त्यांनी अखिल भारतीय काँग्रेस समितीचे खास अधिवेशन बोलाविण्याची मागणी केली.

बंगलोरला अखिल भारतीय काँग्रेस समितीची सात महिन्यांत तिसऱ्यांदा बैठक झाली. या अधि-वेशनात पं. नेहरू काँग्रेस संघटनेचे प्रमुख म्हणून हातामध्ये सूत्रे घेणार अशा तऱ्हेच्या अफवा अगोदरपासूनच पसरल्या होत्या. परंतु टंडनगटाने नेहरूंच्या नेतृत्वाला कोणतेही आव्हान न देता, उलट, त्यांच्या सर्व धोरणांवर आपला विश्वास प्रकट केला. परंतु पक्षसंघटनेवर आपली पूर्ण पकड ठेवण्याचे त्यांचे डावपेच याहीवेळा सुरूच होते. किडवई हे काँग्रेसमधील फुटीरांनी बोलाविलेल्या पाटणा येथील मेळाव्यास उपस्थित राहिल्याचा ठपका टंडनगटाने त्यांच्यावर ठेवला. परंतु किडवई

यांनी काँग्रेसमधून बाहेर न पडण्याचा आपला इरादा व्यक्त केला. पंडित नेहरूंनी या अधिवेशनात दोन्ही गटांमध्ये मतैक्य घडवून आणण्याचा पुनः प्रयत्न केला. परंतु ते काँग्रेस कार्यकारिणीची किंवा केंद्रीय निवडणूक समितीची पुनर्रचना घडवून आणू शकले नाही. पुन: एकदा काँग्रेस ऐक्याच्या दृष्टीने तडजोड घडवून आणण्याची अपेक्षा व्यक्त करणारा पं. नेहरूंचा ठराव मंजूर झाला. हीच या बंगलोर अधिवेशनाची फलश्रुती.

बंगलोर अधिवेशनामध्ये काहीतरी क्रांतिकारक निर्णय होईल ही किडवईंची आशा फोल ठरली. आणि अखेरीस त्यांनी ३० जुलै १९५१ रोजी नेहरूमंत्रिमंडळाचा आपला राजीनामा दिला. या राजीनाम्यामुळे मात्र पं. नेहरूंनी काँग्रेस कार्यकारिणीच्या पुनर्रचनेच्या दृष्टीने निर्णायक पवित्रा घेण्याचे ठरविले आणि टंडन यांना त्यांनी काँग्रेस कार्यकारिणी व केंद्रीय निवडणूक समिती यांच्या सदस्यत्वाचा आपला राजीनामा देण्याचा निर्णय कळविला.

पं. नेहरूंच्या या निर्णयाचे काँग्रेस पक्षावर किती दूरगामी परिणाम होतील याची पूर्ण कल्पना असल्याने टंडन यांनी ११ ऑगस्ट रोजी काँग्रेस कार्यकारिणीची तातडीची बैठक बोलविली. आपले आणि कार्यकारिणीचे सूर संवादी नसल्याने आपण यापुढे कार्यकारिणीवर राहणे इष्ट होणार नाही असे मत व्यक्त करून काँग्रेस ऐक्यासाठी आपण केलेले प्रयत्न कसे विफल ठरले ते नेहरूंनी या वेळी कार्यकारिणीला सांगितले. बिपनचंद्ररॉय आणि गोविंद वल्लभ पंत यांनी या बाबतीत मध्यस्थी करून नेहरूंच्या सल्ल्याने काँग्रेस कार्यकारिणीची पुनर्रचना करण्याची शक्यता अजमावून पाहिली. परंतु या बाबतीत मात्र टंडन आपल्या भूमिकेवर ठाम राहिले आणि काँग्रेस कार्यकारिणीची पुनर्रचना करण्यापेक्षा आपण राजीनामा देणे पसंत करू असा इशारा त्यांनी दिला. त्यामुळे हे मध्यस्थीचे प्रयत्न अयशस्वी ठरले.

आठवडाभरातच काँग्रेस संसदीय पक्षाच्या बैठकीत पं. नेहरूंनी आपली भूमिका सविस्तरपणे मांडली. संसदीय पक्षाच्या बहुसंख्य सभासदांना पंतप्रधान आणि पक्षाध्यक्ष यांच्यातील संघर्षाचा हा प्रश्न म्हणजे संघटना आणि संसदीय पक्ष यांच्यातील संबंधांचा प्रश्न आहे, असेच वाटले. त्यामुळे पं. नेहरूंचे हात बळकट करण्याच्या दृष्टीने त्यांनी पंडितजींच्या नेतृत्वावर आपला अढळ विश्वास व्यक्त केला. संसदीय पक्षाची ही कृती टंडन यांच्या समर्थकांना पसंत पडली नाही. त्यांच्या मते पंडितजींच्या नेतृत्वावरील विश्वास हा वादाचा विषयच नव्हता. याशिवाय शासनामध्ये हुकूमशाही प्रवृत्तींची वाढ होऊ नये, यासाठी त्यांना शासनावर कार्यकारिणीचे नियंत्रण असण्याची आवश्यकताही वाटत होती.

दिल्ली येथे नंतर झालेल्या अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या बैठकीमध्ये टंडन आणि नेहरू यांच्यामध्ये तडजोड घडवून आणण्याचे अखेरचे प्रयत्नही व्यर्थ गेले. शेवटी स्वत: टंडन यांनीच काँग्रेस अध्यक्षपदाचा राजीनामा देण्याचे जाहीर केले. पं. नेहरू हे सर्व राष्ट्राचे प्रतिनिधित्व करत असल्याने त्यांचा कार्यकारिणीचा राजीनामा स्वीकारणे आपणाला शक्य होणार नाही, परंतु त्याचबरोबर कार्यकारिणी पंतप्रधानांच्या दबावाखाली राहणे आपणाला पसंत नसल्याचे मतही त्यांनी स्पष्ट शब्दांमध्ये व्यक्त केले. अध्यक्षपदाचा राजीनामा देऊन एका अर्थी टंडन यांनी स्वत:ची प्रतिष्ठा व पक्षाचे ऐक्य अबाधित राखले. त्यांच्या राजीनाम्यामुळे पक्षातील वादळ शांत झाले. पं. नेहरूंच्या नेतृत्वाची अपरिहार्यता न मानणारा असा एक गट काँग्रेसमध्ये होता. मध्यप्रदेशचे तत्कालीन गृहमंत्री द्वारकाप्रसाद मिश्रा यांनी पं. नेहरूंवर हुकूमशाही प्रवृत्तीने वागण्याचा आरोप करून आपल्या पदाचा आणि नंतर काँग्रेस पक्षाचाही राजीनामा दिला. परंतु त्याचे पक्षावर कोणतेही परिणाम झाले नाहीत. उलट, मिश्रांच्या राजीनाम्याचा पक्षकार्यकर्त्यांकडून व जनतेकडून निषेध झाला व अखेरीस श्री. मिश्रा यांना दीर्घकाळ राजकीय विजनवासात जावे लागले.

८ सप्टेंबर १९५१ रोजी त्याच अधिवेशनात अखिल भारतीय काँग्रेस समितीने टंडन यांचा राजीनामा स्वीकारून २९५ विरुद्ध ४ अशा मतांनी पं. नेहरूंची पक्षाध्यक्ष म्हणून निवड केली. या निवडीनंतर पं. नेहरूंनी ताबडतोब पक्षातील ऐक्य कायम राखण्यासाठी काही पावले उचलली. टंडन

यांची त्यांनी कार्यकारिणीवर नेमणूक केली व टंडन यांनीही त्यास संमती दिली. पक्ष सोडून गेलेल्यांना परत पक्षात येण्याचे आवाहन त्यांनी केले. त्याप्रमाणे ऑक्टोबरमध्ये किडवई परत काँग्रेस-मध्ये आले. किसान मजदूर प्रजा पक्षाचे काँग्रेसमध्ये विसर्जन व्हावे यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न मात्र यशस्वी झाले नाहीत.

१५ ते १९ ऑक्टोबर या काळात काँग्रेसचे दिल्ली येथे खास अधिवेशन बोलाविण्यात आले. या अधिवेशनात आर्थिक प्रश्न, जातीय समस्या आणि परराष्ट्रीय धोरण यांबाबतीतील पं. नेहरूंच्या धोरणाला पूर्ण मान्यता देण्यात आली. अशा रीतीने पंतप्रधान आणि पक्षाध्यक्ष म्हणून काँग्रेस पक्षाने पंडितजींचे एकमुखी नेतृत्व स्वीकारले. पक्षाच्या संक्रमणावस्थेचा काळ संपला. पं. नेहरूंच्या पक्षातील या निर्विवाद वर्चस्वापुढे पक्षाध्यक्षपदाच्या मर्यादा स्पष्ट झाल्या. संघटना पक्ष आणि संसदीय पक्ष यांच्या कार्यक्षेत्रांच्या मर्यादा निश्चित झाल्या. येथून काँग्रेसपक्षामध्ये केंद्रीकरणाच्या कालखंडाला प्रारंभ होऊन तो सुमारे बारा वर्षे टिकला.

– ३ –

१९५१ मध्ये पक्षाध्यक्षाची सूत्रे हाती घेतल्या-पासून सुमारे तीन वर्षे पंडितजींनी पक्ष–शासन संबंधात सुसंवाद साधण्याचा खूप प्रयत्न केला. १९५२ मधील सार्वत्रिक निवडणुकांत त्यांनी पक्षाला घवघवीत यश संपादन करून दिले. परंतु या निवडणुकांनंतर त्यांना बराचसा वेळ साहजिकच शासनकार्यासाठी द्यावा लागला. पक्षसंघटनेच्या कार्याला तितका वेळ न देता आल्याने त्यांना पक्षाचे दोन सरचिटणीस मल्लया आणि बलवंतराय मेहता यांच्याकडे बऱ्याचशा बाबी सोपवाव्या लागत. पंतप्रधानपद व पक्षाध्यक्षपद या दोन्ही जबाबदाऱ्या एकाच व्यक्तीला पार पाडता येणे अशक्य आहे असे पंडितजींचे सुरवातीपासूनचे मत होते. केवळ आपद्-धर्म म्हणून या दुहेरी जबाबदारीचा स्वीकार त्यांना नाइलाजाने करावा लागला होता. परंतु अशा प्रकारची व्यवस्था ही कायमची नसून तात्कालिक स्वरूपाची आहे हे त्यांचे मत निश्चित होते. पक्षातील बहुसंख्य सदस्यांना मात्र ही कायमची व्यवस्था आहे असेच वाटत होते. त्यामुळे पक्षाच्या दैनंदिन प्रशासनाचे कार्य पाहण्यासाठी उपाध्यक्षपद निर्माण करावे अशा तऱ्हेची एक सूचना पुढे आली. परंतु कार्यकारिणीमध्ये ही सूचना मंजूर झाली नाही.

पक्ष–शासन संबंधांची चर्चा अद्यापि पक्षातील विशिष्ट वर्तुळात होतच होती. हनुमंतैय्या आणि स. का. पाटील यांचा या संदर्भातील जाहीर वादही बराच रंगला. पंतप्रधानपद व अध्यक्षपद एकाच व्यक्तीकडे असण्याबद्दल नाराजी व्यक्त करण्यासाठी टंडन यांनीही कार्यकारिणीचा राजीनामा दिला. तरीही नेहरूंना अध्यक्षपदावर आणखी एका मुदती-साठी राहावेच लागले.

१९५४ च्या अखेरीस नेहरूंची अध्यक्षपदाची दुसरी मुदत संपत होती. या सुमारास पं. नेहरूंची व्यक्तिगत लोकप्रियता शिखरावर पोहचली होती. कोरिया आणि इंडोनेशियामध्ये भारताने बजावलेल्या कामगिरीमुळे देशाला आंतरराष्ट्रीय क्षेत्रात प्रतिष्ठा मिळाली होती. देशांतर्गत अन्नधान्य आघाडीवर सरकारने बरेच यश मिळविले होते. पहिली पंच-वार्षिक योजना यशस्वी रीतीने पूर्ण होत होती. परंतु अविरत श्रमाचा आणि दुहेरी जबाबदारीचा नेहरूंच्या मानसिक आणि शारीरिक प्रकृतीवर ताण पडला होता. वरचेवर विचारल्या जाणाऱ्या 'नेहरूंनंतर कोण ?' या प्रश्नानेही ते व्यथित होत होते. त्यामुळे त्यांनी पक्षाध्यक्षपदाच्या जबाबदारी-तून तात्काळ मुक्त होण्याचा निर्णय घेतला.

पं. नेहरूंच्या दृष्टिकोणाप्रमाणे पक्ष–शासन संबंधांचे दोन नमुने भारतासमोर होते. एक ब्रिटनचा व दुसरा सोव्हिएत संघाचा. ब्रिटिश नमुन्यामध्ये संसदीय पक्षाचे संघटनापक्षावर प्रभुत्व असते, तर सोव्हिएत संघामध्ये संघटनेचे संसदीय पक्षावर. भारतासारख्या देशामध्ये शासनाचे धोरण सर्व-सामान्य जनतेपर्यंत पोहोचवून त्याची अमलबजावणी करण्यासाठी आणखी एक मध्यममार्गी नमुना निर्माण करण्याची गरज आहे असे पंडितजींचे मत होते. संसदीय पद्धतीतील पंतप्रधानांची महत्त्वपूर्ण भूमिका पटवून देण्यासाठी मात्र ते इंग्लंडमध्ये मजूर-पक्षात निर्माण झालेल्या लास्की-ॲटली वादाची आठवण करून देत असत.

यानंतरच्या दहा वर्षांमध्ये काँग्रेसच्या अध्यक्ष-पदासाठी पं. नेहरूंना वेळोवेळी योग्य व्यक्तींची

निवड करावी लागली. ही निवड करताना पक्षातील मतैक्याबाबतचे त्यांचे स्वत:चे मूल्यमापन, देशातील राजकीय परिस्थिती, प्रादेशिक संतुलन, अल्पसंख्याकांना प्रतिनिधित्व आणि पक्षामध्ये नवीन नेतृत्व निर्माण करणे इत्यादी घटकांचा पंडितजी विचार करीत. परंतु सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे ज्याची नेमणूक अध्यक्षपदासाठी करावयाची त्याला शासनामध्ये उच्च पातळीवरील शासकीय कार्याचा अनुभव आहे की नाही, हे ते आवर्जून पाहात. शासनामध्ये उच्च पदावर कार्य केलेल्या व्यक्तीला प्रशासनातील अडचणींची जाणीव असल्याने पक्ष–शासन संबंधात अशी व्यक्ती अमूर्त तत्त्वांच्या मागे न लागता वास्तवतावादी दृष्टिकोण स्वीकारील अशी त्यांची रास्त अपेक्षा होती.

काँग्रेसच्या अध्यक्षपदासाठी योग्य व्यक्तीचा शोध सुरू झाला. स्वातंत्र्यपूर्वकाळासारखे हे पद काही आता आकर्षक वा आव्हानात्मक राहिले नव्हते. बहुधा म्हणूनच मुंबइचे भूतपूर्व मुख्यमंत्री बा. गं. खेर यांनी ही जबाबदारी स्वीकारण्यास नकार दिला. पं. नेहरूंना अपेक्षित असलेल्या सर्व आवश्यक अटींची पूर्तता करणारी व्यक्ती मिळणे तसे अवघडच होते. अखेरीस लालबहादूर शास्त्री यांनी त्या वेळच्या सौराष्ट्र या लहानशा घटकराज्याचे मुख्यमंत्री यू. एन्. ढेबर यांचे नाव सुचविले. पक्षविषयक बाबतीत लालबहादूर हे नेहरूंचे महत्त्वाचे सल्लागार होते. त्यांची सूचना स्वीकारून पं. नेहरूंनी मोरारजी देसाईंना यू. एन्. ढेबर यांच्याशी संपर्क साधण्यास सांगितले व अखेर कार्यकारिणीने एकमताने ढेबर यांच्या नावास संमती दिली.

श्री. ढेबर यांना सौराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री म्हणून सात वर्षांचा अनुभव होता आणि शासकीय प्रश्नांची त्यांना पूर्ण जाण होती. त्यांचे वय फक्त ४९ वर्षांचे असल्याने ते खऱ्या अर्थाने नवीन पिढीचे नेतृत्व करण्यास लायक होते. याशिवाय विधायक कार्यामध्ये त्यांना रस होता. सत्तेचे स्थान सोडून पक्षकार्याची जबाबदारी स्वीकारण्याची तयारी दाखवून त्यांनी आपण सत्तेच्या मागे नसल्याचेही दाखवून दिले. नेहरूंचे नेतृत्व आणि पक्षातील सर्वश्रेष्ठ स्थान मनोमन मान्य करून दुय्यम भूमिका बजावण्यासाठी योग्य अशा प्रकारची त्यांची स्वभावप्रकृती होती. आतापर्यंत काँग्रेस अध्यक्षपदाचे स्थान पं. नेहरू, मौलाना आझाद, डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्यासारख्या पहिल्या प्रतीच्या राष्ट्रीय नेत्यांनी किंवा त्यांच्याच पिढीतील आणि निकटवर्ती वर्तुळातील कृपालानी, पट्टाभी किंवा टंडन यांसारख्या दुय्यम नेत्यांनी भूषविलेले होते. ढेबर हे बरेच नंतरच्या पिढीतील. त्यामुळे पंडितजींचे नेतृत्व त्यांनी अगदी हृदयापासून स्वीकारावे हे स्वाभाविकच होते.

ढेबर यांनी म्हणूनच पक्ष–शासन संबंधाच्या प्रश्नाचा कधी नसता बाऊ केला नाही. एखादा विषय चर्चेसाठी उपस्थित केल्यानंतर त्याच्यावर खुल्या मनाने विचार करण्यास पं. नेहरू कधीही नकार देतील असेही त्यांना वाटले नाही. कार्यकारिणीसमोर ते सर्वसमावेशक स्वरूपाची कार्यक्रमपत्रिका ठेवीत असत. त्यामुळे ढेबर यांच्या कारकीर्दीत कार्यकारिणीत अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय प्रश्नांवर चर्चा होत असे. कार्यकारिणीतील चर्चेच्या विषयांची संख्या व व्याप्ती वाढली. उलटपक्षी, पं. नेहरूंनी श्री. ढेबर यांच्याशी सौहार्दाचे संबंध ठेवले. अनेक महत्त्वाच्या शासनविषयक प्रश्नांवर ते ढेबर यांना विश्वासातही घेत असत. त्यामुळे ढेबर यांच्या सुमारे साडेचार वर्षांच्या कारकीर्दीत पक्ष आणि शासन यांचे संबंध सलोख्याचे आणि सहकार्याचे राहिले. काँग्रेस संघटनेच्या कार्यात एकप्रकारचा नियमितपणा आला. दर दोन महिन्यांतून एकदा कार्यकारिणीच्या, चार महिन्यांतून एकदा प्रदेश काँग्रेस समितीच्या अध्यक्षांच्या, सहा महिन्यांतून एकदा अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या तसेच प्रांतिक काँग्रेस समित्यांच्या बैठका नित्यनियमाने होऊ लागल्या. या बैठकांमध्ये पंडितजी जास्तीत जास्त भाग घेऊ लागले. आवश्यक तर अशा बैठकांना मंत्र्यांनाही बोलविण्यात येत असे.

ढेबर यांनी पक्षसंघटनेला प्राप्त झालेली मरगळ नाहीशी करण्यासाठी वीस हजार लोकसंख्येमागे एका मंडल काँग्रेस समितीची रचना करण्यासाठी योजनाही आखली. ढेबर यांच्या कारकीर्दीत त्यांचे पं. नेहरूंशी मतभेद झालेच नाहीत असे नाही. परंतु अशा प्रसंगी शासकीय बाबतीत पं. नेहरूंचा शब्द अखेरचा मानला जाई आणि संघटनात्मक बाबतीत

अनुक्रमणिका

पंडितजी ढेबर यांना अधिकाधिक स्वातंत्र्य देत असत.

दुसऱ्यांदा अध्यक्षपदावर राहण्यासाठी ढेबर फारसे उत्सुक नव्हते, परंतु नेहरूंच्या व्यक्तिगत विनंतीचा आदर करून त्यांनी पुन: अध्यक्षपद स्वीकारले. परंतु ही दुसरी मुदत अर्धीच पूर्ण झाली असताना त्यांनी राजीनामा दिला. घटकराज्यातील पक्षसंघटनेमध्ये दादागिरी, बेशिस्त आणि कोणत्याही मार्गाने संघटनेवर आपली पकड घट्ट करण्याची प्रवृत्ती वाढीस लागली होती. विशेषत: बिहारमध्ये या बाबतीत आलेल्या कटू अनुभवांनंतर अखिल भारतीय काँग्रेससमितीच्या हैद्राबाद येथील १९५८ च्या अखेरीस भरलेल्या अधिवेशनामध्ये श्री. ढेबर यांनी पक्षाच्या कोणत्याही पदाधिकाऱ्याने त्या त्या पदावर दुसऱ्या मुदतीसाठी राहू नये असा ठराव मांडला व तो मंजूरही झाला. शासनातील नेत्यांचा पक्षसंघटनेच्या बाबतीतील वाढता हस्तक्षेप श्री. ढेबर यांना असह्य होऊ लागला होता, व बहुधा ते या बाबतीत पं. नेहरूंवरही नाराज असावेत असे मानण्यास जागा आहे. अशा परिस्थितीत वरील ठराव मंजूर होताच स्वत: आपला राजीनामा सादर करून श्री. ढेबर यांनी इतरांपुढे उत्तम आदर्श घालून दिला.

जानेवारी १९५९ मध्ये नागपूर येथे काँग्रेसचे अधिवेशन होणार होते. त्या वेळी नवीन पक्षाध्यक्ष कोण होणार याची जोरदार चर्चा सुरू झाली. या वेळी गोविंद वल्लभ पंत, श्री. ढेबर आणि दक्षिणेकडील राज्यांतील अनेक नेत्यांनी खलबत करून इंदिरा गांधींचे नाव अध्यक्षपदासाठी सुचविले. पं. नेहरू व स्वत: इंदिराजी सुरवातीस या सूचनेचा स्वीकार करण्याच्या बाबतीत फारसे उत्साही नव्हते. पं. नेहरू पंतप्रधानपदी असताना त्यांच्या कन्येने अध्यक्षपदी असावे ही कल्पना दोघांनाही काहीशी खटकणारी वाटली. अखेरीस विशेषत: दक्षिणेकडच्या काँग्रेस नेत्यांच्या आग्रहावरून इंदिराजींनी अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारण्यास संमती दिली. त्या वेळी इंदिराजींचे वय फक्त ४२ वर्षांचे होते.

इंदिराजींनी आपल्या कार्याची सुरुवात मोठ्या उत्साहाने केली. परंतु काही महिन्यांतच त्यांचा भ्रमनिरास झाला. पक्षातील गटबाजीविरुद्ध त्यांना जितक्या कणखरपणाने उपाययोजना करण्याची तीव्र इच्छा होती त्याप्रमाणे त्या बाबतीत त्यांना यश मिळू शकले नाही. परंतु केरळातील कम्युनिस्ट सरकार उलथून पाडण्यात, तसेच मुंबईच्या द्वैभाषिक राज्याचे विभाजन घडवून आणण्यात त्यांचा महत्त्वाचा वाटा होता. स्वातंत्र्यानंतर झालेल्या काँग्रेसच्या अध्यक्षांमध्ये इंदिराजींनी आपल्या चैतन्यपूर्ण व्यक्तिमत्त्वाने एक स्वत:चा ठसा उमटविला यात शंका नाही. प्रकृती-अस्वास्थ्याने इंदिराजींनी दुसऱ्यांदा अध्यक्षपदाची निवडणूक लढविण्यास नकार दिला.

या वेळेला दक्षिणेकडील राज्यांतून एखाद्या नेत्याची काँग्रेसच्या अध्यक्षपदावर निवड करावी असा विचार बळावला. दक्षिणेकडील राज्यांमध्ये काँग्रेस पक्ष एका अवघड स्थितीतून जात होता. राजगोपालाचारींनी स्वतंत्र पक्षाची स्थापना करून काँग्रेस पक्षाच्या सत्तेला आव्हान दिले होते. अशा परिस्थितीत काँग्रेस पक्षाची प्रतिमा दक्षिणेकडील राज्यांना अधिक आकर्षक वाटेल अशी काहीतरी उपाययोजना करण्याची आवश्यकता होती. शेवटी बऱ्याच विचारविनिमयानंतर संजीव रेड्डींचे नाव अध्यक्षपदासाठी निश्चित करण्यात आले. संजीव रेड्डी त्या वेळी आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री होते आणि त्या राज्यामध्ये काँग्रेस पक्षाचे तारू त्यांनी अस्थैर्याच्या वातावरणातून सुरक्षित रीतीने बाहेर काढले होते. ते वयाने तरुण होते आणि शासकीय कार्याचा अनुभव त्यांच्या पाठीमागे होता. परंतु आंध्रप्रदेशच्या बाहेर राजकीय पातळीवरील राजकारणामध्ये अद्यापि त्यांचा प्रवेश झालेला नव्हता. १९६० च्या प्रारंभी त्यांची काँग्रेस अध्यक्षपदावर बिनविरोध निवड झाली. काँग्रेस अध्यक्षाचे पद आता केवळ नामधारी प्रतिष्ठेचे राहिले आहे याची त्यांना पूर्ण कल्पना होती. काँग्रेस अध्यक्ष म्हणून आपणाला इंदिरा गांधींच्या चपराशाप्रमाणे वागविले जात होते अशी तक्रारही त्यांनी नंतर खाजगीत व्यक्त केली.

संजीव रेड्डी अध्यक्षपदावर असताना त्यांच्या गैरहजेरीमध्ये आंध्रप्रदेशमध्ये अंतर्गत गटबाजीला ऊत आला व त्याचा विपरित परिणाम त्या राज्यात १९६२ मधील सार्वत्रिक निवडणकांत दिसून आला.

त्यामुळे आंध्रमध्ये पक्षात ऐक्य प्रस्थापित करण्याच्या हेतूने कॉंग्रेस श्रेष्ठींनी संजीव रेड्डींना पुनः त्यांच्या राज्यात मुख्यमंत्री म्हणून सूत्रे हाती घेऊ दिली, संजीव रेड्डींच्या जागी आंध्रमध्ये संजीवय्या मुख्यमंत्रीपदावर आले होते. त्यांनी आता संजीव रेड्डींच्या मंत्रिमंडळात काम करण्यास नकार दिला. अशा परिस्थितीत संजीव रेड्डींचा विरोध असतानाही लालबहादूर शास्त्री आणि इंदिराजी यांनी संजीवय्या यांना कॉंग्रेस अध्यक्षपदावर आणण्यात पुढाकार घेतला.

अशा रीतीने १९५४ मध्ये पं. नेहरूंनी कॉंग्रेसचे अध्यक्षपद सोडून दिले तरी, त्यानंतरचे सर्व कॉंग्रेस अध्यक्ष त्यांच्या पूर्वसंमतीनेच अधिकारपदावर येऊ शकले. तसेच पं. नेहरूंच्या कॉंग्रेसपक्षातील सर्वश्रेष्ठ स्थानामुळे या सर्व अध्यक्षांची निवड बिनविरोध झाली. कॉंग्रेस अध्यक्षाची भूमिका पंतप्रधान नेहरू आणि ज्येष्ठ कॉंग्रेस नेते यांच्या सल्ल्याने पक्षाचे दैनंदिन कामकाज चालविण्यापुरती मर्यादित राहिली.

तरीही पक्ष–शासन संबंधांत पक्षाची भूमिका केवळ शासनाची री ओढण्यापुरती मर्यादित असू नये असा विचार नेहरूंच्या मनात नेहमीच होता. ऑक्टोबर १९६२च्या चिनी आक्रमणानंतर नेहरूंची मानसिक आणि शारीरिक प्रकृती ढासळली. चिनी आक्रमणामुळे देशामध्ये आणि पक्षामध्ये तात्पुरती ऐक्यभावना निर्माण झाल्यासारखे दिसले तरी, लष्करी संकट दूर झाल्यानंतर पक्षातील गटबाजीने पुनः डोके वर काढले. त्याचा परिणाम चिनी आक्रमणानंतर फक्त सात महिन्यांनंतर मे १९६३ मध्ये झालेल्या पोटनिवडणुकांमध्ये दिसून आला. अमरोहा, फरूखाबाद आणि राजकोट या ठिकाणी झालेल्या लोकसभेच्या पोटनिवडणुकांत आचार्य कृपालानी, डॉ. राम मनोहर लोहिया आणि मिनू मसानी हे विरोधी पक्षांचे प्रमुख नेते कॉंग्रेस उमेदवारांचा पराभव करून निवडून आले. लोकमत कॉंग्रेसविरोधी जात आहे याची जाणीव कॉंग्रेस-श्रेष्ठींना प्रकर्षाने झाली. अखिल भारतीय कॉंग्रेस समितीचे खास अधिवेशन बोलावून कॉंग्रेस पक्षाच्या स्थितीविषयी चर्चा करण्यासंबंधी ऐशी सभासदांनी मागणी केली. अशा परिस्थितीत मरगळलेल्या संघटनेला नवी संजीवनी प्राप्त करून देण्यासाठी मद्रासचे मुख्यमंत्री कामराज यांनी एक नाट्यपूर्ण आणि गतिशील सूचना केली. ही सुप्रसिद्ध कामराज योजना कामराज यांच्या नावाने प्रसिद्ध असली तरी, ती कामराज यांच्यामार्फत ओरिसाचे त्या वेळचे मुख्य-मंत्री विजू पटनाईक यांनी पुढे रेटली असे म्हणतात. खुद्द मद्रास राज्यामध्ये द्रविड मुन्नेत्र कळहमने कॉंग्रेसला जबरदस्त आव्हान दिले होते. त्यामुळे कामराजही चिंतित झाले होते. कामराज यांनी ही योजना उत्साहाने नेहरूंपुढे ठेवली. या योजनेप्रमाणे शासनामध्ये मंत्रिपदांवर असणाऱ्या ज्येष्ठ कॉंग्रेस नत्यांनी आपल्या मंत्रिपदांचा त्याग करून पक्ष-कार्यासाठी स्वतःला वाहून घ्यावयाचे होते. स्वतः कामराज यांनी आपला राजीनामा प्रथम देऊ केला. ही योजना स्वीकारण्यास पं. नेहरू सुरवातीला राजी नव्हते. नंतर त्यांनी स्वतःच राजीनामा देण्याचा विचार कामराज यांना बोलून दाखविला, परंतु कामराज यांनी तसे न करण्याबाबत पंडितजींचे मन वळविले. अखेरीस १० ऑगस्ट १९६३ रोजी झालेल्या कॉंग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीत कामराज यांनी आपली योजना मंजूर करून घेतली. पुनः नेहरूंनी स्वतःचा राजीनामा देऊ केला. कार्यकारिणीने त्याचा स्वीकार केला नाही. सर्व केंद्रीय मंत्र्यांनी व घटक राज्यांच्या मुख्य मंत्र्यांनी आपले राजीनामे पंडितजींकडे सुपूर्द केले. कोणाचे राजीनामे स्वीकारून त्यांना पक्षकार्यासाठी मोकळे करावयाचे हा नाजूक निर्णय पं. नेहरूंवर सोपविण्यात आला. २४ ऑगस्ट रोजी पंडितजींनी सहा केंद्रीय मंत्री व सहा घटक राज्यांचे मुख्यमंत्री यांचे राजीनामे स्वीकारल्याची घोषणा केली. केंद्रीय मंत्र्यांमध्ये मोरारजी देसाई, जग-जीवनराम, लालबहादूर शास्त्री, स. का. पाटील, बी. गोपाल रेड्डी व के. एल. श्रीमाळी तर घटक-राज्यांच्या मुख्यमंत्र्यांमध्ये कामराज, विजू पटनाईक, बक्षी गुलाम मोहम्मद, विनोदानन्द झा, सी. बी. गुप्ता व बी. ए. मंडलोई यांची नावे होती.

राजीनामे स्वीकारताना कामराज योजनेचा मूळ हेतू सफल व्हावा, परंतु त्याबरोबरच प्रशासन निष्क्रिय होऊ नये या दृष्टीने राजीनाम्यांचा विचार करण्यात आला असे मत पंडितजींनी व्यक्त केले.

याउलट, नेहरूंनी कुटिल नीतीने कामराज योजनेचा एक साधन म्हणून वापर केला व आपल्या मर्जीत नसलेल्या नेत्यांचा अडसर धूर्तपणाने दूर केला, एवढेच नव्हे तर, श्रीमती इंदिरा गांधी यांना आपला वारस म्हणून नेमण्यासाठीच हा सर्व खटाटोप आहे असे आरोप पंडितजींवर करण्यात आले. या आरोपांत काय तथ्य असेल ते असो, परंतु कामराज योजनेमुळे दीर्घकाळ राजकारणात असणाऱ्या काँग्रेस नेत्यांना जबरदस्त हादरा बसला व त्याचे परिणाम पं. नेहरूंनंतर लालबहादूर शास्त्री व त्यांच्यानंतर इंदिरा गांधी अधिकारपदावर येण्यात झाले हे निश्चित आहे. राजीनामा दिलेल्या व्यक्तींचा पक्षकार्यासाठी प्रत्यक्षात उपयोग कितपत झाला याविषयी शंकाच आहे.

कामराज योजनेचे जनक कामराज नाडर यांची काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून निवड करण्याचे कार्यकारिणीने ९ ऑक्टोबर रोजी ठरविले. या निवडीमध्ये काँग्रेसमध्ये उदयाला आलेल्या संजीव रेड्डी, निजलिंगप्पा, अतुल्य घोष, स. का. पाटील यांच्या सिंडिकेट गटाचा मोठा वाटा होता. कोणत्याही परिस्थितीत मोरारजी देसाई यांना काँग्रेसचे अध्यक्षपद मिळू द्यायचे नाही हा त्यामागचा खरा डाव होता.

काँग्रेसमधील सिंडिकेट गटाचा उदय हे एका दृष्टीने काँग्रेसमधील नेहरूपर्व संपुष्टात येणार असल्याचे चिन्हच होते. त्याची खूण भुवनेश्वर येथे जानेवारी १९६४ मध्ये भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात दिसून आली. या अधिवेशनात अखिल भारतीय काँग्रेस समितीमध्ये सिंडिकेट गटाची शक्ती दिसून आली. २७ मे १९६४ रोजी पं. नेहरूंचे निधन झाले आणि त्यांचा राजकीय वारस निश्चित करण्याच्या प्रश्नामुळे पुन: एकदा सुमारे एक तपानंतर काँग्रेसच्या अध्यक्षांची प्रतिष्ठा काही काळ तरी उंचावली. पं. नेहरूंच्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वामुळे आणि पंतप्रधानपदामुळे काँग्रेस अध्यक्ष, कार्यकारिणी, केंद्रीय मंत्री व घटकराज्याचे मुख्यमंत्री यांना दुय्यम स्थान प्राप्त झाले होते. काँग्रेस पक्षातील केंद्रीकरणाची ही प्रवृत्ती आता नेहरूंच्या निधनामुळे काही काळ थांबली आणि निदान १९६७ सालापर्यंत पक्षामध्ये विकेंद्रीकरणाची प्रक्रिया चालू होती. या काळात काँग्रेस अध्यक्ष, कार्यकारिणी आणि मुख्य म्हणजे घटकराज्यांच्या मुख्यमंत्र्यांना पक्षांतर्गत राजकारणात महत्त्व प्राप्त झाले. १९६९–७० मध्ये इंदिराजींचे पक्षामध्ये सर्वोच्च स्थान प्रस्थापित होईपर्यंत ही प्रक्रिया टिकणार होती. मध्यंतरीच्या या पाच वर्षांच्या कालखंडात पक्ष आणि शासन यांत सत्तासंतुलन निर्माण झालेले दिसते.

– ४ –

१९४६ पासून काँग्रेस पक्षांतर्गत चाललेल्या सत्तेच्या राजकारणाची प्रक्रिया पक्ष–शासन संबंधांच्या पार्श्वभूमीवर नेहरूपर्वापर्यंत समजून घेतली. त्यामधून पंतप्रधान आणि पक्षाध्यक्ष यांचे संबंध, काँग्रेसमधील विविध गट व त्यांच्या हालचाली आणि त्यांतून दृष्टोत्पत्तीस येणारे काँग्रेस पक्षाचे स्वरूप आपण पाहिले. तथापि काँग्रेसची घटना, रचना आणि कार्यपद्धती समजून घेतल्याखेरीज काँग्रेसपक्षाचे खरे स्वरूप स्पष्ट होणार नाही. यासाठी प्रथम काँग्रेसच्या घटनेचा विकास कसा झाला ते थोडक्यात पाहावे लागेल. एखाद्या विशाल वटवृक्षाप्रमाणे काँग्रेसला स्वरूप प्राप्त झाले ते महात्माजींच्या कल्पनाचातुर्य आणि संघटना शक्तीमुळे. काँग्रेसच्या संघटनेचे घटनात्मक स्वरूप महात्माजींनी १९२० नंतर प्रभावी रीतीने बदलले आणि स्वातंत्र्योत्तर काळामध्ये किंवा त्याच्या अगोदर महात्माजींनी आकार दिलेल्या या काँग्रेसच्या घटनेमध्ये फारच कमी बदल झाले. जे काही बदल झाले, ते मुख्यत्वेकरून जिल्हापातळीखालील क्षेत्रीय संघटना पुनर्गठित करण्यासाठी किंवा विविध पातळ्यांवर कार्य करणाऱ्या काँग्रेस समित्यांच्या सदस्यसंख्येमध्ये कालानुरूप थोडेफार बदल करण्यासाठी. सत्तांतर होईतो काँग्रेसची संघटना सर्व पातळ्यांवर शासनयंत्रणेला समांतर राहून प्रतिसरकारप्रमाणे कार्य करीत होती. ब्रिटिशांच्या प्रशासकीय यंत्रणेमध्ये आणि काँग्रेसच्या यंत्रणेमध्ये एका बाबतीत मात्र महत्त्वाचा फरक होता. ब्रिटिशांची प्रशासकीय यंत्रणा व प्रांतरचना त्यांच्या येथील सत्तेच्या दृढीकरणाबरोबर लष्करी आणि राजकीय गरजेनुसार निश्चित होत गेली. महात्माजींनी मात्र प्रांतिक काँग्रेसची रचना जनता आणि काँग्रेस कार्यकर्ते यांच्यामध्ये सुलभ रीतीने सुसंवाद प्रस्थापित

व्हावा यासाठी भाषिक तत्त्वानुसार केली. ब्रिटिशांच्या साम्राज्यसत्तेशी झुंज देऊ शकेल अशी शिस्तबद्ध संघटना म्हणून काँग्रेसला महात्माजींनी प्राप्त करून दिलेल्या या स्वरूपामुळे स्वातंत्र्योत्तर काळामध्ये नेहरूपर्वात काँग्रेसला निवडणुकांत प्रचंड यश प्राप्त करणे सहज शक्य झाले.

१८८५ मध्ये काँग्रेसची स्थापना झाली तेव्हा व त्यानंतर दीर्घकाळ ती एक विविध राजकीय संघटना आणि इतर संस्था यांनी पाठविलेल्या प्रतिनिधींची महासभा होती. १९०८ च्या सुमारास काँग्रेसमध्ये अखिल भारतीय पातळीपासून तो प्रांत, जिल्हा आणि तालुका पातळीपर्यंत निर्वाचित समित्यांनी कार्य करण्यास प्रारंभ केला.

१९२० नंतर महात्माजींनी काँग्रेसला राष्ट्रीय पातळीवरील निर्णय-प्रक्रिया घडवून आणणारी एक संघटना म्हणून तिची रचना एखाद्या पिरॅमिड-सारखी केली. अगदी तळाशी व्यापक बैठक असलेली काँग्रेसची वार्षिक सभा असे. तिच्यामध्ये सर्व प्रांतांनी पाठविलेले प्रतिनिधी असत. त्यांच्यावर प्रांतिक काँग्रेसमधून निर्वाचित झालेल्या प्रतिनिधींनी बनलेली अखिल भारतीय काँग्रेस समिती होती. तिच्यामध्ये प्रांतिक काँग्रेसने वार्षिक काँग्रेसवर पाठविलेल्या प्रतिनिधींनी आपणातून निवडलेले १/८ प्रतिनिधी असत. स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये ही समिती म्हणजे भारताची अनधिकृत संसदच होती असे मानावयास हरकत नाही. काँग्रेस-संघटनेच्या या पिरॅमिडच्या शिखरावर काँग्रेसची कार्यकारिणी असे. काँग्रेस कार्यकारिणीमध्ये आता काँग्रेसचे अध्यक्ष आणि इतर वीस सभासद असतात. सुरवातीला काँग्रेसचे वार्षिक अधिवेशन संघटित करण्यासाठी नेमलेल्या तदर्थ समितीकडून काँग्रेस अध्यक्षाची निवड केली जात असे. १९३४ नंतर त्याची निवडणूक प्रांतिक प्रतिनिधींकडून प्रत्यक्ष रीतीने होऊ लागली. सविनय कायदेभंग चळवळीचा अनुभव घेतल्यानंतर काँग्रेसचे कार्य प्रभावी रीतीने करण्यासाठी महात्माजींना काँग्रेसचे नेतृत्व केंद्रीभूत स्वरूपाचे असावे असे वाटू लागले. त्यासाठीच काँग्रेस अध्यक्षाची निवडणूक प्रतिनिधींद्वारे प्रत्यक्ष रीतीने व्हावी, परंतु काँग्रेस अध्यक्षाला आपली कार्यकारिणी नेमण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असावे अशी पद्धती त्यांनी अमलात आणली. प्रत्यक्षामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये अध्यक्ष आणि त्याची कार्यकारिणी या दोहोंची निवड गांधीजींच्या पूर्ण सल्ल्याने आणि संमतीने होत असे. कार्यकारिणीमध्ये निदान काही सदस्य प्रत्यक्ष निवडणुकीने निवडले जावेत असा एक मतप्रवाह काँग्रेसमध्ये होता. परंतु बऱ्याच दीर्घकाळानंतर १९६० मध्ये हे तत्त्व काही अंशी स्वीकारण्यात आले व कार्यकारिणीच्या वीस सभासदांपैकी तेरा सदस्यांची अध्यक्षाने नेमणूक करावयाची व सात सभासद प्रत्यक्ष निवडणुकीने निवडायचे अशी पद्धती अमलात आली. तरीही बहुधा ही निवडणूक कार्य-कारिणी व अध्यक्ष यांच्या प्रभावाखालीच होत असे.

प्रांतिक पातळीवर काँग्रेस-संघटनेची रचना स्वातंत्र्यापूर्वी व नंतर वेळोवेळी बदलत गेलेली आहे. प्रांत किंवा घटकराज्य पातळीवर प्रदेश काँग्रेस समिती ही सर्वोच्च समिती असून तिच्या खालोखाल जिल्हा किंवा शहर काँग्रेस समिती असते. त्यानंतर ब्लॉक वॉर्ड किंवा विभाग काँग्रेस समिती असते. विभाग-समित्यांच्या खालील समित्यांची रचना करावयाची का आणि कशी करावयाची हे ठरविण्याचा अधिकार प्रदेश काँग्रेस समितीला देण्यात आलेला आहे.

पक्षाच्या सदस्यत्वाबद्दल थोडेफार प्रयोग करून पाहण्यात आलेले आहेत. १९४८ मध्ये पक्षसदस्यत्वाचे तीन प्रकार ठरविण्यात आले. तत्पूर्वी चार आणे देऊन पक्षाचे ध्येयधोरण मान्य असणाऱ्या आणि एकवीस वय पूर्ण असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला पक्षाचे प्राथमिक सदस्यत्व मिळू शकत असे. १९४८ मध्ये काँग्रेसच्या घटनेमध्ये बदल करण्यात आला आणि प्राथमिक सदस्यत्वाखेरीज आणखी दोन प्रकारचे सदस्यत्व सुरू करण्यात आले. आता प्राथमिक सदस्यत्वासाठी चार आणे प्रवेश फीचीदेखील गरज नव्हती. याशिवाय विशेष सदस्यत्व आणि परिणामकारक सदस्यत्व असे आणखी दोन प्रकार सुरू करण्यात आले. विशेष सदस्यांसाठी खादीचा स्वीकार, मद्यपान-निषेध आणि जातीयतावादास विरोध अशा अटी निश्चित करण्यात आल्या. परिणामकारक सदस्यांवर पक्षकार्याचे बंधन होते. त्यानंतर १९५१ मध्ये

अनुक्रमणिका

प्राथमिक सदस्यत्व आणि क्रतिशील सदस्यत्व हे दोनच प्रकार निश्चित करण्यात आले. पक्षसदस्यत्वासाठी वयाची अट अठरा वर्षांपर्यंत शिथिल करण्यात आली व पक्षसदस्यत्वाची वर्गणी एक रुपया ठरली. परंतु वर्षभराने यातही थोडा बदल करून प्राथमिक सदस्यांसाठी पूर्ववत चार आणे वर्गणी निश्चित करण्यात आली. कृतिशील सभासदांवर मान सदस्यत्व फीशिवाय पक्षासाठी दहा रुपये जमविण्याचे बंधन टाकण्यात आले. १९५३ मध्ये जेव्हा पक्ष-सदस्यत्वाची मोठचा प्रमाणावर खोटी नोंदणी झाल्याचे आढळून आले, तेव्हा जिल्हा पातळीवर पक्षसदस्यांच्या नोंदणीयाद्या व्यवस्थित ठेवण्या-बाबत काटेकोर बंधने टाकण्यात आली. सदस्यत्व नोंदणी राहण्याच्या किंवा कामाच्या ठिकाणीच करण्याचे बंधन टाकण्यात आले. आणि पक्षसदस्य नोंदणी बरोबर आहे किंवा कसे ते पाहण्यासाठी छाननी समित्या नेमण्यात आल्या.

स्वातंत्र्यानंतर काँग्रेसला संघटना आणि शासन या दोन्ही पातळचांवर कार्य करावे लागले. तेव्हा पक्ष व शासन यांच्यामध्ये सुसंवाद निर्माण करण्या-साठी संसद व घटकराज्यांची विधिमंडळे यांवर निवडून आलेल्या सभासदांना पक्षसंघटनेत योग्य स्तरांवर स्थान देण्याचा विचार करण्यात आला. त्यासाठी १९५२ व १९५८ मध्ये पक्षाच्या घटनेत बदल करण्यात आले. त्यानुसार त्या त्या जिल्हचामध्ये किंवा शहरामध्ये निवडून आलेल्या संसद व विधिमंडळ सदस्यांना जिल्हा किंवा शहर काँग्रेस समितीवर स्थान देण्यात आले. तसेच संसद व विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे नेते आणि संसदीय काँग्रेस पक्षाने निवडलेले १५ संसद सदस्य यांना अखिल भारतीय काँग्रेस समितीवर स्थान देण्यात आले. त्याचप्रमाणे विधिमंडळ काँग्रेस पक्षाच्या सदस्यांनी निवडलेल्या प्रदेश काँग्रेस समितीच्या ५०% इतक्या सभासदांची प्रदेश काँग्रेस समितीवर नेमणूक करण्याचेही ठरले.

– ५ –

काँग्रेस पक्षाच्या घटनेवरून व त्यामध्ये स्वातंत्र्य-पूर्व व स्वातंत्र्योत्तर काळामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या या बदलांमुळे जनसामान्यांची संघटना आणि शासनाची जबाबदारी ही दोन्ही कर्तव्ये पार पाडण्यासाठी काँग्रेसच्या संघटनेमध्ये कोणते बदल करण्यात आले ते आपण पाहिले. परंतु काँग्रेस पक्षाच्या कार्यपद्धतीचा अधिक परिचय होण्यासाठी काँग्रेस कार्यकारिणीचे काँग्रेस पक्षातील स्थान व महत्त्व समजून घेतले पाहिजे. नेहरू-पर्वाच्या प्रारंभी काँग्रेस कार्यकारिणीला प्रामुख्याने चार कार्ये पार पाडावी लागत होती. अखिल भारतीय काँग्रेस समितीची एक उपसमिती म्हणून काँग्रेस कार्यकारिणी ही पक्षातील सर्वोच्च कार्यकारी सत्ता असून पक्षाने व अखिल भारतीय काँग्रेस समितीने निश्चित केलेले धोरण व कार्यक्रम प्रत्यक्षात आणणे हे तिचे पहिले कार्य. या दृष्टीने निदान घटनात्मक दृष्टीने तरी कार्यकारिणीला पक्षाचे धोरण ठरविण्यामध्ये पुढाकार घ्यावा लागत होता. कार्यकारिणीचे दुसरे कार्य म्हणजे पक्षातील प्रमुख प्रशासक म्हणून पक्षातील सभासद आणि विविध पातळींवर कार्य करणाऱ्या घटकसंस्थांवर तसेच प्रदेश काँग्रेस समित्यांवर नियंत्रण ठेवणे व त्यांना मार्गदर्शन करणे आणि पक्षशिस्त मोडणाऱ्या व पक्षाच्या धोरणांविरुद्ध वागणाऱ्या व्यक्ती आणि समित्या यांच्याविरुद्ध शिस्तभंगांची कारवाई करणे. पक्ष व शासन यांच्यात सुसंवाद व समन्वय साधणे हे कार्यकारिणीचे तिसरे कार्य. हे कार्य पार पाडताना कार्यकारिणी संसदीय मंडळ या उपसमितीमार्फत कार्य पाहते. चवथे आणि शेवटचे कार्य म्हणजे संसद आणि घटकराज्य विधिमंडळाच्या निवडणुकां-साठी पक्षाचे उमेदवार निश्चित करणे. हे कार्य कार्यकारिणी मध्यवर्ती निवडणूक समितीच्या मार्फत पार पाडते.

वरील प्रकारची कार्ये कार्यकारिणीला कितपत परिणामकारक रीतीने पार पाडता आली, या प्रश्नाचा विचार करताना कार्यकारिणीतील सभासद व त्यांची वर्तनपद्धती आणि कार्यकारिणीतील निर्णयप्रक्रियेची शैली या घटकांचा विचार करावयास हवा. स्वातंत्र्यानंतर कार्यकारिणीची संसदीय काँग्रेस पक्षापासूनची स्वायत्तता हा एक वादग्रस्त विषय ठरलेला आहे. अर्थात प्रत्यक्ष व्यवहारातील त्याचे उत्तर नेहरूंची काँग्रेसपक्षात एकमुखी नेतृत्व प्रस्थापित झाल्यापासून ठरून गेले, ही गोष्ट अलाहिदा. नेहरूपर्वातील काँग्रेसकार्यकारिणीमध्ये

अनुक्रमणिका

बहुसंख्य सदस्य संसदीय पक्षातील प्रमुख नेत्यांपैकी असल्याने त्यांचे कार्यकारिणीवर वर्चस्व होते. त्यामुळे काँग्रेस कार्यकारिणीची स्वायत्तता हा विषय पुढे नावापुरता शिल्लक राहिला. विशेषत: काँग्रेस कार्यकारिणीमध्ये निर्णय घेताना मतैक्याच्या प्रक्रियेने घेतले जात. मतैक्याने निर्णय घेण्याचे हे तंत्र कार्यकारिणीने इतक्या चांगल्या रीतीने विकसित केले की, त्यामुळे काँग्रेस पक्षाला एकप्रकारचे स्थैर्य प्राप्त झाले. तरीसुद्धा स्वातंत्र्यानंतर काही काळ कार्यकारिणीची स्वायत्तता हा एक वादाचा विषय राहिला.

हंगामी सरकारची स्थापना झाल्यानंतर लगेच मंत्रिमंडळातील मंत्र्यांना कार्यकारिणीमध्ये सदस्य म्हणून काम करता येईल का असा प्रश्न उपस्थित झाला. या प्रश्नाच्या बाबतीत खुद्द कार्यकारिणीतही एकमत नव्हते. तसेच मंत्र्यांनी कार्यकारिणीवर राहण्यास हरकत नाही, असे ज्यांचे मत होते त्यांनाही शासनाचे पक्षावर प्रभुत्व प्रस्थापित होऊ नये व कार्यकारिणीची स्वायत्तता अबाधित राहावी असे वाटत होते. अशा सदस्यांनी मंत्र्यांच्या कार्यकारिणीवरील संख्येवर मर्यादा असावी असे सुचविले. या प्रश्नाबाबत कार्यकारिणीत एकमत न झाल्याने हा प्रश्न अखिल भारतीय काँग्रेस समितीकडे सोपविण्यात आला. अखिल भारतीय काँग्रेस समितीची बैठक सप्टेंबर १९४६ मध्ये झाली. त्या वेळेला उत्तर प्रदेशचे तत्कालीन मुख्यमंत्री गोविंद वल्लभ पंत यांनी व्यक्तिगत रीतीने एक ठराव मांडला. हंगामी शासनामध्ये अधिकारपदावर असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला काँग्रेस कार्यकारिणीवर किंवा पक्षाच्या अन्य कोणत्याही समितीवर कार्य करण्यास हरकत नसावी अशा आशयाचा हा ठराव होता श्री. पंत यांना शासनाचा प्रत्यक्ष अनुभव असल्याने पक्ष आणि शासन यांत योग्य समन्वय राखावयाचा असेल, तर अशा तऱ्हेच्या परवानगीची किती आवश्यकता आहे याची एक ज्येष्ठ संसदपटू आणि कुशल शासक म्हणून त्यांना पूर्व कल्पना होती. श्री. पंत यांचा हा ठराव कार्यकारिणीने व अखिल भारतीय काँग्रेस समितीने मान्य केला आणि पक्षसंघटना व संसदीय पक्ष यांमध्ये सुसंवाद राखण्याच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले. तरीही शासनाचे कार्यकारिणीवर प्रभुत्व निर्माण होत आहे, ही भीती कार्यकारिणीच्या अनेक सभासदांच्या मनात डोकावत होतीच. स्वातंत्र्यानंतर काँग्रेसचे पहिले अध्यक्षपद प्राप्त झालेल्या कृपालानींनी आपल्या कार्यकारिणीमध्ये एकूण सदस्यांच्या $\frac{1}{3}$ इतक्याच मंत्र्यांना घेऊन स्वत:चा त्या बाबतीतील नैतिक आग्रह प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न केला. परंतु कृपालानींची समाधानाची भावना क्षणिक ठरली, कारण मंत्रिमंडळाची पुनर्रचना झाल्यावर कार्यकारिणीतील काहीजणांना मंत्रिमंडळात स्थान मिळाले व कार्यकारिणीतील मंत्र्यांची संख्या प्रमाणाहून अधिक झाली. मुंबईला अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या अधिवेशनात काँग्रेस घटनेत स्वातंत्र्योत्तर काळाला अनुरूप असे बदल करण्यासंबंधी जेव्हा विचारविनिमय झाला, तेव्हा पुन: एकदा कार्यकारिणीतील मंत्र्यांच्या संख्येचा प्रश्न विचारासाठी आला. या वेळेला मात्र मंत्र्यांची संख्या कार्यकारिणीच्या एकूण सदस्यांच्या $\frac{1}{3}$ हून अधिक असू नये असा नुसता ठरावच करण्यात आला नाही, तर तसा प्रत्यक्ष बदलही काँग्रेसच्या घटनेत करण्यात आला. परंतु संघटनेच्या वर्चस्वासाठी आग्रह धरणारांचे एवढ्याने समाधान झाले नाही. काँग्रेस कार्यकारिणीमध्ये १९४८ पूर्वी पंधरा सदस्य असत. ही संख्या वाढविण्याचा त्यांनी आग्रह धरला. हेतू असा की, त्यामुळे प्रांतिक संघटनेमध्ये कार्य करणाऱ्या नेत्यांना कार्यकारिणीत स्थान मिळून शासनाचा संघटनेवरील प्रभाव आणखी कमी होईल. वाढत्या दडपणामुळे अखेरीस कार्यकारिणीतील सदस्यांची संख्या वीस इतकी करण्यात आली. परंतु त्यामुळे संघटनावाद्यांचा व कार्यकारिणीचा प्रभाव न वाढता त्याला मर्यादा पडत असल्याचा उलट अनुभव येऊ लागला. कार्यकारिणीतील एकूण सदस्यांची संख्या वाढली व त्या प्रमाणात मंत्र्यांची संख्या कमी झाली. परिणामी काँग्रेसमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या सर्वच महत्त्वाच्या व्यक्तींचा समावेश कार्यकारिणीत न झाल्याने तिची वास्तविक सत्ता आणि प्रतिष्ठा यांचे अवमूल्यन झाले.

पक्ष–शासन संबंधातील प्रश्नाला कृपालानी व टंडन या दोहोंच्या अध्यक्षीय कारकीर्दीत महत्त्व प्राप्त झाले. कृपालानी–नेहरू यांच्यातील वाद

मुख्यतः अध्यक्ष व संसदीय नेतृत्व यांच्या संबंधातील होता. टंडन यांच्या कारकीर्दीत या प्रश्नाला व्यापक स्वरूप प्राप्त झाले. वाद केवळ काँग्रेस अध्यक्षाच्या भूमिकेपर्यंतच मर्यादित न राहता त्याची व्याप्ती कार्यकारिणीपर्यंत वाढली. नेहरू-टंडन वादामध्ये अखेरीस टंडन यांना हार पत्करावी लागली. त्यानंतर सबंध नेहरूपर्वामध्ये काँग्रेस कार्यकारिणीच्या घडणीमध्ये महत्त्वपूर्ण बदल घडून आले. स्वातंत्र्योत्तर काळातील नवी आर्थिक-सामाजिक आव्हाने स्वीकारण्यासाठी हा बदल आवश्यक होता यात शंका नाही. पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर या बदलास अधिक चालना मिळाली. इंदूर येथील अ. भा. काँग्रेस समितीच्या अधिवेशनात काँग्रेस अध्यक्षांना पूर्ववत काँग्रेस कार्यकारिणीची निवड करण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले आणि १/३ सदस्यत्वाबद्दलचा नियम रद्दबातल करण्यात आला. हळूहळू काँग्रेस कार्यकारिणीत ज्येष्ठ केंद्रीय मंत्री व घटकराज्यातील प्रभावी मुख्यमंत्री यांचा समावेश मोठ्या प्रमाणावर झाला. याशिवाय सदस्य नसलेल्या महत्त्वाच्या पक्षनेत्यांना कार्यकारिणीच्या बैठकीच्या वेळी निमंत्रित सदस्य म्हणून बोलाविण्याची जुनी प्रथा होती. या प्रथेचा मुक्त रीतीने वापर करून पंडितजींनी जे मुख्यमंत्री कार्यकारिणीचे सभासद नसत, त्यांनाही बैठकीला बोलावण्याची पद्धती सुरू केली. त्यामुळे पक्षाचे धोरण निश्चित करताना अधिक व्यापक पातळीवर चर्चा होऊ लागली. भारताने संघराज्यपद्धतीचा स्वीकार केल्यामुळे घटक राज्यांच्या मुख्यमंत्र्यांचा निर्णय-प्रक्रियेत समावेश होणे ही संघराज्याच्या स्थैर्याच्या व वाटचालीच्या दृष्टीने हितावह घटना होती. काँग्रेस पक्ष व काँग्रेस कार्यकारिणी यांच्या निर्णय-प्रक्रियेत अशा रीतीने केंद्रीकरणाची प्रवृत्ती स्थिर होऊ लागली. परंतु त्याचबरोबर घटकराज्यांच्या मुख्यमंत्र्यांना पक्षाच्या निर्णयप्रक्रियेत जे महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले, त्याचे दूरगामी परिणाम लालबहादूर शास्त्री आणि इंदिराजी यांच्या पंतप्रधानपदासाठी होणाऱ्या निवडीच्या वेळी दिसून येणार होते.

काँग्रेस कार्यकारिणीमध्ये कोणतेही महत्त्वाचे निर्णय घेताना एक अंतर्गत सत्तावर्तुळ निर्माण झालेले दिसते. ही काही नवीन घटना नव्हती. १९२० ते १९४६ या गांधीपर्वामध्येही साधारणतः कार्यकारिणीचे निम्मे सभासद वर्षानुवर्षे महत्त्वपूर्ण भूमिका बजावीत होते. नेहरूपर्वामध्ये महत्त्वाचा फरक झाला तो इतकाच. या अंतर्गत सत्तावर्तुळामध्ये संसदीय नेतृत्वाचे वर्चस्व पूर्णपणे प्रस्थापित झाले. कार्यकारिणीमध्ये समावेश असलेल्या पक्षाच्या सरचिटणिसांना स्वतंत्र राजकीय स्थान नसे. परंतु त्यांची निवड कार्यकारिणीवर दैनंदिन पक्षप्रशासन चालविण्यासाठी केलेली असे. संसदीय नेतृत्वाच्या कार्यकारिणीवरील प्रभावाच्या बाबतीत श्री. अतुल्य घोष यांचा एकमेव अपवाद दिसतो. ते १९५२ पासून दीर्घकाळ संसदेचे सभासद असले तरी, मंत्रिपदावर केव्हाही नव्हते.

संसदीय नेतृत्वाचे अशा रीतीने काँग्रेस कार्यकारिणीवर प्रभुत्व प्रस्थापित झाले असले, तरी त्यामुळे अ. भा. काँग्रेस समिती आणि पक्षाची वार्षिक अधिवेशने यांना काहीच महत्त्व राहिले नाही असा याचा अर्थ नाही. अ. भा. काँग्रेस समिती आणि वार्षिक अधिवेशने यांमुळे पक्षाची नाडी समजण्यास कार्यकारिणीला मोठी मदत होते. शिवाय काँग्रेस कार्यकारिणीमध्ये एकवाक्यता असेपर्यंतच तिला अ. भा. काँग्रेस समितीचे व पक्षाचे नेतृत्व करता येते.

नेहरूपर्वाच्या अखेरी अखेरीस मात्र कार्यकारिणीमध्ये संसदीय पक्षाच्या काही निवडक लोकांच्या हाती सत्ता केंद्रित झाल्याबद्दल तीव्र नाराजीची भावना निर्माण होऊ लागली व त्यातून काँग्रेस कार्यकारिणी अधिक प्रातिनिधिक स्वरूपाची व्हावी यासाठी तिच्यामध्ये अ. भा. काँग्रेस समितीने निवडलेले काही सभासद असावेत अशी मागणी पुढे आली. ही मागणी तशी गांधींच्या काळापासूनची होती. १९४८ मध्ये अ. भा. काँग्रेस समितीच्या मुंबई येथील अधिवेशनप्रसंगीदेखील या मागणीचा पुनरुच्चार करण्यात आला होता. अखेरीस ही मागणी रायपूर येथे १९६० मध्ये भरलेल्या अ. भा. काँग्रेस समितीच्या बैठकीमध्ये मान्य करून कार्यकारिणीचे $\frac{1}{3}$ सभासद निर्वाचित असावेत असे ठरविण्यात आले. ही मागणी जेव्हा अ. भा. काँग्रेस समितीच्या पुणे येथील अधिवेशनात मांडण्यात आली, तेव्हा पं. नेहरूंनी ही मागणी मान्य केल्यास

कार्यकारिणीत तणाव निर्माण होतील असे मत व्यक्त करून तिला विरोध दर्शविला. नंतर ही मागणी ठरावरूपाने मतदानास टाकली असताना नामंजूरही झाली. परंतु या वेळी पं. नेहरूंनी नाटयपूर्ण रीतीने निर्वाचित सदस्यत्वाच्या ठरावाला आपला पाठिंबा दर्शविला. हा ठराव मांडणाऱ्या लोकांचा उत्साह पाहून आपण आपले मत बदलल्याचे पंडितजींनी जाहीर केले, त्यामुळे नंतर रायपूरच्या अधिवेशनात हा ठराव मंजूर करण्यात आला. ही घटना पक्षामध्ये हळूहळू घडून येऊ घातलेल्या परिवर्तनाबरोबरच पंडितजींच्या लोकशाही स्वभावावरही बराच प्रकाश टाकते. कार्यकारिणीवरील निर्वाचित सदस्यत्वाचे हे तत्त्व मान्य झाल्याने कार्यकारिणीचा प्रभाव मात्र कमी झाला नाही. उलट, नेहरूपर्वामध्ये काँग्रेस कार्यकारिणी निर्वाचित जागांसाठी उमेदवारांची जी अधिकृत यादी प्रसिद्ध करत असे, तेच उमेदवार यशस्वी ठरत. याला फक्त एकदाच अपवाद झाला व तो म्हणजे डॉ. राम सुभग सिंग हे कार्यकारिणीवर अधिकृत पाठिंबा नसताना १९६१ मध्ये भावनगर येथील अ. भा. काँग्रेस समितीच्या अधिवेशनप्रसंगी निवडून आले. पुढे डॉ. राम सुभग सिंग यांचा नेतृत्वाच्या वर्तुळात समावेश झाल्याने या अपवादालाही नाममात्र महत्त्व राहिले.

— ६ —

नेहरूपर्वातील काँग्रेस कार्यकारिणीवर संसदीय नेतृत्वाचे वर्चस्व प्रस्थापित झाले तरी कार्यकारिणीची पूर्वीची वर्तनपद्धती आणि निर्णय-प्रक्रियेबाबतची शैली जवळपास तशीच राहिली. कार्यकारिणीची कार्यपद्धती, अनौपचारिकता, गुप्तता आणि सामूहिक जबाबदारी या वैशिष्टयांनी पूर्ववत प्रभावित राहिली.

काँग्रेसपक्षाची कार्यालयीन यंत्रणा फारशी मोठी नसल्याने व त्या यंत्रणेचा बराचसा वेळ संघटनात्मक गोष्टींकडे खर्च होत असल्याने कार्यकारिणीमध्ये चर्चेला येणाऱ्या कार्यक्रमपत्रिकेतील विषयांबाबत कार्यकारिणीतील कॅबिनेट मंत्र्यांनाच पुष्कळदा आपल्या शासकीय साहाय्यकांकडून माहिती गोळा करून धोरणविषयक ठरावांचे मसुदे तयार करावे लागत. कार्यकारिणीच्या बैठकी वर्षातून सहा वेळा आणि क्वचित प्रसंगी त्याहून अधिक वेळा झाल्या तरी, धोरणविषयक प्रश्नांबाबत तपशीलाने विचार करण्यासाठी फारसा वेळ नसे. कार्यकारिणीची बैठक साधारणतः दोन किंवा तीन दिवस चालत असे. या कारणांमुळेदेखील कार्यकारिणीवरील संसदीय नेतृत्वाचे वर्चस्व कायम राहिले.

साधारणत: कार्यकारिणीचे ठराव विस्तृत असत. त्यांमध्ये काँग्रेस कार्यकर्त्यांचे शिक्षण करण्याचा हेतुही असे व त्याचबरोबर कार्यकारिणीमध्ये मतैक्य पद्धतीने निर्णय घेण्याची प्रथा दीर्घकाळामध्ये विकसित झाल्याने पुष्कळदा विविध मतांचा समन्वय घडवून आणण्यासाठीदेखील असे विस्तृत ठराव करावे लागत असत. या बाबतीत जानेवारी १९५० मध्ये नियोजन मंडळ स्थापन करण्याबाबतचा ठराव काँग्रेस कार्यकारिणीने कसा मंजूर केला ते पाहण्यासारखे आहे. काँग्रेस कार्यकारिणीत तेव्हा सर्वोदयी विचारसरणीचा पुरस्कार करणारे शंकरराव देव, विशेष निमंत्रित म्हणून भाग घेणारे मजूर नेते खंडुभाई देसाई आणि गुलझारीलाल नंदा यांनी वेगवेगळे दृष्टिकोण मांडले. याशिवाय कार्यकारिणीत व्यापारीवर्ग व भांडवलदार यांबद्दल सहानुभूती असणारे उजव्या विचारसरणीचे काही सभासद होते. हा ठराव चर्चेच्या तीन फेऱ्यांतून गेला आणि सर्व मतप्रवाहांना सामावून घेणारा ठराव मतैक्य पद्धतीने मंजूर करण्यात आला. ज्या बाबतीत ताबडतोब एकमत होण्यासारखे नव्हते, त्या बाबतीत शासनाला निर्णयस्वातंत्र्य देण्यात आले.

कोणत्याही विषयाच्या बाबतीत कार्यकारिणीत चर्चा होई, तेव्हा सर्वसाधारणपणे स्वभावप्रकृती, ज्येष्ठता इत्यादींचा विचार करून सर्वांना आपले विचार व्यक्त करण्याची संधी दिली जाई आणि बहुधा सर्वांनी विचार केल्यानंतर एखाद्या ज्येष्ठ सदस्यावर कार्यकारिणीतील चर्चेबाबत मतैक्यदर्शक गोषवारा व निष्कर्ष सांगण्याची जबाबदारी टाकली जाई. मतदान घेण्याचा प्रसंग क्वचित येई. एवढे करून एखाद्या प्रश्नाबाबत मतैक्य होऊच शकले नाही तर, तीन मार्गांचा अवलंब केला जाई. एक म्हणजे ज्येष्ठ नेत्यांचा निर्णय अखेरचा मानला जाई किंवा वादग्रस्त विषयासंबंधीचा निर्णय पुढे ढकलण्यात येई. तिसरा मार्ग म्हणजे अ. भा. काँग्रेस

समितीमध्ये त्या विषयासंबंधी मतदान घेण्याचे ठरविण्यात येई

स्वतः नेहरूंनी काँग्रेसचे अध्यक्षपद स्वीकारल्या-नंतर काँग्रेस कार्यकारिणीमध्ये धोरणविषयक प्रश्नांची चर्चा अधिक प्रमाणात होऊ लागली. पक्ष-शासन संबंधांचा वाद निर्माण होऊन पंडितजी काँग्रेसचे अध्यक्ष बनले. त्यामुळे शासकीय धोरणासंबंधांची चर्चा कार्यकारिणीत अधिक प्रमाणात उपस्थित करणे व त्यास कार्यकारिणीची संमती घेणे त्यांना आवश्यक वाटले असावे. पक्षाच्या धोरणांपेक्षा नेहरूंना संघटनात्मक प्रश्न कमी महत्त्वाचे वाटत, हेही याचे दुसरे कारण असू शकेल. त्यामुळे पंडितजी अध्यक्ष-पदावरून दूर झाल्यानंतर मात्र पक्ष आणि शासन यांच्या धोरणापेक्षा संघटनात्मक प्रश्न अधिक प्रमाणात चर्चेसाठी येऊ लागले. पक्षाला पूर्ण वेळ अध्यक्ष लाभल्यामुळे अशा रीतीने कार्यकारीप्रमुख म्हणून कार्यकारिणीचे कार्य वाढल्याचे दिसून येते.

काँग्रेस कार्यकारिणीने देशांतर्गत धोरणविषयक महत्त्वाच्या प्रश्नांची चर्चा वेळोवेळी विस्तृत प्रमाणा-वर केली असली तरीदेखील देशाचे शासन चालविताना काँग्रेस पक्षाला ज्या अडचणींना तोंड द्यावे लागत होते, त्यांची चर्चा कार्यकारिणीत फारशी झाल्याचे दिसत नाही. तसेच देशांतर्गत प्रश्नांवर चर्चा होतानादेखील केंद्र-घटकराज्य संबंधांशी निगडित अशा प्रश्नांची चर्चा अधिक प्रमाणावर होत असे. अनेकदा महत्त्वाचे प्रश्न कार्यकारिणी-समोर औपचारिक चर्चेसाठी येतच नसत. असे प्रश्न कार्यकारिणीच्या बैठकांसाठी जमल्यावर अनौप-चारिक चर्चेने निकालात काढण्यात येत असत. बंगाल-बिहार यांच्यामधील सीमाविषयक प्रश्न अशा अनौपचारिक चर्चेतूनच सोडविला गेला. कार्यकारिणीमध्ये चालणाऱ्या अशा अनौपचारिक चर्चेतूनच राष्ट्रीय नेत्यांना राष्ट्रीय धोरणाची आखणी करणे शक्य होई.

सत्तेवर आल्यानंतर काँग्रेस पक्ष संक्रमणावस्थे-मधून जात होता. काँग्रेसअंतर्गत विविध मतप्रवाह होते साहजिकच पक्षामधून जेव्हा अनेक प्रकारच्या मागण्यांच्या पूर्ततेसाठी शासनावर दबाव येत असे, तेव्हा सर्वच प्रश्न समन्वयाने निकालात काढता येत नसत. शासनाच्या अनेक अडचणी पक्ष कार्यकर्त्यांच्या लक्षात येत नसत. त्यांमधून कार्यपद्धती आणि धोरणविषयक मूलभूत महत्त्वाचे प्रश्न यांबाबतीत पक्ष व शासन यांत कधीकधी संघर्ष होत. नेहरूंचे एकमुखी नेतृत्व प्रस्थापित झाल्यानंतर या प्रकारच्या संघर्षाची धार कमी झाली. या संदर्भात काही उदाहरणे नमूद करण्यासारखी आहेत. वनस्पती-तुपाची शुद्ध तुपामध्ये व्यापारी भेसळ करत आहेत, याविषयी काँग्रेस पक्षातील सनातनी हिंदूंनी खूप तक्रारी केल्या व शेवटी वनस्पती तूपाला रंग देऊनच त्याची विक्री करावी असे शासनाने बंधन घालण्याविषयीची जोरदार मागणी केली. या बाबतीत काँग्रेस कार्यकारिणीमध्ये वनस्पती-तुपाची निर्मिती करणाऱ्या यंत्रसामग्रीच्या आयातीवर बंदी घालावी आणि वनस्पतीमध्ये रंग मिसळण्याचे बंधन घालावे असा शासनाला विनंती करणारा ठराव मंजूर झाला. टंडन अध्यक्ष झाल्यानंतर शासनाने या ठरावाची अमलबजावणी करावी म्हणून त्यांच्यावर वरील गटाने खूप दडपण आणले. ठराव करून अठरा महिने लोटले तरी ठरावाची अमलबजावणी होत नाही, यासाठी कार्यकारिणीने पुनः ठराव केला. त्यानंतर दोनच महिन्यांनी वनस्पती-तुपाच्या निर्मितीवर बंदी घालावी अशा अर्थाचा ठराव अ. भा. काँग्रेस समितीने मौलाना आझाद, टंडन, सेठ गोविंद दास यांच्या मध्यस्थीला न जुमानता केला. वनस्पती-तुपावर बंदी घालण्या-बाबत काँग्रेस कार्यकारिणी आणि अ. भा. काँग्रेस समिती यांच्यामध्ये एकमत असतानादेखील या ठरावाची अमलबजावणी शासनाने केली नाही. या बाबतीत अ. भा. काँग्रेस समितीने सर्वसाधारण धोरण आखून घ्यावे, परंतु विशिष्ट प्रश्नांच्या बाबतीत निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य शासनाला असावे असे मत पंडितजींनी व्यक्त केले. याऊलट, टंडन यांनी पक्षाध्यक्षपदाचा राजीनामा देताना अ. भा. काँग्रेस समितीच्या ठरावांची शासन अमलबजावणी करत नाही असे कारण देऊन वनस्पती-तुपाच्या प्रश्नाचा संदर्भ दिला.

अशाच तऱ्हेचा दुसरा संघर्ष भाषिक राज्यांच्या निर्मितीबाबत झाला. भाषावार प्रांत-पुनर्रचनेचे तत्त्व गांधींच्या नेतृत्वाखाली १९२० मध्येच काँग्रेसने स्वीकारलेले होते. परंतु फाळणीनंतर देश एका

अनुक्रमणिका

बिकट परिस्थितीतून जात असताना भाषावार प्रांत-पुनर्रचना करणे म्हणजे विघटनवादी आणि फुटीर प्रवृत्तींना वाव देणे असे राष्ट्रीय नेत्यांचे मत झाले. शासनाने नेमलेल्या एस्. के. दार आयोगाने डिसेंबर १९४८ मध्ये भाषावार प्रांत-पुनर्रचना तावडतोब करणे व्यापक देशहिताच्या दृष्टिकोणातून योग्य होणार नाही असेच मत व्यक्त केले. तरीही काँग्रेस कार्यकर्त्यांच्या दबावामुळे काँग्रेस कार्यकारिणीने या प्रश्नाचा विचार करण्यासाठी नेहरू–पटेल–पट्टाभि समिती नेमली. या समितीनेदेखील दार आयोगा-प्रमाणेच मत व्यक्त केले. तरीदेखील १७ नोव्हेंबर १९४९ रोजी कार्यकारिणीने एका ठरावाद्वारे आंध्रची निर्मिती करण्याबाबत शासनाला एका ठरावान्वये विनंती केली. परंतु २४ जानेवारी १९५० रोजी अशातऱ्हेने आंध्रच्या निर्मितीमध्ये अनेक अडचणी असल्याची घोषणा करून कार्यकारिणीच्या ठरावाची अमलबजावणी करण्यास शासनाने नकार दिला. पुनः नेहरू-टंडन संघर्ष अगदी निकरावर आला असताना कार्यकारिणीने भाषिक प्रांत-पुनर्रचना तातडीने करण्यासंबंधीचा आणखी एक ठराव केला. तरीही पहिल्या सार्वत्रिक निवडणुका पार पडेपर्यंत या बाबतीत शासनाने कोणतीही हालचाल केली नाही.

पक्षाने आखून दिलेले धोरण प्रत्यक्षात आणण्याच्या बाबतीत पंडितजी किती स्वातंत्र्य घेत, त्याचे आणखी एक उदाहरण देता येईल. पक्षाने नेमलेल्या आर्थिक कार्यक्रम समितीने आपला अहवाल २५ जानेवारी १९४८ ला कार्यकारिणीस सादर केला. नंतर हा अहवाल अ. भा. काँग्रेस समितीनेही मंजूर केला. अहवालातील सूचना समाजवादी धोरणास अनुकूल होत्या. व त्यांत महत्त्वाचे उद्योगधंदे, संरक्षण, उत्पादन व सार्वजनिक उपयोगी सेवा इत्यादींचे राष्ट्रीयी-करण करण्यावर भर दिलेला होता. विशेष म्हणजे हा अहवाल तयार करण्यात स्वतः पंडितजींनीच पुढाकार घेतला होता. तरीही यासंबंधी प्रत्यक्ष अमलबजावणी करावी याबद्दलचा ठराव संसदेत एका काँग्रेस सदस्याने मांडला असता पं. नेहरूंनी शासनाने आपले आर्थिक धोरण अद्यापि निश्चित न केल्याचे सांगून अहवालातील सूचनांची अमलबजावणी करण्यास नकार दिला. त्यानंतर शासनाने जेव्हा औद्योगिक धोरणासंबंधीचा १९४८ मधील ठराव संसदेमध्ये आणून शासनाची भूमिका स्पष्ट केली, तेव्हा असे दिसून आले की, पक्षाने मान्य केलेल्या आर्थिक कार्यक्रमासंबंधीच्या अहवालात व या ठरावात महदंतर होते. या औद्योगिक धोरणासंबंधीच्या ठरावात आर्थिक वास्तवता लक्षात घेऊन अनेक तडजोडी स्वीकारलेल्या होत्या व मिश्र अर्थव्यवस्थेचे धोरण स्वीकारलेले होते. राष्ट्रीयी-करणाचा प्रश्न पुढे ढकलण्यात आला होता. या बाबतीत पक्षाचे धोरण डावलल्याची जोरदार तक्रार पक्षाचे सरचिटणीस शंकरराव देव यांनी केली. अहवाल तयार करण्यात स्वतः पुढाकार घेऊन नंतर त्याची अमलबजावणी करण्यास पंडितजींनी नकार का दिला ? देश एका पेंचप्रसंगातून जात असताना उत्पादनामध्ये खीळ पडू नये, तसेच उद्योगपतींच्या मनामध्ये शासनाबद्दल अविश्वासाची भावना निर्माण होऊ नये हा वास्तवदर्शी विचार त्याच्या पाठीमागे होता. सरदार पटेलदेखील अहवालातील सूचनांबद्दल नाराज होते. त्याबरोबरच पक्षाचे धोरण अमलात आणताना शासनाला तत्संबंधी अग्रक्रम ठरविण्याचे स्वातंत्र्य पाहिजे हा पंडितजींचा दृष्टिकोणही यास कारणीभूत होता.

पं. नेहरूंकडे काँग्रेसचे अध्यक्षपद आल्यानंतर अर्थातच पक्ष-शासन संघर्षाचा प्रश्न मृतवत बनला. फाळणीमुळे निर्माण झालेल्या सदस्यांचे उग्र स्वरूप संपुष्टात आले होते. आणि मोठ्या विकासकार्या-साठी शासन व देश सज्ज झाले होते. अशा वेळी निर्णय-प्रक्रियेमध्ये पक्ष कार्यकर्त्यांना सामावून घेतल्याने त्यांना त्यामधील सहभागाचे समाधान मिळेल व त्याचबरोबर पक्षातील अंतर्गत मतभेदांना मूठमाती मिळेल अशा विश्वासाने पंडितजींनी आपल्या कार्यास सुरवात केली. त्यासाठी पक्षातील विविध मतप्रवाहांमध्ये मतैक्य निर्माण करून त्या-प्रमाणे शासनाचे धोरण निर्धारित करण्यास त्यांनी प्रारंभ केला. विशेषतः भारताचे आर्थिक नियोजन-विषयक धोरण ठरवताना त्यांनी मंत्रिमंडळ, काँग्रेस कार्यकारिणी, अ. भा. काँग्रेस समिती व संसद अशा विविध स्तरांवर होणारी चर्चा, वाद-प्रतिवाद लक्षात घेऊन शक्यतो सर्वमान्य अशा

प्रकारचे निर्णय घेऊन परंपरावादी, आधुनिकतावादी, संसदीय पक्ष व संघटनात्मक पक्ष यांच्या विचारांमध्ये समन्वय घडवून आणण्याचा प्रयत्न केला.

पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्ये कृषीउद्योगांवर भर देण्यात आला होता. परंतु पक्षातील विशेषतः नागरी भागांतून आलेल्या व समाजवादी विचारसरणी मान्य असलेल्या आधुनिकतावादी काँग्रेसजनांना सार्वजनिक क्षेत्रांतील अवजड उद्योगधंद्यांत अधिक गुंतवणूक करण्याची आवश्यकता वाटत होती. पक्षातील गांधीवादी काँग्रेसजनांना याऊलट, सहकाराधिष्ठित, विकेंद्रित ग्रामोद्योग व कुटीरोद्योग यांमध्ये अधिक गुंतवणूक व्हावी असे वाटत होते. पक्षामध्ये गांधीवादी काँग्रेसजनांची संख्या मोठी होती असे नाही. परंतु गांधीवादी विचारसरणीशी एक भावनिक जवळीक असल्याने पक्षातील या काँग्रेसजनांच्या मतांचा आदर करणे पंडितजींना आवश्यक वाटत होते. विशेषतः १९५१ मध्ये भूदान चळवळीचा प्रारंभ विनोबाजींनी केल्यानंतर तर या बाबतीत पक्षातील विधायक मनोवृत्तीचे कार्यकर्ते पक्ष सोडून जाणार नाहीत हे पाहण्याचीदेखील गरज होती. त्यामुळे अखेरीस अजमेर येथील अ. भा. काँग्रेस समितीच्या अधिवेशनात स्वतः पंडितजींनी आर्थिक धोरणासंबंधीचे तीन ठराव मांडून वरील प्रकारच्या दोन्ही दृष्टिकोणांमध्ये समन्वय साधण्याचा प्रयत्न केला. या नवीन धोरणाप्रमाणे अवजड उद्योगधंदे व ग्रामोद्योग आणि कुटीरोद्योग यांना अर्थव्यवस्थेत समान महत्त्वाचे स्थान राहणार होते, परंतु ग्रामोद्योग आणि कुटीरोद्योग यांच्यामध्ये सुधारित तंत्रज्ञानाचा वापर करावयाचा होता. पं.नेहरूप्रणीत या ठरावांमुळे कुटीरोद्योग व ग्रामोद्योग यांच्या समर्थकांमध्ये शासनविषयक धोरणाबद्दल विश्वास निर्माण झाला व तो दीर्घकाळ टिकला.

पक्ष आणि शासन यांच्यामध्ये अशा रीतीने समन्वय साधण्याचा प्रयत्न केला तरी, कोणत्याही महत्त्वाच्या धोरणविषयक प्रश्नांमध्ये शासनाची भूमिका निर्णायक ठरणे साहजिकच होते. ग्रामोद्योग आणि कुटीरोद्योग यांबाबतीत नियोजन मंडळाचे सल्लागार प्रा. पी. सी. महालनोबीस यांनी बेकारीचा प्रश्न सोडविण्याबाबत तसेच ग्राहकोपयोगी वस्तूंची निर्मिती करण्यासाठी कुटीरोद्योग व ग्रामोद्योग यांची महत्त्वपूर्ण भूमिका निश्चित केल्यानंतर व त्यास नियोजन मंडळाने संमती दिल्यानंतरच पक्षाने मंजूर केलेले ठराव प्रत्यक्ष अमलात येऊ शकले. काँग्रेसने समाजवादी समाजरचनेचे ध्येय स्वीकारले, तेही असेच. १९५४ मध्ये पं. नेहरूंनी प्रथम राष्ट्रीय विकास परिषदेमध्ये भारतात समाजवादी समाजरचना प्रस्थापित करण्याचा विचार बोलून दाखविला. नंतर कॅबिनेटने त्यास संमती दिली. त्यानंतर लोकसभेने दोन दिवसांच्या चर्चेने समाजवादी समाजरचनेचे ध्येय अधिकृत धोरण म्हणून स्वीकारले. व त्यानुसार नियोजन मंडळाने दुसऱ्या पंचवार्षिक योजनेची आखणी करावी असेही ठरले. अशा रीतीने राष्ट्रीय विकास परिषद, कॅबिनेट, संसदीय काँग्रेस पक्ष, संसद या ठिकाणी सरकारच्या या धोरणाला पाठिंबा मिळाल्यानंतर मद्रास येथील आवडी काँग्रेस अधिवेशनात जानेवारी १९५५ मध्ये काँग्रेस पक्षाने समाजवादी समाजरचनेचे ध्येय अधिकृत रीतीने स्वीकारले. आवडी येथील ठरावाचे श्रेय पं. नेहरूंनी काँग्रेस अध्यक्ष श्री. ढेबर यांना दिले. तांत्रिक दृष्टीने ते खरेही आहे. परंतु पं. नेहरूंचे राष्ट्रीय विकास परिषदेतील भाषण व लोकसभेचा ठराव यांच्या संदर्भात पक्षाच्या धोरणांबाबत पक्ष कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम निर्माण होऊ नये यासाठी श्री. ढेबर यांना आवडी येथे पुढाकार घेऊन हा ठराव मांडावा लागला. पुनः एकदा धोरणविषयक प्रश्नांच्या बाबतीत शासनाचे निर्णायक महत्त्व स्पष्ट झाले.

केंद्र-घटकराज्ये यांतील संबंधांमध्ये समन्वय घडवून आणण्यामध्ये, तसेच अखिल भारतीय पातळीवरील धोरण ठरविण्यामध्ये कार्यकारिणीने नेहमीच महत्त्वाची भूमिका बजावली आहे. स्वातंत्र्यानंतर केंद्रामध्ये व बहुतेक सर्व घटकराज्यांमध्ये काँग्रेसची सरकारे सत्तेवर आल्याने व नेहरू-पर्वातील काँग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीस बहुतेक सर्व राज्यांचे मुख्यमंत्री आपली हजेरी लावत असल्याने कार्यकारिणीने अशा प्रकारची भूमिका पार पाडणे क्रमप्राप्त होते. काँग्रेस कार्यकारिणीने केंद्र व घटकराज्ये यांच्यातील संबंधात समन्वय साधण्याच्या या कार्यात तिला नेहमीच यश मिळाले

असे नव्हे. परंतु काँग्रेस कार्यकारिणीने ही भूमिका पार पाडली नसती, तर अनेक प्रश्न अधिक चिघळले असते यात शंका नाही. अखिल भारतीय पातळीवरचे धोरण प्रत्यक्षात आणताना काँग्रेस कार्यकारिणीद्वारे घटकराज्यांच्या मंत्रिमंडळांवर त्या बाबतीत प्रभाव टाकणेदेखील सोयीचे असे. जमिनदारीचे उच्चाटन आणि जमिनधारणेवरील कमाल मर्यादा यांबाबतीत राज्याराज्यांतील विशिष्ट परिस्थितीचा विचार करून ह्यासंबंधी अखिल भारतीय पातळीवर धोरण ठरविण्याबाबत काँग्रेस कार्यकारिणीने महत्त्वाची भूमिका बजावली. नियोजनाला सुरवात केल्यानंतर मात्र काँग्रेसच्या नेत्यांमध्ये व विशेषतः पंडितजींच्या लक्षामध्ये असे आले की, जोपर्यंत भारताच्या विविध घटकराज्यांमध्ये काँग्रेस सरकारे अधिकारावर आहेत, तोपर्यंतच कार्यकारिणी केंद्र व घटकराज्यांतील संबंधांच्या समन्वयाचे कार्य प्रभावी रीतीने करू शकेल. यासाठी केंद्र व घटकराज्ये यांमध्ये सल्लामसलतींसाठी अधिकृत यंत्रणा निर्माण केल्या पाहिजेत. याच विचाराने १९५२ मध्ये आर्थिक योजना स्वीकृत करण्यासाठी राष्ट्रीय विकास परिषद या यंत्रणेची निर्मिती केली गेली. केंद्र व घटकराज्ये यांतील तसेच घटकराज्यांतील आपापसातील संबंधांचा समन्वय साधण्यासाठी अशा तऱ्हेने अधिकृत यंत्रणा निर्माण करण्याचा विचार नंतर रूढ झाल्याने त्यासंबंधातील कार्यकारिणीच्या कार्याला मर्यादा पडल्या.

– ७ –

स्वातंत्र्यपूर्वकालापासून काँग्रेस कार्यकारिणीला संघटनेतील प्रमुख प्रशासकाची भूमिका पार पाडावी लागली आहे. विविध पातळ्यांवर दुफळी असणे आणि परस्परांशी रस्सीखेच करणारे गट असणे हे काँग्रेस पक्षाचे एक वैशिष्टय आहे. अशा दुहीगटांमध्ये समझोता घडवून आणणे किंवा त्यांच्या बाबतीत लवादाची किंवा मध्यस्थाची भूमिका पार पाडणे आणि शेवटी पक्षांतर्गत ऐक्य आणि पक्षशिस्त राखणे ही कार्ये कार्यकारिणीला करावी लागली आहेत. काँग्रेस सत्तारूढ झाल्यानंतर अशा प्रकारच्या अंतर्गत संघर्षाला जसजसा ऊत येऊ लागला, त्या प्रमाणात कार्यकारिणीच्या या कार्यात वाढ होत गेली. भारतीय परंपरेप्रमाणे कोणत्याही संघर्षामध्ये तटस्थ लवाद नेमणे ही गोष्ट सर्वमान्य आणि रूढ असल्याने कार्यकारिणीच्या या कार्याला महत्त्व प्राप्त झाले.

पक्षातील दुफळी आणि गटबाजी यांमुळे पक्षामध्ये विघटनवादी शक्तींना जसा वाव मिळाला त्याचप्रमाणे पक्षाला काही वेळा नवीन सामर्थ्यही प्राप्त झाले. कारण पक्षातील दोन्ही विरोधी गट आपली शक्ती वाढविण्यासाठी पक्षामध्ये नवीन तरुण कार्यकर्ते आणत व अधिकाधिक जातीगटांना पक्षाकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न करीत. त्यामुळे पक्षामधील जनतेचा सहभाग वाढून पक्षाला व्यापक पाया प्राप्त होण्यास मदत होई.

विविध प्रकारच्या कार्यपद्धतींचा वापर करून व विशिष्ट धोरणे आखून पक्षातील अंतर्गत दुहीला पायबंद घालण्याचा कार्यकारिणीने वेळोवेळी प्रयत्न केला आहे. त्यासाठी सदस्यत्वाच्या अटी, सदस्यत्वाबाबतची छाननी आणि पक्षाची निवडणूक यंत्रणा यांबाबत अनेकदा विशिष्ट धोरणांचा स्वीकार करण्यात आला आहे. तथापि काँग्रेस-संघटनेचा व्याप प्रचंड आहे. नेहरूपर्वाच्या अखेरीस काँग्रेसमध्ये २० प्रदेश काँग्रेस समित्या, ४३७ जिल्हा काँग्रेस समित्या आणि ५,००० हून अधिक विभागीय समित्या होत्या. त्यामुळे एकटया कार्यकारिणीला एवढया प्रचंड यंत्रणेवर नियंत्रण ठेवणे अशक्यप्राय होते. म्हणूनच १९५७ मध्ये ढेबर यांच्या कारकीर्दीत जिल्हा पातळीपर्यंतच्या काँग्रेस यंत्रणेवर नियंत्रण ठेवण्यासाठी कार्यकारिणीने स्वतःचे बरेच अधिकार प्रदेश काँग्रेस समित्यांकडे सुपूर्द केले. तरीही अशाप्रकारच्या विकेंद्रिकरणाने संघटनाविषयक सर्व प्रश्न सुटले असे नव्हे. पक्षाच्या घटनेत व कार्यपद्धतीत बदल करूनही पक्षातील सर्व अपप्रवृत्तींना आळा घालता आला नाही. खोटी सभासदनोंदणी करून पक्ष संघटना आपल्या कह्यात ठेवण्याचे प्रयत्न सुरूच राहिले. पक्षातील दादागिरीची प्रवृत्ती कमी झाली नाही. ज्या घटकराज्यांमध्ये पक्षांतर्गत परस्परविरोधी गट नव्हते, तेथे नियम आणि कार्यपद्धती यांची अमलबजावणी समाधानकारक होई. परंतु दुहीगटांनी दुभंगलेल्या घटकराज्यांतील पक्ष संघटनेत मात्र नियम आणि कार्यपद्धती यांना प्रबळ गटाकडून धुडकावले जात असे. अशा प्रसंगी काँग्रेस कार्य-

कारिणीचा हस्तक्षेप वा मार्गदर्शन अपरिहार्य असे. तीही लवाद वा मध्यस्थ म्हणून कार्य करीत असताना अल्पमतांमध्ये असलेले गट नामशेष होऊ नयेत किंवा त्यांनी पक्ष सोडून जाण्याचा निर्णय घेऊ नये या दृष्टीने प्रयत्नशील असे. कार्यकारिणीकडून जोपर्यंत एवढे तरी संरक्षण मिळत आहे, तोपर्यंत कोणताही अल्पमतांतील गट पक्ष सोडून जाण्याचा विचार न करता एक दिवस आपण बहुमतांमध्ये येऊ असे मनसुबे रचत पक्षातच राहात असे. त्यामुळे काँग्रेस पक्षाच्या देशातील सामर्थ्याला धक्का लागत नसे. अर्थात कार्यकारिणीमध्ये जोपर्यंत ऐक्य असे, तोपर्यंतच तिला अशा तऱ्हेने लवाद वा मध्यस्थ म्हणून प्रभावी रीतीने कार्य करता येत असे. नेहरूपर्वानंतर काँग्रेस कार्यकारिणीत ऐक्य न राहिल्याने पक्षामध्ये तिला वरील प्रकारचे कार्य प्रभावी रीतीने करता येईना. त्यामुळेच पक्षाचा देशातील प्रभावही कमी झाला.

पक्ष संघटनेतील ऐक्य अबाधित राहण्यासाठी काँग्रेस कार्यकारिणीला जी भूमिका पार पाडावी लागते तशाच स्वरूपाची भूमिका राज्यपातळीवर संसदीय मंडळ या कार्यकारिणीच्या उपसमितीला पार पाडावी लागते. केंद्रस्थानी पक्ष-शासन संबंधांमध्ये समन्वय घडवून आणण्याचे कार्य नेहरू-पर्वामध्ये समाधानकारक रीतीने पार पडले. तथापि घटकराज्य पातळीवर सर्वत्र अशा तऱ्हेचे स्थैर्य प्रस्थापित न होता अनेक घटकराज्यांमध्ये संघटना गट आणि संसदीय गट यांच्यातील संघर्ष विकोपाला गेला. पक्षांतर्गत असलेली गटबाजी हेच त्याचे प्रमुख कारण. अशा परिस्थितीत घटकराज्यांमधील काँग्रेस पक्षात संघटना गट व संसदीय गट यांच्यातील संघर्ष-समन्वयाचे महत्त्वपूर्ण कार्य संसदीय मंडळाला पार पाडावे लागले.

१९३५ च्या कायद्याप्रमाणे अनेक प्रांतांमध्ये काँग्रेस सरकारे अधिकारावर आल्यानंतर मे १९३७ मध्ये अशा तऱ्हेच्या संसदीय मंडळाची प्रथम निर्मिती करण्यात आली. घटकराज्यातील मंत्रिमंडळांच्या कारभारावर देखरेख ठेवणे व त्यांच्यामध्ये समन्वय साधणे हा त्यामागील मुख्य हेतू होता. या संसदीय मंडळात सरदार पटेल, राजेंद्रप्रसाद व मौलाना आझाद हे काँग्रेसच्या अंतर्वर्तुळातील तीन ज्येष्ठ नेते होते. पुढे १९४८ मध्ये जयपूर घटनेप्रमाणे या मंडळास घटनात्मक स्वरूप देण्यात आले आणि ते काँग्रेस यंत्रणेचा महत्त्वपूर्ण भाग बनले. तिच्यामध्ये काँग्रेस अध्यक्षाशिवाय आणखी पाच सदस्यांचा समावेश असावा असा नियम करण्यात आला. पुढे १९६३ मध्ये कामराजयोजनेची अमलबजावणी करताना मंडळावरची एकूण सदस्यसंख्या आठ करण्यात आली. नेहरूपर्वामध्ये या संसदीय मंडळावर काँग्रेसमधील ज्येष्ठ केंद्रीय मंत्री व घटकराज्यांचे काही प्रभावी मुख्यमंत्री असत. पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर या मंडळाचे कार्य अधिक व्यवस्थित रीतीने आणि निश्चित कार्यपद्धतीनुसार चालू झाले.

सत्ता हातात आल्यानंतर काँग्रेस अंतर्गत गटबाजी, व व्यक्तिगत वैमनस्य, संकुचित निष्ठा आणि प्रादेशिकता यांना ऊत आला. सत्ताधारी नेत्यांच्या वाढत्या भ्रष्टाचाराबद्दल कार्यकर्त्यांकडून अनेक तक्रारी येऊ लागल्या. काँग्रेस हाच देशातील एकमेव प्रभावी पक्ष असल्याने पक्षशिस्तीच्या नावाखाली या संदर्भातील टीकेची मुस्कटदाबी करणेही पक्षाच्या हिताच्या दृष्टीने योग्य नव्हते. परंतु कित्येकदा पक्षातील अल्पमतांत असलेला गट आपल्या हाता-मध्ये सत्ता येण्यासाठी विधिमंडळ पक्षात आपले बहुमत निर्माण करण्याचा व ते न जमल्यास संघटने-मध्ये आपले वर्चस्व निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असे. संघटनेवर वर्चस्व प्रस्थापित केले की, पुढील निवडणुकीच्या वेळी आपल्या गटाचे जास्तीतजास्त कार्यकर्ते पक्षातर्फे विधिमंडळावर निवडून येतील अशी व्यवस्था करून सत्तेवर येण्याची अपेक्षा बाळगता येत असे. पक्षसंघटनेवर आपले वर्चस्व कायम ठेवण्याच्या पक्षांतर्गत गटांमधील संघर्षांमधून पक्षाची जनमानसातील प्रतिमा खराब होई. यासाठी अधिकारावर असलेल्या मंत्रिमंडळाला सुरळीतपणे राज्यकारभार करता येईल परंतु त्याचबरोबर अधिकारूढ पक्ष गट हुकूमशाही प्रवृत्तीने वागून विरोधी गटाला नामशेष करणार नाही हे पाहण्या-साठी संसदीय मंडळाला अनुभवांतून काही शिफा-रसी कराव्या लागल्या. या शिफारसींना पुढे कार्य-कारिणीने ठराव करून आपला पाठिंबा दिला. कार्यकारिणीने या संदर्भात केलेल्या ठरावांप्रमाणे पक्षामध्ये प्रादेशिक, भाषिक व विशिष्ट मतप्रणाली-बद्दल आधारित असे गट करून पक्षांतर्गत निवडणुका

लढविण्याबद्दल तीव्र नापसंती व्यक्त केली. दुसऱ्या एका ठरावानुसार प्रदेश काँग्रेस समित्यांना काँग्रेस मंत्रिमंडळांविरुद्ध अविश्वासनिदर्शक ठराव करण्यास बंदी घालण्यात आली. मंत्रिमंडळ संसदीय पक्षास जबाबदार असल्याची भूमिका या पाठीमागे होती. तिसऱ्या ठरावानुसार विधिमंडळ पक्षनेत्यांची दरवर्षी निवड करण्याची गरज नाही, तर त्यांची मुदत विधिमंडळाच्या मुदतीइतकी असावी असे ठरविण्यात आले. त्यामुळे मंत्रिमंडळांना स्थैर्य प्राप्त होण्याची शक्यता वाढली. याशिवाय संसदीय पक्षाचा संघटनेवर अनिष्ट प्रभाव पडू नये यासाठी मंत्र्यांनी प्रदेश काँग्रेस समितीवर कोणतेही अधिकाराचे पद स्वीकारू नये असा दंडक घालण्यात आला. परंतु त्याचबरोबर पक्ष आणि शासन यांच्यामध्ये परिणामकारक रीतीने सुसंवाद राहावा यासाठी मंत्र्यांना पक्ष संघटनेच्या कार्यकारी मंडळावर सदस्य म्हणून राहण्याची मुभा देण्यात आली.

संघटना पक्ष आणि संसदीय पक्ष यांच्यामध्ये समन्वय राखून संघर्ष टाळण्याचा प्रश्न काँग्रेस कार्यकारिणीला नेहमीच महत्त्वाचा वाटला. त्यासाठी १९५५, १९५७ व १९६३ मध्ये वेगवेगळ्या समित्या नेमून या प्रश्नाचा अभ्यास करण्यात आला व समन्वय साधण्यासाठी अनेक कार्य पद्धतींची सूचना करण्यात आली. या सूचनांमध्ये मुख्यमंत्री, इतर मंत्री व प्रदेश काँग्रेस समितीचे पदाधिकारी यांच्या बैठका भरविणे, विधिमंडळ पक्षाच्या बैठकांच्या वेळी प्रदेश काँग्रेस समितीच्या पदाधिकाऱ्यांना निमंत्रित करणे इत्यादी सूचना होत्या. १९६३ मध्ये कामराज योजनेची अमलबजावणी करताना या बाबत राज्य समन्वय समित्यांची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला. या समित्यांमध्ये संसदीय मंडळाच्या सभासदांनीही भाग घ्यावयाचा होता.

अशा तऱ्हेची कार्यपद्धती आणि नियमावली घालून देण्यात येऊनही प्रत्यक्षात पक्ष-शासन संघर्ष या ना त्या स्वरूपात चालूच राहिला. साधारणतः ज्या घटकराज्यांत पक्षांतर्गत गटबाजी कमी असे तेथे संसदीय मंडळाला हस्तक्षेप करू न देता विधिमंडळ पक्षाला आपला नेता निवडता येई. तसेच विधिमंडळ नेत्याला आपले सहकारी निवडण्याचेही पूर्ण स्वातंत्र्य मिळे. परंतु ज्या घटकराज्यांत गटबाजी मोठ्या प्रमाणावर असे त्या ठिकाणी मात्र पक्षातील ऐक्य आणि शासनाचे स्थैर्य कायम राखण्याच्या दृष्टिकोणातून संसदीय मंडळाला हस्तक्षेप करून मध्यस्थाची भूमिका पार पाडावी लागे. साधारणतः ज्या घटकराज्यांमध्ये एखादा गट निश्चितपणे प्रबळ असल्याचे आढळून येई त्या ठिकाणी संसदीय मंडळाचा प्रयत्न नेत्याची निवड एकमताने घडवून आणण्याचा असे. परंतु त्याबरोबरच अल्पमतातील गटांना मंत्रिमंडळात प्रतिनिधित्व मिळवून देण्याची काळजी संसदीय मंडळ घेई. ज्या ठिकाणी पक्षांतर्गत गट तुल्यबळ असत त्या ठिकाणी मात्र विविध गटांचे बलाबल अजमावण्यासाठी संसदीय मंडळ कार्यपद्धती निश्चित करी आणि जास्तीत जास्त पाठिंबा असणारी व्यक्ती नेता म्हणून निवडून येईल याची दक्षता घेई.

अशा रीतीने नेहरूपर्वामध्ये घटकराज्यांतील परिस्थितीप्रमाणे संसदीय मंडळ आपल्या अधिकारांचा वापर करत असे. घटकराज्यांतील काँग्रेस पक्षाचा नेता प्रभावी असेल तर संसदीय मंडळाचा फारसा हस्तक्षेप तो खपवून घेत नसे. काँग्रेस पक्ष संघराज्यपद्धतीमध्ये कार्य करीत असल्याने काँग्रेस पक्ष वाटतो तितक्या प्रमाणात केंद्रानुवर्ती पद्धतीने कार्य करीत नाही. त्यामुळे घटकराज्यांमध्ये कार्य करणाऱ्या स्वायत्त पक्षशाखांचा संघ असे स्वरूप काँग्रेस पक्षाला नेहरूपर्वामध्ये प्राप्त होणे अटळ ठरले. तरीही घटकराज्यांमध्ये उदयास येणाऱ्या नवीन नेतृत्वाला जवळ करून, तसेच राष्ट्राध्यक्षांच्या घटकराज्यांमध्ये आणीबाणी पुकारण्याच्या अधिकाराचा उपयोग करण्याचा धाक दाखवून काँग्रेस पक्षातील केंद्रीय नेतृत्वाने घटकराज्यांच्या पक्षशाखांवर संसदीय मंडळामार्फत आपले नियंत्रण ठेवण्याचा सातत्याने प्रयत्न केला आहे. त्याचबरोबर घटकराज्यांतील एखाद्या गटाला पक्षांतर्गत खराखुरा पाठिंबा नसेल तर, केवळ त्या गटाला आपला पाठिंबा देऊन वा त्याला उत्तेजन देऊन तो गट कायम सत्तेवर राहू शकणार नाही अशी जाणही केंद्रीय नेतृत्वाने दाखविली आहे.

पक्षांतर्गत गटबाजी हा भारतातील सर्वच राजकीय पक्षांना मिळालेला शाप आहे. परंतु

काँग्रेस पक्षाचे वैशिष्ट्य असे की, पक्षातील विविध गटांना बरोबर घेऊन, त्यांचे सामर्थ्य जोखून लवाद आणि मध्यस्थी या मार्गांचा उत्तम रीतीने वापर करून पक्षातील नेतृत्वाची योग्य ती निवड करण्याचे सामर्थ्य आणि कुशलता त्याने दाखविली आहे. अर्थात केंद्रीय नेतृत्वामध्ये जोपर्यंत एकी होती तोपर्यंतच संसदीय मंडळाला घटकराज्यांतील पक्षशाखांच्या बाबतीत प्रभावीपणे हस्तक्षेप करता आला. पक्षातील केंद्रीय नेतृत्वातील हे ऐक्य पुढे संपुष्टात आल्यानंतर संसदीय मंडळाचा प्रभावही त्याप्रमाणात कमी झाला.

– ८ –

संसद आणि घटकराज्यांची विधिमंडळे यांसाठी उमेदवारांची निवड करण्याबाबतचे अंतिम अधिकार कार्यकारिणीला आहेत आणि कार्यकारिणी हे कार्य केंद्रीय निवडणूक समिती या आपल्या उपसमिती-मार्फत पार पाडते. या केंद्रीय निवडणूक समितीवर संसदीय मंडळाच्या सभासदांखेरीज अ. भा. काँग्रेस समितीने निवडलेले पाच सभासद असतात. पंतप्रधान पदसिद्ध सभासद असतात. १९४८ मध्ये स्वीकारलेल्या काँग्रेस घटनेप्रमाणे अशा प्रकारची ही यंत्रणा निवडणुकांसाठी उमेदवारी निश्चित करण्याकरिता निर्माण करण्यात आली. तत्पूर्वी १९३७ व १९४६ मध्ये पार पडलेल्या निवडणुकांचे उमेदवार निवडण्यासाठी हंगामी समित्या नेमण्यात आल्या होत्या. निवडणुकांचे उमेदवार निश्चित करणे हे पक्षाचे एक महत्त्वाचे कार्य असल्याने या केंद्रीय निवडणूक समितीमार्फत पक्ष आणि शासन यांत समन्वय प्रस्थापित करण्याचे महत्त्वाचे कार्यही पार पाडले जाते. पहिल्या तीन सार्वत्रिक निवडणुकांमध्ये उमेदवारांची निश्चिती करताना या समितीला निर्णायक महत्त्वाची भूमिका पार पाडावी लागली. अनेक घटकराज्यांमध्ये प्रत्येक पातळीवर पक्षांतर्गत अनेक गट असल्याने त्यांना केंद्रीय निवडणूक समितीचे निर्णय पाठविण्याखेरीज गत्यंतर नव्हते. याशिवाय त्या वेळी या समितींमध्ये व कार्यकारिणीत ऐक्याची भावना असल्यामुळे ही कामगिरी समितीला बऱ्याच समाधानकारक रीतीने पार पाडता आली. त्याचप्रमाणे अ. भा. काँग्रेस-समितीमार्फत केंद्रीय निवडणूक समितीवरील सदस्य निवडताना १९५१ चा नेहरू-टंडन संघर्षाचा काळ वगळला तर फारशी अडचण आली नाही. १९५७ व १९८२ मध्ये कार्यकारिणीला मंजूर असलेले अधिकृत उमेदवारच केंद्रीय निवडणूक मंडळावर निवडून आले.

उमेदवारांची निवड करताना केंद्रीय निवडणूक समितीने उमेदवारांच्या गुणवत्तेसंबंधी अनेक निकष निश्चित केले आहेत व प्रदेश काँग्रेस समितीने नावांची शिफारस करताना हे निकष विचारात घेण्यास सांगितले आहे. परंतु प्रत्यक्षामध्ये अनेक अलिखित निकष विचारात घेतले जातात असा नेहमीचा अनुभव आहे. उमेदवाराची निवडून येण्याची शक्यता हा सर्वांत मोठा निकष आणि उमेदवाराचे सामर्थ्य विचारात घेताना साहजिकच त्याची जात व धर्म, त्याच्या प्रादेशिक व पारंपरिक निष्ठा या सर्वांचा बारकाईने विचार केला जातो. यास अर्थात् भारतातील कोणताही राजकीय पक्ष अपवाद नाही व भारताच्या बहुजिनसी समाजाचे स्वरूप पाहता ही गोष्ट काहीशी अपरिहार्यही आहे. निवडणुकांसाठी उमेदवारी निश्चित करताना विभाग काँग्रेस समिती, जिल्हा काँग्रेस समिती व प्रदेश काँग्रेस समिती यांपैकी कोणत्या पातळीवरील निर्णयाला प्राधान्य द्यायचे व त्यामध्ये अ. भा. काँग्रेस समितीच्या निरीक्षकांनी कोणती भूमिका पार पाडावयाची याविषयी विविध प्रयोग प्रत्येक सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी करण्यात आले आहेत,

ज्या घटकराज्यांमध्ये पक्षात ऐक्य असेल किंवा जेथे एखादा निश्चित प्रबळ गट असेल तेथे अर्थातच केंद्रीय निवडणूक समितीच्या हस्तक्षेपाला कमी वाव राही. अशा ठिकाणी साधारणतः स्थिर मंत्रिमंडळ बनवू शकण्याचे सामर्थ्य असणाऱ्या नेत्याच्या इच्छे-प्रमाणे उमेदवारांची निवड होई. अशा राज्यांमध्ये निवडणूक समिती सहसा उमेदवारांची यादी राज्य पातळीवर निश्चित करताना फारसा हस्तक्षेप करीत नसे. परंतु अंतिम यादी केंद्रीय पातळीवर निश्चित करताना मात्र अल्पमतात असणाऱ्या गटांना योग्य ते प्रतिनिधित्व मिळण्याच्या दृष्टीने थोडे फार बदल करीत असे. अंतर्गत गटबाजी असणाऱ्या घटकराज्यांतील काँग्रेस संघटनेच्या बाबतीत मात्र निवडणुक समितीला बहुधा उमेदवारी निश्चित

करण्याच्या सर्व प्रक्रियांमध्ये भाग घ्यावा लागत असे.

मोठ्या प्रमाणावर अंतर्गत गटबाजी असलेल्या राज्यांमध्ये स्थिर नेतृत्व निर्माण व्हावे यासाठी कधीकधी केंद्रीय निवडणूक मंडळ प्रयत्न करीत असे. परंतु अशा तऱ्हेच्या प्रयत्नांना मर्यादा असत. अशा प्रकारचा निर्णय अखेरीस संबंधित गटांच्या नेत्यांना एकत्रित आणूनच घ्यावा लागे. एखाद्या घटक-राज्यातील राजकीय नेतृत्वात बदल होण्यासारखी परिस्थिती निर्माण झाल्यास अशा बदलास फार काळ थोपवून धरता येत नसे.

एखाद्या घटकराज्यामध्ये विविध गटांमध्ये वादग्रस्त जागांबाबत समझोता होऊ न शकल्यास तटस्थ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या निवडणूक समितीतील केंद्रीय नेत्यांकडे त्या बाबतीतला निर्णय सोपविण्यात येत असे. गोविंद वल्लभ पंत व पं. नेहरू हे असे सर्वांना मान्य होण्यासारखे लवाद असत. पुढे १९६२ च्या सार्वत्रिक निवडणुकांच्या वेळी लालबहादूर शास्त्री आणि इंदिराजी यांना महत्त्वाचे लवाद म्हणून मान्यता मिळाली. पक्षामध्ये तटस्थ मध्यस्थ म्हणून काम केल्याचा पुढे पंतप्रधान पदावर येण्यासाठी दोघांनाही फार मोठा फायदा झाला.

नेहरूपर्वाचा अस्त झाल्यानंतर केंद्रीय नेतृत्वामध्ये ऐक्याची भावना राहिली नाही. त्याची परिणती केंद्रीय निवडणूक मंडळाची प्रतिष्ठा कमी होण्यात झाली. केंद्रीय निवडणूक मंडळाला पूर्वीप्रमाणे तटस्थपणाने मध्यस्थाची भूमिका पार पाडता आली नाही. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर असंतुष्ट कार्यकर्ते काँग्रेसपक्ष सोडून गेले व त्याचा परिणाम १९६७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत झाला. या निवडणुकीत अनेक घटकराज्यांत काँग्रेसला प्रथमच मोठ्या प्रमाणावर पराभव पत्करावा लागला.

– ९ –

नेहरूपर्व कालातील काँग्रेसमधील सत्तास्पर्धा, पंतप्रधान व पक्षाध्यक्ष यांचे संबंध, काँग्रेसची घटना व तिच्या विविध घटकसंस्थांचे कार्य यांचा विस्तृत परामर्ष आतापर्यंत घेतला. त्यावरून काँग्रेसच्या कार्यपद्धतीचा बोध झाला. तथापि काँग्रेस संघटनेचे खरे स्वरूप समजून घ्यायचे असेल, तर काँग्रेसमधील सदस्य व नेतृत्व समाजाच्या कोणत्या कोणत्या स्तरांतून येत राहिले याचा थोडासा विचार करणे आवश्यक ठरते.

काँग्रेस संघटनेचे सर्वांत महत्त्वाचे वैशिष्टच कोणते असेल तर, समाजाच्या अधिकाधिक स्तरांमधून वाढता पाठिंबा मिळवून आपला सामाजिक पाया विस्तृत करण्याची तिची विलक्षण क्षमता. आधुनिकीकरण, औद्योगीकरण आणि लोकशाहीकरण यांमुळे गेल्या सबंध शतकात भारतीय समाजात जे बदल झाले त्याला अनुसरून काँग्रेस संघटनेतील कार्यकर्ते आणि नेतृत्व यांमध्ये सातत्याने प्रत्येक पातळीवर बदल होत राहिले. काँग्रेसच्या या समावेशनशील प्रवृत्तीमुळेच काँग्रेस खऱ्या अर्थाने जनसामान्यांची संघटना बनली. भारताच्या आजच्या राजकीय स्थैर्याचे हे एक महत्त्वाचे कारण आहे. काँग्रेस संघटनेतील हा बदल कधी एकदम घडून आला नाही. काँग्रेसमध्ये नव्याने समाविष्ट होणारे सामाजिक गट आणि उदयाला येणारे नवे नेतृत्व काँग्रेसमध्ये पूर्णपणे समाधानी राहिले किंवा काँग्रेस-मधील या सर्व सामाजिक गटांचा एकमेकांशी नेहमीच सुसंवाद राहिला असे नाही. तरीही मतैक्यपद्धतीने सर्वांना सामावून घेऊन जास्तीतजास्त कार्यकर्ते व नेते यांना संमत होतील अशा तऱ्हेने निर्णय घेण्याची प्रक्रिया स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात काँग्रेसने विकसित केली. त्यामुळे पक्षातील सर्व सामाजिक गटांना नेहमीच पूर्ण समाधान मिळाले नाही, तरी त्यांच्यातील असंतोषाचा उद्रेक निदान नेहरूपर्व कालाचा अस्त होईतो कधी झाला नाही. काँग्रेस संघटनेच्या सातत्यपूर्ण अस्तित्वाचे आणि यशाचे रहस्य यातच सामावलेले आहे.

काँग्रेस पक्षाची सुरवात झाली तेव्हा ती एक उच्च मध्यमवर्गीय, उच्चवर्णीय, नागरी, आंग्लविद्या-विभूषित अशा आधुनिक मनोवृत्तीच्या अभिजनांची संघटना होती. परंतु एक राष्ट्रवादी चळवळ म्हणून फोफावल्यानंतर आणि समाजातील विविध स्तरां-वरील व्यक्तींचा तिच्यामधील सहभाग वाढत गेल्यानंतर तिचे स्वरूप खऱ्या अर्थाने देशी बनले. तिच्या नेतृत्वामध्येही आधुनिकता आणि पारं-परिकता यांच्या वैशिष्ट्यांची सरमिसळ झाली.

महात्माजींच्या प्रत्येक कायदेभंगाच्या चळवळी-बरोबर काँग्रेस पक्षाचा सामाजिक पाया विस्तृत होत गेला. ती केवळ शहरी मध्यमवर्गीयांची चळवळ राहिली नाही. गांधींच्या अलौकिक नेतृत्वाला याचे श्रेय आहेच. परंतु त्याबरोबर हेही लक्षात ठेवले पाहिजे की, भारतीय समाजामध्ये आर्थिक बदल, शिक्षण आणि नागरीकरणामुळे जे बदल हळूहळू होत होते, त्याचा प्रभाव काँग्रेस संघटनेवर पडणेही अपरिहार्य होते. विशेषत: महात्माजींनी काँग्रेस संघटनेची रचना भाषिक तत्त्वावर केल्यामुळे काँग्रेस संघटनेला एक नवे सामर्थ्य आणि चैतन्य प्राप्त झाले. स्वातंत्र्यानंतर मिळालेल्या सत्तेचे आव्हान पेलण्यासाठी पं. नेहरू आणि काँग्रेसचे नेतृत्व यांना याचा मोठा फायदा झाला. काँग्रेसच्या सामाजिक पायामध्ये व नेतृत्वामध्ये होणारा हा बदल नेहरूपर्व कालामध्ये व नंतरही चालूच राहिला.

स्वातंत्र्यपूर्व कालाप्रमाणे नेहरूपर्वामध्येही काँग्रेस-मध्ये व्यावसायिक, शेतकरी, व्यापारी, पांढरपेशे आणि व्यावसायिक राजकारणी यांचा समावेश होता. परंतु प्रौढमताधिकार आणि सत्तेमध्ये सहभागी होण्याची आकांक्षा यांमुळे त्यांच्या काँग्रेसमधील संरचनेमध्ये व प्रमाणामध्ये महत्त्वपूर्ण बदल घडून आलेला आहे. गांधीपर्वामध्ये जनसामान्यांची संघटना हे स्वरूप काँग्रेसला प्राप्त झाले, तरी बऱ्याच अंशी ती नागरी चळवळच राहिली. काँग्रेसचे नेतृत्वही प्रामुख्याने नागरीच राहिले. नेहरूपर्वामध्ये काँग्रेसचे शक्तिकेंद्र लहान शहरे आणि खेडी यांच्याकडे सरकले. त्यामुळे काँग्रेसमधील सुशिक्षित मध्यम-वर्गीयांचा संघटनेवरील प्रभाव कमी होऊन त्याच्या-ऐवजी मध्यमवर्गीय शेतकरी वर्गाचा प्रभाव वाढत गेला. त्यामुळे काँग्रेस संघटना नागरी न राहता तिला ग्रामीण रूप प्राप्त झाले. काँग्रेस पक्षाच्या लोकशाही स्वरूपामुळे हा नवा बदल घडून येण्यात अडचणी निर्माण झाल्या नाहीत.

काँग्रेसच्या स्वरूपामध्ये नेहरूपर्व कालात झालेल्या या बदलामुळे घटकराज्य पातळीवरील नेतृत्वातही फार मोठा बदल झाला. नव्या पिढीचे नेतृत्व उदयास आले. या पिढीतील नवे नेते साधारणत: १९१० ते १९२० या दशकात जन्मलेले होते. संजीव रेड्डी, यशवंतराव चव्हाण, मोहनलाल सुखाडिया यांच्यासारखे हे नेते स्वतःच्या घटक-राज्यांतील सत्तास्पर्धेमध्ये तावून-सुलाखून निघाल्याने स्वातंत्र्यपूर्व कालातील नेत्यांपेक्षा अधिक प्रमाणात समाजातील पारंपरिक प्रवाहांचे नेतृत्व करीत होते. याचा अर्थ हे नेते स्वत: परंपरावादी होते असा नव्हे. राष्ट्रीय पातळीवरील राजकारणाशी संबंध आल्याने अधिक व्यापक दृष्टिकोणातून विचार करण्याची त्यांच्यामध्ये क्षमता होती. त्यांचा स्वतःचा विचार आधुनिक होता. परंतु आपल्या अनुयायांच्या व मतदारांच्या मागण्यांच्या बाबतीत अधिक सहानुभूतिपूर्वक विचार करण्याकडे त्यांचा कल होता.

नेहरूपर्वातील केंद्रीय मंत्रिमंडळ आणि संसद यांतील काँग्रेसजन प्रामुख्याने समाजातील वरच्या स्तरांमधून आलेले दिसतात. परंतु केंद्र पातळी-पासून राज्य व जिल्हा पातळीपर्यंत असलेल्या सर्व निर्वाचित अधिकारपदांचा विचार केला तर त्यामध्ये क्रमशः पारंपरिक समाजातील समाजरचनेतील सत्तासंबंधाचे प्रतिबिंब पडलेले दिसून येते. नेहरू-पर्वाच्या प्रारंभी केंद्र पातळीवरचे नेते राष्ट्रीय आंदोलनातून पुढे आलेले होते. व्यवसाय, जात, शिक्षण व सामाजिक दर्जा या सर्वच बाबतीत त्यांच्यापैकी जवळपास सर्वजण समाजाच्या उच्च-स्तरामध्ये मोडत होते. परंतु त्यांच्यापैकी सर्वच-जणांना स्थानिक पातळीवरील राजकारणाचे बारकावे माहीत होते असे म्हणता येणार नाही. घटकराज्यामध्ये नंतरच्या काळात उदयास आलेल्या नेत्यांची बौद्धिक कुवत त्या वेळच्या केंद्रीय मंत्रिमंडळातील मंत्र्यांएवढी होती असे म्हणता येणार नाही. त्यांच्यातील अनेकांचा जन्म खेडेगावात झाला होता. सामाजिक दर्जाचा विचार करता ते समाजातील कनिष्ठ स्तरांतून वर आले होते. परंतु विविध प्रकारची राजकीय आव्हाने स्वीकारून तसेच पक्षांतर्गत असलेल्या विविध गटांमध्ये संतुलन निर्माण करून आपल्या पाठीमागे बहुमतांचा पाठिंबा उभा करण्याचे कसब त्यांच्या ठिकाणी होते. अशा प्रकारच्या नेत्यांनी घटक-राज्यांमध्ये त्यांना मिळणाऱ्या सर्वोच्च सत्तेमुळे संसदेमध्ये जाण्याचा प्रारंभी तरी विचार केला नाही. थोडाफार फरकाने आजही ही स्थिती

चालूच राहिल्याने केंद्रीय पातळीवरचे नेतृत्व व घटकराज्य पातळीवरचे नेतृत्व यांत समाजाचे खऱ्या अर्थाने प्रातिनिधिक नेतृत्व करण्याच्या बाबतीत तफावत राहिली. परंतु नेहरूपर्वाच्या प्रारंभी ही तफावत ज्या प्रमाणात होती त्या प्रमाणात ती नेहरूपर्वाच्या अखेरीच्या काळात राहिली नाही.

– १० –

महात्माजींनी आपल्या मृत्यूपूर्वी काही तासच अगोदर काँग्रेस कार्यकारिणीत काँग्रेसचे रूपांतर एका लोकसेवक संघामध्ये करण्याची योजना सुचविली होती. या योजनेप्रमाणे काँग्रेस ही संघटना राजकीय पक्ष न राहता एक विधायक संघटना म्हणून कार्य करणार होती. परंतु काँग्रेस ही भारतीय संघराज्यातील सर्वांत महान अशी ऐक्यवर्धक राजकीय संघटना असून राजकीय पक्ष म्हणून तिचे अस्तित्व संपुष्टात आल्यास देशाचे विघटन होण्याचा धोका आहे असा वास्तवदर्शी दृष्टिकोण वल्लभभाई व पंडितजी या दोन्ही नेत्यांनी व्यक्त केला. याबाबत या दोन्ही नेत्यांवर त्यांना सत्तेची हाव असल्याचा आरोप अनेकांनी केलेला आहे. परंतु एका महान संघराज्याचे शासन सुरळीतपणे चालवण्यासाठी तितकाच मजबूत पाया असलेली पक्षयंत्रणा ही काळाची गरज होती. अनेक पिढ्यांतून विकसित झालेली अशी काँग्रेससारखी यंत्रणा निकालात काढणे हे मुत्सद्देगिरीचे खचितच लक्षण नव्हते. या संदर्भात शंकरराव देवांसारख्या गांधीवादी नेत्यातही या वास्तव परिस्थितीची जाण होती हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. सध्याच्या बिकट परिस्थितीत देशाचे ऐक्य व स्थैर्य कायम राखण्यासाठी आणि आर्थिक व सामाजिक विकासाचे अपूर्ण कार्य शेवटास नेण्यासाठी भारतामध्ये सातत्याने एका प्रभावी पक्षाची राजवट राहणे आवश्यक असून ही ऐतिहासिक भूमिका काँग्रेसच बजावू शकेल अशा अर्थाचे विचार त्यांनी १९४७ मध्ये काँग्रेसचे सरचिटणीस या नात्याने पाठविलेल्या पक्षाच्या एका परिपत्रकात व्यक्त केले होते.

राष्ट्रवादी आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्या एका प्रभावी संघटनेचे रूपांतर मतैक्य पद्धतीने चालणाऱ्या तितक्याच प्रभावी राजकीय पक्षामध्ये करण्याचे फार मोठे कार्य नेहरूपर्वाने केले. भारतामध्ये प्रबळ विरोधी पक्ष का निर्माण होऊ शकत नाही आणि काँग्रेसच्या निवडणुकांतील यशाचे रहस्य काय या दोन्ही प्रश्नांचे उत्तर काँग्रेसच्या या मतैक्य पद्धतीने चालणाऱ्या कार्यपद्धतीतच आहे. स्वातंत्र्यापूर्वी किंवा स्वातंत्र्यानंतर काँग्रेस ही एकसंध आणि एकजिनसी अशी संघटना केव्हाही नव्हती. महात्मा गांधींच्या प्रभावाखाली काँग्रेस असतानाही काँग्रेसमध्ये अनेक विचारप्रवाह अस्तित्वात होतेच. देशातील विविध प्रकारचे वंशगट, जातिगट, धर्मगट, सांस्कृतिक गट, प्रादेशिक गट व भाषिक गट या सर्वांचेच प्रतिबिंब काँग्रेसमध्ये पडलेले होते. प्रत्येक प्रांतामध्ये असणाऱ्या या विविध समूहांच्या हितसंबंधांचे प्रातिनिधित्व करणाऱ्या प्रांतिक राजकीय पक्षांचा एकसंघात्मक राजकीय पक्ष असे काहीसे स्वरूप काँग्रेस पक्षाला प्राप्त झाले होते. स्वातंत्र्यानंतर सत्ता हाती आल्यावर सत्तास्पर्धा सुरू होऊन या संघटनेचे विघटन होऊन देशामध्ये अराजक निर्माण होण्याची दाट शक्यता होती. अशा परिस्थितीत स्वातंत्र्यपूर्व काळापासून काँग्रेसमध्ये चालत आलेल्या या मतैक्यपद्धतीचा अधिक विकास नेहरूपर्वामध्ये होऊन तिला काही अंशी एक आदर्श स्वरूप प्राप्त झाले. याचे फार मोठे श्रेय अर्थातच पं. नेहरूंना जाते.

सरदार पटेल हे एक महान मुत्सद्दी होते. भारतीय संघराज्याचे शिल्पकार पक्ष-संघटक म्हणून त्यांचा होणारा गौरव यथार्थ आहे. काश्मीरचा प्रश्न व पाकिस्तानविषयीचे धोरण यांबाबतीत त्यांचे विचार पं. नेहरूंपेक्षाही अधिक वास्तवतावादी असावेत. स्वतः व पं. नेहरू यांच्यामध्ये चालू असणाऱ्या नेतृत्वाच्या स्पर्धेमध्ये पक्ष दुभंगून देशहितास धक्का न लागू देण्याबाबतही ते जागरूक होते. परंतु तरीही कदाचित मतैक्यपद्धतीने संघटनेचा कारभार चालविण्याच्या काँग्रेस पक्षाच्या इतिहासदत्त भूमिकेबाबत पं. नेहरूंना सरदार पटेलांपेक्षाही अधिक जाण असावी असे मानण्यास जागा आहे. पं. नेहरूंचा स्वतःचा असा कोणताही गट काँग्रेसमध्ये नव्हता व त्यांचे नेतृत्व हे इतके स्वयंभू होते की, त्याची गरजही त्यांना कधी भासली नाही. आपले विचार पक्षामध्ये संमत करून घेण्या-

साठी काँग्रेस समाजवादी पक्ष किंवा लोकशाही आघाडी यांसारख्या एखाद्या गटाचा क्वचितप्रसंगी त्यांनी अप्रत्यक्ष रीतीने उपयोग करून घेतला असल्याची शक्यताही नाकारता येणार नाही. तरीही काँग्रेसमधील कोणत्याही गटबाजीपासून ते सर्वस्वी अलिप्त राहिले, हे निर्विवाद सत्य आहे. याउलट, सरदार पटेलांचा गट होता व आपल्या गटाचे संघटनेवर नेहमीच वर्चस्व राहील हेही त्यांनी पाहिले. डाव्या विचारसरणीच्या लोकांना पक्षामध्ये स्थान मिळू नये याबाबत ते आग्रही होते व त्यामुळेच काँग्रेस समाजवादी पक्ष काँग्रेसमधून फुटून बाहेर निघाला. परंतु त्याचबरोबर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या सभासदांना काँग्रेसचे सभासदत्व मिळू देण्यासंबंधीचा ठराव पं. नेहरूंच्या गैरहजेरीत काँग्रेस कार्यकारिणीने केला. त्यामध्ये सरदारांचा पुढाकार होता. पुढे पं. नेहरूंच्या हस्तक्षेपामुळे हा ठराव कार्यकारिणीला मागे घ्यावा लागला.

पं. नेहरूंची वृत्ती लोकशाहीस सर्वस्वी अनुकूल असल्याने आपल्या पक्षातील नेतृत्व अबाधित राखण्यासाठी त्यांनी आपणाला विरोधी असणाऱ्या नेत्यांची पक्षातून हकालपट्टी करण्याचा कधी प्रयत्न केला नाही. उलट, आपल्यामुळे पक्षात दुफळी निर्माण होऊ नये यासाठी त्यांनी लोकशाहीतील सर्व संकेत नेहमीच पाळले. नेहरू–टंडन संघर्षामध्ये त्यांनी अगोदर कार्यकारिणीचा राजीनामा देऊ केला व नंतर अध्यक्षपद त्यांच्याकडे चालत आले ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. कामराज योजनेप्रमाणे इतर मंत्र्यांचे राजीनामे स्वीकारण्यापूर्वी स्वतःच राजीनामा त्यांनी देऊ केला होता, ही गोष्टही विसरता येणार नाही. आपल्या मंत्रिमंडळामध्ये आपल्या प्रवृत्तींशी आणि विचारांशी सहमत नसणाऱ्या व्यक्तींचा त्यांनी समावेश केला. राज्यपातळीवरील मुख्यमंत्र्यांची नेमणूक व तेथील मंत्रिमंडळांची जडणघडण यात त्यांनी केव्हाही हस्तक्षेप केला नाही.

वरील सर्वच बाबतीत काँग्रेसमधील नेहरूपर्व व इंदिरापर्व यांची तुलना करता येण्यासारखी आहे. परंतु तो स्वतंत्र लेखाचा विषय आहे. पुढे १९६९ मध्ये काँग्रेसमध्ये फूट पडली, त्याला सर्वस्वी इंदिराजी जबाबदार होत्या असे म्हणता येणार नाही. परंतु त्याचबरोबर नेहरूंनंतर ज्या तऱ्हेने लालबहादूर शास्त्री यांना काँग्रेसमधील मतैक्याची कार्यपद्धती चालू ठेवून काँग्रेसमधील ऐक्य कायम राखले तसे करण्यास इंदिराजींना अपयश आले हेदेखील नाकारता येणार नाही. किंबहुना पं. नेहरूंनी विकसित केलेली मतैक्याची पद्धती इंदिराजींना मान्य होती किंवा काय याबद्दलच शंका व्यक्त करता येईल. आपल्या मंत्रिमंडळांमध्ये तसेच घटकराज्यांच्या मुख्यमंत्रीपदीही आपणास एकनिष्ठ अशाच व्यक्ती नेहमी राहतील याची सदैव दक्षता त्या घेत. सत्तेची सर्व सूत्रे सर्व स्तरांवर आपल्याच हाती ठेवण्याच्या त्यांच्या अट्टाहासापायी पक्षामध्ये स्वतंत्र आणि निर्भीड मतप्रदर्शनाची कदर राहिली नाही आणि सर्वत्र स्वार्थी स्तुतिपाठकांचा सुळसुळाट झाला.

दोन बाबतीत नेहरूपर्व आणि इंदिरापर्व यांतील फरक लक्षात घेण्यासारखा आहे. पंतप्रधान आणि अध्यक्षपद दोहोंची जबाबदारी एका अपवादात्मक परिस्थितीत पंडितजींनी स्वीकारली. परंतु शक्य तितक्या लवकर ते अध्यक्षपदाच्या जबाबदारीतून मुक्त झाले. पक्ष-संघटनेचे स्वतंत्र अस्तित्व कायम राखण्याच्या बाबतीत ते जागरूक होते. त्यामुळेच नेहरूपर्वामध्ये काँग्रेसची वार्षिक अधिवेशने, अ. भा. काँग्रेस समितीची अधिवेशने, कार्यकारिणीच्या बैठका, पक्षांतर्गत निवडणुका या सर्व गोष्टी नियमित रूपाने पार पडत. अशा प्रकारच्या नियमितपणाबद्दल इंदिरापर्वामध्ये बेफिकिरी आली. काँग्रेसचे संघटनात्मक रूप जाऊन ती एक व्यक्तिप्रधान संघटना बनली. अखेरीस संघटनेलाही व्यक्तीचे नाव प्राप्त झाले. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे पक्षाची विचारधारा, पक्षाचा सामाजिक व आर्थिक कार्यक्रम. यांबाबत काँग्रेस कार्यकारिणीत व अ. भा. काँग्रेस समितीत सखोल चर्चा घडवून आणण्याबाबत व तत्संबंधी विस्तृत ठराव करण्याबाबत पं. नेहरू नेहमीच उत्साही असत. या बाबतीत असा आग्रह आणि उत्साह इंदिरापर्वामध्ये राहिला नाही. पं. नेहरूंच्या आर्थिक कार्यक्रमांवर टीका जरूर करता येईल. परंतु तो कार्यक्रम एका विशिष्ट दृष्टिकोणावर आधारलेला असे. इंदिरापर्वामध्ये निश्चित धोरण न ठरवता झटपट कलमी कार्यक्रम एकाएकी जाहीर करण्यावर भर असे.

काँग्रेस पक्षावर एकाधिकारी भांडवलदार, बडे व्यापारी, धनिक जमीनदारवर्ग आणि श्रीमंत शेतकरी यांचा प्रभाव नेहरूपर्वामध्ये व नंतर होता अशी टीका मार्क्सवादी विचारवंतांनी नेहमीच केली आहे. या वर्गांना अनुकूल अशा प्रकारची धोरणे काँग्रेस सरकारने काही वेळा स्वीकारली व त्याच्या मोबदल्यात या वर्गांनी निवडणुकांच्या प्रसंगी काँग्रेसची साथ केली यात काही अंशी सत्य जरूर आहे. परंतु काँग्रेस पक्ष आणि काँग्रेस सरकार या वर्गांना नेहमीच धार्जिणे राहिले अशा प्रकारची टीका अयोग्य होईल. समाजाच्या सर्व स्तरांमधून काँग्रेस पक्षाला नेहमीच पाठिंबा मिळाला आणि समाजातील सर्व घटकांना सामावून घेण्याची क्षमता काँग्रेसने नेहमीच दाखविली. नेहरूपर्वामध्ये काँग्रेसमध्ये मध्यमवर्गीय शेतकरीजातींचे प्रभुत्व निर्माण झाले. परंतु बहुसंख्य असंघटित शेतमजूर व कामगारवर्ग आणि पददलित सत्तेच्या सहभागापासून वंचित राहिले. १९६७ मध्ये काँग्रेसला मिळालेल्या जबरदस्त धक्क्यातून बाहेर काढण्यासाठी इंदिराजींनी वरील वर्गांना सत्तेमध्ये सहभागी करून घेण्याचे असामान्य राजकीय चातुर्य दाखविले. असे करताना त्यांनी पक्षसंघटनेचे आणि लोकशाहीचे सर्वच संकेत पाळले असे नाही. याचा उल्लेख वर आलाच आहे. शिवाय पं. नेहरूंनी विकसित केलेल्या मतैक्यपद्धतीचा आदर न केल्याने त्याचेही परिणाम त्यांना व अखेरीस काँग्रेस पक्षाला भोगावे लागले. राजीव गांधींच्या नेतृत्वाखालील काँग्रेस पक्षाला हीच गोष्ट लक्षात ठेवावी लागणार आहे.

वरील सर्व विवेचनातून एक प्रश्न निर्माण होतो. पं. नेहरूंनी विकसित केलेली मतैक्यपद्धती आदर्श मानावी का, असा हा प्रश्न आहे. या बाबतीत असेही म्हणता येईल की, मतैक्यपद्धती ही काँग्रेसचे प्रमुख शक्तिस्थान आणि प्रमुख दोषस्थानही होते. मतैक्यपद्धतीने पं. नेहरूंनी काँग्रेसला स्थैर्य प्राप्त करून दिले. त्यामुळे नेहरूपर्वात सामर्थ्यसंपन्न लोकशाही व निधर्मी भारताच्या उभारणीचा भरभक्कम पाया घालता आला. परंतु मतैक्यपद्धतीबद्दलच्या आग्रहामुळे नेहरूपर्वामध्ये दारिद्र्य व विषमता या दोन आघाड्यांवर यशस्वी रीतीने झुंज देण्यात काँग्रेसला फारसे यश आले नाही. मात्र याबाबत पं. नेहरूंच्या नेतृत्वावर व नेहरूपर्वातील काँग्रेस पक्षाच्या कार्यावर टीका करताना भारताने स्वीकारलेल्या लोकशाही मार्गामध्येच गोगलगायीच्या संथ गतीने प्रगती होण्याची अट अनुस्यूत आहे याचे भान ठेवलेले बरे. लोकशाहीचा मार्ग स्वीकारण्यामध्ये निश्चित प्रगतीची हमी देता येणार नाही आणि त्याची किंमतही आपणाला परवडण्यासारखी नाही.

प्रमुख संदर्भग्रंथ–

1. Kochanek Stanley A.; India–The Dynamics of One-yart Democracy, Princeton, 1968.
2. Kothari Rajni; Politics in India Orient Longmans Ltd, New Delhi, 1970.
3. Dr. Singh Akhileshwar; Political Leadership of Jawaharlal Nehru, Deep and Deep Publications, New Delhi, 1986.
4. Alexander Chicherov; Jawaharlal Nehru and the Indian National Congress, Allied Publishers Private Ltd, New Delhi, 1985.
5. Roop Lekha Borgohain; The Indian National Congress, Intellectual Publishing House, New Delhi, 1982.
6. W. H. Morris–Jones; The Government and Politics of India, B. I. Publications, New Delhi, 1974.

⊙ ⊙ ⊙

अनुक्रमणिका

कॉंग्रेसच्या इतिहासातील इंदिरा गांधीपर्व

भास्कर लक्ष्मण भोळे

कॉंग्रेस पक्षात इंदिरापर्व सुरू होईपर्यंत या पक्षाचे स्वरूप सापेक्षतः बरेचसे सुसंघटित होते आणि तळापासून शिखरापर्यंत सर्व स्तरांवर आणि देशाच्या सर्व कानाकोपऱ्यांपर्यंत प्रतिसाददायी नेतृत्वाची उपलब्धता पक्ष राखून होता. तसा हा पक्ष एकजिनसी कधीच नव्हता, त्याचे स्वरूप पूर्वापार संकलित व समावेशक संयुक्त आघाडीचेच होते पण तरीही राष्ट्रव्यापी संघटनेची स्वातंत्र्यपूर्वकाळापासून झालेली बांधणी त्याला सत्ता संपादण्यात, टिकवण्यात आणि पूर्वसंचित प्रतिष्ठा अबाधित राखण्यात उपयुक्त ठरत आली होती. आपापल्या गटाचा पक्षांतर्गत दबदबा वाढवण्याच्या ईर्ष्येतून पक्षातील गटांनी केलेल्या स्पर्धेमुळे त्या पक्षाला व्यापक पाया जोडण्यात यशही लाभले होते. निम्नतर पातळ्यांवरही पक्षयंत्रणा क्रियाशील राहिल्यामुळे राजकीय पर्यावरणात वेळोवेळी होणारे बदल त्वरित टिपून पक्षश्रेष्ठींपर्यंत पोचणे आणि त्या बदलांना पक्षाकडून प्रतिसाद दिला जाणे या प्रक्रिया बऱ्याच प्रमाणात सुरळीत पार पडत होत्या. एकमेकांना शह-काटशह देणारे गट सत्तारूढ पक्षाच्या छत्राखालीच उपस्थित असल्यामुळे विरोधी पक्षांना वाढण्याची वा प्रभाव टाकण्याची संधीच प्राप्त होत नसे.

परंतु नेहरूंच्या निधनानंतर–खरेतर, निधनापूर्वी दोन वर्षे आधीपासूनच–या पक्षाच्या विश्वासार्हतेला ओहोटी लागली होती. सामाजिक संबंधांची आमूलाग्र फेररचना करण्याऐवजी लोकांना काही सोयीसवलती देऊन वरून खाली क्रांती संक्रमित करण्याचा उदारमतवादी मार्गच नेहरूंनी पत्करल्यामुळे मूळ प्रश्न तसेच राहिले. फक्त त्यांना वरवर मलमपट्टीच होत राहिली. नेहरूंना आपल्या हयातीत लोकशाही समाजवादाच्या तत्त्वज्ञानाचा निश्चित अर्थ आणि आशय आपल्या पक्षकार्यकर्त्यांपर्यंत मुळीच पोचवता आला नव्हता. त्यामुळे एकीकडे नियोजन, भूसुधार कायदे, कामगार कल्याण, सार्वजनिक क्षेत्रांचा विस्तार करीत असलेल्या नेहरूंचे सरकारही खालून वर येऊ पाहणाऱ्या लोकक्रांतीशी दडपणाच्याच भाषेत संवाद करायचे. विद्यमान व्यवस्थेतील काही अतिरेकांना आवर घालण्याचा खटाटोप नेहरूंच्या काळात केला गेला असला तरी, एकूण त्या व्यवस्थेचा पाया पूर्वीपेक्षा अधिकच बळकट झाला होता. स्वाभाविकच तीव्र झालेल्या सामाजिक–आर्थिक प्रश्नांनी नेहरूंच्या उत्तराधिकाऱ्यांसमोर प्रचंड मोठी आव्हाने उभी केली होती आणि ते पेलण्याचे सामर्थ्य मुळातच नसलेली पक्षयंत्रणा त्यांना वारसारूपाने लाभली होती.

आर्थिक विचारसरणीचा आधार नसलेली, गटागटांच्या संतुलनातून सत्ता टिकवणारी, कोणत्याही प्रकारचा भविष्यदर्शी कार्यक्रम नसणारी आणि निवडणूक प्रचाराखेरीज प्रयोजन नसलेली ही पक्षयंत्रणा मोडीत काढणे नंतरच्या वारसदारांना मुळीच अशक्य नव्हते. नव्हे, ती तशी मोडीत काढणे ही त्यांच्या नेतृत्वाच्या उभारणीची एक अपरिहार्य निकडच जणू होऊन बसली होती ! नेहरूंच्या निधनानंतर पक्षात सर्वमुखी मान्यता ज्याला प्राप्त आहे किंवा होऊ शकेल असा नेताच नव्हता. ती पोकळी भरून काढण्याचा प्रयत्न वयाने ज्येष्ठ आणि राज्य-राजकारणात थोडेबहुत पाये असलेल्या काही नेत्यांनी केला. कामराज, स. का. पाटील, संजीव रेड्डी, अतुल्य घोष आणि निजलिंगप्पा यांचा या गटात अंतर्भाव होता. पुढे भारतीय राजकारणात **सिंडिकेट** म्हणून तो प्रसिद्धी पावला. नेहरूंच्या निधनानंतर प्रथम 'कॉन्सेन्सस' च्या तत्त्वाधारे शास्त्रींची, आणि शास्त्रीनिधनानंतर मतदानाच्या मार्गाद्वारे श्रीमती गांधींची प्रधानमंत्रिपदी निवड करण्यात या गटाला यश मिळाले होते. दोन्ही वेळा

अनुक्रमणिका

'मोरारजी नकोत' या नकारात्मक विचाराचाच पगडा या निवडींवर होता. शास्त्रीजी व इंदिरा गांधी या दोनच व्यक्ती मोरारजींना फिके पाडू शकणाऱ्या होत्या. शास्त्रींची निवड झाली तेव्हा सिंडिकेटची अशी खात्री होती की, ते आपल्या ओंजळीने पाणी पितील, पण त्यांची ती अपेक्षा फोल ठरली. आता दुसऱ्या वेळी तरी आपण गाफील राहता कामा नये अशा निर्धाराने या पक्षश्रेष्ठींनी पावले टाकण्यास प्रारंभ केला. किंबहुना त्यामुळेच मोरारजींपेक्षा श्रीमती गांधींच्या पारड्यात त्यांनी आपले वजन टाकले आणि त्यांची सत्ता निरंकुश होऊ नये म्हणून त्यांनी मोरारजींना श्रीमती गांधींच्या मंत्रिपरिषदेत उपपंतप्रधान मंत्रिपदावर बसवले.

इंदिराजी राजकारणात नवख्या होत्या, देशातली परिस्थिती कमालीची बिघडलेली होती. सिंडीकेटच्या पुढाऱ्यांच्या हे पथ्यावरच पडले. प्रधानमंत्री आपल्या हातातले बाहुले आहेत अशा पद्धतीने ते वावरत होते. मोरारजी व सिंडिकेट यांचे सूत वाढत चालले होते. काँग्रेस पक्षात प्रधानमंत्र्यांचा गट (किचन कॅबिनेट), आणि पक्षश्रेष्ठींचा गट अशी मोर्चेबंदी सुरू झाली होती. दिनेश सिंग, यशवंतराव चव्हाण, द्वारकाप्रसाद मिश्र, उमाशंकर दीक्षित, कमलाकान्त त्रिपाठी, अशोक मेहता, सी. सुब्रह्मण्यम ही माणसे खास प्रधानमंत्र्यांच्या विश्वासातली मानली जात असत. श्रीमती गांधींनी रुपयाचे अवमूल्यन करण्याचा निर्णय घेतला. खुद्द कामराजांनाही तो वर्तमानपत्रातून समजला, इतका महत्त्वाचा व दूरगामी निर्णय श्रीमती गांधींनी आपल्याला न विचारता घ्यावा याचे त्यांना वैषम्य वाटले. मंत्रिपरिषद श्रेष्ठ, की पक्षसंघटना श्रेष्ठ या सनातन वादाला नव्याने तोंड फुटले. श्रीमती गांधींच्या स्वतंत्र वृत्तीची ही पहिली चुणूक होती.

तरीसुद्धा १९६७ च्या निवडणुका होईपर्यंत सिंडिकेटचेच पारडे जड होते. ज्वलंत प्रश्नांसंबंधी उदासीन दिसणाऱ्या शासनाविषयी जनभावना प्रक्षुब्ध झाली होती याचे प्रत्यंतर या निवडणुकीच्या निकालात पाहायला मिळाले. काँग्रेसचे लोकसभेतील बहुमत कमालीचे घटले. अर्ध्याअधिक राज्यांमधून त्या पक्षाला सत्ताच्युत व्हावे लागले. केंद्रातली आपली सत्ता अल्पजीवी ठरेल या आशंकेपोटी गटबाजीचा पक्षात सुळसुळाट माजला. पक्षाचे निवडणुकीत मतदारांनी धिक्कारलेले दिग्गज आणि त्यांचे गट सत्तास्थाने बळकावण्यासाठी आपापल्या परीने प्रयत्न करू लागले. सिंडिकेटने श्रीमती गांधींवर अंकुश ठेवण्याचा खटाटोप चालूच ठेवला. लोकसभेच्या सभापतिपदावर श्रीमती गांधींना हवे असलेले रघुनाथराव खाडिलकर यांच्याऐवजी सिंडिकेटने आपले उमेदवार संजीव रेड्डी यांना बसवण्यात यश मिळवले.

सिंडिकेटमध्ये स. का. पाटील हे काँग्रेसमधील उजव्या प्रवाहाचे प्रतिनिधित्व करणारे, वल्लभभाई पटेल यांचे वारसदार म्हणून ओळखले जात. निवडणुकीत काँग्रेसला बसलेले हादरे पाहून त्यांना असे वाटले की, यापुढे एकपक्षीय राजवटी अशक्य ठरणार असून समविचारी राजकीय पक्षांशी युती करण्याखेरीज तरणोपाय नाही. जनसंघ व स्वतंत्र हे पक्ष त्यांना जवळचे वाटले आणि त्यांच्याशी हातमिळवणी करण्याचे मनसुबे ते जाहीर करू लागले होते. श्रीमती गांधींनी हे हेरून ठेवले होते. योग्य वेळ येण्याची त्या प्रतीक्षा करीत होत्या. त्यासाठी त्यांना १९६९ साल उजाडेपर्यंत थांबावे लागले. तोपर्यंत श्रीमती गांधींची भूमिका बरीचशी बचावात्मकच राहिली होती. राज्यसत्ता श्रीमती गांधींची असली तरी, त्या सत्तेमागची प्रेरणा व शक्ती आपल्याच हाती आहे अशा अहंकारात पक्षश्रेष्ठी वावरत होते. आपण मनात आणू तेव्हा श्रीमती गांधींना पदच्युत करू शकू अशी खात्री त्यांना वाटत होती.

पण राष्ट्रपती झाकीर हुसेन निधन पावले आणि नव्या उमेदवाराची निवड क्रमप्राप्त ठरली. उपराष्ट्रपती गिरींचे मत होते की, उपराष्ट्रपतीला राष्ट्रपती करण्याच्या पायंड्यानुसार त्यांना ते पद मिळावे. श्रीमती गांधी मुग्ध होत्या. सिंडिकेटने संजीव रेड्डी यांचे नाव मुक्रर केले. हे नाव ठरवण्यात निश्चितच काही डाव आहे, आपल्या सत्तेला पायबंद घालण्याचे षडयंत्र आहे अशी श्रीमती गांधींची समजूत झाली. बंगलोरला अ. भा. काँ. कमिटीच्या अधिवेशनात इंदिरा गांधी व पक्षश्रेष्ठी यांच्यातील संघर्ष तीव्र व स्पष्ट झाला. पहिल्या दिवशी स्वतः हजर न राहता फक्रूद्दीन अली अहमद यांच्या

हस्ते '**सहज सुचलेले काही विचार**' नामक एक खलिता त्यांनी पाठवून दिला. कॉंग्रेसने हाती घ्यावयाच्या आर्थिक कार्यक्रमाची त्यात कथित रूपरेषा होती. कार्यकारिणीने तो कार्यक्रम विचारात घ्यावा असा आग्रह अहमद यांनी धरला. श्रेष्ठींसमोर पेच पडला. एक कार्यक्रम अ. भा. कॉं. कमिटी समोर होताच, त्याविषयीचे ठरावही होते. ठरावात दुरुस्त्या हव्या तर यथावकाश सुचवता येतील, पण ऐनवेळी आलेल्या या "सहज सुचलेल्या विचारां"ना कुठे स्थान द्यायचे ? त्यात नवीन असे काहीच नाही असा अभिप्राय मोरारजी, पाटील व कामराज प्रभृतींनी दिला. यशवंतरावांनी मात्र त्यावर स्वतंत्र ठराव करण्याची शिफारस केली.

दुसऱ्या दिवशी कॉंग्रेस पार्लमेन्टरी बोर्डाची बैठक भरली तेव्हा श्रीमती गांधी हजर होत्या. राष्ट्रपतिपदाच्या उमेदवाराची निवड करायची होती. श्रेष्ठींनी एकमुखाने संजीव रेड्डींचे नाव सुचवले. श्रीमती गांधींनी मात्र अत्यंत अनपेक्षितपणे जगजीवनराम यांचे नाव पुढे केले. तडकाफडकी निर्णय घेऊन, 'आक्रमकता हाच बचावाचा सर्वोत्तम पवित्रा आहे' यापुढे अनेकदा प्रत्ययास आलेल्या त्यांच्या खास सूत्राचा पहिला अवलंब श्रीमती गांधींनी या वेळी केला. मतदान झाले. संजीव रेड्डींचे नाव बहुमताने घोषित केले गेले. आणि श्रीमती गांधींनी आक्रमक पावले पुढे रेटायला प्रारंभ केला. पहिली गोष्ट त्यांनी केली, ती म्हणजे रात्रीतून मोरारजी देसाई यांचे अर्थमंत्रिपद काढून घेतले आणि चौदा बँकांचे राष्ट्रीयीकरण जाहीर केले.

आपली बाजू पुरोगामी, समाजवादी व परिवर्तनाग्रही आहे तर पक्षश्रेष्ठी प्रतिगामी, भांडवलदारी व 'जैसे थे'वादी असून आपल्या कार्यक्रमांना खीळ घालीत आहेत असा जोरदार प्रचार श्रीमती गांधींनी सुरू केला. जनमानसांवर आपली ही क्रांतिकारी प्रतिमा उमटवण्यात त्यांना बरेच यशही मिळाले. निजलिंगप्पा, स. का. पाटील वगैरे नेते जनसंघाशी मैत्री करतात याचे प्रचंड भांडवल त्यांनी केले. कॉंग्रेसने शिरोधार्य मानलेली तत्त्वे, मूल्ये आणि आदर्श धुळीत मिळवू पाहणाऱ्या या नेत्यांनी राष्ट्रपतिपदासाठी निवडलेला उमेदवार निवडून आणणे म्हणजे कॉंग्रेसच्या मूळ तत्त्वांशी द्रोह ठरेल. तेव्हा ज्याने त्याने आपल्या सदसद्विवेकबुद्धीच्या आधारे राष्ट्रपतीच्या निवडणुकीत मतदान करावे. कॉंग्रेसच्या आमदार-खासदारांना तसे करण्याचे स्वातंत्र्य राहील. सरळसरळ पक्षसंघटनेविरुद्ध पुकारलेला हा एल्गार होता. पुढे मिळालेल्या यशामुळे जरी त्यातील वावगेपणा नजरेआड झाला असला तरी, इंदिरा गांधींचे हे कृत्य पक्षशिस्त मोडणारे आणि पक्षसंघटनेला कःपदार्थ ठरवणारेच होते हे इतिहासकाराला नाकारता येणार नाही.

पक्षाचा अधिकृत उमेदवार राष्ट्रपतिपदाची निवडणूक हरला. पक्षात न मिटणारी दरी पडली. पक्षाध्यक्षांनी रास्त कारणांवरून सी. सुब्रह्मण्यम् व कमलापती त्रिपाठी यांचे कॉंग्रेस कार्यकारिणीचे सदस्यत्व रद्द करण्याचा निर्णय घेतला तर त्यावर प्रधानमंत्र्यांनी आपल्या व काही सहकाऱ्यांच्या सहीने अध्यक्षच बदलण्याची मागणी केली. मंत्रिपरिषदेतून सिंडिकेटचे सदस्य एकेक करून काढायला सुरुवात केली. श्रेष्ठींनी मग प्रधानमंत्र्यांवरच शिस्तभंगाचा आरोप ठेवून त्यांच्या उच्चाटनाचा घाट घातला. पण तोपावेतो चित्र पार पालटलेले होते. संघटनेत आणि पार्लमेन्टरी पक्षातही इंदिरा गांधींचे स्थान पक्षश्रेष्ठींपेक्षा प्रचंड बलवत्तर झालेले होते.

श्रीमती गांधींनीच मुंबईला कॉंग्रेसचे अधिवेशन भरवून त्यात लोकसभाविसर्जनाची घोषणा केली. श्रेष्ठींनी 'इंदिरा हटाव'चा नारा लावला तरी इंदिराजींनी 'गरिबी हटाव'ची घोषणा केली. त्यांना या निवडणुकीच्या जुगारात प्रचंड मोठे दान पडले. पाठोपाठ बांगलादेश मुक्तियुद्धातील विजयामुळे त्यांची प्रतिमा खूपच उजळली. विधानसभांच्या निवडणुकाही त्यांच्या पक्षाला यशदायी ठरल्या. इंदिरा गांधींची सत्तारूढ कॉंग्रेस हीच खरी कॉंग्रेस ठरली. संघटना कॉंग्रेस राजकीय विजनवासात गेली.

पक्षाच्या दृष्टीने या सर्व घडामोडींचा इत्यर्थ काय झाला हे पाहणे अधिक महत्त्वाचे आहे. निवडणुकीतील हा विजय कॉंग्रेस पक्षाचा असण्यापेक्षा तो श्रीमती गांधींचा होता हे निर्विवाद सत्य आहे. वरिष्ठ पातळीवरच्या पक्षफुटीमुळे पक्षयंत्रणा पूर्णपणे खिळखिळी झाली होती आणि पक्षनायिकेवरची

पक्षाची भिस्त अभूतपूर्व वाढली होती. 'मुक्तिदात्या'ची भूमिका जनसामान्यांच्या व पक्षकार्यकर्त्यांच्याही मनात श्रीमती गांधींची एव्हाना तयार झाली होती. एकमेवाद्वितीय पक्षप्रमुखाच्या हाती अमर्याद सत्ता आणि इतर सर्व पक्षशाखांना पक्षाघात अशी विकलांग अवस्था या पक्षाला यापूर्वी कधीच आलेली नव्हती. मधल्या काळात काहीशी निर्नायकी व बेबंदशाही माजली होती ती श्रीमती गांधींच्या एकमुखी नेतृत्वामुळे कमी झाल्यासारखे वाटले असले तरी, त्यासाठी पक्षाला फार जबर किंमत चुकवावी लागत होती. भारतासारख्या खंडप्राय देशाला मध्यवर्ती नेत्यावरच भिस्त ठेवून असणारा एकखांबी तंबूसारखा पक्ष अजिबात कामाचा नव्हता.

व्यक्तिकेंद्रित राजकीय पक्षाचा आधार पक्षनेत्याचे दिव्यवलय हाच एकमात्र असतो. नेत्याच्या ठिकाणी जणू अलौकिक शक्ती आहेत आणि हवा तो चमत्कार नेता चुटकीसरशी घडवून आणू शकतो अशी अविवेकी मनोवृत्ती एकखांबी पक्ष नेहमीच निर्माण करीत असतात. त्या त्या पातळीवरचे सामाजिक–आर्थिक–राजकीय प्रश्न त्याच पातळीवरच्या पक्षयंत्रणा सोडवण्याच्या फंदातच पडत नाहीत. त्या फक्त 'वरून' येणाऱ्या आदेशाची वाट पाहात निष्क्रीय राहतात. मध्यवर्ती नेता म्हणेल तीच मग पक्षाची विचारसरणी ठरत असल्यामुळे त्याबाबतीत सातत्य, सुसंगती वा जाणती राबवणूक यांपैकी काहीही घडू शकत नाही. प्रश्नांची उत्तरे तत्त्वज्ञानाच्या आधारे मिळवण्यापेक्षा तंत्रज्ञानातून मिळवण्याचाच प्रयत्न केला जातो. पक्षयंत्रणाच असून नसल्यागत झाली की, सामाजिक आभियांत्रिकीद्वारे प्रश्नांची मुळात जाऊन चिकित्सा करणे किंवा ते मुळासकट नष्ट करण्याचे उपाय योजिणे अशक्यच होऊन बसते. याचे दूरगामी परिणाम अनिष्टच होतात.

सिंडिकेटशी संघर्ष करीत असताना श्रीमती गांधींना कदाचित असे वाटले असेल की, आपल्याला प्रतिष्ठेने व स्वतंत्रपणे उभे राहायचे असेल तर सुसंबद्ध पक्षचौकट झुगारून देण्यावाचून गत्यंतर नाही. अडचणीत गाठलेल्या व्यक्तीने निर्वाणीचा म्हणून आततायीपणाचा का होईना मार्ग अनुसरणे एक वेळ समजू शकते. पण राज्यव्यवस्थेच्या दृष्टीने त्याचे झालेले अनिष्ट परिणाम लक्षात घ्यावेच लागतात. संकटाबाहेर आल्यानंतर तरी श्रीमती गांधी व त्यांच्या सहकाऱ्यांनी निकोप पक्षबांधणीचा प्रयत्न करायला पाहिजे होता. पण त्यांनी तो तसा केला नाही. उलट, पक्षात कुठेही स्वायत्त सत्ताकेंद्र निर्माण होऊ नये अशीच दक्षता घेतली. जणू पक्षयंत्रणा 'दरबारी' ठेवूनच आपली सत्ता संकलित राहू शकेल असा त्यांचा होरा असावा. पण याचा परिणाम असा झाला की, त्यांच्या सत्तेचे डोलारे हवेतच अधांतरी राहिले. समाजजीवनात स्थिर आणि पक्ष-पाया त्यांना निर्माण करताच आला नाही. भावनिक आवाहनांतून जनमताचा कौल मिळवणे त्यांना शक्य झाले, पण पुरोगामी नवसमाजनिर्मितीची शक्ती ते खडी करू शकले नाहीत.

मुक्तिदात्याची प्रतिमा श्रीमती गांधींच्या कारकीर्दीत कळसाला पोचली. बँकांचे राष्ट्रीयीकरण, संस्थानिकांचे तनखे रद्द करणे, पुरोगामी प्रतिमा व क्रांतिकारी घोषणा, जनसामान्यांशी (पक्षयंत्रणेद्वारे नव्हे तर) प्रत्यक्ष संवाद इत्यादींमुळे इंदिरा गांधींना जनसामान्यांनी डोक्यावर घेतले; आणि त्याच वेळी नक्षलवादी ठरवून चळवळी करणारांना डांबून ठेवणे वा ठार करणे, रेल्वे संप दडपणे, औद्योगिक शांतता दहशतीच्या मार्गाने टिकवण्यास हातभार लावणे वगैरेंमधून राज्यकर्ता वर्गही त्यांच्यावर संतुष्ट राहिला. बांगला देशातील पराक्रम हा तर त्यांच्या कीर्तीचा शिरपेच ठरला.

पण गरिबी हटावच्या घोषणेतून उंचावलेल्या अपेक्षा आणि वचनपूर्तीच्या राजकारणाचा लवकरच स्पष्ट झालेला फोलपणा यांमुळे लोकांचा प्रचंड भ्रमनिरास होत गेला. क्रांतिकारक घोषणा अखंड होत असतानाच सामाजिक–आर्थिक परिस्थिती तशीच राहते, किंबहुना अधिकच बिघडते हे पाहून संतप्त झालेल्या लोकांची आंदोलने जसजशी उग्र होत गेली तसतसे शास्त्रीय दमनसत्रही प्रखर होत राहिले.

प्रचारासाठी स्वीकारलेल्या पुरोगामी भूमिकेचे काही पक्षरचनात्मक संदर्भही असतात हे श्रीमती गांधींना बहुधा कधीच जाणवले नसावे. किंवा ती

भूमिका गंभीरपणे राबवणे त्यांना मुळात अभिप्रेतच नसावे असे दिसते. बंगलोर अधिवेशनात मांडलेला जो "आर्थिक कार्यक्रम" त्यांना ही पुरोगामी प्रतिमा मिळवून देण्यास कारणीभूत ठरला तो खूप सखोल विचारविमर्श करून, किंवा सर्व संभाव्य परिणामांची मनाशी आखणी करून, किंवा दीर्घकालीन बांधीलकीमधून साकार झालेला नव्हता, तर "सहज सुचलेले संकीर्ण विचार" असेच त्याचे स्वरूप होते. घाईघाईने अधिवेशनाच्या आदल्या दिवशी केलेले ते टाचण होते. पक्षश्रेष्ठींना पेचात पकडण्याची एक तात्कालिक क्लृप्ती याहून अधिक महत्त्व श्रीमती गांधींनी त्यास दिलेले नव्हते. त्यांचा त्याबाबतचा दृष्टिकोण स्पष्टपणे उथळ (कॅज्युअल) होता.

स्वाभाविकच त्यांची ही "क्रांतिकारी" वैचारिकता पक्षयंत्रणेत आणण्याचा वा ठोस धोरणात्मक परिभाषेत मांडण्याचा गंभीर प्रयत्न श्रीमती गांधींनी कधीच केला नाही. तो फक्त एक मुखवटाच राहिला. त्या देखाव्याला भुलून किंवा अन्य अंतस्थ हेतूने काही साम्यवाद्यांनी या काळात सत्तारूढ काँग्रेसशी जवळीक केली. काहींनी त्यात प्रवेशही केला. त्यांच्या प्रभावाखाली पक्षांतर्गत 'फोरम फॉर सोशॅलिस्ट ॲक्शन' स्थापन करण्यात आला. त्याला शह देण्यासाठी साम्यवाद्यांबद्दल दु:स्वास असणाऱ्या पक्षनेत्यांनी 'नेहरू फोरम' काढला. १९७३ पर्यंत आणखी काही फोरम्स निघाले. पक्षाच्या वैचारिक अराजकाचेच हे चित्र होते. १९७३ साली ते फोरम्स गुंडाळण्यात आले. राजकीय विचारसरणीचा काटेकोर आग्रह धरून सबगोलंकार पक्षाची उभारणी इंदिरा गांधींना करणे अशक्य होते, आणि सबगोलंकार पक्ष झाल्याशिवाय सत्तेवर टिकून राहणे अशक्यच होते.

राज्यपातळीवरील पक्षयंत्रणा निष्प्रभ करणे, विधानसभा निवडणुकींच्या उमेदवारांपासून राज्यांच्या मुख्यमंत्र्यांपर्यंतच्या सर्व निवडणुका राजधानी दिल्लीमधूनच केल्या जाणे, प्रदेश काँग्रेसचे अध्यक्षही वरूनच ठरवले जाणे, राज्यांत शक्यतो स्वत:चा पाया असलेले नेतृत्व सत्तेवर राहू न दिले जाणे असे प्रकार नित्याचे झाले होते. पक्ष सर्वांगसुंदर करण्याच्या दृष्टीने ते निश्चितच मारक होते. पक्षांतर्गत लोकशाही संपुष्टात आली होती. पक्षसंविधानानुसार बंधनकारक असलेली अधिवेशनेही भरवली जात नसत. सर्व पक्षस्तरांवर 'निर्वाचित' पदाधिकाऱ्यांऐवजी 'नियुक्त' व्यक्तींचा मन:पूत रीतीने भरणा करण्याचा पायंडा दृढमूल झाला होता.

गुजरात व बिहार आंदोलनांच्या निमित्ताने जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली जे राष्ट्रव्यापी आव्हान उभे राहिले होते ते पेलण्याचे सामर्थ्य सत्तारूढ पक्षापाशी नव्हते. शिबिरे घेऊन कार्यकर्ते प्रशिक्षित करण्याचा घाट नरोरा मुक्कामी काही पुढाऱ्यांनी घातल्यानंतर देशभर अशी शिबिरे घेतली गेली. परंतु ही शिबिरे फलद्रूप ठरू शकली नाहीत, कारण शिकण्याची व शिकून विवेकी होण्याची संस्कृतीच हा पक्ष तोपर्यंत गमावून बसला होता.

१२ जून १९७५ रोजी अलाहाबाद उच्च न्यायालयाने श्रीमती गांधींची निवडणूक भ्रष्टाचाराच्या सिद्ध झालेल्या आरोपावरून रद्द ठरवल्यानंतर त्यांनी जो मार्ग अनुसरला तो पक्षाच्या दृष्टीने फारच अनिष्ट ठरला. वस्तुत: आणीबाणीच्या सर्व भीषण अनुभवांनंतरही जर त्या १९८० साली पुन्हा प्रचंड बहुमत मिळवून निवडून येऊ शकल्या तर १९७५ साली त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा देऊन पुन्हा निवडणूक लढवली असती तर नक्कीच निवडून आल्या असत्या. न्यायालयीन निर्णयाचा सन्मान झाला असता. पक्षाची प्रतिष्ठा टिकून राहिली असती आणि त्यांची व्यक्तिगत प्रतिमा तर अधिकच तेजस्वी झाली असती. पण असुरक्षिततेच्या गंडातून आणि व्यक्तिगत सत्ताकांक्षेतून त्यांनी आणीबाणीचा अविवेकी मार्ग अनुसरला. त्यांनी राजीनामा दिला असता तर विरोधकांच्या चळवळीच्या शीडातले वारेच त्या काढून घेऊ शकल्या असत्या. पण त्यांनी आपल्यावरील हल्ल्याला अधिकच आक्रमक प्रतिहल्ल्याचा प्रतिसाद दिला. आणीबाणीत नागरी हक्क, वृत्तपत्रस्वातंत्र्य, संघराज्य रचना, संसदीय कार्यपद्धती, न्यायालयीन स्वातंत्र्य, संविधानाची मान्यता, लोकशाहीचे संकेत–यांपैकी एकूणएक गोष्ट त्यांनी निकालात काढली. राजकीय, नैतिक, वैज्ञानिक वा सांविधानिक कोणतेही नियम

अनुक्रमणिका

पापणी लवते तितक्या सहजपणे व बिनदिक्कत त्यांनी मोडले. त्यांच्या राजकीय शैलीच्या या वैशिष्ट्याचा अत्यंत विपरीत परिणाम संपूर्ण देशाच्या सामाजिक-राजकीय जीवनावर झाला, कारण सर्वच प्रकारच्या अनैतिक व भ्रष्ट मार्गांना राजकीय प्रतिष्ठा व अधिमान्यता त्या शैलीने मिळवून दिली. साध्यसाधन विवेकाचे नेहरूंच्या काळापर्यंत कसेबसे टिकून राहिलेले सूत्र सर्वथैव त्याज्य ठरले.

खुद्द श्रीमती गांधींच्या पक्षात जे नवे शक्तिप्रवाह यातून प्रविष्ट व प्रभावी झाले त्यांनी त्यांची सगळीच प्रतिष्ठा धुळीस मिळविली. सत्ता टिकवण्यासाठी वेठीस धरल्या गेलेल्या 'खाजगी' पक्षाची अवकळा त्याला प्राप्त झाली. काँग्रेस पक्षाचा साधा सभासदही नसलेला संजय गांधी आणि त्याचे तत्त्वशून्य साथीदार जुन्या निष्ठावंत कार्यकर्त्यांपेक्षा पक्षकारभारात वरचढ ठरले. नेताजी सुभाषचंद्रांचे पुतणे अरविंद बोस यांनी या काळात श्रीमती गांधींना लिहिलेले एक पत्र बोलके आहे. ते म्हणतात, "तुमच्या व्यक्तिगत नेतृत्वाखाली काँग्रेस पक्ष व शासन व्यक्तिपूजेकडे व अधिकारशाहीकडे जात चालले असून सरळसरळ लोकशाहीविरोधी पवित्रे घेत आहे. काँग्रेसच्या परंपरा, तत्त्वे, धोरणे व कार्यक्रम पायदळी तुडवताना तुम्हाला कसलीच दिक्कत वाटत नाही. तुम्ही सत्तेवर आल्यानंतर पहिला बळी समाजवादी शक्तींचा पडला आहे" (उद्धृत, इंडियन एक्स्प्रेस, ७.२.१९७७).

श्रीमती गांधींना नेहरूंपेक्षाही सर्वश्रेष्ठ स्थान आणि सत्ता शासनात आणि पक्षात मिळूनही त्यांची असुरक्षिततेची भावना कधीच कमी झाली नव्हती. पक्षांतर्गत विरोध किंवा व्यक्तिगत अपात्रतेची जाणीव या असुरक्षिततेच्या मुळाशी होती असे म्हणता येणार नाही, तर देशात उत्तरोत्तर गंभीर होत चाललेला सामाजिक-आर्थिक पेचप्रसंग (क्रायसिस) आणि व्यक्तिगत सत्ताकांक्षा यांच्या संमिश्रणातून हा असुरक्षितपणा प्रादुर्भूत झाला होता. त्यांच्या अनेक आक्रमक, आकस्मिक आणि अविचारी निर्णयांच्या बुडाशी ही असुरक्षितपणाची भावनाच दिसून येते. जवळच्या पक्षसहकाऱ्यांवरही त्यांचा पूर्ण विश्वास कधीच नसायचा. कार्यकारिणीसमोर चर्चेला न ठेवता अनेक निर्णय त्या घेत असत. पक्षाच्या अधिकृत यंत्रणांच्या परिघाबाहेर निर्णयप्रक्रियेची अनौपचारिक केंद्रे त्यांनी निर्माण केल्यामुळे ज्येष्ठ सहकाऱ्यांचा तेजोभंग होत असे पण प्रतिकार करण्याची कुवत नसल्यामुळे त्यांचा नुसताच जळफळाट होत असे. पक्षसंस्था जसजशा कुचकामी ठरत गेल्या तसतसा लोकजीवनापासून तुटलेला तंत्रज्ञ-नोकरशहांचा पक्षात वरचष्मा वाढू लागला आणि लोकनेत्यांवर ते वर्चस्व गाजवू लागले. वाईट नाण्यांनी चांगली नाणी राजकीय बाजारातून हद्दपार केली.

आणीबाणीतील शक्तिनाशक आत्मसंतुष्टतेमुळे सत्तारूढ पक्षाची यंत्रणा इतकी सुस्त आणि जड झाली होती की, विरोधी पक्षांच्या संघटित व गतिमान प्रचाराचा मुकाबला ती करूच शकली नाही. स्वार्थी व करियरिस्ट बाजारबुणग्यांचाच भरणा पक्षात झाल्यामुळे श्रीमती गांधींचे व्यक्तिस्तोम वाढवण्यापेक्षा निराळा प्रचार करणेच त्यांना शक्य नव्हते. एकीकडे एकचालकानुवर्तित्वातून निष्पन्न झालेले केंद्रीकरण पक्षात असले, तरी अशा रचनेचे लाभ मात्र पक्षाला मिळणे अशक्यप्राय ठरले होते; कारण गटबाजीने त्याला खालपासून वरपर्यंत पोखरले होते. श्रीमती गांधींचे वर्चस्व हा मुद्दा वगळल्यास दुसऱ्या कशावरच पक्षात एकमत नव्हते. जनतेशी कोणत्याही पातळीवर संवाद करण्याची क्षमता आणि तयारी या संधिसाधू पुढाऱ्यांची नव्हती.

परिणामी या पक्षाचा १९७७ च्या निवडणुकीत पराभव झाला. पण या पराभवापासूनही तो काही शिकू शकला नाही. कठोर आत्मपरिक्षण व चिकित्सा करण्याची त्याची सवय एव्हाना सुटलीच होती. सप्टेंबर १९७७ मध्ये कार्यकारिणीच्या बैठकीत नवे अध्यक्ष ब्रह्मानंद रेड्डी व यशवंतराव चव्हाण यांनी 'पक्षांतर्गत लोकशाही' आणि 'सामुदायिक नेतृत्व' या दोन गोष्टींवर विशेष भर दिला. श्रीमती गांधींना यांत स्वतःच्या एकतंत्री नेतृत्वाला दिलेले आव्हान दिसले. जनता राज्यकर्त्यांनी श्रीमती गांधींना अटक करून दोनच दिवसांनी सोडण्याचा गलथानपणा केला. या दोन दिवसांत राज्याराज्यांत त्यांच्या पाठीराख्यांनी जे समर्थन-तमाशे केले त्यामुळे श्रीमती गांधींचा वृथाभिमान पुन्हा उसळी मारून आला. ब्रह्मानंद रेड्डींच्या जागी श्रीमती गांधींना

पक्षाध्यक्ष करावे ही मागणी इंदिरानिष्ठांनी सुरू केली. त्यासाठी अ. भा. काँ. कमिटीचे अधिवेशन बोलावण्याची त्यांनी मागणी केली. रेड्डी–चव्हाण यांनी खंबीर भूमिका घेऊन श्रीमती गांधींना एकमुखी नेतृत्व देण्यास विरोध केला.

श्रीमती गांधींच्या गटाने पक्षात यूथ फोरम स्थापन केले. संजय गांधी हे त्याचे सूत्रधार होते. रेड्डी-चव्हाण-नेतृत्व कमकुवत असून जनता पक्षाशी ते स्वार्थी वाटाघाटी करीत असल्यामुळे जनता-राज्यकर्त्यांविरुद्ध ठामपणे उभे राहण्यास असमर्थ आहे असा या फोरमचा मुख्य आरोप होता. काँग्रेस कार्यकारिणीत इंदिरागटातील काहींनी थेट मध्ययुगीन दरबारी परिभाषेत स्वामिनीभक्तीच्या वल्गना केल्या, श्रीमती गांधींनी स्वतःही पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांविरुद्ध टीकास्त्र सोडले. दुहीचे बीजारोपण पक्षात स्पष्ट दिसत होते.

डिसेंबर १९७७ मध्ये श्रीमती गांधींनी काँग्रेस कार्यकारिणी-सदस्यत्वाचा राजीनामा दिला. आपल्या पाठीराख्यांची एक परिषद त्यांनी १९७८ च्या प्रारंभी भरवली. रेड्डी-चव्हाणांनी या परिषदेवर बहिष्कार टाकण्याचे आवाहन पक्षसदस्यांना केले. त्यांनी काढलेल्या पत्रकात श्रीमती गांधींचे सदर कृत्य पक्षविरोधी आहे, त्या पक्षात गोंधळ व बेदिली माजवू इच्छितात, त्यांना पुनश्च पक्ष आपल्या दावणीला बांधायचा आहे, आणीबाणीच्या गुन्हेगारांशी काँग्रेस-संघटना एकरूप होऊ शकणार नाही. इत्यादी विधाने केलेली असून शिस्तभंग करून राजकीय दडपण आणण्याच्या खटाटोपाचा निषेध करण्यात आला होता. पण याचा उपयोग झाला नाही. ठरल्याप्रमाणे इंदिरानिष्ठांचे अधिवेशन पार पडले. जनता सरकार व काँग्रेस श्रेष्ठी या दोहोंवर त्यात आगपाखड केली गेली. रेड्डी-चव्हाण यांचे नेतृत्व प्रभावशून्य व कचखाऊ ठरवण्यात आले. त्यांच्या हातून पक्ष सोडवावा व पुनश्च श्रीमती गांधींच्या प्रभावी व धडाडीच्या नेतृत्वाखाली पक्षपुनर्घटना करावी अशी जोरदार मागणी करण्यात आली. अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी इंदिरा-काँग्रेस पक्षाची स्थापना रीतसर घोषित करण्यात आली व त्याचे अध्यक्षपद श्रीमती गांधींना देण्यात आले.

नव्या पक्षात गेलेल्यांचे पदाधिकार व पक्ष-सदस्यत्व जुन्या कार्यकारिणीने काढून घेतले. काही काळ दोन्ही गटांनी आपलीच काँग्रेस ही खरी राष्ट्रीय काँग्रेस असल्याचा दावा केला. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा ९२ वा वाढदिवस झाल्यावर अवघ्या सहा-सात दिवसांतच तिच्या अशा चिरफळ्या उडाल्या. ऐक्याचे सर्व प्रयत्न निष्फळ ठरले. श्रीमती गांधींच्या कारकीर्दीत पक्ष दुसऱ्यांदा फुटला. या दोन्ही फुटी श्रीमती गांधींच्या व्यक्तिगत राजकारणाच्या सोयीप्रमाणे घडून आल्या. पहिल्या वेळी (१९६९) वैचारिकतेचा झिरझिरीत का होईना पडदा होता, दुसऱ्या वेळी तर तोसुद्धा नव्हता. ९२ वर्षांच्या इतिहासात काही गट काँग्रेस-बाहेर पडल्याची उदाहरणे घडली होती. मात्र नेत्याच्या व्यक्तिगत राजकीय महत्वाकांक्षेपायी पक्षयंत्रणा मोडून टाकण्याचे तत्पूर्वी कधीच घडले नव्हते.

संजय गांधींना पक्षयंत्रणेचे महत्त्व मुळातच मान्य नव्हते. ऐक्य-प्रयत्नांना मुख्य मोडता त्यांनीच घातला होता. ऐक्यवाद्यांना श्रीमती गांधींचे दिव्य-वलय व जनमानसातील प्रतिमा वापरून घ्यायची आहे असा उलट आरोप करून 'त्यांनी हवे तर आमच्या पक्षात यावे, युती करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही' अशी भूमिका त्यांनी घेतली. आणीबाणीतील प्रकरणांची चौकशी करण्यासाठी नेमल्या जाणाऱ्या खास न्यायालयांच्या ठरावाला पक्ष-नेत्यांनी कसून विरोध करावा, इंदिरा किंवा संजय यांना पुन्हा अटक केल्यास रस्त्यावर येऊ असे जाहीर करावे, शहा-आयोगाला विरोध करावा अशा त्यांच्या अपेक्षा होत्या. नवा पक्ष निर्माण करण्यामागे श्रीमती गांधींच्या पाठीशी पक्षाध्यक्षपदाचे बळ उभे करणे ही एकमेव प्रेरणा होती असे दिसते.

संजय गांधींच्या नेतृत्वाखाली ज्या युवाशक्तीचा प्रवेश पक्षात झाला तिला काँग्रेसची तत्त्वे, इतिहास, त्याग, राष्ट्रभक्ती यांच्याशी काहीही कर्तव्य नव्हते, साधनशुचिता तर तिच्या गावीही नव्हती. आक्रमक, विधिनिषेधशून्य व गुन्हेगारीप्रवण अशा या नवप्रविष्ट शक्तीचा श्रीमती गांधींना या काळात आधार वाटला असला तरी, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या तत्त्वांचा तो संपूर्ण पराभव होता.

पण यशासारखे यशस्वी दुसरे काहीच नसते या म्हणीचा पुन्हा एकदा प्रत्यय आला. १९८० च्या निवडणुकीत इंदिरा-काँग्रेस पक्ष प्रचंड बहुमताने विजयी झाला. या यशाचे श्रेय पक्षातल्या "ताज्या, तरुण रक्ताला" दिले गेले, आणि त्यातून त्याच्या मार्गांना प्रामाण्य प्राप्त झाले.

नेहरू घराणे हेच फक्त राज्य करू शकते, त्या घराण्याशी एकनिष्ठ राहाल तरच सत्तेच्या उतरंडी-वर कुठे ना कुठे तुमची वर्णी लागू शकेल– अशी मिथके (मिथ्स) काँग्रेस-संघटनेत सर्वमान्य ठरली. जे या मिथकांवर विश्वास बाळगतील, किंवा विश्वास जाहीरपणे दाखवतील, या घराण्यात सत्ता पिढयान् पिढया चालू राहण्यास जे हरकत घेणार नाहीत अशांचाच भरणा पक्षात होत राहिला. इंदिरानिष्ठेची एक शपथ घेऊन पाळणाऱ्याला दुसरी कोणतीही शपथ घ्यावी–पाळावी लागत नव्हती. विवेकबुद्धी पार गाडून टाकावी लागत होती. अशी होयबा माणसे गुणवत्तेत व कर्तबगारीत सुमार असणे अपरिहार्यच होते.

वैचारिकदृष्टया खुद्द श्रीमती गांधींचाच प्रवास जिथे समाजवादापासून देवभोळेपणाकडे झाला होता तिथे त्यांच्या पक्षाची वैचारिकता संदिग्धतेकडून पोकळपणाकडे संक्रमित होणे अटळच होते. डाव्या विचारांच्या दिखाऊ पुरस्कारातून पक्षश्रेष्ठींना यशस्वी शह देणाऱ्या श्रीमती गांधींनी अनेक आर्थिक–राजकीय प्रश्नांवर खुशाल उजवे पवित्रे घेतले होते. हिंदू परंपराभिमानी शक्तींचा अनुनयही त्यांनी प्रसंगी केला होता. पंजाबात अकाली दलाला शह देण्यासाठी भिंद्रानवालेचा भस्मासूर त्यांनीच उभा केला होता. काश्मीरमध्ये फारूक सरकार-विरुद्ध जम्मूच्या हिंदूंना चिथावण्याचे राजकारणही त्यांनी केले होते. एकीकडे अवकाशसंशोधन व वैज्ञानिक मनोवृत्तीचे गोडवे गाणाऱ्या श्रीमती गांधी फलज्योतिष्य, कर्मकांड, देवळे व मंदिरे वगैरेंच्या आहारी जाऊन लोकांच्या अंधश्रद्धा दृढमूल करीत होत्या. विश्वहिंदू परिषदेने हरिद्वार येथे बांधलेल्या भारतमाता मंदिराचे उद्घाटन करण्यात किंवा अजमेरला आर्यसमाजापुढे 'आपला धर्म व परंपरा संकटात आहे' अशा आशयाचे भाषण करण्यात त्यांना धर्मनिरपेक्षतेचा भंग होतो असे वाटतच नसे. समाजवाद, धर्मनिरपेक्षता वर्णविहीन समताधिष्ठित समाज वगैरे आधुनिक मूल्यांची रुजुवात समाजात करण्याचे कार्य अशा परिस्थितीत इंदिरा गांधींच्या नावाने चालणाऱ्या पक्षातर्फे होण्याची शक्यताच संपली होती. एवढेच नव्हे तर, काँग्रेसवाला म्हणजे सदाचारी, सच्चरित्र व विश्वासार्ह व्यक्ती या लोकसमजाचेही पार उच्चाटन झाले होते.

तात्पर्य, श्रीमती गांधींच्या नेतृत्वाचा उदय झाला तेव्हा थोडयाफार प्रमाणात का होईना अस्तित्वात असलेली पक्षयंत्रणा त्यांनी विशिष्ट हेतूंनी मुद्दामहून मोडीत काढली. पक्षनिष्ठेच्या जागी व्यक्तिनिष्ठेला प्रोत्साहन दिले. पक्षसंविधानाने मुक्रर केलेल्या औपचारिक, रचनाबद्ध यंत्रणा निष्प्रभ करून टाकल्या, पक्षांतर्गत लोकशाही गाडून सत्तेचे अमर्याद केंद्रीकरण केले, तत्त्वशून्य संधिसाधूंचा विधिनिषेधशून्य मेळावा असे स्वरूप पक्षाला त्यांच्या कारकीर्दीत आले. आपल्याशी व आपल्या कुटुंबियांशी एकनिष्ठ राहतील त्यांच्यावरच त्या भिस्त ठेवीत असल्यामुळे नेतृत्वाच्या मधल्या फळया त्यांनी निकालात काढल्या, पक्षयंत्रणा फक्त कागदोपत्री ठेवली. सर्व पदाधिकारी आपल्या मर्जीने नामनिर्देशित केले. या प्रक्रियेत स्वाभाविकच हा पक्ष जनजीवनापासून दुरावला. तत्त्वनिष्ठ पण स्वतंत्र बाण्याची माणसे खडयांसारखी पक्षातून वगळली गेली.

परिणाम असा झाला की, ज्यांच्या ठायी थोडा-फारही प्रशासकीय व राजकीय गुणवत्ता व अनुभव आहे ते या पक्षात सत्तेच्या व जबाबदारीच्या स्थानांच्या जवळपासही नाहीत आणि जे त्या पदां-वर आहेत ते कुशाग्र बुद्धिमत्ता, अर्हता व अनुभव या गुणांना पारखे झालेले आहेत.

⊙ ⊙ ⊙

अनुक्रमणिका

भारतीय काँग्रेस : इंदिरा कालखंड

वि. मा. बाचल

१९६७ च्या निवडणुका या श्रीमती इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखालील पहिल्या सार्वत्रिक निवडणुका होत्या. विशेष म्हणजे या निवडणुका म्हणजे स्वतंत्र भारताच्या पक्षीय राजकारणातील पहिला भूकंप होता. लोकसभेत काँग्रेसला केवळ २८० म्हणजे ५४% जागा मिळाल्या आणि कसेबसे आपले सरकार बनविता आले. घटक राज्यांतही काँग्रेसची मोठी वाताहत झाली. आंध्र, आसाम, महाराष्ट्र, मध्यप्रदेश, हिमाचल प्रदेश, हरियाना या राज्यांत आणि काही संघीय प्रदेशांत काँग्रेसला निर्विवाद बहुमत मिळाले. जवळजवळ निम्म्या घटक राज्यांत काँग्रेसचा मोठा पराभव होऊन तेथे काँग्रेस-विरोधी पक्ष अधिकारावर आले. काँग्रेसच्या मक्तेदारीविरुद्ध हा मतदारांचा पहिला कौल होता. काँग्रेसच्या खालोखाल स्वतंत्र पक्षास स्थान मिळाले. ८·५९% मतांच्या जोरावर या पक्षाने लोकसभेत ४४ जागा जिंकल्या. ९·३३% मतांच्या पाठिंब्यावर लोकसभेत जनसंघाने ३६ जागा मिळविल्या. सर्वसाधारणपणे या निवडणुकांत तथाकथित उजव्या पक्षांना अधिक जागा मिळाल्या, तरी मतदारांनी उजव्या विचारसरणीला प्राधान्य दिले असा मात्र याचा अर्थ नाही. आचार्य कृपलानी यांनी म्हटल्याप्रमाणे "पाश्चात्त्य उदारमतवादी अथवा सर्वंकष राष्ट्रांमध्ये 'डाव्या' आणि 'उजव्या' विचारसरणींना जो विशेष अर्थ प्राप्त झाला आहे, तो भारताच्या संदर्भात मात्र लागू नाही." या निवडणुकांचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्टय म्हणजे काँग्रेसमधून फुटून निघालेल्या बंडखोरांनी वेगवेगळ्या नावांखाली निवडणुका लढवून स्पृहणीय यशही मिळविले. द्र. मु. क., अकाली दल यांसारख्या प्रादेशिक पक्षांचे महत्त्व वाढले.

इंडिकेट काँग्रेसची स्थापना

स्वातंत्र्योत्तर काळात काँग्रेसचा प्रथमच एवढा मोठा पराभव झाला. पंडित जवाहरलाल नेहरूंसारखे उत्तुंग व्यक्तिमत्त्व अस्तंगत झालेले असल्याने काँग्रेसमधील गट परस्परांवर पराभवाचे खापर फोडू लागले. काँग्रेसमधील वयोवृद्ध नेते— पक्षाचे अध्यक्ष निजलिंगप्पा, त्यांचे सहकारी मोरारजी देसाई, स. का. पाटील, संजीव रेड्डी इत्यादी ज्येष्ठ नेते एका बाजूस आणि काँग्रेसच्या संसदीय गटाच्या नेत्या इंदिरा गांधी आणि त्यांचे पाठीराखे तरुण तुर्क— मोहन धारिया, चंद्रशेखर, शशिभूषण इत्यादी— दुसऱ्या बाजूस असा संघर्ष सुरू झाला. दोन्ही गट पक्षयंत्रणेवर आपले प्रभुत्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करू लागले.

१९६९ च्या मध्यात राष्ट्रपती झाकीर हुसेन यांच्या अकल्पित निधनानंतर राष्ट्रपतींच्या आगामी निवडणुकीसाठी आपला उमेदवार निश्चित करणे, काँग्रेसची प्रतिमा उजळ करण्यासाठी कार्यक्रम आखणे इत्यादी प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी बंगलोर येथे काँग्रेसचे ऐतिहासिक अधिवेशन भरले. इंदिरा गांधींनी बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचा पुरस्कार केला, तर मोरारजींनी 'सामाजिक नियंत्रणांचा' आग्रह धरला. काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांच्या 'सिंडिकेट' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या गटाने राष्ट्रपतिपदासाठी संजीव रेड्डींच्या नावाला पाठिंबा दिला, तर इंदिरा गांधींना हे नाव पसंत नव्हते. या वादाचे स्वरूप राजकीय होते. मूळ वाद राष्ट्रपतिपदासाठी काँग्रेसचा उमेदवार पंतप्रधानांच्या म्हणण्याप्रमाणे निवडावा की इतर काँग्रेस श्रेष्ठींच्या पसंतीचा असावा हाच होता.

इंदिरा गांधींनी राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत उघडपणे व्ही. व्ही. गिरींना पाठिंबा दिला, तर काँग्रेसच्या अधिकृत उमेदवाराला पुरेसा पाठिंबा मिळतो की नाही याबद्दल साशंक झालेल्या काँग्रेस अध्यक्षांनी स्वतंत्र आणि जनसंघ नेत्यांची चाचपणी केली. यावर सिंडिकेट गटाने संमिश्र सरकार बनविण्याची खटपट चालविली आहे असा आक्षेप

अनुक्रमणिका

घेऊन काँग्रेसमधील काही गटांनी मतस्वातंत्र्याची मागणी केली. शेवटी इंदिरा गांधींच्या पाठिंब्याने गिरी निवडून आले. इंदिरा गांधींचा हा पहिला महत्त्वाचा राजकीय विजय होता.

१२ नोव्हेंबर १९६९ रोजी काँग्रेसच्या वर्किंग कमिटीने पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधींनी पक्षाच्या अधिकृत उमेदवाराविरुद्ध प्रचार करून पक्षशिस्त मोडली, हे निमित्त करून त्यांची काँग्रेस पक्षातून हकालपट्टी केली. तांत्रिक दृष्टीने पाहता श्रेष्ठींचा हा निर्णय नियमबाह्य नव्हता. इंदिरा गांधींच्या पाठीराख्यांनी मात्र या निर्णयास आव्हान दिले. आपला गट हाच खरा काँग्रेस पक्ष आहे, श्रेष्ठींना जनमताची नाडी समजली नाही, अशी भूमिका घेतली. दोन्ही गटांनी आपापले सामर्थ्य जोखले. परिणामी काँग्रेसमध्ये फूट पडली, काँग्रेसच्या संसदीय पक्षांतही फूट पडली, लोकसभेतील काँग्रेसच्या २१० सभासदांनी इंदिरा गांधींच्या नेतृत्वास पाठिंबा दिला. त्यांच्या नेतृत्वामुळे या गटास 'इंडिकेट काँग्रेस' हे टोपण नाव मिळाले, तर संघटनेतील वरिष्ठ नेत्यांच्या तथाकथित 'दादागिरी'मुळे त्या गटास 'सिंडिकेट काँग्रेस' हे टोपण नाव मिळाले. इंदिरा गांधी सत्तारूढ असल्याने त्यांच्या गटास 'सत्तारूढ काँग्रेस' तर श्रेष्ठींचा प्रभाव पक्षाच्या संघटनेवर असल्याने त्या गटास 'संघटनात्मक काँग्रेस' हे नाव मिळाले. पक्षफुटीमुळे इंदिरा गांधींच्या पाठीमागे संसदेत निर्विवाद बहुमत राहिले नाही आणि त्यांनी भारतीय कम्युनिस्ट पक्ष, द्र. मु. क., अकाली दल, काही समाजवादी यांच्या साहाय्याने कसेबसे सरकार चालविले.

वडी आघाडी

१९६९ मध्ये इंदिरा गांधींनी दोन महत्त्वाचे निर्णय घेतले होते. बँकांचे राष्ट्रीयीकरण आणि संस्थानिकांची तनखेबंदी हे ते निर्णय होत. बहुजन समाजाच्या हितासाठी घेतलेले समाजवादी निर्णय अशी प्रतिमा निर्माण झाल्याने इंदिरा गांधींना लोकमत अनुकूल होऊ लागले. पोटनिवडणुकांमध्ये हे स्पष्ट झाले. अशा परिस्थितीत फुटकळ गटांच्या पाठिंब्यावर सरकार चालविण्याची तारेवरची कसरत करण्यापेक्षा अनुकूल लोकमताचा फायदा घेऊन, 'कौल' अजमावण्याचे ठरवून, १९७० च्या अखेरीस इंदिरा गांधींनी लोकसभा बरखास्त केली आणि मुदतपूर्व निवडणुका जाहीर केल्या. इंदिरा गांधींच्या पाठिंब्यावरच गिरी राष्ट्रपती झाले असल्याने त्यांच्याकडून काही खळखळ होण्याची अपेक्षा नव्हती. काँग्रेसमधील दोन्ही गट आपलीच काँग्रेस खरी असे म्हणत जनमताचा कौल घेण्यास सरसावले. सत्तारूढ काँग्रेसला शह देण्यासाठी संघटना काँग्रेसने पुढाकार घेऊन स्वतंत्र, जनसंघ आणि संयुक्त समाजवादी यांच्याबरोबर वडी आघाडी (Grand Alliance) स्थापन केली तर या आघाडीस प्रत्युत्तर देण्यासाठी इंदिरा गटाने कम्युनिस्ट, द्र. मु. क., मुस्लिम लीग आणि इतर लहान गटांबरोबर निवडणूक समझौता केला.

काँग्रेसमधील वारसाहक्काचे भांडण हे वड्या आघाडीच्या बनावामागील मूळ कारण होते. काँग्रेसमधील दोन गट परस्परांविरुद्ध उभे ठाकले. काँग्रेसमध्ये एकत्र असताना जे जमले नाही, ते आघाडीमार्फत करविण्यासाठी 'इंदिरा हटाव, देश बचाव' ही घोषणा सिंडिकेटने स्वीकारली. १९६७ च्या निवडणुकांनंतर काँग्रेसमधील श्रेष्ठींनी स्वतंत्र पक्षाशी धागा जुळविला होता. काँग्रेसमधील काही ज्येष्ठांनी स्वतंत्र पक्षाच्या स्थापनेमध्ये भाग घेतला असल्याने हे शक्य झाले होते. काँग्रेस पक्ष फुटण्यापूर्वीच सिंडिकेटच्या काही नेत्यांनी जनसंघाची महत्त्वाकांक्षा आणि मनुष्यबळ वापरण्याचा बेत केला असण्याची शक्यता आहे. जनसंघाची प्रकृती पाहता सिंडिकेटचे किंवा स्वतंत्र पक्षाचे विशेष प्रेम असण्याचे कारण नव्हते. लोकसभेतील आपले आसन बळकट करण्याचे आणि पक्षाचे कार्य देशभर पसरविण्याचे उद्दिष्ट गाठण्यासाठी वड्या आघाडीचा जास्तीतजास्त उपयोग करणे हा जनसंघाचा व्यावहारिक हिशेब होता. पक्षीय राजकारणाच्या चौकटीत ते गैर वाटण्याचे कारणही नव्हते. स्वतःला डॉ. लोहियांचे वैचारिक आणि संघटनात्मक वारसदार मानणाऱ्या समाजवाद्यांना सिंडिकेटचे किंवा स्वतंत्रांचे आर्थिक धोरण पसंत असण्याची शक्यता नव्हती. यामुळे इंदिराविरोध हे वड्या आघाडीचे मुख्य सूत्र होते, वैचारिक एकात्मतेतून निर्माण होणारा पक्ष असे स्वरूप मुळीच नव्हते. उलटपक्षी, इंदिरा हटावच्या आघाडीच्या 'एककलमी कार्यक्रमास' समर्थपणे

तोंड देता यावे यासाठी इंडिकेट काँग्रेसनेही मुस्लिम अनुनयास सुरुवात केली. बडी आघाडी विरुद्ध इंडिकेट काँग्रेस आघाडी यांच्यातील संघर्ष हा वैचारिक–तात्त्विक संघर्षापेक्षा सत्तेसाठी झालेला संघर्ष होता.

१९७१ च्या लोकसभा निवडणुकांत कोणत्याही पक्षाने सर्वच्या सर्व (५१८) जागा लढविल्या नाहीत. सत्तारूढ इंदिरा गटाने जास्तीतजास्त (४४१) जागा लढविल्या. या निवडणुकीच्या निकालांनी पुनश्च आश्चर्याचे धक्के दिले. इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखालील काँग्रेस पक्षाने घवघवीत यश मिळवून ३५० (जवळजवळ ६७%) जागा जिंकल्या व केंद्रात पुनश्च दृढ शासन स्थापन केले. या निवडणुकीत बडया आघाडीचे स. का. पाटील, अशोक मेहता, चरणसिंग, मिनू मसानी, मधू लिमये, फर्नांडिस इत्यादी मान्यवर नेते आणि मातब्बर उद्योगपती पराभूत झाले. या निवडणुकांचे वैशिष्टय हे की, निकालांवरून इंदिरा गटाची काँग्रेस हीच खरी काँग्रेस हा स्पष्ट कौल मिळाला. या यशात सिंहाचा वाटा स्वतः इंदिरा गांधींचा होता. सिंडिकेटच्या नेतृत्वाखाली एकत्र आलेल्या आघाडीला ६० जागाही जिंकता आल्या नाहीत.

घटक राज्यांतील संविद् सरकारे

१९६७ च्या निवडणुकांत जवळजवळ निम्म्या घटकराज्यांत काँग्रेसचा मोठा पराभव झाला, याचा मागे उल्लेख केला आहे. यांतील बहुतेक राज्ये उत्तर भारतातील होती. तेथे काँग्रेसच्या विरोधातील अकाली, जनसंघ, स्वतंत्र, समाजवादी आणि बंडखोर काँग्रेस जनांनी हातमिळवणी करून 'संयुक्त विधायक दले' स्थापून बहुमत मिळविले आणि आपली सरकारे स्थापन केली. संविद सरकारांमध्ये वैचारिक अथवा संघटनात्मक एकात्मता साधू शकली नाही. सत्तेसाठी एकत्र आलेले गट परस्परांवर कुरघोडी करू लागले आणि केवळ २/३ वर्षांच्या अवधीत ही संविद सरकारे कोसळली. हरियाना (राव वीरेन्द्र सिंग), पश्चिम बंगाल (अजोय मुखर्जी), बिहार (भोला पास्वान शास्त्री) इत्यादींची सरकारे पक्षांतरामुळे कोसळली आणि तेथे राष्ट्रपती-राजवट लागू करण्यात आली. या घटनांमुळे काँग्रेसविरोधकांचे दौर्बल्य प्रकर्षाने सिद्ध झाले. १९७१ च्या सुरुवातीस इंदिरा गटाने लोकसभा निवडणुकांत मिळविलेल्या यशामुळे घटक राज्यांच्या राजकारणावरही त्याचा परिणाम झाल्यावाचून राहिला नाही.

दुसरे असे की, १९७१ च्या अखेरीस बांगला देशाच्या संदर्भातील पाकिस्तानबरोबरील युद्धात नेत्रदीपक यश मिळाल्याने सत्तारूढ इंदिरा काँग्रेसची प्रतिमा आणखी उजळली. बांगलादेशची निर्मिती हा इंदिरा गांधींच्या वैयक्तिक राजनीतीच्या यशातील शिरपेच होता. जगाच्या राजकारणात इंदिरा गांधींच्या नेतृत्वाने भारताला विशिष्ट स्थान प्राप्त झाले. एकप्रकारे १९६२ च्या चीनबरोबरील युद्धात झालेली भारताची मानहानी या विजयाने भरून निघाली. या पार्श्वभूमीवर १९७२ मध्ये राज्यांतील विधानसभांच्या निवडणुका झाल्या. केंद्रातील शासनाला आपली धोरणे योग्य प्रकारे राबविता यावीत व स्थिर-शासन लाभावे म्हणून घटक राज्यांतही आम्हाला निवडून द्या या इंदिरा काँग्रेसच्या आवाहनाला अनुकूल प्रतिसाद मिळाला आणि तामीळनाडू वगळता सर्व घटक राज्यांत केंद्रात सत्तारूढ असलेल्या इंदिरा गटाची सरकारे अधिकारावर आली. संपूर्ण देशात १९६७ पूर्वीसारखी काँग्रेसची प्रबळ पकड पुन्हा प्रस्थापित झाली. तसेच इंदिरा-काँग्रेस हीच खरी काँग्रेस हा जनमताचा कौल आणखी दृढ रीतीने व्यक्त झाला.

लोकसभेच्या मुदतपूर्व निवडणुकांप्रमाणेच राज्यांतील विधानसभांच्या काँग्रेसच्या दिग्विजयाचे श्रेयही पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधींच्या नेतृत्वाला आणि कर्तृत्वाला द्यावे लागले. लोकसभेच्या निवडणूक निकालांनी अनेकांचा अपेक्षाभंग झाला व कित्येकांना आश्चर्याचा धक्का बसला होता; पण कोणताच विरोधी पक्ष त्यापासून धडा घेऊ शकला नाही. "लोकसभेच्या निवडणुकीच्या वेळी काहीही घडलेले असो, विधानसभांच्या निवडणुकीत तसे काही घडणार नाही; कारण येथे स्थानिक प्रश्नांचा मुद्दा आहे; अशा सुखस्वप्नात विरोधी पक्ष होते; पण त्या सर्वांचाच पूर्ण भ्रमनिरास झाला. सारे विरोधी पक्ष पराभूत झाले. लोकसभेच्या निवडणुकीच्या वेळी अपयशाचे खापर बडया आघाडीवर तरी फोडता आले; पण या वेळी ती संधीही विरोधी पक्षांना लाभू शकली नाही."

अनुक्रमणिका

शांततेसाठी अणुस्फोट

प्रचंड बहुमताच्या आधारावर १९७२ मध्ये संपूर्ण देशात आपले शासन प्रस्थापित केल्यानंतर दुसऱ्याच वर्षी, १९७३ मध्ये इंदिरा गांधींनी पोखरण येथे 'भारताने शांततेसाठी अणुस्फोटाची यशस्वी चाचणी केल्याचे' जाहीर केले. भारताने अणुविज्ञान जाणू शकणाऱ्या जगातील पहिल्या सहा राष्ट्रांत प्रवेश केला. यामुळे एका बाजूला भारताची आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा वाढली, तर दुसरीकडे अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रांतील यशामुळे इंदिरा गांधींची पावले हळूहळू एकाधिकारशाहीकडे वळू लागली. जयप्रकाशजींच्या नेतृत्वाखाली गुजराथ-बिहारमध्ये आंदोलन उभे राहिले. अलाहाबाद हायकोर्टाचा निर्णय इंदिरा गांधींच्या निवडणुकी-विरुद्ध गेला. विरोधकांच्या आंदोलनाला प्रत्युत्तर म्हणून १९७५ च्या मध्यात अंतर्गत सुरक्षिततेच्या नावाखाली राष्ट्रीय आणीबाणी पुकारण्यात आली.

राष्ट्रीय आणीबाणी आणि ४२वी घटनादुरुस्ती

आणीबाणीच्या काळाचे मूल्यमापन परस्पर-विरोधी स्वरूपाचे आहे. काँग्रेसच्या मते, "लोकशाहीची घसरलेली गाडी रुळावर आणण्यासाठी आणीबाणी जाहीर करण्यात आली आणि आणीबाणीच्या काळात देशात समर्थ शासन उभे राहिले, औद्योगिक आणि शैक्षणिक क्षेत्रांत शिस्त नांदली. उत्पादनात मोठ्या प्रमाणावर वाढ झाली. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत रुपयाची किंमत वाढली, काळाबाजारवाले आणि स्मगलर्स यांच्याविरुद्ध कठोर कारवाई करणे शक्य होऊन देशाची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत झाली." याच्या उलट, काँग्रेसविरोधकांच्या मते "तथाकथित अंतर्गत आणीबाणी जाहीर केल्यानंतर या देशातील जनतेला मानभंगाच्या अवस्थेतून जावे लागले. अनेकांना स्थानबद्ध करण्यात आले. कायद्याचे राज्य नष्ट झाले. हेविअस कॉर्पसचा हक्क काढून घेण्यात आला. न्यायाची आणि न्यायालयांची अप्रतिष्ठा झाली, नागरिकांचे हक्क नष्ट झाले. वृत्तपत्रांची गळचेपी झाली, संतुलनाच्या यंत्रणा सत्तारूढ पक्षाने स्वतःच्या हितासाठी वापरल्या, कामगारांचे हक्क काढून घेण्यात आले, आर्थिक प्रगतीची दिशाभूल करणारी आकडेवारी देण्यात आली, भ्रष्टाचार फोफावला इ."

आणीबाणीच्या काळात, १ सप्टेंबर १९७६ रोजी संसदेमध्ये ४२ व्या घटनादुरुस्तीचे विधेयक सादर करण्यात आले. सत्तारूढ काँग्रेसतर्फे "सामाजिक–आर्थिक क्रांती घडवून आणण्यात जे घटनात्मक अडथळे येत आहेत ते दूर करण्यासाठी घटनादुरुस्ती करण्यात येत आहे", अशी भूमिका घेण्यात आली. वास्तवात या दुरुस्तीने घटनेतील सत्तासमतोलात अत्यंत मूलगामी बदल केला. घटनेची चौकटच बदलण्यात आली. केंद्र–घटकराज्य संदर्भात केंद्रसत्ता प्रबळ करण्यात आली. केंद्र–शासनात न्यायालयांची सत्ता सीमित करून संसद सार्वभौम बनविली, प्रत्यक्ष व्यवहारात कार्यकारी शासन प्रबळ बनले. त्यातही कार्यकारी शासनात राष्ट्रपतींची सत्ता नाममात्र ठरविण्यात आल्याने मंत्रिमंडळाची सत्ता प्रबळ झाली. पंतप्रधानांना दुरुस्तीमुळे विशेष संरक्षण दिल्याने पंतप्रधानांचे स्थान 'न भूतो' निरंकुश बनले.

विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे घटना दुरुस्तीची, अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया आणीबाणीच्या काळात पार पाडण्यात आली. या काळात विरोधी पक्षांचे अनेक प्रमुख नेते तुरुंगात होते. आणीबाणीच्या निर्बंधामुळे विवेकी चर्चेस आवश्यक असे मुक्त आणि निर्भय वातावरण नव्हते. त्यामुळे दुरुस्तीविधेयकावर खरीखुरी चर्चा होऊ शकली नाही. न्यायालयांच्या अधिकारावर बंधने आल्याने व्यक्तिस्वातंत्र्याचे रक्षण होऊ शकले नाही आणि योग्य, न्याय्य विरोध व्यक्त झाला नाही. ज्या निर्भय आणि मुक्त वातावरणात भारताच्या घटनासमितीने अतिशय सविस्तर, समग्र आणि खोलवर विचार करून घटना बनविली, त्याविरुद्ध आणीबाणीच्या कोंदलेल्या वातावरणात घाईघाईने ती मूलतः बदलण्यात आली.

१९७७ चे निवडणूकपर्व : जनता पक्षाची स्थापना

१८ जानेवारी १९७७ रोजी लोकसभेच्या निवडणुकांसंबंधी इंदिरा गांधींनी घोषणा केली. या घोषणेनंतर चारच दिवसांनी जनसंघ, संघटना काँग्रेस, समाजवादी आणि भारतीय लोकदल (यात स्वतंत्र पक्ष पूर्वीच समाविष्ट झाला होता.) या चार पक्षांनी एकत्र येऊन नवा 'जनता पक्ष' स्थापन

केला. तुरुंगात असलेल्या विविध पक्षांच्या नेत्यांनी यासंबंधीची मानसिक पार्श्वभूमी तयार केली होतीच. विरोधी पक्ष झटपट एकत्र येतील याची काँग्रेस नेत्यांना कल्पना नव्हती. किंबहुना सर्व विरोधी पक्ष एकत्र येऊन आंदोलन उभारण्याच्या तयारीत असतानाच आणीबाणीची घोषणा होऊन विरोधी पक्षनेत्यांना अटकेत टाकण्यात आले होते. आणीबाणीच्या काळातील घटनांनी, देशातील परिस्थितीने स्थानबद्ध नेत्यांना आत्मपरीक्षणास प्रवृत्त केले. सत्तारूढ काँग्रेसला प्रभावीपणे तोंड देण्यासाठी काँग्रेसइतकाच तुल्यबळ पक्ष उभा राहिल्याशिवाय गत्यंतर नाही याची विरोधी पक्षांना जाणीव झाली. जनता पक्षाचा जन्म ही एक राजकीय अपरिहार्यता होती, आणि आणीबाणीने एक प्रकारे या प्रक्रियेला चालनाच दिली.

२ फेब्रुवारी १९७७ रोजी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाबू जगजीवनराम, बहुगुणा, नंदिनी सत्पथी, गणेश इत्यादी नेत्यांनी पक्षाचा राजीनामा देऊन लोकशाहीवादी काँग्रेस (Congress for Democracy) पक्षाची स्थापना केली. या घटनेचे जनता पक्षाने स्वागत केले. जनता पक्ष आणि लोकशाही काँग्रेस यांनी संघटितरीत्या काँग्रेस पक्षाशी निवडणुकांत सामना द्यावयाचे ठरले. तसेच अकाली दल, मार्क्सवादी कम्युनिस्ट, शेतकरी कामगार पक्ष, द्र. मु. क. यांच्याशी निवडणूक समझौते करून संघटित विरोधी आघाडी उभारली.

काँग्रेस पक्षाने निवडणुकीमध्ये आणीबाणीचे समर्थन करणारी बचावात्मक भूमिका घेतली, तर जनता पक्षाने आपल्या जाहीरनाम्यात म्हटल्याप्रमाणे– "जनतेपुढे दोन स्पष्ट पर्याय आहेत– स्वातंत्र्य आणि गुलामी, लोकशाही आणि हुकूमशाही, जनशक्ती झुगारणे आणि जनशक्ती मानणे, गांधीवादी मार्ग आणि अनेक देशांना हुकूमशाही, लष्करी धाकदपटशा आणि राष्ट्रविनाश यांच्या गर्तेत लोटणारा मार्ग या दोन्हींतले काय हवे हे जनतेने ठरवावयाचे आहे."

आपल्या निवडणूक-जाहीरनाम्यामध्ये जनता पक्षाने लोकशाहीच्या पुनःस्थापनेचे निखळ आश्वासन दिले.

१९७७ : निवडणूक निकालांचा भूकंप

१९७७ च्या निवडणुकांनी महाभारत घडले. मतपेटीने जणू भूकंप घडविला. सत्तारूढ काँग्रेसचा बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या उत्तरेकडील नऊ प्रांतांत काँग्रेसचा पूर्ण पराभव झाला. या प्रांतांत इंदिरा काँग्रेसला एकही जागा जिंकता आली नाही. काँग्रेसचे मातबर मंत्री प्रचंड मतांनी पराभूत झाले. यांत स्वत: पंतप्रधान इंदिरा गांधी, संरक्षणमंत्री बन्सीलाल, घटनादुरुस्तीसाठी नेमलेल्या समितीचे अध्यक्ष सरदार स्वर्णसिंग, काँग्रेसचे माजी अध्यक्ष शंकर दयाळ शर्मा, माजी सभापती गुरुदयाळ धिल्लाँ, ४२ व्या घटनादुरुस्तीचे मुख्य प्रवर्तक कायदामंत्री हरिभाऊ गोखले, बॅ. विठ्ठलराव गाडगीळ इत्यादींचा समावेश होता. आणीबाणीच्या काळात कोणतेही शासकीय स्थान नसतानाही कारभारात प्रचंड दबाव आणणारे युवक काँग्रेसचे नेते श्री. संजय गांधी यांचाही पराभव झाला. नव्याने जन्मलेल्या जनता पक्षास लोकसभेत स्पष्ट बहुमत प्राप्त झाले. दक्षिणेकडील कर्नाटक, आन्ध्र, केरळ, तामीळनाडू या राज्यांत मात्र काँग्रेस विजयी झाली. काँग्रेसला मिळालेल्या एकंदर १५३ जागांपैकी १०१ म्हणजे $\frac{2}{3}$ जागा या चार राज्यांत मिळाल्या. काँग्रेसशी सहकार्य करणाऱ्या पक्षांनाही दक्षिणेत यश मिळाले. स्वातंत्र्यानंतरच्या काळात प्रथमच काँग्रेसेतर पक्ष केंद्रात स्पष्ट बहुमताच्या जोरावर अधिकारावर आला.

देशात सरासरी ६०.५४ टक्के मतदान झाले. जनता पक्ष आणि लोकशाहीवादी काँग्रेस यांच्या आघाडीने ४३.१७ टक्के, तर इंदिरा गांधींच्या सत्तारूढ काँग्रेसने ३४.५४ टक्के मते मिळविली. काँग्रेसची दहा टक्के मते घटली. दक्षिणेकडील राज्यांत काँग्रेसला ४१.३७ टक्के, तर जनता–लोकशाही काँग्रेस आघाडीला २४ टक्के मते मिळाली. उत्तरेकडील सात राज्यांत जनता आघाडीला ५० टक्क्यांहून अधिक मते मिळाली.

निवडणुकांच्या निकालाचे स्वरूप पाहता ही केवळ नेहमीप्रमाणे निवडणूक नव्हती, हे एक सार्वमत होते. अंतर्गत आणीबाणी आणि ४२ वी घटनादुरुस्ती यांविरुद्ध हा स्पष्ट कौल होता. आणीबाणीच्या काळातले जाचक निर्बंध, हजारो लोकांची

चौकशीविना स्थानबद्धता; अधिकाऱ्यांनी केलेले अतिरेक, वृत्तपत्रांवरील सेन्सॉरशिप, भाषण आणि विचारस्वातंत्र्याची गळचेपी यांबाबत जनतेने काँग्रेस-विरोधी कौल दिला. आणीबाणीच्या काळात लादलेल्या संसूचन साधनांवरील बंधनांमुळे सत्तारूढ काँग्रेसला आपल्याविरुद्ध धुमसत असलेला असंतोष समजूच शकला नाही. काँग्रेस राज्यकर्ते आणि नेते लोकांच्या भावना ओळखू शकले नाहीत. आणीबाणीच्या काळात संजय गांधींचे नेतृत्व देशावर लादण्याचा प्रयत्न झाला. संजय गांधी आणि त्यांचे साथीदार बन्सीलाल यांची दुष्कृत्ये, अल्पसंख्याकांवरील अत्याचार, नसबंदीच्या धोरणातील अतिरेक, संघटनेतील बेबंद दडपशाही यांमुळे काँग्रेसविरुद्ध वातावरण तयार झाले होते. मुक्त आणि निर्भय निवडणुकांत जनतेचा संताप व्यक्त झाला आणि एक शांततामय क्रांती करून जनतेने हुकूमशाही-विरुद्ध आपला कौल दिला. दक्षिणेकडील राज्यांत आणीबाणीच्या काळातील अतिरेक न झाल्याने काँग्रेसचा जय झाला.

"भारतातील निवडणुकांपासून साऱ्या जगाला प्रेरणा मिळावी. भारताने लोकशाहीचे खरे मूल्यमापन केले आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात स्वतंत्र, न्याय्य निवडणुकांत मतदान करून भारतातील लोकशाही खऱ्या अर्थाने परीक्षेला उतरली," अशा शब्दांत अमेरिकेचे राष्ट्रपती जिमी कार्टर यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली; तर "भारतातील सर्वसामान्य माणसाचा हा जय असून या निकालाचे आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत कौतुक झाले पाहिजे. सामान्य माणसाने हुकूमशाहीपुढे मान तुकविण्यास नकार दिला आहे," अशा शब्दांत ऑस्ट्रेलियन दैनिकांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली. भारताची निवडणूकयंत्रणा ही किती निस्पृहपणे कार्य करू शकते हेही या निवडणुकीने सिद्ध झाले.

मार्च १९७७ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचा संपूर्ण पाडाव झाल्यामुळे अभूतपूर्व राजकीय परिस्थिती निर्माण झाली.

पंजाब, हरियाना, हिमाचलप्रदेश, उत्तरप्रदेश व बिहार या राज्यांत काँग्रेसला एकही जागा मिळाली नाही, राजस्थानात २५ पैकी १, मध्यप्रदेशात ४० पैकी १, पश्चिम बंगालमध्ये ४२ पैकी ३, तर ओरिसात २१ पैकी ४ अशा जागा काँग्रेसला मिळाल्या. हे लक्षात घेता "या राज्यांच्या विधानसभा व मंत्रिमंडळे जनमताचे प्रतिनिधित्व करतात असे मानता येणार नाही" अशी भूमिका घेऊन जनता सरकारच्या सल्ल्यावरून राष्ट्रपतींनी ३० एप्रिल १९७७ रोजी वर उल्लेखिलेल्या नऊ राज्यांच्या विधानसभा विसर्जित करून तेथे राष्ट्रपती-राजवट लागू केली. भारतीय गणराज्याच्या इतिहासात एकाच वेळी नऊ राज्यांत राष्ट्रपती-राजवट लादण्याचा हा पहिला प्रसंग होय. या निर्णयावर काँग्रेसने विरोध नोंदविला; परंतु मे १९७७ मध्ये या सर्व विधानसभांच्या निवडणुका घेण्यात आल्या, त्यांत सर्व राज्यांमध्ये काँग्रेसचा प्रचंड पराभव झाला. अशा प्रकारे जवळजवळ संपूर्ण उत्तरभारतात जनता पक्षाचे प्रभुत्व प्रस्थापित झाले.

अशा प्रकारे स्वातंत्र्यानंतर प्रथमच काँग्रेसला प्रबळ विरोध करू शकणारा पक्ष निर्माण झाला. निवडणुकांपूर्वी सुरू झालेली ध्रुवीकरणाची प्रक्रिया नंतर पुढे चालूच राहिली. ६ मे १९७७ रोजी जनतापक्षातील घटकपक्षांनी तसेच लोकशाहीवादी काँग्रेसने जनता पक्षात पूर्णपणे विलीन होण्याचा निर्णय घेतला. पक्षाची नवी घटना आणि नवी रचना करण्याची प्रक्रिया सुरू झाली. देशात द्विपक्ष-पद्धतीवर आधारलेली संसदीय शासनपद्धती रूढ होण्याची लक्षणे दिसू लागली.

जनता पक्षाची राजवट

आणीबाणीच्या काळातील परिस्थितीचा रेटाच एवढा प्रचंड होता की, एकसंध पक्षनिर्मितीच्या पूर्व-तयारीसाठी आवश्यक असणारी सर्व परिस्थिती नसतानाही सर्व काँग्रेसविरोधक एकत्र आले. आणीबाणीविरुद्धच्या लोकक्षोभाचा त्यांना लाभ झाला आणि जनता पक्षाचा उद्देश अपेक्षेपेक्षाही अधिक सफल झाला.

अधिकारावर आल्यावर जनता पक्षाने आपल्या जाहीरनाम्यास अनुसरून अनेक चांगल्या गोष्टी केल्या. विशेषतः लोकशाही संस्था आणि परंपरा दृढ करण्यासाठी व पूर्वीच्या राजवटीचे अतिरेकी निर्णय रद्द करण्यासाठी कौतुकास्पद पावले टाकली. मात्र पक्षबांधणी व पक्षशिस्त यांकडे सुरुवातीपासूनच

द्यावे तितके लक्ष दिले गेले नाही. वास्तविक वर्षानुवर्षे स्वतंत्रपणे कार्य केलेल्या, वैचारिक एकवाक्यता नसलेल्या व संघटनात्मक एकसंधता नसलेल्या पक्षांनी एकत्र येऊन एक ऐतिहासिक कार्य पार पाडण्याची जबाबदारी अंगावर घेतल्यानंतर नव्या पक्षाच्या उभारणीकडे लक्ष केंद्रित करावयास हवे होते. प्रत्यक्षात तसे घडले नाही. घटक पक्षांतील आर्थिक धोरणाच्या सामंजस्याच्या अभावामुळे आर्थिक, सामाजिक पातळीवर जनता पक्षाला म्हणावेसे यश लाभले नाही.

जनता पक्षाच्या कारभाराच्या सुरुवातीपासून अंतर्गत संघर्ष सुरू झाले. या संघर्षाची एक बाजू नेतृत्वसंघर्षाची होती. राजकीयदृष्टचा सर्वोच्च महत्त्वाचे पंतप्रधानपद हे नेतृत्वसंघर्षाचे मुख्य केंद्र बनले. मोरारजी देसाई, जगजीवनराम आणि चरणसिंग या जनता पक्षातील नेत्यांचे संघर्ष या केंद्राभोवती घडले.

पंतप्रधानपदाचे इच्छुक श्री. चौधरी चरणसिंग यांनी दबावाचे राजकारण खेळण्यास सुरुवात केली. यातून ‘ चरणसिंगाच्या राजीनाम्याचे नाटक ’ घडले. घटक पक्षांचा संघर्ष ही अधिक महत्त्वाची व अधिक दूरगामी परिणाम करणारी बाजू होती. घटक पक्ष आपली पूर्वाश्रमीची अस्मिता विसरले नाहीत. जुनी विचारसरणी, जुन्या निष्ठा, जुने लागेबांधे सर्वच घटक पक्षांच्या बाबतीत शिल्लक होते. घटक पक्षांचे बळ समान नसल्याने शह–काटशह यांचे राजकारण सातत्याने चालू राहिले.

जनता पक्ष की आघाडी

सत्तेवर येऊन जनता पक्ष, पक्ष म्हणून राहू शकला नाही, विकसित होऊ शकला नाही. घटक पक्षांची आघाडी असेच त्याचे स्वरूप राहिले.

जनता पक्षात जनसंघाचे प्राबल्य होते. युतीच्या राजकारणात मुरब्बी असलेल्या चरणसिंगांनी जनता-पक्षांतर्गत जनसंघ–भालोद युती उभारली. हरियाना, उत्तरप्रदेश, बिहार या राज्यांत भालोदचे आणि त्याच्या मोबदल्यात मध्यप्रदेश, राजस्थान, हिमाचल प्रदेश या राज्यांत जनसंघाचे मंत्रिमंडळ अधिकारावर आणले. पूर्वाश्रमींच्या काँग्रेस समाजवाद्यांना दुर्बळ करून जनता पक्ष पूर्णतः कह्यात आणावयाचा हा जनसंघ-भालोद युतीचा उद्देश होता. या युतीमुळे पक्षांतर्गत एकात्मतेच्या प्रक्रियेऐवजी विघटनाच्या प्रक्रियेस जोर चढला. ही युती आपणास लाभदायी ठरणार नाही याची जनसंघाला थोडी उशीरा जाणीव झाली आणि जाणीव झाली तेव्हा बाण हातातून सुटला होता. (जनसंघाचा उपयोग व्यक्तिगत महत्वाकांक्षेपोटी चरणसिंगांकडून केला जात आहे ही ती जाणीव होय.) या अंतर्गत तणावांमधून १९७८ सालच्या मध्यात जनता पक्षापुढे फुटीचे संकट उभे राहिले.

जनता पक्षाचे विघटन

चरणसिंग–मोरारजी यांच्या द्वंद्वाने जनता पक्षाच्या विघटनाची नांदी झाली. भालोद–जनसंघ यांच्या परस्पर शह-काटशह देण्याच्या प्रयत्नांतून उत्तर प्रदेश, बिहार आणि हरयाना या राज्यांतील परस्परांची मंत्रिमंडळे पाडण्यात आली. या पडझडीचे सूत्रधार होते दबावाच्या राजकारणाचे सूत्रधार चरणसिंग आणि त्यांचे ‘ हनुमान ’ राजनारायण. जनसंघाच्या पाठिंब्यावर आपले पंतप्रधानपद टिकवू पाहणारे हटवादी मोरारजी आपल्या परीने या पडझडीत हातभार लावीत होते. देवीलाल यांना पदच्युत करण्याचे प्रयत्न आणि राजनारायण यांच्यावरील शिस्तभंगाची कारवाई हे विघटनाच्या प्रक्रियेला वेग आणणारे आघात ठरले,

इकडे जनता पक्षातील तणाव वाढत असताना इंदिरा गांधींच्या काँग्रेस पक्षातही तणाव वाढत होते. एकीकडे ‘ इंदिराकृत एकाधिकारशाही ’ आणि दुसरीकडे ‘ संघीय हुकूमशाही ’ यांनी धास्तावलेले मध्यममार्गी सर्व पक्षांत समानशीलांचा शोध घेऊ लागले. अशा परिस्थितीत काँग्रेसच्या यशवंतरावांनी मोरारजी मंत्रिमंडळाविरुद्ध अविश्वासाचा ठराव मांडला. या पार्श्वभूमीवर राजनारायण यांनी पक्षत्याग केला आणि आपल्या सर्वशक्तिनिशी धर्मनिरपेक्ष-जनता गटाची उभारणी केली, आणि मोरारजी सरकार कोसळविणे हे आपले लक्ष्य बनविले. या रणधुमाळीत केवळ मोरारजींच्या नेतृत्वास विरोध करणारे, परंतु जनता पक्षाच्या चौकटीत अन्य नेतृत्वाखाली जनता राजवट टिकवू पाहणारे आणि त्याचबरोबर जनता पक्षाचा प्रभाव कमी करण्यासाठी इतर पक्षांतील गटांना आपल्यात ओढणारे जनता पक्षातील काही प्रवाह होते. जनता आणि काँग्रेस यांना एकत्र

आणून महाराष्ट्रातील राज्यपातळीवर काहीसा यशस्वीपणे चाललेला पुलोदचा (पुरोगामी लोकदल) प्रयोग राष्ट्रीय पातळीवर राबवू पाहणारे गट होते. आपली नेहमीची सावधानता सोडून अधिक आक्रमक झाल्याने जनता पक्षाच्या मुळावर येण्यास आपण कारणीभूत झालो आहोत हे ओळखून जनसंघ कोशात जावयास तयार झाला. आपले लोकसभेतील संख्याबळ कोणत्याही सत्तासमतोलात महत्त्वाचे आहे याची जाणीव असलेल्या जनसंघाने 'दुहेरी निष्ठांचा' प्रश्न सोडविण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. अकाली, द्र. मु. क., डावे पक्ष संभाव्य राजकीय देवघेवीत आपले 'भाव' जोखीत राहिले. गटागटांचे आडाखे आणि प्रतिआडाखे अस्थिरतेत भर घालीत असताना पंतप्रधानपदाची माळ आपल्याच गळ्यात पडावी म्हणून अथवा आहे ती राहावी म्हणून प्रयत्नशील असणारे सत्तापिपासू नेते कसलाही विधिनिषेध न बाळगता, कसलेही समझौते करावयास तयार होते. परिणामी जनता पक्षांतर्गत तणावांनी परिसीमा गाठली; जनता पक्ष फुटला.

सत्तापिपासू राजकारण्यांच्या संगीतखुर्चीच्या खेळात अनेकांचे बळी गेले. अविश्वासाच्या ठरावावरील मतदानापूर्वी मोरारजींना राजीनामा द्यावा लागला. विरोधी पक्षनेता म्हणून संधी लाभलेल्या यशवंतरावांना आपल्या पाठीमागे पुरेसे पाठबळ उभे करणे अशक्य झाले आणि चरणसिंगांनी चव्हाणांच्या नेतृत्वाखालील काँग्रेसच्या सहकार्याने सरकार बनविले. यांच्यांचे बहुमत तपासलेल्या चरणसिंगांनी संसदेत बळ अजमावण्यापूर्वीच राजीनामा दिला. चरणसिंगाच्या आघाडी सरकारने लोकसभेत विश्वास संपादणे ही महत्त्वाची अट होती; ती पुरी करणे शक्य न झाल्याने हा राजीनामा दिला होता. अशा परिस्थितीत राष्ट्रपतींनी लोकसभा बरखास्त करण्याचा चरणसिंगांचा सल्ला स्वीकारला. हा निर्णय अयोग्य होता व जनताचे बहुमत सिद्ध करण्याची संधी द्यावयास हवी होती असा आग्रह जनता नेत्यांनी धरला, इतकेच नव्हे तर, राष्ट्रपतींवर अभियोग चालविण्याची धमकीही दिली.

या सर्व प्रकरणात इंदिरा काँग्रेसला कमालीचे महत्त्व प्राप्त झाले होते. केंद्रातील स्थैर्याचा तोल बऱ्याच अंशी इंदिरा गांधींच्या हाती होता. त्यांनी आपल्या डावपेचांनी हळूहळू देशाला मध्यावधी निवडणुकांकडे खेचीत नेले व मोरारजी, चरणसिंग, जगजीवनराम, चंद्रशेखर आणि यशवंतराव या अतिरथींचे राजकीय वस्त्रहरण करून आपले पटुत्व सिद्ध केले. विरोधकांचे नाकर्तेपण आणि दुफळी त्यांच्याच अंगी आली. निवडणुका जसजशा जवळ आल्या तसतसा इंदिरा गांधींचा आक्रमक आघात वाढत राहिला. जिद्द, चिकाटी, आक्रमकता, धडाडी आणि समयसूचकता यांच्या जोरावर इंदिरा गांधींनी लोकमत झपाट्याने आपल्या बाजूला वळविले.

सातव्या लोकसभेच्या निवडणुका

सातव्या लोकसभेचे (मध्यावधी) निवडणुकीचे निकाल अकल्पित होते. केवळ दोन वर्षांच्या अवधीत जनता पक्षाने आपली विश्वासार्हता गमावली होती. मात्र, इंदिरा गांधी विजयी होतील अशी आशा बाळगणाऱ्यांनाही त्यांना इतके विक्रमी (३५० जागा) बहुमत मिळेल अशी अपेक्षा नव्हती. जनता पक्षाला सर्वांत दारुण पराभव पत्करावा लागला. या पक्षाला केवळ तीस जागा मिळून चौथ्या क्रमांकाचे स्थान पत्करावे लागले. जनता पक्षाच्या बहुतेक नेत्यांना पूर्ण हार खावी लागली, तर निवडून आलेल्यांना निसटता जय मिळाला. दक्षिणेत नवे स्थान मिळण्याचे दूरच; जनसंघाच्या बालेकिल्ल्यातही जनता पक्षाला प्रचंड पराभव पत्करावा लागला.

घटक राज्यांच्या निवडणुका

लोकसभेच्या निवडणुकांनंतर सहा महिन्यांनी, जून १९८० मध्ये नऊ घटक राज्यांच्या निवडणुका झाल्या. जनता पक्षाने १९७७ मध्ये जे तर्कशास्त्र वापरून घटक राज्यांची सरकारे बरखास्त करून तेथे निवडणुका घेतल्या त्याचाच अवलंब करून इंदिरा गांधींनी घटक राज्यांच्या निवडणुका आयोजिल्या. या निवडणुकांनी १९७१-७२ ची पुनरावृत्ती केली. बंगाल, केरळ, जम्मू, काश्मीर, तामीळनाडू वगळता इतर राज्यांत इंदिरा काँग्रेसने स्थिर शासन देऊ शकणारे बहुमत मिळविले. दुसऱ्या क्रांतीचा पाया रचणाऱ्या गुजराथ राज्यात, पूर्वाश्रमीच्या जनसंघाचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या मध्यप्रदेश, राजस्थान या राज्यांत आणि भारताच्या राजकारणात निर्णायक भूमिका बजावणाऱ्या उत्तरप्रदेशात कधी नव्हे इतके-तीन-

चतुर्थांश बहुमत मिळविले. बिहार, पंजाब, महाराष्ट्र या राज्यांत निर्विवाद बहुमत मिळविले. १९७९ च्या मध्यात सुरू झालेली जनता आघाडीच्या विघटनाची प्रक्रिया लोकसभा निवडणुकीतील अपयशाने थांबली तर नाहीच; उलट, अपयशाचे खापर परस्परांवर फोडणाऱ्या घटक पक्षांच्या कारवायांमुळे विघटनाला अधिक वेग आला. राष्ट्रीय पातळीवर मान्यता मिळवून निवडणुकीच्या रिंगणात उतरू पाहणारे, जनता हे नाव कुठेतरी राहिलेच पाहिजे असे म्हणून आपलाच गट खरा जनता पक्ष आहे असा आग्रह धरणारे चार गट पडले–भारतीय जनता, जनता जे. पी., जनता एस (चरणसिंग), जनता एस (राजनारायण) इत्यादी.

मे १९८२ मध्ये केरळ आणि पश्चिम बंगाल, हिमाचलप्रदेश व हरियाना या राज्यांत मध्यावधी निवडणुका झाल्या. या निवडणुकांमध्ये काँग्रेसचा प्रभाव बराच कमी झाला. जानेवारी १९८३ मध्ये आंध्र, कर्नाटक आणि त्रिपुरा या राज्यांत निवडणुका झाल्या. आंध्रात तेलगु देसम, कर्नाटकात जनता आघाडी तर त्रिपुरात कम्युनिस्ट मार्क्सिस्ट अधिकारावर आले. या निवडणुकांचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य हे की, स्वातंत्र्यानंतर प्रथमच दक्षिणेकडील आंध्र आणि कर्नाटक या काँग्रेसचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या राज्यांत इंदिरा काँग्रेसला पराभव पत्करावा लागला. प्रादेशिक पक्षांचे महत्त्व वाढणे हाही एक महत्त्वाचा लक्षणीय फरक होता.

याच दरम्यान दिल्लीच्या मेट्रोपॉलिटन कौन्सिलच्या निवडणुका झाल्या. त्यांत ५६ पैकी काँग्रेसने ३४, तर भारतीय जनता पक्षाने फक्त १९ जागा जिंकल्या. आसाममधील निवडणुकांत काँग्रेस पक्षाने फार मोठे बहुमत मिळविले; परंतु आसाममधील आंदोलनाच्या नेत्यांनी निवडणुकांत भाग न घेतल्याने या निवडणुका प्रातिनिधिक मानता येणार नाहीत. १९८० नंतरच्या निवडणुकांनंतर झालेल्या राज्यविधानसभांच्या निवडणुकांमध्ये इंदिरा काँग्रेसची बहुतेक ठिकाणी पीछेहाट झाली. इंदिरा गांधींची पकड निसटत चालल्याचे हे निदर्शक होते. याच काळात पंजाबमधील शीख अतिरेक्यांचे आंदोलन बळावत होते आणि १९८४ च्या मध्यात तर सुवर्णमंदिरावरील शीख अतिरेक्यांचे प्रभुत्व संपविण्यासाठी इंदिरा शासनाने लष्करी कारवाई केली. ३० ऑक्टोबर १९८४ रोजी अतिरेकी प्रवृत्तींनी इंदिरा गांधींची निर्घृण हत्या केली. देशाची एकात्मता टिकविण्यासाठी त्यांचे बलिदान झाल्याने त्याला हौतात्माचे स्वरूप आले. इंदिरा गांधींच्या विरोधकांनाही, अनेक बाबतीत मतभेद असूनही त्यांची देशनिष्ठा आणि कार्यनिष्ठा मान्य करावीच लागली. त्यांच्या लोकप्रियतेला ओहोटी लागलेली असताना १९८५ च्या सार्वत्रिक निवडणुकांत त्या पुन्हा सत्ता प्राप्त करू शकतील की नाही यांची शंका वाटत होती. अशा परिस्थितीत झालेल्या हत्येने इंदिरा काँग्रेसचे महत्त्व अधिकच वाढले. संकटमय काळात इंदिरा काँग्रेसने राजीव गांधींची निवड करून एका नव्या पर्वाची सुरुवात केली. एका वादळी व्यक्तिमत्त्वाचे वादळी युग समाप्त झाले.

मूल्यमापन

लाल बहादुर शास्त्रींच्या अकल्पित आणि अकाली निधनानंतर श्रीमती इंदिरा गांधींनी भारतीय राजकारणाची सूत्रे आपल्या हाती घेतली. तेव्हापासून ते त्यांच्या हत्येपर्यंतच्या अठरा वर्षांच्या अवधीत संपूर्ण भारतीय राजकारण त्यांच्या वादळी व्यक्तिमत्त्वाभोवती खेळत राहिले; त्या सत्तेवर असताना आणि जनता राजवटीत स्वतः सत्तेवर नसतानाही ! या काळात देशाचे राजकारण हे इंदिरा गांधींचे राजकारण, काँग्रेसचे राजकारण हे इंदिरा गांधींचे राजकारण असे समीकरण राहिले. एखाद्या शंभर वर्षांच्या राजकीय पक्षाचे भवितव्य केवळ एखाद्या व्यक्तीभोवती एवढ्या मोठ्या प्रमाणावर केंद्रित राहण्याची ही घटना, विशेषतः लोकशाही शासनपद्धतीमध्ये, अपवादात्मकच मानावी लागेल. खुद्द काँग्रेसच्या स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळातील इतिहासातही– महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू यांच्या काळातही– अशी परिस्थिती नव्हती. महात्मा गांधी आणि जवाहरलाल नेहरू या दोघांचेही नेतृत्व लोकोत्तर स्वरूपाचे होते. भारतीय स्वातंत्र्याच्या या शिल्पकारांभोवती असे तेजोवलय होते की, मनात आणले असते तर सर्वेसर्वा राहून आपली अधिकारशाही ते प्रस्थापित करू शकले असते. मात्र, या दोन्ही पुरुषांचा पिंड तसा नव्हता आणि दुसरे

विशेष असे की, दोघांच्याही भोवती असलेल्या दुसऱ्या फळीचे नेतृत्व उच्च दर्जाचे होते आणि त्यामुळे निसर्गतः सर्वोच्च नेतृत्वावर एक प्रकारचा सामूहिक अंकुश राहात असे. इंदिरा गांधींच्या काळात तसे नव्हते. काँग्रेस पक्षातले ज्येष्ठ नेतृत्व तसा अंकुश निर्माण करू शकले नाही आणि जयप्रकाशजींचे नेतृत्व वगळता विरोधी पक्षही सत्तारूढांवर नियंत्रण ठेवू शकेल असे नेतृत्व देण्यात थिटे पडले. परस्परांतील सत्तासंघर्षांमुळे विरोधी पक्षांचे नेतृत्व ऐतिहासिक स्वरूपाची संधी लाभली असतानाही आपला प्रभाव पाडू शकले नाही. पंडित नेहरू विरोधी पक्षांना वाढू देत नाहीत असा विरोधक आक्षेप घेत, तसाच आक्षेप इंदिरा गांधीं-बाबतही घेतला जात असे. स्वतःच्या दौर्बल्यावर पांघरूण घालण्याचाच हा हास्यास्पद प्रयत्न होता.

संघटनात्मक आणि संसदीय विभागांचे संबंध

राजकीय पक्ष आणि शासन यांचे संबंध कसे असतात हे तपासणे आवश्यक असते. साम्यवादी अथवा एकाधिकारी फॅसिस्ट पद्धतीमध्ये राजकीय पक्षाचे, तेही एकाच, शासनावर निरंकुश नियंत्रण असते. लोकशाही व्यवस्थांमध्ये राजकीय पक्षांना महत्त्वाचे स्थान असले तरी धोरणात्मक बाबींत आणि दैनंदिन कारभाराच्या बाबतीत पक्षाचे शासनावर कितपत नियंत्रण असावे याबद्दल विविध मते आहेत. राजकीय पक्षाने धोरणात्मक चौकट आखावी, राजकीय नेतृत्व निवडण्याच्या प्रक्रियेत सहकार्य करावे; परंतु प्रत्यक्ष कारभार करताना दैनंदिन बाबतीत पक्षाने ढवळाढवळ करू नये अशी एक अपेक्षा असते. उदारमतवादी पक्ष अशी अपेक्षा करतात. समाजवादी पक्ष यापेक्षाही अधिक नियंत्रणाची अपेक्षा करतात. राजकीय पक्ष आणि शासन यांच्या संबंधांबाबत विचार करताना संसदीय विभागाचे नेतृत्व करणारे पंतप्रधान आणि संघटनेचे नेतृत्व करणारे पक्षाध्यक्ष यांचे संबंध कसे असतात ते पाहावे लागते. या दोन्ही नेतृत्वांमध्ये सामंजस्याची नितान्त आवश्यकता असते. तसे नसेल तर अपयशाचे खापर परस्परांवर फोडण्याची प्रक्रिया सुरू होते किंवा अंतिम अधिकार कुणाचा हे ठरविताना सत्तेची रस्सीखेच होते, कारभार कुंठतो. अशी उदाहरणे अनेक आढळतात. इंग्लंडमध्ये मजूर पक्षाच्या इतिहासात पक्षप्रमुख हॅरोल्ड लास्की आणि पंतप्रधान ॲटली यांच्या वादात शेवटी लास्कींना राजीनामा द्यावा लागला. पंतप्रधान जवाहरलाल नेहरू आणि पुरुषोत्तमदास टंडन यांच्यातील वाद परिचित होय.

इंदिरा गांधींच्या कारकीर्दीची खरी सुरुवातच मुळी पक्षनेतृत्वाला आव्हान देण्यात झाली. १९६९ ची काँग्रेस पक्षाची फाटाफूट यातून उद्भवली.

चौथ्या सार्वत्रिक निवडणुकांनंतर मे १९६७ मध्ये काँग्रेसच्या वर्किंग कमिटीची बैठक भरली. या बैठकीत सार्वत्रिक निवडणुकांतील अपयशावर कडाक्याची चर्चा झाली. पक्षाचा संसदीय विभाग आणि संघटनात्मक विभाग यांच्यातील वाढती दरी ही चर्चेचा विषय ठरली. या दोन विभागांतील अंतर कमी करण्यासाठी पक्षाध्यक्ष, पंतप्रधान, तीन ज्येष्ठ मंत्री आणि अन्य तीन (मंत्री नसलेले) ज्येष्ठ पक्षीय नेते (वर्किंग कमिटीचे सभासद) अशांची समन्वय समिती नेमण्यात आली. पक्षाची धोरणे आणि कार्यक्रम यांची कार्यवाही आणि मूल्यमापन करणारी यंत्रणा उभारणे हे समन्वय समितीचे प्रमुख कार्य होते. समन्वय समितीने तसा ठरावही केला. प्रत्यक्षात त्याचा काही उपयोग झाला नाही. १९६९ मध्ये काँग्रेस पक्ष पूर्णतया दुभंगला. त्यानंतरच्या काळात इंदिरा गांधींनी पक्षाध्यक्षपदी दुय्यम दर्जाची व्यक्ती राहील याची खबरदारी घेतली (उदा., शंकरदयाळ शर्मा, देवकांत बारूआ इ.) पक्षाध्यक्षांत पंतप्रधानांना आव्हान देण्याचा फारसा प्रश्न उद्भवला नाही. जे काही किरकोळ मतभेद असतील ते टाळण्यासाठी तर इंदिरा गांधींनी पक्षाध्यक्षपद आणि पंतप्रधानपद स्वतःकडेच ठेवण्यास सुरुवात केली. इंदिरा काँग्रेसचा एकंदर पिंड पाहता या दोन्ही पदांच्या एकीकरणाला फारसा विरोध झाला नाही. इंदिरा गांधींच्या मृत्यूनंतरही इंदिरा काँग्रेस पक्षात आजही हीच पद्धती आहे. कार्याध्यक्षपद हे नाममात्र आहे हे निर्विवाद.

केंद्र आणि घटक यांचे संबंध

भारतासारख्या संघराज्यात राजकीय पक्षांतर्गत केंद्रीय यंत्रणा आणि घटक राज्यांची यंत्रणा यांचे परस्परसंबंध महत्त्वाचे ठरतात. अपेक्षा अशी की; घटक राज्यांच्या पक्षीय यंत्रणांना जास्तीतजास्त

स्वायत्तता द्यावी आणि आवश्यक तेव्हा आणि तेवढे अंतिम नियंत्रण पक्षाच्या केंद्रीय यंत्रणेने ठेवावे. इंदिरा काँग्रेसमध्ये प्रत्यक्ष व्यवहारात मात्र तसे घडले नाही, आजही घडत नाही. घटक राज्यांना दुय्यम स्थान आणि केंद्रात सत्तेचे केंद्रीकरण असा पक्षीय राजकारणाचा बाज आहे. याचा परिणाम असा की, पक्षाच्या घटक राज्य पातळीवरच्या संघटनात्मक प्रमुखाची तसेच मुख्य मंत्र्यांची निवड ही केंद्रीय पक्षनेतृत्वाने करण्याची पद्धती सुरू झाली. वास्तवात नेतृत्वाची उभारणी तळाकडून वरच्या पातळीकडे असे व्हावयास हवे. जिल्हा पातळीवरून प्रांतीय आणि प्रांतीय पातळीवरून केंद्रीय पातळीवरचे नेतृत्व आणि तेही निवडणुकीच्या मार्गाने व्हावयास हवे. अशा नेतृत्वनिर्मितीसाठी पक्षाच्या संघटनात्मक निवडणुका सातत्याने आणि खुल्या पद्धतीने व्हावयास हव्यात. संघटनात्मक निवडणुका न घेणे अथवा जास्तीतजास्त काळ टाळणे हा भारतातील सर्वच पक्षांचा स्थायीभाव बनत चालला आहे. काँग्रेस पक्ष त्याला अपवाद नाही. किंबहुना 'वर्षानुवर्षे अशा निवडणुका न घेणे', 'बोगस' सभासदांची नोंदणी करणे पक्षाचे आर्थिक हिशेब सादर न करणे हा इंदिरा काँग्रेसचा पिंड बनत चालला आहे अशी खुद्द पक्षांतर्गत गटांची टीका ऐकू येते.

कोणत्याही पातळीवरील नेतृत्वनिवडीमध्ये त्या पातळीच्या कनिष्ठ स्तराचा पाठिंबा आणि वरिष्ठ स्तराशी वैयक्तिक किंवा संघटनात्मक संबंध महत्त्वाचे ठरतात. या दृष्टीने घटक राज्यपातळीवरील मुख्यमंत्री आणि प्रांतीय पक्षाध्यक्ष यांचा विचार करता येईल. इंदिरा गांधींच्या कारकीर्दीत कनिष्ठ स्तरावरील मूलभूत पाठिंब्यापेक्षा वरिष्ठ पातळीवरच्या श्रेष्ठीजनांशी लागेबांधे महत्त्वाचे ठरू लागले. सुरुवातीच्या काळात इंदिरा गांधींनी स्वतः आपले प्रभुत्व प्रस्थापित होईपर्यंत, सिंडिकेटच्या नेत्यांशी ज्या मुद्द्यावर संघर्ष उभारला व ज्या पद्धतीविरुद्ध आव्हान देऊन त्या उभ्या ठाकल्या, नेमकी तीच पद्धती त्यांनी स्वतः अगदी उघडपणे आणि कठोरपणे राबविली. किंबहुना, वरिष्ठांनी मुख्यमंत्री लादणे आणि अशा मुख्यमंत्र्याला विधानसभेत मूलभूत पाठिंबा नसल्याने बंडखोरी होऊन मंत्रिमंडळ अडचणीत येणे किंवा कोसळणे हे नित्याचे झाले. घटक राज्यांतील काँग्रेस सरकारांचे मुख्यमंत्रिपद कोणाकडे असावे, एवढेच नव्हे तर, मंत्रिमंडळात कोणाचा समावेश असावा यांसारखे महत्त्वाचे निर्णय घटक राज्यांच्या विधानसभांनी घेण्याऐवजी काँग्रेसचे केंद्रीय नेतृत्व घेऊ लागले. राज्यपातळीवरील नेता निवडीसाठी श्रेष्ठींनी निरीक्षक पाठविणे, त्यांनी पाठिंबा अजमावून एकमताने निवडीचे नाटक करणे, मंत्र्यांच्या यादीला दिल्लीहून संमती आणणे या वार्ता सवयीच्या होऊ लागल्या. विधिमंडळात बहुमताचा पाठिंबा असूनही केंद्रीय नेत्यांची मर्जी नसल्याने काहींना मुख्यमंत्रिपद गमवावे लागले, तर काही ठिकाणी विद्यमान मुख्यमंत्र्यावर अविश्वास दर्शविल्यानंतर नेतृत्वबदलाचा निर्णय सर्वस्वी केंद्रीय नेत्यांवर सोपविण्यात आला. इंदिरा गांधी म्हणतील ती पूर्वदिशा होऊ लागली. काँग्रेसचेच सरकार, परंतु सरकारचे नेतृत्व बदलण्याच्या अनेक घटना घटक राज्यांत घडल्या. केदार पांडे (बिहार), घनश्यामदास ओझा (गुजराथ), देवराज अरस (म्हैसूर), बहुगुणा (उत्तरप्रदेश), श्रीमती नंदिनी सत्पथी (ओरिसा) अशी अनेक उदाहरणे देता येतील. १९८० नंतर एकटया आंध्रामध्ये चार वेळा मुख्यमंत्रिपदावरची व्यक्ती बदलण्याचे प्रसंग आले. आपण नेमलेला मुख्यमंत्री अपेक्षेप्रमाणे काम करतो की नाही, हे पाहणारी निवडक नेत्यांची 'गुप्तहेर' यंत्रणा केंद्रात उभी राहिली. एका वेगळयाच पद्धतीने किचन-कॅबिनेट अस्तित्वात आले. आणीबाणीच्या काळात ते "चौकडी" या नावाने बदनाम झाले. सर्वांत कळस म्हणजे वास्तविक आपल्या अखत्यारीतले निर्णय केंद्राकडे, बऱ्याच वेळा तशी आवश्यकता नसतानाही, सोपविण्यामध्ये आपण आपल्या न्याय्य आणि घटनात्मक अधिकारांचा संकोच करीत आहोत याची जाणीवही नष्ट होऊ लागली. सरंजामी पद्धतीचा वारसा अशा पद्धतीने नव्या रूपात चालविला जाऊ लागला.

मुख्यमंत्र्याची निवड श्रेष्ठींच्या हाती गेल्यानंतर अर्थातच संघटनात्मक पातळीवरील प्रांताध्यक्षाची निवडही नेमणुकीच्या मार्गाने होऊ लागली. निवडणुका जसजशा जवळ येतात तसतसा संघटनाप्रमुखाचा अधिकार वाढतो, तिकीटवाटपाची

जबाबदारी येते, मुख्यमंत्री आणि प्रांताध्यक्ष यांच्यात रस्सीखेच होते, मुख्यमंत्री प्रभावी असला तर सामंजस्यासाठी प्रांताध्यक्ष बदलण्याची (किंवा उलटही) प्रक्रिया सुरू होते. इंदिरा गांधींच्या कारकीर्दीत हे सतत होत असे. एकटया महाराष्ट्रात केवळ पाच वर्षांत श्रेष्ठींनी निवडलेले किंवा लादलेले चार मुख्यमंत्री आणि बदललेले पाच प्रांताध्यक्ष झाले, हे उदाहरण अतिशय बोलके आहे. स्थिर आणि दर्जेदार शासनाबद्दल नावाजलेल्या महाराष्ट्रात हे घडावे आणि जे घडते त्याबद्दल विषाद न वाटण्याइतक्या जाणिवा बोथट व्हाव्या ही कसली लोकशाही ?

मंत्रिमंडळाच्या जडणघडणीप्रमाणेच घटक राज्यांनी राबवावयाच्या कार्यक्रमांच्या बाबतीत योजनांची मंजुरी, औद्योगिक प्रकल्पांची मांडणी, अन्नधान्यासंबंधी धोरण, यांबाबतीतही घटक पातळीवरच्या पक्षीय नेत्यांपेक्षा केंद्रीय नेत्यांच्या मताला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले. कापसाची एकाधिकार पद्धतीने खरेदी करावयाची की नाही, लेव्हीची वसुली कशी करावयाची, कुटुंबनियोजनाचे कार्यक्रम कसे राबवावयाचे यांसारखे पूर्णतया घटक राज्याच्या कक्षेतील निर्णयही दिल्लीतील वरिष्ठ नेत्यांच्या मर्जीवर अवलंबून राहू लागले. आणीबाणीच्या काळात केंद्रीय नेतृत्वाकडे अनिर्बंध सत्ता केंद्रित झाली. घटक राज्याची स्वायत्तता ही केवळ कागदोपत्री राहिली. भारताच्या संघराज्याचे रूपांतर एकात्म राज्यात झाले. १९८० मध्ये इंदिरा राजवट स्थिर झाल्यानंतर ही प्रक्रिया पुन्हा सुरू झाली. निकोप संसदीय लोकशाही, निकोप संघराज्यपद्धती रूढ करावयाची असेल तर, इंदिरा काँग्रेसची ही कार्यशैली बदलावयास हवी.

काँग्रेसचे सर्वसाधारण स्वरूप

एक–प्रबळ–पक्षपद्धती

भारतीय गणराज्याच्या स्थापनेपासून पस्तीस वर्षांच्या कालखंडाच्या आढाव्यावरून भारतामध्ये विशिष्ट पक्षपद्धती निर्माण झाल्याचे आढळते. भारतात अनेक पक्ष असले तरी, पारंपरिक अर्थाची फ्रान्ससारखी बहुपक्षपद्धती निर्माण झाली नाही. फ्रान्समध्ये जवळजवळ समबल अनेक पक्ष असल्याने तेथे अस्थिर-शासन राहिले. विशेषतः १९४६ ते १९५९ या काळातील फ्रान्सची पक्षपद्धती अस्थिर बहुपक्षपद्धती म्हणून ओळखली गेली. भारतात मात्र राजकीय पक्षांची संख्या बरीच असली तरी एका पक्षाच्या अनन्यसाधारण प्रभावामुळे देशात एक–प्रबळ–पक्षपद्धती (One–party –dominance) निर्माण झाली. १९५२ ते १९७७ काँग्रेस, १९७७–७९ जनता तर १९७९ पासून पुन्हा काँग्रेस अशा पद्धतीने सत्ता राहिली आहे. केवळ ४०–४५ टक्के मते मिळवूनही विजयी पक्ष ५५ ते ७५ टक्के जागा मिळवू शकतो. प्रादेशिक एकसदस्य निवडणूक पद्धती ही यास बव्हंशी जबाबदार आहे. या पद्धतीमध्ये निवडणुकीस उभ्या राहणाऱ्या उमेदवारांची संख्या वाढते त्या प्रमाणात मते विभागली जातात आणि मतांचे प्रमाण व जागांचे प्रमाण यात तफावत पडते. जितकी पक्षसंख्या अधिक तितके उमेदवार अधिक. याचाच अर्थ असा की, द्विपक्षपद्धतीमध्ये ही तफावत कमी असते, तर बहुपक्षपद्धतीत ती अधिक असते. इंग्लंड-मध्ये लिबरल आणि कॉन्झरव्हेटिव्ह हे पक्ष प्रबळ होते त्या वेळी या दोन पक्षांना मिळणाऱ्या मतांच्या आणि जागांच्या प्रमाणात दहा टक्क्यांहून अधिक तफावत पडत नसे. लेबर पक्षाच्या स्थापनेनंतर १९२० ते १९३९ या काळात इंग्लंडमध्ये त्रिपक्ष-पद्धती अस्तित्वात राहिली. या काळात ही तफावत २० ते २२ टक्क्यांपर्यंत वाढली. लिबरल पक्ष दुर्बल झाल्यावर ही तफावत पुन्हा कमी झाली आहे.

भारतात मात्र काँग्रेस हा प्रबळ पक्ष असून विरोधी पक्ष संख्येने अधिक आहेत. परिणामी काँग्रेसला मिळालेल्या मतांपेक्षा २० ते २५ टक्के जागा अधिक मिळत गेल्या तर विरोधी पक्ष विघटित असल्याने त्यांना ५१ ते ६० टक्के मते एकत्ररीत्या मिळत असूनही जागा मात्र २५ ते ४५ टक्क्यांपर्यंत मिळत गेल्या. १९७७–७९ या काळात जनता पक्षही मतांपेक्षा २०–२५ टक्के जादा जागा मिळवून अधिकारावर होता. आज काँग्रेसची परिस्थिती तशीच आहे.

काँग्रेसचे छत्रीसारखे स्वरूप

काही पाश्चात्य टीकाकारांच्या मते काँग्रेस हा संघटित राजकीय पक्ष नसून ती एक छत्रीच्या स्वरूपाची सर्वसमावेशक आघाडीच आहे. या पक्षात

अनुक्रमणिका

कोणत्याही विशिष्ट तत्त्वज्ञानाशी बांधील अशा सभासदांचा समावेश नसून अनेक हितसंबंधी गटांची ती एक 'आवळ्याची मोट' आहे. काँग्रेसने स्वातंत्र्यपूर्व काळात राष्ट्रीय चळवळीमध्ये ज्याप्रमाणे अनेक विविध विचारांच्या लोकांना आसरा दिला त्याप्रमाणे स्वातंत्र्योत्तर काळातही जमीनदार–शेतकरी, उद्योगपती–कामगार, श्रीमंत –गरीब, उदारमतवादी–समाजवादी, निधर्मी–कट्टर धर्मनिष्ठ अशा परस्परविरोधी, बहुरंगी, बहुढंगी गटांना काँग्रेसमध्ये स्थान मिळत गेले. त्यामुळे काँग्रेसचे संख्यात्मक बळ टिकून राहिले. या अनेक गटांना समाधान लाभेल असा सर्वसमावेशक कार्यक्रम काँग्रेसने सातत्याने ठेवला. प्रत्येक हितसंबंधी गटाला आपणास काँग्रेसमध्ये काहीतरी स्थान आहे असे वाटण्याइतपत ही समावेशकता होती. तत्त्वज्ञानाच्या बाबतीत कोणतीही एकांगी अथवा अतिरेकी बांधीलकी नसल्याने असा कार्यक्रम आखणे शक्य होते. काँग्रेसची संघटना काहीशी विस्कळीत अशा राज्यसंघासारखी आहे असे मॉरिस जोन्स यांनी म्हटले आहे. अशा संघटनेत भिन्न गट काहीसे विस्कळीत स्वरूपात परंतु एकत्र ठेवले जातात. त्यामुळे पक्षांतर्गत तणाव निर्माण झाले तरी भिन्न गटांचा पाठिंबा मिळत राहतो आणि पक्षाची शक्ती कायम राहते. इंदिरा गांधींच्या अठरा वर्षांच्या कारकीर्दीतही परिस्थिती अशीच होती. विरोधकांचा कार्यक्रम आपलासा करून घेण्याचे आणि त्यांना निष्प्रभ करून टाकण्याचे धोरण त्यांनी सातत्याने चालू ठेवले. १९६९ च्या काँग्रेस फुटीनंतर डाव्या गटांचे सहकार्य मिळविले. कधी मुस्लिम अल्पसंख्याकांचा पाठिंबा मिळविला, तर कधी बहुसंख्य हिंदूंना आपलेसे करण्याचा प्रयत्न केला.

इंदिरा गांधी : राष्ट्रवादाच्या प्रणेत्या ?

इंदिरा गांधींना जी एक विशेष लोकप्रियता लाभली त्यामागे त्यांचा एक आगळा राष्ट्रवाद होता असे म्हणावे लागेल. हा राष्ट्रवाद आग्रही स्वरूपाचा होता आणि ज्या वेळी तत्त्वज्ञाने, पक्ष आणि संस्था विघटित होत होत्या, अपयशी ठरत होत्या, त्या वेळी या राष्ट्रवादाच्या आधाराने इंदिरा गांधींनी सर्वसामान्य जनतेला आपल्याकडे खेचण्याचा यशस्वी प्रयत्न केला. त्यांच्या कारकीर्दीतील अनेक घटना याच्या साक्षी होत.

पाकिस्तानचा पराभव, 'बांगला देश'ची स्वतंत्र राष्ट्र म्हणून निर्मिती, सिक्कीमचे सामीलीकरण, अणुस्फोट, पाश्चात्त्यांविरोधी तिसऱ्या तटस्थ गटातील राष्ट्रांचे अनभिषिक्त नेतृत्व, भारताच्या लष्करी सामर्थ्यावर भर आणि संरक्षणसिध्दतेसाठी वाढता संरक्षण खर्च, केंद्रसत्ता प्रबळ करण्यावर भर, जागतिक परिषदांमध्ये यशस्वी सहभाग, आशियाई खेळांचे आयोजन, पीडा देऊ पाहणाऱ्या शेजारी राष्ट्रांबाबत ताठर भूमिकेचा स्वीकार, देशाच्या राष्ट्रीय एकात्मतेला आणि प्रादेशिक अखंडत्वाला धोका निर्माण करणाऱ्या अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय शक्तींबद्दल सतत जागरूकतेची भूमिका आणि सावधानतेचा इशारा- इत्यादी घटना म्हणजे भारतीय राष्ट्रवादाचे उभरते प्रतीक म्हणून स्वतःची प्रतिमा निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न होता. इंदिरा गांधींच्या या आवाहनांचे, कार्यक्रमांचे हिंदू राष्ट्रवाद्यांना चांगलेच आकर्षण वाटू लागले. अल्पसंख्याकांना फारसे न दुखवता भारतातील बहुसंख्य हिंदूंना आकर्षित करण्याचे त्यांचे तंत्र चांगलेच यशस्वी ठरले. किंबहुना १९७० नंतर अल्पसंख्याकांची जितकी मते इंदिरा काँग्रेसने गमावली असतील, त्यापेक्षा कितीतरी अधिक गर्भित हिंदुराष्ट्रवादाच्या आवाहनामुळे हिंदूंकडून मिळविली. इंदिरा गांधींचा राष्ट्रवाद भारताच्या प्राचीन आणि संभाव्य भावी समर्थ प्रतिमेवर आधारलेला होता आणि ज्या ज्या वेळी विरोधकांनी इंदिरा गांधींच्या कार्यपद्धतीमुळे भारताची लोकशाही धोक्यात आहे असा आक्षेप घ्यावयास सुरुवात केली, त्या त्या वेळी इंदिरा गांधींनी लोकशाहीस असलेल्या धोक्यापेक्षा राष्ट्रीय एकात्मतेस असलेला धोका अधिक गंभीर असल्याचा पुकारा केला आणि यात फॅसिझमचा अभिप्रेत धोका असला तरी, सर्वसामान्यांना तो आकर्षित करू शकला. इंदिरा गांधींच्या लोकप्रियतेचा, पंडित नेहरूंपेक्षाही अधिक लोकप्रियतेचा, हा अन्वयार्थ महत्त्वाचा आहे. त्यांची ही लोकप्रियता इंदिरा काँग्रेसच्या यशाची गमक होय, निर्णायक शक्तीही होय.

०००

अनुक्रमणिका

कॉंग्रेस, इहवाद, लोकशाही आणि समाजवाद

सत्यरंजन साठे

कॉंग्रेस पक्षाला ह्या वर्षी एक शतक पुरे झाले; ह्या शतकात त्या पक्षाने खालील गोष्टी केल्या ह्यात शंका नाही. १) भारताच्या स्वातंत्र्याची शांततामय चळवळ करून स्वातंत्र्यप्राप्तीस गती आणली; २) भारताचे संविधान तयार करण्यात सिंहाचा वाटा त्याच पक्षाचा होता; ३) भारतीय जनतेस उदार मतवादी, मानवतावादी व परिवर्तनवादी मूल्ये दिली आणि ४) स्वतंत्र भारताचा राज्यकारभार केंद्रात तीन वर्षांचा (१९७७ ते १९८०) काळ सोडता व बहुतेक राज्यांतून सातत्याने किंवा बराच काळ वाहिला. गेली ३५ वर्षे अधिकारात असलेल्या ह्या पक्षाला जसे यशाचे श्रेय आहे तसेच अपयशाची जबाबदारीही घ्यावी लागणार. भारताची आर्थिक, राजकीय क्षेत्रांत प्रगती झाली आहे ह्यात शंका नाही. पण ह्या प्रगतीचा जमाखर्च मांडायचा ह्या लेखाचा हेतू नाही. भारतात गेली ३५ वर्षे लोकशाही शासनपद्धती अस्तित्वात आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर स्वतंत्र झालेल्या आशियाई, आफ्रिकन राष्ट्रांपैकी एक श्रीलंकेचा अपवाद वगळता इतर सर्व देश हुकूमशाहीच्या विळख्यात सापडले. भारतातल्या लोकशाहीवर टीका करणारे अनेक आहेत. ती आदर्श नाही. तीत अनेक दोष आहेतही, परंतु सदोष का होईना लोकशाही आहे ह्यात शंका नाही. आणि ती गेली ३५ वर्षे टिकून आहे. आणीबाणीच्या १९ महिन्यांत तिच्यावर खूप मर्यादा घालण्यात आल्या, तरी त्याही काळात ती संपूर्णपणे नष्ट झाली नाही. श्रीमती इंदिरा गांधींनी १९७७ मध्ये निवडणुका घेतल्या– अगदी त्यांच्या विरोधकांच्या म्हणण्याप्रमाणे त्या त्यांना घ्याव्या लागल्या असे जरी मान्य केले तरीही लोकशाही अस्तित्वात असण्याचेच ते लक्षण आहे. राज्यघटनेने 'इहवाद' (Secularism) आणि समाजवाद ही उद्दिष्टेही मान्य केली आहेत. भारतात अनेक धर्मांचे लोक राहतात. त्या सर्वांचा हा देश आहे. त्यामुळे येथील शासन धर्मातीत असायला हवे. खरे पाहता ते इहवादी असायला हवे. कारण तसे ते असल्याशिवाय खऱ्या अर्थाने धर्मातीत होऊच शकत नाही. परंतु भारतात अनेक लोकांनी सेक्युलर म्हणजे सर्वधर्मसमभाव असा ठाम ग्रह करून घेतला असल्याने इहवादी शासनाची संकल्पना साकार झालेली नाही. "समाजवाद" म्हणजे काय ह्याबद्दल तर जास्तच गोंधळ आहे. स्थूल अर्थाने समाजवाद म्हणजे विषमताविरहित, समान संधी देणारी, सामाजिक व आर्थिक न्याय प्रस्थापित करणारी समाजव्यवस्था. ह्या ध्येयाकडे आपली कितपत वाटचाल झाली आहे? त्या वाटचालीत कॉंग्रेस पक्षाचे श्रेय किती? अपयशाची जबाबदारी किती? ह्या प्रश्नांचा आढावा, काहीशा स्थूल मानाने, ह्या लेखात घेण्याचा प्रयत्न आहे.

भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीचे नेतृत्व करणारी जी मंडळी होती ती बहुतेक इंग्रजीशिक्षित मध्यमवर्गीय होती. इंग्रजी शिक्षणामुळे त्यांची मते संस्कारित झाली व त्यांवर पाश्चात्त्य उदारमतवादी-मानवतावादी तसेच मार्क्सवादी विचारांचे संस्कार झाले. सशस्त्र क्रांती करून इंग्रजांचे राज्य जाणे कठीण होते. इंग्लंड हा देश लोकशाहीचा असल्याने लोकमत जागृत करून, लोकशक्ती उभी करूनच स्वातंत्र्य मिळवता येईल हाही विचार दृढ झाला. स्वातंत्र्याची चळवळ ही जर लोकांची व्हायची तर स्वातंत्र्य कशासाठी हे त्यांना सांगितले पाहिजे. इंग्रजपूर्व काळात भारतात खऱ्या अर्थाने एकराष्ट्रीयत्वाची भावना होती काय हा वादाचा विषय होऊ शकतो. ह्या देशात अनेक धर्म, विविध भाषा आणि विविध संस्कृती असल्याने, त्यांचे इतिहास हेही प्रादेशिक असल्याने, केवळ भूतकाळाकडे बघून सर्व समाजाला एकत्र ठेवता येणे कठीण. ह्या

अनुक्रमणिका

समाजामध्ये एकता ही भविष्यकालीन प्रेरणांनीच निर्माण होऊ शकली आणि त्या प्रेरणा काँग्रेसी नेतृत्वाने दिल्या ह्यात शंका नाही. स्वातंत्र्य म्हणजे पूर्वीची मोगलाई किंवा पेशवाई पुनःस्थापित करायची असे नसून लोकांचे राज्य स्थापन करणे हा हेतू होता. इंग्रजांचे राज्य जाणे व त्याजागी गहूवर्णी माणसांचे राज्य येणे म्हणजे स्वातंत्र्य नाही. तर सामान्य माणसाचा शासनप्रक्रियेतील सहभाग असेल ते राज्य; ज्यात त्याची सामाजिक व आर्थिक शोषणापासून मुक्तता होईल, जिथे त्याला स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव ह्यांचा प्रत्यय येईल अशी व्यवस्था.

सुरुवातीला अर्जे-विनंत्या करणारा काँग्रेस पक्ष टिळकयुगात जहाल व आग्रही बनला. पण तरीदेखील तो पक्ष वरच्या वर्गांतल्या लोकांपर्यंतच सीमित राहिला. महात्मा गांधींच्या नेतृत्वात सामान्य माणसापर्यंत पोचण्याची शक्ती होती. गांधीयुगातच काँग्रेस ही खऱ्या अर्थाने जनतेची चळवळ झाली. चांगले ध्येयदेखील वाईट मार्गाने साध्य करणे योग्य नाही, ह्या गांधींच्या आग्रहामुळे काँग्रेसी चळवळीला नैतिक अधिष्ठान लाभले. इंग्रजी राज्याचा विरोध पण इंग्रजी माणसाचा द्वेष नाही ही भावनाही स्वीकारली गेली. अहिंसा, सत्याग्रह, सविनय कायदेभंग ह्या गांधींच्या चळवळींनी भारतीय समाजाची अस्मिता जागृत केली. सर्वशक्तिमान अशा ब्रिटिश सत्तेला शस्त्रास्त्रांनी विरोध केला तर ती तो सहज निपटू शकते. परंतु नैतिक विरोधाची शक्ती मोठी असते. इंग्लंड हा लोकशाहीप्रधान देश असल्याने इंग्लंडमधील लोकमत व विरोधी पक्षाची सहानुभूती काँग्रेस पक्षाला मिळत होती. परंतु इंग्लंडच्या लोकशाहीचा केवळ स्वार्थीपणाने किंवा संधिसाधुपणाने उपयोग करायची कल्पना भारतीय नेत्यांच्या मनात नव्हती. इंग्रजी राज्य गेल्यावर स्वतंत्र होणाऱ्या भारतातली सत्ता लोकांचीच असेल हाही स्वातंत्र्यचळवळीचा उद्देश होता. म्हणूनच लोकशाही आणि स्वातंत्र्य ह्या एकमेकांपासून भिन्न मानल्या गेल्या नाहीत. ह्या दोघांचा एकत्र विचार केल्याशिवाय बहुजन समाजाची शक्ती चळवळीमागे उभी राहूच शकत नव्हती.

काँग्रेसखेरीज इतर पक्ष होते. त्यांनीही लोकशाहीव्यवस्था मान्य केली होती. कम्युनिस्ट पक्षाला अर्थात साम्यवादी पद्धती आणायची होती. ह्या पक्षाच्या अनेक मर्यादा असल्याने त्याच्या लोकसंग्रहाला मर्यादा पडल्या. दुसरा महत्त्वाचा पक्ष म्हणजे मुस्लिम लीग. ह्या पक्षाला मुसलमानांचे स्वतंत्र राष्ट्र हवे होते. हे मुसलमानांचे राष्ट्र लोकशाहीप्रधान असेल, की हुकूमशाहीप्रधान असेल ह्याचा त्या पक्षाच्या पुढाऱ्यांनी विचार केलेला नव्हता. परंतु पुढे झालेल्या पाकिस्तानात आजवर हुकूमशाहीच आहे हे सत्य डोळ्याआड करता येत नाही. हिंदूमहासभा हा मुस्लिम लीगचा हिंदू प्रतिस्पर्धी पक्ष. त्याला हिंदू राष्ट्र हवे होते. मुस्लिम लीग आणि हिंदूमहासभा ह्यांचे दावे एकमेकांना पूरक होते. काँग्रेसने मात्र प्रथमपासून धर्मातीत–धर्मनिरपेक्ष राज्याची भूमिका घेतली होती. स्वतः महात्मा गांधी धार्मिक प्रवृत्तीचे होते व सर्व धर्मांना समान वागणूक द्यावी ह्या मताचे होते. परंतु शासनाने मात्र कुठल्याही धर्माचा पुरस्कार करू नये असे त्यांचे मत होते. म्हणूनच कायद्याने गोवधबंदी करायला त्यांचा विरोध होता. जवाहरलाल नेहरू तर सेक्युलर ह्या शब्दाचा इहवादी शासन असाच अर्थ घेणारे होते. धर्मातीत शासन किंवा इहवादी शासन ही संकल्पना लोकशाहीला पूरक होती.

इंग्रजी राज्यकर्त्यांनी मुस्लिम लीगला उत्तेजन दिले आणि त्यामुळे बॅ. जीना ह्यांनी अवास्तव मागण्या करायला सुरुवात केली. १९३७ च्या निवडणुकांत मुस्लिमांचे बहुमत असलेल्या प्रांतांतूनदेखील लीगला बहुमत मिळाले नव्हते. काँग्रेसी पुढाऱ्यांवर मुसलमानांचा अनुनय केल्याचा आरोप काही हिंदुत्वनिष्ठ करतात. परंतु फाळणी टाळण्याचा तो प्रामाणिक प्रयत्न होता. फाळणीचा निर्णय झाल्यावर व इस्लामी तत्त्वावर पाकिस्तानची स्थापना झाल्यावरही उर्वरित भारत हा हिंदू राष्ट्र न होता धर्मातीत राष्ट्रच राहील ह्या निर्णयामागे काँग्रेसी पुढाऱ्यांची – मुख्यत: गांधी व नेहरू ह्यांचीच निष्ठा होती. भारत हा जर हिंदू राष्ट्र व्हायचे तर मग काश्मीर भारतात राहण्याचा प्रश्नच आला नसता. ८० टक्के हिंदू लोकसंख्या जरी असली, तरी भारतात २० टक्के लोकसंख्या मुस्लिम, ख्रिस्ती, पारशी वगैरेंची आहे. ह्या सर्वांना भारत आपला वाटायचा तर तो धर्मातीतच

असायला हवा. मुस्लिम लीगच्या द्विराष्ट्रवादाला काँग्रेसने विरोध केला. केवळ मुस्लिम धर्म हा राष्ट्रीयत्वाचा आधार होऊ शकत नाही हे त्यानंतर बांगला देशच्या निर्मितीने व पाकिस्तानच्या विभाजनाने सिद्ध केले.

भारताच्या संविधानात "सेक्युलर" हा शब्द जरी घालण्यात आला नाही तरी तो आशय असावा असे अभिप्रेत होते. संविधानाने सेक्युलर स्टेटच्या दोन अटींची पूर्तता केली. १) कायद्याने सर्वांना समान वागणूक देण्याची हमी देण्यात आली. धर्म, जात, लिंग किंवा वंश ह्यांसारख्या कारणांवरून पक्षपात होता कामा नये असेही स्पष्ट सांगितले गेले; २) प्रत्येक व्यक्तीला आपल्या धर्मावर विश्वास ठेवण्याचे, त्याप्रमाणे आचरण करण्याचे, आणि त्याचा प्रचार करण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले. सेक्युलर स्टेटची तिसरी अट अशी आहे की, शासनाने कुठल्याही धर्माशी कसलाही संबंध ठेवू नये. शासनाने धर्मास मदत करू नये, त्यात हस्तक्षेप करू नये किंवा त्यास प्रतिबंध करू नये. ह्या तिसऱ्या तत्त्वाची अतिशय काटेकोरपणे अमलबजावणी अमेरिकेत झालेली आहे. भारतात ह्या तत्त्वाची अमलबजावणी होण्यास अनेक अडचणी होत्या. युरोपमध्ये धर्मसंस्था व राज्यसंस्था ह्यांत संघर्ष झाला व त्यातून धर्म आणि इहवादी शासन ह्यांची फारकत झाली. ह्यामुळे धर्माची व्याप्तीही सीमित झाली आणि त्यानुसार शासनाच्या कार्यक्षेत्राची मर्यादा ठरली. व्यक्तीच्या उपासनेबाबत, तिच्या पारमार्थिक जीवनाबाबत धर्माची सत्ता असेल; तर त्याच्या इहवादी जीवनाचे नियंत्रण इहवादी शासनामार्फत होईल. भारतात धर्म आणि शासन ह्यांच्यात अशा सीमारेषा ठरलेल्या नव्हत्या; कारण येथील धर्माची व्याप्ती फार मोठी होती. हिंदू आणि इस्लाम ह्या धर्मांच्या क्षेत्रांत व्यक्तीच्या अनेक इहवादी व्यवहारांचाही समावेश होता. त्याच्या जन्मापासून मृत्यूपर्यंत जवळजवळ सर्वच व्यवहार धर्माच्या नियंत्रणाखाली होते. धर्मस्वातंत्र्याचे एवढे व्यापक स्वरूप जर मान्य करायचे झाले तर आधुनिक शासनव्यवस्थाच अस्तित्वात येऊ शकली नसती. धर्मस्वातंत्र्याचा सामाजिक परिवर्तन व आधुनिकता ह्यांना रोखण्यासाठी उपयोग होऊ देता कामा नये ह्याबद्दल सर्वच सुजाण नेत्यांचे एकमत असावे. धर्मस्वातंत्र्याच्या कलमाची रचना करताना ही काळजी घेण्यात आली. व्यक्तीला धर्मपालनाचे स्वातंत्र्य आहे; परंतु अस्पृश्यता किंवा नरबळी अशा अमानुष चालीरीती त्या संरक्षणाखाली येता कामा नयेत किंवा जातीय द्वेष निर्माण करणाऱ्या अभिव्यक्तींवर शासनाला प्रतिबंध घालता आला पाहिजे. देवदासीसारखी प्रथा धर्माच्या नावाखाली उजळ माथ्याने वावरता उपयोगाची नाही आणि देवीची लस टोचल्याने देवीचा कोप होतो ह्यासारख्या अंधश्रद्धा त्या स्वातंत्र्याने जपल्या जाऊ नयेत. युरोपमध्ये जे संघर्षानंतर झाले ते भारतात शासनाने कायद्यामार्फत करायचे अशीच ह्या तरतुदीमागची भूमिका होती. म्हणून प्रत्येक व्यक्तीला आपल्या धर्माप्रमाणे आचरण करण्याचे स्वातंत्र्य आहे. पण ह्या स्वातंत्र्यावर खालील मर्यादा लादण्यात आल्या : १) हे स्वातंत्र्य शासनाच्या कायदा व सुव्यवस्था, नीतिमत्ता आणि सार्वजनिक स्वास्थ्य ह्यांच्या रक्षणार्थ केलेल्या कायद्याशी सुसंगत असायला हवे; २) हे स्वातंत्र्य व्यक्तीला संविधानाने दिलेल्या मूलभूत अधिकारांचा अधिक्षेप करणारे असता कामा नये; ३) धर्माच्या आवश्यक बाबींपुरतेच ते मर्यादित असेल. धर्मव्यवहाराशी निगडित अशा इहवादी व्यवहारांचे नियमन करण्याचा अधिकार शासनाला आहे; ४) सामाजिक कल्याण आणि सुधारणा ह्यांकरता केलेल्या किंवा हिंदूंची देवालये त्या धर्माच्या सर्व जातींच्या लोकांना खुली करण्याकरता केलेल्या कायद्यामुळे त्या स्वातंत्र्यावर मर्यादा घालता येतील. राज्यघटनेच्या कुठल्याही इतर मूलभूत अधिकारावर (धर्मस्वातंत्र्याची तरतूदही मूलभूत अधिकारांपैकी एक आहे) अशा तऱ्हेच्या व्यापक मर्यादा नाहीत. राज्यघटना लिहिणाऱ्यांची दृष्टी आणि सामाजिक परिवर्तनाच्या दिशांचे स्पष्ट दिग्दर्शन ह्या तरतुदींमुळे होते. शासनाला इहवादी व्यवहारांचे नियमन करण्याचा अधिकार आहे ह्याचाच अर्थ धर्माची व्याप्ती ठरवण्याचा अधिकार आहे. तसेच सामाजिक कल्याण आणि सुधारणा ह्यांकरता केलेला कायदा हा ह्या स्वातंत्र्यावर मर्यादा घालू शकतो. ह्या क्रांतिकारक तरतुदी आहेत.

ह्याचमुळे शासन आणि धर्म ह्यांना संपूर्णपणे छेदणारी भिंत घटनाकारांनी उभी केली नाही. परंतु शासनाचा हस्तक्षेप फक्त धर्माची आवश्यक अंगे सीमित करण्यापुरता आणि सामाजिक कल्याण किंवा सुधारणा ह्यांच्या आड येत असलेल्या धर्म-व्यवहारापुरताच मर्यादित असावा. ह्याखेरीज शासनाने धर्मापासून वेगळेच राहिले पाहिजे. शासकीय शिक्षण संस्थांत धर्माची शिकवण देण्यात येऊ नये (कलम २८[१]) किंवा शासकीय अनुदान असलेल्या शिक्षण संस्थेत जर धार्मिक शिक्षणाची तरतूद असेल, तर अशा शिक्षणाची सक्ती कुठल्याही विद्यार्थ्यावर होऊ नये अशीही तरतूद आहे (कलम २८[३]). कुठल्याही विशिष्ट धर्मासाठी नागरिकाला कर देण्याची सक्ती करण्यात येऊ नये अशीही तरतूद आहे (कलम २७).

संविधानाच्या तरतुदी जरी आदर्श असल्या, तरी प्रत्यक्षात मात्र इहवादी शासन ही संकल्पना कार्यवाहीत आलेली नाही. भारतीय समाज हा अंधश्रद्धा आणि कर्मकांड ह्यांना फार मोठे मानणारा आहे. त्यामुळे शासनाच्या अनेक कार्यक्रमांना मूहूर्त पाहिले जातात. भूमिपूजनाचे कार्यक्रम होतात; सुवासिनींनी आरती ओवाळण्याचा कार्यक्रम होतो आणि अनेक इतर हिंदू धार्मिक विधी केले जातात. दिवसेंदिवस ह्याचे प्रमाण वाढतच आहे. पं. जवाहरलाल नेहरू हे पहिले पंतप्रधान. त्यांच्या कारकीर्दीत त्यामानाने जास्त बुद्धि-प्रामाण्यवादी भूमिका घेतली जायची. परंतु श्रीमती इंदिरा गांधी ह्या स्वतःच सारख्या देवळात जाणाऱ्या होत्या. अनेक होम-हवनांचे विधी करणाऱ्या होत्या. त्यामुळे त्या काळात धार्मिक पुनरुज्जीवनवाद वाढला. स्वातंत्र्याच्या वेळीही काँग्रेस पक्षात अनेक कर्मकांडी व श्रद्धावान लोक होतेच. पण गांधी, नेहरूंच्या धाकाने ते फारसे डोके वर काढू शकले नाहीत. स्वतः गांधी हे धार्मिक होते पण शासन व धर्म ह्यांतील भेद त्यांना मान्य होता. सामाजिक जीवनात ते सर्वधर्मसमभावाच्या तत्त्वांचे पालन करीत, पण राजकीय जीवनात ते फक्त नीती हाच धर्म मानत. जवाहरलाल नेहरू हे जास्त आधुनिक व पाश्चिमात्य विचारसरणीचे होते. त्यांना इहवादी शासनच अभिप्रेत होते. परंतु बहुसंख्य काँग्रेसी सभासद हे परंपरावादीच होते असा पुरावा मिळतो डॉ. राजेंद्रप्रसाद ह्यांनी पाटण्याला ब्राह्मणांचे पाय धुतले ह्याबद्दल नेहरूंना राग आला होता. त्यांच्यातला हा संघर्ष हा आधुनिक व परंपरागत धार्मिक वृत्ती ह्यांतला होता. कारण धर्म म्हणून-देखील जर एखादी व्यक्ती ब्राह्मणांची उच्चता मानत असेल तर मग ती व्यक्ती राज्यघटनेतील समतेच्या तत्त्वाशी कशी काय बांधिलकी राखणार ?

काँग्रेस पक्षाने ह्या बाबतीत पहिल्यापासून पथ्य पाळले नाही असेच म्हणावे लागते. गांधीजींनी मुसलमानांना खूश करण्याकरता खिलाफत चळवळीला पाठिंबा दिला. ही चळवळ कुणाची होती ? सनातनी, परिवर्तनविरोधी मुस्लिमांची. त्यांच्या सुधारणांविरुद्धची ही चळवळ होती. ह्या पाठिंब्यामुळे काँग्रेस पक्षाला कोणत्या मुसलमानांचा पाठिंबा मिळाला ? मुल्ला, मौलवी व परिवर्तनाला विरोध करणाऱ्या, आधुनिकतेकडे पाठ फिरवणाऱ्या मुसलमानांचा पाठिंबा मिळाला. खरे पाहिले असता, पाकिस्तानची मागणी करणारे जीना हे आधुनिक विचारांचे, धर्माचे स्तोम न माजवणारे व इहवादी प्रवृत्तीचे होते. हिंदुराष्ट्राचा आग्रह धरणारे सावरकर हे तर संपूर्ण बुद्धिवादी होते व त्यांचे हिंदूराष्ट्र हे इहवादी शासनच झाले असते. काँग्रेस पक्षात त्यामानाने इहवादी शासनाच्या तत्त्वाशी संपूर्ण बांधिलकी असणारे नेहरूंसारखे थोडे होते. आणि इतर जे होते ते समाजवादी पक्षाच्या स्थापनेनंतर बाहेर पडले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ किंवा जमाते उलेमासारख्या भूतकाळाकडे बघूनच आणि धर्माबाबत आग्रही भूमिका घेणाऱ्या जातीय संघटनांच्या सभासदांमध्ये जो विचाराचा कोतेपणा दिसतो तेवढा जरी नसला तरी काही प्रमाणात धर्मांधता असणारे आणि इहवादी भूमिका न पेलू शकणाऱ्यांची संख्या काँग्रेस पक्षातही मोठी होती. सेठ गोविंददाससारख्या काँग्रेसी खासदाराने घटना समितीत गोवधबंदीसाठी आग्रह धरला आणि त्यामुळेच मार्गदर्शक तत्त्वांमध्ये त्या बंदीचा समावेश झाला हे विसरून चालणार नाही. धर्म आणि राजकारण ह्यांच्या सीमारेषा आपण आजवर ठरवू शकलेलो नाही. धर्माचा उपयोग राजकारणाकरता सर्वच पक्षांनी केलेला आहे. हिंदूराष्ट्र ही कल्पना

घेऊन सामान्यांचा पाठिंबा मिळू शकत नाही हे पाहिल्यावर जनसंघाने किंवा भाजपने वरवर जरी भारतीय राष्ट्रवादाचा मुखवटा धारण केला असला तरी, खरे पाहिले असता, तो पक्ष तसा हिंदुवादीच आहे. तसेच गांधी, नेहरूंच्या परंपरेखाली सेक्युलर स्टेट मान्य केलेल्या काँग्रेसी सभासदांनीही खऱ्या अर्थाने इहवादी शासनाची संकल्पना स्वीकारली आहे असे दिसत नाही. त्यातून काँग्रेसमधल्या आणि इतर पक्षांतल्या हिंदू सेक्यूलरवाद्यांनी इहवादी भूमिका एकतर्फी घेतल्याचेही दिसते. म्हणजे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाबद्दल जातीय म्हणून विरोधात्मक बोलले गेले; परंतु मुसलमानांच्या किंवा इतर अल्पसंख्याकांच्या जातीयतेबाबत मौन पाळण्यात आले. "सर्वधर्मसमभाव" ह्याचा अर्थ सर्व धर्मांचा सनातनीपणा व परिवर्तनविरोधी भूमिकांबाबत संदिग्ध राहायचे असाही काही राजकारण्यांनी सोयीस्कररीत्या केलेला आहे. बोहरा समाजाच्या धर्मगुरूंची सर्वंकष सत्ता आपले शासन कशी काय मान्य करते? नुसती मान्य करते असे नाही तर सय्यदितांच्या वाढदिवशी अभिनंदनाचा संदेश धाडते? फार वर्षांपूर्वी बोहरा धर्मगुरूंच्या ह्या सर्वंकष सत्तेला पायबंद घालणारा कायदा मुंबई राज्याच्या विधानसभेने पास केला होता. परंतु हा कायदा बोहरांच्या धर्माच्या आवश्यक बाबींत हस्तक्षेप करतो असा आक्षेप घेऊन सर्वोच्च न्यायालयाने रद्दबातल ठरवला. एखाद्या व्यक्तीने धर्मगुरूची आज्ञा पाळली नाही म्हणून तो त्या व्यक्तीस बहिष्कृत करू शकतो. ही धर्मगुरूंची सत्ता धर्माचे आवश्यक अंग मानली जाते. ह्यावरूनच "धर्म" ह्या संज्ञेचा किती व्यापक अर्थ होऊ शकतो ह्याची कल्पना येते. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांनी घटनेचा लावलेला हा अन्वयार्थ संपूर्ण चुकीचा आणि सामाजिक न्याय व परिवर्तन ह्या दोन्ही ध्येयांना डावलणारा आहे. जर हिंदू समाजामध्ये असणारी अस्पृश्यता आम्ही धर्माची मानत नाही तर एखाद्या व्यक्तीला बहिष्कृत करून त्या व्यक्तीला अनेक नागरी सुविधा नाकारण्याचा बोहरा धर्मगुरूंचा अधिकार धर्माचा भाग का मानला जावा? बहुपत्नीत्व किंवा एकतर्फी "तलाक" हा शब्द तीनदा उच्चारून केलेला घटस्फोट मानणारा शेरियतचा कायदा चालू ठेवण्याचा आग्रह मुसलमान पुढारी आजही धरतात. सर्वोच्च न्यायालयाने मुस्लिम स्त्रीस पोटगीचा अधिकार दिला म्हणून त्याविरुद्ध आक्रमक आंदोलनाची भाषा बोलतात आणि काँग्रेसचे पुढारी त्या मुस्लिम व्यक्तिगत कायद्यात आपण काहीही बदल करणार नाही असे वचन देतात. इतर पक्षांचे पुढारीही ह्याबाबतीत तितकेच दोषी आहेत. अशा धोरणांमुळे सनातनी मुसलमान व इतर अल्पसंख्याकांचे फावते– त्यामुळे बहुसंख्य हिंदूंना राग येतो व ते जातीय संघटनांच्या आहारी जातात ही सत्य परिस्थिती आहे. अर्थात, हिंदू समाजापुरता इहवादही आजकाल सोडण्यात आलेला दिसतो. रेडिओ, दूरदर्शनवरून धर्माचेच नव्हे तर निरनिराळ्या बुवा, महाराजांचेही स्तोम आजकाल माजवले जात आहे. लोकांनी सामाजिक, आर्थिक प्रश्नांवरून अडचणीत टाकणाऱ्या भूमिका घेऊ नयेत म्हणून निरनिराळ्या धार्मिक उत्सवांचे प्रमाण वाढले आहे आणि त्या उत्सवांमध्ये अधिकारारूढ पक्षाचे पुढारी मोठ्या संख्येने भाग घेत आहेत. पंजाबच्या प्रश्नाने कधी नव्हे इतकी इहवादी शासनाची गरज आपल्या निदर्शनास आणली आहे. गुरुद्वारात शस्त्रे जमवली तरी शासनाने त्यात हस्तक्षेप करायचा नाही ही शिखांची भाषा मूलभूतवादाचेच (Fundamentalism) दर्शन घडवते. ह्यांचा मुकाबला करायचा तर निश्चितपणे व खंबीरपणे इहवादी भूमिका घेणे आवश्यक आहे. काँग्रेसने ती घ्यायला हवी. त्या पक्षालाच ते शक्य होईल व तसे करणे हे त्या पक्षाचे ऐतिहासिक कर्तव्य आहे.

वरील विवेचनात केवळ काँग्रेस पक्षालाच दोष देण्याचा हेतू नाही. कारण सांप्रदायिक वृत्ती ही कुठल्याही एका पक्षात मर्यादित झालेली नाही. आपण कितीही सेक्युलर आहोत असे म्हटले तरी, कुठेतरी मनात आपण हिंदू आहोत, मुसलमान आहोत, ख्रिश्चन आहोत किंवा पारशी आहोत ही भावना वसत असते. शिवाय धर्म किंवा रूढीविरुद्ध बोलणे व वागणे फार कठीण असते. अप्रिय बोलणे राजकारणात राहणाऱ्यांना परवडणारे नसते. आजही निवडणुकीत अमुक माणूस हिंदुविरोधी आहे असा प्रचार होतो. असा प्रचार संघाने व हिंदुमहासभेने

महात्मा गांधींच्या विरुद्ध केला होता; पण त्याचा परिणाम झाला नाही. आज मात्र तो होतो. एका बाजूला हिंदू म्हणून भूमिका घ्यायची व दुसरीकडून खलिस्तानला विरोध करायचा किंवा काश्मीर भारताचा भाग आहे असे म्हणायचे ह्यांत फार मोठा विरोधाभास आहे. हे जर हिंदूंचे राष्ट्र प्रगट किंवा अप्रगटपणे असले तर मग शिखांनी खलिस्तान मागणे काय किंवा मुसलमानांनी काश्मीर पाकिस्तानात जावे असे म्हणणे काय ह्याला आपण नैतिक भूमिकेवरून विरोध करू शकणार नाही; आणि केवळ सैन्यबळाने जर विरोध करायचा विचार काही लोकांच्या मनात असेल, तर ते वर्तमानकाळात जगत नाहीत असे म्हणावे लागेल. ह्या देशात जर खरेखुरे इहवादी शासन आले तरच धर्माचे क्षेत्र सीमित होईल. त्या सीमित क्षेत्रात धर्माचे स्वातंत्र्य अबाधितच राहील. पण धर्म म्हणजे काय ते ठरले पाहिजे. अंधश्रद्धा, उच्चनीचता आणि धर्मांधता हे आपल्या समाजाचे प्रमुख दोष आहेत व आधुनिक भारताला जर खराखुरा एकात्म समाज बनायचे असेल, तर हे दोष घालवले पाहिजेत. सर्वांना समान नागरी कायदा व्हायला हवा. त्याकरता मुसलमानांचे शिक्षण करायला हवे. मुसलमान समाजाचे पुढारी आपल्या स्वार्थाकरता त्या समाजाचे वेगळेपण टिकवून धरताहेत. आणि हे वेगळेपण कालबाह्य कायदे टिकवून ठेवण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. जर हिंदूंची अस्पृश्यता ह्या देशात राहू शकत नाही अशी आपली रास्त भूमिका आहे, तर ह्या देशात एका पुरुषाने चार बायका करणे किंवा नुसते "तलाक" हा शब्द तीन वेळा उच्चारून एकतर्फी घटस्फोट देणे हेही घालवणे आपले कर्तव्य आहे. ह्या गोष्टींचा धर्माशी काही संबंध नाही. आज अशी भूमिका जातीयवादी हिंदूने घेऊन चालणार नाही. जातीयवाद्यांनी समान नागरी कायद्याचा आग्रह धरल्यामुळे तो कायदा होणे आणखी कठीण होते. कारण मग मुस्लिम सनातन्यांना असे म्हणता येते की, हा हिंदूंचा मुसलमानांना नष्ट करण्याचा डाव आहे. समान नागरी कायद्याचा आग्रह इहवादी भूमिकेतून व संपूर्णपणे धर्मातीत शक्तींनीच करायला हवा. जसे हिंदू स्त्रीचे केशवपन हा धर्माच्या नावाखाली केलेला मानवावरचा अत्याचार होता तसाच बहुपत्नीकत्व आणि एकतर्फी घटस्फोट हा स्त्रीवरचा स्त्री म्हणून केलेला अन्याय आहे आणि तो धर्माच्या नावाखाली चालता कामा नये अशी भूमिका काँग्रेस पक्षाला घ्यावी लागेल.

"समाजवाद" ह्या शब्दाची व्याख्या कुणीच केलेली नाही. सामाजिक व आर्थिक न्याय हा तर त्याचा प्रमुख हेतू आहेच; परंतु ते घडवून आणण्याकरता अर्थव्यवस्थेची पुनर्रचनाही अपेक्षित आहे. थोड्या लोकांच्या हातांत अर्थव्यवस्थेची सूत्रे असता उपयोगाचे नाही, उत्पादनाची साधने बहुजन समाजाच्या हिताविरोधी वापरली जाऊ नयेत हीही व्यापक अशी उद्दिष्टे आहेत. महात्मा गांधींना जी अर्थव्यवस्था अभिप्रेत होती तीत बडे उद्योगधंदे अपेक्षित नव्हते. प्रत्येक खेडे हे स्वयंपूर्ण व्हावे ह्या भूमिकेवरून त्यांनी विचार केला होता. तो आधुनिक जगात व्यवहार्य ठरणे कठीण होते. स्वातंत्र्यपूर्व काळापासून ह्या देशाच्या गरिबीचा व सामाजिक अन्यायाचा विचार ज्या थोड्या काँग्रेसी नेत्यांनी केला होता त्यांत पं. जवाहरलाल नेहरू हे होते. त्यांना समाजवादाचे आकर्षण होते आणि म्हणूनच ते समाजवादी चळवळीचे अध्वर्यू मानले जात. काँग्रेसमध्ये सरदार पटेल हे उजव्या गटाचे पुढारी मानले जात. त्यांचा पक्षसंघटनेवर ताबा होता. नेहरूंनी पक्षाविरुद्ध बंड करावे व बाहेर पडावे असा पक्षातल्या समाजवादी मंडळींचा आग्रह होता पण नेहरूंनी तसे केले नाही. विरोधात राहून आपण समाजवादासाठी काहीही करू शकणार नाही, त्यापेक्षा सत्ता राबवूनच काही करता येईल असा त्यांचा विचार असणार. गांधींनी त्यांनाच आपले वारस मानले होते आणि स्वातंत्र्य मिळाल्यावर तेच पंतप्रधान झाले. स्वातंत्र्यपूर्व काळापासून आर्थिक नियोजनाद्वारे विकास करायचा हे धोरण त्यांनी काँग्रेस पक्षात मांडले होते. पंतप्रधान झाल्यावर त्यांनी ते अमलात आणले. राज्यघटना तयार करताना घटना समितीत आर्थिक लोकशाहीवर बरीच चर्चा झाली. मालमत्तेच्या अधिकारावरही खूप चर्चा झाली. प्रत्येक व्यक्तीला मालमत्तेचा अधिकार देण्यात आला. त्यावर मर्यादा किंवा बंधने घालायची असल्यास ती कायद्यानेच घालता येतील हेही ठरले. मात्र खाजगी मालमत्ता ठेवण्यावर सामाजिक हितार्थ

अनुक्रमणिका

मर्यादा घालण्याचा अधिकार शासनाला दिला गेला. ह्या मर्यादा वाजवी असाव्यात व त्या वाजवी आहेत की नाहीत हे बघण्याचा अधिकार न्यायालयांचा हेही मान्य झाले. पण जर खाजगी मालमत्ता शासनाने घेतली, तर नुकसानभरपाई दिली जावी हेही सांगण्यात आले. ह्यावर घटनासमितीत खूप चर्चा झाली. काँग्रेसमधले काही डावे व साम्यवादी, समाजवादी ह्यांना नुकसानभरपाई देऊच नये असे वाटत होते, तर उजव्यांना ती पूर्णपणे म्हणजे मालमत्तेच्या किंमतीइतकी द्यावी असे वाटत होते. ह्या वेळी काँग्रेस पक्षाने जमीनदाऱ्या नष्ट करण्याचा कार्यक्रम हाती घेतला होता. उत्तर हिंदुस्थानात इंग्रजी राज्यात ही पद्धत अस्तित्वात आली होती. सुरुवातीला शेतकऱ्यांकडून सरकारला खंड वसूल करून देणारे दलाल, पुढे त्या जमिनीचे मालक झाले होते. काहींना इंग्रजी राज्याचे निष्ठावंत म्हणूनही ह्या देणग्या मिळाल्या होत्या. त्यांनी स्वतः कधी शेती कसली नव्हती. सरकारला जो सारा द्यायचा त्यापेक्षा कितीतरी जास्त ते शेत कसणाऱ्यांकडून वसूल करत आणि सारा देऊन उरलेली रक्कम स्वतःसाठी ठेवत. जमिनीवर ते कधीही मशागतीसाठी खर्च करत नसत. केवळ जमिनीच्या मालकीचा फायदा जास्तीतजास्त पिळवणूक करण्याकरता ते करत. ह्या जमीनदारांना नुकसानभरपाई किती द्यायची? घटनासमितीत नेहरूंनी सांगितले की, कुणाचीही मालमत्ता नुकसानभरपाई न देता काढून घेण्याचा सरकारचा हेतू नाही. पण 'नुकसानभरपाई' ठरवताना आज त्या मालमत्तेच्या मालकीचा सर्व बाजूंनी विचार व्हावा लागेल. त्यामुळे नुकसान-भरपाईची तत्त्वे अगर रक्कम संसदेने ठरवावीत—न्यायालयांनी त्यात हस्तक्षेप करू नये. हा विचार त्या वेळी सर्वांना मान्य झालेला दिसला. परंतु पुढे न्यायालयांनी त्या प्रश्नांवर जे निर्णय दिले त्यांनुसार नुकसानभरपाई म्हणजे बाजारी किंमत असा अन्वयार्थ दिला गेला. ह्या बाबतीत न्यायालयांनीही फार कायदेनिष्ठ भूमिका घेतली आणि त्या भूमिकेचे खंडण करण्याकरता संसदेला घटनादुरुस्त्या कराव्या लागल्या ह्याचा इतिहास माझ्याच पूर्वीच्या एका लेखात दिला आहे (सत्यरंजन साठे, "खाजगी मालमत्तेचा अधिकार व भारतीय घटना", समाज प्रबोधन पत्रिका; नोव्हेंबर, डिसेंबर, १९७२). नेहरू-काळात राज्यघटनेत १७ दुरुस्त्या झाल्या. त्यांपैकी तीन दुरुस्त्या ह्या मालमत्तेच्या अधिकारावर मर्यादा लादणाऱ्या झाल्या. संसदेला प्रत्येक सभागृहात हजर असलेल्या व मतदान करणाऱ्या सभासदांपैकी दोन-तृतीयांश व एकूण सदस्यसंख्येच्या निम्म्याहून अधिक सभासदांच्या पाठिंब्याने घटनादुरुस्ती विधेयक मंजूर करून घ्यावे लागत होते. परंतु काँग्रेस पक्षाला हे बहुमत मिळवणे कधीच कठीण गेले नाही. १९५५ मध्ये आवडी येथे भरलेल्या काँग्रेस अधिवेशनात समाजवादाचा ठराव मान्य झाल्यापासून काँग्रेस पक्षाने ह्याबाबत खंबीर भूमिका घेतली. न्यायालयांचा जो विरोध झाला तो घटनादुरुस्ती करून मोडून काढला. संसदेला घटनादुरुस्ती करण्याचा अधिकार नाही; कारण मूलभूत अधिकारांचा संकोच करण्याचा तिला अधिकार नाही असा युक्तिवाद १९५१ मध्ये सर्वोच्च न्यायालयापुढे केला गेला, पण तो न्याया-लयाने फेटाळून लावला. १९६५ साली संसदेला मूलभूत अधिकारांचा संकोच करणारी घटनादुरुस्ती करायचा अधिकार नाही असा युक्तिवाद पुन्हा एकदा सर्वोच्च न्यायालयापुढे आला. ह्याही वेळी तो फेटाळण्यात आला. परंतु पूर्वीच्या वेळी तो ५ न्यायाधीशांनी एकमताने फेटाळला तर ह्या वेळी ३ विरुद्ध २ मताने तो फेटाळला गेला. ज्या दोन न्यायाधीशांनी विरुद्ध मत दिले ते होते न्या. हिदायतुल्ला व न्या. मुधोळकर. १९६७ मध्ये गोलकनाथ खटल्यात ६ विरुद्ध ५ मताने संसदेला घटनादुरुस्ती करून मूलभूत अधिकारांत संकोच करता येणार नाही असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला.

१९६९ मध्ये काँग्रेस पक्षात फार मोठे स्थित्यंतर झाले. ते म्हणजे हा पक्ष फुटला. श्रीमती इंदिरा गांधी ह्या १९६५ पासून पंतप्रधान होत्या. १९६७ मध्ये त्या पुन्हा नेतेपदी निवडल्या गेल्या. पण सिंडिकेट नावाने ओळखला गेलेला पक्षातला सत्तागट त्यांच्यावर खूश नव्हता. आपल्या तंत्राने त्या चालतील अशा विश्वासाने त्या गटाने त्यांना पंतप्रधानपदी आणले होते. परंतु त्यांनी स्वतंत्रपणे निर्णय द्यायला सुरुवात केल्यावर त्यांना दूर करण्यासाठी प्रयत्न सुरू झाले. इंदिरा गांधींनी

पक्षाचा उमेदवार श्री. संजीव रेड्डी ह्यांचा राष्ट्रपतीच्या निवडणुकीत विरोधी मतदान करून पराभव केला. आपली जहाल व डावी प्रतिमा प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी बँकांचे राष्ट्रीयीकरण केले; नरेशांचे तनखे बंद करणारा हुकूम राष्ट्रपतींकडून काढविला व आय. सी. एस. अधिकाऱ्यांच्या विशेष सवलती रद्द केल्या. ह्यांपैकी बँकांचे राष्ट्रीयीकरण व नरेशांचे तनखे रद्द करणारा हुकूम सर्वोच्च न्यायालयाने रद्दबातल ठरवले. १९७१ मध्ये इंदिरा गांधींनी संसदेचे विसर्जन केले व नवीन निवडणुका घेतल्या.

"गरिबी हटाव" ह्या कार्यक्रमासह त्या मतदारांकडे गेल्या व त्यांनी अभूतपूर्व असा विजय मिळवला. १९७१ मध्ये त्यांच्या काँग्रेस पक्षाला लोकसभेत दोनतृतीयांश जागा मिळाल्या. त्यानंतरच्या राज्यांच्या निवडणुकीतही असेच यश मिळाले. त्याच्या आधी बांगलादेश युद्धात त्यांनी भारताला गौरवशाली बनवले. त्या वेळी त्या लोकप्रियतेच्या शिखरावर होत्या. गोलकनाथ खटल्यात संसदेला मूलभूत अधिकारांत कपात करणारी घटनादुरुस्ती करण्याचा अधिकार नाही असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला होता. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने बँकांचे राष्ट्रीयीकरण करणारा कायदा रद्दबातल ठरवला होता आणि नरेशांच्या तनख्याविषयीचा हुकूम रद्द ठरवला होता. ह्यापूर्वी सर्वोच्च न्यायालयांनी मालमत्तेच्या अधिकाराबाबत असे निर्णय दिले होते की, ते श्रीमंतांचे पाठीराखे आहेत असा समज निर्माण झाला होता. परिवर्तनवादी कायदे श्रीमंतांच्या, हितसंबंधीयांच्या हिताविरुद्धचे होते. त्यामुळे त्या कायद्यांना विरोध करण्याकरता तेच न्यायालयात गेले. न्यायालयांचे बहुतेक निर्णय त्यांच्या बाजूने झाले. गोलकनाथ व त्यानंतरचे बँक राष्ट्रीयीकरण वगैरेंच्या निर्णयामुळे सर्वोच्च न्यायालयांची ही प्रतिमा आणखीच दृढ झाली. १९७१ च्या निवडणुकीत वरील न्यायालयीन निर्णयांना रद्द करणारी घटनादुरुस्ती आपण करू असे वचन काँग्रेस पक्षाच्या जाहीरनाम्यात होते. ह्या निवडणुकीत भरघोस यश मिळवल्यावर इंदिरा गांधींच्या सरकारने २४ व २५ ह्या घटनादुरुस्त्या संमत करून घेतल्या. २४ व्या घटनादुरुस्तीचा हेतू गोलकनाथ खटल्यातील निर्णय फिरवून संसदेचा घटनादुरुस्ती करण्याचा अधिकार अमर्यादित आहे असे स्पष्ट करण्याचा होता, तर २५ वी घटनादुरुस्ती मालमत्तेच्या अधिकारावर आणखी बंधने लादणारी होती. ह्या घटनादुरुस्तीने ३१-क हे कलम घटनेत घातले. त्यानुसार मार्गदर्शक तत्त्वाच्या यादीतील कलम ३९ (ब) व (क) ह्या तरतुदींची कार्यवाही करणाऱ्या कायद्यास तो कलम १४, १९ व ३१ ह्यामध्ये दिलेल्या मूलभूत अधिकारांचा संकोच करतो हे कारण देऊन आक्षेप घेता येणार नाही असे सांगितले गेले. सर्वोच्च न्यायालयाने ह्या दोन्ही घटनादुरुस्त्यांची वैधता केशवानंद भारती खटल्यात तपासली. २४ व २५ ह्या दोन्ही घटनादुरुस्त्या वैध आहेत असा निर्णय दिला. परंतु २५ व्या घटनादुरुस्तीतले कलम ३१ क मधले एक उपकलम रद्दबातल ठरले. मात्र घटनादुरुस्तीच्या अधिकाराबाबत न्यायालयाने असे सांगितले की, राज्यघटनेची सारभूत अंगे किंवा मूलभूत चौकट नष्ट करणारी घटनादुरुस्ती संसदेला करता येणार नाही. (पहा, सत्यरंजन साठे, " न्यायालयीन पुनरावलोकन–केशवानंद भारती निर्णयाच्या निमित्ताने " समाज प्रबोधन पत्रिका, नोव्हें–डिसें. १९७४).

खरे म्हणजे असलेल्या अधिकारांचा उपयोग करूनही शासनाला पुष्कळ काही करता आले असते. परंतु ते करण्याची इच्छाच राहिली नाही. १९६९ पासून काँग्रेस पक्षाच्या सवंग राजकारणाला सुरुवात झाली. नेहरूंची समाजवादावर श्रद्धा होती आणि लोकशाही प्रक्रियेनुसार तो आणावयास ते बांधलेले होते. त्याकरता त्यांनी प्रयत्नही केले होते. अर्थात काँग्रेस पक्षावर भांडवलदारांचे वर्चस्व असल्याने त्याला फारसे करता येणे शक्यच नव्हते. नेहरूंचे हेतू चांगले होते; परंतु त्यांचे यश मर्यादितच राहिले. समाजवादामुळे आलेल्या नियंत्रणाचा फायदा भांडवलदार आणि नोकरशाही ह्यांनीच घेतला. (पहा, अ. रा. कामत, **स्वातंत्र्योत्तर भारतातील सामाजिक बदल**, मागोवा प्रकाशन, १९८२) नेहरूंच्या हयातीत त्यांच्या समाजवादी धोरणाला विरोध असणारे गप्प होते. त्यांच्या निधनानंतर त्यांनी उचल खाल्ली. आणि त्याला प्रत्युत्तर म्हणून

व स्वतःच्या हितरक्षणार्थ इंदिरा गांधींनी जहाल समाजवाद्याची प्रतिमा धारण केली. जुने हितसंबंधीय किंवा समाजवादाला विरोध करणारे गेले; पण जे आले ते मात्र कुठलीही श्रद्धा नसलेले–फक्त स्वतःचे हित साधू पाहणारे. अशा लोकांमार्फत कुठलाही सामाजिक–आर्थिक परिवर्तनाचा कार्यक्रम अमलात आणणे कठीणच. त्यातून अनेकांचा सामाजिक–आर्थिक कार्यक्रमाला विरोधच होता. कमाल जमीनधारणा कायदा केला; पण त्याची कार्यवाही झाली नाही. अतिरिक्त जमिनीचे वाटप भूमिहीनांना व्हायचे ते झाले नाही. हरितक्रांतीचा फायदा श्रीमंत शेतकऱ्यांनी घेतला व आपली अर्थव्यवस्थेवरची पकड अधिकच घट्ट केली. सार्वजनिक क्षेत्रांची जबाबदारी ज्या नोकरशाहीवर पडली, तिला बांधिलकीही नव्हती आणि कार्य-कुशलताही नव्हती. कधी नव्हे इतका भ्रष्टाचार बोकाळला. स्वतः इंदिरा गांधींनाही हे दिसू लागले. त्याच वेळी जयप्रकाश नारायण ह्यांनी भ्रष्टाचारा-विरोधी आंदोलन सुरू केले. निवडणुकीत अभूतपूर्व विजय मिळवूनही प्रत्यक्षात काहीही करू न शकल्यामुळे अधिकारारूढ पक्षाचाही आत्मविश्वास कमी होत होता. त्यातच इंदिरा गांधींची निवडणूक अलाहाबाद उच्च न्यायालयाने रद्द ठरवली. ह्या सर्व गोष्टी विरुद्ध गेल्यावर विरोध दडपून टाकणे येवढेच हातात राहिले आणि ते करण्याकरता आणीबाणी लादली गेली. वीस कलमी योजना म्हणजे समाजवादाची थट्टाच होती. आणीबाणीच्या काळात अनेक घटनादुरुस्त्या केल्या. काँग्रेस पक्षाच्या शंभर वर्षांतला सर्वांत दुर्दैवी असा तो कालखंड आहे असे नाइलाजाने म्हणावे लागते. पंतप्रधानांनी कुठलाही गुन्हा केला असता त्याविरुद्ध कुठलीही न्यायालयीन कारवाई होऊ नये अशी घटनादुरुस्ती संसदेच्या एका सभागृहाने पास केली. तसेच पंतप्रधानांची जी निवडणूक अलाहाबाद उच्च न्यायालयाने रद्द ठरवली ती वैधच आहे असे घोषित करणारी घटनादुरुस्तीही पास झाली. (ह्याची चर्चा पहा, सत्यरंजन साठे, "पंतप्रधान निवडणूक खटला : सर्वोच्च न्याया-लयाच्या निर्णयाचा अर्थ आणि अन्वयार्थ", समाज प्रबोधन पत्रिका, जाने., फेब्रु. १९७६) ह्यापैकी ४२ व्या घटनादुरुस्तीने राज्यघटनेच्या प्रतिज्ञा-पत्रकात "समाजवाद" हा शब्द घालण्यात आला. आपण समाजवाद आणू शकलो नाही– उलट, सामाजिक अन्याय वाढवण्यासच कारणीभूत झालो अशा अपराधित्वाच्या भावनेमुळे हा शब्द घालण्यात आला की स्वतःची व देशाची वंचना करण्याचा तो प्रयत्न होता हे सांगणे कठीण आहे. बेचाळिसाव्या घटनादुरुस्तीविरुद्ध प्रस्तुत लेखकाने इंग्रजीत लेख लिहिला होता. (पहा, एस. पी. साठे, फॉर्टी फोर्थ कॉन्स्टिटयूशनल अमेंडमेंट, २३–१०–७६, इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकली. हा लेख प्रा. ए. बी. शहा ह्यांनी संकलित केलेल्या व सिटिझन्स फॉर डेमॉक्रसीने प्रसिद्ध केलेल्या "डेमॉक्रसी अँड कॉन्स्टिटयूशन : फॉर्टीसेकंड अमेंडमेंट बिल" ह्या पुस्तिकेतही समाविष्ट झाला होता.) नेहरूंची समाजवादावर नितांत श्रद्धा असूनही त्यांनी राज्यघटनेत तो शब्द समाविष्ट केला नव्हता. "समाजवाद" आणि "धर्मनिरपेक्षता" ह्यांचे आशय राज्यघटनेत होतेच. समाजवाद म्हणजे विषमतेचे निर्मूलन, सामाजिक न्यायाची प्रस्थापना ह्या अर्थी सर्वांनाच मान्य होता. समाजवाद म्हणजे सर्वंकष राष्ट्रीयीकरण असा अर्थ काही ठिकाणी घेतला जातो आणि म्हणून तो घटनेत घेतलेला नव्हता. कारण घटनेत असे तपशील घातल्याने शासनाच्या स्वातंत्र्यावर उगीच बंधने पडतात. आर्थिक धोरण हे लवचीक असावे– व्यावहारिक असावे. सार्वजनिक क्षेत्र आणि खाजगी क्षेत्र ह्या दोन्हींचा उपयोग विकासाकरता करून घ्यावा लागेल आणि उपयुक्तते-प्रमाणे तो किती करायचा, कुठे करायचा हे ठरवावे लागेल. समाजवाद म्हणजे शासकीय नियंत्रण असाही अर्थ घेतला जातो. तसे असण्याचे कारण नाही. नियंत्रणे कमी करता आल्यास करावी. कारण नियंत्रणामुळे अकार्यक्षम उद्योजकांना संरक्षण मिळते आणि भ्रष्टाचाराला वाव मिळतो.

भारतीय राजकारणात "समाजवाद" हा परवलीचा शब्द आला आहे. आणि अगदी भाजप-सकट सर्वच पक्ष त्याचा उल्लेख करतात. आता राज्यघटनेतच तो समाविष्ट झाल्याने सर्वच पक्ष त्यांना बांधलेले असले पाहिजेत. म्हणून त्या शब्दाचा अर्थ जास्त व्यापक आणि लवचीकता

देणारा असावा. त्या दृष्टीने पाहिले तर गेल्या १५–२० वर्षांत गरीब आणि श्रीमंत ह्यांच्यातली दरी वाढली आहे. झोपडपट्ट्यांचा प्रश्न आणखी ज्वलंत झाला आहे. त्यावरून काय दिसते ? ज्या ठिकाणी काही लोक श्रीमंतीचे नागडेउघडे प्रदर्शन करावयास मोकळे आहेत त्याच ठिकाणी हजारो कुटुंबे मानवी हक्कविरहित जीवन जगत आहेत. साधी संडासाची सोय लोकांना नाही– पिण्याचे पाणी नाही. दुसरीकडे आज पंचतारांकित हॉटेले खूप आहेत. हा आमचा समाजवाद आहे का ? भ्रष्टाचार आणि काळा पैसा हे आज मुक्तपणे वावरत आहेत. सामान्य माणूस आज हताश झाला आहे– लाचार झाला आहे– तो दैववादी तरी होतो आहे, नाहीतर अतिशय वैफल्यग्रस्त झाला आहे. प्रत्येक पक्षाजवळ हिंसा करणाऱ्या गुंडांच्या संघटणा आहेत. नोकरी नसणारे अनेक तरुण आज पैशाकरता गुंडगिरी करायला उपलब्ध आहेत. शिवाजी उत्सव, गणेशोत्सव, नवरात्रोत्सव अशा सणांत व उत्सवांत लोकांना गुंतवून सामाजिक परिवर्तनावरून त्यांचे लक्ष दुसरीकडे मुद्दाम वळवण्यात येत आहे काय, अशी शंका येण्यासारखी परिस्थिती आहे. व्यवहार्य ह्या नावाखाली सर्वच तत्त्वे सोडण्यावर भर आहे. सर्व प्रतिगामी शक्ती एकत्र येत असल्याचाही प्रत्यय येतो आहे. सांप्रदायिकता, जातीयता ह्या शक्ती राष्ट्रीय एकात्मतेचा बुरखा घेऊन आक्रमकपणे पुढे येत आहेत. ह्या शक्तींनी महात्मा गांधींचा द्वेष केला. नेहरूंचा राग केला. ह्या शक्ती आज उघडउघड समाजवादी विचाराच्या व इहवादी विचारांच्या लोकांना नेस्तनाबूत करायला सज्ज झाल्या आहेत. दुर्दैवाने अशा वृत्तीच्या लोकांचा काँग्रेसमध्ये फार मोठ्या प्रमाणात शिरकाव झाला आहे. शुद्ध इहवादी भूमिका घेतली असती, तर पंजाबचा प्रश्न ह्या स्वरूपात आला नसता. अल्पसंख्याकांचा मूलभूत वाद जर खंबीरपणे रोखायचा असेल, तर हिंदूंसकट सर्व जमातींमधला जातीयवाद मागे रेटला पाहिजे. त्याविरुद्ध खंबीरपणे उभे राहायला हवे. मग हिंदूंची गोवधबंदीची मागणी असो किंवा मुसलमानांची शेरियतची मागणी असो, दोन्हींचा सारख्याच निर्धाराने विरोध व्हायला हवा. समाजवाद म्हणजे फक्त अर्थव्यवस्थेबाबतचे तत्त्वज्ञान असे नसून ती एक जीवनदृष्टी आहे. समाजवादी शासन हे इहवादी, लोकशाहीप्रधानच असायला हवे.

पं. जवाहरलाल नेहरू हे भारताचे पहिले पंतप्रधान. भारतात लोकशाही रुजण्यात त्यांचा मोठा वाटा आहे ह्यात शंका नाही. परंतु लोकशाही म्हणजे केवळ निवडणुका नव्हे. निवडणुका स्वच्छ आणि मोकळ्या पद्धतीने व्हायला हव्यात. निवडणुकांमध्ये होणारा बेसुमार खर्च भ्रष्टाचाराची जननी आहे. लोकशाही काही संस्थांवर अवलंबून असते, त्यांपैकी पक्षसंघटणा, न्यायालये आणि वृत्तपत्रे ही सर्वांत महत्त्वाची. काँग्रेस पक्षाची संघटणा खिळखिळी झालेली आहे. सर्व सत्ता पंतप्रधानांच्या हाती आहे. राज्यांचे मुख्यमंत्री केंद्र-श्रेष्ठींकडूनच नेमले जाण्याची प्रथा गेल्या दोन दशकांत रूढ झाली आहे. पक्षांतर्गत निवडणुका न होणे व सर्व पदाधिकारी नेमले जाणे हे नित्याचे झाले आहे. आपल्याच पक्षाचे सरकार पाडण्याचा प्रयत्न काँग्रेसजन करतात हेही अनेकवेळा अनुभवास आले आहे. पक्षांची शिस्त हा प्रकार राहिलेला नाही. पक्षांतर हा एक मोठा रोग लागला होता व त्यामुळे सरकारे पाडण्याला ऊत आला होता. थोड्या फायद्याकरता किंवा लाच घेऊन पाठिंबा देणारे किंवा काढून घेणारे आमदार सर्वत्र आहेत. पंतप्रधान राजीव गांधींनी पक्षांतरविरोधी कायदा करून एक चांगले पाऊल टाकले आहे. ह्या कायद्यातील पळवाटांचा फायदा घेणारे तरीही येतीलच.

न्यायालयांच्या बाबतीतही तेच म्हणता येईल. राजकीय हेतूने न्यायाधीशांच्या नेमणुका करण्यात येतात अशी तक्रार विधि-आयोगाने १९५८ मध्ये १४ व्या अहवालात केली होती. त्या वेळेपेक्षा आज परिस्थिती जास्त गंभीर आहे. न्यायालयांत भ्रष्टाचाराचे प्रमाण वाढले आहे असे लोक उघड बोलत आहेत. (पहा, न्या. कृष्ण अय्यर, दि केस फॉर रिफॉर्म, जस्टिस जज्ज बाय सेल्फ आणि टूवार्डस न्यू अवेअरनेस, इलस्ट्रेटेड वीकली, १३ ऑक्टो., २० ऑक्टो. आणि २७ ऑक्टो. १९८५) न्यायालयातला विलंब आणि खर्च ह्यांमुळे न्याय डावलला जातो. चांगले न्यायाधीश नेमले जाणे, वकिलीचा दर्जा वाढणे, न्यायप्रक्रियेत मूलभूत

अनुक्रमणिका

बदल होणे आवश्यक आहे. काही न्यायाधीशांचा ज्येष्ठताक्रम डावलणे किंवा त्यांच्या बदल्या करणे हा काही सुधारणेचा मार्ग नव्हे.

वृत्तपत्रांनी मात्र त्यामानाने आपले स्वातंत्र्य टिकवले आहे. काही अपवाद वगळता वृत्तपत्रांच्या स्वातंत्र्यावर बंधने आलेली नाहीत.

विरोधी पक्ष सध्या फार वाईट स्थितीत आहेत. केवळ व्यक्तिविरोधावर विरोधी पक्षांचा जोवर भर आहे तोवर त्यांचे असेच व्हायचे. तरी संघराज्यांत विरोधी पक्ष प्रादेशिक पातळीवर अस्तित्वात आहेत. आज उत्तरेत पंजाब व काश्मीरमध्ये, पूर्वेला बंगालमध्ये आणि दक्षिणेत केरळ, कर्नाटक, तामीळनाडू, आंध्र ह्या राज्यांमध्ये विरोधी पक्षांची सरकारे आहेत. काँग्रेस पक्षाने संघराज्यतत्त्वाची आजवर फारशी कदर केलेली नाही. देशाची एकता व एकात्मता म्हणजे काँग्रेसचे सर्वत्र राज्य असे समीकरण राजीव गांधींसकट सर्व काँग्रेसपक्षीयांनी मांडलेले आहे. ह्या वृत्तीने देश एकत्र राहणे जास्त कठीण होईल. प्रादेशिक स्वायत्तता (राज्यघटनेच्या चौकटीतली) मान्य केल्यानेच राष्ट्रीय एकात्मता वाढीस लागेल. दोन पातळ्यांवर निरनिराळ्या पक्षांची सरकारे असणे हे तत्त्वत:च नव्हे, तर प्रत्यक्षातही काँग्रेसने मान्य करायला हवे. काश्मीर आणि पंजाब येथील प्रादेशिक पक्षांबाबतच नव्हे, तर सर्व विरोधी पक्षांबाबत उदारपणाची भूमिका काँग्रेसने घ्यायला हवी. काश्मीर आणि पंजाबमधील परिस्थिती नाजूकपणे हाताळण्याची आवश्यकता आहे. ह्या राज्यांची स्वायत्तता मान्य करायची आणि त्याचबरोबर अखिल भारतीय राजकीय प्रवाहात त्यांना समाविष्ट करायचे ही जबाबदारी काँग्रेसलाच पार पाडावी लागेल.

पंतप्रधान इंदिरा गांधींचा काळ हा काहीसा अस्वस्थतेचा, संघर्षाचा होता. त्याला काही प्रमाणात इंदिरा गांधींची असुरक्षिततेची भावना, त्यांची वागण्याची शैली आणि लोकशाही मूल्यांबाबत त्यांनी दाखवलेली उपेक्षा ह्या जबाबदाऱ्या होत्या. त्याचप्रमाणे विरोधकांचा व्यक्तिद्वेष आणि वैफल्याचे राजकारणही जबाबदार होते. पंतप्रधान इंदिरा गांधींचा अमानुष वध हा पंजाबबाबत धर्म आणि राजकारण यांची गल्लत केल्यामुळे झाला. त्याला त्या एकट्या जबाबदार होत्या असे म्हणता येणार नाही. ही गल्लत अनेक वर्षे होत आहे. अमृतसरच्या सुवर्णमंदिरात सैन्य धाडले ही मी चूक मानीत नाही. तर त्या मंदिरात एवढ्या मोठ्या प्रमाणावर शस्त्रास्त्रांचा साठा होऊ दिला हीच चूक. अकाली-दलाच्या स्वायत्ततेच्या मागण्यांबाबत दिरंगाई केली पण धार्मिक मागण्या मान्य केल्या ही चूक. यापुढे तरी शासनाने सर्व धार्मिक गटांना स्पष्टपणे सांगितले पाहिजे की, धर्माच्या क्षेत्रात आम्ही हस्तक्षेप करणार नाही. पण जे धर्माचे नाही त्यात मात्र तुम्हाला वाटेल ते करता यायचे नाही. येथे राज्यघटना हीच अंतिम शक्ती होय. संसद हीच सार्वभौम आहे. सर्वोच्च न्यायालय हेच अंतिम न्यायालय आहे. ह्यांची अमलबजावणी केवळ हिंदूपुरती न करता सर्वांना कठोरपणे लागू केली पाहिजे.

पंतप्रधान राजीव गांधी ह्यांचे पहिले वर्ष पुरे झाले आहे. एक धीरगंभीर, तरुण, तडकाफडकी निर्णय घेण्याची क्षमता असणारा विचारविनिमयाने, सर्वांच्या सहमताने चालणारा नेता असा विश्वास त्यांनी निर्माण केला आहे. केंद्र–राज्य संबंधाबाबत काही नवे पायंडे पडतील असे मला वाटते आहे. स्वच्छ सरकार– लोकशाही व धर्मनिरपेक्षता या मूल्यांशी बांधिलकी असणारे सरकार देण्याची त्यांची ग्वाही आहे. पक्षांतरबंदीचा कायदा त्यांनी केला आहे. विरोधी पक्षांची राज्यसरकारे पाडायची नाहीत असा निश्चय दिसतो. लोकपालनियुक्तीचे विधेयक संसदेत मांडले आहे. ते चिकित्सासमितीकडे धाडण्यात आले आहे. आर्थिक धोरणात बदल झाले आहेत. शैक्षणिक धोरणाचीही चर्चा सुरू आहे. पण राजीव गांधींना अडचणीत आणणार आहेत त्यांचेच पक्ष-सदस्य. त्यांचेच हितसंबंध ह्या नव्या धोरणामुळे अडचणीत येणार आहेत आणि मग ते त्यांना निष्प्रभ करायसाठी प्रयत्न करतील. विरोधी पक्षांनी तर आपले तत्त्वहीन राजकारण सुरू ठेवले तर काँग्रेसी असंतुष्टांना ते उत्तेजन देतील. राजीव गांधी ह्यातून कसा मार्ग काढतात ते बघायचे. पुन्हा एकदा तत्त्व-निष्ठ आणि बांधिलकीचे राजकारण सुरू होवो अशी शताब्दीच्या निमित्ताने काँग्रेस पक्षाच्या सर्व हित-

चिंतकांची इच्छा असणारच. आजही अखिल भारतीय पातळीवर काँग्रेसला पर्याय दिसत नाही. केवळ काँग्रेसविरोध ह्या एका मुद्द्यामुळे एकी होणाऱ्या विरोधी पक्षांना जनतेचा विश्वास लाभणार नाही. भारताला अनेक संकटांना तोंड द्यायचे आहे. परकी शत्रूंपासून धोका आहे, तसेच अंतस्थ दुहीपासूनही धोका आहे. ह्या आव्हानांना तोंड देण्यासाठी आजही फक्त काँग्रेस पक्षच डोळ्यांसमोर येतो. लोकशाही खऱ्या अर्थाने सहभागाची करणे- सत्तेत जनतेचा सहभाग निर्माण करणे- इहवादी शासन स्थापणे व सामाजिक न्याय प्रस्थापित करणे ही आजची आव्हाने आहेत. तरुण पंतप्रधान ती कशी पेलतात व त्याकरता ते पक्षाचे स्वरूप कसे बदलतात ह्यावर सर्व अवलंबून आहे.

⊙ ⊙ ⊙

साभार पोच-

* **गर्द** - अनिल अवचट ; श्रीविद्या प्रकाशन, २५० शनिवार पेठ, पुणे ३० ; १९८६ ; पृ. १४७ ; किं. ४० रु.
* **पुस्तकांची दुनिया** - प्रा. दिनकर बोरीकर ; जयहिंद प्रिंटिंग प्रेस, औरंगाबाद- ४३१००१ ; १९८६; पृ. ६०.
* **वनश्री आणि वनविज्ञान** - घ. भ. दशपुत्रे; काँटिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे-३० ; १९८६ ; पृ. १४७ ; किं. ४० रु.
* **राजेश्री** - ना. सं. इनामदार; काँटिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे-३०; १९८६ ; पृ. ६९४ ; किं. ८० रु.
* **दूरदेशीच्या गोष्टी** (कथासंग्रह) अजिता काळे, श्रीविद्या प्रकाशन, २५० शनिवार, पुणे- ३० ; १९८६ ; पृ. १३४; किं. ४० रु.
* **धरती, सागर आणि शिंपले** (कादंबरी) - अमृता प्रीतम ; अनुवाद पद्माकर जोशी ; श्रीविद्या प्रकाशन, पुणे-३० ; १९८६; पृ. १२८; किं. ३० रु.
* **पहिला बाजीराव** (नाटक)- कवि उल्हास (नारायण सदाशिव बापट) चारुचंद्र प्रकाशन, ७५९/६१ कर्वे रोड, पुणे - ४११००४ ; १९८५ ; पृ. १३४ ; किं. ३० रु.

अनुक्रमणिका

शंभर वर्षांतील काँग्रेसचे शेतीविषयक धोरण

पन्नालाल सुराणा

काँग्रेसच्या शेतीविषयक धोरणात शंभर वर्षांत कसकसा फरक पडत गेला हे पाहण्यासारखे आहे.

१८८५ साली काँग्रेसची स्थापना झाली, आणि दुसऱ्याच वर्षापासून शेतीविषयक प्रश्नांचा विचार सुरू झाला. १८८५ ते १९२० या कालखंडात शेतसारा, जंगलविषयक कायदे, पाणीदर यांसारखे प्रश्न हाताळले गेले.

ब्रिटिश अंमल कायम झालेल्या प्रदेशांत सर्व जमिनींची कायदेशीर मालकी सरकारची आहे असे मानण्यात आले होते. प्रत्यक्ष जमीन कसणारा हा भोगवटा करणारा असून त्याला तेवढाच हक्क (ऑक्युपन्सी राईट) आहे असे मानले गेले. ज्या भागांत रयतवारी पद्धत लागू करण्यात आली तेथे शेतसारा शेतकरी स्वत: सरकारात भरत असे. साऱ्याची आकारणी एकदा झाली की, फेरआकारणी तीस वर्षांनंतर होईल असा नियम करण्यात आला होता. काही भागांत शेतसाऱ्याची ठरावीक रक्कम दरवर्षी सरकारात भरण्याच्या अटीवर शेतकऱ्यांकडून सारा वसूल करण्याचा हक्क काही बड्या शेतकऱ्यांना देण्यात आला होता. असे हक्क मिळालेल्यांना वेगवेगळ्या भागांत काही ठिकाणी जमीनदार म्हणत, तर काही ठिकाणी इजारेदार, तालुकदार, मालगुजार वगैरे म्हणत. काही जमीनदारांकडून साऱ्याची किती रक्कम भरायची ते तीस वर्षे मुदतीसाठी ठरवण्यात आले होते. त्याला पर्मनंट सेटलमेंट म्हणत. अन्य मध्यस्थांबाबत सरकारी अधिकारी मन मानेल तेव्हा साऱ्याची रक्कम वाढवीत. वास्तविक इंग्लंडमधील सेक्रेटरी ऑफ स्टेटने १८६० व १८६२ साली असे आश्वासन दिले होते की, साऱ्याची रक्कम अधेमधे वाढवली जाणार नाही. पण प्रत्यक्षात एक-दोन वर्षांनी वाढ व्हायची.

१८८८ साली अलाहाबाद येथे झालेल्या काँग्रेस अधिवेशनात हा प्रश्न चर्चिला गेला. बाबू वैकुंठनाथ सेन यांच्या अध्यक्षतेखाली या प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी एक समिती नेमण्यात आली. १८९२ च्या अधिवेशनात केलेल्या ठरावात अशी मागणी करण्यात आली की, मध्यस्थांकडून सरकारने घ्यावयाच्या शेतसाऱ्याची रक्कम तीस वर्षांसाठी ठरवली जावी. त्यासाठी असा युक्तिवाद करण्यात आला की, तो सारा हा कर नसून खंड आहे. म्हणून सरकारचे उत्पन्न वाढवण्यासाठी सारावाढ करायची हे योग्य नव्हे. लष्करावरील भरमसाट खर्चामुळे सरकारला ही वाढ करावी लागते असे दिसते. तरी सरकारने तो खर्च कमी करावा असे सुचविण्यात आले. काही भागांत तर शेतात एका वर्षी जेवढे मिळते त्यापेक्षा साऱ्याची रक्कम जास्त होते. हा अन्याय आहे. १९०३ च्या अधिवेशनात काँग्रेसने जादा आकारणीवर कायदेमंडळांचा व न्यायालयांचा लगाम असावा अशी मागणी केली. पण सरकार बधत नाही असे पाहून पुढेपुढे या प्रश्नावर ठराव करण्याचे थांबले, असे काँग्रेसचे एकेकाळचे अध्यक्ष व पहिले इतिहासकार डॉ. पट्टाभि सीतारामय्या यांनी म्हटले आहे.

मद्रास प्रांतात कालव्याने दिल्या जाणाऱ्या पाण्याचा दर रु. ४ वरून ५ करण्यात आला होता. ही वाढ शेतकऱ्यांना जाचक ठरणारी असल्याने ती रद्द करावी अशी मागणी १८९४ च्या अधिवेशनात करण्यात आली.

देशाच्या विविध भागांत पडणाऱ्या दुष्काळाबाबत १८९६ च्या अधिवेशनात विचार करण्यात आला. दुष्काळी परिस्थितीला तोंड देण्यासाठी दुष्काळ विमा फंड निर्माण करण्यात यावा अशी मागणी करण्यात आली.

याच सुमारास सरकारने एक हुकूम काढून सर्व जंगल सरकारच्या मालकीचे आहे असे घोषित केले होते. त्यामुळे शेतकऱ्यांना जंगलातील गवतावर

अनुक्रमणिका

गुरे चारणे बंद झाले, जळणासाठी व घरबांधणी-साठी लाकूडफाटा मिळेना. एका अहवालाप्रमाणे १८९१ साली एकट्या उत्तर अर्काट जिल्ह्यात नऊ महिन्यांत तीन लाख जनावरे मृत्युमुखी पडली. पॉल पीटर पिले यांनी या जंगलकायद्याविरुद्ध जोरदार आवाज उठवला. १८९२ व १८९३ साली काँग्रेस अधिवेशनात जंगलकायद्याची चौकशी व्हावी अशी जोरदार मागणी केली. हा प्रश्न १९३० पर्यंत मधूनमधून तापत राहिला असे दिसते. पंजाबात पं. पद्मेनराय यांनी जंगलकायद्याविरुद्ध मोहीम चालविली. १९३० च्या काँग्रेस अधिवेशनात एका ठरावाने महाराष्ट्र, कर्नाटक, मध्यप्रांत आदी भागांत झालेल्या जंगलसत्याग्रहांचा गौरव करण्यात आला.

शेतकऱ्यांच्या प्रश्नांना काँग्रेसच्या व्यासपीठावर परत स्थान मिळाले १९३१ साली. मात्र दुष्काळामुळे त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांना शेतसारा भरण्यात व कर्जफेडीत सवलत मिळावी अशी मते त्या त्या भागांतले काँग्रेस पुढारी मधूनमधून मांडत होते. लो. टिळकांनी महाराष्ट्रात हा प्रश्न उचलून धरला होता. १९२२ साली गुजराथेत याच प्रश्नावर बार्डोलीतील साराबंदीची चळवळ झाली. त्यानंतर म. गांधींनी बिहारमधील चंपारण्य जिल्ह्यातील निळीच्या शेतकऱ्यांचा प्रश्न हाताळला. उत्तर प्रदेशात पं. जवाहरलाल नेहरूंनी शेतमालाला योग्य भाव मिळावा व जमीनदारांच्या अत्याचारापासून कुळांना संरक्षण मिळावे या मागण्या केल्या होत्या. १९३१ साली कराची येथे झालेल्या काँग्रेस अधिवेशनात नागरिकांच्या मूलभूत राजकीय व आर्थिक हक्कांचा जाहीरनामा ठरावरूपाने मंजूर करण्यात आला. त्या वीस-कलमी मागण्यांत चार शेतीसंबंधी होत्या. त्या पुढीलप्रमाणे : कलम ८– शेतसारा व खंड यांत कपात व्हावी. कलम ९– शेतीपासून मिळणाऱ्या उत्पन्नालाही आयकर लागू करण्यात यावा. कलम १८– पौंड व रुपया यांतील चलनदर हा भारतीय उद्योग व शेतीला हानिकारक ठरणार नाही अशा रीतीने ठरवला जावा. कलम २०– शेतीला कर्जपुरवठा करणाऱ्या सावकारांवर नियंत्रण असावे.

या चार कलमांकडे नीट पाहिले म्हणजे असे लक्षात येते की, शेतकऱ्यांना जाचक ठरणाऱ्या काही सरकारी धोरणांविरुद्ध ज्याप्रमाणे भूमिका घेतली जात होती, त्याचप्रमाणे प्रत्यक्ष शेती करणाऱ्या शेतकऱ्यांची पिळवणूक करणाऱ्या जमीनदार व सावकार या वर्गांविरुद्धही काँग्रेसने आवाज उठवायला सुरुवात केली होती. शेतसाऱ्यात कपात व्हावी ही मागणी सरकारला उद्देशून होती. तर खंडात कपात व्हावी ही मागणी जमीनदार व बटाईने शेती करून घेणाऱ्या अनुपस्थित मालकांविरुद्ध होती. पौंड व रुपया यांतील चलनदर हा एकूण भारतीय अर्थव्यवस्थेतील महत्त्वाचा विषय बनला होता. भारतातील कच्चा माल आपल्याला स्वस्तात मिळावा अशी इंग्लंडमधील कारखानदारांची इच्छा असायची व त्यासाठी पौंड–रुपया चलनदर त्या दृष्टीने ठरवीत जावा असे दडपण ते ब्रिटिश सरकारवर आणीत असत. त्यामुळे भारतीय शेतकऱ्यांचे, विशेषत: कापूस –उत्पादकांचे नुकसान होत असे. भारतीय कापूस ब्रिटिश कारखानदारांना पौंडात स्वस्त पडायचा व त्यामानाने भारतातील कापडगिरण्यांना तो महाग पडायचा. त्यामुळे इथल्या कापडगिरण्यांना ब्रिटिश कापडाशी स्पर्धा करणे जड जायचे. म्हणून पौंड–रुपया चलनदर भारतीयांना हानिकारक ठरू नये यासाठी वेगवेगळ्या व्यासपीठांवरून आवाज उठवला जात होता. चेंबर ऑफ कॉमर्स ती मागणी करीत असे. त्याप्रमाणे शेतकऱ्यांच्या वतीने काँग्रेसही त्या मागणीचा पाठपुरावा करीत असे.

भारतीय शेती वाढत्या प्रमाणात बाजारपेठेशी जोडली जात होती. शेतकऱ्याला चालू खर्चासाठी व भांडवली कामांसाठी कर्जाची गरज असायची. खाजगी सावकार भरमसाट व्याजाने कर्जे देत व थकबाकीवसुलीसाठी शेतकऱ्यांच्या जमिनी लिलावात काढून त्या बळकावत. नव्याने रूढ झालेल्या दिवाणी कायद्यांमुळे व दाव्यांमुळे शेतजमिनींचे लिलाव करून घेणे सुलभ झाले होते. त्यामुळे सावकारी पाश अधिकाधिक आवळला जाऊन मध्यम व छोटा शेतकरी वाढत्या प्रमाणात भूमिहीन होऊ लागला होता. म्हणून काँग्रेसने सावकारी नियंत्रणाचा प्रश्न मांडायला सुरुवात केली होती.

कराची काँग्रेसच्या ठरावात जमीनदार व राजेमहाराजांना इशारा देण्यात आला होता. त्याची प्रतिक्रिया उमटली. आपल्या चळवळीत, म्हणजे

देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात काँग्रेसला या वर्गाचेही साहाय्य पाहिजे होते. परकीयांचे राज्य संपल्याशिवाय शेतकऱ्यांचे प्रश्न खऱ्या अर्थाने सुटणार नाहीत, हे तर काँग्रेसच्या बहुतेक ठरावांचे पालुपद असायचे. कराची ठरावामुळे जमीनदारवर्ग नाराज झाला आहे हे पाहून ७–८ नोव्हे. १९३१ रोजी मुंबईत झालेल्या वर्किंग कमिटीच्या बैठकीत एका ठरावाद्वारे जमीनदारांना असे आश्वासन देण्यात आले की, खंडबंद मोहीम त्यांच्याविरुद्ध नाही. अर्धपोटी राहणाऱ्या शेतकऱ्यांना खंडाचा बोजा असह्य होऊ लागला असल्याने ती चळवळ हाती घेणे भाग पडत आहे. तरी जमीनदारांनी नाराज न होता, राष्ट्रीय स्वातंत्र्यचळवळीला मदत करीत राहावे (Working committee assures the Zamindars concerned that the no–rent proposals referred to were in no way aimed at them but they represent an economic necessity for the peasantry which is known to be half–starved and at present suffering from unprecedented economic distress.)

जागतिक मंदीमुळे कापूस–उत्पादकांवर ओढवलेली संक्रांत, सारावाढ, सावकारी पाश अशा विविध कारणांमुळे शेतकरीवर्गात असंतोष वाढू लागला होता. काँग्रेसमधील साम्यवादी व समाजवादी विचारांचे कार्यकर्ते कामगारांप्रमाणे शेतकऱ्यांच्या चळवळी संघटित करू लागले होते. काँग्रेसच्या विस्तृत छत्रीखाली किसानसभा या संघटनेचे काम उत्तर प्रदेश, बिहार, पंजाब आदी राज्यांत वाढू लागले होते. महाराष्ट्रात खोतांच्या कुळांचे प्रश्न अच्युत पटवर्धन, एस. एम. जोशी, भाई चितळे, साने गुरुजी वगैरे मंडळी हाताळू लागली होती. सेनापती बापटांच्या नेतृत्वाखाली मुळशी सत्याग्रह झाला होता. (टाटांच्या संकल्पित मुळशी धरणाखाली शेतकऱ्यांच्या जमिनी बुडू नयेत या मागणीसाठी.) मद्रास व कर्नाटक राज्यांतही शेतकरीवर्गात चळवळ सुरू झाली होती. काँग्रेसने शेतकऱ्यांच्या प्रश्नात अधिक लक्ष घालावे असे दडपण वाढू लागले होते. लखनौ येथे एप्रिल १९३६ मध्ये झालेल्या अधिवेशनात शेती व ग्रामीण प्रश्नांवर एक स्वतंत्र ठराव करण्यात आला. त्यात १९३१ पेक्षा अधिक तपशीलवार मागण्या करण्यात आल्या होत्या. पण शेतीबाबत प्रदेशनिहाय वेगवेगळी परिस्थिती असल्याने प्रदेश काँग्रेसकमिट्यांकडून याबाबत सूचना मागवण्यात याव्यात असेही ठरले.

अशा व्यापक विचारमंथनातून डिसेंबर १९३६ मध्ये फैजपूर येथे भरलेल्या ५०व्या काँग्रेस अधिवेशनात शेतीविषयक एक विस्तृत ठराव मंजूर करण्यात आला. त्यातील प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे होत :

१. खंड व शेतसाऱ्यात सूट मिळावी.
२. बिगरकिफायतशीर शेतीधारकांना शेतसारा माफ करण्यात यावा.
३. शेतीउत्पन्न हेही आयकरपात्र करण्यात यावे.
४. पाणीपट्टीत कपात करण्यात यावी.
५. शेतकरी व कुळे यांच्यावरील नजराणे वगैरेंसारखे सरंजामशाही बोजे नष्ट करण्यात यावेत व वेठबिगारीची प्रथा बंद करण्यात यावी.
६. कूळ कसणुकीचे हक्क वंशपरंपरागत मिळावेत व कूळ कसत असलेल्या जमिनीवर राहण्यासाठी घर बांधायला व झाडे लावायला कुळांना परवानगी असावी.
७. सहकारी शेतीची सुरुवात करण्यात यावी.
८. जे कर्जांचे बोजे बेसुमार वाढले असतील (उदा., व्याज दामदुपटीने भरले गेले असेल तर, इ.) ते रद्द करण्यात यावेत.
९. कुळांकडील खंडाची थकबाकी रद्द करण्यात यावी.
१०. शेतकऱ्यांना सामायिक गायराने देण्यात यावीत.
११. कुळांकडे खंडाची थकबाकी असली तरी तेवढ्या कारणावरून त्याला जमिनीवरून हुसकले जाऊ नये. थकित खंड दिवाणी येणे मानून त्या पद्धतीने वसूल केले जावे.
१२. शेतमजुरांना जीवनवेतन मिळावे यासाठी कायदा करण्यात यावा.
१३. शेतकऱ्यांना संघटणा करण्याचा हक्क आहे हे मान्य करण्यात यावे व त्यांच्या संघटणांना मान्यता देण्यात यावी.

या मागण्यांवर नजर टाकली असता असे लक्षात येते की, कसणारांच्या बाजूने शेतीतील धनिक शहांविरुद्ध काँग्रेसने भूमिका घ्यायला सुरुवात केली होती. येथे हेही लक्षात घेतले पाहिजे की, १९३५ च्या भारत सरकार कायद्यान्वये लोकनियुक्त प्रांतिक सरकारे बनवण्यासाठी प्रांतिक कायदेमंडळांच्या निवडणुका लवकरच व्हायच्या होत्या. खरे तर, त्या वेळी मतदानाचा अधिकार ग्रामीण भागात श्रीमंत व मध्यम शेतकऱ्यांपुरता मर्यादित होता; पण तरीही गरीब, कष्टकरी शेतकऱ्यांच्या बाजूने आपण उभे आहोत अशी भूमिका काँग्रेसने घ्यावी एवढे दडपण समाजवादी साम्यवाद्यांनी निर्माण केले होते.

यातून संघर्ष वाढत जाणार हेही स्पष्ट होते. उत्तर प्रदेश व बिहारमध्ये स्वामी सहजानंद, आचार्य नरेंद्र देव, जयप्रकाश नारायण वगैरेंच्या पुढाकाराने किसानसभेचे काम वाढू लागले होते. त्याविरुद्ध बिहार प्रांतिक काँग्रेस कमिटीने तक्रार केली. मार्च १९३७ मध्ये दिल्लीत झालेल्या अ. भा. काँ. क. च्या बैठकीत एका ठरावान्वये किसान सभेला अशी समज देण्यात आली की, त्यांनी जमीनदारांविरुद्ध विनाकारण व काँग्रेसच्या परवानगीशिवाय लढे उभारू नयेत. त्याच बैठकीत दामोदर-कालव्यातील पाणीदरवाढीविरुद्ध आंदोलन करायचे ठरले. तसेच घसरत्या किंमतीपासून कापूस-उत्पादकांना संरक्षण मिळवून देण्यासाठी जमनालाल बजाज यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त करण्यात आली आणि भारतीय कापडगिरण्यांनी परदेशी कापूस विकत घेऊ नये अशी त्यांना सूचना करण्यात आली.

१९३८ साली हरिपुरा येथे झालेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात देशाच्या आर्थिक विकासासाठी नियोजनाचा अंगीकार केला जावा असा ठराव करण्यात आला. शेतीला सिंचनाची सोय मोठ्या प्रमाणात करून देण्यात यावी, जलविद्युतनिर्मितीचे प्रकल्प हाती घेण्यात यावेत, शेतमालासाठी स्वस्त वाहतुकीची सोय करण्यात यावी, पुरांमुळे होणारी जमिनीची धूप थांबविणे व गाळ साचून जमिनी चिबड होतात ते थांबवावे यासाठी पूरनियंत्रणयोजना केल्या जाव्यात– अशा प्रकारच्या विकासोन्मुख सूचना करण्यात आल्या. पं. जवाहरलाल नेहरूंच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय योजना समितीची स्थापना करण्यात आली. त्यात अनेक अर्थशास्त्रज्ञांचा समावेश करण्यात आला. प्रो. के. टी. शहा यांना कार्याध्यक्ष नेमण्यात आले. त्यांनी उद्योग, शेती अशा वेगवेगळ्या विषयांसाठी पोटसमित्या नेमल्या व त्यांच्याकडून विस्तृत अहवाल तयार करून घेण्यात आले. ते पुस्तकरूपाने प्रसिद्धही करण्यात आले.

१९३७ च्या निवडणुकांत काँग्रेसला सहा प्रांतांत बहुमत मिळाले व तेथे त्या पक्षाची मंत्रिमंडळे अधिकारावर आली. काँग्रेसने विशेषतः फैजपूर अधिवेशनात केलेल्या ठरावांची अमलबजावणी करावी यासाठी पुरोगामी कार्यकर्त्यांकडून मंत्रिमंडळांवर दडपण येऊ लागले. प्रांतिक सरकारांनी केलेल्या कामाचे अहवाल अ. भा. काँ. क. कडे मागवण्यात येऊ लागले. त्या अहवालांवरून मिळणारी माहिती थोडक्यात पुढीलप्रमाणे आहे :

मुंबई प्रांतात कुळांना संरक्षण देणारा कायदा करण्यात आला.

बिहारमध्येही कूळकायदा करण्यात आला. १९११ ते १९३६ या काळात खंडात जी वाढ करण्यात आली होती, ती रद्द करण्यात आली. तसेच खंडात काही सूट देऊन 'परवडणारा खंड' ठरवण्याची पद्धत घालून देण्यात आली. जमीनदारांनी बेकायदेशीर नजराणे वसूल करण्यावर बंदी घालण्यात आली. बारा वर्षांपेक्षा अधिक काळ जमीन कसणारांना 'रयत' सारखे हक्क देण्यात आले. चंपारणामधील निळीच्या शेतकऱ्यांना संरक्षण देण्यात आले. जमीनदारांच्या नियंत्रणाखालील बखळ (म्हणजे लागवडीयोग्य पडीक) जमीन कसण्यासाठी जमीनदार लिलाव करीत असत. ती पद्धत बंद करण्यात आली. कुळांनी द्यावयाच्या लिलाव-रकमांची थकबाकी रद्द करण्यात आली. छोटानागपूर भागातील रयत शेतकऱ्यांवरील ओझे कमी करण्यात आले. शेती उत्पन्नावर कर बसवण्यात आला. (मात्र १९३९ साली काँग्रेस मंत्रिमंडळाने राजीनामा दिल्यावर यांपैकी अनेक कार्यक्रम स्थगित करण्यात आले.)

वायव्य सरहद्द प्रांतात शेतसाऱ्यात सूट देण्यात आली. कर्जनिवारणासंबंधी कायदा करण्यात आला.

सरकारतर्फे शेतकऱ्यांना तगाई-कर्जपुरवठा वाढवण्यात आला.

आसामात कुळांना संरक्षण देणारा कायदा करण्यात आला. खंडात सूट देण्यात आली. कर्जनिवारण कायदा करण्यात आला. शेतमालभावात मंदी आल्याने शेतसाऱ्यात सूट देण्यात आली.

मद्रास प्रांतात शेतसाऱ्यात सूट देण्यात आली. कर्जनिवारण कायदा करण्यात आला. जमीनदारी पद्धत रद्द करण्याच्या प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी एक समिती नेमण्यात आली.

ओरिसामध्ये शेतकऱ्यांच्या संघटणा दडपण्यासाठी आधी जे कायदे केले होते ते रद्द करण्यात आले.

या काळातले लक्षणीय अपयश उत्तर प्रदेशातले मानावे लागेल. तेथे काँग्रेस मंत्रिमंडळ अधिकारावर येऊनही कुळांना संरक्षण देणारा कायदा होऊ शकला नाही.

१९३९ साली दुसरे महायुद्ध सुरू झाले. लोकनियुक्त मंत्रिमंडळांना विश्वासात न घेता भारत इंग्लंडच्या बाजूने युद्धात उतरल्याची घोषणा व्हाईसरॉयनी केली. त्याच्या निषेधार्थ काँग्रेस मंत्रिमंडळांनी राजीनामे दिले. १९४५ पर्यंत महायुद्ध, 'चलेजाव' चळवळ वगैरे धामधूम चालू राहिली.

१९४६ साली अनेक प्रांतांत व केंद्रातही काँग्रेसप्रणित मंत्रिमंडळे अधिकारारूढ झाली. १९४७ साली स्वातंत्र्य मिळाले. सत्तेवर असलेल्या काँग्रेस मंत्रिमंडळांनी कुठले शेतीविषयक कार्यक्रम हाती घ्यावेत याबाबतचा एक अहवाल आचार्य कृपलानी (ते त्या वेळी काँग्रेसचे अध्यक्ष झाले होते) यांनी तयार करून पंतप्रधान पं. नेहरूंना सादर केला. पण युद्धोत्तर परिणाम, देशाची फाळणी वगैरेंमुळे सरकारांना असे कार्यक्रम पार पाडण्याचा तगादा लावू नये असे मत नेहरूंनी व्यक्त केले. परिणामतः काँग्रेस पक्षाने पक्षपातळीवर शेतीविषयक किंबहुना कुठलेच कार्यक्रम सुचवू नयेत असे वातावरण तयार झाले. मात्र १९४९ साली उत्तर प्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल, मध्यप्रांत, मद्रास आदी राज्यांत जमीनदारी-मालगुजारी प्रथा नष्ट करणारे कायदे करण्यात आले. मुंबईसारख्या प्रांतात कुळांना अधिक संरक्षण देणारे कायदे करण्यात आले. केंद्र सरकारने राष्ट्रीय योजना आयोगाची पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली स्थापना केली. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या आराखड्यात जमीनधारा पद्धतीत सुधारणा करणे, सरकार व शेतकरी यांच्या दरम्यानचे मध्यस्थ दलाल व अनुपस्थित जमीनमालक हटवणे, तुकडेबंदी व तुकडेजोड, शेतमाल विक्रीसाठी नियंत्रित बाजारपेठांची स्थापना आदी कार्यक्रम सुचविण्यात आले. त्यानुसार विविध राज्यांत काही पावले उचलली गेली.

१९५५ साली आवडी अधिवेशनात काँग्रेसने समाजवादी समाजरचना हे आर्थिक धोरणाचे उद्दिष्ट असावे असा ठराव केला. उत्पादनाची प्रमुख साधने सामाजिक मालकी किंवा नियंत्रणाखाली आणावीत, उत्पादनवाढीवर भर द्यावा व राष्ट्रीय संपत्तीच्या न्याय्य वितरणाच्या दिशेने पावले उचलावीत असा त्या ठरावाचा आशय होता. पण शेतजमिनीबाबत राष्ट्रीयीकरण करावे की सीलिंग बसवून फेरवाटप करावे याविषयी स्पष्ट निर्देश नव्हता. जमीनसुधारणा करण्याचा सरकारचा निर्णय स्वागतार्ह आहे एवढेच त्या ठरावात म्हटले आहे. भूदान व संपत्तिदान आंदोलनाचे स्वागत करण्यात आले. शेतीसाठी कर्जपुरवठा वाढवावा व शेतमालाच्या किंमतीत होणारी घट थांबवण्याच्या दृष्टीने सरकारने पावले उचलावीत अशा सूचना करण्यात आल्या.

शेतीबाबतचा महत्त्वपूर्ण ठराव काँग्रेसने केला तो जाने. १९५९ मध्ये नागपूरच्या अधिवेशनात. ग्रामीण भागाचे पुनःसंघटण करण्यासाठी— १) ग्रामपंचायती व सहकारी सोसायट्यांची स्थापना करावी, २) संयुक्त सहकारी शेती सुरू करावी, ३) जमीन व्यवस्थेतील मध्यस्थ पूर्णपणे हटवावेत व १९५९ च्या अखेरीपर्यंत सीलिंगचे कायदे करावेत, ४) शेतमालाला हमी किंमत बांधून द्यावी व सरकारने त्या किंमतीत खरेदीची व्यवस्था करावी, ५) अन्नधान्याची खरेदी सरकारने मोठ्या प्रमाणावर करावी, ६) पडीत जमिनी लागवडीखाली आणाव्यात— असा त्या ठरावाचा आशय आहे.

त्यांतील संयुक्त सहकारी शेती व शेतमालाची सहकारी खरेदी या सूचनांवर देशभर जोरदार वादळ उठले. संयुक्त सहकारी शेतीचा विचार जवळपास सोडून देण्यात आला. शेतमालाची खरेदी

अनुक्रमणिका

करण्यासाठी सहकारी यंत्रणा उभारण्याचा कार्यक्रमही बाजूला पडला. १९६० पासून काही राज्यांत सीलिंगचे कायदे झाले. पण त्यांची अमलबजावणी अतिशय शिथिलतेने झाली असे योजना-आयोगानेच सहाव्या योजनेत म्हटले आहे.

१९३१ साली कराची काँग्रेसमध्ये मूलभूत राजकीय, आर्थिक हक्कविषयक ठराव मांडणारे व शेतीविषयक व्यापक ठराव संमत झालेल्या फैजपूर काँग्रेसचे अध्यक्ष असलेले पं. जवाहरलाल नेहरू हे १९४७ ते १९६४ या काळात काँग्रेसचे सर्वशक्तिशाली नेते होते. त्यांच्या हयातीत शेवटचे अधिवेशन झाले ते भुवनेश्वरला १९६४ साली. त्या अधिवेशनात लोकशाही समाजवादाबाबतचा ठराव झाला. शेतीबद्दल फारशी चर्चा झाली नाही.

नेहरूंच्या नंतर पंतप्रधानपदी आलेल्या लालबहादुर शास्त्रींच्या काळात दुर्गापूर येथे १९६५ साली अधिवेशन झाले. त्यात झालेल्या शेतीविषयक ठरावात म्हटले आहे की, जमीनसुधारणाविषयक कायदे बरेच झाले असले तरी त्यांची अमलबजावणी अद्याप झालेली नाही. ती करण्यात यावी. तसेच समाजविकास योजना अधिक जोमाने राबवण्यात याव्यात. शेतीत अधिक गुंतवणूक करण्यात यावी व सहकारी यंत्रणा मजबूत करून शेतीसाठी कर्जपुरवठा वाढवण्यात यावा. पुढच्याच वर्षी जयपूरला इंदिरा गांधींच्या पंतप्रधानपदाच्या सुरुवातीच्या काळात झालेल्या अधिवेशनात अन्न व शेती या विषयावर स्वतंत्र ठराव करण्यात आला. शेतीविकासासाठी शास्त्रीय पद्धतीचा अंगीकार करण्यात यावा, गुंतवणूक वाढवण्यात यावी, शेतमालाला किफायतशीर भाव बांधून द्यावेत व सरकारने धान्यखरेदी मोठ्या प्रमाणावर करावी अशा सूचना त्यात करण्यात आल्या होत्या. (१९६५ च्या भारत-पाक युद्धाच्या वेळी भारताने अमेरिकेचे न ऐकल्यामुळे पीएल-४८० योजनेखाली गहू पाठवण्याचे अमेरिकेने बंद केले होते. म्हणून लालबहादुर शास्त्रींनी ' जय जवान जय किसान ' ही घोषणा दिली होती. सरकारी धान्यखरेदी मोठ्या प्रमाणात करण्यात यावी या सूचनेची ही पार्श्वभूमी होय.)

१९६९ साली बंगलोर येथे झालेल्या अ. भा. काँ. क. पुढे इंदिराजींनी मांडलेल्या १० कलमी मुक्त विचारांत शेतीसंबंधी कुठलीही सूचना नव्हती. त्यानंतर पक्षात फूट पडली. त्या वर्षाच्या अखेरीस मुंबई येथे झालेल्या इंडिकेट काँग्रेसच्या अधिवेशनात शेतीविषयक करण्यात आलेल्या ठरावात म्हटले आहे की, जमीनसुधारणा कायद्यांची अमलबजावणी १९७०–७१ हे वर्ष संपण्यापूर्वी व्हावी, नव्याने ज्यांना जमीन दिली जाईल त्यांच्या सहकारी शेती सोसायटया बनवाव्यात व तुकडेजोड कार्यक्रमावर भर देण्यात यावा.

१९७० साली दिल्लीत झालेल्या अधिवेशनात हरितक्रांतीच्या यशाबद्दल समाधान व्यक्त करण्यात येऊन सीलिंगची मर्यादा खाली आणावी व त्या कायद्यांची कठोरपणे अमलबजावणी करावी असे आवाहन करण्यात आले.

१९७२ साली नवी दिल्ली येथे झालेल्या काँग्रेस अधिवेशनात शेतीविषयक पुढील १० कलमी कार्यक्रम स्वीकारण्यात आला– (१) लघुसिंचन योजनांवर भर देण्यात यावा. (२) मृद्‌संधारण कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर हाती घेण्यात यावा. (३) प्रदेश विकास कार्यक्रम हाती घेण्यात यावेत. (४) दूध-व्यवसायाला उत्तेजन देण्यात यावे. (५) जंगल-विकासावर भर देण्यात यावा. (६) मासेमारीला उत्तेजन देण्यात यावे. (७) शेतमाल विक्रीची व्यवस्था नीट करावी व साठवणुकीसाठी गुदामे बांधण्यात यावीत. (८) लघुउद्योगांना उत्तेजन देण्यात यावे. (९) ग्रामीण भागांत रस्ते बांधण्यात यावेत. (१०) अल्प भूधारकांसाठी SEFA, MFAL, DPAD आदी कार्यक्रम राबवण्यात यावेत.

१९७२ नंतर १९८४ पर्यंत म्हणजे इंदिराजींच्या मृत्यूपर्यंत काँग्रेसच्या अधिवेशनात शेतीविषयक ठराव झालेला दिसत नाही. १९७५ च्या जूनमध्ये अंतर्गत आणीबाणी पुकारल्यानंतर १ जुलै रोजी पंतप्रधानांनी जाहीर केलेल्या २० कलमी कार्यक्रमात शेतीसंबंधी पुढील कलमे होती : सीलिंग कायद्यांची अमलबजावणी करून भूमिहीनांना जमिनी व घरे वाटणे, सिंचनाची सोय वाढवणे, शेतजमिनीतील हक्कसंबंधविषयक हक्कसंबंधांचे सरकारी दप्तर अद्ययावत करणे व वेठबिगारी प्रथा बंद करणे. १९७७ च्या निवडणूक जाहीरनाम्यात व १९८०

अनुक्रमणिका

साली परत अधिकारावर आल्यावर इंदिराजींनी याच बाबींचा पुनरुच्चार केला.

श्री. राजीव गांधी देशाचे पंतप्रधान व कॉंग्रेस (आय.)चे अध्यक्ष झाल्यानंतर ४–५ मे १९८५ रोजी नवी दिल्ली येथे अ. भा. कॉं. क. चे अधिवेशन झाले. त्यात मंजूर करण्यात आलेल्या आर्थिक ठरावात शेतीविषयक उल्लेख पुढीलप्रमाणे आहेत–

परि. ८– श्री. राजीव गांधींच्या नेतृत्वाखाली, या धर्तीवरल्या अर्थव्यवस्थेच्या विकासाला आणखी वेग आला आहे. शेतकरी आणि कामगार यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी यापूर्वीच खालीलप्रमाणे उपाय योजले आहेत–

(अ) पीक विमा योजना सुरू करण्यात आली आहे. तिचा लहान व अतिलहान शेतकऱ्यांना फायदा मिळेल.

(ई) पडीक जमीन विकास कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे. त्यामुळे लाखो ग्रामीण कुटुंबांना आपली इंधनाची व वैरणीची गरज भागायला मदत होईल.

परि. ९– ...२२ लाख खेड्यांना पिण्याचे पाणी पुरवण्यात आले. ११ लाख ९० हजार खेड्यांना वीज पुरवण्यात आली.

परि. १२– ...शेती हा आपल्या अर्थव्यवस्थेचा गाभा असल्याने त्याकडे जास्त लक्ष देण्यात येत आहे... आधुनिक तंत्रशास्त्र वापरण्यात येईल... शेती विकासासाठीच्या खास कार्यक्रमांची सांगड घालण्यात १९८५–८६ मध्ये, अशा कार्यक्रमांसाठी जास्त पैसे द्यावेत अशी अ. भा. कॉं. समिती (आय.) सरकारला विनंती करीत आहे.

परि. १६– ...विशेषत: देशाच्या ज्या भागांत उत्पादनाच्या तंत्रशास्त्राने अद्याप महत्त्वाचा प्रभाव पाडलेला नाही, तिथे शेतकी उत्पादकता वाढवायच्या प्रश्नाकडे ताबडतोब लक्ष देण्याची गरज आहे... विशेषत: पूर्व विभागामध्ये तांदूळ उत्पादकता वाढवण्यासाठी सर्वोच्च प्राधान्य द्यावे अशी अ. भा. कॉं. समिती (आय.) सरकारला विनंती करीत आहे... जमीनसुधारणासकट अनेक धडाडीचे आणि नवे उपाय योजणे आवश्यक आहे... शेतकऱ्यांच्या उत्पादनांना हमखास योग्य किंमत मिळेल अशी खात्री देऊन, तसेच त्यांना लागणाऱ्या मालाचा, आर्थिक मदत देऊन पुरवठा करून शेतकऱ्यांना प्रोत्साहन हा आपल्या शेतकीधोरणाचा महत्त्वाचा भाग आहे. गतकाळात या धोरणामुळे खूप फायदा झाला. हेच धोरण चालू ठेवल्याबद्दल अ. भा. कॉं. समिती (आय.) सरकारची प्रशंसा करते आणि शेतकीभाव-आयोगाची, शेतकीखर्च व भाव-आयोग म्हणून पुनर्रचना करण्याच्या निर्णयाचे स्वागत करते. या निर्णयामुळे शेतकरी समाजाचा मोठ्या प्रमाणावर फायदा होईल.

[वाक्यरचना व मराठी भाषांतर अ. भा. कॉं. समिती (आय.) चेच आहे.]

१८८५ ते १९८५ या शंभर वर्षांतील कॉंग्रेसच्या शेतीविषयक धोरणाचा हा धावता आढावा आहे. असे दिसते की, १८८५ ते १९३० पर्यंत शेतीवरील सरकारी बोजाबद्दल वारंवार तक्रार करण्यात येत होती. १९३५ पासून शेतीतील महत्त्वाच्या प्रश्नांचा तपशीलात जाऊन विचार सुरू झाला. १९३७ ते ३९ या काळात काही प्रांतांत कॉंग्रेस मंत्रिमंडळांनी शेतकरीवर्गावरील बोजे कमी करण्याच्या दिशेने पावले टाकली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सरकार व शेतकरी यांच्या दरम्यानचा मध्यस्थ बाजूला सारला गेला. शेतीक्षेत्राची समतेच्या तत्त्वावर पुनर्रचना करण्याचा विचार नेहरूंनी १९५९ साली आग्रहाने मांडला. त्याचा पुनरुच्चार मधूनमधून झाला असला तरी पाठपुरावा केला गेला नाही. आणि १९७५ नंतर तर शेतीविषयक प्रश्नांचा उल्लेख केवळ तोंडदेखलाच केला जाऊ लागला. त्याबद्दलची पोटतिडीक ठराव या चर्चेत तरी जाणवत नाही.

० ० ०

अनुक्रमणिका

भारतीय नियोजन : १९५१–१९८५*

ह. कृ. परांजपे

स्वातंत्र्य मिळाल्यावर अनेक दशकांनी आर्थिक विकासात मागे पडलेल्या भारताची आर्थिक उन्नती झपाट्याने घडवून आणावयाची तर केवळ निरंकुश अर्थव्यवहाराच्या (laissez faire) वर अवलंबून राहून चालणार नाही; अनेक तऱ्हेच्या आर्थिक विकासात स्वराज्य सरकारला प्रत्यक्ष भाग घ्यावा लागेल, वेगवेगळ्या आर्थिक व्यवहारांवर नियंत्रण करावे लागेल, हे विचार जवळजवळ सर्व थरांतल्या व पक्षांच्या भारतीयांमध्ये प्रसृत झालेले होते. त्यामुळेच १९३८ साली बाबू सुभाषचंद्र बोस यांनी काँग्रेस अध्यक्ष म्हणून जेव्हा एका राष्ट्रीय नियोजन समितीची स्थापना केली, तेव्हा त्यास सार्वत्रिक पाठिंबा मिळाला. जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखालील या समितीच्या हातून जरी राजकीय अडचणींमुळे प्रत्यक्षात फार मर्यादितच काम झाले, तरीसुद्धा स्वातंत्र्यानंतर देशाच्या आर्थिक विकासासाठी नियोजन करण्याची आवश्यकता राहील ही कल्पना लोकांच्या मनात घट्टपणे रुजविण्यास या समितीच्या कामाचा फार उपयोग झाला. स्वातंत्र्यानंतर देशाच्या अर्थकारणात कोणती मूलभूत भूमिका स्वीकारावी लागेल याबद्दल १९३१ साली कराची येथील काँग्रेसमध्ये या विषयावर ठराव झाल्यापासून वाद चालू होते; आणि प्रत्यक्ष कसणाऱ्यांना संरक्षण दिले पाहिजे, महत्त्वाच्या उद्योगधंद्यांवर सरकारी मालकी नसली तरी नियंत्रण असले पाहिजे, मजुरांना योग्य ती मजुरी व संरक्षण मिळाले पाहिजे, या कल्पना सतत पुढे मांडल्या जात होत्या.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळातील अनुभवाने सर्व जगातच शासनाने अर्थव्यवस्थेत महत्त्वाचा भाग घेणे आणि सामान्यजनांच्या हितसंरक्षणासाठी वेगवेगळ्या नियंत्रणांचा वापर करणे ही गोष्ट सर्वमान्य होऊ लागली होती. जागतिक मंदीच्या काळात निरंकुश अर्थव्यवहाराच्या तत्त्वज्ञानाला मोठाच तडाखा बसला होता. त्यावर या युद्धकालीन अनुभवाने जणू शिक्कामोर्तब केले. त्याचा परिणाम म्हणूनच की काय, ब्रिटिशांच्या नियंत्रणाखालील भारत सरकारने-सुद्धा युद्धोत्तर काळात भारतीय अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी अनेक तऱ्हेच्या योजना आखण्यास सुरुवात केली आणि त्यासाठी दिल्लीपासून जिल्ह्यां-पर्यंत थोडीशी यंत्रणाही निर्माण केली. युद्धोत्तर काळात राजकीय स्वातंत्र्य तर मिळाले पाहिजेच पण त्यानंतर सत्तेवर येणाऱ्या सरकारने आर्थिक विकास साधण्यासाठी मोठी आणि सर्वंकष योजना आखून त्याबरहुकूम त्वरेने विकास साधला पाहिजे, अशी भूमिका भारतातल्या प्रमुख उद्योगपतींनीही आपल्या 'मुंबई योजने'मार्फत पुढे मांडली. याला पर्याय म्हणून मानवेंद्रनाथ रॉय यांच्या पक्षाने 'जनतेची योजना' आणि काही गांधीवादी मंडळींनी 'गांधीवादी योजना' सादर केल्या. या योजनांच्या तपशीलात येथे जाण्याचे कारण नाही. पण एक महत्त्वाची गोष्ट या सर्वांवरून दिसून येते ती ही की, नियोजित आर्थिक विकास घडवून आणण्याची शासनाची जबाबदारी ही या सर्व तऱ्हेच्या मंडळींना मान्य होती आणि स्वातंत्र्योत्तर सरकारने याबाबत त्वरेने पावले टाकली पाहिजेत अशी त्यांची भूमिका होती.

---

* मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वार्षिक अधिवेशनाच्या (१९८५) अध्यक्षपदावरून केलेले भाषण येथे संक्षेपाने पुनर्मुद्रित केले आहे. मराठी अर्थशास्त्र परिषद व प्रा. ह. कृ. परांजपे यांचे आम्ही आभारी आहोत– संपादक.

अनुक्रमणिका

आर्थिक व्यवहार स्वातंत्र्योत्तर काळात योजनाबद्ध रीतीने चालवावा याबद्दलचे हे सार्वत्रिक एकमत केवळ वरवरचे होते याचा प्रत्यय स्वातंत्र्यानंतर लगेचच येऊ लागला. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीने काँग्रेसचा भावी आर्थिक कार्यक्रम तयार करण्यासाठी जवाहरलाल नेहरूंच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. या समितीने आपला अहवाल १९४७ अखेर सादर केला. काँग्रेसने अर्थव्यवस्थेबाबत ज्या तऱ्हेची भूमिका––विशेषत: १९३६-३७ पासून––मांडली होती तीच भूमिका जास्त स्पष्टपणाने आणि काही मुदतीची बंधने घालून या समितीने मांडलेली होती. पण आता परिस्थितीत फरक पडलेला होता. जवाहलाल नेहरू पंतप्रधान झालेले होते. तेव्हा त्यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या या समितीच्या शिफारसींना आता वेगळेच रूप आले; आणि आजवर उद्योग आणि व्यापारविषयक मांडल्या जात असणाऱ्या 'डाव्या' कल्पनांकडे काँग्रेसचे इतर अनेक पुढारी आणि त्यांचे व्यापारउद्योगातील संपन्न पाठीराखे जसे दुर्लक्ष करीत होते तसे दुर्लक्ष करणे त्यांना आता भयप्रद वाटले. टीकेचा गदारोळ उठला; स्टॉक एक्स्चेंजमधील शेअरचे भाव भराभर घसरले; आणि उद्योगपतींनी हाकाटी केली की, असे धोरण प्रत्यक्ष व्यवहारात आणल्यास अर्थव्यवस्था कोलमडून पडेल. काँग्रेस पक्ष आणि सरकार या हाकाटीस घाबरले. याचा प्रत्यय थोड्याच महिन्यांच्या कालावधीनंतर जेव्हा सरकारने आपले औद्योगिक धोरण (१९४८) जाहीर केले तेव्हा आला. त्याच्याही पुढे जाऊन नेहरूंनी परकीय भांडवलाबाबत भारतीय सरकारचे धोरण (१९४९) जाहीर केले तेव्हा हे स्पष्ट झाले की, परकीय भांडवलाबाबत काय किंवा येथील उद्योगधंद्यांची मालकी आणि त्यांवरचे नियंत्रण यांबद्दल काय, स्वातंत्र्यापूर्वीचे ठराव स्वतंत्र भारताचे सरकार तसेच्या तसे अमलात आणणार नाही. जबाबदारी आल्यानंतर जास्त 'वास्तववादी' विचार स्वतंत्र भारताचे सरकार करील अशी खात्री स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या दोन-तीन वर्षांतच या तऱ्हेने दिली गेली.

भारताचा आर्थिक विकास नियोजित पद्धतीने साधण्यासाठी नियोजन आयोगाची स्थापना १९५० मध्ये करण्यात आली आणि पहिली पंचवार्षिक योजना––१९५१ ते १९५६ या काळासाठी––१९५२ मध्ये जाहीर करण्यात आली. तेव्हापासून नियोजन आयोग काम करीत राहिला आहे; आणि अधिकृत रीत्या तरी भारताचा आर्थिक विकास हा पंचवार्षिक योजनांवर आधारून चालू आहे. पंचवार्षिक योजना लागू नव्हती अशी १९६६ ते १९६८ ही तीन वर्षे सोडली, तर हा सर्व कालखंड पंचवार्षिक योजनांमध्ये विभागला गेला आहे.

सहावी पंचवार्षिक योजना मार्च १९८५ मध्ये संपुष्टात आली असून आता सातव्या पंचवार्षिक योजनेचा काळ चालू आहे. सातवी पंचवार्षिक योजना अजून पूर्णपणे तयार होऊन देशापुढे मांडण्यात आलेली नाही हे खरे. पण ही योजना आजही कार्यवाहित आहे असे सरकारदरबारी समजले जाते. तेव्हा या पंचवार्षिक योजनांमागे आर्थिक विकासाचा मुख्य विचार कोणता आहे? त्याबरहुकूम देशाचा आर्थिक विकास किती व कसा झाला आहे? आणि या अनुभवावरून देशाचे नागरिक म्हणून व अर्थशास्त्राचे अभ्यासू म्हणून आपणास कोणते धडे शिकण्यासारखे आहेत? या प्रश्नांचा काही अंगांनी विचार मांडण्याचा माझा प्रयत्न आहे.

– २ –

एकूण भारताचा आर्थिक विकास पंचवार्षिक योजनांच्या काळात कसा होत राहावा याबद्दलच्या काही ढोबळ कल्पना पहिल्या पंचवार्षिक योजनेत मांडल्या गेल्या होत्या. कल्पना अशी होती की, भारताचे राष्ट्रीय उत्पन्न २२ वर्षांच्या काळात १६० टक्क्यांनी वाढावे आणि लोकसंख्या दरवर्षी सव्वा टक्क्याने वाढत राहून दरडोई उत्पन्न त्याच काळात जवळजवळ दुप्पट व्हावे. आर्थिक विकासास आवश्यक असे भांडवल उपलब्ध होण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्नातील बचतीचे प्रमाण १९५०–५१ मध्ये केवळ ५ टक्के होते ते वाढत १९६७–६८ मध्ये २० टक्क्यांपर्यंत जावे. बचत आणि भांडवलनिर्मिती झपाट्याने वाढवावयाची तर उत्पन्नातील उपभोगाचा वाटा आहे तोच ठेवावा लागेल अगर काहीसा कमीही करावा लागेल. बहुसंख्य लोकांचे दारिद्र्य लक्षात घेता या प्रमाणात काहीशी हळूहळूच वाढ करण्यात

यावी. राष्ट्रीय उत्पन्नात विकास योजनांमुळे जी वाढ होईल त्याचा वाढता वाटा मात्र बचत व भांडवल-निर्मितीसाठी वापरला जावा. हे प्रमाण पहिल्या योजनेत २० टक्के राहून दुसऱ्या योजनेच्या काळापासून मात्र ते वाढलेल्या उत्पन्नाच्या ५० टक्के इतके चढवावे. म्हणजे बचत व भांडवलनिर्मिती योग्य प्रमाणात होऊ शकेल. भांडवल गुंतवल्यापासून सरासरी तीन वर्षांत त्यापासून उत्पादन मिळू शकेल आणि भांडवल आणि उत्पादन यांचे साधारण प्रमाण तिनास एक असे राहील असेही या सर्व विचारांत गृहीत धरण्यात आले होते.

या सर्व कल्पना पुढे मांडताना भारतीय अर्थ-व्यवस्थेतील काही ठळक वैशिष्टये लक्षात आणून दिलेली होती. उदाहरणार्थ, भारतात लोकसंख्येचा एक मोठा भाग अर्धबेकारीच्या स्थितीत आहे आणि त्यामुळे अनेक तऱ्हेची भांडवलनिर्मिती ही त्यांच्या श्रमशक्तीचा वापर करून करता येईल; असे करण्याची शक्यता समाजाच्या आणि शासनाच्या संघटनाचातुर्यावर अवलंबून राहील, केवळ पैशातील बचतीवर नव्हे. तसेच शिक्षण आणि आरोग्य या सुविधा भारतात जितक्या निकृष्ट प्रमाणात उपलब्ध होत्या, शेतीधंद्यातील उत्पादकता बव्हंशी कमी होती हे लक्षात घेता या क्षेत्रांमध्ये थोडचा खर्चाने उत्पादकता फार मोठ्या प्रमाणावर वाढण्याची किती शक्यता आहे आणि त्यामुळे भांडवल आणि उत्पादन यांतील प्रमाण तिनास एक याऐवजी कितीतरी जास्त फायद्याचे राहण्याचा संभव आहे, याकडेही लक्ष वेधण्यात आलेले होते. भारतातील बेकारीचे आणि अर्धबेकारीचे मोठे प्रमाण लक्षात घेता शेती-धंद्याची उत्पादकता सुधारण्यासाठी वेगवेगळ्या तऱ्हांची मदत देणे आणि कमी भांडवलावर आधार-लेले छोटे आणि ग्रामीण उद्योगधंदे मोठ्या प्रमाणावर वाढविण्यास मदत करणे या उपायांवरही मोठा भर देण्यात आला होता. देशातील बचतीवर आधारून उभारले जाणारे भांडवल विकासासाठी काहीसे कमी पडेल आणि त्यामुळे परकीय भांडवली मदत मिळविण्याचा प्रयत्न करावा लागेल हेही योजनेच्या विचारात गृहीत धरलेले होते. पण असाही विचार स्पष्टपणे मांडण्यात आला होता की, वर्तमान परिस्थितीत विकास योजनेचा मुख्य भर स्वदेशीय बचतीवरच अवलंबून ठेवण्याशिवाय गत्यंतर नाही. परकीय मदतीवर अवलंबून राहण्यात धोके आहेत आणि अशी मदत घेताना देशाच्या आंतरराष्ट्रीय संबंधातील स्वातंत्र्यास धक्का लागता कामा नये, हाही विचार योजनाकारांनी स्पष्टपणे मांडला होता.

विकास योजना अमलात आणावयाची तर शासनास अर्थव्यवस्थेत मोठा वाटा उचलावा लागेल हे गृहीत धरण्यात आले होते आणि अनेक महत्त्वाच्या उद्योगधंद्यांमध्ये भावी विकास सरकारामार्फतच करावा लागेल हे स्पष्ट करण्यात आले होते. खाजगी उद्योगधंदेही योजनेबरहुकूम वाढवायचे तर त्यांवर सरकारला नियंत्रणे घालावी लागतील; आणि ते कोठे घालावेत, उत्पादन कसे करावे, परकीय भांडवलाचा भाग काय असावा, कोणत्या उत्पादनास प्राधान्य द्यावे, अशी सर्व अंगे सरकारास नियंत्रित करावी लागतील हे स्पष्ट केलेले होते. शेतीधंदा सुधारून त्यातील उत्पादन वाढवायचे तर शेत-जमिनीतील मालकी संबंध सुधारले पाहिजेत, कसणाऱ्या कुळास योग्य संरक्षण मिळाले पाहिजे, किमान भाव ठरवून देऊन उत्पादनवाढीस उत्तेजन दिले पाहिजे, या कल्पना मांडण्यात आल्या होत्या. त्याचबरोबर बचतीचे प्रमाण वाढत राहावयाचे तर भपकेबाज उपभोगाला थारा देता येणार नाही, जास्त उत्पन्न असणाऱ्या लोकांना वाढत्या प्रमाणात सरकारास बचतीत हातभार लावावा लागेल, आणि असे केल्याशिवाय योजना फलद्रूप होणार नाहीत. अर्थव्यवहार प्रामुख्याने योजनेने घालून दिलेल्या साच्याप्रमाणे व्हावयाचा तर राजकोषीय आणि चलनी नियंत्रणे तर वापरावी लागतीलच, पण काही काळ तरी अनेक तऱ्हेची प्रत्यक्ष नियंत्रणे वापरावी लागतील; मात्र प्रत्यक्ष नियंत्रणे जितकी कमी ठेवता येतील तितके बरे, हेही स्पष्ट करण्यात आलेले होते.

दुसरी पंचवार्षिक योजना बनविताना योजनेच्या मूलभूत साच्यात जर कोणता महत्त्वाचा बदल झाला असला तर हा की, देशाचा विकास हा काही किमान वेगाने तरी झाला पाहिजे, आणि देशाचे आर्थिक व राजकीय स्वातंत्र्य सांभाळून व्हावयाचा तर, मूलभूत उद्योगांच्या विकासाकडे जास्त लक्ष

दिले पाहिजे यावर भर देण्यात आला. त्या दृष्टीने खनिज पदार्थ, पोलादासारखे महत्त्वाचे धातू आणि वेगवेगळ्या उद्योगांस लागणारी यंत्रसामग्री, रसायने आणि सिमेंटसारखे महत्त्वाचे पदार्थ यांच्या उत्पादन-वाढीकडे विशेष लक्ष देण्यात आले. अशा तऱ्हेची वाढ मोठ्या प्रमाणावर घडवून आणणे खाजगी उद्योग-क्षेत्रास शक्य नव्हते हे उघडच होते. अशा विकासासाठी मोठे भांडवल गुंतविणे, त्यासाठी लागणारे तंत्रज्ञान व मनुष्यबळ दोन्हींची जुळवाजुळव करणे, आणि उत्पादन सुरू होऊन उद्योग फायदेशीर होण्यास वेळ लागणार असला तरी या तऱ्हेच्या योजना पुढे रेटणे हे सरकारी उद्योगधंद्यांस शक्य असले तरी, खाजगी उद्योगांस शक्य नव्हते. याचबरोबर देशात अनेक कारणांमुळे नवे राजकीय वारे खेळू लागले होते, आणि त्याचा परिणाम म्हणून देशाची अर्थरचना ही समाजवादाकडे वाटचाल करणारी असावी हा विचार बळावला होता. त्या दृष्टीने योजनेमधील भांडवलनिर्मितीत सरकारचा वाटा वाढवावा, आणि त्यामानाने खाजगी क्षेत्राचा कमी राहावा, हे ओघानेच आले होते. उपलब्ध भांडवलाच्या गुंतवणुकीची दिशा योजनेतील प्राधान्याप्रमाणे ठरविता यावी, आणि त्याचबरोबर ग्रामीण भागांत आणि लोकसंख्येच्या आजवर दुर्लक्ष केल्या गेलेल्या गटांत बचतीचा प्रचार वाढावा या दोन्ही दृष्टींनी आयुर्विमा धंद्याचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. आधुनिक पद्धतीच्या पतपुरवठ्याचा फायदा केवळ शहरांपुरता आणि व्यापार व उद्योगधंदे यांपुरता न राहता ग्रामीण जनतेला व शेतीधंद्याला त्याचा वाढत्या प्रमाणात फायदा होत राहावा या दृष्टीने इंपिरिअल बँकेचेही राष्ट्रीयीकरण करण्यात आले, आणि या सर्व अर्थसंकल्पनेचा दुसरा भाग म्हणून श्रीमंत वर्गावरील प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष करांच्या पद्धतीत आणि दरांत बदल करण्यात आले. एकूण हवा अशी झाली की देशाच्या अर्थव्यवस्थेचा मूलभूत ढांचा, वैधानिक पद्धतीने का होईना, पण दृढपणे आणि थोडक्या काळात बदलला जाणार आहे.

दुसऱ्या योजनेसाठी म्हणून अंगिकारण्यात आलेला प्रशांतचंद्र महालनोवीस यांच्या प्रतिमानावर (Model) आधारलेला— विकासाचा हा ढांचा विशेष आणि मूलभूत बदल न करता सहाव्या योजनेपर्यंत चालू होता असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही. एकूण भांडवल-गुंतवणुकीचा निम्म्यापेक्षाही जास्त वाटा (तिसऱ्या व चौथ्या योजनेत तर ६० टक्क्यांहून जास्त वाटा) सार्वजनिक (सरकारी मालकीच्या) क्षेत्रात असणे, योजना-खर्चापैकी २० टक्क्यांहून जास्त वाटा मोठे उद्योगधंदे आणि खाणी यांजकरता वापरला जाणे आणि शासकीय नियंत्रणे, राष्ट्रीय उत्पन्नाचा सरकारी वाटा इत्यादींवर वाढता भर, या सर्व प्रवृत्ती दुसऱ्या योजनेपासून ज्या चालू झाल्या त्या जवळजवळ अखंडपणे सहाव्या योजनेपर्यंत चालू होत्या. तांत्रिकदृष्ट्या विकास-योजनेमागील प्रतिमानात अनेक तऱ्हेचे बदल आणि सुधारणा केल्या गेल्या असल्या तरी, विकासाच्या मूलभूत ढांचात काही बदल झाला असे म्हणण्याचे कारण नाही.

पण याउलट, असेही लक्षात ठेवले पाहिजे की दुसरी योजना स्वीकारताना ध्येयधोरणाबद्दलचा जो एक तात्त्विक आविष्कार— किंवा निदान आविर्भाव— पुढे मांडण्यात आला होता, त्याच्यात ती योजना सुरू झाल्यावर दोन-तीन वर्षांतच बदल होऊ लागले. स्वाभिमान, स्वावलंबन आणि समाजवाद या घोषणा चालू राहिल्या— किंबहुना घोषणांचा आवाज मोठाच होत गेला— परंतु खरेखुरे पाहिले असता या धोरणांना गळती लागली. दुसऱ्या योजनेच्या तयारीच्या काळात जेव्हा काही परकीय सल्लागार आणि मदत करणाऱ्या संस्था यांनी त्यात बदल सुचविले होते तेव्हा त्यांना निक्षून सांगण्यात आले होते की, योजनेचा गाभा, तिचे ध्येयधोरण ठरविणे हा भारताचा सार्वभौम हक्क आहे आणि त्यात कोणतीही परकीय ढवळाढवळ चालणार नाही. पण ही भूमिका टिकविण्यासाठी ज्या शिस्तीची, काटकसरीची आणि सर्व अर्थव्यवहार स्पष्टपणे योजनेच्या दिशेने चालविण्याच्या निर्धाराची गरज होती, ती सत्ताधारी मंडळींच्यात नसल्यामुळे परदेशी चलनाची युद्धकाळापासून चालत असलेली गंगाजळी तर संपलीच; पण टंचाईची बिकट परिस्थिती निर्माण झाली. अन्नधान्यावरील नियंत्रणे व्यवस्थित चालू ठेवून अडचणींच्या काळात देशात टंचाई आणि त्यातून उद्‌भवणारी संकटे निर्माण

होणार नाहीत याची काळजी घ्यावयाची आवश्यकता १९४६ पासून सरकारपुढे अनेक तज्ज्ञांनी, समित्यांनी आणि नियोजन आयोगाने मांडलेली होती. पण त्याकडे दुर्लक्ष करून धरसोडीचे धोरण सरकारने स्वीकारल्यामुळे त्या क्षेत्रांतही संकटे निर्माण झाली; आणि हे सर्व लक्षात येताच योजनेत बदल करण्याचे आणि मदत देऊ शकणाऱ्या संपन्न देशांकडे याचना करण्याचे सरकारने ठरविले. यांतून जागतिक बँकेच्या नेतृत्वाखालील भारतास मदत करणाऱ्या देशांचा एक गट (Consortium) उभारण्यात आला आणि तेव्हापासून जागतिक बँकेच्या नेतृत्वाखाली हा गट भारताच्या विकास योजनांना मदत करीत आलेला आहे. पण अर्थातच या मदतीचा परिणाम म्हणून, योजनांचे ध्येयधोरण ठरविण्यातही या मदत करणाऱ्या संस्था व त्यांचे प्रतिनिधी यांचा वाटा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष तऱ्हेने मोठा राहिला आहे. दुसऱ्या योजनेच्या काळात परदेशी चलनातील तुडवडा भरून काढण्यासाठी सुमारे ९०० कोटी रुपयांची परदेशी मदत आवश्यक असेल असा अंदाज योजना आयोगाने केलेला होता. पण हा अंदाज करताना असेही म्हणण्यात आले होते की, योजनेच्या स्वरूपात कोणताही बदल न करता अशी मदत मिळाली तर ठीक; न मिळाल्यास अंतर्गत बचत आणि इतर मार्गांचा जास्त कटाक्षाने उपयोग करण्यास हवा. पण असे काही करण्याची क्षमता नसल्यामुळे परदेशी मदतीवर विकास योजना अवलंबून राहण्याची पद्धत त्यानंतर कायमच झाली. योजनांमधील सार्वजनिक क्षेत्रांच्या खर्चापैकी मोठा भाग परदेशी मदतीवर अवलंबून राहू लागला आणि हे प्रमाण तिसऱ्या योजनेतील २८ टक्क्यांवरून सहाव्या योजनेत १० टक्क्यांइतके खाली आले असले आणि देशातील एकूण भांडवलनिर्मितीचा फार थोडा वाटा परदेशी मदतीवर अवलंबून असला तरीसुद्धा ही मदत सरकारी क्षेत्रात महत्त्वाची असल्यामुळे, व इतर कारणांनी, मदत देणाऱ्यांचा प्रभाव देशाच्या आर्थिक ध्येयधोरणावर तेव्हापासून विशेष पडला असे म्हणण्यास हरकत नाही.

असा परिणाम होत आहे, दुसरी योजना स्वीकारली जात असताना समाजवादाकडे वाटचाल करण्याच्या, देशाची अर्थव्यवस्था स्वावलंबी बनविण्याच्या, आणि गरिबांची स्थिती सुधारण्याच्या ज्या वल्गना केल्या गेल्या त्या खोट्या पडत आहेत याची जाणीव नेहरूंसारख्या जनमानसाची संवेदना उत्तम जाणणाऱ्या नेत्याला होती. योजनाबद्ध विकास केला जात असताना श्रीमंतांची श्रीमंती आणि गरिबांची गरिबी वाढतच आहे की काय असा प्रश्न स्वतःच विचारून पंडितजींनी महालनोबीस यांच्या नेतृत्वाखाली या विषयाकडे बघण्यासाठी एक समिती स्थापन केली. या समितीच्या कामावरून आणि सूचनांप्रमाणे मक्तेदारी चौकशी आयोग नेमण्यात आला. रवि हजारी यांनी समितीसाठी केलेल्या अभ्यासाचा परिणाम म्हणून, औद्योगिक परवाना पद्धती आणि सरकारी वित्त संस्था यांनी औद्योगिक धोरणाची मूलभूत उद्दिष्टे साधण्यात कितपत हातभार लावला आहे हे बघण्यासाठी दत्त समिती नेमण्यात आली. त्याच वेळी काँग्रेस पक्षात जो राजकीय संघर्ष निर्माण झाला, त्याला तात्त्विक झालर देण्यात येऊन समाजवादी धोरण पुढे रेटण्याचा भाग म्हणून सर्व मोठ्या बँकांचे आणि त्यानंतर कोळशाच्या धंद्याचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. संपन्नांची संपत्ती आणि देशातील दुरुपयोगी अशी विषमता कमी करण्याचे प्रतीक म्हणून राजेरजवाड्यांचे तनखे बंद करण्यात आले. मक्तेदारीविरोधी कायदा करण्यात येऊन मक्तेदारी आयोग नेमण्यात आला. प्रत्यक्ष करांचे प्रमाण विशेष वाढविण्यात आले. बळवंतराय मेहता समितीच्या अहवालाबरहुकूम देशात पंचायत राज्यांची स्थापना करण्याचे ठरविण्यात आले व योजना बनविण्यात व तिच्या कार्यवाहीत विकेंद्रीकरण होईल, विकास योजनांत सामान्य जनांचा भाग वाढविता येईल, अशा कल्पना मांडण्यात आल्या. चौथ्या योजनेच्या सुरुवातीच्या वर्षांत एकूणच वातावरण असे होऊन गेले की, पुन्हा एकवार योजनेच्या मार्गाने समाजवादी उद्दिष्टे साधली जाण्याची, गरिबी हटविली जाण्याची आणि देशाची झपाट्याने उन्नती होण्याची आशा अनेकांच्या मनात फुलू लागली.

पण ही हवा फार थोडा काळ टिकली. १९७३ नंतर, ज्या तऱ्हेची धरसोड ध्येयधोरणात १९५८–५९ सालापासून दिसत होती तशीच, पुन्हा

एकवार, चालू झाली. पाचव्या योजनेत बेकारी निवारणाच्या वगैरे काही विशेष योजनांचा अंतर्भाव केला गेला. परंतु अर्थव्यवस्थेच्या ढांच्यात आणि पद्धतीत विशेष फरक पडला नाही. १९७७ मध्ये देशाच्या इतिहासात प्रथमच दुसऱ्या पक्षाचे सरकार राज्यावर आले. पण त्यानेही विकासाच्या पद्धतीत विशेष काही फरक झाला नाही. १९८० मध्ये पुन्हा एकवार काँग्रेस पक्ष राज्यावर येऊन १९७३ पासून ज्या तऱ्हेचे आर्थिक धोरण वाढत्या रीतीने अमलात येत होते, ते आणखीच झपाटचाने आणि स्पष्टपणे पुढे जाऊ लागले. आता आपण सातव्या पंचवार्षिक योजनेच्या उंबरठ्यावर उभे आहोत. १९८४–८५ मधील राजकीय दुर्घटनांमुळे, आणि त्यांतून जे राजकीय बदल झाले आहेत त्यामुळे, देशाच्या विकासाच्या पद्धतीत काही मूलभूत बदल घडवून आणले पाहिजेत असे विचार सरकारी आणि राज्यकर्त्या वर्तुळांमधून मांडले जात आहेत. तेव्हा आजवरचा योजनाबद्ध विकासाचा आपला अनुभव काय दर्शवितो आणि त्यावरून भावी काळासाठी कोणते धडे आपण शिकले पाहिजेत त्याचा विचार करण्यास ही योग्य वेळ आहे.

– ३ –

एक गोष्ट स्पष्ट आहे की, स्वातंत्र्याच्या वेळी भारत होता तो आता अनेक दृष्टींनी बदलला आहे, सुधारला आहे, विकास पावला आहे. जवळजवळ सर्व तऱ्हेच्या यंत्रसामग्रीसाठी परावलंबी असलेल्या भारतात आता आवश्यक अशी बहुतेक तऱ्हेची यंत्रसामग्री निर्माण होऊ शकते. आधुनिक अर्थ-व्यवस्थेला आवश्यक अशी रसायने, खनिजे आणि धातू यांचे उत्पादन भारतात मोठ्या प्रमाणावर होत आहे. शास्त्र आणि तंत्रज्ञान यांतही भारताने मोठी आघाडी मारली असून भारतीय शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञ यांची उपलब्धता देशात तर मोठी आहेच; पण त्यांना विकसित देशांतही मोठी मागणी आहे. शेती-उत्पादनातील अनेक दशकांचा गतिरोध संपून शेतीमालाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढले आहे. कारखान्यांत काम करणाऱ्या मजुरांची संख्या दुप्पटीने वाढली आहे. सर्व तऱ्हेचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या जवळजवळ सहापटीने वाढली आहे, आणि भारतीय नागरिकाचे सरासरी आयुर्मान ३२ वर्षांवरून ५० वर्षांवर पोहोचले आहे. विकास योजनांमधून देशाची प्रगती अनेक तऱ्हेने झाली आहे, काही अती मागासलेले भागही आधुनिक संस्कृतीच्या आणि उत्पादनाच्या मार्गाने वाटचाल करू लागले आहेत, यात कोणतीही शंका नाही.

पण याबरोबरच हेही विसरता येत नाही की, योजनाबद्ध विकासाच्या सुरुवातीस जी उद्दिष्टे डोळ्यांसमोर ठेवण्यात आली होती, गरिबांची गरिबी हटविण्याच्या, बेकारांची बेकारी नष्ट करण्याच्या, संपत्तीतील आणि उत्पन्नातील प्रचंड विषमता नाहीशी करण्याच्या, आणि समाजवादा-कडे वाटचाल करण्याच्या ज्या कल्पना योजनांमध्ये पुढे मांडण्यात आल्या होत्या त्या काही विशेष कार्यवाहीत आल्या नाहीत. मी आधी सांगितले आहेच की, पहिल्या पंचवार्षिक योजनेत विकासाचे एक ठोबळ उद्दिष्ट मांडण्यात आले होते की, साधारण पाच पंचवार्षिक योजनांमध्ये देशातील दरडोई उत्पन्न दुप्पटीने वाढावे. योजनाबद्ध विकास योजना सुरू होऊन ३५ वर्षे झाली, जवळजवळ सात पंचवार्षिक योजनांचा काळ लोटला. तरीही हे उद्दिष्ट सफल झालेले नाही. १९५०–५१ च्या मानाने दरडोई खरे उत्पन्न सरासरी ६०–६२ टक्क्यांनीच वाढलेले आहे. आणि ही वाढ **सरासरी** उत्पन्नातील आहे.

संपत्तीतील आणि उत्पन्नांतील विषमता खरीखुरी कमी झालेली आहे असे समजण्यास कोणताही वाव नाही. असे दिसून आले आहे की, सगळ्यांत गरीब जे १० टक्के लोक आहेत त्यांचा उपभोगावरील खर्च देशातील एकूण उपभोगखर्चाच्या ३.५ ते ४ टक्के इतका असतो, तर सगळ्यांत संपन्न अशा १० टक्के लोकांचा हा खर्च देशातील उपभोगखर्चाच्या २५ टक्क्यांहून जास्त असतो. भारतातील एकूण दारिद्र्य-रेषेखालील जनतेची संख्या किती आहे याबद्दल आता वादविवाद आहेत. १९७७–७८ मध्ये तरी अशा जनतेचे प्रमाण ४७–४८ टक्के इतके आहे असे सर्वत्र मान्य केले जात होते. आता ही संख्या ३७–३८ टक्के इतकी खाली आली आहे असा दावा शासकीय वर्तुळांकडून केला जातो. हा दावा जरी खरा मानला तरी हे स्पष्ट आहे की, ३५ वर्षांच्या नियोजित

विकासाच्या प्रयत्नांनंतरसुद्धा या देशांतील १०० पैकी ३७–३८ लोक निकृष्टावस्थेत जीवन कंठितात. पहिल्या योजनेपासून आजवर बेकारी निवारणासाठी अनेक कल्पना आणि प्रयोग मांडले गेले आणि कार्यवाहीत आणले गेले; तरी बेकारांची आणि अर्ध-बेकारांची संख्या कमी होत आहे असा स्पष्ट दावा कोणी करू शकत नाही. प्राथमिक शिक्षण न घेणाऱ्या मुलांचे प्रमाण सर्व भारतात मिळून अजूनही जवळजवळ ३० टक्के आहे, काही प्रांतांत तर ते ४० टक्क्यांहून जास्त आहे आणि मुलींचे प्रमाण तर अनेक ठिकाणी ५५ ते ६० टक्के आहे. या सर्व आकड्यांवरून हे स्पष्ट होते की, ज्या मूलभूत उद्दिष्टांसाठी योजनाबद्ध विकासाची दिशा देशाने स्वीकारली, ती उद्दिष्टे साध्य करण्यात आजवरच्या धोरणांना विशेषसे यश लाभलेलं नाही.

हे असे का झाले ? ध्येयधोरणे ठरविण्यात काही चुकले, विकासाबद्दल जे प्रतिमान बनविले गेले तेच चुकीचे होते, की केवळ कार्यवाहीत चुका झाल्यामुळे असे झाले ? या प्रश्नावर अर्थातच अनेक मतप्रवाह आहेत आणि याबद्दलचा ऊहापोह गेली ३०–३५ वर्षे अखंड चालू आहे.

अर्थशास्त्रज्ञांमधील एका गटाचा रोख फार सुरुवातीच्याच काळापासून ज्या तऱ्हेचे विकास-प्रतिमान विशेषतः दुसऱ्या योजनेपासून वापरले गेले, आणि त्या आधारावर जी ध्येयधोरणे आखण्यात आली, त्यांवर टीका करण्याचा राहिलेला आहे. बी. आर. शेणॉय, सी. आर. वकील, पी. आर. ब्रह्मानंद इ. नी १९५६–५७ पासूनच या तऱ्हेच्या नियोजनाला आणि ध्येयधोरणाला विरोध दर्शविलेला होता. त्यांचे मुख्य म्हणणे असे की, शेतीवर भर देण्याऐवजी उद्योगधंद्यांवर भर देणे, उद्योगधंद्यांमध्येसुद्धा उपभोग्य मालाऐवजी भांडवली माल, यंत्रसामग्री इत्यादींवर भर देणे यामधून भाववाढ, बेकारी, राष्ट्रीय उत्पन्नाची अतिशय मर्यादित वाढ, भांडवल आणि उत्पादन यांचे गुणोत्तर (ratio) जास्त राहून उत्पादनात भर कमी पडणे, हे परिणाम सहजच उद्भवतात. त्याचबरोबर योजनाखर्चासाठी तुटीची वित्तव्यवस्था मोठ्या प्रमाणात वापरण्याची पद्धत पाडल्यामुळे भाववाढ अटळ राहात गेली आणि त्याचा उघडच परिणाम सामान्य लोकांची स्थिती वाढत्या हलाखीची होण्यात झाला. शिवाय शेतीधंद्याला आणि उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनाला पुरेसे महत्त्व आणि प्राधान्य न दिल्यामुळे भाववाढीच्या प्रवृत्तीला आणखीच जोर आला.

या टीकेत दुसरेही काही मतप्रवाह हळूहळू सामील झाले. शासनाच्या हाती नियंत्रणाची मोठी सत्ता केंद्रित झाल्यामुळे दिरंगाई आणि भ्रष्टाचार यांचे तर प्रमाण वाढलेच; पण अनेक वेळा आर्थिक निकषांवर टिकू शकणार नाहीत असे निर्णय घेतले गेले आणि भांडवलाची, संपत्तीची उधळमाधळ झाली, असा दावा विशेषतः खाजगी औद्योगिक वर्तुळामधून केला जातो. परदेशी तंत्रज्ञान आणि यंत्रसामग्री आणण्यावर बंधनें घातल्यामुळे एतद्देशीय उद्योगधंदे तंत्रज्ञानात जुनाट व मागासलेले राहिले आणि जगाच्या बाजारातील चढाओढीस तोंड देण्याची क्षमता भारतीय उद्योगधंद्यांमध्ये आली नाही. त्यामुळे निर्यात व्यापारावर परिणाम होऊन जागतिक व्यापारात भारत मागे पडला. औद्योगिक परवान्यांच्या पद्धतीमुळे काही क्षेत्रांत मक्तेदारी वाढली तर काही क्षेत्रांत बिनकिफायती प्रमाणावर उत्पादन करणारे कारखाने उभे राहून मोठ्या प्रमाणावर उत्पादन करण्याचे फायदे देशाला मिळवता आले नाहीत. अनेक तऱ्हेचे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कर लादल्यामुळे, आणि करांचे प्रमाण अव्वाच्या सव्वा वाढविल्यामुळे, कर चुकविण्याची प्रवृत्ती वाढत गेली आणि देशात काळ्या पैशाचा वापर वाढला. मक्तेदारीविरोधी कायद्यामुळे महत्त्वाच्या उद्योगांची वाढ खुंटली तरी किंवा त्या वाढीत अतिशय दिरंगाई होऊन भांडवली खर्चाचे प्रमाण वाढले आणि औद्योगिक विकासाचा वेग मंदावला. अनेक महत्त्वाचे उद्योगधंदे आणि इतरही अर्थ-व्यवहार सरकारी मालकीच्या क्षेत्रासाठी राखून ठेवल्यामुळे आणि सरकारी मालकीच्या धंद्यात जवळजवळ सर्वत्र अकार्यक्षमता माजल्यामुळे, देशाच्या एकूणच अर्थव्यवस्थेत हाहाकार माजला. रेल्वे, वीजमंडळे, टेलिफोनसारखी दळणवळणाची साधने यांच्या अकार्यक्षमतेचा परिणाम अर्थव्यवस्थेच्या सर्वच क्षेत्रांस भोगावयास लागून उत्पादनाची आणि एकूणच विकासाची गती रोधली गेली. इतर क्षेत्रांतील सरकारी मालकीचे उद्योग अनेक वेळा

तोटद्यात चालल्यामुळे फार मोठ्या भांडवलाचा अपव्यय झाला आणि या धंद्यांमधून फायदा मिळून भांडवलनिर्मितीस पुढे हातभार लागण्याऐवजी या धंद्याचा तोटा सरकारी तिजोरीवर भार होऊ लागला. तेव्हा विकासाचा आणि योजनांचा १९५५–५६ पासून चुकीच्या मार्गाने वाढत गेलेला हा ढांचाच बदलला पाहिजे, तरच देशाची आर्थिक स्थिती खरोखर सुधारू शकेल, अशी टीका अनेक वेळा केली गेली आहे; आणि विशेषतः गेल्या काही वर्षांत या टीकेला जोर आला आहे.

येथे हे लक्षात ठेवले पाहिजे की, योजनेच्या मूलभूत कल्पनांना विरोध असणाऱ्यांमध्ये केवळ स्वतंत्र पक्षासारखे विरोधी राजकीय पक्ष होते असे नव्हे, तर सत्ताधारी पक्षातही अशा मतांची मंडळी बरीच होती. पण नेहरू अगर इंदिरा गांधी यांसारख्या लोकप्रिय आणि जरबीने सत्ता चालविणाऱ्या नेत्यांविरुद्ध मतभिन्नता स्पष्टपणे मांडण्याचे धैर्य यांपैकी बहुतेक मंडळींमध्ये नव्हते. शासनयंत्रणेत तशीच स्थिती होती. अनेक वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांना आणि सल्लागारांना योजनेतील आणि या तऱ्हेच्या प्रतिमानातील महत्त्वाची अंगे मान्य नव्हती; पण याविरुद्ध स्पष्ट मत देण्याचे धारिष्टच अगर तत्त्वनिष्ठता त्यांपैकी फार थोडयांजवळ होती. या तऱ्हेचे धोरण मान्य नसणारे प्रभावी गट परदेशांमध्ये अर्थातच अनेक होते; आणि त्यांत विशेषतः अमेरिका, आणि अमेरिकेच्या प्रभावाखाली असणाऱ्या आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक बँक या संस्था, यांचा समावेश होता. जेव्हा संधी सापडली तेव्हा धोरणात आणि योजनेमागील एकूणच प्रतिमानात बदल घडवून आणण्याचे प्रयत्न या सर्व मंडळींनी केले. भारतातील खाजगी क्षेत्रात प्रबळ असणाऱ्या व्यापारी आणि उद्योगपतींचाही या ध्येयधोरणांमधील अनेक बाजूंना आणि अंगांना विरोध होता. सावधपणाने का होईना, पण संधी मिळताच त्यांनीही या सर्व धोरणांमध्ये बदल घडवून आणण्याच्या प्रयत्नात वाटा उचलला. वर म्हटल्याप्रमाणे १९५८–५९ मध्ये परदेशी चलनाची टंचाई, आणि इतरही अन्नधान्याची वगैरे संकटे, यांमुळे जेव्हा भारतसरकार अडचणीत होते तेव्हा, विकास योजनेला जी थोडीशी स्पष्ट दिशा १९५६ पासून मिळू पाहात होती ती धूसर करण्यात, एकूणच सर्व पद्धती ढिली बनविण्यात, या शक्तींना यश लाभले. १९६६–६७ मध्ये पुन्हा एकवार अनेक आर्थिक संकटे देशापुढे उभी ठाकली असताना प्रमुख धोरणांमध्ये बदल करण्यासाठी भारत सरकारवर विशेष दबाव आणण्यात आला; आणि रुपयाचे अवमूल्यन करून धोरण बदलण्याची आपली तयारीही सरकारने दाखवली. पण अनेक कारणांमुळे १९६९–७० सालामध्ये प्रवाह पुन्हा उलटला; आणि सरकारी धोरण काही काळ तरी पुन्हा सरकारी क्षेत्र वाढविण्याकडे, सरकारी नियंत्रणे कडक करण्याकडे, संपन्न वर्गावर कठोर नियंत्रणे आणून गरिबी हटविण्याकडे वळले. पण हे अवसान फार काळ टिकले नाही. नियंत्रणांची पद्धती टिकली. पण उद्दिष्टांपासूनची घसरण १९७३ मध्ये सुरू झाली ती सतत चालू राहिली. १९८० पासून बदल करीत आहोत असे उघड न म्हणता धोरणात जास्त प्रमाणात बदल करण्यात येऊ लागले, आणि आता विशेषतः नोव्हेंबर १९८४ पासून तर धोरणात महत्त्वाचे व मूलभूत बदल घडवून आणले जात आहेत. अर्थात समाजवादाचे उद्दिष्ट आम्ही सोडले, किंवा गरिबांची आम्ही आता कदर करणार नाही, असे कोणतेच सरकार अगर पक्ष म्हणणार नाही. उलट, जवाहरलाल नेहरू यांनी घालून दिलेल्या मूलभूत चौकटीतच आम्ही आमची धोरणे आखीत आहोत असा राज्यकर्त्यांचा दावा आहे. पण प्रत्यक्षात मात्र महत्त्वाचे बदल घडवून आणण्यात येत आहेत.

अर्थात हे स्पष्ट केले पाहिजे की, आजवर ज्या तऱ्हेने विकास योजना घडविल्या गेल्या आणि त्यांची कार्यवाही केली गेली त्याबाबत जी अनेक तऱ्हेची टीका केली गेली आहे आणि जात आहे त्यात अगदीच तथ्य नाही असे कोणासच म्हणता यावयाचे नाही. सरकारच्या हाती प्रचंड सत्ता एकवटून, सरकारामार्फत प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रीतीने जलद आर्थिक विकास आणि त्याचबरोबर सामाजिक न्याय भारताला साधता येईल, ही अपेक्षा प्रत्यक्षात फोल ठरली, यात काहीच शंका नाही. अनेक तऱ्हेची नियंत्रणे सरकारच्या हाती असूनसुद्धा ज्या तऱ्हेच्या शिस्तीने देशाची अर्थव्यवस्था चालावी अशी अपेक्षा योजनांमध्ये होती तशी शिस्त कधीच पाळली गेली

अनुक्रमणिका

नाही. दुसऱ्या योजनेच्या सुरुवातीच्या वर्षांत आयात व्यापार आणि परदेशी चलन यांवर सरकारचे पूर्ण नियंत्रण असूनसुद्धा परकीय चलनाच्या टंचाईचे मोठे संकट १९५७–५८ मध्ये कसे उभे राहिले ? किंवा देशात औद्योगिक विकास हा सर्व भागांत विखरून झाला पाहिजे, समतोल झाला पाहिजे, अशा उद्दिष्टाने औद्योगिक परवाना पद्धती आणि इतर नियंत्रणे यांचा वापर केला जावा आणि मुंबईसारख्या शहरांची जास्त वाढ होऊ देऊ नये अशी कल्पना योजना काळाच्या सुरुवातीपासूनच मांडण्यात आली होती; असे असून मुंबईची प्रचंड वाढ कशी झाली ? आयकराचे प्रमाण वाढते ठेवूनही संपन्न वर्गाचे उत्पन्न आणि उपभोग यांवर त्याचा काय परिणाम झाला ? मक्तेदारीविरोधी कायदा करून आणि मक्तेदारी आयोग निर्माण करून देशातील खाजगी उद्योगसमूहांची मक्तेदारी आणि वाढ कितपत खुंटली ? भांडवलवाल्या वर्गाचा लोकशाही राजकारणावर देणग्यांमुळे प्रभाव पडू नये म्हणून कंपन्यांना राजकीय कामासाठी देणग्या देण्यास जी बंदी घालण्यात आली त्याचा काय उपयोग झाला ? अनेक पदार्थांच्या भावांवर नियंत्रण ठेवण्याचे अधिकार सरकारकडे असूनसुद्धा आवश्यक वस्तूंचे भाव वाढतच राहिले की नाही ? काळाबाजार वाढला की नाही ? आजसुद्धा साखरेसारख्या आवश्यक वस्तूंची स्थिती काय दिसते ? शेतजमिनीच्या मालकीबाबतच्या सुधारणांबद्दल स्वातंत्र्याच्या वेळेपासून अनेक घोषणा, ठराव, कायदे इ. होऊनसुद्धा कसेल त्याची जमीन आणि जमिनीचे काही प्रमाणात तरी समान वाटप करून भूहीनांना जमीन मिळवून देण्यात कितपत यश आले ? मोठ्या उद्योगधंद्यांतल्या आणि संघटित कामगारांना शासकीय यंत्रणेचा आणि कायद्यांचा वापर करून काही संरक्षण देता आले, त्यांचे शोषण बरेचसे थांबविता आले हे खरे; पण जे खरेखुरे अतिशय शोषित आहेत असे आदिवासी, हरिजन आणि एकूणच शेतमजूर, त्याचप्रमाणे शहरी आणि ग्रामीण छोट्या व्यापारधंद्यांमधील, असंघटित मजूर, यांचे सतत चाललेले प्रचंड प्रमाणावरील शोषण थांबविण्यात आणि त्यांची विपन्नावस्था कमी करण्यात अपयश आले ते कसे ? सरकारजवळ पुरेशी सत्ता नाही, कायद्याचे शासनास पाठबळ नाही, म्हणून असे होते आहे का ? की जवळ निरंकुश सत्ता सरकारच्या हाती असूनही सरकारची जडणघडण हीच अशी आहे, की घोषित उद्दिष्टे साध्य करण्याची त्यातील घटकांची खरीखुरी इच्छा आणि तयारीच नाही ?

देशाच्या आर्थिक नियोजनाला हे जे वेगवेगळ्या तऱ्हेचे अपयश आलेले आहे त्याचे मूलभूत कारण म्हणजे विकासाचे प्रतिमानच चुकले होते असे म्हणण्यास जागा नाही. भारतासारख्या खंडप्राय देशात लोह आणि कोळसा या खनिजांची मुबलक उपलब्धता असताना आधुनिक अर्थव्यवस्थेला आवश्यक असे पोलादाचे उत्पादन झपाट्याने वाढविण्याचे ठरविले तर त्यात चूक कोणती ? परदेशांवर महत्त्वाच्या यंत्रसामग्रीसाठी अवलंबून राहाण्याचे तोटे स्वतःच्याच गेल्या १०० वर्षांच्या इतिहासावरून आणि इतर अनेक देशांच्या अनुभवांवरून पाहिल्यानंतर अशा महत्त्वाच्या भांडवली गोष्टींसाठी देश बराचसा स्वावलंबी करण्याचे ठरविण्यात चूक ती काय ? भारताची लोकसंख्या, त्याचे क्षेत्रफळ, त्याच्या अर्थव्यवस्थेची संभाव्य भावी व्याप्ती हे सर्व लक्षात घेता महत्त्वाचे सर्व उद्योगधंदे योग्य परिमाणावर येथे उभारता येतील हे बघून औद्योगिक विकासाच्या योजना बनविण्यात गफलत कशी ? सुरुवातीस जेथून चांगले तंत्रज्ञान जास्तीतजास्त फायद्यांच्या अटींवर मिळू शकेल तेथून ते घेणे, पण त्यानंतर एतद्देशीय तंत्रज्ञांनीच तांत्रिक सुधारणा करीत राहाण्याची आकांक्षा बाळगणे, त्यासाठी शास्त्र आणि तंत्रज्ञान शिकविणाऱ्या अत्युत्तम संस्था काढणे आणि त्यांना तांत्रिक सुधारणा करीत राहाता यावे म्हणून मोठ्या प्रमाणावर संशोधन संस्था उपलब्ध करून देणे, या सर्व पायऱ्या चांगल्या नियोजनाचा भाग मानता येणार नाहीत काय ? १९५६ नंतर ७-८ वर्षांत एकाच वेळी भारतात पोलादाचे तीन मोठे अद्ययावत कारखाने काढता आले, त्यासाठी योग्य ते तांत्रिक मनुष्यबळ शिकवून तयार करता आले, तांत्रिक शिक्षणाच्या ज्या विशेष संस्था (Institutes of Technology) काढल्या. त्यांतील प्रशिक्षितांना केवळ देशात नव्हे तर विकसित देशांतसुद्धा मागणी

अनुक्रमणिका

यत राहिली, ही सर्व काय हे धोरण चूक होते असे दर्शवितात ?

या प्रतिमानात शेतीकडे आणि उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनाकडे दुर्लक्ष केले गेले होते ही कल्पना बरोबर नाही. योजना खर्चाचे आकडे बघितले की हे स्पष्ट दिसते की, शेतीला आवश्यक अशा पाणी, खते, सुधारित बी-बियाणे या सुविधा पुरविण्यासाठी पुरेशा खर्चाची तरतूद करण्यात आली होती. झाले नाही ते हे की, या सर्वांचा उत्तम उपयोग होण्यासाठी जे संघटणात्मक कार्य क्षमतेने करावयास हवे होते त्यात शासन, राजकीय पक्ष आणि सर्वच संघटणा अपुऱ्या ठरल्या. घटनेमध्ये सर्व नागरिक झपाट्याने शिक्षित करून टाकण्याची व्यक्त केलेली आशा प्रत्यक्षात आणण्याचा निर्धार आणि संघटणात्मक धडाडी दाखविण्यात आली नाही. नवीन तंत्रांचा वापर करण्यात, किंवहुना नवीन सुविधांचा प्रत्यक्ष उपयोग शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यास अतिशय दिरंगाई झाली, आणि त्यामुळे भांडवल गुंतविल्यानंतर उत्पादन वाढण्यास फार काळ जावा लागला.

तशीच स्थिती इतर उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनाबद्दल होती. गांधीजींचे खादीचे संपूर्ण तत्त्वज्ञान जरी मान्य झाले नव्हते, तरी देशात मनुष्यबळ भरपूर असून भांडवलाचा तुटवडा दीर्घकाळपर्यंत जाणवणार आहे हें सत्य कोणीच डोळचाआड करू शकत नव्हते. तेव्हा ज्या ज्या उद्योगांत अगर आर्थिक व्यवहारात कमी भांडवल आणि जास्त मनुष्यबळ यांची सांगड घालून उत्पादन शक्य होते तेथे तेथे ते तसे करावे हा विचार योजनाकारांचा होता. पोलाद आदी धातूंचे अगर कोळशासारख्या खनिजांचे व विजेचे उत्पादन, आधुनिक उद्योगांस लागणाऱ्या अवजड यंत्रांची आणि मूलभूत रसायनांची निर्मिती, अशा क्षेत्रांत या तऱ्हेचे, कमी भांडवल आणि जास्त मनुष्यबळ यांची सांगड घालणारे, तंत्रज्ञान विशेष उपलब्ध नव्हते. उलट, अनेक उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनात ही शक्यता फार मोठी होती. या कारणामुळे योजनांमध्ये गुंतविण्याच्या भांडवलाची वाटणी काही मूलभूत धंद्यांकडे आणि सुविधांकडे जास्त झुकणारी अशी दिसून येते. पण याचा अर्थ शेतीधंद्याकडे अगर इतर उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनाकडे योजनाकारांनी लक्ष दिले नाही असा घेता येत नाही. विकास योजनेमागील मूळ प्रतिमान चुकीचे नव्हते.

मग नियोजन अमलात आणताना चुका का होत गेल्या ? याचे थोडक्यात उत्तर असे की, या प्रकारचे नियोजन पार पडण्यासाठी देशातील राजकीय आणि शासकीय रचना कशी असली पाहिजे याकडे योजनाकारांनी आणि त्यावर विचार करणाऱ्या अर्थशास्त्रज्ञांनीसुद्धा पुरेसे लक्ष दिले नाही. मी आधी म्हटलेच आहे की, स्वातंत्र्यापूर्वीपासूनच ही कल्पना सर्वमान्य होती की भारतासारख्या अप्रगत, विकास जवळजवळ कुंठित झालेल्या देशाची आर्थिक प्रगती झपाट्याने घडवून आणावयाची व त्याच वेळी समाजातील विषमता व अन्याय कमी करावयाचे, तर लोकांनी निवडून दिलेल्या सरकारने या कामात पुढाकार घ्यावा लागेल; अशा सरकारला अनेक तऱ्हेचे अधिकार स्वतःकडे घेऊन अर्थव्यवस्थेचे नियंत्रण करावे लागेल, काही क्षेत्रांत स्वतःच भाग घेऊन प्रगती करावी लागेल. पण हे म्हणताना असे अध्याहृत धरले जात होते की, लोकांनी निवडून दिलेले स्वातंत्र्योत्तर काळातील सरकार हे राष्ट्राचे आणि बहुजनांचे हित साधेल अशा तऱ्हेनेच वागेल. असे गृहीत धरण्यास राष्ट्रीय चळवळीच्या नेतृत्वावरील विश्वास हे तर एक कारण होतेच ; शिवाय लोकशाही घटना मान्य करून वयात आलेल्या प्रत्येक नागरिकास मतदानाचा अधिकार देऊन, आणि मूलभूत स्वातंत्र्यास व त्याचप्रमाणे समतेच्या तत्त्वांस घटनेतच स्थान देऊन, या प्रवृत्तीस आणखी आधार देण्यात आला होता. अशा लोकशाही मार्गाने निवडून आलेले शासन बहुजन हिताच्या आणि राष्ट्रीय प्रगतीच्या योजनांचा पाठपुरावा करील, त्यासाठी योग्य अशी धोरणे आखील आणि ती निर्धाराने पार पाडील हे योजनाकारांनी गृहीत धरलेले होते. अशा शासनाकडून कळत न कळत चुका होणार नाहीत असे मानण्याचे कारण नव्हते. पण निवडणुकींचा आपल्या सत्तास्थानांवर होणारा संभाव्य परिणाम लक्षात घेऊन चुका टाळल्या जातील, धोरणे बदलली जातील, किंवा असे न करणाऱ्या सरकारला बाजूला सारून मतदार जास्त योग्य मंडळींना अधिकारावर आणतील, असा विश्वास यामागे होता. पण केवळ लोकशाहीची

घटना असल्यामुळे, लोकहिताचे काम करण्याची कुवत आणि खरोखर इच्छा असेल त्यांच्याच हाती शासन येईल हा विचार अगदीच वरवरचा, उथळ आहे हे राज्यशास्त्राच्या अभ्यासूंना सांगण्यास नकोच. एकूण जनता कोणत्या सामाजिक आणि आर्थिक वर्गांमध्ये व गटांमध्ये विभागलेली आहे, या वर्गांचे आणि गटांचे परस्परसंबंध कोणते आहेत, त्यांचे तौलनिक बळ किती आहे, या सर्व गोष्टी लक्षात घेऊनच शासनावर कोणाची पकड राहील याचा विचार करावा लागतो आणि त्याच आधारावर शासन खरोखर कोणत्या धोरणाचा पाठपुरावा करणार, कोणाच्या हिताकडे दृष्टी ठेवणार, हे बघता येते. कोणत्या का कारणाने असेल, भारतातील आर्थिक विकासाच्या आणि नियोजनविषयक विचारांमध्ये या मुद्द्याकडे बव्हंशी दुर्लक्ष केलेले दिसून येते.

पारंपरिक मार्क्सवादी विचारसरणी लक्षात घेतली तर औद्योगिक क्रांती होऊन भांडवलशाही थोडीशी प्रगत झाल्याशिवाय कोणताही देश समाजवादाकडे खरी वाटचाल करू शकत नाही; कारण अशा वाटचालीस आवश्यक अशी उत्पादनाची आणि एकूणच बैठक तयार नसते. पण आता मार्क्सच्याच स्वतःच्या विचारात, विशेषतः १८७० नंतरच्या काळात, रशियासारख्या देशांचा अनुभव लक्षात घेऊन जे बदल होत होते अशी माहिती पुढे येत आहे त्यावरून असे दिसते की, सर्वच देशांनी पश्चिम युरोपातील इंग्लंड, जर्मनी अगर फ्रान्स या देशांसारखे भांडवलशाहीच्या अवस्थेतूनच गेले पाहिजे, त्याशिवाय समाजवादी दिशेने त्यांची वाटचाल होऊच शकणार नाही, अशी त्याची खात्री होती असे दिसत नाही. रशियासारख्या देशात, 'कम्यून' हा ग्रामीण आणि शेतीधंद्यातील संस्थेचा पाया धरून, भांडवलशाहीची पायरी टाळून, एकदम समाजवादाकडे प्रगती करणे अशक्य नाही, हा विचार त्याच्या मनात बळावत होता असे दिसते. अर्थात असे होणे अनेक ऐतिहासिक घटनांवर, एकूण परिस्थितीवर आणि योग्य नेतृत्वावर अवलंबून राहणार होते. तेव्हा सरंजामशाही अजून काही महत्त्वाच्या क्षेत्रांत उलथली न गेलेल्या भारतासारख्या देशात, भांडवलशाही सुदृढ न करता सरळ समाजवादाकडे जाण्याचा प्रयत्न करता येईल असा विचार मार्क्सच्या विचारात बसलाच नसता असे नाही.

भारतासारख्या ज्या देशांमध्ये शांततापूर्ण मार्गाने एतद्देशीय लोकांच्या हाती राज्य आले, अशा ठिकाणी निर्माण झालेली राज्यव्यवस्था कशी असू शकेल आणि त्या देशाची प्रगती होताना कोणते प्रश्न निर्माण होतील याबाबत के. एन. राज यांनी भारतासारख्या देशांमध्ये अशा तऱ्हेची सरकारे कोणत्या वर्गांवर अवलंबून राहतील आणि तेथील आर्थिक नियोजनात आणि अर्थव्यवस्थाविषयक धोरणात कोणते प्रश्न निर्माण होऊ शकतील याबाबत काही कल्पना मांडल्या होत्या. सत्तासंक्रमणानंतर राज्यसत्ता ही जास्त करून कनिष्ठ मध्यम वर्ग आणि मोठा शेतकरी यांच्या प्रभावाखाली राहण्याची शक्यता आणि त्यातून उद्भवणारी आर्थिक प्रश्नांची मालिका ही राज यांनी विशद केली होती. अशा परिस्थितीमध्ये शासकीय भांडवलशाही (State Capitalism) विशेष वाढू शकते; कारण कनिष्ठ मध्यमवर्ग आणि मोठा शेतकरीवर्ग या दोघांनाही स्वहितासाठी अशा पद्धतीचा उपयोग करून घेण्याची शक्यता वाटते. संख्येने वाढत्या शिक्षित मध्यम वर्गाला या पद्धतीत जास्त जास्त संधी मिळू शकतात. मोठ्या शेतकऱ्यांना उत्पादन वाढविण्यासाठी ज्या सुविधा, पाणीपुरवठ्याच्या योजना, खते, सुधारित बी-बियाणे, वीज इ. लागतात त्या त्यांना सरकारमार्फत सहज आणि स्वस्तपणे उपलब्ध होतील असे वाटते. मालाच्या विक्रीतही सरकारने हस्तक्षेप करून शेतीमालाचे भाव बधारते ठेवले आणि दलाल–मध्यस्थांचा फायदा नियंत्रित केला तर या वर्गाचा फायदा होऊ शकतो. शिवाय सरकारी भांडवलशाही वाढविताना तिला समाजवादाचा बुरखा घालता येतो आणि त्यामुळे लोकमताची काही प्रकारांनी फसवणूक करता येते. नियोजन, आर्थिक विकास आणि सरकारी नियंत्रणे या सर्वांचा वापर नियोजित मार्गाने एकूण राष्ट्राच्या आणि विशेषतः बहुजनांच्या हितासाठी केला जात आहे असा आभास निर्माण करता येतो. भारतीय नियोजनाच्या इतिहासाला हे प्रमेय चांगले लागू पडते.

अनुक्रमणिका

पण थोड्याच काळात हे उघड होते की, कनिष्ठ मध्यमवर्ग आणि संपन्न शेतकरी यांचे आर्थिक हितसंबंध अनेक बाबतीत एकमेकांशी विरोधी असल्यामुळे नियोजित धोरणांचा सातत्याने पाठपुरावा होत राहणे अवघड जाते. उदाहरणार्थ, धरण बांधावयाची, वीज अगर खते यांचा पुरवठा वाढवीत राहून जास्त शेतकऱ्यांना हे फायदे मिळवून द्यावयाचे, तर ज्यांना ह्या सुविधा प्रथम उपलब्ध होतील त्यांनी कर व सुयोग्य किंमती आपल्या वाढत्या उत्पन्नातून सरकारला दिल्या पाहिजेत. पण संपन्न शेतकरीवर्गाची यास सामान्यतः तयारी नसते. भारतातसुद्धा जरी सुधारपट्टी, वाढत्या शेती उत्पन्नावर कोणत्यातरी मार्गाने वाढते कर, या कल्पना पहिल्या योजनेपासून मांडल्या गेल्या होत्या तरी त्या प्रत्यक्ष अमलात कधीच आणि विशेष आल्या नाहीत. याचा उघडच असा परिणाम झाला की, या सुविधा झपाट्याने वाढवीत राहणे, त्यांचा फायदा जास्त जास्त शेतकऱ्यांस देणे, आणि या मार्गाने एकून शेतीधंद्याची स्थिती झपाट्याने सुधारणे, शक्य झाले नाही. उलट, संपन्न शेतकऱ्यास विकता येणाऱ्या मालास भाव वाढवून हवे असतात; पण यास शहरी मध्यम वर्गाचा विरोध असतो. तेव्हा हे भाव पुरेसे वाढविले तरी जात नाहींत, किंवा वाढविले तर शहरी वर्गास खूष ठेवण्यासाठी कोणत्या ना कोणत्या मार्गाने अर्थसाहाय्य देऊन शेतीमाल विकावा लागतो. हा बोजा सरकारी अंदाजपत्रकावर वाढत्या प्रमाणात पडल्यामुळे सरकार अडचणीत येते.

शिवाय शासकीय भांडवलशाहीच्या नावाखाली जरी अशा सरकारांनी काही पावले टाकली, काही उद्योगधंदे सरकारी क्षेत्रात वाढविले, काही धंद्यांचे राष्ट्रीयीकरण केले, भांडवलदार वर्गावरील आणि एकूणच संपन्न लोकांवरील करांमध्ये औपचारिक वाढ केली, तरीसुद्धा संपत्तीतील विषमता, आणि महत्त्वाच्या अनेक उत्पादनसाधनांवरील खाजगी मालकी, नष्ट करणे त्यांना अवघड जाते. उलट, या लोकसमूहातील काही गट जसे सत्तेवर—राजकीय किंवा शासकीय पदांवर—जास्त राहातात, तसे त्यांचे खाजगी भांडवलदार वर्गाशी सहकार्याचे संबंध वाढतात; आणि याचा परिणाम म्हणून वरिष्ठ मध्यम वर्गाची संख्याही वाढत जाते. यामुळे शासनात आणि राज्यकर्त्या गटांमध्ये वाढते अंतर्विरोध निर्माण होतात. लोकप्रियता टिकविण्यासाठी समाजवादाच्या घोषणा कराव्या लागतात, भांडवलदार आणि मक्तेदारी यांवर नियंत्रण ठेवणारे कायदे करावे लागतात; पण या वर्गांशी जवळीक वाढत गेल्यामुळे या उपायांची खरीखुरी कार्यवाही अवघड होते.

इतर अनेक परिणामांबरोबरच या अंतर्विरोधातून एक विशेष त्रासदायक परिणाम उद्भवतो. तो म्हणजे विकास योजनांवरील आणि इतर सरकारी खर्च सतत मोठ्या प्रमाणात वाढत राहतो; उलट, करांचे औपचारिक प्रमाण कितीही वाढविले तरी सरकारी उत्पन्न पुरेसे वाढत नाही आणि तुटीच्या अर्थकारणावर जास्त जास्त विसंबून राहावे लागते. याचा उघडच परिणाम म्हणजे उत्पन्नाहून अधिक राजव्यय केल्याने नेहमी होते त्या तऱ्हेची अतिवृद्धी (inflation) होते, भाववाढ होत राहते आणि देशात अशांतता माजते. याचबरोबर आवश्यक तितका द्रव्यसंचय करणे सरकारास अवघड झाल्यामुळे परकीय मदतीचा वाढता अवलंब करावा लागतो.

भारतासारख्या देशातील वेगवेगळ्या वर्गांची परकीय मदत घेण्याबद्दलची आणि विशेषतः परकीय भांडवल देशात येऊ देण्याबद्दलची वृत्ती वेगवेगळी असते. स्वातंत्र्य मिळेपर्यंत परकीय सत्ता आणि परकीय भांडवल हे दोन्ही साथीदारीने बऱ्हंशी वागत असतात आणि त्यामुळे सर्वच एतद्देशीय गटांचा त्यांना विरोध असतो. कनिष्ठ मध्यम वर्ग आणि शेतकरी वर्ग यांची ही वृत्ती पुढेही कायम राहते. उलट, एतद्देशीय भांडवलदार वर्गाच्या त्याचप्रमाणे वरिष्ठ मध्यमवर्गाच्या वृत्तींत हळूहळू फरक पडत जातो. जोवर एतद्देशीय भांडवलदार तुलनेने छोटे असतात आणि परकीय भांडवल आले तर आपला नायनाट होईल, त्यांच्याशी चढाओढीत आपण टिकू शकणार नाही अशी त्यांना भीती असते तोवर त्यांचा परकीय मदत आणि विशेषतः खाजगी परकीय भांडवल येऊ देण्याला विरोध असतो. पण आर्थिक नियोजनाच्या आणि नियंत्रणाच्या संरक्षणाखाली एतद्देशीय खाजगी भांडवलदार वर्ग काहीसा बळावला, त्याचे आर्थिक आणि राजकीय बळ वाढले, म्हणजे त्याचा आत्मविश्वास वाढतो. याच-

बरोबर सरकारमध्ये दिसणाऱ्या शासकीय भांडवलशाहीच्या वाढत्या प्रवृत्तीबद्दलही या वर्गाला भीती वाटत असते. लोकशाही घटनेखाली या वर्गाचा प्रत्यक्ष व उघड पाठिंबा असणारे पक्ष प्रभावी होत नाहीत हे बघून त्यांना आपल्या भवितव्याची वाढती काळजी वाटते, आणि म्हणून परकीय भांडवलाशी सहकार्य करून राष्ट्रीय सरकारवर दडपण आणण्याची त्यांची प्रवृत्ती होते. राष्ट्रीय सरकार जेव्हा वर दाखविल्याप्रमाणे आर्थिक धोरणांमुळे अडचणीत सापडते, तेव्हा परकीय मदतीसाठी याचना करणे हा सरकारला अडचणीतून बाहेर पडण्याचा सोपा उपाय दिसतो. कारण दुसऱ्या उपायांमध्ये निर्धारपूर्वक भाव वाढवावे लागतील, कार्यक्षमता सुधारावी लागेल, कर वसूल करावे लागतील, शिस्त बाणवावी लागेल आणि या सर्वांतून आपणास पाठिंबा देणाऱ्या जनतेत आपल्या लोकप्रियतेस ओहोटी लागेल अशी त्या सरकारास भीती असते. हे लक्षात घेऊन, मदत करू शकणारे परकीय भांडवलशाही देश आणि त्यांच्या प्रतिनिधी संस्था मदतीची किंमत म्हणून धोरणात बदल करून मागतात; आणि या मागणीमध्ये एतद्देशीय मोठ्या भांडवलदारांचे सहकार्य असते. सुशिक्षित आणि शहरी मध्यम वर्गातील एक प्रभावी गटही हळूहळू खाजगी भांडवलशाही उद्योगधंद्यात स्थान मिळू लागल्यामुळे या मागणीस पाठिंबा देऊ लागतो आणि वरिष्ठ शासकीय गटांमध्येसुद्धा, एतद्देशीय आणि परकीय संधींची उपलब्धता लक्षात घेऊन, या मागणीस पाठिंबा देण्याची प्रवृत्ती बळावते; आणि नियंत्रणे काढून टाकण्यासाठी अगर कमी करण्यासाठी, करभार कमी करण्यासाठी आणि एकूणच खाजगी उद्योगधंद्यांना आणि परकीय भांडवलाला मोकळे सोडण्यासाठी सरकारवर दबाव वाढतो.

याउलट, कनिष्ठ मध्यमवर्ग आणि शेतकरीवर्ग यांना या तऱ्हेच्या खुल्या अर्थव्यवस्थेच्या धोरणात रस नसतो. उलट, शासकीय भांडवलशाहीच्याच मार्गाने त्यांचे हित साधण्याची शक्यता त्यांना वाटते. या विरोधाचा परिणाम सरकारी धोरणातील धरसोडीच्या वृत्तीमध्ये दिसून येतो. काही वेळा यांपैकी एका गटाचे प्राबल्य वाढते तेव्हा धोरण तिकडे झुकते, दुसऱ्या गटाचे वाढते तेव्हा तिकडे झुकते. शासनाच्या हाती नियंत्रणाचे सामर्थ्य एकवटून ठेवून नियोजनाचा, शासकीय भांडवलशाहीचा अगर समाजवादाचासुद्धा देखावा केला जातो; पण प्रत्यक्षात निर्णय हा संबंधित व्यक्तींचा अगर गटांचा तौलनिक दबाव किती पडतो यांवर अवलंबून असतो.

यामुळेच भारतासारख्या शासनात अशीही प्रवृत्ती बळावते की, कोणतेही महत्त्वाचे निर्णय, सनदी नोकरांसारख्या ज्या व्यक्तींवर अगर स्वायत्त मंडळांवर प्रत्यक्ष राजकीय दबाव पुरेसा आणता येणार नाही त्यांच्यावर अवलंबून न ठेवता ते सतत राजकारणाच्या वातावरणात वावरणाऱ्या मंडळींच्यावर अवलंबून राहावेत. किंमतीच्या नियंत्रणांचे अधिकार कायद्याने निर्माण केलेल्या स्वायत्त आयोगांकडे न सोपवता सरकारकडेच म्हणजे मंत्र्यांकडेच ठेवले जातात. सार्वजनिक क्षेत्रातील धंद्यांचे व्यवस्थापन कार्यक्षम होण्यासाठी स्वायत्तता देण्याऐवजी महत्त्वाच्या सर्व निर्णयांसाठी मंत्री आणि त्यांचे कार्यालय यांजकडे बघावे लागते. यांतून भ्रष्टाचार, दिरंगाई आणि अकार्यक्षमता यांचे थैमान माजते. मात्र विशिष्ट हितसंबंधांच्या राज्यकर्त्यांवर येणाऱ्या दबावावर याचे खापर न फोडता, नियोजन पद्धती, सरकारी मालकी, अशा संस्थात्मक पद्धतींवर फोडले जाते.

भारतातील विकास योजनांचा इतिहास व त्यांचे आजवरचे यशापयश यांकडे मी आता मांडलेल्या दृष्टिकोणातून पाहिले म्हणजे त्यांची संगती काहीशी चांगली लागू शकते. स्वातंत्र्यानंतरच्या काळात राजसत्ता कोणत्या गटांच्या व वर्गांच्या हाती प्रामुख्याने केंद्रित झाली आहे, त्याचप्रमाणे लोकशाही घटनेचा, व निवडणुकांच्या राजकारणाचा, धोरणे ठरविण्यावर कसा परिणाम होतो, प्रत्यक्ष कार्यवाही करताना दबाव कोणते येतात, हे सर्व लक्षात घेतले म्हणजे धोरणांत लंबकासारखे हेलकावे का निर्माण होतात, दाखवायचे दात आणि खायचे दात यांच्यात मोठा फरक का पडतो, या प्रश्नांची काहीतरी सुसंगत उत्तरे मिळतात.

– ४ –

भारताची अर्थव्यवस्था आता एका अशा टप्प्याला येऊन पोचली आहे की, येथून पुढे तिला वेगळेच वळण लागण्याची मोठी शक्यता दिसू लागली आहे.

एका बाजूने काही महत्त्वाच्या अंगांत देशाचे बळ वाढले आहे. शास्त्र व तंत्रज्ञान यांत कुशल मनुष्य-बळ, व्यवस्थापन व शासन यांबद्दलची कुशल संघटणा व अनुभव, आधुनिक अर्थव्यवस्था स्वावलंबी, विकसित होत राहण्यास आवश्यक इतकी किमान मूलभूत उत्पादनाची आणि आधारभूत संरचनेची (infrastructure) घडण, आणि देशाच्या उत्पन्नातून होणारे बचतीचे २२–२३% इतके प्रमाण, या सर्वांमुळे झपाटयाने, आत्मनिर्भरतेने व कोणा दुसऱ्याच्या तोंडाकडे न पाहावे लागता स्वावलंबी पद्धतीने अर्थविकास घडवण्याचे ठरवले, तर तसे करणे आता भारताला अशक्य नाही. आर्थिक व सामाजिक अन्याय कमी करून, संपत्ती, उत्पन्न आणि उपभोग यांतील विषमता कमी करून, उत्पादनांच्या साधनांमधील केंद्रीकरणावर आघात करून, आणि एकूणच राज्यकारभाराचे व अर्थव्यवहाराचे विकेंद्रीकरण करून, देशातील प्रचंड मनुष्यबळाचा, जनतेतील सुप्त क्रियाशीलतेचा आणि श्रमशक्तीचा फायदा घेण्याचा प्रयत्न झाला तर आर्थिक विकासाची गती तर वाढेलच; पण शिवाय गेली पन्नास वर्षे जी उद्दिष्टे व ध्येये आपण जनतेसमोर मांडीत आहोत ती जवळ येतील, असंतोषाचा वाढता उद्रेक थांबेल, आणि देशातील लोकशाही व देशाची एकता दृढमूल होईल. राजकीय एकता व लोकशाही घटना या भारतास अनेक दृष्टींनी नव्या आहेत; इतर नवस्वतंत्र देशांच्या मानाने आपण त्या टिकविण्यात आजवर जास्त यश मिळवलेले असले तरी, त्या अजूनही पुऱ्या घट्ट रुजलेल्या नाहीत; आणि गेल्या काही वर्षांतील घटनांवरून त्यांना असलेले धोके स्पष्ट झाले आहेत, या सर्व गोष्टी विसरून चालणार नाही.

याचबरोबर हेही ध्यानात ठेवावयास हवे की, आजवर ज्या तऱ्हेने नियोजनाच्या कल्पना मांडल्या गेल्या आणि धरसोडीने का होईना, कार्यक्षमता मुळीही न दाखवता पण बहुजनांच्या हिताच्या दृष्टीने धोरणे आखण्याची जी परंपरा १९५०-५५ पासून पाडली गेली, ती खंडित करून एका वेगळ्याच मार्गाने भारतीय अर्थव्यवस्था आणि त्याच्या मागोमाग राज्यव्यवस्था नेण्याची कल्पना जोराने पुढे येत आहे. या कल्पनेला देशातल्या मोठ्या भांडवलदारांचा तर पाठिंबा आहेच; पण देशाबाहेरील प्रभावशाली शक्ती त्यांना या प्रयत्नांत पाठिंबा देत आहेत. जगातील संपन्न व प्रगत भांडवलशाही देश, आणि त्यांच्या वतीने अप्रगत देशांना मदत करणाऱ्या जागतिक बँकेसारख्या संस्था, यांचा भारताच्या एकूण अर्थव्यवस्था चालविण्याच्या पद्धतीत मूलभूत बदल घडवून आणण्याच्या कल्पनेला पाठिंबा आहे. सत्ताधारी पक्ष व राजशासन यांतीलही एक मोठा गट याच मताचा असून १९७३ पासून हळूहळू, १९८० पासून जास्त वेगाने आणि नोव्हेंबर १९८४ पासून अगदी झपाट्याने आर्थिक धोरणात बदल केले जात आहेत. या बदलांचे जागतिक बँक आणि संपन्न देशांचे नेते स्वागत करीत असून त्यामुळे हे बदल घडवून आणणाऱ्यांना विशेष उत्तेजन मिळत आहे. वरिष्ठ मध्यमवर्ग, मोठी वर्तमानपत्रे आणि उच्चशिक्षित व्यावसायिक गटांचाही या बदलास पाठिंबा मिळत असून आकाशवाणी, दूरदर्शन ही माध्यमेही हे बदल घडवून आणत असणाऱ्या सरकारच्या पूर्ण नियंत्रणाखाली असल्याने, त्यांमधले धोके, अशा बदलांतून राष्ट्रीय हिताची वाताहत होण्याचा असलेला संभव, यांकडे नागरिकांचे लक्ष वेधणेही अवघड झाले आहे.

धोरणात जे बदल होत आहेत त्यांनी मोठ्या शेतकरी वर्गास फायदा होण्यासारखा नाही; उलट, तोटा होण्यासारखा आहे. शेतकरी संघटणा या बदलांना आक्षेप घेत आहे हे याचे गमक आहे. राज्य सरकारांवर बड्या शेतकऱ्यांचा विशेष प्रभाव असल्यामुळे राज्य सरकारे नवीन धोरणांबद्दल विशेष उत्साही नाहीत. पण अनेक राज्यांची सरकारे केंद्रीय राज्यकर्त्या पक्षाचीच असल्याने व त्या पक्षात अंतर्गत लोकशाहीची वानवा असल्याने नवीन धोरणांना त्यांच्याकडून संघटित विरोध होण्याचा संभव नाही. विरोधी पक्षांची बहुतेक सरकारे ध्येय-धोरणांबाबत स्पष्ट विचारांची नाहीत.

छोटे उद्योगधंदे चालविणारे, संघटित कामगार आणि कनिष्ठ मध्यमवर्गात मोडणारे सरकारी-बिन-सरकारी नोकर व इतर शहरी गट यांचा या धोरण-बदलास विरोध आहे, व या धोरणांचे परिणाम जसे उघड होत जातील तसा त्यांचा विरोध वाढेल. पण हा

अनुक्रमणिका

विरोध संघटित करून विकासविषयक पर्यायी धोरण मांडण्याची कुवत असणाऱ्या राजकीय अगर आर्थिक संघटणा या गटांना निर्माण करता आलेल्या नाहीत. त्यातल्यात्यात संघटित असणारे जे विशेषत: मक्तेदारी उद्योगधंद्यांतील कामगार-गट आहेत, त्यांना एका बाजूने वेतनवाढ देऊन व दुसऱ्या बाजूने चढाओढीतून त्यांच्या नोकरीबद्दल अशाश्वती निर्माण करून, आणि जरूर तेव्हा दंडबळाचा वापर करून, त्यांचा विरोध मोडून काढणे राजशक्तीला अशक्य होणार नाही.

नवीन आर्थिक धोरणाची मुख्य अंगे कोणती? एक म्हणजे, सरकारी नियंत्रणाच्या शिथिलीकरणाचे (liberalisation). वर म्हटल्याप्रमाणे यातील अनेक नियंत्रणांनी देशापुढील उद्दिष्टे सफल करण्याऐवजी भ्रष्टाचार, दिरंगाई व चुकीचे निर्णय यांस मदत केली आहे. औद्योगिक परवाना पद्धती औद्योगिक विकासातील प्राधान्ये अमलात आणणे, वेगवेगळ्या राज्यांतील व भागांतील असमतोल दूर करणे, उत्पादनाचे परिमाण शास्त्रशुद्ध राखणे, अनावश्यक परकीय सहकार्य (collaboration) टाळणे, मक्तेदारी वाढू न देणे, अशी उद्दिष्टे गाठण्याच्या दृष्टीने विशेष उपयोगी पडली नाही, असे दत्त समितीने सांगितले होते; आणि बऱ्याच मोठ्या—'मध्यम'—क्षेत्रात औद्योगिक परवाने खुलेपणाने देण्यात यावेत अशी शिफारस केली होती. तेव्हा आता औद्योगिक परवान्यांच्या पद्धतीचे बरेचसे शिथिलीकरण केले आहे त्यात काही अयोग्य नाही. मक्तेदारी कायदा लागू करण्यासाठीची मर्यादा रु. २० कोटींऐवजी रु. १०० कोटी करण्यात आली ही गोष्ट, १९६९ पासूनची भाववाढ, आणि मक्तेदारी कायद्याचा मक्तेदारी कमी करण्यास सरकारने काहीही उपयोग करून घेतलेला नाही, हे लक्षात घेता अयोग्य म्हणता येणार नाही. मोटारगाड्या, सिमेंट, पोलाद, साखर इत्यादी गोष्टींवरच्या भावनियंत्रणाचा इतिहास पाहिला म्हणजे भावनियंत्रणे कमी करण्यात सरकार काही चुकत आहे जसे म्हणता येणार नाही. प्रत्यक्ष नियंत्रणाऐवजी जेथे शक्य तेथे कर पद्धतीची अगर चलन पद्धतीची नियंत्रणे वापरावी या तत्त्वालाही विरोध करण्याचे कारण नाही.

पण धोरणात बदल करताना सरकार स्वत:चे स्वेच्छाधीन (Discretionary) अधिकार कमी करीत नाही आहे हे ध्यानात ठेवण्याजोगे आहे. नियंत्रणांचे अधिकार कायद्याच्या व्याप्तीत स्वायत्त तज्ज्ञ मंडळांकडे सोपवण्याऐवजी सरकारने ते स्वत:कडे ठेवण्याची, आणि त्यांचा वापर राजकीय व वैयक्तिक स्वार्थासाठी मंत्रिगणांनी करण्याची, सार्वत्रिक पद्धत पडून गेली आहे. किंमतीच्या नियंत्रणाचे काम एखाद्या भावनियंत्रण आयोगाकडे ठेवण्याऐवजी मंत्रालयाच्या अंतर्गत अशा उत्पादन-मूल्य आणि भाव यांविषयींच्या सल्लागार मंडळाकडे (Bureau of Industrial costs & Prices) देण्यात येते. हे मंडळ उघड चौकशी (open enquiry) करीत नाही व त्याचे अहवाल गोपनीय असतात. तेव्हा सरकार जो निर्णय घेते तो शास्त्रशुद्ध आहे की वेगळ्याच कारणांसाठी घेतलेला आहे हे उघड कळू शकत नाही. मक्तेदारी कायद्याचे तिसरे प्रकरण लागू करण्याची मर्यादा रु. १०० कोटी केली तरीही, ज्या कंपन्यांना कायदा लागू होईल त्यांच्या सर्वच बाबी आपोआप मक्तेदारी आयोगाकडे जाव्यात ही साचार समितीची शिफारस सरकार मान्य करीत नाही. कंपन्यांनी राजकीय कार्यासाठी देणग्या देण्यास हरकत नाही हा बदल सरकारने केला ते राज्यकर्ता पक्ष—आणि इतर पक्ष—ज्या रीतीने आपल्या कामासाठी दबाव आणून कंपन्यांकडून रोखीने पैसे घेत होते ते लक्षात घेता, योग्यच म्हणता येईल. पण राजकीय पक्षांचे हिशेब प्रसिद्ध करावे व त्यांची सार्वजनिक तपासणी करावी अशी काही तरतूद सरकार करीत नाही. तेव्हा या सर्व शिथिलीकरणामध्ये एक हातचा राखून ठेवण्याची पद्धती आहे. राज्यकर्त्या पक्षाला व सत्ताधारी मंडळींना पक्षाचा व वैयक्तिक स्वार्थ साधण्याच्या ज्या सोयी नियंत्रणांच्या यंत्रणेत आहेत—आणि ज्यांचा परिणाम भ्रष्टाचार प्रचंड वाढण्यात व काळा पैसा जवळजवळ कायदेशीर होण्यात झाला—त्या सोयी नष्ट केल्या जाण्याचे काहीही चिन्ह अजून दिसत नाही.

शिथिलीकरणाचा दुसरा भाग म्हणजे आयात नियंत्रणे सैल करणे, परकीय तंत्रज्ञान आणण्यास, परकीय भांडवल भारतात येऊ देण्यास, भारतातील

अनुक्रमणिका

परकीय भांडवल असणाऱ्या कंपन्यांना सवलती देणे हा. या शिथिलीकरणाच्या पुरस्कारार्थ असे मांडले जाते की, या मार्गे भारतातील उद्योगधंदे जागतिक चढाओढ करण्याच्या क्षमतेचे बनून भारतातील जनतेला तर फायदा होईलच पण भारताचा निर्यात-व्यापारही वाढेल. शिवाय परदेशी चलनाची टंचाई कमी होऊन भांडवलनिर्मिती वाढेल. अत्याधुनिक तंत्रज्ञान भारतात येण्यास मदत होईल.

हे विशिष्ट शिथिलीकरण मात्र अनेक तऱ्हेने भारतीय अर्थव्यवस्थेस धोक्याचे ठरणार आहे. परकीय कंपन्यांचे भारतातील आजवरचे कार्य पाहिले तर असे दिसते की, भारतातील तंत्रबळ आणि इतर सोयींचा फायदा घेऊन भारतात उत्पादन वाढवून ते जगाच्या इतर भागांत निर्यात करण्याऐवजी, केवळ मोठ्या भारतीय बाजारपेठेचा फायदा उठविण्याची त्यांची प्रवृत्ती राहिली आहे. हिंदुस्थान लीव्हर, फिलिप्स या कंपन्यांचा एकूण व्यवहार पाहिला तर, त्यांनी भारतात आणलेल्या भांडवलाच्या कितीतरी पट फायदा आजपर्यंत भारताबाहेर नेला आहे, नेत आहेत; आणि परदेशी चलनातील त्यांचा आयव्ययाचा तोल पाहिला तर उत्पन्नापेक्षा खर्चच जास्त आहे, असे आढळून येते. जे भारतीय जगात भारताबाहेर राहातात (Non Resident Indians) त्यांना सवलती दिल्या तर ते भारताच्या विकासासाठी काही विशेष प्रयत्न करतील, स्वस्तात भांडवल उपलब्ध करून देतील, अद्ययावत् तंत्रज्ञान आणण्यास मदत करतील, अशी एक कल्पना मांडली जाते. अशी काही मंडळी देशाचा थोडा फायदा करून देतील, नाही असे नाही; पण त्यांतील बहुतेकजण व्यापारी आणि सट्टेबाजीच्या उलाढालीतून करोडपती झालेले आहेत आणि त्याच मार्गांचा ते भारतातही वापर करू पाहतील हे स्वराज पॉल प्रकरणाने सिद्ध झाले आहे.

परकीय तंत्रज्ञान देशात आणण्यास हरकत असावी असे कोणीच म्हणत नाही. पण जपानने ज्याप्रमाणे परकीय अत्याधुनिक तंत्रज्ञान एकदा आणावयाचे, वापरावयाचे पण त्याबरोबरच पुढील तांत्रिक विकास आपल्या संशोधनामार्फत करीत राहावयाचा, असे धोरण स्वीकारले तसेच भारताने करण्यास नको का ? दुसऱ्या योजनेपासून भारताचे धोरण हेच होते. ते अमलात का व कोठे आले नाही ते बघून ज्या क्षेत्रात नवीन तंत्रज्ञान आणून विशेष फायदा होण्यासारखा असेल तेथेच ते आणू द्यावे, इतरत्र अगर सर्वत्र नाही, असे धोरण नको का ? की बजाज आटोने पियाजिओकडून घेतलेले तंत्रज्ञान आत्मसात केले, काहीसे वाढविले याचे बक्षिस दुसऱ्या कारखान्यांना पियाजिओकडून तंत्रज्ञान आणण्याचीच नव्हे तर 'व्हेस्पा' हे परदेशी नावही वापरण्याची परवानगी देऊन द्यावे ? मल्होत्रा उद्योगसमूहाची दाढीच्या ब्लेड बनविण्यातील मक्तेदारी कमी करण्यासाठी, परकीय तंत्रज्ञानच नव्हे तर परकीय नावही वापरून चढाओढीस उत्तेजन देणे, हा योग्य मार्ग आहे काय ?

अशा सवलतींमुळे देशाचा निर्यात-व्यापार वाढेल, परदेशी चलनाची टंचाई दूर होईल, असे म्हटले जाते. प्रत्यक्ष अनुभव वेगळा आहे. निर्यात संवर्धन क्षेत्रे (EPZ), १००% निर्यात करणारे कारखाने, इत्यादी अनेक कल्पना काढून त्यांना अनेक सवलती देऊन, अनेक वर्षे झाली; निर्यात वाढण्यास त्याचा पुरेसा उपयोग होत नाही हा अनुभव आहे. देशाचा आंतरराष्ट्रीय ताळेबंद (Balance of Payments) आजही काही मोठा चांगला नाही. येत्या काही वर्षांत ही परिस्थिती आणखीच बिकट होणार आहे असा अधिकृत अंदाज आहे. शिथिलीकरण केल्याबद्दल जागतिक बँक भारत सरकारची स्तुती करते; पण सवलतीची कर्जे मिळत राहण्याबद्दल दिलासा देऊ शकत नाही. व्यापारी दराने व मार्गाने कर्जे घेण्याची पद्धत काहीशी बळावली आहेच. ही आणखी वाढली तर दक्षिण अमेरिकेतील अनेक देश आज कर्जाच्या बोजाखाली दबून गेले आहेत, दिवाळखोरीला आले आहेत, तशी भारताची स्थिती होईल.

अशी परिस्थिती येऊ द्यावयाची नसेल तर, आयातीवर सक्त नियंत्रणे घातली पाहिजेत. आयात कमी करण्यासाठी देशातही अंतर्गत व्यापार आणि पुरवठा यांबाबत, साखर, खाद्य तेले इत्यादींबाबत कडक नियंत्रणे घालून साठेबाजीस व भाववाढीस आळा घातला पाहिजे. आयात होणारा बराच कच्चा अगर अर्धकच्चा माल चैनीच्या उपभोग्य वस्तू बनविण्यासाठी वापरला जातो. या मालाच्या

अनुक्रमणिका

वापरावर कररूपाने अगर इतर मार्गांनी बंदी आणली पाहिजे.

शिथिलीकरणाच्या नावाखाली संपन्न वर्गाचे उपभोग वाढवण्याचे प्रकार सर्रास बळावत आहेत. प्रत्यक्ष कर कमी करून, कंपन्यांच्या 'खर्चा'वर असलेली थोडीफार बंधनेही काढून टाकून, आणि परदेशी पर्यटकांना सुखसोयी देण्याच्या नावाखाली एतद्देशीय श्रीमंतांना मौजमजा करण्याला साधने उपलब्ध करून देऊन, उपभोगांतील विषमता आपण वाढवीत आहोत. दूरदर्शनवर जाहिरातबाजीचे जे पेव फुटले आहे त्यातून उत्पादकता, कामातील शिस्त आणि बचत यांना पूरक वातावरण निर्माण करण्याऐवजी उधळमाधळ करण्याचे धडे बालबच्चांपासून सर्वांना आपण देत आहोत. यातून कोणते परिणाम संभवतात ?

एक तर कर कमी केल्यामुळे सरकारी उत्पन्न कमी होईल अगर पुरेसे वाढणार नाही. शहरी संपन्न वर्गावरील करभार कमी करत असतानाच ग्रामीण संपन्नांवर कर बसवता येईल अगर त्यांजकडून पाणी, वीज, खते इत्यादींवर योग्य किंमती घेता येतील हे अशक्य आहे. तुटीचे अर्थकारण हा सरकारी आयव्ययाचा भागच बनलेला आहे व आताही तो ७ व्या योजनेत चालू राहणार आहे. याने भाववाढीचे दुष्टचक्र चालू राहून असंतोष माजण्यास मदत होईल.

संपन्न शहरी वर्गाच्या उपभोगी राहणीचे प्रदर्शनी परिणाम (Demonstration effect) आताच संघटित कामगारांच्या मागण्यांत व राहण्यात दिसून येत आहेत. ही प्रवृत्ती बळावेल. असंघटितांना मजुरी वाढवून मिळणार नाही. स्वाभाविकच त्यांचा असंतोष बळावेल. या सर्व असंतोषाला वेगवेगळ्या मार्गांनी तोंड फुटत राहील. गुजराथमध्ये राखीव जागांवरून जे दंग्यांचे पेव फुटले त्या तऱ्हेचे दंगे या ना त्या कारणाने वेगवेगळ्या भागांत होत राहणे असंभवनीय नाही.

विकासयोजनांमध्ये आजवर जो अनुभव आला त्यावरून जे खरे शिकावयास हवे ते हे की, नियोजित पद्धतीने विकास साधावयाचा तर सर्वांनीच शिस्त पाळावयास हवी. प्रत्येक मंत्र्याने आणि राज्य सरकारने आपल्याला वाटेल तशी मनमानी कारभाराची पद्धती केली तर भांडवलाचा योग्य उपयोग होत नाही. अनेक धरणे व इतर भांडवली कामे एकाच वेळी चालू ठेवण्याची अनेक राज्यांमधली पद्धती आणि रेल्वेच्या अनेक योजना हळूहळू प्रगत करीत राहण्याची केन्द्राची पद्धती या दोन्हींत भांडवलाचा उपयोग होण्यास प्रचंड काळ जातो. दरम्यान उत्पादनास त्याचा उपयोग होत नाही. मुंबईसारखी मोठी शहरे वाढू न देण्याची शिस्त न पाळल्याने तेथील रहिवाशांची हलाखी तर वाढतेच; पण तेथील आर्थिक जीवन चालू ठेवण्यासाठी प्रचंड भांडवल खर्चावे लागते आणि ग्रामीण भागाचा विकास मागे पडतो. कारखानदार, व्यवस्थापक, वरिष्ठ शासकीय अधिकारी आणि मंत्रिगण यांनी वैयक्तिक आणि कार्यकारी जीवनात काटकसर केली, कार्यक्षमता व शिस्त दाखवली, तर सामान्य कर्मचारी, कामगार, जनता, उपदेश मानण्याची थोडीतरी शक्यता असते. सार्वजनिक क्षेत्र म्हणजे मंत्र्यांची व शासकांची पोळी भाजून घेण्याची जागा न मानता कार्यक्षम अर्थव्यवहार करण्याचे ठरवले तर, तज्ज्ञ व्यवस्थापक नेमून त्यांस पुरेशी स्वायत्तता देणे, कामगारांस प्रशिक्षण देऊन त्यांस कुवत असल्यास वरच्या जागांवर चढता येईल अशी व्यवस्था करणे, असे प्रयत्न करता येतील. न पेक्षा अनेक वर्षे सरकारी मालकी म्हणजेच समाजवाद असा भ्रामक युक्तिवाद मांडून, आता सरकारी क्षेत्र अकार्यक्षम तेव्हा 'खाजगीकरण' (Privatisation) करावे असे दुतोंडी बोलणारे राज्यकर्ते थोडे नाहीत.

देशाच्या पहिल्या योजनेपासून आजवर विकेंद्रीकरणाची भाषा सारखी बोलली गेली असली तरी, प्रत्यक्षात योजना बनवताना काय, अगर विकासाच्या कार्यक्रमात काय, केंद्रीकरणावरच कायम भर राहिला आहे. अजूनही शिक्षणविषयक धोरण आखतानाही उत्तम शिक्षणाची थोडी केंद्रे निर्माण करण्यावर भर आहे— बहुजनांचे किमान शिक्षण होण्याची घटनेतील तरतूद ३५ वर्षांत पुरी झाली नाही याची खरी खंत कोणासच नाही. नवीन धोरण बनविणाऱ्यांची कल्पना अशीच दिसते की, संगणित्रांचा वापर आणि इतर अत्याधुनिक तंत्रज्ञानाची काही बेटे वाढविली की, एकूण देशाची क्षमता झपाट्याने वाढेल.

ही कल्पना चुकीची आहे. एक तर आगगाड्या, वीजपुरवठा, दूरसंचरण (telecommunications) ही क्षमतेने चालण्यावर शहरी आणि औद्योगिक आधुनिक क्षेत्रके अवलंबून असतात आणि ही क्षेत्रे कार्यक्षम राहणे देशभर विखुरलेल्या शेकडो कर्मचाऱ्यांच्या क्षमतेवर आणि कामाबद्दलच्या निष्ठेवर अवलंबून असते. ज्या समाजात प्रचंड विषमता आहे त्यात अशी निष्ठा बहुसंख्य कामगारांत निर्माण होईल का ? सर्वसामान्यांच्या शिक्षणाकडे, किमान सुविधांकडे, आजवर केले तसेच दुर्लक्ष करीत राहिले तर, त्यांची काम करण्याची क्षमता आवश्यक किमान इतकी तरी राहील का ? याउलट, भाववाढ, असमानता, बेकारी यांत वाढच होत राहिली तर, असंतोषाचे उद्रेक जागोजाग होऊन गुंतवलेल्या भांडवलापासून मिळणारे उत्पादन कमी राहण्याचीच मोठी शक्यता नाही का ? राजकारण व अर्थकारण यांचा परस्परसंबंधी विचार करावा लागतो तो अशा धोरणविषयक प्रश्नांत.

भीती अशी वाटते की, देशाचे धोरण ठरविण्याची सूत्रे आता अशा मंडळींच्या हाती जात आहेत की, ज्यांना सामान्यजनांचे आयुष्य कसे असते, त्यांची सुखदुःखे कोणती, त्यांचा सहभाग विकासकार्यात कसा मिळू शकेल, याची कल्पना फार कमी आहे. वरिष्ठ मध्यम वर्ग, एतद्देशीय संपन्न व भांडवलदार वर्ग, यांनी तर आपल्या नजीकच्या फायद्यापलीकडे दृष्टी ठेवण्याचे आता सोडूनच दिले आहे. संघटित कामगार– विशेषतः द. म. १९००–२००० अशी मजुरी मिळविणारे यांना आर्थिक ढांचा बदलण्यात रस राहिलेला नाही; जे असंघटित, वंचित आहेत ते संख्येने मोठे असले तरी, आपल्या हितरक्षणार्थ आर्थिक धोरणात आवश्यक ते बदल घडवून आणण्याची त्यांची ताकद नाही. त्यांची संघटणा बांधण्याचे काम फार कष्टाचे, जिकीरीचे आणि दीर्घकाळ लावणारे असल्यामुळे कामगारसंघटक काय अगर राजकीय पक्ष काय, त्या कामाला विशेषकरून हात घालीत नाहीत. त्या लोकांच्या दबावाने नव्या धोरणात बदल घडून येण्याची नजीकच्या भविष्यात तरी शक्यता नाही.

तेव्हा आपणासारख्या अर्थशास्त्राच्या अभ्यासूंचे कर्तव्य हे ठरते की, देशाचे अर्थकारण व तदनुषंगिक राजकारण कोठे चुकते आहे त्याचा अभ्यास करून निर्भीडपणाने आपले विचार लोकांपुढे मांडीत राहावे. ते विचार कदाचित समाजातील अनेक लोकांस आणि विशेषतः सत्ताधाऱ्यांस आवडणार नाहीत. पण अप्रिय पण पथ्यकारक असे जे विचार आपणास सुचतात, ते लोकांपर्यंत पोचविणे हे अभ्यासू व्यावसायिकांचे कर्तव्यच आहे. आगरकरांनी सांगितल्याप्रमाणे "असे करण्यास लागणारे धैर्य ज्या समाजातील काही व्यक्तींच्यासुद्धा अंगी नसेल, त्या समाजांनी वर डोके काढण्याची आशा कधीही करू नये."

○ ○ ○

अनुक्रमणिका

भारताची आर्थिक कामगिरी : एक समीक्षा

अविनाश यशवंत जोशी

१९५५–५६ च्या सुमाराला भारताच्या आर्थिक परिस्थितीबद्दलची चर्चा जशी एका चैतन्यमय अवस्थेत होती तशीच परिस्थिती १९८५–८६ या काळात आहे. अर्थात चैतन्यमयता हा समान गुण सोडला, तर बाकीच्या गोष्टी खूपच भिन्न आहेत.

डिसेंबर १९५४ मध्ये काँग्रेसच्या, विशेषतः नेहरू–महालनोबिस यांच्या, प्रभावाखाली जवळ-जवळ संपूर्ण (सुशिक्षित) भारत समाजवादी समाज-रचना निर्माण करण्याचा संकल्प सोडत होता. यासाठी दुसरी पंचवर्षीय योजना व औद्योगिक धोरणाचा ठराव या गोष्टींची अमलबजावणी सुरू केली गेली आणि मिश्र अर्थव्यवस्थेचा प्रयोग मोठ्या श्रद्धेने मांडला गेला. १९८५–८६ या तीस वर्षांनंतरच्या टप्प्यावर 'समाजवाद', 'नियोजन' 'मिश्र अर्थव्यवस्था' हे शब्द होते तसेच आहेत; परंतु त्यांचे व्याकरणच बदलल्यासारखे झाले आहे.

अर्थात या शब्दांच्या आलंकारिकतेमध्ये वाढ झालेली आहे एवढीच गोष्ट महत्त्वाची नाही. गेल्या तीस-पस्तीस वर्षांत भारतात तसेच इतर देशांत जे घडले आणि त्याचा जो चिकित्सक अभ्यास होतो आहे त्यामुळे आणखी एक महत्त्वाची गोष्ट, विशेषतः गेल्या दहा-पंधरा वर्षांत, स्पष्ट होते आहे. "काय घडावे ?" या कळीच्या प्रश्नाबद्दल विचार करण्याच्या पद्धतींमध्येच एक प्रकारची रोचक बेबंद-शाही निर्माण झाली आहे. त्यामुळे, वैचारिक क्षेत्रातल्या सध्याच्या मतमतांतरांच्या गलबल्याचे बरेचसे श्रेय या बेबंदशाहीतून निर्माण झालेल्या संदिग्धतेला, अनिश्चिततेला जाते. अशी परिस्थिती १९५५–५६ च्या टप्प्यावर नव्हती. फार मोठ्या प्रमाणावर निःसंदिग्धता होती, "काय घडावे" याबद्दल मोठी एकवाक्यता होती.

भारताच्या आर्थिक परिस्थितीबद्दल प्रामाणिक-पणे आणि शक्यतो खुल्या मनाने विचार करण्यासाठी सद्यःपरिस्थितीचे हे वैशिष्टच लक्षात घेणे आवश्यक आहे. या दृष्टीने पाहता प्रस्तुत लेख म्हणजे, एका अर्थाने, भारताच्या आर्थिक परिस्थितीबद्दलची (भूत–वर्तमान–भविष्य अशा तिन्ही संदर्भांत) माझी समज त्यांच्या संदिग्धतेसकट मांडण्याचा एक प्रयत्न आहे. 'नवभारत'च्या सुविद्य वाचकांना, स्वतःचे विचार / मते / इंप्रेशन्स् थोडीशी पुन्हा एकदा तुलनात्मक दृष्टीने निरखण्यासाठी एक संदर्भ चौकट (फ्रेम ऑफ रेफरन्स्) या लेखाच्या स्वरूपात उपलब्ध व्हावी असे अत्यंत माफक उद्दिष्ट डोळ्यांसमोर आहे. म्हणूनच आर्थिक आकडेवारी तसेच ग्रंथसंदर्भ इत्यादी तपशिलांचा उल्लेख अगदी अनिवार्य तेथेच करण्याचे ठरवले आहे.

I

भारताच्या, किंवा तसे पाहिले तर कोणत्याच देशाच्या, अर्थव्यवस्थेसंबंधीचा विचार सरळसोट असा करता येणार नाही. प्रथम आपल्याला दुसऱ्या महायुद्धानंतर एकूणच अर्थव्यवस्थांच्या कामगिरी-बद्दल विचार करण्याच्या पद्धती कशा बदलत आलेल्या आहेत याची दखल घ्यावी लागेल, त्या त्या पद्धतींनुसार निष्पन्न होणारे निष्कर्ष मांडावे लागतील आणि त्या पर्यायी निष्कर्षांच्या संचामधून (आपापल्या मूल्यप्रणालीनुसार) निवड करावी लागेल. कदाचित ही निवड ठामपणे करताही येणार नाही. परंतु ती न करता येण्याची कारणे अधिक स्पष्ट झालेली असतील.

महायुद्धानंतरच्या लगेचच्या काही वर्षांत (१९६०-६५ पर्यंत) सर्वसाधारणपणे आर्थिक वृद्धी (ग्रोथ) म्हणजेच विकास (डिवेलप्मेंट) असे मानले जाई. देशाचे एकूण व विशेषतः दर डोई उत्पादन/उत्पन्न (जी. एन्. पी. पर कॅपिटा) वाढणे म्हणजे आर्थिक वृद्धी होणे; आणि या वाढीचा वार्षिक प्रतिशत दर जेवढा जास्त तितकी

अनुक्रमणिका

त्या देशाची विकास कामगिरी चांगली असे मानले जाई. या निकषानुसार जागतिक बँकेने राष्ट्रांचे वर्गीकरण गरीब, मध्यम उत्पन्नाची, उच्च उत्पन्न-वाली राष्ट्रे अशा पद्धतीने सुरू केले आणि सर्व-साधारणपणे या वर्गीकरणानुसारच न्यूनविकसित, मध्यम-विकसित, विकसित या संज्ञा वापरल्या जाऊ लागल्या. म्हणजे, विकासाचा संबंध उत्पन्नाशी म्हणजेच नव्या संपत्ती-निर्मितीशी लावला गेला आणि आजही हा संबंध चिवटपणे तग धरून बहुतेकांच्या मनात असतो.

या दृष्टीने पाहिले म्हणजे, भारतातील पंचवर्षीय योजनांच्या विविध उद्दिष्टांपैकी वृद्धिदराला देण्यात येणारे अनन्यसाधारण महत्त्व लक्षात येते. जणु वृद्धिदराच्या त्या एका आकड्यात साऱ्या विकास-प्रक्रियेचे सार उमटलेले असते. योजनांमध्ये इतरही उद्दिष्टे असतात (उदा., बेकारी निर्मूलन, रोजगार निर्मिती, विषमता कमी करणे, स्वावलंबन इ.); परंतु असे गृहीत धरले जाई (आणि अजूनही धरले जाते असे मानायला जागा आहे) की, वृद्धीचा दर गाठला गेला की, बाकीची उद्दिष्टे आपोआप, हळूहळू का होईना, गाठली जातील. म्हणजे असे की, सुरु-वातीला वृद्धीचा लाभ समाजातील थोड्या लोकांनाच व विशिष्ट प्रदेशांनाच मिळेल; परंतु कालांतराने हे लाभ 'खाली' झिरपतील– (ट्रिकल् प्रोसेस्) किंवा 'आजूबाजूला' पसरतील (स्प्रेड इफेक्टस्) आणि त्यांतून दारिद्र्यनिवारण वगैरे साधेल. हा फक्त वेळाचा प्रश्न आहे. आणि खरे पाहता, आर्थिक विषमतेवर प्रत्यक्ष हल्ला सुरुवातीलाच चढवणे योग्यही ठरणार नाही. न्याय्य वाटप करायला मोठे राष्ट्रीय उत्पन्न तर हवे. तेव्हा प्रथम संपत्तिरूपी 'केक'चा आकार वाढवण्यावर (वृद्धी) भर द्यायला हवा आणि तो पुरेसा वाढल्यावरच त्याच्या न्याय्य वाटपाचा काही अर्थपूर्ण विचार करता येईल.

अशा पद्धतीने, न्यूनविकसित देशाने विकास साधणे म्हणजेच आर्थिक वृद्धीचा मार्ग धरणे हे समीकरण सुरुवातीला अलिखिततः गृहीतच धरले गेले. दर डोई उत्पन्नाची उच्च पातळी व ते वाढण्याचा चांगला दर ही दोन्ही वैशिष्ट्ये तथाकथित 'विकसित' राष्ट्रांच्या संदर्भात (भांडवलशाही तसेच यूरपमधील बहुतेक साम्यवादी) दिसत असल्याने साधारणतः विकास साधणे म्हणजे उ. अमेरिका व यूरपमधील राष्ट्रांचा कित्ता गिरवणे असेही एक सूत्र निर्माण झाले. अर्थात त्या त्या राष्ट्रातील राजकीय घडा-मोडींनुसार हा कित्ता गिरवण्यातील तपशील हा भांडवलशाही मार्गाचा की साम्यवादी स्वरूपाचा यांत फरक पडणार होताच. परंतु ढोबळमानाने पाहताना, या 'पश्चिमी' राष्ट्रांच्या इतिहासात दिसणाऱ्या महत्त्वाच्या घटकांनी मिळूनच भारता-सारख्या भांडवलशाही न्यूनविकसित राष्ट्रांच्या विकासनीतीचा गाभा सिद्ध झाला.

भारताने लोकशाही नियोजनाचा व मिश्र अर्थ-व्यवस्थेचा अवलंब दुसऱ्या योजनेपासून (१९५६–६०) सुरू केला आणि त्यात वस्तुरूप भांडवल-उभारणीला फार मोठे स्थान मिळाले. जड, पायाभूत भांडवली वस्तूंच्या निर्मितीची, पायाभूत संरचनेच्या उभारणीची (इन्फ्रास्ट्रक्चर) मुख्य जबाबदारी सार्व-जनिक क्षेत्रावर टाकण्याचे ठरले आणि त्यामुळे सार्वजनिक क्षेत्राला मोक्याच्या स्थानांची (कमांडिंग हाइट्स्) मक्तेदारी मिळाली. म्हणजेच, नियोजनाचे मुख्य माध्यम अशी भूमिका सार्वजनिक क्षेत्राकडे आली आणि मुख्यतः या क्षेत्राद्वारेच पश्चिमेतील त्या वेळच्या भांडवलसघन उच्च तांत्रिकीचा (हाय् टेक्नॉलजी) भारतात प्रवेश झाला. (उदा., पोलाद, यंत्रनिर्मिती, रासायनिक खते इ.)

मिश्र अर्थव्यवस्थेमध्ये खाजगी क्षेत्राला स्थान होतेच; परंतु विशेषतः खाजगी संघटित उद्योगांना औद्योगिक धोरणाच्या, परवाना पद्धतीच्या, मक्ते-दारी नियंत्रणाच्या आणि विदेशी चलनांवरील निर्बंधांच्या शिस्तीत आपले व्यवहार पार पाडावयाचे होते. त्यांना आयात शुल्कांसारख्या नियंत्रणांनी परकीय उद्योगांपासून संरक्षणही मिळणार होते आणि या संरक्षित बाजारपेठेत, आयात–प्रतिस्थापनाची (इंपोर्ट सब्स्टिट्यूशन्) जबाबदारी पार पाडून मुख्यतः उपभोग्य वस्तूंचे उत्पादन त्यांनी वाढवावयाचे होते. हळूहळू औद्योगिक मालाची निर्यात करण्याची अपेक्षासुद्धा खाजगी क्षेत्रांकडून करण्यात आली होती.

कृषिक्षेत्राची भूमिका त्यामानाने दुय्यम धरली गेली होती. या क्षेत्राकडून, अन्नधान्याचा वाढता पुरवठा, औद्योगिक क्षेत्राला कच्च्या मालाचा पुरवठा

व पारंपरिक निर्यात वस्तूंची निर्मिती या गोष्टी अपेक्षित होत्या आणि त्यासाठी योजनांमध्ये प्रत्यक्ष –अप्रत्यक्ष तरतूद होतीच (जलसिंचन, खते, शेतकी संशोधन, विस्तार इ.). परंतु सुरुवातीच्या कालखंडात, एकंदर पाहाता, विकास म्हणजे आर्थिक वृद्धी व त्यासाठी मुख्यत: औद्योगीकरण– नागरीकरण– भांडवली वस्तूंची निर्मिती हा फॉर्म्युला मूलभूत मानला गेला. अशा प्रकारच्या भांडवलसघन विकास-योजनेला महत्तम प्रमाणातील देशांतर्गत बचतदेखील पुरणार नव्हती आणि त्यामुळे परकीय मदतीवर आणि त्याबरोबर येणाऱ्या तंत्रज्ञानावर अवलंबून राहाणे गृहीतच धरले गेले होते. अंतर्गत बचतीवर प्रतिकूल परिणाम होऊ न देण्यासाठी, नव्याने निर्माण होणाऱ्या उत्पन्न व संपत्तीच्या विभाजनातील विषमता फारशी कमी करता येणार नाही अशी भूमिकाही अध्याहृतपणे घेतली गेली होती. (अर्थात चीनसारख्या देशात तेथील साम्यवादी क्रांतीमुळे या संदर्भातील परिस्थिती अगदी भिन्न होती. द. कोरियासारख्या भांडवलशाही देशांनी-सुद्धा या बाबतीत समतेकडे अधिक झुकणारे धोरण सुरुवातीलाच स्वीकारले आणि या मॉडेलची भलावणही Irma Adleman सारख्या अर्थज्ञांनी केली.)

भारतामध्ये लोकसंख्या नियंत्रणाकडे अधिक गंभीरपणे जरी थोडे उशिरा (१९६५–६६ नंतर) लक्ष दिले गेले तरी लोकसंख्येबद्दल विचार करताना ' विकासप्रक्रियेतील अडथळा ' आणि ' दारिद्र्याचे (जवळजवळ सर्वांत) महत्त्वाचे कारण ' असाच विचार प्रामुख्याने केला जात असे. त्यामुळेच, औद्योगीकरण–शहरीकरणाच्या फॉर्म्युल्याला कृषी–ग्रामीण क्षेत्रांतील अतिरिक्त मनुष्यबळाला शोषून घेण्याचा म्हणजेच तेथील बेकारी कमी करण्याचा एक महत्त्वाचा उपाय असेही महत्त्व होते.

विकासाच्या नीतीतील वृद्धी–अभिमुख अशा वरील घटकांचा एकत्रितपणे विचार केला तर पुढील दोन गोष्टी लक्षात येऊ लागतात. एक म्हणजे, अविकसित देश, अविकसित का असतात या प्रश्नाचे प्रमुख उत्तर ' त्यांच्यातील अंतर्गत परिस्थितीमुळे ' (उदा., कमी भांडवलसंचय, अतिरिक्त लोकसंख्या, उद्योगांचा अभाव इ.) हे मानले गेले. दुसरे म्हणजे, विकास कशाला समजावे व विकास होण्याची प्रक्रिया कोणती, या प्रश्नांची उत्तरेही जवळपास नैसर्गिक विज्ञानांसारखी सर्व ठिकाणी लागू पडणारी असतात आणि त्यामुळे थोड्याफार फरकाने श्रीमंत पश्चिमी देशांनी जे केले ते सरळ करत गेले (त्या देशांच्या सल्ल्याने, आर्थिक, तांत्रिक मदतीने) की विकास सरळपणे साधला जाईल अशी श्रद्धा सुरुवातीला होती.

एकच, अतिशय व्यापक अर्थाचा शब्द वापरून वरील संपूर्ण विकास-संकल्पनेचे व विकासतंत्राचे वर्णन आपल्याला करता येते आणि तो शब्द म्हणजे 'आधुनिकीकरण'. म्हणजेच 'पाश्चात्त्यीकरण'. आणि पाश्चात्त्यीकरणाची साररूप कसोटी म्हणजे देशाच्या प्रतिमाणशी वस्तुरूप उत्पादनात झपाट्याने होणारी वाढ.

आर्थिक विकासासंबंधीच्या या दृष्टिकोणाचा प्रचंड प्रभाव सुरुवातीच्या काळात होता. आजच्या अधिक चिकित्सक वातावरणातही तो विशेषत: भारतातील सुशिक्षित जनसामान्यांवर आढळून येतो. म्हणून त्यासंबंधीचे एक अधिकारवाणीने केलेले विधानच आपण लक्षात घेऊ आणि त्या विधानाचे एक ' प्रमुख संदर्भविधान ' म्हणून असलेले महत्त्व मनात रुजवून पुढे जाऊ. हे विधान ' एनसायक्लोपीडिआ ऑव् सोशल सायन्सिस् ' या जगन्मान्य संदर्भग्रंथातील ' आर्थिक विकास ' या विषयावरील रिचर्ड ए. ईस्टरलिन् यांच्या लेखातून घेतलेले आहे (खंड ४, पृ. ३९५).

" आर्थिक विकास म्हणजे दर डोई वस्तुरूप उत्पादनातील भरघोस व वेगवान वाढ आणि त्याबरोबरच समाजाच्या तांत्रिक, आर्थिक व लोकसंख्याविषयक वैशिष्ट्यांमध्ये होणारी स्थित्यंतरे. अलीकडच्या काळातच मांडल्या गेलेल्या सामाजिक व राजकीय विकास या संकल्पनांसकट जर विचार केला तर आर्थिक विकास म्हणजेच ' आधुनिकीकरण '. आधुनिकीकरणामध्ये व्यक्तीचे वर्तन व सामाजिक संस्था यांच्याशी संबंधित अशा अनेक नावीन्यांचा (इनवेशन्स्चा) समावेश होतो.

" आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत मूलभूत असलेल्या परिवर्तनांची खास वैशिष्टचे कोणती ? ह्या परिवर्तनांची कक्षा अत्यंत व्यापक असते, त्यांच्या-

अनुक्रमणिका

तील बरीचशी परिवर्तने एकदा घेतलेली दिशा बदलता न येण्याजोगी (इर्रिवर्सिबल्) अशी असतात आणि त्यांचा वेग अभूतपूर्व असा असतो. याचा परिणाम असा होतो की, आधुनिकीकरण होणाऱ्या समाजातील लोकांचे भौतिक जीवनमान नेत्रदीपक प्रमाणात उंचावते आणि त्यांच्या जगण्याच्या पद्धतीत होत्याचे नव्हते करून टाकणारे बदल घडून येतात." (हे स्वैर भाषांतर आहे.)

वरील प्रातिनिधिक वाक्याचा जर नीट विचार केला तर या भूमिकेनुसार, 'विकास' साधायचा म्हणजे आपण शक्यतो झटपट यूरप-उत्तर अमेरिकेसारखे व्हायचे हे स्पष्ट आहे. म्हणजे तेथल्यासारखा उपभोग (वैविध्यपूर्ण, चटपटीत, हवा-बंद, 'पॅकेज्ड्' इ. वैशिष्ट्यांनी युक्त), तेथल्यासारखी उत्पादनपद्धती (आधुनिकतम, स्वयंचलित, भांडवल-ऊर्जासघन' अशी तांत्रिकी, कारखाने वगैरेंचे विराट आकारमान), अर्थव्यवस्थेत प्राथमिक क्षेत्राला (शेती, जंगले, मच्छीमार, खाणी इ.) कमीकमी तौलनिक महत्त्व आणि कारखानदारी व सेवा (ऑफिसातले पांढरपेशी व्यवसाय विशेषतः) यांना वाढते महत्त्व, क्रेडिट-कार्डांसारख्या अत्यंत सोफिस्टिकेटेड विनिमय-माध्यमांचा सर्रास वापर, आरोग्य-शिक्षण इत्यादी क्षेत्रांमध्येही विशेषज्ञांवर अवलंबून राहण्यावर भर (एक्सपर्टॉक्रसी) अशांसारख्या लक्षणांनी युक्त असा समाज निर्माण करणे. हे सगळे म्हणजेच 'आधुनिकीकरण', म्हणजेच 'विकास', हा या वृद्धी-अभिमुख भूमिकेचा अर्थ आहे.

तेव्हा, भारतात दुसऱ्या पंचवर्षीय योजनेच्या वेळेला जो विकासाचा संकल्प सोडला गेला, त्यामागचे स्वप्न आज ना उद्या वरील प्रकारचा 'आधुनिक भारत' बनविण्याचे होते हे लक्षात घेणे आवश्यक आहे. मधल्या काळात, या संकल्पनेवर जरी पुष्कळ टीकात्मक विचार झाला तरी भारतातील सुशिक्षितांमधील बहुसंख्य व्यक्तींच्या मनात विकासाचे हेच चटपटीत चित्र आहे आणि ते सध्या अधिकच चकचकीत केले जात आहे हेही लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

II

साधारणपणे या शतकाच्या सहाव्या दशकाच्या सुरुवातीपासून 'वृद्धी म्हणजेच विकास' या भूमिकेबद्दल संशय निर्माण होण्यास सुरुवात झाली. एक तर असे आढळून येऊ लागले की, आर्थिक वृद्धी होत असताना उत्पन्नातील विषमतादेखील वाढते. (वृद्धीसाठी भांडवल संचय, भांडवल संचयाच्या प्रयत्नांमुळे उपभोग्य वस्तूंचा पुरवठा पुरेसा न वाढणे, पण त्याच वेळी मागणी मात्र वाढत असल्याने किंमती वाढणे आणि या भाववाढीमुळे बहुसंख्य जनतेचे वास्तविक उत्पन्न घटणे व मूठभर श्रीमंतांची श्रीमंती आणखीनच वाढणे असे विषमता वाढण्याचे एक महत्त्वाचे स्पष्टीकरण वाचकांच्या परिचयाचे असेलच.) विषमतेचा संबंध दारिद्र्याशी निकटचा असतो. आणि या दोन्हींचा संबंध बेरोजगाराशी असतो.

तेव्हा, भारत व इतर अनेक देशांत असे आढळून येऊ लागले की, भांडवलसघन उच्च तांत्रिकीवर भर देणाऱ्या औद्योगीकरणप्रधान विकासनीतीमुळे बेकारीवर फारसा परिणाम होत नाही; किंबहुना लोकसंख्या वाढत असल्याने बेरोजगारांची संख्या व प्रमाण अप्रतिहतपणे वाढतच राहाते आणि त्यामुळे केवळ किमान कॅलरीजच्या निकषानुसार ठरवलेल्या दारिद्र्यरेषेच्या खालील व्यक्तींची संख्या (व काही अंदाजांनुसार प्रमाणसुद्धा) वाढते. यातून निर्माण होणारा प्रश्न असा की, राष्ट्राचे दर डोई उत्पादन जरी वाढत असले (भारताचे एकूण उत्पादन १९६४–६५ पर्यंतच्या कालखंडात अंदाजे प्रतिवर्ष ३·७% या दराने व दर डोई उत्पन्न अंदाजे १·५% वाढले) तरी त्याचा बेरोजगार–विषमता–दारिद्र्य या लक्षणत्रयीवर जर काहीच परिणाम होत नसेल (किंबहुना या समस्या त्याच वेळी तीव्रतर होत असतील), तर अशा आर्थिक वृद्धीला 'विकास' या शब्दाने संबोधण्यात काय अर्थ आहे?

या प्रकारची टीका ज्या प्रमुख अर्थज्ञांच्या* लिखाणामध्ये आपल्याला दिसते ती म्हणजे सायमन् कझनेटस्, इर्मा अॅडलमन् व सिंथिआ टाफ्ट् मॉरिस्,

* इंग्रजी शब्दांचे, विशेषतः विशेषनामांचे देवनागरीत केलेले येथील 'उच्चार' हे अंदाजे केलेले आहेत. ते 'योग्य'च आहेत असा लेखकाचा दावा नाही.

अनुक्रमणिका

डड्‌ली सीअर्स इत्यादी. यांच्यापैकी कझनेटस् यांनी तर राष्ट्रीय उत्पन्न या विकासमापकाच्या यथार्थतेवरच हल्ला चढवून त्यावर अवलंबून राहण्यातील धोके स्पष्ट केले आणि राष्ट्रीय उत्पन्नाव्यतिरिक्त पर्यायी किंवा पूरक अशा इतर मापकांची आवश्यकता प्रतिपादली.

भारतामध्येही विषमता–दारिद्रय या समस्यांचे निरसन 'झिरपण प्रक्रियेतू' न साधले जात नाही याची जाणीव महालनोविस समितीच्या निष्कर्षातून (१९६४) व नियोजन मंडळाच्या सुरवातीच्या अभ्यासातून निर्माण होऊ लागली होतीच. यातूनच पुढे प्रसिद्धी पावलेले दांडेकर–रथ, प्रणब बर्धन, मिन्हास यांच्यासारख्यांचे 'दारिद्रय–अंदाज' निर्माण झाले व दारिद्रय रेषा' ही संकल्पना एक वाक्प्रचार म्हणून रूढ झाली.

या संदर्भातला एक महत्त्वाचा तपशीलही इथे लक्षात घेऊ. वृद्धी-अभिमुख विकासव्यूहात असे गृहीत धरण्यात येत असे की, विकसित देशांमध्येदेखील सुरुवातीला विषमता वाढली होती (उदा., इंग्लंडच्या औद्योगिक क्रांतीचा काळ). परंतु ती नंतर कमी झाली (विसाव्या शतकात विशेषतः कल्याणकारी राज्यांच्या निर्मितीनंतर). हेच सध्याच्या न्यूनविकसित देशांच्याही बाबतीत घडेल असे गृहीतच धरून चालणे अनेकांना संशयास्पद वाटू लागले. उदा., सिंगर या अर्थज्ञाने असा इशारा दिला की विषम उत्पन्न विभाजनाला अनुकूल (म्हणजेच चैनीच्या वस्तूंना प्राधान्य देणारी) अशी उत्पादन रचना एकदा का प्रस्थापित झाली की, नंतर तिचे रूपांतर आम जनतेच्या गरजा भागविण्यासाठी युक्त अशा रचनेमध्ये करणे आर्थिक व राजकीय अशा दोन्ही कारणांनी अत्यंत कठीण होऊन बसते. महबूब उल् हक् या अर्थज्ञानेही असे स्पष्ट शब्दांत सांगितले की, आर्थिक वृद्धीच्या प्रक्रियेच्या सुरुवातीला जर जमीनमालकीमध्ये खूप विषमता असेल आणि एकूणच आर्थिक सत्तेचे मोठ्या प्रमाणावर केंद्रीकरण असेल तर, वृद्धीच्या प्रक्रियेने या गोष्टींना अधिकच मजबुती येईल आणि पुरोगामी कायद्यांच्या द्वारा त्यांच्या (धनिकांच्या) हातातील सत्ता व बळ कमी करण्याचा प्रत्येक प्रयत्न ते यशस्वीपणे हाणून पाडतील.

या अतिशय भेदक अशा भाकितांचा प्रत्यय भारतातील ज्या एका घटनेने आणून दिलेला आहे ती घटना म्हणजे प्रथम प्रथम अत्यंत कौतुक केली गेलेली व सध्या वादग्रस्त ठरलेली हरित क्रांती. या हरित क्रांतीमुळे पंजाब, हरियाणा, पश्चिमी उत्तर प्रदेश व आंध्रातील काही जिल्ह्यांमध्ये प्रचंड श्रीमंती आली; परंतु संकरित बेण्यांची तांत्रिकी फक्त बड्या शेतकऱ्यांनाच परवडण्याजोगी असल्याने त्यांचे फावले, त्यांनी छोट्या शेतकऱ्यांच्या जमिनी विकत घेण्याचा सपाटा लावला आणि त्यामुळे जमीन-वाटपाची विषमता झपाट्याने वाढली.

या विवेचनाचे महत्त्वाचे फलित म्हणजे, दारिद्रयाच्या समस्येवर **प्रत्यक्ष** हल्ला चढवण्याची आवश्यकता आहे व आर्थिक वृद्धीचा एक बायप्रॉडक्ट म्हणून दारिद्रय (व विषमता) निवारणाकडे बघणे बरोबर ठरणार नाही, या गोष्टींचे हळूहळू आलेले भान.

हे भान जसजसे वाढू लागले तसतशी, आर्थिक नियोजनाच्या उद्दिष्टांची भाषा बदलू लागली. विषमतेचे प्रमाण वाढू न देता किंवा जमल्यास कमी करून आर्थिक वृद्धी साधणे म्हणजेच 'न्यायासकट वृद्धी' (Growth with Equity) ही अॅकडेमिक वर्तुळातील भाषा आणि 'गरिबी हटाव' हा तिचा राजकीय क्षेत्रातील अवतार ही या नव्या विचारसरणीची फलिते. अर्थातच हा बदल विचारसरणीमधील बदल असल्याने त्याचे प्रत्यंतर पुढील दोन गोष्टींमध्ये येऊ लागले.

एक, 'विकास कशाला म्हणावे' आणि दोन, 'विकास कशाने मोजावा' या प्रश्नांना दिली जाणारी उत्तरे बदलू लागली. याचा थोडासा तपशील पाहू.

उदा., १९७३ साली प्रसिद्ध झालेल्या अॅन् इंट्रडक्शन टु डिवलपमेंट इकनॉमिक्स या वॉल्टर एल्कॉन् यांच्या छोटेखानी सुप्रसिद्ध पुस्तकात, आपल्याला आर्थिक विकासाची पुढील व्याख्या आढळते : "आर्थिक विकास म्हणजे अशी प्रक्रिया की जिने सर्वसामान्य जनतेचे जीवन सुधारते व तेही फार विलंब न लावता. जीवन सुधारण्याच्या प्रक्रियेचे दोन घटक म्हणजे लोकांजवळील वस्तू व सेवांची उपलब्धता वाढणे व त्यांना उपलब्ध असलेल्या निवडींची कक्षा (चॉइसिस् ओपन टु देम) रुंदावणे."

या व्याख्येचा विचार केल्यास हे स्पष्ट होते की, Dudley Seers यांनी म्हटल्याप्रमाणे, गरिबी, बेरोजगारी व विषमता यांच्यात जर सुधारणा होत नसेल तर दरडोई उत्पन्न दुप्पट होऊनदेखील त्याला आर्थिक विकास असे म्हणता येणार नाही. (जाता-जाता हे नमूद करायला हरकत नाही की भारतातील दरडोई उत्पन्न १९५० पासून १९७५ पर्यंत दुपटीने वाढवण्याचा संकल्प होता; पण ते १९८५ पर्यंत प्रत्यक्षात फक्त ६२% एवढ्यानेच वाढले होते आणि बाकीच्या समस्यांनी उग्रतर स्वरूप धारण केले होते.) थोडक्या निराळ्या भाषेत म्हणजे, आर्थिक वृद्धीच्या फायद्यांपासून जोपर्यंत समाजातील पददलित लोक वंचित राहतात तोपर्यंत त्या वृद्धीला गंभीरपणे 'विकास' असे संबोधता येणार नाही.

आता 'विकास कशाने मोजावा' या प्रश्नाच्या उत्तरात झालेल्या बदलांकडे वळू.

प्रथम हे लक्षात घेतले पाहिजे की सामाजिक शास्त्रातील विचारवंतांना मापकांच्या भाषेत बोलण्याची एक मानसिक गरज नेहमीच सतावत आली आहे. याचे कारण म्हणजे मापनशक्यता ही विज्ञानाची महत्त्वाची कसोटी मानली गेली आहे. या गरजेपायीच अर्थशास्त्रात गणिताचा वाजवी आणि पुष्कळसा गैरवाजवी उपयोग केला जाऊ लागला. या गरजेने त्रस्त अशा अर्थज्ञांना राष्ट्रीय उत्पन्न ही जणू मानवाच्या भौतिक (व त्यामुळे एकूणही!) कल्याणाची एक उत्तम फूटपट्टी म्हणून हाती लागली. त्यामुळेच, आतापर्यंत आपण बघितल्याप्रमाणे, या राष्ट्रीय उत्पन्नाच्या पातळीत व त्याच्या वाढीच्या दरात (म्हणजेच आर्थिक वृद्धीत) विकास 'मोजण्याची' प्रथा रूढ झाली.

परंतु, या वृद्धीच्या आकड्यामध्ये सरासरी उत्पन्नाच्या विभाजनाचे, त्या विभाजनाशी संबंधित असलेल्या दारिद्र्याचे, बेकारीचे स्वरूप उमटत नसल्याने दरडोई राष्ट्रीय उत्पन्नाचे मापक हे अधिकाधिक अर्थज्ञांना असमाधानकारक वाटू लागले. त्यामुळे, या मापकाबरोबरच इतर मापकांचाही उपयोग व्हावा असे अधिकाधिक अर्थज्ञांना वाटू लागले. विकासाच्या या नव्या मापकांच्या शोधामध्ये यूनो, जागतिक बँक वगैरे आंतरराष्ट्रीय संस्थांनीही पुष्कळ रस घेतला व याचा परिणाम म्हणून आजकाल राष्ट्रीय उत्पन्नाच्या जोडीला पुढील प्रमुख प्रकारचे मापक वापरांत येऊ लागलेले आहेत :

(अ) लोकसंख्या व आरोग्याशी संबंधित :

मृत्युदर, जन्मदर, अपेक्षित आयुर्मान (लाइफ् इक्पेक्टन्सी), अर्भक मृत्युप्रमाण, (इन्फंट् मॉरटॅलिटी) इ.

दर डॉक्टरामागील लोकसंख्या, दर हजार लोकसंख्येमागे असलेल्या इस्पितळांतील खाटा, दरडोई दर दिवशीचे उष्मांकांचे (कॅलरीज्) व प्रथिनांचे (ग्रॅम्स्) सेवन, पिण्यास योग्य अशा पाण्याची वर्षभर सोय असलेले लोकसंख्येचे प्रमाण इ.

यावरोबरच 'अ' जीवनसत्वाची, लोहाची कमतरता असलेल्या लोकसंख्येचे प्रमाण.

(आ) शिक्षणाशी संबंधित :

साक्षरता प्रमाण, गणनकौशल्य (न्यूमरसी) असलेल्यांचे प्रमाण, मूलभूत तांत्रिक कौशल्ये प्राप्त झालेल्यांचे प्रमाण (टेक्निरसी), शिक्षक : विद्यार्थी प्रमाण, निरनिराळ्या वयोगटांतील पटावरील विद्यार्थ्यांचे प्रमाण (एनरोलमंट रेशिओज्), गळती व स्थगताचे प्रमाण (ड्रॉपआऊट व स्टॅग्नेशन् रेशिओज्), दर डोई दर वर्षी मिळणाऱ्या पत्रांची संख्या, दर वर्षी दर डोई होणारा न्यूजप्रिंटचा वापर, दर हजारी रेडिओ सेट्स., टी. व्ही. सेट्सची संख्या इ.

(इ) ऊर्जा, पोलाद, सिमेंट, कापड यांचे दर डोई दर वर्षी होणारे सेवन; दर डोई उपलब्ध निवाऱ्याची जागा (चौ. फूट), दर हजार लोकांमागे असलेल्या वाहनांची (मोटारी, स्कूटर्स, सायकली) संख्या इ.

(ई) बेकारीचे प्रमाण (न वापरली गेलेली श्रमशक्ती मनुष्यवर्षांमध्ये); कामकरी लोकसंख्येचे व्यवसायानुसार (प्राथमिक, दुय्यम व तृतीय क्षेत्रांमधील) विभाजन.

(ड) गुन्हेगारीचे प्रमाण, मानवी हक्कांच्या पायमल्लीचे प्रमाण इ. (या यादीत आपल्यालाही काही मापकांची भर घालता येईल. उदा., रेडिओ व टी. व्ही. यांच्या एकूण वेळामध्ये करमणुकीच्या व शैक्षणिक कार्यक्रमांचे प्रमाण; आरोग्याला घातक अशा पातळीच्या प्रदूषणाला तोंड द्याव्या लागणाऱ्या

लोकसंख्येचे प्रमाण; एकूण भूपृष्ठाशी असलेले जंगलांचे प्रमाण इ.)

वरीलपैकी अनेक मापकांचा आजकाल सर्रास वापर केला जातो हे वाचकांना माहीत आहेच आणि एखाद्या देशाचा केवल किंवा तौलनिक 'विकास' केवळ राष्ट्रीय उत्पन्नाच्या फूटपट्टीने मापण्यापेक्षा अशा सामाजिक–आर्थिक निर्देशकांच्या साहाय्याने मापला तर ते अधिक यथार्थ आहे हे उघड आहे. परंतु या प्रकारच्या प्रयत्नांना गेल्या सात-आठ वर्षांत मिळालेल्या एका नव्या दिशेची थोडीशी ओळख करून घेऊन हा मुद्दा पूर्ण करू.

वरील प्रकारच्या सामाजिक–आर्थिक निर्देशकांच्या किंवा सूचकांच्या वापरात दोन अडचणी जाणवू लागल्या. एक म्हणजे, त्यांची मोठी संख्या आणि त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नाच्या मापकात असलेल्या सुटसुटितपणाचा अभाव. दुसरे म्हणजे, त्यांच्यातील अनेकांची (उदा. : पोलादाचा दरडोई उपयोग) विवाद्य प्रस्तुतता तसेच त्यांच्या बाबतीतील माहिती मिळवण्याच्या न्यूनविकसित देशांतील अडचणी (उदा. : ऊर्जेचा भारतातील दरडोई होणारा वापर).

या अडचणींमुळे, आणि न्यूनविकसित देशातील विशेषतः गरिबांच्या जीवनामध्ये (लेवल् ऑव् लिविंग) होणाऱ्या बदलांवर लक्ष केंद्रित करता यावे म्हणून काही विचारवंतांनी काही महत्त्वाच्या मापकांचा मिळून बनवलेला असा एखादा संमिश्र निर्देशांक (काँपझिट् इंडेक्स्) तयार करता येईल का, या दृष्टीने विचार सुरू केला. या प्रयत्नांना आलेले एक विचारप्रवर्तक फळ म्हणजेच भौतिक जीवन गुणवत्ता निर्देशांक (फिजिकल् क्वॉलिटी ऑव् लाइफ् इंडेक्स्).

या ठिकाणी भौतिक जीवन गुणवत्ता निर्देशांकाची अगदी प्राथमिक स्वरूपाची ओळख हा निर्देशांक अगदी निर्दोष परिपूर्ण आहे अशा भाबड्या समजुतीने नव्हे तर, या निर्देशांकामागची जी तार्किक भूमिका आहे तिचा परिचय व्हावा म्हणून. या तार्किक भूमिकेमध्येच 'विकास' या संकल्पनेच्या अर्थाची निश्चिती करण्यातील काही महत्त्वाच्या अडचणी आपल्या लक्षात येऊ शकतात. त्यामुळेच भारताच्या विकासात्मक कामगिरीबद्दल काही निर्णय गंभीरपणे घेण्यासाठी हा अभ्यास उपयुक्त आहे असे वाटते.

भौतिक जीवन गुणवत्ता निर्देशांकाची संकल्पना ही मॉरिस् डेविड् मॉरिस् व मायकल् बी. मॅक्ॲलपिन यांच्या 'मेझरिंग द कंडिशन् ऑव् इंडिआज् पुअर' (१९८३) या ग्रंथात जागतिक तसेच विशेषतः भारतीय तपशीलाच्या संदर्भात मांडलेली आढळते. त्यातील संख्याशास्त्रीय (तत्त्वे व तंत्रे) तपशील बाजूला ठेवून इथे फक्त पुढील ढोबळ महत्त्वाच्या गोष्टीच लक्षात घेऊ :

(१) व्यक्तीच्या अत्यंत मूलभूत गरजांचे होणारे समाधान व्यक्त करण्यासाठी वापरायच्या कोणत्याही निर्देशक चलाने कोणत्या कसोटया उतरल्या पाहिजेत याचा विचार लेखकांनी प्रथम केला आहे.* त्या कसोटया पुढीलप्रमाणे मांडता येतील : i) देशाचा विकास होण्याची एकच विवक्षित पद्धत असते असे गृहीत धरून चालू नये; नाही तर विकासाच्या पूर्व अटी व त्यांचे परिणाम यांच्या संबंधांची एक ताठर भूमिका तयार होते. ii) निर्देशक चलांतून विशिष्ट प्रकारची सांस्कृतिक मूल्ये प्रतिबिंबित होऊ नयेत; कारण तसे झाल्यास विशिष्ट संस्कृतीत मान्यता पावलेल्या प्रथा आणि सर्वसाधारण निखळ महत्त्वाच्या भौतिक गरजा यांची गल्लत होण्याची शक्यता असते. अशी गल्लत झाल्यास संस्कृतिसापेक्षतेचा— एथ्नोसेंट्रिसिटीचा — दोष विश्लेषणात येतो. (उदा., मांसासारख्या प्राणिज पदार्थातून मिळणाऱ्या प्रथिनांना पाश्चात्त्य देशात दिले जाणारे विशेष महत्त्व, अशी गल्लत झाल्यास एकच महत्त्वाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी भिन्न पर्यायी मार्ग उपलब्ध असतात या वस्तुस्थितीला पुरेसे महत्त्व दिले जात नाही तर एका विशिष्ट पर्यायालाच नकळत महत्त्व मिळून जाते. (iii) दुसऱ्या कसोटीनेच जी तिसरी कसोटी आपोआप सुचविली जाते ती म्हणजे निर्देशक चल हा परिणामरूपी (रिझल्टस्) असावा, साधनरूपी (इनपुटस्)

* 'चल म्हणजे संख्यात्मक किंवा गुणात्मक बदल ज्यामध्ये होऊ शकतो असा घटक किंवा अशी बाब.

अनुक्रमणिका

नसावा. उदा., आम जनतेचे आरोग्य महत्वाचे; एखादा देश आकर्षक, खर्चिक इस्पितळे उभारून ते मिळवतो की चीनप्रमाणे 'अनवाणी डॉक्टरां'ची फौज उभारून मिळवतो हे कमी महत्त्वाचे. या कसोटीचे महत्त्व असे की, कमी खर्चिक (दिसायला कदाचित मागास) असे पर्यायी तंत्र वापरूनदेखील गरीब देशांना विकास साधता येतो हे स्पष्ट होते. (iv) निर्देशक चलामध्ये केवळ संख्यात्मक वाढ झाली की त्यापासून निर्माण होणाऱ्या लाभाचे वितरण जवळजवळ सर्वांचा लाभ वाढेल असे असावे. (राष्ट्रीय उत्पन्न हा निर्देशक या कसोटीत फार मार खातो हे आपण पाहिले आहेच. तीच गत पोलाद किंवा न्यूजप्रिंटचा दर डोई वापर यासारख्या निर्देशकांची होईल हे लक्षात येईल.) (v) निर्देशक चलांच्या संख्यात्मक आविष्करणासाठी लागणारी (संख्याशास्त्रीय) माहिती कोणतेही शासन नेहमीच (routinely) गोळा करते अशी आणि जिच्यावर सहज प्रक्रिया होऊ शकतात अशी असावी. ही झाली सुलभतेची, बिनखर्चिकपणाची आणि म्हणून गरीब 'मागास' देशांच्या दृष्टीने विशेष महत्त्वाची कसोटी. राष्ट्रीय उत्पन्न हे इथेही मार खाते. (vi) निर्देशक घटक असे असावेत की ज्यांच्या भाषेत आंतरराष्ट्रीय तुलना सहजशक्य होतात. आंतरराष्ट्रीय आर्थिक व आर्थिकेतर साहाय्याला (aid) अधिक अर्थपूर्णता आणण्याच्या दृष्टीने व एका गरीब राष्ट्राकडून दुसऱ्या गरीब राष्ट्राला योग्य असे धडे शिकता येण्याच्या दृष्टीने हा निकष महत्त्वाचा आहे हे स्पष्ट आहे.

(२) आता पुढचा प्रश्न म्हणजे कोणत्या गरजा भागण्यावर माणसाचे अगदी प्राथमिक पातळीवरील हित (भौतिक जीवन गुणवत्ता) अवलंबून असते आणि कोणत्या निर्देशक चलांकरवी (वरील सहा कसोट्या मोठ्या प्रमाणात पूर्ण करू शकणाऱ्या) ते हित चांगल्या प्रकारे व्यक्त होऊ शकेल ?

Morris यांनी शंभरावर चलांमधून ज्या तिघांची निवड केली ते म्हणजे (अ) प्रौढ साक्षरता प्रमाण (प्रतिशत); (आ) अर्भक मृत्युदर (दर हजारी); व (इ) सरासरी अपेक्षित आयुर्मान (वर्षसंख्या).

या तीन निर्देशक चलांची निवड करण्यामागचा विचार थोडक्यात असा मांडता येईल. सर्व समाजांमध्ये, परंतु विशेषत: गरीब देशांतून बहुसंख्येने आढळणाऱ्या गरिबांच्या दृष्टीने विचार केल्यास, असे दिसते की, कमीत कमी बालमृत्यू होणे, जास्तीत जास्त आयुर्मान (longevity) असणे आणि जास्तीत जास्त प्रौढ व्यक्ती साक्षर असणे या गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या ठरतात, मानल्या जातात; एवढेच नव्हे तर हे तीन निर्देशक 'चांगल्या' निर्देशकांच्या सहाही कसोट्यांना, इतर बहुतेक निर्देशकांच्या तुलनेत चांगले उतरतात. (वाचकांनी एक स्वाध्याय म्हणून याचा विचार करावा आणि यासंबंधीचे मूळ ग्रंथातील विश्लेषण अवश्य वाचावे.)

तेव्हा, या तीन चलांच्या आधारे जर एक संयुक्त निर्देशांक तयार केला तर त्यात एखाद्या देशातील लोकांची अगदी प्राथमिक पातळीवरील जीवनगुणवत्ता प्रतिबिंबित होईल अशी मॉरिस् यांची धारणा आहे. यात संपूर्ण जीवनाची व्यापक अर्थाची गुणवत्ता व्यक्त होत नाही आणि म्हणूनच या गुणवत्तेची मर्यादितता अधोरेखित करण्यासाठी 'भौतिक' हा थोडासा असमाधानकारक शब्द आपण वापरला आहे जसे मॉरिस् आवर्जून सांगतात.

(३) भौतिक जीवन गुणवत्ता निर्देशांक शून्य ते शंभर या श्रेणीत मांडला जातो. तो साक्षरता (सा), आयुर्मान (आ) व अर्भक मृत्युदर (मृ) या तीन चलांवर आधारित असल्याने, या चलांची पातळी दाखविणारे जे प्रत्यक्ष आकडे असतात ते प्रथम ० ते १०० या श्रेणीत रूपांतरित करून घ्यावे लागतात उदा, ७७ वर्षे ही सर्वोत्तम सरासरी आयुर्मर्यादा व ३८ वर्षे ही सरासरी किमान आयुर्मर्यादा असल्याने, ज्या देशांमध्ये प्रत्यक्षात सरासरी आयुर्मान ७७ वर्षे असेल त्याचा निर्देशांक (आ) =१०० होईल. (संख्याशास्त्रीय सूत्र वापरल्यास भारताची ५६ वर्षे ही आयुर्मर्यादा ४६ हा या संदर्भातील निर्देशांक आपल्याला देते.) याच पद्धतीने निर्देशांक (सा) व निर्देशांक (मृ) तयार केले जातात. ते कोणत्याही एका देशाच्या बाबतीत तयार केल्यावर त्यांची बेरीज करून त्यांना ३ ने भागून जी संख्या येते तो त्या देशाचा (संयुक्त) भौतिक जीवन गुणवत्ता निर्देशांक होय. (३ ने

अनुक्रमणिका

भागणे म्हणजे प्रत्येक चलाला समान महत्त्व देणे होय. या निर्णयाचे समर्थन तशाच इतरही अनेक सूक्ष्म विवाद्य मुद्द्यांचे विवेचन मुळातून वाचण्या-सारखे आहे.

(४) अशा पद्धतीने तयार केलेल्या या विकास-मापकाचे तौलनिक फायदे कोणते हा महत्त्वाचा प्रश्न आता लक्षात घेऊ.

(i) राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीतून ज्या अनेक महत्त्वाच्या गोष्टी सुटतात त्या या निर्देशांकाने प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे लक्षात येतात. राष्ट्रीय उत्पन्न व भौतिक जीवन गुणवत्ता निर्देशांक याबद्दलची मॉरिस् यांनी दिलेली आकडेवारी लक्षात घेतल्यास एक फार महत्त्वाची गोष्ट लक्षात येते ती अशी की, या दोन गोष्टींमध्ये सहसंबंध असला तरी तो लक्ष-णीय नाही. म्हणजेच बहुतेक आखाती देश, कातार, सौदी अरब, लिबिया, गेबाँ, घाना, अँगोला या देशांमध्ये दरडोई उत्पन्न खूपच वरच्या पातळीवर असूनदेखील तेथील भौतिक जीवन 'गुणवत्ता' निर्देशांक फारच कमी (४५ पेक्षासुद्धा कमी) आहे; याउलट श्रीलंका, चीन, ब्रह्मदेश या देशांमध्ये दर डोई राष्ट्रीय उत्पन्न खूपच कमी असूनदेखील भौतिक जीवन गुणवत्ता निर्देशांक त्यामानाने खूपच चांगला (५० च्या पुढे, श्रीलंकेत तर ८० च्यापेक्षा जास्त) आहे. याचा अर्थ राष्ट्र संपन्न असले म्हणजे तेथील लोकांच्या भौतिक जीवनाची गुणवत्ता (विकासपातळी) संपन्न असेलच असे नाही आणि राष्ट्र गरीब असूनदेखील योग्य अग्रक्रम ठेवून सामाजिक कल्याणाच्या योजना इ. राबविल्यास ही गुणवत्ता लक्षणीय प्रमाणात सुधारता येते आणि अधिक खऱ्या अर्थाने 'विकास' साधता येतो. तेव्हा समाजशास्त्रज्ञांसाठी हा एक महत्त्वाचा संशोधन-प्रश्न निर्माण झाला आहे की लंका, चीन, ब्रह्मदेश, इ. देशांच्या धोरणातून भारतासारख्या इतर गरीब देशांना काय शिकण्यासारखे आहे? (ii) राष्ट्रीय उत्पन्न, पोलादाचे किंवा ऊर्जेचे प्रतिमाणशी सेवन यांसारख्या मापकांच्या बाबतीत आपल्याला समाजा-तील महत्त्वाच्या वर्गांनुसार/गटांनुसार (उदा. स्त्री-पुरुष) माहिती मिळतेच असे नाही ती भौतिक जीवन गुणवत्ता निर्देशांकाच्या बाबतीत मिळू शकते आणि सामाजिक-आर्थिक धोरणाच्या संदर्भातील अशा माहितीचे महत्त्व वादातीत आहे. (iii) राष्ट्रीय उत्पन्न हे मापक वापरण्यातला एक धोका असा की, त्याच्या वाढीला तत्त्वतः मर्यादा अशी नसल्या-कारणाने ते आंतरराष्ट्रीय स्पर्धेला एका अर्थाने उत्तेजनच देते आणि त्यातून अणुयुद्धाचे धोके किंवा त्यासाठी केला जाणारा मर्यादित साधनसंपत्तीचा दुरूपयोग या मानवहितविरोधी गोष्टी अटळपणे निर्माण होतात. भौतिक जीवन गुणवत्ता निर्देशांकाला (निदान मध्यम कालावधीच्या संदर्भात तरी) १०० ही कमाल मर्यादा असल्याने त्यातून अशी जीवघेणी स्पर्धा न निर्माण होता खरोखरच सर्वसामान्यांच्या मूलभूत गरजांच्या पूर्तीसाठी योजना आखण्याकडे समाजांचे लक्ष वळेल व राष्ट्रे (विशेषतः भौतिक जीवनाची गुणवत्ता खूपच कमी असलेली) जास्त करून अंतर्मुख होतील. (iv) एक महत्त्वाची गोष्ट अशी की, भौतिक जीवनाच्या गुणवत्तेचा निर्देशांक वाढविण्याच्या प्रयत्नांमुळे अप्रत्यक्षतः इतर अनेक 'कल्याणकारी' गोष्टी करण्याचा आवश्यक तो दबाव अनिवार्यपणे निर्माण होतो. उदा., सरासरी आयुर्मान तातडीने वाढवावयाचे म्हटल्यास, किंवा साक्षरता वाढवावयाची झाल्यास सामाजिक-आर्थिक धोरणांमध्ये किती मूलभूत बदल करावे लागतील हे सहज लक्षात येण्याजोगे आहे. या दृष्टीने पाहता असे म्हणावेसे वाटते की, हा निर्देशांक हिमनगाच्या टोकासारखा आहे. या निर्देशांकात वाढ करायची झाल्यास सबंध धोरण लोकहितवादी करावे लागेल. या दृष्टीने पाहता, दर डोई राष्ट्रीय उत्पन्नाचा व अनेक सामाजिक-आर्थिक निर्देशकांचाही विकास-मापक म्हणून असलेला तोकडेपणा, भ्रममूलकता प्रकर्षाने लक्षात येते. (v) मॉरिस् यांनी ज्या १५० राष्ट्रांची (१९७०-७५ या वर्षांसाठीची) जी सरासरी आकडेवारी दिली आहे ती आकडेवारी आपल्याला एक गोष्ट निश्चितपणे सांगते. साम्यवादी देशांची या संदर्भातील कामगिरी उत्तम आहे—मग तो देश राष्ट्रीय उत्पन्नाच्या निकषानुसार गरीब असो (विएतनाम, चीन), मध्यम असो (क्यूबा, अल्बेनिया इ.) की श्रीमंत असो (प. जर्मनी, रशिया इ.) (vi) या मुद्द्याचा विस्तार म्हणून असेही म्हणता येते की, या प्रकारच्या आंतरराष्ट्रीय तुलना पैशात मोजल्या जाणाऱ्या आणि त्यामुळे अनेक

जटिल समस्या निर्माण करणाऱ्या दर डोई राष्ट्रीय उत्पन्नासारख्या निर्देशकापेक्षा, या 'वास्तविक' (रिअल किंवा नॉन्-मॉनिटरी) निर्देशांकाच्या आधारे अधिक निर्दोषपणे करू शकतो. हा फायदा विशेषतः आंतरराष्ट्रीय पातळीवरील आर्थिक व इतर प्रकारच्या साहाय्याचा तपशील ठरवताना (स्वरूप, कालावधी, मूल्यमापनाचे निकष इ.) अतिशय महत्त्वाचा ठरेल.

भौतिक जीवन गुणवत्ता निर्देशांकाच्या या गुण-वर्णनाचा समारोप करायच्या आधी त्यातील (आधी उल्लेखिलेल्या वगळून) काही विवाद्य भागांचा निर्देश करणे आवश्यक आहे. प्रा. एम्. मुखर्जी यांनी दोन अडचणी मांडल्या आहेत त्या अशा : (i) या निर्देशांकासाठी लागणारी संख्या-शास्त्रीय माहिती साधारणतः दरवर्षी नव्याने गोळा केली जात नाही. (ii) निर्देशांक केवळ तीनच घटकांवर आधारित असल्याने आणि प्रत्येकाला सारखेच महत्त्व असल्याने, यांतील एकाही घटका-संबंधीच्या माहितीत जर गंभीर दोष असेल तरी त्याचा एकूण निर्देशांकावर मोठा परिणाम होऊ शकेल. (या साठी आणखी काही घटक समाविष्ट करण्याचा उपाय मुखर्जींनी सुचवला आहे. हे जादा घटक, ज्यांच्याबद्दल दरवर्षी माहिती उपलब्ध होऊ शकते असे असणे श्रेयस्कर. या जादा घटकांच्या समावेशामुळे आजच्या निर्देशांकाचा 'साधेपणा' किंवा 'सरलता' हा महत्त्वाचा गुण त्या प्रमाणात कमी होईल हे मुखर्जींना मान्य आहे.)

III

"केवळ आर्थिक वृद्धी म्हणजे विकास नव्हे" या, या शतकाच्या सहाव्या दशकामध्ये निर्माण झालेल्या भूमिकेच्या संदर्भातला काही महत्त्वाचा तपशील आपण वर पाहिला. उरलेला (आयडिअलॉजिकल भेदांच्या दृष्टीने) महत्त्वाचा तपशील आपण थोडा नंतर पाहणार आहोत. असे करण्याचे कारण म्हणजे प्रस्तुत भूमिकेतून विचार करता, भारताच्या आज-वरच्या कामगिरीबद्दल ढोबळ मानाने काय म्हणता येते याबद्दलचे विवेचन करण्यासाठी आवश्यक तो संकल्पनात्मक सांगाडा आता आपल्या जवळ आहे आणि त्यामुळे ते विवेचन मध्ये खंड न पाडता आपल्याला लगेच हाती घेता येईल.

प्रथमतःच एक गोष्ट स्पष्ट करणे आवश्यक आहे. प्रस्तुत भूमिका आर्थिक–वृद्धी–विरोधी अशी भूमिका नाही. ती फक्त आर्थिक वृद्धीच्या अपुरेपणाकडे, त्रुटींकडे लक्ष वेधून आपल्याला असे बजावते की, वृद्धी साधून 'विकास' साधेलच असे नाही.

या भूमिकेचा स्वीकार केल्यास, गेल्या तीस–पस्तीस वर्षांतील भारताचा ताळेबंद कसा दिसतो ?

एकूण कामगिरीतील यशाचा आढावा पुढील प्रमाणे मांडता येईल. (हा सर्वसाधारणपणे बहुते-कांच्या परिचयाचा असतो असे गृहीत धरून सारांश-रूपानेच मांडला आहे.) स्वातंत्र्यापूर्वीची चार-पाच दशके भारताचे एकूण राष्ट्रीय उत्पन्न सरासरी प्रति-वर्ष १% दराने वाढले; परंतु लोकसंख्याही साधारण तेवढ्यानेच वाढल्याने दरडोई राष्ट्रीय उत्पन्नाच्या भाषेत भारताची अर्थव्यवस्था जवळजवळ कुंठित अशा अवस्थेतच होती. दारिद्र्य होतेच; एवढेच नव्हे तर १९४३ च्या बंगालच्या दुष्काळात तीन दशलक्ष लोक मृत्युमुखी पडले आणि, अमर्त्य सेन यांनी दाखवल्याप्रमाणे अन्नधान्याच्या उत्पादनात व दर डोई उपलब्धतेत फारशी घट झालेली नसताना हे भूकबळी पडले. यावरून स्वातंत्र्यपूर्व भारताच्या अर्थव्यवस्थेतील कमकुवतपणा (Vulnerability) स्पष्ट होतो.

(१) या पार्श्वभूमीवर, स्वातंत्र्योत्तर काळात १९८० पर्यंतच्या काळात एकूण राष्ट्रीय उत्पन्न सरासरी वार्षिक ३·५% दराने तर लोकसंख्या २% दराने आणि त्यामुळे दर डोई उत्पन्न १·५% दराने वाढले. म्हणजेच, लोकसंख्यावाढीचा दर पूर्वीपेक्षा वाढूनदेखील दर डोई उत्पन्न थोड्या वेगाने का होईना, परंतु वाढत आले आणि कुंठित अर्थ-व्यवस्थेच्या जागी आपल्याला सौम्यपणे गतिमान अशी अर्थव्यवस्था अनुभवता आली.

(२) स्वातंत्र्यपूर्व काळाच्या मानाने स्वातंत्र्योत्तर काळामध्ये भारतातील प्रमुख व्यवसायाची म्हणजे शेतीची चांगली वाढ झाली. अन्नधान्याचे उत्पादन १९५१ ते १९८४ या काळात ५ कोटी टनांवरून १५ कोटी टनांपर्यंत वाढले. नवी जमीन लागवडी-खाली आणल्याने व विशेषतः सहाव्या दशकातील मध्यानंतरच्या हरितक्रांतीमुळे (संकरित बेणी + रासायनिक खते + जलसिंचन + यंत्रे + कीटकनाशके)

हे विशेषतः घडले. अर्थात हे मुख्यतः गव्हाच्या बाबतीत आणि पंजाब–हरयाणा इ. भागांपुरते मर्यादित राहिले. परंतु या उत्पादनवाढीने आपली अन्नधान्याची आयात बंद होऊन सत्तरीत आपण त्या बाबतीत स्वयंनिर्भर झालो. १९६८, १९७१–७३ व १९७८ या वर्षांमध्ये अनुक्रमे बिहार, महाराष्ट्र प. बंगाल या राज्यांमध्ये दुष्काळ / पूरजन्य परिस्थिती निर्माण होऊनसुद्धा आपण बंगालची १९४३ ची भूकबळींची परिस्थिती टाळू शकलो

(३) परदेशी मालाच्या आयातीपासून संरक्षण, आयात–प्रतिस्थापन इ. धोरणांच्या साहाय्याने आपण एक वैविध्यपूर्ण (भिन्न भिन्न प्रकारच्या भांडवली व उपभोग्य वस्तू) असे औद्योगिक जाळे प्रस्थापू शकलो व त्यामुळे 'निमऔद्योगिक' या संज्ञेला आपली अर्थव्यवस्था पात्र झाली. स्वातंत्र्याच्या वेळी काही औद्योगिक माल सोडला तर बाकी सगळा आयात करावा लागत असे या पार्श्वभूमीवर आजची मोठ्या प्रमाणातील केवळ स्वयंपूर्णताच नव्हे तर निर्यात-क्षमता हे महत्त्वाचे यश मानले जाते.

(४) निर्यातीमधील वाढ ही जरी साठनंतरची कथा असली आणि तीही फारशी लक्षणीय नसली तरी गेल्या काही वर्षांतील खनिज तेलाचे देशांतर्गत संशोधन-उत्पादन-शुद्धीकरण यातील वाढ, आखाती देशांतील सुबत्तेचा फायदा उठवण्यात भारतीय लोकांनी दाखवलेली तत्परता (ब त्यामुळे विदेशी चलनाच्या ओघात पडलेली भर) आणि सातव्या दशकात एकूण जगातच मंदी चालू असतानाही भारताने त्या परिस्थितीचा स्वतःवर फारसा प्रतिकूल परिणाम होऊ न देण्यात मिळवलेले तौलनिक यश ही कामगिरीदेखील समाधानकारक मानली जाते.

(५) लोकसंख्या निर्धारित करणाऱ्या घटकांच्या दृष्टीने थोडे यश मिळाले ते म्हणजे १९५१ ते १९८१ या कालखंडात मृत्युदर २७ पासून १४ वर व जन्मदर ४४ वरून ३४ वर आला. (हे दोन्ही दर घटणे हे यश असले तरी त्यांच्या घटण्याच्या वेगात तफावत असल्याने लोकसंख्यावाढीचा दर मात्र वाढला आहे !)

(६) न्यूक्लिअर सायंटिस्ट्सच्या संख्येत भारत जगातील तिसरा देश असणे, २० ते २४ वर्षे या वयोगटातील ८% इतकी लोकसंख्या सध्या उच्च शिक्षण संस्थांमध्ये शिकत असणे (श्रीलंका व चीन प्रत्येकी १% व ब्रह्मदेश ४%) आणि या बाबतीत भारतापेक्षा दुप्पट दर डोई उत्पन्न असलेले देशसुद्धा भारताच्या मागे असणे ही गोष्ट अभिमानाने सांगितली जाते. तसेच, चीन सोडल्यास, इतर गरीब देशांमध्ये दर हजार लोकसंख्येमागे असलेल्या डॉक्टरांच्या संख्येच्या बाबतीतही भारत आघाडीवर आहे.

(७) ज्या एका नव्या विकास-मापकाचा अपणा परिचय करून घेतला, त्या भौतिक जीवन गुणवत्ता निर्देशांकाच्या बाबतीतही भारताने पुढील प्रकारे प्रगती केल्याचे दिसते :

	१९५०च्या सुमाराला	**१९७५च्या सुमाराला**
साक्षरता	१६.६	३४ (प्रतिशत)
आयुर्मान	३३	५५ (वर्षसंख्या)
अर्भकमृत्यु	१४६	१२२ (दर हजारी)
भौतिक जीवन गुणवत्ता निर्देशांक	२६	४२ (निर्देशांक)

वरील तक्त्यावरून असे म्हणता येईल की, भारतीयांच्या भौतिक (प्राथमिक, ऐहिक) जीवनाची गुणवत्ताही गेल्या २५-३० वर्षांत काही प्रमाणात सुधारली आहे आणि (आपणच आधीच पाहिलेल्या कारणांनी) असेही म्हणावयास जागा आहे की, या मर्यादित सुधारणेतला बराच मोठा भाग सर्व-सामान्य माणसाच्या वाटचाला आलेला आहे. (म्हणजे दर डोई उत्पन्नवाढीच्या लाभांचे जसे फार मोठ्या प्रमाणात केंद्रीकरण होते तितके या लाभांचे झालेले नाही.) एम्. मुखर्जी यांच्या आकडेवारी-नुसार, १९०१ पासून १९७१ हा कालखंड घेतल्यास असेही दिसते की, दर डोई राष्ट्रीय उत्पन्नाच्या वार्षिक सरासरी वृद्धीपेक्षा भौतिक जीवन गुणवत्ता निर्देशांकामधील सुधारणेचा वेग पुष्कळच जास्त होता. मुखर्जी यांनी यावरून असा निष्कर्ष काढला आहे की, निदान सुरुवातीच्या काळात, निर्देशांका-मध्ये सुधारणा होण्यासाठी दर डोई उत्पन्नामध्ये लक्षणीय वाढ होणे तितकेसे आवश्यक नसते.

'न्यायासकट वृद्धी' या टीकात्मक विचारधारे-नुसार भारतीय अर्थव्यवस्थेच्या यशाची वरीलप्रमाणे

दखल घेतल्यानंतर आता आपल्याला प्रमुख अपयशांकडे वळायचे आहे. येथेही सर्वसाधारणपणे परिचित आणि 'लक्षणवजा' मुद्द्यांचा त्रोटक उल्लेख आणि 'रोगमूला'च्या चर्चेला प्राधान्य असे पथ्य पाळले आहे.

(१) स्वातंत्र्यापूर्वीच्या मानाने स्वातंत्र्योत्तर काळात अर्थव्यवस्था जरी 'वर्धिष्णू' होती तरी राजकृष्ण यांनी म्हटल्याप्रमाणे सालिना १.५% हा फार सौम्य वृद्धिदर होता आणि त्यामुळे १९७५ मध्ये (२५ वर्षांत) भारताचे वस्तुरूप दर डोई उत्पन्न दुप्पट करण्याचे उद्दिष्ट १९८५ पर्यंतही साधले जाऊ शकले नाही. ही वाढ केवळ ६२% च्या आसपासच आहे. हे वृद्धिअभिमुख भारतीय आर्थिक नियोजनाचे एक महत्त्वाचे अपयश आहे.

(२) एकूण औद्योगिक उत्पादन निरनिराळ्या प्रकारच्या वस्तूंनी मिळून बनते. त्यात पुढील मुख्य प्रकार येतात: (i) पायाभूत— उदा., खनिजे, रसायने, खते, धातू, वीज इ. (ii) भांडवली— उदा., यंत्रसामग्री, रेल्वे इक्विपमंट, ट्रक्स इ. (iii) अर्धसिद्ध (इंटरमीडिएट्)— उदा., सूत, टायर्स-ट्यूब्ज, कृत्रिम धागा, रंग, पेट्रोलियम प्रॉडक्टस्, बॅटरीज् इ. व (iv) उपभोग्य— उदा., साखर, तेल, कापड, चहा, कागद, औषधे, काच-सामान, काडेपेटचा, साबण इ. व दीर्घोपयोगी उपभोग्य— उदा., ऑफिस व घरगुती वापराची यंत्रे, मोटारी, स्कूटर्स, रिफ्रिजरेटर्स, अेअरकंडिशनर्स इ.

या निरनिराळ्या प्रकारच्या उत्पादनांच्या वाढीचे दर जर लक्षात घेतले तर असे आढळते की, 'दीर्घोपयोगी उपभोग्य' या प्रकारचे औद्योगिक उत्पादन लक्षणीय वेगाने वाढत आले आहे. याचा एक अर्थ असा होतो की आपण नियोजित पद्धतीने विकास साधण्याचा प्रयत्न करण्याचे ठरवूनदेखील औद्योगिक क्षेत्राला मोटारी, अेअरकंडिशनर्ससारख्या वस्तूंचे उत्पादन वेगाने वाढविण्यासाठी मर्यादित उत्पादनसाधने उपलब्ध होऊ शकतात व ती उत्पादने किफायतशीरही ठरू शकतात. याचाच अर्थ असा की, स्वातंत्र्यानंतर परकीय स्पर्धेपासून संरक्षण देऊन, परवानापद्धतीसारख्या नियंत्रणव्यवस्था उभारूनही आपण जे औद्योगीकरण साधले त्याला आपण समाजहितैषी असे वळण देण्यात असमर्थ ठरलो; कारण सर्वसामान्य माणसाला लागणाऱ्या दैनंदिन सेवनाच्या वस्तूंच्या (वेज् गुड्स्) उत्पादनांच्या वाढीचा वेग 'दीर्घोपयोगी उपभोग्य' वस्तूंच्या मानाने किरकोळच राहिला.

ज्या खाजगी क्षेत्रातील उद्योगपतींनी या प्रकारच्या औद्योगीकरणाला बाळसे आणले त्या खाजगी क्षेत्रात आपल्याला आणखीही काही (भांडवलशाही अर्थव्यवस्थेत अटळ असलेली) वैगुण्ये दिसतात ती पुढीलप्रमाणे : (अ) मक्तेदारीविरोधी कायदे असूनही वाढत गेलेली काही मोजक्या उद्योगसमूहांची मक्तेदारी (संदर्भ : महालनोबिस, हजारी, दत्त यांच्या अध्यक्षतेखालच्या समित्यांचे सुप्रसिद्ध अहवाल) व वाढते आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण; (आ) सरकारी वित्तीय संस्थांनी, भांडवलाची वास्तविक दुर्मिळता प्रतिबिंबित न करणाऱ्या अति कमी व्याजदराने पुरवलेल्या वित्तीय भांडवलामुळे खाजगी उद्योगपतींनी सरसकट वापरलेली भांडवलसघन तांत्रिकी व त्यामुळे रोजगार पुरेशा वेगाने वाढवण्यात औद्योगिक क्षेत्राला आलेले अपयश; (इ) अशा वाट चुकलेल्या खाजगी क्षेत्रातील कारखानदारीला सरकारी कारखान्यांकडूनच फारच स्वस्तात (सब्सिडाइज्ड्) पोलाद, वीज यांसारखी संसाधने मिळाल्याने त्यांचीही उधळामाधळ व अनेक ठिकाणी निर्माण केलेल्या उत्पादनक्षमतेचा अर्धवट उपयोग; म्हणजेच निराळ्या भाषेत, भांडवलाच्या अकार्यक्षम उपयोगामुळे व भारतीय परिस्थितीत अनुचित ठरणाऱ्या तांत्रिकीचा सर्रास वापर केल्याने सतत वाढत गेलेले भांडवल–उत्पादन प्रमाण (कॅपिटल् आउटपुट् रेशिओ); (ई) या कारणांनी आणि संरक्षित बाजारपेठ सातत्याने मिळाल्याने मालाच्या उत्पादनखर्चा (व किंमती) बद्दल व गुणवत्तेबद्दल एकुणात बेफिकिरी आणि त्यामुळे, एवढ्या मोठ्या (सापेक्षत्वाने) उद्योगक्षेत्राचे निर्यातीच्या क्षेत्रात असलेले (द. कोरियासारख्या देशांशी तुलना करता) अगदी निराशाजनक योगदान.

(३) भारतीय नियोजनाचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट म्हणजे उत्पन्न व संपत्ती यांच्या वितरणातील विषमता निदान जमेल तेवढी कमी करणे. या संदर्भात परिस्थिती पूर्णपणे निराशाजनक आहे हे

आता सर्वज्ञात आहे. ग्रामीण भागांत भू-अधिकार सुधारणा (लँड् रिफॉर्मस्) राबवण्याचा प्रयत्न एकोणिसशे साठनंतर जवळजवळ ठप्प पडलेला आहे. त्यात हरित क्रांतीने, मोठ्या शेतकऱ्यांनी छोटयांच्या जमिनी विकत घेऊन टाकण्याचा सपाटा लावल्याने जमीन–वाटपाच्या विषमतेत भर पडत आहेच व शेतमजुरांच्या संख्येत व प्रमाणात झपाटयाने वाढ होत आहे. नागरी भागांतील संपत्तीचे केंद्रीकरण तर अधिकच वेगाने वाढत असल्याचे अंदाज आहेत. संपत्तीच्या (अॅसेट्स्) विषमतेत वाढ झाली की, परिणामी उत्पन्नविषमतेत भर पडणारच हे ओघाने आलेच. केवळ राष्ट्रीय उपभोगखर्चाचा विचार केला तर लोकसंख्येतील तळाच्या १०% लोकांचा वाटा केवळ ३·५% असून सगळयात वरच्या १०% लोकांचा वाटा २५% आहे. यावरून राहणीमानातील विषमता अधिक प्रकर्षाने लक्षात येऊ शकेल.

(४) भारताचे एक चिघळत आलेले दुखणे म्हणजे बेकारी. बेकारीचे, अर्थातच, ग्रामीण-शहरी, उघड-छुपी, शिक्षितांची-अशिक्षितांची, कायमची-मोसमी असे अनेक प्रकारे वर्गीकरण केले जाते; परंतु आपल्या दृष्टीने महत्त्वाचा मुद्दा असा की, प्रत्येक नव्या पंचवर्षीय योजनेला त्याआधीच्या योजनेकडून 'वारशाने आलेला' बेकारीचा अनुशेष (बॅकलॉग्) वाढतच आलेला आहे. ही वाढ, एकूण बेकारांची संख्या आणि त्या संख्येचे एकूण कामगारदलाशी (लेबर फोर्स) असलेले प्रमाण, अशा दोन्ही प्रकारची वाढ आहे. वाढती बेकारी हे भारतीय नियोजनाचे एक अतिशय महत्त्वाचे अपयश मानावेच लागते; कारण बेकारीचा, दारिद्र्याचा आणि शेवटी मानवी प्रतिष्ठेचाच घनिष्ठ संबंध असतो.

आता, विषमता-बेकारी-दारिद्र्य या त्रिकोणाच्या तिसऱ्या, बहुचर्चित तरीही ज्याची काहीशा विस्ताराने चर्चा करणे आवश्यक आहे अशा दारिद्र्याच्या बाजूकडे वळू. या चर्चेतून, दारिद्र्याचा संबंध वर चर्चिलेल्या औद्योगीकरणाच्या काही अनिष्ट वैशिष्टयांशीदेखील कसा आहे हे स्पष्ट होईल.

(५) 'दारिद्र्य-रेषा' या संकल्पनेचा आपण आधीच उल्लेख केला आहे. या ठिकाणी प्रथम 'सेमिनार' मासिकाच्या जानेवारी १९८५ च्या अंकातील सुरेश तेंडुलकर यांच्या लेखाच्या आधारे (त्यातील बराचसा सांख्यिकीय तपशील बाजूला ठेवून) आपण एक महत्त्वाचा, पुष्कळसा विश्वसनीय असा मुद्दा मांडू शकतो आणि तो म्हणजे : १९७७-७८ (ज्याच्या बाबतीत विश्वसनीय माहिती सध्या उपलब्ध आहे असे शेवटचे वर्ष) साली ग्रामीण भागांत २० कोटी व शहरांत ६ कोटी इतक्या व्यक्ती दारिद्र्यरेषेखाली होत्या. म्हणजे लोकसंख्येच्या ४०% माणसे पोषणाच्या (कॅलरीज्) कसोटीनुसार दारिद्र्य कंठीत होती.

तेंडुलकर सांगतात त्याप्रमाणे एकोणीसशे सतरच्या आधी, दारिद्र्याचा उल्लेख हा भारताच्या अनेक समग्र पातळीवरच्या (मॅक्रो) समस्यांपैकी महत्त्वाची समस्या असा 'सर्वसाधारण स्वरूपाचा' असे. सहाव्या दशकाच्या सुरुवातीपासून जरी दारिद्र्याचा अधिक काटेकोर अभ्यास व्हायला सुरवात झाली तरी दारिद्र्यावर वृद्धीच्या झिरपणीमार्फत अप्रत्यक्ष 'उपाययोजना' पुष्कळ काळ पूर्वीसारखीच चालू राहिली. दारिद्र्यावर 'प्रत्यक्ष' हल्ला चढवण्याच्या कृतीला मात्र थोडीफार सुरुवात झाली ती १९७४-७५ साली सुरू झालेल्या पाचव्या योजनेपासून (आय. आर. डी. पी. सारख्या प्रकल्पांतर्गत सर्वांत गरीब कुटुंबांना शोधून काढून त्यांना प्रत्यक्ष साहाय्य देण्याच्या योजना इ.). म्हणजे, एकूण लोकसंख्येचा एक अतिदुर्दैवी भाग निश्चित करून त्याच्याबद्दल काही प्रत्यक्ष कृती करण्याचे ठरविण्यासाठी आपल्या नियोजन-यंत्रणेला जवळजवळ २५ वर्षे लागली. एकूण भारतीय अर्थप्रक्रियांचे हेच सगळयांत महत्त्वाचे अपयश मानावे लागेल.

याचा विचार थोडा खुलासेवार करणे अगत्याचे आहे.

जगदीश भगवती यांच्या 'सेमिनार' मधील (ऑक्टो. १९८५) दीर्घ लेखातील 'भारतातील दारिद्र्य निश्चितपणे कमी झालेले आहे आणि त्याच्यामागे उत्पन्नवृद्धीचीच प्रक्रिया आहे' हा युक्तिवादसुद्धा जरी क्षणभर मान्य केला आणि दारिद्र्य आणि त्यातील बदल मोजण्याच्या पद्धतींमधील अनेक अडचणी जरी लक्षात घेतल्या तरी अमर्त्य सेन म्हणतात त्याप्रमाणे साधारणपणे १/३ ते १/२ या कक्षेमध्ये कुठेतरी भारतातील दारिद्र्य–

प्रमाण बसते हे निश्चित. (म्हणूनच तेंडुलकरांच्या ४०% टक्के या १९७७-७८ सालच्या संदर्भातील प्रमाणाचा मुद्दाम उल्लेख केलेला आहे.) १/३ ते १/२ हे प्रमाण भारताच्या प्रचंड आणि वाढत्या लोकसंख्येचे प्रमाण आहे. म्हणजे हा प्रश्न कोटच-वधी लोकांचा प्रश्न आहे, म्हणून तो अत्यंत गंभीर आहे आणि तो नियोजनाच्या ३० वर्षांनंतरही टिकून आहे म्हणून ते आपले एक अत्यंत लाजिरवाणे अपयश आहे. कोणत्या दृष्टीने ?

आपण आधीच पाहिले आहे की, भारताचे दर डोई उत्पन्न १.५% प्रतिवर्ष या धीम्या दराने वाढत आलेले आहे; एवढेच नव्हे तर १९६५-१९६७ सालच्या दुष्काळांमुळे एकदम वाढलेली धान्यआयात, त्यामुळे धान्योत्पादन वेगाने वाढवण्याची निर्माण झालेली निकड, त्याच वेळी उपलब्ध झालेले नवे शेतकी तंत्रज्ञान व त्यातून आकारलेली हरित क्रांती वगैरेंमधून, देशांतर्गत उत्पादन वाढून अन्नधान्याची स्वयंपूर्णताही निर्माण झाली. गेल्या काही वर्षांमध्ये तर सरकारी धान्यकोठारांमध्ये न पेलवण्याइतके धान्यसाठे निर्माण होऊन अन्नधान्याची पुरेशी दर डोई उपलब्धता आपण निर्माण करू शकलो. असे असूनदेखील आणि दुष्काळातील भूकबळी टाळून-देखील आपण कोटचवधी नागरिकांची दीर्घकालीन उपासमार (chronic hunger) मात्र टाळू शकलेलो नाही. तसेच 'गरिबांचे प्रथिन' असलेल्या डाळींचे उत्पादनही फार कमी वाढले आहे व डाळींची दर डोई उपलब्धता तर घटतच आहे. म्हणजेच आर्थिक वृद्धी व अन्नधान्याची स्वयंपूर्णता या प्रक्रियांचा संरक्षक स्पर्शही भारतातील १/३ ते १/२ लोकांना झाला नाही. ते या प्रक्रियेच्या वर्तुळाबाहेरच वंचित, कोरडे राहिले. असे का झाले ?

अमर्त्य सेन यांनी वापरलेली परिभाषा थोडी वापरून याचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे थोडक्यात मांडता येईल :

अन्नधान्याची उपलब्धता (देशांतर्गत उत्पादन + आयात या दोन घटकांनी ठरणारी) ही व्यक्तींना पुरेसे अन्नधान्य मिळण्याची केवळ आवश्यक अट (नेसिसरी कंडिशन्) आहे; पर्याप्त अट (सफिशंट कंडिशन्) नाही. मग, व्यक्तीला जितके अन्नधान्य प्रत्यक्षात मिळते ते कशावर अवलंबून असते ? तर, भारतासारख्या बाजारप्रधान अर्थव्यवस्थेत ते पुढील दोन गोष्टींवरून ठरते : (अ) व्यक्तीजवळ अन्नेतर संसाधने कोणती आणि किती आहेत (एंडाउमंटस्) व (आ) या संसाधनांच्या आधारे अन्नधान्य आपल्या पदरात पाडून घेण्याची कशा प्रकारची परिस्थिती व्यक्तीला उपलब्ध आहे (इक्स्चेंज् ऐंटाय्टल्मंट्स्).

या मुद्द्यांचा विचार केल्यास आपल्याला असे आढळते की, उदाहरणार्थ, भूमिहीन शेतमजुरापाशी त्याची श्रमशक्ती ही 'एंडाउमंट' तर रोजगार संधी, त्या कामावर प्रत्यक्षात हातात पडणाऱ्या मजुरीचा दर व अन्नधान्याची बाजारातील किंमत या तीन गोष्टी मिळून 'एक्स्चेंज् एंटाय्टल्मंट्' असेल व या गोष्टींनी मिळून त्याला प्रत्यक्षात किती धान्य प्राप्त होईल हे ठरेल. असाच विचार छोटे शेतकरी, छोटे मच्छीमार, आदिवासी, भटक्या जमातींतले लोक यांच्या बाबतीत करावा लागेल. तो केल्यानंतर मच्छीमारीच्या, गुरे चारण्याच्या, जंगलातील लाकूडफाटा-मध-फळे इ. गोष्टी गोळा करण्याच्या वहिवाटींच्या हक्कांचे आणि ते नाहीसे/संकुचित होण्याच्या परिणामांचे दारुण महत्त्व लक्षात येऊ लागते.

तात्पर्य असे की, वृद्धिप्रक्रियेने वंचित ठेवलेल्या या कोटचवधी व्यक्तींना (व त्यांच्यावर अवलंबून असलेल्यांना) इतकी अपुरी 'इक्स्चेंज् एंटाय्टल्मंट्' प्राप्त झाली की त्यांच्या अन्नाच्या एकूण गरजेचे बाजारातील मागणीत पूर्णपणे रूपांतर होऊ शकले नाही आणि ही परिस्थिती देशात सगळ्यांना पुरण्याइतके धान्य असतानाही होती व आहे ! अमर्त्य सेन म्हणतात त्याप्रमाणे परिस्थिती अशी असूनही **बाजारात** कधी प्रचंड टंचाई निर्माण झाली नाही, अन्नआंदोलने झाली नाहीत, सरकारे कोसळली नाहीत, काही नाही.

भारतीय अर्थव्यवस्थेने कोटचवधी लोकांचे जवळजवळ दररोज अर्धपोटी झोपी जाणे ३०-३५ वर्षे अप्रतिहतपणे पचवले ! भारतात समाजवादी समाजरचनेचा प्रयोग १९५६ पासून सुरू असताना!!

अर्थात आपल्याला केवळ हे उद्गारचिन्हयुक्त वस्तुस्थितिनिदर्शक विधान करून मुद्दा येथे सोडता येणार नाही. कारण इथेच एक अत्यंत महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो आणि तो म्हणजे : आतापर्यंत

हे जे होत आले त्यापेक्षा निराळे भारताला करणे शक्य होते की नाही ?

या प्रश्नाचे नकारार्थी उत्तर पूर्वोल्लेखित जगदीश भगवतींसारख्यांच्या समर्थनात आढळते. (१९६१ मध्ये, योजना आयोगाच्या पर्स्पेक्टिव प्लॅनिंग डिविजनचे पीतांबर पंत यांनी भगवतींना बोलावून घेतले व त्यामुळे 'मुख्य अर्थज्ञ' म्हणून भगवती त्या वेळी विकासव्यूहाच्या निर्मितीत सहभागी झाले होते.) म्हणजे असे की, स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जे नियोजनपर्व १९५०-५१ साली सुरू झाले त्या वेळची वार्षिक दर डोई उत्पन्नाची अतिनीच पातळी (त्या वर्षीच्या किंमतीमध्ये रु. २४६) लक्षात घेता आणि ही पातळी वाढविण्याच्या बाबतीत लोकशाही नियोजनावर पडणाऱ्या मर्यादा लक्षात घेता जी काही वाढ करणे जमले त्यांमध्ये उपासमार/कुपोषण कमी करण्यातले प्रत्यक्षात मिळाले तेवढेच यश बसू शकते. (१९६२ साली भारताला भेट दिलेल्या सुप्रसिद्ध पोलिश अर्थज्ञ मायकल् कालेकी यांचीही साक्ष भगवती काढतात. ते म्हणाले होते, "भारताच्या बाबतीत एक कटकटीचा मुद्दा आहे आणि तो म्हणजे इथे शोषकांची संख्या फार कमी आहे आणि शोषितांची फार आहे.")

थोडीशी याच प्रकारची, म्हणजे "परिस्थिती वाटते तितकी वाईट नाही" या प्रकारची भूमिका प्रसिद्ध अर्थज्ञ प्रा. खुसरो यांनी घेतली आहे आणि त्या भूमिकेचाही तेंडुलकरांनी पूर्वोल्लेखित लेखात चांगला समाचार घेतला आहे. खुसरो यांचा युक्तिवाद असा की, व्यक्तीच्या जीवनमानात अन्नातून मिळणाऱ्या कॅलरीज्‌खेरीज आरोग्यसेवा, शिक्षणसेवा आणि औद्योगिक क्षेत्रातील उत्पादनांचे (कापडचोपड, साबण, सिगारेटी/विडचा, करमणूक इ.) सेवनही समाविष्ट असते. या इतर सेवनात झालेल्या वाढीमुळे या संदर्भातील दारिद्रच कमी झाले आहे. आणि याची दखल न घेणे हा 'दारिद्रच-विवेचनातील दरिद्रीपणा' आहे.

वस्तुस्थिती अशी आहे की केवळ पोषणसंबंधित दारिद्र्याचे मापन करतानादेखील जी संख्याशास्त्रीय माहिती मुख्यतः वापरली जाते (राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणाने जमा केलेली माहिती) ती उपभोगखर्चासंबंधीची असते आणि त्यामध्ये अन्नधान्य सोडून बाकीच्या सेवनाच्या वस्तू येतातच. आता, आरोग्यसेवा, शिक्षण यांच्या बाबतीतील आकडेवारी पुष्कळदा या सुविधांची सरकारने केलेली 'उपलब्धता' या स्वरूपात असते आणि भारतासारख्या, प्रामुख्याने बाजारयंत्रणेवर विसंबणाऱ्या किंवा सार्वजनिक वितरणसेवा कमकुवत असणाऱ्या अर्थव्यवस्थेत उपलब्धता आणि त्या सोयींचा गरिबांना होणारा प्रत्यक्ष लाभ यात पुष्कळदा खूप तफावत पडते. हे लक्षात न घेता खुसरो यांनी वापरलेली 'दारिद्रचविवेचनातील दारिद्रच' ही शब्दयोजना म्हणजे उत्साहाने समजूतदारपणावर केलेली कुरघोडी ठरते (तेंडुलकर).

यातून निघणारा निष्कर्ष असा की 'भारताने आतापर्यंत जे काही साधले त्यामुळे परिस्थिती निश्चितच सुधारली आहे आणि ती यापेक्षा जास्त सुधारण्याच्या शक्यता भारतामध्ये मुळातच फारशा नव्हत्या' असे गंभीरपणे मानणारी भगवती, खुसरो यांच्यासारखी अर्थज्ञ मंडळी आहेत. भारताच्या आर्थिक धोरणांच्या बांधणीत त्यांचा महत्त्वाचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहभाग गेली वीस वर्षे राहिलेला आहे.

आता आपल्याला आपणच उपस्थित केलेल्या "भारत यापेक्षा निराळे काही करू शकला असता का ?" या प्रश्नाच्या होकारार्थी उत्तरामागील विचार व त्याचा खुलासा नीटपणे लक्षात घ्यायला हवा.

'दारिद्रचनिवारणाच्या बाबतीत आपण प्रत्यक्षात जे काही साधले त्यापेक्षा पुष्कळच अधिक साधू शकलो असतो' या म्हणण्यामागची विचारसरणी प्रथम संक्षेपाने अशी मांडता येईल : प्रामाणिकपणे विचार केला तर असे दिसते की, पहिल्यापासूनच भारताने स्वीकारलेली धोरणे अभिजनवादी (elitist) होती. त्यामुळे दारिद्र्याच्या समस्येची जी काही दखल घेतली गेली ती भारतातील एक 'सर्वसाधारण समस्या' अशी घेतली गेली असे न करता, समाजातील एका फार मोठ्या गटाला ग्रासणारी समस्या म्हणून जर दारिद्र्याकडे पहिल्यापासून पाहिले गेले असते तर दारिद्रचनिवारणाच्या धोरणाला एक 'तातडीचा प्रधान कार्यक्रम' असे स्थान प्राप्त झाले असते व परिणामतः आज

प्रत्यक्षात दिसते त्यापेक्षा परिस्थिती पुष्कळच वेगळी, चांगली दिसली असती.

हे समजून घेण्याचा उत्तम उपाय म्हणजे अमर्त्य सेन यांच्यासारख्यांनी गेल्या काही वर्षांत भारत, श्रीलंका, चीन, द. कोरिआ इ. देशांतील धोरणांचा तौलनिक अभ्यास करून जे महत्त्वाचे निष्कर्ष मांडले आहेत त्यांची ओळख करून घेणे. (जिज्ञासूंनी सेन यांचा रिसोर्सिस्, वॅल्यूज् अँड् डिवेलपमंट्स्, १९८४, या लेखसंग्रहातील, विशेषतः विभाग IV व V या भागांतील लेख व त्या लेखांत उल्लेखिलेले विविध संदर्भ जरूर पाहावेत. सेन यांच्या विचारांसंबंधीची माहिती गेल्या दोन वर्षांतील इलस्ट्रेटिड् वीकलीच्या किमान दोन अंकांत तरी येऊन गेल्याचे मला स्मरते.)

या ठिकाणी श्रीलंकेचा विचार आधी करणे योग्य ठरेल; कारण ते राष्ट्र साम्यवादी नसल्याने व भौगोलिकतः आपल्याच प्रदेशात येत असल्याने तुलनेतून निर्माण होणारे प्रश्न काहीसे कमी असतील. श्रीलंकेने, सर्वसाधारणपणे लोकशाही चौकटीत राहूनच, सर्वसामान्य माणसापर्यंत प्रत्यक्ष आणि परिणामकारकतेने पोहोचणारी अशी समाजसेवा योजना गेली तीन दशके राबवत आणलेली आहे. याचे काही तपशील पुढीलप्रमाणे : (i) अन्न / पोषणाच्या संदर्भात दीर्घकालीन कुपोषण कोणाचेही होणार नाही या हेतूने आखलेले, विशेषतः तांदूळ वितरण धोरण. यामध्ये शासनाने तांदळाच्या उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होऊ नये याची काळजी घेत आणि या प्रकारच्या योजना नीट राबवल्या नाहीत तर त्या खर्चिक ठरून हाताबाहेर जाऊ शकतात याचे भान ठेवून त्यांची कक्षा जे पुरेसा तांदूळ विकत घेऊ शकणार नाहीत त्यांच्यापुरतीच मर्यादित ठेवली. यामध्ये, रॅशनिंग आणि अर्थसाहाय्य (सबसिडी) देऊन कमी किंमतीला तांदूळ उपलब्ध करण्याच्या योजनांचा अंतर्भाव होतो. (१९७७ पासून उजवे पक्ष सत्तेवर आल्यावर त्यांनी फूड सबसिडी लोकसंख्येच्या खालच्या ५०% पुरतीच मर्यादित केली. १९७७ आधी लोकशाही समाजवादी सरकारांनी अधिक सढळ धोरण ठेवले होते. उदा., सर्वांना स्वस्त तांदूळ, किंवा विशिष्ट पातळीपेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्यांना काही तांदूळ अजिबात पैसे न घेता इ.) या धोरणाचा विचार करताना लक्षात ठेवायची महत्त्वाची गोष्ट अशी की, श्रीलंकेची, दर डोई उत्पन्न किंवा दर डोई अन्न उपलब्धता या संदर्भातील एकूण परिस्थिती ही साधारणपणे, भारता (किंवा पाकिस्तान) सारखीच आहे आणि तरीही तेथील शासनाने शेजारील या दोन देशांच्या मानाने काहीसे क्रांतिकारक वाटावे इतके पुरोगामी धोरण राबवत आणले आहे आणि त्यामुळे लक्षावधींच्या अर्धउपासमारीचा प्रश्नच नाहीसा करण्यात लक्षणीय यश मिळविले आहे. (ii) श्रीलंकेच्या धोरणाचा दुसरा भाग म्हणजे त्यांची प्रागतिक व उचित अशी सार्वजनिक स्वास्थ्य योजना. या योजनेची वैशिष्ट्ये म्हणजे : निम-प्रशिक्षित आरोग्य सेवकांची प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये भरती आणि त्यांना केवळ पूरक म्हणूनच क्लिनिक्स व हॉस्पिटल्स्ची यंत्रणा; प्राथमिक आरोग्य केंद्रांचा सर्वदूर विस्तार आणि त्यांमध्ये गरोदर, बाळंत अशा स्त्रियांची, अर्भकांची इ. विशेष काळजी घेण्यावर भर; मलेरियासारख्या रोगाचा बंदोबस्त करण्याच्या योजना. (iii) श्रीलंकेने शिक्षणाला फार महत्त्व दिलेले आहे परंतु त्यातही प्राथमिक शिक्षण व स्त्रीशिक्षणावर अतिशय भर दिलेला आहे. स्त्रीशिक्षणावर भर देण्याचे कारण म्हणजे योग्य आहार, रोगप्रतिबंधक स्वच्छ राहण्याच्या सवयी, परिवार नियोजन, मुलांमध्ये आरोग्यकारक सवयी रुजवणे इत्यादी गोष्टी साधण्याच्या दृष्टीने स्त्रीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे आणि या गोष्टींची पहिल्यापासून श्रीलंकेने दखल घेतली आहे.

अन्न-आरोग्य-शिक्षण या संबंधांतील वर वर्णन केलेल्या प्रागतिक धोरणाचा कोणता लाभ श्रीलंकेतील सामान्य जनतेला मिळाला या प्रश्नाचे उत्तर पुढील महत्त्वाच्या आकडेवारीतून मिळू शकेल :

वर्ष	भौतिकजीवन गुणवत्ता निर्देशांक	प्रौढ साक्षरता (%)	आयुर्मान (वर्षे)	अर्भकमृत्यू (दर हजारी)
१९२१	१९	४०	३८	१९२
१९४६	४२	५८	४८	१४१
१९५३	६४	६५	६०	७१
१९६३	७३	७२	६५	५६
१९७१	७९	७८	६७	४३

(आधार : मॉरिस्, पृ. ८४-८५)

या बोलक्या आकडेवारीने, गरीब देशसुद्धा निर्धाराने ठरवले तर सर्वसामान्य माणसासाठी काय करू शकतो हे सहज स्पष्ट होते.

आता भारताकडे वळूया. श्रीलंकेच्या पार्श्वभूमीवर जे काही ठळकपणे उठून दिसते ते म्हणजे, सामाजिक सेवांच्या बाबतीतील अतिशय कल्पनादरिद्री आणि क्षुद्र पारंपरिकतेचा वास मारणारे असे धोरण. ही पारंपरिकता भारतीय समाज आणि भारतीय राजनीतीच्या अभिजनवादाशी (एलिटिझम्) अगदी चपखल जुळते.

भारतातील अभिजन हे जरी प्रमाणाने अल्प असले तरी एकूण लोकसंख्याच ७५ कोटीच्या आसपास असल्याने संख्येने मोठे (अंदाजे ५ कोटी) आहेत. यांत फक्त थैलीवाले भांडवलशहाच येतात असे नाही तर बहुसंख्य पांढरपेशे व इतर पगारदार, दुकानदार, मध्यम-मोठे शेतकरी, शिक्षक-अकाउंटंट्स्-आर्किटेक्टस्-वकील यांच्यासारखे व्यावसायिक हे सर्व येतात. यांतील अनेकजण आंतरराष्ट्रीय पातळीवर 'गरीब'ही ठरू शकतील; परंतु भारतात ते अभिजनातच मोडतात.

या अभिजनांचाच भारतातील आर्थिक-सामाजिक ध्येयधोरणांवर प्रचंड प्रभाव आहे. (i) स्वातंत्र्योत्तर काळात या अभिजनांच्या निर्वाचित प्रतिनिधींनी दुष्काळात पूर्वीसारखे भूकबळी पडणार नाहीत अशी धोरणे निश्चितच स्वीकारली (आणि ही जमेची बाजू म्हणून आपण मांडली आहे); परंतु याच अभिजन-प्रतिनिधींनी संथ, शांत दीर्घकालीन उपासमार, दारिद्रय, प्रचंड निरक्षरता यांच्या संबंधात तातडीचे युद्धपातळीवरील असे उपाय योजण्याबाबत अक्षम्य बेफिकिरी दाखविली. याचे कारण काय असू शकेल? भारतातील बहुसंख्य हिंदू समाजातील व्यक्तींच्या मनावरील उतरंड-प्रधान विषमतामूलक अशा जीवनसरणीचा असलेला प्रभाव आणि सर्व राजकीय पक्षांतील, कामगारसंघटनांतील नेतेमंडळी अभिजनांच्या कुटुंबांतूनच आलेली असणे या दोन गोष्टींमध्ये या प्रश्नाचा खुलासा होऊ शकतो. अशा मंडळींच्या हातीच प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सत्ता असल्याने एका विशिष्ट मर्यादेपलीकडे सर्वसामान्य माणसाच्या हिताची पर्वा न दाखविणारे आणि एकंदरीत आपल्याच पोळीवर तूप ओढून घेणारे आर्थिक धोरण वर्षानुवर्षे स्वीकारले जाणे यात फारसे आश्चर्य नाही. यामुळेच आपले अन्न-वितरण धोरण अत्यंत पारंपरिक राहिले. या देशात कोणत्याही कारणानी कोणीही अर्धपोटी राहाणार नाही असा निर्धार आपण करू शकलो नाही. रोजगार हमी योजनेसारखी योजनादेखील राबवायला सातवे दशक उजाडावे लागले. (ii) आपली आरोग्यव्यवस्थादेखील मुख्यत: शहरी, डॉक्टरधार्जिणी, औषध–कंपन्याधार्जिणी अशी राहिली. नियोजनाच्या पस्तीस वर्षांनंतरदेखील एकूण पाच लाख खेडेगावांपैकी अजून चाळीस हजारांवर खेड्यांना निर्धोक खात्रीचा बारमाही पाण्याचा पुरवठा आपण करू शकलेलो नाही आयडीन, लोह, 'अ' जीवनसत्त्व यांचा आहारातील अभाव आणि त्यामुळे फार मोठ्या प्रमाणावर आढळणारे गलगंड (गॉय्टर) अॅनीमिअ (पंडुरोग), अंधत्व या रोगांचे सहज होऊ शकणारे उच्चाटण यांना आपण तातडीचा अग्रक्रम द्यावयाचे ठरवू शकलो नाही. क्षय, महारोग, आतड्यांचे व फुप्फुसाचे विकार हे मोठ्या प्रमाणावर असूनदेखील त्यांना लागणारी औषधे मुबलक प्रमाणावर उत्पादून वाजवी किंमतींना ती जनतेला उपलब्ध करून देण्याचे जनहितवादी औषधधोरण आपण अजूनही ठरवू शकलेलो नाही (या बाबतीत बांगलादेशानेही आपल्यावर आघाडी मारल्याचे सर्वश्रुत आहे). बहुराष्ट्रीय कंपन्यांना, फक्त अभिजनांना लागणारी (व न लागणारीही) फॅन्सी औषधे-टॉनिके निर्माण करण्याची मुभा देऊन साधनसामग्रीचा दुरुपयोग मात्र आपण सतत चालू दिला आहे. (iii) स्वातंत्र्योत्तर काळात भारतात शिक्षणाचा झपाट्याने विस्तार झाला आणि पूर्वीच नमूद केल्याप्रमाणे न्यूक्लिअर शास्त्रज्ञ, एंजिनिअर्स–तंत्रज्ञ यांच्या प्रशिक्षणात नेत्रदीपक कामगिरी बजावली. परंतु हे सर्व घडत असताना प्रौढ साक्षरता, प्राथमिक शिक्षण, स्त्रीशिक्षण या अग्रक्रमाच्या गोष्टींकडे अक्षम्य दुर्लक्ष केले गेले. त्यामुळे २० ते २४ वर्षांच्या वयोगटातील ८% व्यक्ती उच्च शिक्षण घेतात ही गोष्ट अभिमानाची ठरत नाही; तर तो एक प्रमाद ठरतो. श्रीलंका व चीनमध्ये हेच प्रमाण केवळ १% आहे. यावरून

त्यांच्या शिक्षणयोजनेमधील अग्रक्रम व खरी समाजाभिमुखता स्पष्ट होते. व आपल्या धोरणातील अभिजनवाद अधोरेखित होतो.

पोषण–आरोग्य–शिक्षण या अतिमहत्त्वाच्या क्षेत्रांतील आपल्या अशा प्रकारच्या उच्चभ्रू धोरणाचे परिणाम पुढील आकडेवारीत दिसून येतात. ही आकडेवारी श्रीलंकेच्या आधी दिलेल्या आकडेवारीशी तोलून पाहावी.

वर्ष	भौतिकजीवन गुणवत्ता निर्देशांक	साक्षरता (%)	आयुर्मान (वर्षे)	अर्भकमृत्यू (दर हजारी)
१९२१	५	७	३१	१७४
१९५१	२६	१७	४७	१४६
१९६१	३७	२४	५८	१४६
१९७१	४५	५७	४८	१४०

(आधार : मॉरिस, पृ. ८४–८५)

तेव्हा श्रीलंका व भारत यांच्या धोरणांतील फरकांचे परिणाम स्पष्ट आहेत. श्रीलंकेतील वैशिष्टचपूर्ण धोरणांमुळे तेथील १९८० मधील जन्मदर व मृत्युदर (दर हजारी) अनुक्रमे २५ व ७.७ होते तर भारतात याच संख्या अनुक्रमे ३६ व १३.६ अशा होत्या. वरीलपैकी अनेक बाबतीत श्रीलंकेचे आकडे पश्चिमेकडच्या सधन 'विकसित' देशांशी जवळीक साधणारे आहेत आणि तेसुद्धा श्रीलंकेचा समावेश दर डोई उत्पन्नाच्या निकषानुसार न्यूनविकसित दरिद्री देशांच्या गटात— तिसऱ्या जगतात— होत असूनसुद्धा. म्हणजे, भौतिक जीवन गुणवत्ता निर्देशांकाची संकल्पना अभ्यासत असताना आपण जो एक मुद्दा मांडला होता, तो आता तपशिलात सिद्ध झाला. तो म्हणजे या (अधिक अर्थपूर्ण अशा) निकषानुसार 'विकसित' ठरण्यासाठी श्रीमंत असण्याची राष्ट्राला आवश्यकता नाही. फक्त राष्ट्राने अधिक न्यायपूर्ण धोरणे आखली व राबवली मात्र पाहिजेत. हा भारताने लंकेकडून शिकण्याचा महत्त्वाचा धडा आहे.

(IV) आता आपल्याला भारतातील 'उच्चभ्रू' धोरणाची जी थोडी निराळी, अतिशय महत्त्वाची बाजू लक्षात घ्यायची आहे ती म्हणजे पुरुषधार्जिणेपणा.

आपण स्त्री-पुरुष समानता हे एक महत्त्वाचे नैतिक तत्त्व म्हणून मानतो आणि त्यामुळेच या समानतेला विकासाचे एक सर्वसामान्य लक्षण म्हणून महत्त्व प्राप्त होते. परंतु अधिक म्हणजे, आरोग्यदायक सवयींचा प्रसार, मुलांच्या शिक्षणाचा प्रसार, परिवार नियोजन व लोकसंख्या नियंत्रण या 'विकास'प्रक्रियेच्या अतिशय महत्त्वाच्या संदर्भात स्त्रीचे कुटुंबातील व एकूण समाजातील स्थान व तिला मिळणारी वागणूक यांना एक नवे आगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. स्त्रीच्या बाजूने शक्य झाले तर पारडे अधिक झुकणे ('more than equal') होणे आवश्यक मानले जात आहे.

एका अर्थाने तर, स्त्री पुरुषापेक्षा श्रेष्ठ असल्याचे जीवशास्त्र व अनुवंशशास्त्रदृष्ट्या आता सिद्धही झाले आहे. त्यामुळे सामाजिक संस्था पक्षपाती नसतील तर, सामान्यत: स्त्रियांमध्ये आयुर्मान जास्त व अर्भकमृत्यु-प्रमाण कमी असे आढळते. त्यामुळे ज्या ७३ देशांसाठी स्त्री-पुरुषांसाठी स्वतंत्रत: भौतिक जीवन गुणवत्ता निर्देशांक उपलब्ध आहे, त्यांपैकी २८ देश सोडता इतर सगळ्यांत स्त्री-निर्देशांक पुरुष-निर्देशांकापेक्षा जास्त आहे आणि ते नैसर्गिकच आहे. या २८ पैकी १८ देशांत मात्र स्त्री-निर्देशांक पुरुष-निर्देशांकापेक्षा लक्षणीयत: कमी आहे. या १८ मधील बहुसंख्य देशांत स्त्रिया पुरुषांच्या मागे पडण्याचे मुख्य कारण कमी साक्षरता हे आहे आणि साक्षरता हा सांस्कृतिक घटकांनी ठरणारा चल आहे.

या १८ देशांमध्ये भारत व श्रीलंका हे दोन्ही देश होते; परंतु भारतातील परिस्थिती वैशिष्ट्यपूर्ण होती. ही वैशिष्ट्यपूर्णता लक्षात येण्यासाठी भारत व श्रीलंका यांची माहिती पृ. १२६ वर लागोपाठ घेतली आहे.

या माहितीतून अनेक गोष्टी स्पष्ट होतात. त्यांतील महत्त्वाच्या अशा :

(अ) दोन्ही देशांत जरी स्त्रिया पुरुषांच्या मागे आहेत तरी श्रीलंकेत दोघांच्यातील फरक उत्तरोत्तर कमी होतो कारण स्त्रियांची प्रगती पुरुषांच्या प्रगतीपेक्षा वेगवान आहे. भारतातील परिस्थिती याच्या अगदी विरुद्ध आहे. म्हणजे भारतीय स्त्रीच्या जीवनाची भौतिक गुणवत्ता जरी केवलदृष्ट्या सुधारली असली तरी पुरुषांच्या **तुलनेत** ती

	वर्ष	भौतिक जीवन गुणवत्ता निर्देशांक एकूण	स्त्री	पुरुष	फरक (स्त्री वजा पुरुष)	आयुर्मान निर्देशांक स्त्री	पुरुष	अर्भक मृत्यू निर्देशांक स्त्री	पुरुष	साक्षरता निर्देशांक स्त्री	पुरुष
भारत	१९४९	१४	१०	१७	– ७	–२	३	२४	१८	८	२९
	१९५९	३०	२५	३४	– ९	२१	२७	३१	३४	१३	४२
	१९७०	४०	३५	४५	–१०	४२	४४	४१	४४	२२	४५
श्रीलंका	१९५३	६५	६०	७०	–१०	५२	६०	७४	६९	५३	८१
	१९६३	७५	७२	७८	– ६	७२	७३	८१	७७	६४	८६
	१९६९	८०	७८	८२	– ४	७९	७५	८४	८०	७२	८९

(आधार : मॉरिस, पृ. ४८.)

सूचना : उजवीकडील भागातील आकडे कच्च्या माहितीचे नसून निर्देशांकांच्या स्वरूपातील आहेत.

खालावली आहे. हा एका अत्यंत महत्त्वाच्या दृष्टीने ऋणविकास आहे. म्हणजे विकासाच्या फळातील वाढता वाटा विशेषत: दुर्बल घटकांतील कुटुंबांमध्ये भारतीय पुरुषाने हडप केला आहे.

(आ) उजव्या भागातील घटक-तपशील पाहिला तर काय दिसते ? श्रीलंकेमध्ये आयुर्मानात स्त्रिया मागून येऊन पुरुषांच्या पुढे गेल्या तर भारतीय स्त्रिया मात्र पुरुषांच्या मागेच आहेत; अर्भक-मृत्यूंच्या बाबतीत, लंकेतील स्त्रिया पुरुषांपेक्षा सतत पुढे आहेत आणि भारतातही हे श्रेष्ठत्व सुरुवातीला होते, परंतु विकासप्रक्रियेचा परिणाम म्हणून (?) हे अंगीभूत श्रेष्ठत्वही स्त्रियांनी शेवटी गमावले; साक्षरतेच्या बाबतीतही श्रीलंकेत स्त्रियांची सतत सापेक्ष प्रगती दिसते तर भारतीय स्त्रियांची मात्र सापेक्ष पीछेहाट दिसते.

(इ) श्रीलंका (व इतर १६ देशांशी) तुलना केल्यास जी एक अद्भूत गोष्ट नजरेला येते ती अशी की, भारत हा एकमेव देश असा आहे की, जेथील स्त्रिया केवळ साक्षरतेतच नव्हे तर बाकीच्याही दोन्ही (अशा एकूण तिन्ही) बाबतीत १९७१ साली पुरुषांच्यापेक्षा हीणकस गुणवत्तेचे भौतिक जीवन जगत होत्या !

या साऱ्या माहितीवरून भारतीय 'विकास'-प्रक्रियेतील एक काळी बाजू उघडकीला येते. मर्त्य सेन यांनी १९७८ सालच्या प. बंगालमधील पुराच्या वेळेला केलेल्या एका पाहणीनुसार पाचपेक्षा कमी वर्षे वय असलेल्या बालकांमध्येदेखील मुलींचे कुपोषण मुलग्यांपेक्षा ६०% नी जास्त होते. सापेक्ष-दृष्ट्या भारतीय स्त्रीचे खालावत चाललेले जीवन-मान आपल्याला सगळ्यात प्रकर्षाने कशात प्रतिबिंबित झालेले दिसते तर स्त्री-पुरुष प्रमाणात. आफ्रिकेतील 'मागास' देशातसुद्धा जे दिसत नाही ते अभूतपूर्व भारतात घडले आहे आणि ते म्हणजे १९०१ मध्ये स्त्री-पुरुष प्रमाण जे ९७·२% होते ते १९८१ मध्ये ९३·५% वर घसरले होते. या क्षेत्रात कदाचित भारताचा पहिला नंबर लागेल परंतु तो शेवटून पहिला असण्याचे ते अपश्रेय असेल! या निष्कर्षाला पुष्टी देणारे असे विश्लेषण एप्रिल १९८६ च्या इकनॉमिक् टाइम्स् मध्ये आले आहे. त्यामध्ये, अर्चना ढोलाकिया यांनी भौतिक जीवन गुणवत्ता निर्देशांकाच्या प्रकारचे परंतु थोडे वेगळे घटक घेऊन पुरुष-कल्याण निर्देशांक (Men's Welfare Index) व स्त्री-कल्याण निर्देशांक या संकल्पना मांडून काही आकडेवारी दिली आहे. त्यानुसारही (चालू दशकाच्या सुरुवातीच्या काल-खंडात), पुरुष-कल्याण निर्देशांक ६१·७० तर स्त्री-कल्याण निर्देशांक ४६·७७ भरतो.

मॉरिस यांच्या ग्रंथात भारतातील १२ राज्यां-साठी सत्तरीच्या सुरुवातीची भौतिक जीवन गुणवत्ता निर्देशांकविषयक माहिती आढळते. त्यातील एक अत्यंत दिलासाजनक निष्कर्ष असा की, या निर्देशां-काच्या दृष्टीने केरळ हे अग्रेसर राज्य होते; परंतु केरळचे प्रतिमाणशी उत्पन्न अखिल भारतीय सरा-सरी दर डोई उत्पन्नापेक्षाही कमी होते. म्हणजेच

आंतराज्यीय पातळीवरसुद्धा भौतिक जीवनाच्या गुणवत्तेच्या दृष्टीने श्रीमंत असणे महत्त्वाचे नाही. बरोबर याच प्रकारचा निष्कर्ष उपरोल्लेखित ढोलाकिया यांनाही मिळालेला आहे यात आता आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. केरळमधील मातृसत्ताक कुटुंबव्यवस्था, थोडे निराळ्या प्रकारचे जमीनविषयक कायदे, शिक्षणाची दीर्घ परंपरा इ. गोष्टींमध्ये या फरकांचा खुलासा असू शकेल.

या निर्देशांकानुसार राज्यांचा चढता क्रम लावला तर तो उ. प्रदेश. (२५), राजस्थान (३३), आसाम (३७), म. प्रदेश (३७), ओरिसा (३७), गुजरात (४०) अखिल भारत सरासरी (४०), आंध्र (४३), तमिळनाडू (४६), कर्नाटक (४८), महाराष्ट्र (४९), पंजाब (५०) व केरळ (७०) असा दिसतो. यांतील उत्तर व दक्षिण भारतातील राज्ये असा जो एक ढोबळ भेद दिसतो त्यासंबंधीचे काही सूचक खुलासे मॉरिस यांनी मांडले आहेत ते जिज्ञासूंनी मुळातून वाचण्यासारखे आहेत.

भारताची तुलना आपण आतापर्यंत मुख्यतः श्रीलंकेशी करत आलो. परंतु चीनही तितकाच महत्त्वाचा आहे. १९४९ साली साम्यवादी व्यवस्था आणल्यावर माओला अत्यंत परिणामकारकपणे क्रांतिपूर्व चीनमधील अभिजनसत्ता (विशेषतः ग्रामीण भागातील) मोडून काढता आली आणि पोषण, आरोग्य व शिक्षण या क्षेत्रांत सामान्य माणसाचा वेगाने लाभ होईल अशी धोरणे आखता आली. त्यामुळे एवढी प्रचंड लोकसंख्या असूनही दीर्घकालीन कुपोषण चीनमध्ये अजिबात नाही व आयुर्मान ६९ वर्षे, अर्भकमृत्युप्रमाण ५६, साक्षरता ६०% व भौतिक जीवन गुणवत्ता निर्देशांक ७० अशी स्पृहणीय परिस्थिती आहे. प्रचंड आकाराचा गरीब देश योग्य अग्रक्रम ठरवला तर काय करू शकतो याचे हे एक उत्तम उदाहरण आहे. चीनने आज आपले जन्मदर व मृत्युदरही अनु. २० व ६.७ या पातळीवर आणून लोकसंख्या नियंत्रणात मोठे यश मिळवले आहे. (चीनच्या चिकित्सेसाठी भगवतींचा लेख, पृ. ४३, पाहावा.)

अर्थात चीनच्या बाबतीत असलेला थोडा वेगळेपणाही लक्षात घेणे आवश्यक आहे. एक म्हणजे, चीनच्या भौतिक जीवनाची गुणवत्ता सुधारत असताना त्याच्या दर डोई उत्पन्नाच्या वाढीचा वेगही चांगला होता. असे म्हणता येईल की, चीनने गंभीरपणे आखलेल्या समाजवादी नियोजनाच्या माध्यमातून, आर्थिक वृद्धीला योग्य अशी दिशा देऊन लोकांच्या जीवनमानाची गुणवत्ताही वाढवली. दुसरे म्हणजे, पोषण–आरोग्य–शिक्षण यांसंबंधीची बरीचशी श्रीलंकेसारखीच असलेली धोरणे चीनला परिणामकारकरीत्या एवढ्या प्रचंड प्रमाणावर राबवता आली. यामध्ये तेथील साम्यवादी राजवटीचा, माओच्या नेतृत्वाचा, सांस्कृतिक क्रांतीसारख्या प्रयोगांचा मोठा वाटा आहे. या गोष्टींमुळे चिनी जनतेला जी किंमत मोजावी लागली (हत्या, छळ, सक्तीची श्रमशिबिरे, विद्यापीठे व ग्रंथालये यांची नासधूस, जाळपोळ इ.) तीही दुर्लक्षून चालणार नाही. विशेषतः चीन व भारत यांची तुलना करताना असे म्हणावे लागेल की, जी भारतीय जनता येथील अभिजनवादी धोरणे दीर्घकाळ निमूटपणे सहन करते तीच जनता तिच्या राजकीय नागरिक स्वातंत्र्याचा संकोच थोडा काळही सहन करत नाही. तेव्हा, अभिजनवाद + राजकीय लोकशाही हे मिश्रण भारतीयांना पसंत दिसते ! दुसरे असे की, नुकत्या-नुकत्याच (माओच्या मृत्यूनंतर) प्रकाशात येऊ लागलेल्या माहितीनुसार, चीनने जरी दीर्घकालीन कुपोषणाचा प्रश्न सोडवण्यात लक्षणीय यश मिळवले असले तरी अल्पकालीन एकदम निर्माण होणारी दुष्काळजन्य उपासमार व भूकबळींची समस्या सोडवण्यात तेथील सरकार तितकी सहवेदना म्हणा, तत्परता म्हणा, कार्यक्षमता म्हणा दाखवू शकत नाही असे दिसते. १९५९ ते १९६१ या कालखंडातील दुष्काळामुळे चीनमध्ये मेलेल्या लोकांची संख्या सरकारी आकडेवारीनुसारच १६.५ दशलक्ष इतकी आहे. हे पक्क्या समाजवादी, क्रांतिकारी चीनमध्ये घडू शकले आणि अशा घटना टाळण्यात अभिजनवादी-परंपरावादी स्वातंत्र्योत्तर भारत यशस्वी होऊ शकला हा फरकही राजकीय दृष्टीने महत्त्वाचा आहे. कारण राजकीय स्वातंत्र्य असलेल्या भारतात भूकबळी झाल्यास वृत्तपत्रांकडून, विरोधी पक्षांकडून गदारोळ माजू शकतो आणि सरकारला कृती करणे भाग पडते; तर याउलट, विरोधी पक्ष नसलेल्या चिनी व्यवस्थेत १६.५ दशलक्ष भूकबळींची बातमी

अनुक्रमणिका

जवळजवळ २० वर्षे दडपून ठेवता येते. सोविएत रशियामधील तिसऱ्या दशकातील परिस्थिती व कांपुचियातील अलीकडील परिस्थितीही अशा प्रकाऱ्च्याच आहेत. त्यामुळे, गरीब राष्ट्रांच्या संदर्भात 'भाकरी की स्वातंत्र्य' अशी स्पष्ट काळी–पांढरी निवड उपलब्ध नाही तर 'वर्षानुवर्ष अपुरी भाकरी + बरेचसे स्वातंत्र्य' (भारत), 'सर्वसाधारण परिस्थितीतच पुरेशी भाकरी + फारच कमी स्वातंत्र्य' (चीन), 'पुरेशी भाकरी + तमिळ सोडून बाकीच्यांना पुरेसे स्वातंत्र्य' (श्रीलंका) अशा कमीअधिक राखाडी रंगातले पर्यायच उपलब्ध दिसतात आणि या पर्यायांतून अंतिम निवड करणे हा कठीण मूल्य-प्रश्न आहे हे मान्य करायलाच हवे.

IV

'न्यायासकट वृद्धी' म्हणजेच 'पुर्नवितरणासकट वृद्धी' (growth with redistribution) या सत्तरीमध्ये आकारास आलेल्या भूमिकेनुसार, भारतीय अर्थव्यवस्थेचे अपयश हे आर्थिक धोरणांच्या अभिजनवादी वळणामध्ये कसे सामावलेले आहे हे आपण थोड्याफार तपशीलवारपणे पाहिले. आता या रोगनिदानानुसार प्रत्यक्ष कृतीमध्ये कोणत्या गोष्टींचा अंतर्भाव करावा लागेल हे थोडक्यात पाहणे आवश्यक ठरेल. कारण त्या पार्श्वभूमीवरच राजीव गांधींच्या आर्थिक धोरणांना येत असलेली आक्षेपात्मक प्रतिक्रिया समजून घेता येते.

या प्रकारच्या धोरणाचा पुरस्कार गुनार मिर्दाल् हे सुप्रसिद्ध विचारवंत तसेच इर्मा अॅडल्मन् व सिंथिआ मॉरिस् तसेच हॉलिस चेनरी–मॉंतेक अलुवालिया–क्लाइव् बेल्–जॉन् ड्युलॉय्–रिचर्ड जो या पाश्चात्त्यांच्या लेखनांत आणि कमी-अधिक प्रमाणात डावीकडे झुकणाऱ्या पुढील भारतीयांच्या लेखनात दिसतो. उदा. : अमर्त्य सेन, सुरेश तेंडुलकर, मिन्हास, प्रमित चौधरी, सी. टी. कुरिअन् प्रणव बर्धन इत्यादी. या विश्लेषकांव्यतिरिक्त, जयप्रकाश नारायण यांच्यासारख्या कृतिशील विचारवंताचा उल्लेखदेखील या भूमिकेच्या संदर्भात करणे आवश्यक आहे.

'पुर्नवितरणासकट वृद्धी' या शब्दप्रयोगाच्या अनेक अर्थच्छटा संभवतात हे मात्र लक्षात घेणे आवश्यक आहे. मिर्दाल् व इतर पाश्चात्त्य विश्लेषक हे कोणत्याही वृद्धिआधीच जमीन इ. संपत्तीच्या पुर्नवितरणापासून सुरुवात करणे आवश्यक आहे (distribution before growth) असे मानतात; कारण त्यांच्या मते तसे जर केले नाही तर त्याचा अर्थ विषमताजन्य प्रवृत्ती भविष्यकाळात वृद्धिप्रक्रियेबरोबरच फोफावत राहाण्याची व्यवस्थाच केल्यासारखे होते. परंतु 'वृद्धीचा थोडा कमी दर पत्करून पुर्नवितरण' अशी एक आणि 'पुर्नवितरणाकडे दुर्लक्ष न करता वृद्धी' अशीही एक (सौम्यतम) अर्थच्छटा होऊ शकते. भारतीय विश्लेषकांनी साधारणपणे त्यांच्या राजकीय झुकावानुसार या अर्थच्छटांपैकी एकीची (अथवा त्यांच्या मिश्रणाची) निवड केलेली दिसते. भारताच्या नियोजन आयोगाने चौथ्या पंचवार्षिक योजनेमध्ये (१९६९–७४) प्रथमच छोटे व सीमांत शेतकरी, शेतमजूर, दलित यांसारख्या लक्ष्य-गटांकडे विशेष लक्ष पुरवण्यास सुरवात केली. (परंतु प्रत्यक्षात काही केले नाही.) पांचव्या योजनेमध्ये आरोग्य, शिक्षण, पिण्याचे पाणी या सार्वजनिक सेवा गरिबांच्या 'किमान गरजां'च्या पूर्तीसाठी काही तरतूद करण्यात आली. परंतु गरिबी निवारणासाठी व सामाजिक न्यायासाठी खरा उपाय म्हणजे रोजगारातील वाढच आणि यासाठी काही प्रमाणात कमी वेगाची वृद्धी स्वीकारावी लागेल याचे स्पष्ट भान आपल्याला जे प्रथमतः दिसते, ते जनता सरकारने आखलेल्या सहाव्या योजनेच्या मसुद्यात (१९७८–८३). रोजगाराभिमुख अशा या संकल्पित योजनेमध्ये किमान-गरजा कार्यक्रम व लक्ष्य-गट कार्यक्रमांच्या जोडीला पुढील महत्त्वाच्या कार्यक्रमांची जोड देण्यात आली होती : कमाल वेगाने जलसिंचनाची वाढ, भू-सुधारणांची त्वरित अमलबजावणी (वरकड जमिनींचे भूमिहीनांमध्ये वाटप इ.), जनतेला लागणाऱ्या उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनासाठी श्रम-सघन तांत्रिकीला प्राधान्य, ग्रामीण भागात सार्वजनिक सुविधा व आधारभूत संरचना (रस्ते, मृद्संधारण, पाझर तलाव इ.) यांच्यातील सार्वजनिक गुंतवणुकीत वाढ इ.

उत्पन्नवाढीमुळे होणाऱ्या लाभात गरिबांचा वाटा किती राहील या महत्त्वाच्या प्रश्नाची चर्चा सहाव्या योजनेच्या (१९७८–८३) मसुद्यात आहे. एकूण

लाभातील किती भाग समाजातील दुर्बल घटकांना आपल्याकडे वळवता येईल हे दोन गोष्टींवर अवलंबून राहील असे हा मसुदा सुचवतो. या दोन गोष्टी म्हणजे, समतापोषक धोरणे प्रत्यक्ष कारवाईत उतरवण्याच्या संदर्भात सरकार किती समर्थ (किंवा असमर्थ) ठरेल हे एक आणि दुसरे म्हणजे या धोरणांमुळे ज्यांचे लाभ काही प्रमाणात कमी होतील त्यांचा विरोध. तेव्हा या दोन अडचणींचा मुकाबला करण्यात गरीबच किती यशस्वी होतील ही गोष्ट पुनर्वितरणात्मक (समतापोषक) धोरणांच्या यशाची निर्धारक अट असेल. प्रत्यक्षात कसे करायचे याविषयी योजनेचा मसुदा जरी मुग्ध असला तरी वरील मुद्दा ज्यांना लाभ मिळू शकतील अशा गरिबांचे संघटण या कामासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे; याचे कारण असे की, सध्याची सामाजिक–आर्थिक संस्थांची चौकट लक्षात घेता, शासनाला केवळ स्वतःच्या हिंमतीवर वृद्धिजन्य लाभ गरिबांपर्यंत प्रत्यक्षात पोहोचविता येणार नाहीत, त्यासाठी गरिबांकडूनच दबाव निर्माण व्हावा लागेल व गरिबांचे हात बळकट करावे लागतील या वस्तुस्थितीची या मुद्द्यामध्ये सरकारने स्वत: होऊन प्रथमच दिलेली प्रामाणिक आणि स्पष्ट कबुली आहे. यामुळेच, गरिबांच्या राजकीय जाणिवा तीव्र करण्याच्या दृष्टीने (कॉन्शंटायझेशन्) महत्त्वाचा असा 'राष्ट्रीय प्रौढ साक्षरता कार्यक्रम' या तर्जुम्यात समाविष्ट केलेला आपल्याला दिसतो. जनतासरकार कोलमडल्यावर १९८० साली इंदिरा काँग्रेस सरकारने जी नवी सहावी योजना (१९८०–८५) कार्यान्वित केली, तीमध्ये हा सगळा प्रामाणिकपणा बाजूला पडला, गरिबांच्या संघटित दबावाच्या आवश्यकतेची जाणीव विरून गेली आणि त्या ठिकाणी 'लोकांचा सहभाग' ही गुळमुळित भाषा आली.

या सगळ्या पार्श्वभूमीवर, 'सेमिनार' मधील पूर्वोक्त लेखामध्ये सुरेश तेंडुलकरांनी केलेले विश्लेषण भविष्यकाळाबद्दल अंदाज बांधण्याच्या दृष्टीने फार उद्बोधक वाटते. 'पुनर्वितरणासकट वृद्धी' या एकूण भूमिकेचे ते प्रातिनिधिक विवेचन आहे अशी प्रस्तुत लेखकाची धारणा असल्याने त्याचा सारांश इथे मांडणे उचित होईल.

दरिद्री जनतेचे दोन भाग कल्पिता येतील. एक, सातत्याने गरिबीत असणाऱ्यांचा आणि दुसरा, काही काळच दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्यांचा. भारतातील शहरी–ग्रामीण भागात एकदम पडणारा फरक, जातिसंस्थेने भिनलेली सामाजिक फुटीरता, एका बाजूला पाश्चिमात्य संस्कृतीशी जवळचे नाते सांगणारी अवकाशयुगीत उच्च–तांत्रिकी–विभूषित 'विकसित' संपन्नतेची बेटे तर दुसरीकडे अत्यंत 'अप्रगत' जुनाट तंत्रांचा वापर करणारा 'बैलगाडी युगातला' समाज अशी तांत्रिक–आर्थिक दुफळी (ड्युॲलिझम्), एका बाजूला जवळजवळ सगळी राजकीय आर्थिक निर्णयशक्तीची मक्तेदारी असलेले अभिजनगट तर दुसऱ्या बाजूला सोशिकपणे सगळे स्वीकारून निमूटपणे सारे काही सहन करीत असाहाय्यपणे जगत राहणारा बहुसंख्य समाज— अशी विरोधाभासपूर्ण परिस्थिती भारतात असल्यामुळे आणि त्यात राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाढीचा वेगही एकूण मंदच राहिल्यामुळे, एकूण दरिद्री जनतेतील सर्वांत खालचे ४/५ हे सतत गरीब व १/५ अल्पकाळापुरते गरीब असे असावेत. अल्पकाळापुरते दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्यांना अर्थसाहाय्य दिले की ते एकूण वृद्धिप्रक्रियेमध्ये दारिद्र्यरेषेच्या वर उचलले जाऊ शकतात. (याच लोकांना पाहून साधारणत: असे अनुदार उद्गार काढले जातात की, "भारतात खरोखरच गरिबी जर इतकी असेल तर हा कालचा फाटका माणूस आज असा राहूच कसा शकेल ?") परंतु 'सतत गरीब' या प्रकारात मोडणारी कुटुंबे मात्र एकूण वृद्धिप्रक्रियेच्याच इतकी बाहेर राहतात की, त्यांना एखाद्या वेळेला दिलेले अर्थसाहाय्य दारिद्र्यरेषेच्या वर ढकलण्यास अपुरे पडते; कारण त्यांच्याजवळ अपुऱ्या पोषणामधून कशीबशी टिकून राहिलेली निकृष्ट श्रमशक्ती सोडून दुसरे कोणतेच उत्पादक साधन नसते. (या संदर्भात, 'सद्गती', दामुल', 'पार' इ. चित्रपटांतील दलित पात्रे हमखास आठवतात.)

सतत दरिद्री असणाऱ्यांचे प्रचंड मोठे प्रमाण व संख्या लक्षात घेता आणि आपला कूर्मगती वृद्धिवेग लक्षात घेता, वृद्धिप्रक्रियेवर दारिद्र्य निर्मूलनासाठी अवलंबून राहणे अन्याय्य, अनुचित ठरते आणि म्हणून पुनर्वितरणाच्या धोरणांना विशेष

महत्त्व प्राप्त होते. परंतु इथे दोन कटकटीचे मुद्दे लक्षात घ्यावे लागतात :

(i) पुनर्वितरणाचे धोरण स्वीकारणे म्हणजे सधनांनी खुषीने किंवा सक्तिपूर्वक त्याग पत्करणे हे आलेच. दारिद्र्याचे प्रमाण प्रत्यक्षात जितके जास्त व दारिद्र्य निवारण करण्याचा कालावधी जितका कमी, तितका हा त्याग जास्त असावा लागेल व या त्यागाचा बोजा कमी उत्पन्नाच्या अ–गरीब कुटुंबांवर जितका जास्त प्रमाणात पडेल तितका या पुनर्वितरणाच्या कार्यक्रमाला जास्त तीव्र विरोध होईल.

(ii) शिवाय, उत्पन्नाचे व संपत्तीचे हे हस्तांतरण 'एकदाचेच' असून भागणार नाही तर, दरिद्री कुटुंबांमध्ये स्वयंनिर्वाहिता किंवा जीवनक्षमता (viability) निर्माण होण्याच्या दृष्टीने आवश्यक अशी सुधारित उत्पादन व वितरण व्यवस्था हळूहळू निर्माण व्हावी लागेल. इथेही परत असे लक्षात घ्यावे लागेल की, दारिद्र्याचे प्रमाण जितके जास्त व जितक्या कमी वेळात दारिद्र्यनिवारण साधायचे असेल तितकी उत्पादन–वितरण यंत्रणेतील सुधारणा ही अधिक परिणामकारक असावी लागेल.

तेव्हा पुनर्वितरणात्मक धोरणे जर गंभीरपणे राबवायची असतील तर, सर्वसाधारणपणे आतापर्यंत प्रत्यक्षात राबविलेल्या बहुतांश वृद्धिप्रधान धोरणांपेक्षा पुष्कळ जास्त तीव्र अशी हितसंबंधांच्या संघर्षाची परिस्थिती पत्करण्याची तयारी ठेवावी लागेल. सर्व राजकीय पक्षांपुढे जे सर्वांत कठीण आव्हान उभे राहील ते पुढीलप्रमाणे मांडता येईल : या संघर्षाविषयीचा अंदाज बांधण्यातील अडचणी, त्यांचे नियंत्रण–निरसन करण्यातील अडचणी व हे सारे करताना लोकशाहीच्या चौकटीबाहेर जाण्याचा मोह होण्याची शक्यता. हा संपूर्ण प्रश्नच खरोखर राजकीय पातळीवरचा प्रश्न असून त्याची सोडवणूक राजकीय प्रक्रियांमधूनच होऊ शकते. हा प्रश्न सोडवण्यातले यश हे पुरोगामी सामाजिक आणि राजकीय शक्तींची उभारणी, त्यांचे संघटण आणि सत्तारूढ पक्षाचा/पक्षांचा पुनर्वितरणात्मक धोरणांना असलेला सच्चा व सक्रिय पाठिंबा या गोष्टींवरच अवलंबून राहील. (खऱ्या अर्थाने 'राजकीय निर्धारा'ची संकल्पना ती हीच.) हे यश मिळवण्यासाठी ज्या आणखी अटी पूर्ण व्हाव्या लागतील त्या म्हणजे : राज्य–जिल्हा–गट–तालुका–खेडे या पातळ्यांवरील राजकीय संस्थांची निकोपता, भौगोलिकदृष्ट्या विखुरलेल्या गरीब कुटुंबांपर्यंत पोहोचण्यासाठी आवश्यक अशी शासनयंत्रणा आणि जेणेकरून गरिबांचे उत्पन्न वाढेल आणि ती वाढ टिकून राहील अशा पद्धतीने उत्पादन व उत्पादकता वाढविण्यास आवश्यक अशा नव्या तांत्रिकीची निर्मिती किंवा जुन्या तंत्रामध्ये आवश्यक ते बदल घडवून आणण्यास लागणारी उपक्रमशीलता.

हे साधण्यासाठी प्रथम कोणत्या गोष्टी कराव्या लागतील तर (i) सहाव्या दशकाच्या मध्यापासून विश्वासार्हताच गमावून बसलेली नियोजन-प्रक्रिया (तीही पुनर्वितरणाच्या प्रत्यक्ष कार्यक्रमांवर भर देणारी) पुन्हा एकदा सुरू करणे व रोजगारवाढ साधणारे 'उचित' तंत्र हा त्या नियोजनाचा एक महत्त्वाचा केंद्रबिंदू बनविणे; व (ii) एकूणच सामाजिक व विशेषतः पुनर्वितरणाच्या धोरणातून निर्माण होऊ शकणारे ताणतणाव व संघर्ष काबूत ठेवण्यासाठी व त्यांचे निरसन करण्यासाठी आवश्यक असलेली राजकीय विश्वासार्हता पुनःप्रस्थापित करणे. (सुरेश तेंडुलकर, 'ईक्वॉलिटी अंड् इनीक्वॉलिटी, १९८३, पृष्ठे १२१–१२२.)

या प्रकारच्या यशस्वी पुनर्वितरणप्रधान नियोजनाचे कोणते महत्त्वाचे परिणाम संभवतात ? अतिशय सारांशाने असे म्हणता येईल की, एकूण उत्पन्नातील खालच्या ४०% ते ६०% लोकांचा वाटा वाढला तर वस्तूंना असलेल्या मागणीची संरचना (पॅटर्न ऑव् डिमांड) बदलेल व जीवनाश्यक वस्तूंच्या गरजांच्या न भागलेल्या भागाचे प्रत्यक्ष मागणीत रूपांतर झाल्यामुळे या वस्तूंना (उदा., धान्ये, डाळी, कापड इ.) असलेली मागणी वाढून उत्पादनाची संरचना आज आहे त्यापेक्षा समाजकल्याणाला अधिक अनुकूल होईल. याचाच अप्रत्यक्ष परिणाम म्हणजे सामाजिक दृष्ट्या कमी महत्त्वाच्या वस्तूंचा एकूण उत्पादनातला तौलनिक वाटा कमी होईल. म्हणजेच पर्यायाने मर्यादित साधनांच्या विल्हेवारीची सामाजिक गुणवत्ता वाढलेली असेल.

'समाजवादी समाजरचना' म्हणजे, मर्यादित अर्थाने, यापेक्षा दुसरे काय ? 'मर्यादित अर्थाने'

अनुक्रमणिका

असे म्हणण्याचे कारण म्हणजे या प्रकारच्या बदलांमध्ये फार मोठ्या प्रकारचे संस्थात्मक बदल अनुस्यूत नाहीत. या अर्थाने, धोरणांच्या या प्रकाराला 'लिबरल' किंवा 'लोकशाही समाजवादी' असेही म्हणता येईल. या लिबरल धोरणांचा आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील अवतार काय असू शकेल, हे सहज ओळखता येण्याजोगे आहे. आंतरराष्ट्रीय क्षेत्रात जो व्यापार, गुंतवणूक, अर्थसाहाय्य यांबाबतीत अन्यायाचा व्यवहार चालतो तो सुधारणे आणि भारतासारख्या न्यूनविकसित राष्ट्रांना न्याय मिळवून देणे असे सुधारणात्मक (रिफॉर्मिस्ट) धोरण लिबरल विचारवंतांकडून सुचवले जाते. त्यात 'विकसित' राष्ट्रांनी आपल्याला अधिक सढळ व स्वस्त अर्थसाहाय्य देणे, आपल्या मालाला चांगल्या व स्थिर किंमती देऊन त्यांची आयात (आपली निर्यात) वाढेल असे धोरण ठेवणे, त्यांच्या बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या गुंतवणूकधोरणाला कमी शोषणात्मक व आपल्याला अधिक अनुकूल असे वळण लावण्यासाठी दबाव आणणे, त्यासाठी 'दक्षिणे'च्या राष्ट्रांनी 'उत्तरे'शी मुकाबला करण्यासाठी संघटण करून आपली सौदाशक्ती वाढवणे अशा अनेक गोष्टी येतात व याला 'नवी आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्था' असे म्हटले जाते. या मागण्या 'सर्वांसाठी भांडवलशाही फक्त पश्चिमी राष्ट्रांसाठीच नाही' अशा आहेत. म्हणजे आंतरराष्ट्रीय भांडवलशाही सुधारित व बळकट करणाऱ्यांच्याच आहेत हे स्पष्ट आहे.

'परंतु 'समाजवादी समाजरचना' या शब्दप्रयोगाचा अधिक गंभीर व एका पारंपरिक अर्थाने 'मूलगामी' (रॅडिकल) असा दुसरा अर्थ संभवतो. या मूलगामी विचारधारेत मार्क्सवादी पॉल बारान्, द. अमेरिकेतील 'अवलंबन सिद्धांतनी' आँद्रे गुंडेर फ्रँक व यूरपमधील 'पीस रिसर्च' पठडीशी संबंधित असलेले जोहान् गाल्टुंग्, डी सेनगासू, असे निरनिराळे विचारवंत समाविष्ट आहेत. यांच्यातील समाईक असे विचारसूत्र म्हणजे : तिसऱ्या जगातील देश अविकसित असण्याचे कारण म्हणजे ते एका शोषक अशा आंतरराष्ट्रीय भांडवली व्यवस्थेचाच एक अवयव आहेत आणि त्यामुळे 'अविकसितपणा' हा आंतरराष्ट्रीय पातळीवरील संरचनात्मक समस्येचा अपरिहार्य ऐतिहासिक आविष्कार आहे. या विश्लेषणामध्ये साहजिकच साम्राज्यवाद व वसाहतवादाला अत्यंत महत्त्व प्राप्त होते. महायुद्धानंतर जरी जुना साम्राज्यवाद संपुष्टात आला तरी त्याची जागा नव्या साम्राज्यवादाने घेतली. जुन्या वसाहती देशांच्या वाढत्या आर्थिक अवलंबनातून ही प्रक्रिया चालूच राहते. आपले वर्चस्व गाजवणारे भांडवली देश अवलंबित देशांमधील पश्चिम-अभिमुख अशा अभिजनांचा उपयोग करून घेतात. ते त्या अभिजनांच्याही अनेक दृष्टींनी फायद्याचे असते. अभिजन आपापल्या देशात अशीच 'साम्राज्यवादी' भूमिका बजावीत असतात. थोडक्यात, अविकसितपणा हा असमान विकासाचा निरनिराळ्या पातळ्यांवरचा आविष्कार असतो.

रॅडिकल विचारवंतांच्या दृष्टीने पुढील धोरणे योग्य ठरतात : (i) काहींच्या मते, प्रथम आंतरराष्ट्रीय व्यवस्थेतून अंग काढून घेणे, किमान गरजांचा अंतर्गत कार्यक्रम ठरवून त्या संपूर्णपणे स्वतःच्या हिंमतीवरच भागविण्याची खरी 'स्वावलंबना'ची योजना जिद्दीने पार पाडणे व मग आपल्या आर्थिक स्वातंत्र्यानिशी मानाने आंतरराष्ट्रीय मैदानात परत उतरणे (गाल्टुंग); किंवा (ii) देशांतर्गत समाजवादी क्रांती करून 'विकास' साधणे. (या विचारांशी जवळचे नाते सांगणारे भारतीय अर्थज्ञ म्हणजे रणजित साऊ, प्रभात पटनाईक, अशोक मित्र, के. एन्. राज इ.)

दुसऱ्या पर्यायाच्या बाबतीत अनेक अडचणी व शंका उपस्थित होऊ शकतात. उदा., बहुराष्ट्रीय कंपन्यांचे वाढते वर्चस्व असलेल्या व उजवी विचारसरणी एकूणच फैलावत असलेल्या सध्याच्या जगात समाजवादी क्रांती मुळातच शक्य आहे का ? अविकसित देशांत तर क्रांतीची शक्यता आणखीच कमी नाही का ? मग चीन अविकसितच नव्हता का ? परंतु स्वावलंबनाचा, क्रांतीचा व पुनर्वितरणासकट वृद्धीचा प्रयोग पुष्कळशा यशस्वीपणे केल्यानंतर माओच्या मृत्यूनंतर चीनचे जे नवे भांडवली वाटू शकणारे प्रयोग चालू आहेत त्यांचे काय ?

आपले सर्व विश्लेषण या चीनच्या मुद्द्यावर आणून पोहोचवण्याला एक महत्त्वाचे कारण आहे. 'लिबरल' काय किंवा 'रॅडिकल' काय, या दोन्ही पाठभेदांमध्ये 'वृद्धीच नको' अशी भूमिका नाही.

त्यांचा आग्रह वितरणात्मक अन्याय निर्माण करणाऱ्या वृद्धीला कमी-अधिक प्रमाणात समताभिमुख शिस्त आणण्याची आवश्यकता आहे हा आहे. वृद्धी मात्र हवी. विशेषतः दीर्घकाळात तर हवीच हवी.

हा मुद्दा महत्त्वाचा आहे. कारण गेल्या काही वर्षांत वृद्धीलाच मुळातून विरोध करणारे असे विचारप्रवाह बाळसे धरत आहेत. या विचारप्रवाहांमध्येही अनेक पाठभेद आहेत आणि त्यांना अजून 'प्रस्थापितता' प्राप्त झालेली नाही. प्रस्थापित म्हणजे समताभिमुख विश्लेषणामध्ये, या वृद्धिविरोधी विचारातील काही त्यातल्या त्यात निरुपद्रवी विचारांना एक प्रकारचे 'लिंबू-टिंबू' स्थान आजकाल देण्यात येते आणि प्रस्तुत लेखकाच्या मते असे करणे हे प्रस्थापित विचारप्रवाहातील औद्धत्याचा आणि आडमुठेपणाचा एक आविष्कार आहे. तथापि प्रस्थापित भूमिकेचा सारांश करण्यातच बरीच पाने खर्ची पडल्याने आता राजीव गांधींच्या बहुचर्चित आर्थिक धोरणांची, प्रस्थापित म्हणजेच समतासमर्थक भूमिकेच्या पार्श्वभूमीवर चिकित्सा कशी होऊ शकेल याचे थोडक्यात सूचन करून, वृद्धिविरोधी प्रवाहाचीही कल्पना थोडक्यातच शेवटच्या भागात मांडण्याचे ठरवू या.

V

राजीव गांधींनी १९८५ पासून ज्या प्रकारचे धोरणात्मक निर्णय घेतले ते एका अर्थाने, १९७३ पासून सुरू झालेल्या व १९८० पासून वेग धरलेल्या इंदिरा गांधीप्रणीत धोरणांचा काहीसा अधिक उत्साही व नाटचपूर्ण असा पाठपुरावा आहेसे वाटते.

असा एक मतप्रवाह आहे की, सध्याचे राजीव गांधी यांचे शिथिलीकरण-आधुनिकीकरण यांना महत्त्व देणारे जे धोरण आहे ते पुढील दोन गोष्टींतून आकाराला आले आहे. एक म्हणजे, राजीव गांधींचा स्वतःचा 'धंदेवाईक-व्यवस्थापकीय' असा दृष्टिकोण; व दुसरे म्हणजे सर्व साम्यवादी देशांत (चीनसकट) गेल्या काही वर्षांत बाजारयंत्रणेला मिळू लागलेले वाढते महत्त्व. त्यात काही प्रमाणात तथ्यही आहे. परंतु, इतर राष्ट्रे जे करत आहेत ते करण्याच्या परिस्थितीत भारतही आहे असे समजणे चूक आहे. रेगन्, थॅचर यांच्या प्रभावाखाली पाश्चिमात्य भांडवली राष्ट्रांत 'खाजगीकरणाची' प्रक्रिया सुरू झाली आहे; परंतु हे प्रयोग परवडण्याइतकी एकंदर संपन्नता त्या देशांमध्ये केव्हापासूनची निर्माण झालेली आहे. चीनसकट साम्यवादी देशांनीही मूलभूत गरजांचा मुकाबला कमी-अधिक यशस्वितेने करून दाखविला आहे आणि त्यामुळे भांडवलशाही संपन्न देशांच्या राहणीमानासारखे राहणीमान आपापल्या जनतेला उपलब्ध करून देण्यासाठी बाजारयंत्रणेला व नफाप्रेरणेला अधिक वाव द्यावासा जर त्यांना वाटत असेल, तर ते त्यांना आपल्यापेक्षा निश्चितच अधिक परवडण्यासारखे आहे.

आपण मात्र सर्व जनतेच्या मूलभूत गरजा भागविण्यापासून अजून खूपच दूर आहोत (श्रीलंकेच्या तुलनेतदेखील) आणि त्यामुळे आपली अर्थव्यवस्था बाजारप्रक्रियांवर अधिकाधिक सोपवण्यातून गरीब, बेकार लोकांचे दैन्य आणखीनच वाढणे संभवते. त्यामुळे राजीव गांधींची प्रकर्षाने पश्चिमाभिमुख अशी धोरणे या कारणांसाठी गैरलागू ठरतील असे वाटते.

परंतु राजीव गांधींची ही धोरणे त्यांच्या स्वतःच्या विचारांचा किंवा व्यक्तित्वाचा असा फारसा भाग नसून तो जागतिक पातळीवरच्या नव-साम्राज्यवादाचा किंवा नव-वसाहतवादाचा एक अटळ आविष्कार आहे अशी मार्क्सीय विचारधाराही पुढे आलेली आहे आणि त्यात मोठा तथ्यांश असल्याने तिचा थोडक्यात विचार करू. (जिज्ञासूंनी 'तात्पर्य' मासिकाचा मार्च १९८६ चा विशेष अंक पहावा.)

नेहरूंच्या प्रभावामुळे जी राज्य-भांडवलशाहीची (स्टेट् कॅपिटलिझम्) किंवा फेबिअन् पद्धतीची समाजवादी व्यवस्था भारतात निर्माण केली गेली, तिच्याकडून अशी अपेक्षा होती की राज्यक्रांती न करता, बाल्यावस्थेतल्या लोकशाही संस्था वापरूनच भारतात कल्याणकारी राज्य नजीकच्या भविष्यकाळातच निर्माण होऊ शकेल. परंतु या चौकटीतसुद्धा, राबवण्यात आलेली धोरणे जरुरीपेक्षा जास्त अभिजनवादी व आस्ते कदम स्वरूपाची अशी झाल्याने, आपण आधी पाहिल्यानुसार, दारिद्र्य-विषमता-बेकारी हा समस्यात्रिकोण अडतीस वर्षांनंतरसुद्धा अबाधितच राहिला आहे.

याचे एक अतिशय महत्त्वाचे स्पष्टीकरण म्हणजे मागणीची न्यूनता. १९६५ नंतरच्या काल-खंडात, त्यापूर्वीच्या १५ वर्षांतील वृद्धीच्या मानाने (विशेषतः औद्योगिक क्षेत्रात) एक प्रकारची मरगळ आलेली आहे आणि याचे एक मध्यवर्ती कारण म्हणजे मागणीची न्यूनता होय. ही मागणीची न्यूनता कशी निर्माण झाली ?

वस्तूंना मागणी निर्माण होण्यासाठी लोकांच्या इच्छांना क्रयशक्तीचे पाठबळ असावे लागते. सर्व-सामान्यांच्या हातात क्रयशक्ती येते ती उत्पादक काम करून. आता, आपण पाहिल्यानुसार, बेरोज-गारावर व दारिद्र्यावर प्रत्यक्ष व तातडीचा हल्ला चढवण्याचा व्यूह आपल्या नियोजनामध्ये पहिल्या-पासूनच नसल्यामुळे या समस्या आजपर्यंत तशाच राहिल्या. त्यामुळेच, लोकांना या गोष्टींची तीव्र गरज असतानाही अन्नधान्याचे, कापडाचे न खपलेले साठे निर्माण होणे अशी विचित्र परिस्थिती निर्माण होऊ शकली ! या परिस्थितीला आजवरची कोणती धोरणे जबाबदार आहेत ?

भू–अधिकार सुधारणांद्वारे संस्थात्मक पुनर्रचनेचा अप्रिय मार्ग न स्वीकारता, शेतमजुरांच्या बेरोज-गारी, शोषण यांसारख्या प्रश्नांकडे लक्ष न देता, पाणीवाटपाची आवश्यकता लक्षात न घेता शासनाने शेती-विकासाची धोरणे आजपर्यंत राबवली आणि त्यातून निर्माण होणाऱ्या परिणामांना पुरेसे कह्यात ठेवण्यासाठी प्रथम हरितक्रांतीचा तांत्रिक उपाय आणि नंतर आय्. आर. डी. पी. सारखे तुकडेफेकू उपाय वापरले. हरितक्रांतीच्या प्रयोगा-तून विषारी खते–रसायने यांचा सर्रास वापर करण्याचा नवा 'आदर्श' तर निर्माण झालाच; परंतु शेकडो वर्षांच्या अनौपचारिक प्रयोगातून विकास पावलेल्या तांदळासारख्या महत्त्वाच्या पिकांच्या अनेक काटक एतद्देशीय प्रजाती कायमच्या नष्ट होण्याच्या मार्गाला लागल्या. तसेच यातून मुख्यतः श्रीमंत शेतकरी अधिक श्रीमंत झाले आणि 'विकासाच्या दलालां'चा एक नवा बांडगुळी वर्ग निर्माण झाला. शेतीतल्या खालच्या थरांमध्ये सर्वहारीकरण, भूमिहीनीकरण व दारिद्रीकरणाच्या प्रक्रियाच चालू राहिल्या व त्यामुळे भारतातील फार मोठ्या वर्गाची जीवनावश्यक वस्तूंना असलेली मागणी (गरज नव्हे) सतत खालावलेलीच राहिली. सरकारचे वाढत्या तुटीच्या अर्थसंकल्पांचे, भाव-वाढीला चालना देणारे व गरिबांची क्रयशक्ती खच्ची करणारे धोरण, तसेच श्रीमंत शेतकऱ्यांच्या उत्पन्नांना करातून सूट देण्याचे धोरण, एकूणच कराधानात (टॅक्सेशन्) श्रीमंतांना भराव्या लाग-णाऱ्या प्रत्यक्ष करांचे महत्त्व कमी करून जन-सामान्यांवर अधिक बोजा पाडणाऱ्या अप्रत्यक्ष करांचे (उदा., उत्पादन शुल्क, विक्री कर इ.) तौलनिक महत्त्व वाढवण्याचे धोरण, काळ्या धनावर नियंत्रण आणण्यातील अनिच्छा / अपयश इत्यादी सर्व ज्ञात गोष्टींचा विचार केला की, जीवनावश्यक वस्तूंना मागणी फारशी का नाही व चैनीच्या वस्तूंना मात्र मागणी का आहे व त्यांचे उत्पादन त्या मानाने एकंदरीत अधिकाधिक किफायतशीर कसे ठरत आहे याचा उलगडा होतो.

चैनीच्या किंवा निम-चैनीच्या वस्तूंचे उत्पादन वाढवण्याच्या आवश्यकतेपाशी या पद्धतीने आपण आलो की, १९८५ पासूनच्या आर्थिक धोरणातल्या बदलांमधील घाई, नाटचमयता, आधुनिकीकरणाची भाषा यांचा निराळा अर्थ आपल्याला दिसू लागतो. आतापर्यंत संरक्षित बाजारपेठ (आणि औद्योगिक नियंत्रणेदेखील) देशी भांडवलदारांच्या पथ्यावर पडली; परंतु अलीकडे मात्र औद्योगिक मरगळीच्या अवस्थेतून बाहेर पडण्यासाठी बंधने उठवण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. चैनीच्या वस्तूंचे उत्पादन खुलेआम वाढवण्यासाठी, त्यांची निर्यात करण्यासाठी, त्यांच्या उत्पादनासाठी लागणारे तंत्र-ज्ञान, भांडवल इत्यादींच्या आयातीसाठी उत्पादन-नियंत्रणे, किंमतनियंत्रणे, आयात–निर्यात–नियंत्रणे, विदेशी चलनव्यवहारासंबंधीची नियंत्रणे उठवण्याची आवश्यकता आता भांडवलदारवर्गाला भासत आहे. सरकारनेही या नव्या दबावाखाली, आता सर्व-परिचित झालेले असे बदल १९८५ पासून झपाट्याने अमलात आणले आहेत. कंपन्यांच्या व व्यक्तींच्या उत्पन्नावरील करांच्या दरातील घट, कंपन्यांना पूर्वी निषिद्ध असलेले खर्च करण्याची दिलेली मुभा, मक्तेदारीविरोधी कायद्यात केलेले भांडवल-धार्जिणे बदल इ. गोष्टी व अनिवासी भारतीयांना दिलेल्या विशेष सवलतींसकट औद्योगिक व परदेशी

अनुक्रमणिका

व्यापारावरील नियंत्रणांच्या शिथिलीकरणाचा विचार केला की, आधुनिकीकरणाची भाषा ही खऱ्या अर्थाने कशी पोकळ आहे हे लक्षात येऊ लागते.

परंतु हे स्पष्टीकरण येथेच थांबत नाही; कारण देशी भांडवलदारांच्या दबावाबरोबरच परदेशी भांडवली शक्तींचा दबावही येथे लक्षात घेणे आवश्यक आहे. अमेरिका, प. यूरपीय राष्ट्रे, जपान इ. देशांचे प्रभुत्व असलेल्या आंतरराष्ट्रीय नाणे निधी व जागतिक बँक या संस्थांकडूनही वरील प्रकारच्या दुहेरी शिथिलीकरणासाठी गेल्या १०–१५ वर्षांपासून सारखा दबाव येत होता व १९८१ साली आपण घेतलेल्या मोठ्या आय्. एम्. एफ्. कर्जापासून तो अधिकच स्पष्ट होऊ लागला. (पाहा : अशोक मित्र यांचा 'पॉवर प्ले' हा लेख; इलस्ट्रेटेड वीकली, एप्रिल १३, १९८६). बहुराष्ट्रीय कंपन्यांशी हे आणि इतर परकी कंपन्यांशी होणारे सहयोग झपाट्याने वाढू लागले आणि भारतातील उच्च मध्यमवर्ग, मध्यम व उच्च श्रेणींवरचे नोकरशहा, शहरांमध्ये पैसा गुंतवू इच्छिणारे श्रीमंत शेतकरी, अनिवासी भारतीय, आयात-निर्यात व्यापारातले दलाल यांच्या उत्साहाला उधाण आले. (परदेशी कंपन्यांच्या प्रवेशामुळे निर्माण होणाऱ्या स्पर्धेमुळे, जुना भांडवलदारवर्ग मात्र शिथिलीकरणाच्या बाबतीत साहजिकच सरसकट उत्साही नाही.)

या धोरणसंचामुळे कोणकोणते परिणाम संभवतात किंवा दिसू लागले आहेत ? एक म्हणजे, राष्ट्रीय उत्पादनाच्या रचनेतील बदल. हे बदल चैनीच्या वस्तूंना अनुकूल व गरजेच्या वस्तूंना प्रतिकूल असे होतील. या बदलांमुळे देशातील वातावरण झपाट्याने सुखलोलुपतेकडे झुकणार आणि याला टी. व्ही.-सारख्या सरकारच्या नियंत्रणाखालील प्रसार-माध्यमाचा हातभार लागणार. दुसरे म्हणजे, या वस्तूंच्या उत्पादनासाठी (मोटारी, स्कूटर्स, टी. व्ही., धुलाई यंत्रे, कंप्यूटर्स इ.) अत्याधुनिक तांत्रिकी वापरली जाणार व त्यामधून कामगारकपात, खुशीची निवृत्ती या गोष्टींना उत्तेजन मिळणार. तिसरे म्हणजे, आयात शिथिलीकरणामुळे देशातील अनेक उद्योगधंदे बसणार, भांडवल वाया जाणार, बेकारी वाढणार. चवथे म्हणजे, परकीय भांडवलाची भारतीय अर्थव्यवस्थेवरील पकड अधिक बळकट होणार व (अनेक अभ्यासांतून दिसते त्यानुसार) या परकी भांडवलाच्या सहयोगामुळे निर्यात फारशी वाढणार नाही ती नाहीच; परंतु देशाबाहेर जाणाऱ्या विदेशी चलनाचा ओघ वाढून आपला आंतरराष्ट्रीय येण्या-देण्याचा तोल मात्र सतत बिघडत जाणार. ('निर्यात वाढवण्यासाठीच आपण आयातीवरील बंधने शिथिल करत आहोत' हा सरकारी युक्तिवाद, आपल्या निर्यात मालाला असलेली जागतिक मागणीची परिस्थिती व इतर राष्ट्रांनी अंगिकारलेली संरक्षक धोरणे लक्षात घेता फोल ठरतो. या संदर्भातील सातव्या योजनेतील उद्दिष्टेही अवास्तव आहेत.) पाचवा परिणाम म्हणजे, या सगळ्या गोष्टी रेटण्यासाठी शासनाला अधिकाधिक प्रमाणात आणि उघडपणे भांडवल-धार्जिणे व्हावे लागेल, सैन्य-पोलीस-गुंड या दमन-शक्तींचे जनतेशी सामना करण्यासाठी अधिकाधिक साहाय्य घ्यावे लागेल आणि उघडउघड हुकूमशाही-यंत्रणा राबवावी लागेल. कदाचित या परिवर्तनात, अर्थवादाला सहज बळी पडणारे संघटित औद्योगिक कामगारदेखील सरकारशी प्रच्छन्न सलोखा साधतील आणि हा तीन 'बड्यां'चा (सरकार, भांडवलदार व संघटित कामगार) एक 'ग्रँड अलायन्स्' होऊ शकेल. अर्थातच, कनिष्ठ मध्यमवर्ग, छोटे कारखान-दार–व्यावसायिक, असंघटित औद्योगिक व शेत-मजूर या बहुसंख्य जनतेच्या शोषणावर जगणारा व त्यांना परकी दमनयंत्रणेच्या साहाय्याने यशस्वीपणे टाचेखाली दाबून ठेवू शकणारा असा अलायन्स विरोधी पक्षांनी कोणतेही खरे विकासधोरणपर्याय निर्माण केलेले नसल्याने या बहुसंख्य जनतेलाही ही बहुजनांची हुकूमशाही स्वीकारण्यावाचून दुसरा पर्याय राहिलेला नसेल. अर्थातच, या सगळ्यांमध्ये, इथून पुढे १९६५ पासूनच 'सुटीवर पाठवण्यात आलेल्या' विकासात्मक नियोजनाला कायमचीच सुटी मिळेल. योजनेतील एकूण गुंतवणुकीपैकी सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणूक ही आजपर्यंतच्या योजनात नेहमीच खाजगी गुंतवणुकीपेक्षा जास्त होती; सातव्या योजनेत मात्र प्रथमच सार्वजनिक क्षेत्र गुंतवणूक (रु. १५४,२१८ कोटी) ही खाजगी क्षेत्र गुंतवणुकीपेक्षा (रु, १६८, १४८ कोटी) चक्क कमी भरेल. म्हणजे सार्वजनिक

क्षेत्राने 'मोक्याच्या जागा' आपल्या ताब्यात घेऊन सबंध अर्थव्यवस्थेच्या (ज्यामध्ये खाजगी क्षेत्र हेच मोठे क्षेत्र राहाणार) कामगिरीला प्रत्यक्षतः किंवा अप्रत्यक्षतः दिशा द्यावी अशी जी धारणा नेहरूंच्या काळात होती तिला आता मूठमाती दिल्यासारखीच आहे. याचा अर्थ समाजवादाचा फेबिअन् स्वरूपाचा सौम्य अवतारदेखील आता बाजूला सारण्यात आला आहे. एका बाजूने शिथिलीकरण करूनसुद्धा सरकारने अनेक प्रकारचे निर्णय घेण्याची सत्ता स्वेच्छाधीन स्वरूपात स्वतःकडे ठेवली आहेच. (उदा., 'संशयित' करचुकव्यांच्या घरीसुद्धा वॉरंटविना धाड घालण्याचे अधिकार) आणि त्यामुळे अशा सत्तेचा उपयोग, जो कायद्यानें नेमलेल्या स्वायत्त मंडळांकडून वस्तुतः व्हायला हवा, तो प्रत्यक्षात मंत्री अथवा राज्यपालसुद्धा मनमानेपणाने करण्याची प्रथा वाढतच जाण्याची शक्यता आहे. ('अर्थसंवाद' ऑक्टो. ते डिसें. १९८५ मधील ह. कृ. परांजपे यांचे अध्यक्षीय भाषण, पृ. १४३) अशा प्रकारचा मनमाना हस्तक्षेप अनेक सार्वजनिक उद्योगांच्या अकार्यक्षमतेचे व तोट्याचे महत्त्वाचे कारण आहे. या अकार्यक्षमतेचे निमित्त करून तसेच सार्वजनिक उद्योगांची यंत्रसामग्री किंवा तंत्रज्ञान स्वस्त दरात पुरवण्याची भारताची तयारी असूनसुद्धा परदेशी कंपन्यांना ऑर्डर्स देऊन गेल्या तीस-पस्तीस वर्षांत कष्टाने निर्माण केलेल्या सार्वजनिक उद्योगांना मुद्दाम गाळात घालण्याच्या पवित्र्यात नवे सरकार दिसत आहे. सार्वजनिक उद्योगांची, चुकीच्या सरकारी धोरणांमुळे आधीच गेलेली (परंतु पुन्हा सावरता येऊ शकेल अशी), इभ्रत अशा प्रकारे नष्ट करून त्यांच्या खाजगीकरणासाठी योग्य असे समर्थन निर्माण करण्याच्याच खटाटोपात सरकार असल्यासारखे दिसते. या प्रयत्नातून 'मोक्याच्या जागा' बड्या मक्तेदार कंपन्यांच्या ताब्यात जाऊन आपण आजपर्यंत जे काही थोडेफार आर्थिक नियोजन राबवत आलो तेही संपुष्टात येईल व भारतीय अर्थव्यवस्था लवकरच 'कॉर्पोरेट कॅपिटलिझम्'चे एक उदाहरण होईल. मोठी हॉस्पिटलेसुद्धा खाजगी कंपन्यांनी चालविण्याची कल्पना आता मान्य होत असल्याने आरोग्यसेवेसारख्या क्षेत्रातदेखील 'दामाप्रमाणे काम' हे तत्त्व उजळ माथ्याने स्वीकारले जात आहे आणि हे राजीव गांधींच्या 'आधुनिकीकरणा'च्या स्वप्नामध्ये चपखल बसते हे स्पष्ट आहे.

VI

राजीव गांधींच्या अर्थकारणाची जी त्रोटक चिकित्सा वर केलेली आहे ती 'प्रस्थापित' अशा डाव्या विचारसरणीच्या अंगाने केलेली चिकित्सा आहे. आपण आधीच पाहिल्यानुसार या 'रॅडिकल्' दृष्टिकोणानुसार न्यूनविकसित देशांच्या अर्थव्यवस्था या जागतिक भांडवली नवसाम्राज्यवादाचा एक अपरिहार्य, अवलंबित असा अंश असतात. राजीव गांधींची धोरणे भारताला या आंतरराष्ट्रीय व्यवस्थेत अधिकाधिक घट्टपणे गुंतवतील आणि समाजवादी क्रांतीखेरीज किंवा स्वयंपूर्णतेच्या आग्रही धोरणाखेरीज यातून सुटण्याचा मार्ग नाही असा या विचारसरणीचा सर्वसाधारण निष्कर्ष राहील हे स्पष्ट आहे.

या 'प्रस्थापित' विचारसरणीमध्ये (किंवा तिच्या सौम्य पाठभेदांमध्ये) आर्थिक वृद्धीच नको अशी धारणा नसते याचा उल्लेख आपण विभाग IV च्या शेवटी केला होता. आता ज्याला 'वृद्धीविरोधी मतप्रवाह' असे संबोधतात त्याचे वैशिष्ट्य काय ते थोडक्यात पाहूया.

इ. जे. मिशान् या प्रख्यात ब्रिटिश अर्थज्ञाने केलेल्या एका परखड विधानात वृद्धिविरोधी भूमिकेचे चांगले प्रतिबिंब पडलेले आहे. ते म्हणतात : "सामाजिक कल्याणाच्या वृद्धीसाठी आर्थिक वृद्धी आवश्यकही नाही व पुरेशीही नाही; खरे पाहाता, आपण आता असा विचार करण्यासाठी मनाची तयारी करायला हवी, की आर्थिक वृद्धीच्या मागे लागत राहाण्याने, चांगल्या जीवनाचे आपले स्वप्न मात्र धुळीला मिळेल." (द इकनॉमिक् ग्रोथ डिबेट् : ॲन् असेसमंट, १९७७, पृ. ३७)

आर्थिक वृद्धीला विरोध करणाऱ्या विचारसरणीचे दोन ढोबळ भाग पाडता येतील. एक, 'पर्यावरणवादी' किंवा 'पारिस्थितिक संतुलनवादी' (इकलॉजिकल्) दृष्टिकोणातून आर्थिक वृद्धीला होणारा विरोध. दोन, अधिक व्यापक अशा आदर्शवादी तात्त्विक (नॉर्मटिव्) भूमिकेतून वृद्धीची केली जाणारी चिकित्सा. या दोन भूमिकांच्या केवळ

सूचक पद्धतीने संक्षिप्त असा विचार करू व त्यांची भारतीय संदर्भातील प्रस्तुतताही थोडक्यात लक्षात घेऊ.

१) पर्यावरणवाद, आर्थिक वृद्धी व विकास

'क्लब ऑव् रोम' या संस्थेच्या वतीने डेनिस मेडोज् व इतरांनी लिहिलेल्या 'द लिमिट्स् टु ग्रोथ' या १९७२ साली प्रकाशित झालेल्या पुस्तकामुळे या वादाला तोंड फुटले व आज हा विचार कमी-अधिक प्रमाणात प्रत्येक सुशिक्षिताच्या परिचयाचा झाला आहे. वर उल्लेखिलेले मिशान्सारखे परदेशी अर्थज्ञ व भारतामध्ये क्लॉड अल्वारिस्सारखे लेखक ('इलस्ट्रेटेड वीकली' चे गेल्या दोन वर्षांतील त्यांचे लेख पहावेत) ही विचारसरणी परिणामकारकरीत्या मांडत आलेले आहेत. 'भोपाळ शोध व बोध' (एप्रिल १९८५) हा 'नवभारत' चा या विषयावरील खास अंक वाचकांच्या परिचयाचा आहेच.

पर्यावरणवादाचे मुख्य मुद्दे पुढीलप्रमाणे मांडता येतील: (i) लोकसंख्यावाढीमुळे व आर्थिक वृद्धीच्या हव्यासामुळे मर्यादित संसाधनांवर—विशेषत: खनिज तेल, कोळसा, धातू यांसारख्या अपुनरुत्पाद्य संसाधनांवर—पडणारा प्रचंड ताण, त्यांचा नाश व त्यामुळे होणारे निर्वनीकरण, वाळवंटीकरण, पशुपक्षांच्या अनेक जातींचा कायमचा नाश, खनिजांची होणारी कायमची संपुष्टी इ.; (ii) आर्थिक वृद्धीमुळे निर्माण होणाऱ्या अकल्याणकारी वस्तू ('इकनॉमिक् बॅड्स्'), विशेषत: सर्व प्रकारचे (जमिनीचे, पाण्याचे, हवेचे, वनस्पती व प्राणिजगताचे थोडक्यात संपूर्ण बायोस्फिअरचे किंवा सृष्टीचे) प्रदूषण.

या दोन गोष्टी लक्षात घेता या 'पृथ्वीरूपी आकाशयाना'तील (स्पेसशिप अर्थ) मानवजात जर भविष्यकाळात टिकून राहायची असेल तर त्यासाठी तिने लोकसंख्यावृद्धी व आर्थिक वृद्धीही कमी कमी करत शून्यावर आणली पाहिजे.

या विचारसरणीवर प्रतिहल्ले चढवले जात आहेत व ते हल्ले तांत्रिक व राजकीय–अर्थशास्त्रीय अशा दोन्ही दिशांनी केले जात आहेत. आर्थिक वृद्धीने निर्माण केलेल्या प्रदूषणासारख्या समस्यांना वैज्ञानिक प्रगतीतूनच उपाय निर्माण होतील; तेव्हा या प्रश्नांचा बाऊ करण्यात काही अर्थ नाही असा एक प्रतिवाद करण्यात येतो. तसेच लोकसंख्यावाढीचा प्रश्न जरी असला, तरी त्यातही जगाच्या एकूण साधनसंपत्तीचे श्रीमंत व गरीब देशांमध्ये होणारे अत्यंत विषम वाटप हा अधिक महत्त्वाचा प्रश्न असल्याचे लक्षात आणून दिले जाते. त्यामुळे संपन्न देशांनी, जगाच्या साधनसंपत्तीवर आत्यंतिक ताण निर्माण करणारी

स्वतःची उपभोगपातळी प्रथम कमी करावी आणि तसे केल्यास तिसऱ्या जगातल्या वाढत्या, मोठ्या लोकसंख्येलाही उपलब्ध साधनसंपत्ती पुरी पडेल असे ठणकावले जाते. म्हणजेच, पर्यावरणाचे प्रश्न हेही, मुख्यतः, नवी तंत्रे निर्माण करून (उदा., सौरऊर्जा, प्रदूषण-प्रतिबंध तांत्रिकी इ.) व जागतिक संसाधनांच्या वितरणातील (व प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष ताब्यातील) विषमता कमी करून, सोडवता येण्यासारखे आहेत असे प्रतिवादींना वाटते. म्हणजेच, एका अर्थी संपन्न देशांतील 'अतिवृद्धी' रोखणे व न्यूनविकसित देश एका 'उचित' (ऑप्टिमम्) पातळीपर्यंत येईपर्यंत त्यांनी वृद्धीचा मार्ग चोखाळणे असे या 'उपाया'चे संमिश्र स्वरूप होईल. त्यामध्ये अतिविकसितांकडून न्यूनविकसितांकडे संसाधनांचा ओघ वळवणे हेही येईल.

अर्थात हे उपाय वाटतात तितके साधे व सरळ नाहीत हे उघड आहे. आजपर्यंतच्या अनुभवानुसार, संपन्न देशांकडून तिसऱ्या जगाकडे वळविण्यात आलेला साहाय्य-ओघ कमीकमीच होतो आहे असे दिसते. 'अतिविकसित' देश आपल्या वृद्धीचा वेग स्वतः होऊन धोरण म्हणून कमी करण्याची, शून्य करण्याची शक्यता या क्षणी तरी शून्य दिसते. वृद्धीचा वेग महत्तम ठेवण्याचे 'प्रस्थापित' उद्दिष्ट आंतरराष्ट्रीय स्पर्धेच्या वातावरणात पूर्वीच्याच उत्साहाने व ईर्षेने पाठलागिले जात आहे. दुसरे असे की, भोपाळ दुर्घटनेने व त्या प्रकारच्या आता हरघडी उजेडात येऊ लागलेल्या असंख्य घटनांनी (उदा., दिल्लीतील वायुगळती, जमिनींचे खारावून नापीक होणे, जंगलतोडीमुळे येणारे पूर व जमिनीची धूप, गोव्यातील झुआरी नदीचे प्रदूषण व त्याचा मच्छीमारीवरील दुष्परिणाम इ.) ही गोष्ट स्पष्ट झालेली आहे की, आर्थिक वृद्धीशी संबंधित अशा पर्यावरणात्मक समस्या ही काही केवळ संपन्न राष्ट्रांची मक्तेदारी नाही. आर्थिक वृद्धीच्या मार्गाने 'विकास' साधणाऱ्या (पुनर्वितरणात्मक धोरणे राबवणाऱ्यादेखील) न्यूनविकसित देशांनासुद्धा पर्यावरणात्मक समस्यांची किंमत चुकवावी लागणारच. किंबहुना, तिसऱ्या जगातील बहुसंख्य जनता या समस्यांविषयी अज्ञानी किंवा असाहाय्य असल्याने व संपन्न राष्ट्रे प्रदूषण वगैरे निर्माण करणारे उद्योग बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या मार्फत तिसऱ्या जगातील भूमीवरच शक्यतो प्रस्थापित करण्याच्या मागे असल्याने पर्यावरणाच्या समस्यांचे यापुढे तिसऱ्या जगातच केंद्रीकरण झाल्यास त्याचे आश्चर्य वाटावयास नको!

न. भा. २१

त्यामुळे, शेवटी आपण अशा एका निष्कर्षावर येतो की, आर्थिक वृद्धीच्या प्रक्रियेतच, विशेषतः 'जगातील एकूण संसाधने अपरिमित आहेत' या वृद्धिप्रधान विकासप्रणालीच्या बुडाशी असलेल्या गृहीतातच, काहीतरी गफलत आहे. विज्ञानाचा व त्यावर आधारित तांत्रिकीचा विकास हा सर्व समस्यांवर खात्रीचा उपाय आहे, फक्त त्याला हवी असल्यास संपत्तीचे 'योग्य' विभाजन किंवा सोविएत प्रकारचा 'समाजवाद' यांची जोड दिली की झाले, हा सध्याचा प्रस्थापित समज एक मूलभूत भ्रम आहे हे पर्यावरण समस्येच्या चर्चेच्या निमित्ताने स्पष्ट होण्यास मदत झाली हे या चर्चेचे एक अत्यंत महत्त्वाचे योगदानच समजले पाहिजे.

मानवतावादी आदर्श कल्पना, आर्थिकवृद्धी व 'विकास'

आता आपण 'विकास' कशाला म्हणावे व म्हणू नये या आपल्या मूळ प्रश्नाचे उत्तर देण्याच्या प्रयत्नाच्या शेवटच्या, सगळ्यांत महत्त्वाच्या परंतु विवाद्य व काहीशा धूसर अशा टप्प्यावर येऊन पोहोचलो आहोत.

या टप्प्याची सुरुवात आपण एका प्रश्नाने करू. तो प्रश्न असा की, समजा, या ना त्या पद्धतीने पर्यावरणात्मक प्रश्न सुटण्याची शक्यता निर्माण झाली असती तर 'आर्थिक वृद्धी म्हणजेच विकास' असे म्हणता आले असते का? किंवा थोडयाशा निराळ्या पद्धतीने विचार केल्यास, समजा, पृथ्वीवरील नैसर्गिक संसाधने लोकसंख्या वगैरेंच्या मानाने इतकी आहेत की, आर्थिक वृद्धीच्या प्रक्रियेने त्यांना पोहोचलेली क्षती आज जशी आपल्याला तीव्रतेने लक्षात येत आहे तशी लक्षात येण्यासारखी परिस्थिती निर्माण झालेली नाही; अशा परिस्थितीत आर्थिक वृद्धी व 'विकास' यांच्यात विरोध आहे असे म्हटले गेले असते का?

असे वाटते की, या जर-तर-रूपी परंतु महत्त्वाच्या प्रश्नाचे उत्तर आजच्या अनेक पर्यावरणवादी वृद्धि-विरोधकांनी वृद्धीच्या बाजूने दिले असते. किंबहुना,

हा साधा प्रश्न ऐकून, वाचूनदेखील त्यांना हायसे वाटले असते; कारण, माझ्या मते, बहुसंख्य वृद्धि–विरोधकांचा विरोध वृद्धीच्या, एका अर्थाने फक्त 'बाह्य' अशा आक्षेपार्ह बाजूला असतो; त्यांना अमर्याद वृद्धीचे उद्दिष्ट मुळातूनच, अंतर्बाह्य आक्षेपार्ह आहे असे वाटत नसते. म्हणजे त्यांचा दृष्टिकोण सुधारणावादी असतो; शब्दशः 'मूलगामी' स्वरूपाचा नसतो.

आर्थिक वृद्धीची प्रक्रिया पर्यावरणात्मक समस्यांपासून मुक्त (म्हणजे क्षतिरहित, स्वच्छ) अशी असेल व वृद्धीचे लाभ जर पुरेसे न्यायाने वाटले जाणार असतील, तर वृद्धीचे उद्दिष्ट दोषमुक्त होते हे 'मूलगामी' विचारसरणीला मात्र मान्य का नाही याचा थोडा विचार केला पाहिजे.

माणूस नेहमीच 'चांगले' जीवन म्हणजे काय याचा, म्हणजेच आदर्शांचा, विचार करत आलेला आहे. आर्थिक वृद्धीच्या 'चांगुलपणा'वर श्रद्धा असणाऱ्यांचीदेखील एक आदर्श कल्पना असते हे उघड आहे. ती थोडक्यात मांडायची झाली तर, 'अधिक हे नेहमी चांगले असते' (मोअर इज् बेटर) म्हणून वस्तू व सेवांचे उत्पादन व उपभोग यांची पातळी जास्तीतजास्त असणे, त्यांच्या वाढीचा वेग जास्तीतजास्त असणे ही आदर्श परिस्थिती ठरते. अशी परिस्थिती ज्या राष्ट्रांमध्ये आढळते ती या न्यायाने 'विकसित' राष्ट्रे ठरतात व 'त्यांच्यासारखे' बनण्यासाठी आवश्यक ते बदल करणे म्हणजे 'विकास पावणे' किंवा 'विकसनशील' असणे असे ठरते. या अर्थानेच विकसित राष्ट्रे ही 'आधुनिक' असतात आणि म्हणून आधुनिकीकरण हा एक अनुबंधित आदर्श ठरतो.

या ठिकाणी आपल्याला असे लक्षात घ्यायचे आहे की, वरील अत्यंत सुप्रस्थापित अशा आदर्श कल्पनेला छेद देणारी अशी आदर्श संकल्पना गेल्या काही वर्षांत जोराने पुढे आली (वस्तुतः, काही जुन्या आदर्श कल्पनांचाच नव्या संदर्भातील, नव्या परिभाषेतील पुनरुच्चार असेही या संकल्पनेकडे पाहाता येईल) आणि ती आपल्याला असे सांगते की, आर्थिक वृद्धी ही केवळ चांगले व्यक्ती–व–सामाजिक जीवन निर्माण करण्यात अयशस्वी ठरली असे नसून आर्थिक वृद्धी अनुबंधित आदर्श संकल्पना चांगले जीवन निर्माण करूच शकणार नाही. याचे कारण असे की, मानवी जीवनाच्या आदर्श परिस्थितीत, म्हणजेच खऱ्या अर्थाने 'विकसित' अवस्थेत मानवी जीवनाच्या विविध पैलूंमध्ये (आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, आध्यात्मिक) एकरसता निर्माण झालेली असेल आणि त्यांतील कोणत्याही एकाचा प्रकर्ष ही एकरसता नष्ट करून आदर्शापासून जीवनाला दूर नेईल. म्हणजेच, थोड्या निराळ्या शब्दात असे म्हणता येईल की, आर्थिक वृद्धीशी अनुबंधित असे जे मानवी जीवन आहे ते माणसाचे संपूर्ण माणूसपण फुलून येण्यामध्ये अडचणी निर्माण करते आणि म्हणून वृद्धी ही मानवहितविरोधी म्हणजेच विकासविरोधी अशी प्रक्रिया आहे.

आर्थिक वृद्धिवादी विचारसरणीत समाजाचे जे एक प्रतिमान (model) असते त्यात विवक्षित सामाजिक संस्थांचा एक संच अनुस्यूत असतो. या संस्था अशा असतात की, मानवी गरजा आणि वस्तू यांची अन्योन्यता आणि त्या वस्तूंच्या उत्पादनाच्या विशिष्ट पद्धती यांना त्या संस्थांचे पाठबळ किंवा समर्थन असते. आर्थिक वृद्धीवर अधिष्ठित अशा समाजातील नागरिक या संस्थांचे गुलाम झालेले असतात. ईवान् इलिच् या विचारवंताने म्हटल्याप्रमाणे, व्यक्तींना आपले गुलाम बनविणाऱ्या या संस्थांचा प्रसार म्हणजेच 'प्रगती' असे गृहीत धरले जाते. शिक्षण-संस्थांचे उदाहरण घेऊन इलिच् असे सांगतात की, अधिकाधिक शिकण्याची आपली गरज आणि शाळा-कॉलेज-विद्यापीठांच्या वर्गातील चार, दहा, बारा, पंधरा, सतरा वर्षांची आपली उपस्थिती यांची पक्की अन्योन्य सांगड आपल्या मनात रुजली आहे आणि या शिक्षण-संस्था आपल्याला तथाकथित 'शिक्षण + नोकरीसाठी लागणारी अर्हता + काही नीतिकल्पना' असे एक गाठोडे (package) उपलब्ध करून देतात. याच न्यायाने समाजाचे स्वास्थ्य सुधारणे म्हणजे काय, तर डॉक्टर्स + इस्पितळे यांचा पुरवठा वाढवणे. जे शिक्षण व स्वास्थ्य यांचे उत्पादन करणाऱ्या संस्थांच्या बाबतीत खरे तेच कारखाने, प्रसारमाध्यमे, सरकारे इ. संस्थांच्या बाबतीतही खरे. अमेरिकेसारख्या संपन्न समाजात बहुसंख्य नागरिकांना

त्यांच्या उपभोगासाठी अशी वस्तू-सेवांची गाठोडी भरपूर प्रमाणात उपलब्ध होत असतात हे खरे; परंतु याचा अर्थ असा नाही की त्यामुळे हे समाज 'चांगले जीवन निर्माण करणारे' या वर्णनाला पात्र असतात. याउलट, इलिच् यांच्या मते, नागरिक अशा गाठोड्यांचा उपभोग घेण्यात जसजसे अधिक तत्पर होतात तसतशी आपल्या परिस्थितीला आपल्या हाताने आकार देण्याची त्यांची क्षमता क्षीण होत जाते. इलिच् यांनी न्यूनविकासाची व्याख्याच मुळी 'तयार गाठोड्यांपुढे समाजमानसाने लोटांगण घालण्याची परिस्थिती' अशी केली आहे. आणि या न्यायाने तथाकथित अतिसंपन्न राष्ट्रेच न्यूनविकसित ठरतात !

आर्थिक वृद्धिप्रधान विचारसरणीत गरजांपेक्षा (नीड्स्) हावरटपणाला (ग्रीड्स्) महत्त्वाचे स्थान मिळते आणि हावरटपणाला अंत नसल्याकारणाने सतत वाढणाऱ्या राष्ट्रीय उत्पादनाला (एकूण व विशेषत: दर डोई) विकासाच्या मुख्य गमकाचे स्थान प्राप्त होते. वस्तू व सेवांनी माणसाच्या काही (भौतिक) गरजांचे समाधान होते म्हणून माणसाच्या एकूण हिताची किंवा कल्याणाचीच सांगड वस्तूंच्या उत्पादनाशी, त्या उत्पादनप्रक्रियेच्या कार्यक्षमतेशी, कार्यक्षमतेसाठी आवश्यक असणाऱ्या विशेषीकरणाशी घातली जाते. यातूनच तज्ज्ञशाही (expertocracy), अभिजनशाही तयार होते आणि ते अटळ असते. नफा वाढवायचा असेल व त्यासाठी 'कार्यक्षमता' हवी असेल तर जिथे 'गुण' अधिक आहेत त्या व्यक्तींना, प्रदेशांना अधिक महत्त्व दिले जाणे (building on the best) हे अपरिहार्यपणे आलेच. या विचारसरणीत माणसांकडेही एक 'उत्पादन साधन' म्हणून पाहाणे व शिक्षण–आरोग्य आदी गोष्टींकडे या उत्पादनसाधनांची उत्पादकता वाढविणारी गुंतवणूक अशा अ-मानुष दृष्टीने बघणेही ओघाने आलेच. ई. एफ. शुमाकरनी त्यांच्या 'स्मॉल् इज् ब्यूटिफुल' या विख्यात पुस्तकात म्हटल्याप्रमाणे, आर्थिक वृद्धी साधली की माणसाने आपले माणूसपण विकसित करण्याची, म्हणजेच 'चांगले', 'सद्‌गुणी' होण्याची गरजच जणू कमी होते ! आर्थिक वृद्धीच्या प्रतिमानाचा हाच खरा सगळ्यांत महत्त्वाचा आक्षेपार्ह भाग आहे. राष्ट्रीय उत्पादन महत्तम वेगाने वाढवण्याच्या कैफात राष्ट्र एकदा का अडकले की 'घंटोंका काम मिनिटोंमें' (इक्सपिडिअन्सी) हा एकमेव संदेश होतो आणि समांतर अर्थव्यवस्थाच नाही तर समांतर राज्यव्यवस्था, समांतर न्यायव्यवस्था, समांतर शिक्षणव्यवस्था, समांतर धर्मपीठे इ. 'काळ्या' व्यवस्था अटळपणे फैलावतात. 'विविधता हाच सुखी जीवनाचा मूलमंत्र' हे एक 'शास्त्रीय सत्य' म्हणून स्वीकारल्यावर, माणूस भौतिक गरजांच्या समाधानाच्या पायापासून आध्यात्मिक समाधानाच्या कळसाकडे उत्क्रांत होत जाण्याऐवजी वस्तू व सेवांच्या सतत वाढणाऱ्या पसाऱ्यात नुसता आडवा पसरत जातो आणि माणूस असण्यातल्या अनेक शक्यतांना वंचित होतो. आर्थिक वृद्धीच्या कार्यक्षमताप्रधान वातावरणात, तोंडाचा 'आ' वासून निष्क्रियपणे उपभोग घेणाऱ्या मतिमंद लहान मुलासारखी माणसाची अवस्था होते आणि तो वस्तू–सेवांची नवी नवी तयार 'गाठोडी' मिळवून ती उपभोगण्यात जीवनाची इतिकर्तव्यता समजतो. (तिसऱ्या जगातील ज्या देशांबद्दल आपल्याला कौतुक आणि असूया वाटते ते द. कोरिया, ताइवान इत्यादी वेगाने वृद्धी पावलेले देश आता याच अवस्थेत आहेत आणि आपल्यापुढे त्यांचाच, विशेषत: कोरियाचा आदर्श आहे ! कारण त्यांनी स्वत:ची थोडीशी अक्कलहुषारी दाखवून यूरप, अमेरिकेचे यशस्वी अनुकरण या सर्व बाबतीत केले आहे !)

या वृद्धिप्रणीत आदर्शांचा तथाकथित न्यूनविकसित देशांमधील नागरिकांवर प्रचंड प्रभाव पडला आहे आणि विकास साधणे म्हणजे 'त्यांच्या'-प्रमाणे अत्यंत गुंतागुंतीच्या, खर्चिक, टोलेजंग अशा संस्था (शिक्षण, स्वास्थ्य, करमणूक इ. क्षेत्रांत) निर्माण करणे व प्री-पॅकेज्ड् सुविधांच्या बाटल्या तोंडाला लावून चोखत पडणे असा आपणही अर्थ लावत आहोत. आपल्या हे लक्षात येत नाही की, एक तर या 'बाटल्या' आपल्या समाजातील बहुसंख्य लोकांना पुरतील इतक्या निर्माण करणे शक्य नाही (त्या सध्याप्रमाणे फक्त मूठभर लोकांनाच मिळणार); दुसरे म्हणजे, त्या निर्माण करण्याच्या प्रयत्नात आपण इतर अधिक महत्त्वाच्या गरजांची

पूर्ती करण्याची व समाजहित वाढवण्याची संधी गमावत असतो (उदा., एक एम्. डी. निर्माण करण्यासाठी लागणाऱ्या खर्चात शुद्ध पाण्याचा पुरवठा योजून १०० मृत्यू टाळता येतात); आणि तिसरे म्हणजे, 'त्यां'चे अनुकरण करण्यातून आपण आपली कल्पनाशक्ती, निर्मितिक्षमता बठू देत असतो! इलिच्‌ने म्हटल्याप्रमाणे जसजसे एखाद्या समाजाचे मन अनुकरणशील बनते, तसतसे इतरांपेक्षा आपण कमी आहोत, हीणकस आहोत अशा न्यूनगंडाने पछाडले न जाता जगणे शक्य आहे हा लोकांमधला विश्वासच खचू लागतो. ('आउटबिटिंग द "डिवेलप्ड्" कंट्रीज्' हे मेलिब्रेशन् ऑव् अवेअरनेस्, १९६९, या पुस्तकातील प्रकरण.)

येथे एक गोष्ट मात्र स्पष्ट करायला हवी. वृद्धिप्रणीत आदर्श प्रतिमानाच्या या अफूने केवळ संपन्न भांडवलशाही राष्ट्रांतील व त्यांचे अनुकरण करणाऱ्या न्यूनविकसित राष्ट्रांतील नागरिकच 'गुंग' झालेत असे नव्हे, तर सोविएत रशिया व त्याची उपग्रह-राष्ट्रेही याच अफूने गुंग आहेत. यूरपमधला समाजवाद हा अर्थातच उत्पादनसाधनांची मालकी सामायिक करूनदेखील भांडवलशाही उपभोगवादी मूल्ये विसरू शकत नाही ; उलट, मूलभूत गरजा व्यवस्थित भागण्याची परिस्थिती निर्माण होताच भांडवली देशांतील जीवनमानाचे, सुखासीनतेचे अनुकरण करायला अधीर होतो हे एक विदारक सत्य आहे.

वृद्धी-अधिष्ठित आदर्शकल्पना मानवहितविरोधी कोणत्या अर्थाने आहे हे आपण पाहिले. या पार्श्वभूमीवर मानवतावादी आदर्श समाजाच्या कल्पनेचे काही घटक थोडक्यात लक्षात घऊया. या आदर्शाची काही प्रमाणात चुणूक आपल्याला अनेक दक्षिण अमेरिकेतील विचारवंतांच्या 'मुक्ती' (लिबरेशन्) या संकल्पनेच्या विश्लेषणावरून येऊ शकते. (या विचारवंतांत पॉवलो फ्रेइरे हे एक प्रमुख आहेत. त्यांचे या संदर्भातील लिखाण 'कल्चरल् अॅक्शन् फॉर फ्रीडम्' व 'पेड्‌गॉगी ऑव् दि ऑप्रेस्ड्' या पुस्तकांत आढळते.) याच्या मागे, अर्थातच, मार्क्सच्या शोषणरहित, आत्मभ्रंशरहित (अन्-अेलिइनेटिड्), माणुसकीप्रधान, माणसातल्या विविधांगी निर्मितिक्षमतेला जास्तीतजास्त वाव देणाऱ्या खऱ्या साम्यवादी समाजाचे स्वप्न किंवा दृष्टी (विजन्) आहे. मार्क्सने आपल्या German Ideology मध्ये विकासाची व्याख्याच पुढीलप्रमाणे केली आहे, "परिस्थिती व दैव यांच्या व्यक्तीवरील वर्चस्वाच्या जागी परिस्थिती व दैव यांच्यावरील व्यक्तींचे वर्चस्व प्रस्थापित करणे." या दृष्टिकोणातून विचार केल्यास माओ आणि गांधीजींच्या विचारा-आचारांतील काही घटकांचे क्रांतिकारी महत्त्व प्रकर्षाने लक्षात येऊ लागते. 'साम्यवादी माणूस' निर्माण करण्यासाठी माओने विशेषीकरणाचे स्तोम मुद्दाम कमी करण्याचे केलेले प्रयत्न (खेडे व शहर; शारीरिक व बौद्धिक श्रम; शेती व उद्योगधंदे इ. मधील फरक कमी करणे व त्यामुळे उत्पादनात घट झाल्यास ती पत्करणे), जनतेच्या संघर्षयुक्त सहभागावर व त्यातून निर्माण होणाऱ्या ज्ञानावर दिलेला भर, कम्यून्‌च्या पातळीपासून राष्ट्रीय पातळीपर्यंत स्वावलंबनाला दिलेला अग्रक्रम इ. प्रयोगांमधील धाडसीपणा आणि त्या प्रयोगांना चीनसारख्या प्रचंड, गरीब देशात (जे काही माओच्या मृत्यूपर्यंत) आले ते यश हे—सगळेच आश्चर्यकारक, काहीसे उत्साहवर्धक, परंतु माओच्या मृत्यूनंतरच्या 'घूम जाव' घटना पाहाता काहीसे खिन्न करणारे आहे.

परंतु मला व्यक्तिशः असे वाटते की, गांधींचे विचार, आणि गांधी व बुद्ध यांच्या विचारांवर लुब्ध झालेल्या शूमाकर यांच्या लिखाणातील विचार हे तितकेच, (किंबहुना अधिकच) सुज्ञ, सध्याच्या भोगवादाच्या विनाशकारक चक्रव्यूहात सापडलेल्या जगाचे डोके ठिकाणावर आणण्यासाठी अधिक महत्त्वाचे आहेत. बाह्य परिस्थितीवरील नियंत्रणापेक्षाही व्यक्तीने आपल्या अंतर्गत परिस्थितीवर म्हणजेच इच्छांवर व वर्तनावर वर्चस्व स्थापन करण्याचा अत्यंत महत्त्वाचा, अत्यंत गंभीर अर्थाने 'मूलगामी' असा विचार गांधींनी ठासून मांडला आणि 'विकासा'च्या संकुचित संकल्पनेला एक निराळे अहिंसक, शांतीचे, प्रेमाचे, प्रसन्न परिमाण प्राप्त करून दिले. त्यामुळे, माणसाच्या इच्छा, त्याच्या एकूण व्यवहारांची (अॅक्टिविटीज्) संख्या व गुणवत्ता, तो वापरीत असलेल्या तांत्रिकीचा त्याच्या कल्याणाशी असलेला संबंध, माणसाची

स्वयंसिद्ध प्रतिष्ठा इ. गोष्टींचा मुळापासून पुनर्विचार करण्याची गरज भासू लागली आहे. खऱ्या 'साम्यवादी' समाजात उच्च तंत्रज्ञानामुळे वस्तूंचे वैपुल्य निर्माण झालेले असेल आणि त्यामुळे व्यक्तींना नीतिमानपणे वागणेही आपोआप शक्य होईल असे काहीसे मार्क्सच्या 'स्वप्ना'त असावेसे वाटते. परंतु, यात, सध्या खूप चर्चा होत असलेला भौतिकीतील 'एंट्रपी' (entropy) चा सिद्धांत मार्क्सने लक्षात घेतलेला नाही असे काही विचारवंतांचे म्हणणे आहे. तो जर लक्षात घेतला तर, मार्क्सने उच्च तांत्रिकीकडून ठेवलेल्या अपेक्षा अवास्तव ठरतात आणि अशा प्रसंगी आपल्या इच्छांनाच आतून आवर घालण्याचा गांधींचा (किंवा बुद्धाचा) आग्रह किंवा प्राचीन चिनी तत्त्वज्ञानातील 'यिन्' (Yin) हे सौम्यतेचे तत्त्व या गोष्टीच वनस्पती, प्राणी व इतर सृष्टीसकट मानववंशाच्या टिकून राहाण्याच्या दृष्टीने अधिक महत्त्वाच्या ठरतात.

या सगळ्यांवरून असे म्हणावेसे वाटते की, 'विकास' म्हणजे, अहिंसा, अपरिग्रह यांसारख्या शांतीला अनुकूल अशा मूल्यांच्या आधारे उचित अशा सामाजिक संस्था, तांत्रिकी यांची व्यवस्था निर्माण करत, माणुसकीपूर्ण समाज बांधण्यासाठी मानवी समाजांनी केलेले बदल. थोडक्यात 'विकास' म्हणजे, अमानुष होण्यापासून स्वतःला वाचवण्याचे व माणूस होण्यासाठी केलेले वैयक्तिक व सामूहिक प्रयत्न.

'विकास' या संकल्पनेचा अर्थ लावण्याच्या या अंतिम टप्प्यावर आपण स्वतःला एका गोष्टीचे स्मरण करून देणे योग्य ठरेल. भारताने स्वातंत्र्योत्तर काळात काय साधले (वा साधले नाही) या प्रश्नाचे उत्तर देता येण्यासाठी 'काय घडावे' या संबंधीची आपली धारणा शक्यतो स्पष्ट असणे आवश्यक आहे; परंतु या कळीच्या प्रश्नाचा विचार करण्याच्या पद्धतींमध्येच एक प्रकारची रोचक बेबंदशाही निर्माण झाली आहे व त्यामुळे भारताच्या कामगिरीच्या मूल्यमापनाबद्दल एक प्रकारची अनिश्चितता, संदिग्धता निर्माण झाली आहे असे आपण सुरुवातीलाच म्हणालो होतो. या विधानाचा प्रत्यय वाचकांना आला असेल अशी आशा आहे. भारताची कामगिरी चांगली, की वाईट, की बरी या प्रश्नाचे उत्तर चांगल्या-वाईटाचे निकष आपण कोणते ठरवतो यावरून ठरेल ; या प्रश्नाला तसे 'वस्तुनिष्ठ', 'शास्त्रीय' उत्तर नाही हे स्पष्ट झाले असावे अशीही आशा आहे.

अगदी शेवटी चर्चिलेला व प्रस्तुत लेखकाच्या जिव्हाळ्याचा असा जो दृष्टिकोण आहे त्यानुसार विचार केल्यास भारताची वाटचाल एकंदरीत अधोगतीची आहे. बेताल औद्योगीकरण, शेतीच्या व्यापारीकरणावर भर, सर्व प्रकारच्या विशेषीकरणाला प्रोत्साहन (म्हणजेच प्रत्येक पातळीवरच्या स्वावलंबनाला मूठमाती) या गोष्टी पश्चिमेच्या अंध अनुकरणातून आलेल्या आहेत— ज्या पश्चिमेतच बुद्ध आणि गांधींच्या विचार-आचारांचे गंभीरपणे मंथन होऊ लागले आहे. २१ व्या शतकाच्या दिशेने सुरू झालेल्या घोडदौडीने या अनुकरणजन्य अधोगतीला आणखीनच वेग येणार आहे.

आधुनिकीकरणाच्या अमली सेवनातून निर्माण झालेल्या या विनाशकारी घोडदौडीतून काही बरे निर्माण होईल असे वाटण्यासारखी परिस्थिती आज नाही असे प्रामाणिकपणे वाटते.

अधिक वाचनासाठी संदर्भयादी :

[टीप : लेख तयार करताना उपयोगी पडलेल्या साहित्याचा उल्लेख त्या त्या ठिकाणी केलेला आहेच. त्या संदर्भांव्यतिरिक्त ज्यांचा उपयोग होऊ शकेल असे वाटते, त्यांतील महत्त्वाचे खाली देत आहे. त्यांतून आणखी अनेक संदर्भ मिळतीलच.]

I विकासाच्या संकल्पनेशी संबंधित :

(i) पॉल स्ट्रीटन् व इतर, फर्स्ट थिंग्ज् फर्स्ट (ऑक्सफर्ड, १९८२).

(ii) ईवान् इलिच्, शॅडो वर्क (मेरिअन् बॉयर्स, लंडन, १९८१).

अनुक्रमणिका

(iii) बिर्ला इन्स्टिटयूट ऑव् सायंटिफिक् रिसर्च, डिवेलपमंट ॲण्ड वेलफेअर इंडिकेटर्स (ॲलाइड, नवी दिल्ली, १९८२).
(iv) एफ्. काप्रा, द टर्निंग पॉइंट (फॉयना, १९८२).
(v) एरिक फ्रॉम्, टु हॅव ऑर टु बी (बँटम्, न्यू एज्, १९७६).
(vi) विल्यम् लेइस्, द लिमिट्स् टु सॅटिस्फॅक्शन् (मॅरिअन् बॉयर्स, १९७८).
(vii) अमृतानंद दास, फाउंडेशन्स् ऑव् गांधिअन् इकनॉमिक्स (ॲलाइड, १९७९).
(viii) पार्क लुट्झ व केनिथ लुक्स, द चॅलिंज ऑव ह्यूमनिस्टिक् इकनॉमिक्स् (बेंजमिन् / कमिंग्ज्, १९७९).
(ix) मासानोबू फुकुओका, दि वन् स्ट्रॉ रेवलूशन् (फ्रेंड्स् रूरल सेंटर, रसूलिया, म. प्रदेश, १९७८).

II **‘ तिसरे जग ’ व विशेषतः भारत यांच्याशी संबंधित :**

(i) मायकल् टोडारो, इकनॉमिक् डिवेलपमंट् इन् द थर्ड् वर्ल्ड् (लाँगमन, १९८१).
(ii) जेरल्ड एम्. मिअर, इमर्जिंग फ्रॉम पॉवर्टी (ऑक्सफर्ड, १९८४).
(iii) बी. के. जोशी (संपादक), ऑल्टरनटिव् डिवेलपमंट् स्ट्रॅटिजीज् ॲण्ड इंडिअन् इक्स्पीरिअन्स् (हिमालया, १९८४).
(iv) प्रमित चौधरी, दि इंडिअन् इकॉनमी (विकास, १९७८).
(v) चार्ल्स के. विल्बर, संपा.– द पलिटिकल इकॉनमी ऑव् डिवेलपमेंट ॲण्ड अंडर डिवेलपमंट (रॅण्डम हाउस, १९७८).

⊙ ⊙ ⊙

Registered No. SAT- 19 and Licenced to post without per-payment-Licence No. 6

हे मासिक श्री. ग. दीक्षित यांनी दी प्राज्ञ प्रेस, २१५ गंगापुरी, वाई येथे छापून म. पुं. रेगे यांनी प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई यांच्याकरिता तेथेच प्रसिद्ध केले